सुलभ-संतवाङ्मय-माला—ग्रन्थांक ४ ( ३ )

न. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं न. १८०९

श्री एकनाथ महाराजकृत

# श्रीभावार्थरामायण

## भाग तिसरा

## सुंदरकांड

( महत्त्वाच्या टीपा, शीर्षकें व पाठभेदांसह )

★

जगन्नाथ रघुनाथ घारपुरे
संपादक

RFFBK-0010564

आवृत्ति पहिली

१९५८

सुलभ-संतवाङ्मय-माला—ग्रन्थांक ४ ( ३ )

श्री एकनाथ महाराजकृत

# श्रीभावार्थरामायण

## भाग तिसरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 22060 ... वि. 3104
दाखल 7709 ... नों. दि. 26/3/58

## सुंदरकांड

( महत्त्वाच्या टीपा, शीर्षकें व पाठभेदासह )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 90467

★

जगन्नाथ रघुनाथ घारपुरे
संपादक

REFBK-0010564

आवृत्ति पहिली सर्व हक्क स्वाधीन १९५८

मुद्रक : श्री. स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्‌एल्‌.बी., नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना, ४१ बुधवार, पुणें २.
प्रकाशक : श्री. सौ. रुक्मिणीबाई गोविंद मोडक, श्रीज्ञानेश्वरी वाचन मंदिर,
१८ शुक्रवार पेठ, पुणें २.

# निवेदन

मागील भाग प्रसिद्ध झाल्यानंतर बऱ्याच अवधीनतर **हा तिसरा भाग** म्हणजे **सुंदरकांड** प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे. त्याच्या नावाप्रमाणें व त्यातील वर्ण्य विषय व प्रसंगावरून त्या काडाचें **सुंदरकांड** हेंच नामाभिधान सार्थ आहे असें वाटतें. हें 'उदार गंभीर सुंदरकांड' भावार्थ रामायणाचा गाभाच आहे. भावार्थ रामायण हा सर्व ग्रंथच त्याच्या प्रासादिक ओजस्वितेमुळें व त्यातील वर्ण्य विषय व व्यक्तींच्या उदात्ततेमुळें सर्वांगसुंदर झाला असून हा वाङ्मयाचा भाग वाचून होणारा आनंद अवर्णनीय आहे असेंच कोणाही वाचकास वाटणें साहजिक आहे. ह्या ग्रंथातील **संहिता** म्हणजे **मूळ** सहा भागात प्रसिद्ध झाल्यावर सातव्या भागांत **श्रीएकनाथ-महाराजांचें** चरित्र, चारित्र्य, व्यक्तिमात्र, वाङ्मयविस्तार व वैशिष्ट्यें, त्यांची रचना-पद्धती, स्वभाववर्णन, भाषासौष्ठव, अलंकार-पद्धती व मराठी वाङ्मयातील त्यांचें स्थान इत्यादि गोष्टींचा साकल्येंकरून विचार सातव्या भागात केल्यास योग्य होईल असें वाटल्यानें त्या भागाची स्वतंत्र योजना केली आहे. ईशकृपा व वाचकाची सदिच्छा व सहानुभूती या हें सर्व यथोद्दिष्ट पार पाडोत अशी त्या जगन्नियंत्या परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

मिति फाल्गुन शु. ५, १८७९
सोमवार ता. २४ फेब्रुवारी १९५८
ज्ञानेश्वरी वाचन-मंदिर, पुणें.

जगन्नाथ रघुनाथ धारपुरे

# संपादकीय

प्रस्तुत भागाच्या पाठनिश्चितीच्या कामीं खालीं निर्दिष्ट केलेल्या हस्तलिखित व मुद्रिताचा उपयोग करण्यांत आला आहे —

**मुद्रितें-क्रमांक** ( १ ) निर्णयसागर छापखान्यात १९२४ सालीं छापलेली प्रत पुस्तकी आकार. अ

( २ ) पुणें येथें ' ज्ञान-चक्षु ' छापखान्यात छापलेली पोथी श्री. गंगाधर गोविंद सापकर व त्याचे बंधु यांनीं संपादिलेली. ब

( ३ ) महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणें येथील संग्रहांतून मिळालेली सर्व कांडें असलेली पोथी. क्ष

( ४ ) डेक्कन कॉलेजात मिळालेलें पांच कांडें असलेलें पुस्तक पुणें येथें छापलेलें. ड

येणेंप्रमाणें साधनसंपत्ति आजपावेतों उपलब्ध झालेली आहे. त्याबद्दल व तिचा उपयोग करितां आल्याबद्दल आनंद व त्या त्या संस्था व व्यक्तींस धन्यवाद—इति शम्

जगन्नाथ रघुनाथ घारपुरे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 23060 . वि: 3164
क्रमांक 2809 नों: दि: 29/3/58

# अनुक्रमणिका

## सुंदरकांड [ १ ते २७४ (४२) ]


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| | **अध्याय १ ला ( पा. १ ते ६ )** | |
| | रामस्तवन | १ |
| १–६ | रामनामाची थोरवी | १ |
| ७–१० | लंकेच्या उच्च भागावर बसून मारुती पुढील बेत आखतो | १ |
| ११–२१ | लंकेचें वर्णन व अभेद्यत्व | २ |
| २२–३४ | वानर किंवा राक्षसरूप घेऊन कार्य सिद्धि होणें कठीण | २ |
| ३५–४७ | अत्यंत सूक्ष्म रूपानें लंकेंत प्रवेश | ३ |
| ४८–६० | ब्रह्मराक्षस वसति, शैवदीक्षा, त्रिपुंडधारी वगैरे विविध राक्षस जाती | ३–४ |
| ६१–८२ | अग्निहोत्री, क्षत्रिय, चारादिकांचीं घरें शोधिलीं | ४–५ |
| ८३–१२० | व्यवहारी | ५–६ |
| १२१–१२९ | सर्व स्थळें शोधून पुढें चालला | ६ |
| | **अध्याय २ रा ( पा. ६ ते १३ )** | |
| १–२ | नगरशोधन झाल्यावर राजवस्तींत हनुमान जातो | ६–७ |
| ३–२९ | उच्च उड्डाणानें प्रहस्तादिकांचीं घरें शोधितो | ७–८ |
| ३०–४२ | हीं घरें पाहत असता दृष्टीसमोर आलेले एकांतप्रसंग | ८ |
| ४३–६४ | हीं दृश्यें ब्रह्मचर्यविघातक म्हणून हनुमताचा उद्वेग | ८–९ |
| ६५–९८ | इंद्रजिताच्या भुवनात–भुवनवर्णन–सुलोचनादर्शन–सीतेविषयीं आलाप व संताप | ९–११ |
| ९९–११३ | कुंभकर्णाचें भुवन | ११ |
| ११४–१५६ | बिभीषणाचें घर | ११–१३ |
| | **अध्याय ३ रा ( पा. १४ ते १९ )** | |
| १–१७ | बिभीषणाचें मंदिर, बाजार पेठा वगैरे सर्व पाहून सीता शुद्धि झाली नाहीं | १४ |
| १८–२२ | सीता आणिल्यामुळें हा प्रसंग आला–पौर जनाचा कलकलाट | १४–१५ |
| २३–४५ | राजभवनाकडे जाणाऱ्या मानकन्यांवर पुच्छ प्रयोग. अश्वारूढ, गजारूढ, रथारूढ, शिबिकारूढाची दैना | १५ |
| ४६–५२ | इतर मानकन्यांवर त्याप्रमाणें प्रयोग | १५–१६ |
| ५३–६५ | मल्लाचा संघर्ष, वारेवाले, वाजंत्री वेदपाठक वगैरे | १६ |
| ६६–७० | रावणाचे सभेंत हेराचा वृत्तान्त; सर्वत्र अंधार | १६ |
| ७१–७८ | पूर्वीच्यांनीं दुर्लक्ष केल्याचा परिणाम | १६–१७ |
| ७९–८७ | अशा वार्ता आणणाऱ्यास शासन | १७ |
| ८८–१०६ | त्याचे परिणाम. सर्वत्र अंधार, सर्वत्र गोंधळ, सीताहरणाचे परिणाम | १७–१८ |
| १०७–११२ | रावणाचा मुकुट ओढून पाडणें, शीर्षावर आघात | १८ |
| ११३–१३७ | दिवे आल्यावर दृष्टीस पडलेलें विचित्र दृश्य | १८–१९ |
| | **अध्याय ४ था ( पा. १९ ते २५ )** | |
| १–८ | पुष्कळ शोध करूनही सीतेचा शोध लागत नाहीं | १९–२० |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ९–१४ | त्यामुळें हनुमंताची चिंता | २० |
| १५–१६ | किंवा रावणानेंही खाल्ली असेल | २० |
| १७–१८ | अथवा त्याच्या पत्न्यांनींही | २० |
| १९–२७ | मारुतीचें दुःख | २० |
| २८ | त्या वार्तेचे परिणाम | २० |
| २९–३४ | गुरुजवळ विकल्परहित सर्व सागावें | २०–२१ |
| ३५–४२ | ह्या वार्तेचे परिणाम, सूर्यवंश व वानरवंश नष्ट होईल | २१ |
| ४३–४५ | बरें, मी येथेंच राहणें बरें नाहीं | २१ |
| ४६–५४ | त्याचे परिणाम | २१–२२ |
| ५५–५७ | त्यामुळें हनुमंतास आल्हाद व आत्मविश्वास | २२ |
| ५८–६० | प्रयत्नाची प्रशसा व फळ | २२ |
| ६१–६४ | हनुमंतास उल्लास व पुढील बेत | २२ |
| ६५–६८ | पुढील प्रयत्नाची दिशा व निश्चय | २२ |
| ६९–७० | हनुमताचा सूक्ष्म रूपानें रावण-गृहात प्रवेश | २२–२३ |
| ७१–८४ | तेथील वर्णन | २३ |
| ८५–९९ | कामग विमान | २३–२४ |
| १००–१०२ | रावणाचें निजभुवन | २४ |
| १०३–१०८ | त्याचें शयनस्थान | २४ |
| १०९–११७ | त्याची स्थिति | २४–२५ |
| ११८–१२० | रावणाच्या शय्या | २५ |
| १२१–१२२ | मंदोदरी दर्शन | २५ |
| १२३–१२५ | तीच सीता असा हनुमताचा समज व त्याची मनःस्थिति | २५ |
| १२६–१३१ | सभेतील विघ्नाबद्दल रावणाचें शान्तिकर्म | २५ |

अध्याय ५ वा ( पा. २५ ते ३० )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १– | रावणाचा शान्तिहोम | २५ |
| २–१२ | मदोदरीलाच सीता समजून हनुमताचे विचार व मनोविकार | २५–२६ |
| १३–१४ | होमसमाप्तीनतर मदोदरी रावणाची पूजा करते | २६ |
| १५–२५ | तें पाहून हनुमताचा कोप | २६ |
| २६–२७ | त्याचे आधीं सत्यान्वेषणाचा विचार | २७ |
| २८–३० | क्रोधाचे परिणाम | २७ |
| ३१–४६ | दोघांचा संवाद, मदोदरीचें स्वप्न | २७ |
| ४७ | रावणाचें सांत्वन | २७ |
| ४८–५० | मंदोदरीची विनंती | २७ |
| ५१–५३ | सीतेचा ठाव लागल्यानें हनुमताला आनद व पुढील बेत | २८ |
| ५४–६६ | सीतेच्या नामनिर्देशानें रावणाचा चित्तक्षोभ | २८ |
| ६७–७३ | रावणानें योजिलेली युक्ती | २८ |
| ७४–८१ | दूतिकाप्रेषण | २८–२९ |
| ८२–८९ | मारुतीनें केलेलें दूतिकानुगमन | २९ |
| ९०–९६ | सीता व अशोक | २९ |
| ९७–१०४ | सीतादर्शनानें हनुमताला झालेला हर्ष | २९–३० |

अध्याय ६ वा ( पा. ३० ते ३६ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–२ | सीतेची देहस्थिति | ३० |
| ३–११ | अतर्यामीं भजनभक्ती, वाचिक श्रवण, घ्राण, त्वचेनें | ३० |
| १२–१५ | अनन्यता | ३० |
| १६–१८ | याप्रमाणें हनुमंतास दिसली त्याचें कारण | ३० |
| १९ | मंदोदरी हीच सीता असा हनुमतास भास कां झाला | ३० |
| २० | मूळ कथा | ३० |
| २१–२२ | कैकसीची पञ्चधान्य पिष्टाची पञ्चवक्त्र-लिंगपूजा | ३१ |
| २३–२८ | शिवरात्रीला ध्यानस्थ असतां इंद्रानें लिंग समुद्रांत टाकलें | ३१ |
| २९–३० | कैकसीचा आक्रोश | ३१ |
| ३१–३३ | रावणाचें आश्वासन | ३१ |
| ३४–३६ | कैकसीचें असमाधान | ३१ |
| ३७–४० | आत्मलिंग आणण्याकरिता रावण कैलासास जातो | ३१ |
| ४१–४५ | शकराचें दुर्लक्ष | ३१ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ४६–४७ | श्रृंगीच्या झणत्कारांत शिव तल्लीन | ३२ |
| ४८–४९ | रावणाचें शिरार्पण व गायन | ३२ |
| ५०–५१ | प्रसन्न होऊन शंकराचें वरदान | ३२ |
| ५२–५३ | रावणाला दहा शिरें, वीस भुजा, व अमृताची कुपी | ३२ |
| ५४–५५ | शिव रावणाचें अभीष्ट देण्यास उत्सुक | ३२ |
| ५६–५७ | पार्वती व आत्मलिंग रावण मागतो | ३२ |
| ५८–६१ | शंकराचें आश्चर्य, परंतु वरदानानें बद्ध, म्हणून दोन्ही देतात | ३२ |
| ६२–६४ | आत्मलिंगासंबधानें शंकराचा इषारा | ३२ |
| ६५–६६ | दोन्ही घेऊन रावण जातो | ३२ |
| ६७–७२ | उमा विष्णूचा धांवा करिते | ३२–३३ |
| ७३–७४ | पार्वतीस सोडविण्यात गणेश व कुमार यांची असहायता | ३३ |
| ७५–७६ | विष्णु व या दोघांची भेट व सगनमत | ३३ |
| ७७–७८ | विष्णु धर्मऋषि होतात, कुमार शिष्य व गणपति गोपाळ | ३३ |
| ७९–८० | शिष्य-रावण-संवाद | ३३ |
| ८१–८६ | उमेची विकृती व रावणाचा उद्वेग | ३३ |
| ८७ | रावणाची शंकराकडे धाव | ३३ |
| ८८–८९ | विष्णूनें केलेली मंदोदरीची उत्पत्ती | ३३ |
| ९०–९२ | मंदोदरी शब्दाची व्युत्पत्ती | ३३–३४ |
| ९३–९४ | विष्णू ती पुतळी शिवाच्या आसनाखालीं घालतात | ३४ |
| ९५–१०५ | रावणाचा राग व अधिक्षेप व शिवाची प्रतिक्रिया | ३४ |
| १०६–११० | रावणाचें प्रयाण व मार्गांत मूत्रोत्सर्गाचा विकार | ३४ |
| १११–११७ | गणेशास लिंग घेण्याची विनंती, त्याची सशर्त संमति | ३४–३५ |
| ११८–११९ | रावणाचा मूत्रातिरेक, गणेशाची हांक व लिंगप्रक्षेप | ३५ |
| १२०–१२५ | रावणाचा उद्वेग व लिंगोद्धरणाक्षमता | ३५ |
| १२६–१२८ | त्याचा शोक | ३५ |
| १२९–१३३ | पंचलिंगोत्पत्ती | ३५ |
| १३४–१३६ | गोकर्ण महाबळेश्वर व ब्रह्मनिर्मित महाबळेश्वर भिन्न | ३५ |
| १३७ | ह्या कथेचा आधार ब्रह्मोत्तरखंड | ३५ |
| १३८–१४३ | मारुतीला वाटलेलें सीता-मंदोदरी-साम्य | ३५–३६ |
| | **अध्याय ७ वा ( पा. ३६ ते ४२ )** | |
| १–२ | मारुतीचें अशोकवनात आगमन | ३६ |
| ३–१९ | अशोकवन वर्णन | ३६ |
| २०–२१ | हनुमताचें प्राकारगमन | ३७ |
| २२–३३ | तेथून दृष्टीस पडलेली रमणीयता | ३७ |
| ३४–३५ | व सुरक्षितता | ३७ |
| ३६–४५ | तेथील देवळें व प्रासाद राक्षसांनीं सुरक्षित | ३७–३८ |
| ४६–५३ | सीतेची अतर्क्य स्थिती | ३८ |
| ५४–६१ | सीतेचे ठाणमाण | ३८ |
| ६२–६७ | शांत व निर्भय वृत्ति | ३९ |
| ६८–७९ | अखंड नामस्मरण, नाममहिमा | ३९ |
| ८०–८३ | हनुमताला भेटीची उत्सुकता | ३९ |
| ८४–८८ | म्हणून सर्वतो निद्रा येई पावेतों थांबण्याचा निश्चय | ४० |
| ८९–९४ | अरुणोदयवेळा व वर्णन | ४० |
| ९५–१०५ | हनुमंताची उत्सुकता व सूर्याचें अस्तगमन | ४० |
| १०६–११५ | रावणाची मन:स्थिति, सीतेचें चिंतन | ४१ |
| ११६–११९ | सर्वत्र शांतता प्रस्थापित | ४१ |
| १२०–१२५ | रावणाची अस्वस्थता | ४१ |
| १२६–१३६ | सीतेकडे जाणें. स्त्रियांचा परिवार | ४१–४२ |
| १३७–१४० | रावणाचे आगमनानें हनुमताचा कोप | ४२ |
| १४१–१४७ | पंचोन्मत्त रावणाचे वर्तनावरून पुढील उपक्रम | ४२ |
| | **अध्याय ८ वा ( पा. ४२ ते ५० )** | |
| १–६ | रावणाच्या आगमनानें झालेली सीतेची स्थिति | ४२–४३ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ७–८ | अंतरीं सतत रामचिंतन | ४३ |
| ९–४२ | रावणाचें भाषण, आत्मश्लाघा, रामनिंदा | ४३–४४ |
| ४३–५२ | सीतेचा रोष | ४४–४५ |
| ५३–६९ | सीतेचें उत्तर, रावणाला धिक्कार, अधिक्षेप | ४५–४६ |
| ७०–७६ | रावणाचा क्रोध व सीतेला धमकी | ४६ |
| ७७–८७ | श्रीरामाच्या दैन्यावस्थेचें चित्रण | ४६ |
| ८८–९४ | डमरुपुराणांतर्गत ऋषिभाष्य | ४६–४७ |
| ९५–९७ | त्याचा अर्थ | ४७ |
| ९८–११७ | रावणाचा क्रोध व सीतेचा अधिक्षेप व निर्भर्त्सना | ४७–४८ |
| ११८–१२२ | मारुतीचा विस्मय | ४८ |
| १२३–१२६ | श्रीराम-महिमा | ४८ |
| १२७–१२९ | श्रीराम निंदेनें सीतेचा कोपाविष्कार | ४८ |
| १३०–१३७ | कोपसंयमन, कामक्रोधाचे परिणाम | ४८–४९ |
| १३८–१४५ | रावणाला भावी घटनांचें कथन | ४९ |
| १४६–१४९ | रामबाणाचा महिमा | ४९ |
| १५०–१५२ | रावणाच्या निंद्य कृत्याबद्दल त्याचें निर्भर्त्सन | ४९ |
| १५३–१५६ | रावणाचा क्रोध | ४९ |
| १५७–१६१ | मारुतीचा आवेश | ४९–५० |
| १६२–१६७ | मंदोदरीचें आगमन | ५० |


अध्याय ९ वा ( पा. ५० ते ५४ )


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४ | मंदोदरीचा अनुनय | ५० |
| ५–९ | सीताहरणामुळें होणारे भावी अनर्थ | ५० |
| १०–१३ | परदारासक्तिनिंदा | ५०–५१ |
| १४–२२ | नारदोक्ति कथन | ५१ |
| २३–२६ | रावणाचा ब्रह्मदेवास प्रश्न | ५१ |
| २७–३० | ब्रह्मदेवाचें कथन | ५१ |
| ३१–३६ | सेतुबंधमाहात्म्यांतर्गत–कौसल्या-दशरथ-विवाह-वर्णन | ५१ |
| ३७–४५ | कौसल्येला पेटींत घालून समुद्रार्पण | ५२ |
| ४६–५२ | त्याप्रमाणेच दशरथावर आक्रमण व समुद्रार्पण | ५२ |
| ५३–६९ | दशरथ-कौसल्या-मीलन, अन्योन्य वृत्तकथन | ५२–५३ |
| ७०–८६ | उभयतांचा विवाह | ५३ |
| ८७–९१ | रावणाच्या दर्पगर्भ प्रश्नास ब्रह्मदेवाचें उत्तर | ५३–५४ |
| ९२–९५ | रावणानें पेटी आणविता दशरथ-कौसल्या दर्शन | ५४ |
| ९६–१०० | रावण वधोद्यत; मंदोदरीचें निवारण | ५४ |
| १०१–१०९ | मंदोदरीची सूचना व कौसल्या-दशरथास अयोध्येस धाडणें | ५४ |


अध्याय १० वा ( पा. ५४ ते ६० )


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४ | सीतेला रावणाच्या धमक्या | ५४–५५ |
| ५–७ | त्याच्या पत्न्यांनीं तिचें आश्वासन केलें | ५५ |
| ८–१३ | रावणाला ब्रह्मशाप | ५५ |
| १४–२५ | रावणाचे सांगण्याप्रमाणें राक्षसीचें सीतेला भिवविणें | ५५–५६ |
| २६–३२ | शूर्पणखेच्या वल्गना | ५६ |
| ३३–३४ | सीतेनें दर्शविलेली अवहेलना | ५६ |
| ३५–३६ | शूर्पणखेचा कोप | ५६ |
| ३७–४० | सीतेची निर्भय व शांत वृत्ति | ५६ |
| ४१–४५ | सीतेचा रामावरील अचल भाव | ५६–५७ |
| ४६–५४ | त्याचा राक्षसींवर परिणाम | ५७ |
| ५५–६० | राम-सीता दर्शन | ५७ |
| ६१–६६ | रावणादींची स्थिति | ५७–५८ |
| ६७–७१ | सीतेचें दुःख | ५८ |
| ७२–७४ | राम शोधावयाला न येण्याचें कारण | ५८ |
| ७५–८२ | शुद्धिदानाचें फल | ५८ |
| ८३–१०३ | हनुमानाची मन:स्थिति | ५८–५९ |
| १०४–१११ | सीतेला एकांतात भेटण्याचा निश्चय | ५९–६० |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| | **अध्याय ११ वा ( पा. ६० ते ६५ )** | |
| १–२५ | मागील गोष्टींचें स्मरण व सीतेचा अनुताप | ६०–६१ |
| २६–२७ | हनुमत मुद्रा टाकितो | ६१ |
| २८–३८ | त्याचा सीतेवर परिणाम | ६१ |
| ३९–८० | जानकीचें अवलोकन व मुद्रिकेशीं भाषण | ६१–६३ |
| ८१–८३ | सीतेला आलेली मूर्च्छा | ६३ |
| ८४–८८ | त्यामुळें हनुमत घाबरले | ६३ |
| ८९–१०४ | श्रीराम वृत्तान्त कथन | ६४ |
| १०५–११० | ते ऐकून सीता सावध होते व तो पाठविणाऱ्याला भेटीला बोलावते | ६४ |
| १११–११३ | मारुतीचें खालीं उतरून सीतेला वंदन | ६४ |
| ११४–११६ | मारुतीचा आनंद व सात्त्विक भाव | ६५ |
| ११७–१२५ | सीतेची शंका, खरा दूत की प्रच्छन्न राक्षस ? | ६५ |
| १२६–१२९ | पूर्ववृत्तान्त जिज्ञासा | ६५ |
| | **अध्याय १२ वा ( पा. ६५ ते ७२ )** | |
| १–८ | सीतेची हनुमंताला पूर्ववृत्त-कथनाची सूचना | ६५–६६ |
| ९–१३ | रामकथाश्रवण फळ | ६६ |
| १४–१६ | हनुमताचें कथन | ६६ |
| १७–३७ | श्रीरामवर्णन | ६६–६७ |
| ३८–४७ | श्रीरामदर्शन फळ | ६७ |
| ४८–४९ | लक्ष्मणवर्णन | ६७ |
| ५०–५६ | त्याचा सीतेवर परिणाम | ६७–६८ |
| ५७–५८ | रामलक्ष्मणाचें कुशल ऐकून सीतेला झालेला आनंद | ६८ |
| ५९–७२ | सीता हनुमताची स्तुति करिते | ६८ |
| ७३–७५ | हनुमंत सीतेजवळ खूण मागतात | ६८ |
| ७६–८४ | अथवा पाठीवर येण्याचें सुचवितात | ६९ |
| ८५–८९ | सीतेचें उत्तर. वाटेंत अडथळा किंवा अपघाताचें भय | ६९ |
| ९०–९२ | मारुतीचें उत्तर व सीतेची शंका | ६९ |
| ९३–९९ | मारुतीचें पुच्छप्रतापवर्णन व आश्वासन | ७० |
| १००–१०५ | रामावाचून पर-पुरुष-स्पर्श वर्ज्य | ७० |
| १०६–१२१ | मारुती सीतेला आपली व रामाची आप्तता सांगतात | ७०–७१ |
| १२२–१२४ | व स्वतःचें गुह्य कथन करितात | ७१ |
| १२५–१२७ | सीतेचा प्रश्न, रामाची आज्ञा काय आहे ? शुद्धि का स्वतःला आणणें ? | ७१ |
| १२८–१३७ | हनुमताचें उत्तर व सीतेचा निरोप | ७१ |
| १३८–१५० | सीता हनुमताजवळ खुणेचा मणी देते व लक्ष्मणाला क्षमापन सांगते | ७१–७२ |
| | **अध्याय १३ वा ( पा. ७२ ते ७८ )** | |
| १–११ | मणी पाहून श्रीरामचंद्रास गत गोष्टींचें स्मरण होईल तें सीता सांगते | ७२–७३ |
| १२–३० | खूण घेतल्यावर कुरापत काढावी म्हणून मारुती सीतेची आज्ञा मागतात | ७३ |
| ३१–३५ | पुढील परिणामपरंपरा मनांत आणून सीतेचा अनिश्चय | ७३–७४ |
| ३६–३८ | हनुमंताचा उद्वेगाविष्कार | ७४ |
| ३९–४० | सीतेचा कळवळा व क्षुधाहरणा-पुरती आज्ञा | ७४ |
| ४१–५३ | पुढील कार्याचा विचार व प्रारंभ | ७४ |
| ५४–६२ | विशेष वर्णन | ७४–७५ |
| ६३–८३ | रक्षकांची गडबड व समुद्रार्पण | ७५–७६ |
| ८४–८६ | राक्षसींची सीतेजवळ चौकशी | ७६ |
| ८७–९१ | सीतेचें उत्तर | ७६ |
| ९२–९८ | हनुमानाचें गुरकावणें व राक्षसींची तारांबळ | ७६ |
| ९९–११५ | रावणाकडे वृत्तान्त-कथन, रावणाचा संताप व सैन्य नियोजन | ७६–७७ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ११६–१२१ | सैन्याचा पाडाव व रावणाकडे निरोप | ७७–७८ |

अध्याय १४ वा ( पा. ७८ ते ८५ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–६ | वनविध्वंसामुळें रावणाचा कोप | ७८ |
| ७–४० | पराङ्मुख आल्यास अपमानाची धमकी देऊन प्रहस्तसुत जंबुमाळी पाठविला | ७८–८० |
| ४१–५४ | उभयतांचें युद्ध, जंबूचे परिघानें त्याचाच घात | ८० |
| ५५–६७ | त्याचे मातांचा शोकाक्रंद | ८०–८१ |
| ६८–७७ | पुच्छांत आवळून सर्वांचा एकत्र अंत | ८१ |
| ७८–७९ | रावणाचा संताप | ८१ |
| ८०–८५ | यूपाक्ष विरूपाक्षादि पांच सेनानी पाठविले | ८१–८२ |
| ८६–९९ | पांच बाजूनीं हल्ला व पांचांचाही पुच्छें करून एकदम नाश | ८२ |
| १००–१०१ | नंतर भुभुःकार करून देवालयावर बसला | ८२ |
| १०२–१०८ | रावणास समजल्यावर अखया कुमाराची योजना | ८२–८३ |
| १०९–११२ | प्रधानादि आप्तांचा असतोष | ८३ |
| ११३–१२१ | दुसऱ्या कोणास धाडण्याची विनंति | ८३ |
| १२२–१२८ | हनुमंत आणि अखयाचें आकाशांत युद्ध | ८३–८४ |
| १२९–१३८ | पुच्छानें रथ, ध्वज, सारथी यांचा नाश | ८४ |
| १३९–१५० | अखयास धरून गरगरा फिरवून शिळेवर आपटला, त्याचा अंत | ८४–८५ |

अध्याय १५ वा ( पा. ८५ ते ९२ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–१४ | अखयाच्या निधनानें रावण दुःखी | ८५ |
| १५–१७ | स्वतःच जाण्याची तयारी | ८५ |
| १८–२० | हें समजतांच इंद्रजिताचें आगमन | ८५ |
| २१–२४ | स्वतःला पाठविण्याची विनंति | ८५–८६ |
| २५–२९ | त्याला धाडण्याविषयीं रावण साशंक | ८६ |
| ३०–३२ | इंद्रजिताचें आश्वासन | ८६ |
| ३३–४३ | रावण त्याला पाठवितो व मायिक युद्धप्रकार सुचवितो | ८६–८७ |
| ४४–४६ | प्रस्थानाचे वेळीं अशुभ शकुन | ८७ |
| ४७–४८ | ब्रह्मयास विचारितां मरण न येण्याची खात्री | ८७ |
| ४९–५४ | रावणाचे विशेष आदेश | ८७ |
| ५५–५६ | मारुतीला बांधून आणण्याची इंद्रजिताची प्रतिज्ञा | ८७ |
| ५७–७६ | महान सैन्याची स्वारी | ८७–८८ |
| ७७–८४ | हनुमंताला आनंद व उल्लास | ८८ |
| ८५–८७ | पुच्छाला सर्वांचें निर्दळण करण्याची आज्ञा | ८८ |
| ८८–९५ | इंद्रजिताचें प्रस्थान | ८९ |
| ९६–१०४ | असाळीचें आगमन, तिचा आवेश व विक्राळ वदन पसरणें | ८९ |
| १०५–११५ | सूक्ष्म रूपानें तिच्या मुखांतून प्रवेश, व उदरांतून काळीज घेऊन निर्गमन | ८९–९० |
| ११६–११९ | असाळीचें निर्दाळण | ९० |
| १२०–१४६ | इंद्रजित व मारुती द्वंद्वयुद्ध | ९०–९१ |
| १४७–१५० | मारुतीच्या पराक्रमामुळें इंद्रजित चिंताक्रांत | ९१ |
| १५१–१६२ | इंद्रजिताचीं शस्त्रास्त्रें त्यावरच उलटतात | ९१–९२ |
| १६३–१८९ | मल्लयुद्धांतही इंद्रजित जर्जर | ९२ |

अध्याय १६ वा ( पा. ९२ ते ९६ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–२० | अवमानित इंद्रजिताचा उद्वेग व पलायन | ९२–९३ |
| २१–२८ | हनुमंताचा विवेक; पुच्छाशीं विचारविनिमय | ९३ |
| २९–७७ | हनुमंत व पुच्छानें केलेला सैन्यसंहार | ९३–९५ |
| ७८–८१ | जनांचा आक्रोश | ९५ |
| ८२–८४ | इंद्रजित मेल्याचा मवाद | ९५–९६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 23080 ... दि: 9144
क्रमांक 9809 ... नोंद दि 24/3/..

अनुक्रमणिका


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ८५–९० | रावणाचा शोक | ९६ |
| ९१–९४ | ब्रह्मदेवास पाचारण; ब्रह्मदेव स्वतः च अशोकवनात जातात | ९६ |
| ९५–१,२ | ब्रह्मदेव-हनुमत संवाद | ९६ |
| | **अध्याय १७ वा (पा. ९६ ते १०४)** | |
| १–१५ | इंद्रजिताची दैन्यावस्था; ब्रह्मदेवाचें स्मरण | ९६–९७ |
| १६–३५ | व त्याचें आगमन. इंद्रजिताची असहायता | ९७–९८ |
| ३६–४१ | ब्रह्मयाला दोष देतां राक्षसांच्या कपटवृत्तीमुळें पाश प्रभावी होत नाहीं | ९८ |
| ४२–४६ | पाशबद्ध होण्याविषयीं ब्रह्मदेवाची हनुमंतास विनंति | ९८–९९ |
| ४७–५१ | मान्य करून हनुमंतानें बांधून घेतलें | ९९ |
| ५२–६२ | पाशबद्ध हनुमंताशीं राक्षसांच्या चेष्टा व ओढाताण | ९९ |
| ६३–८९ | एवंभूत हनुमंताचा लंकेंत प्रवेश | ९९–१०० |
| ९०–९१ | रावणानें हनुमंतावर केलेला खड्गप्रहार निष्फळ | १०१ |
| ९२–१०० | हनुमंताचें हास्य; रावणाचा प्रश्न | १०१ |
| १०१–१०४ | प्रहस्ताकरवीं हनुमंतास प्रश्न | १०१ |
| १०५–१०८ | मारुतीचें कथन | १०१ |
| १०९–१५२ | रावणाचा प्रश्न. मारुतीचें उत्तर | १०१–१०३ |
| १५३–१५७ | बिभीषणास सांगणें | १०३ |
| १५८–१६८ | बिभीषणाची रावणास सूचना | १०३–१०४ |
| | **अध्याय १८ वा (पा. १०४ ते १०८)** | |
| १–८ | त्याविषयीं रावणाचा विचार | १०४ |
| ९–१२ | हनुमंतास त्याचें मरण विचारितो | १०४ |
| १३–१४ | हनुमंताचें उत्तर | १०४ |
| १५–२६ | रावणाचा अविश्वास व कारणें | १०४–१०५ |
| २७–३६ | रावणाच्या अविश्वासावर मारुतीची प्रतिक्रिया | १०५ |
| ३७–८४ | पुच्छ गुंडाळण्यास लंकेचें वस्त्रहरण | १०५–१०७ |
| ८५–९५ | तेलातुपाचा दुष्काळ | १०७ |
| ९६–१०१ | पुच्छ पेट घेईना | १०७–१०८ |
| १०२–११६ | मारुतीच्या सूचनेवरून रावण स्वतः फुंकूं लागला | १०८ |
| ११७–१२० | त्याबरोबर भडका उडून रावणाच्या दाढीमिशा जळाल्या | १०८ |
| | **अध्याय १९ वा (पा. १०९ ते ११७)** | |
| १–२४ | दाढीमिशा जळाल्यामुळें रावणाची उडालेली धांदल | १०९–११० |
| २५–२६ | मारुतीचा आंवाका | ११० |
| २७–२८ | तो मेला असें समजून राक्षसांची प्रतिक्रिया | ११० |
| २९–४३ | सीतेचा अविश्वास; मारुती मरणें अशक्य | ११० |
| ४४–१६३ | जळत्या पुच्छानें केलेला अनर्थ | ११०–११५ |
| १६४–१९३ | राक्षसांचें हनुमंतावर आक्रमण | ११५–११७ |
| १९४–२१६ | हनुमंताचें राक्षसशस्त्रागारात दडणें व आविष्कार | ११७ |
| | **अध्याय २० वा (पा. ११८ ते १२४)** | |
| १–८ | रावणाला अवमानून, लंका जाळून मारुती परतले | ११८ |
| ९–१७ | हनुमंताचे मनाची उल्लसित वृत्ति | ११८ |
| १८ | त्या वेळीं आलेला स्वेदबिंदु समुद्रांत पडून मगरीचे पोटांत गेला | ११८ |
| १९–२० | त्यापासून मकरध्वजाची उत्पत्ति | ११८ |
| २१–२७ | हनुमंताचें पुच्छ पेटवून त्याला जाळला असें राक्षसी सीतेला सांगतात | ११९ |
| २८–३० | सीतेचे दुःख | ११९ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ३१–३८ | लंका जाळून हनुमत परत गेला अशी क्षेमवार्ता सरमा सांगते | ११९ |
| ३९–४२ | सीतेला आनंद | ११९ |
| ४३–४४ | लंकादाहात सीताही भस्म झाली असावी असा हनुमताचा समज | १२० |
| ४५–५६ | त्यामुळें व पुढील कारणपरंपरेमुळें हनुमंताला उद्वेग | १२० |
| ५७–६० | क्रोधाचा प्रभाव व त्याची निंदा | १२० |
| ६१–६६ | क्रोध जिंकणारे नरांना धन्यवाद | १२०–१२१ |
| ६७–७२ | पुढें काय करावें हा विचार | १२१ |
| ७३–७४ | श्रीरामाचें स्तवन व प्रार्थना | १२१ |
| ७५–७९ | सीता भस्म होणें अशक्य असा आत्मविश्वास | १२१ |
| ८०–८१ | अग्नीनें जाळली असल्यास त्यास दंड | १२१ |
| ८२–८४ | वायूचें आश्वासन व हनुमताचें स्वास्थ्य | १२१ |
| ८५–९५ | परत लंकेंत जाऊन सीतेचें दर्शन | १२२ |
| ९६–१०० | सीतेचा आनंद, व विश्रांति घेऊन जाण्याची सूचना | १२२ |
| १०१–१०५ | हनुमताचें विश्रांतिस्थान श्रीरामचंद्र | १२२ |
| १०६–१०८ | तें ऐकून सीतेला सुख | १२३ |
| १०९–११४ | सीतेची शंका, वानर समुद्रोत्तरण कसें करतील | १२३ |
| ११५–१२१ | हनुमताचें आश्वासन, रामाच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास | १२३ |
| १२२–१२३ | सीतेला नमस्कार करून हनुमताचें उड्डाण. सीतेचा गहिंवर | १२३ |
| १२४–१३० | हनुमताचा आदेश, रामचरणीं लीनता | १२४ |
| | **अध्याय २१ वा ( १२४ ते १३१ )** | |
| १–४ | लंकादहनाचा परिणाम | १२४ |
| ५–६ | गजेंद्रोद्धरणाख्यान | १२४ |
| ७–१० | हें आख्यान श्रीशुकांनीं परीक्षितीला सांगितलें | १२४ |
| ११–३७ | त्रिकूट पर्वतावर गंडकीगिरींत मोठें सरोवर आहे | १२४–१२६ |
| ३८–३९ | त्या सरोवरांत एक महान् नक्र होता, तसाच त्या वनात मोठा गज होता | १२६ |
| ४०–४१ | ते दोघेहि ब्रह्मशापानें त्या योनींत गेले इन्द्रद्युम्न राजा गजेंद्र व हुहु गंधर्व नक्र | १२६ |
| ४२–४७ | पांड्य देशाचा राजा इन्द्रद्युम्न ध्यानस्थ असतां अगस्ती मुनींच्या अनादरामुळें गज झाला | १२६ |
| ४८–५२ | गर्वाचे प्रकार व त्याचे परिणाम | १२६–१२७ |
| ५३–५९ | साधूंच्या उपेक्षेचे परिणाम | १२७ |
| ६०–६४ | हूहू गंधर्व सरोवरांत क्रीडत असता ऋषींच्या पायांत झोंबल्यामुळें तो नक्र झाला | १२७ |
| ६५–७६ | दोघेही ऋषीस शरण गेल्यावर त्यांना उःशाप मिळाला कीं त्यांचें द्वंद्वयुद्ध जुंपल्यावर भगवताच्या कृपेनें उद्धार होईल | १२७–१२८ |
| ७७–८४ | त्यामुळें गजेंद्र सरोवरांत कधींही गेला नाहीं | १२८ |
| ८५–१०९ | उन्हाळ्यात कळपासह विहार करीत असतां तृषार्त होऊन सरोवरांत आला | १२८–१२९ |
| ११०–११७ | सोंडेनें उदक घेत असता नक्रानें सोंड भेदिली | १३० |
| ११८–१२८ | व दोघांची ओढाओढी चालू झाली | १३० |
| १२९–१४६ | याप्रमाणें हजार वर्षें युद्ध चालल्यावर गजेंद्र क्षीण झाला व त्यानें प्रभूचा धावा केला | १३१ |

## अध्याय २२ वा ( पा. १३२ ते १४२ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४७ | | १३२–१३३ |
| ४८–९२ | श्रीकृष्ण व श्रीरामचंद्र अवतार-साम्य व तुलना | १३४–१३५ |
| ९३–१४७ | गजेंद्राचे आर्त स्वरामुळें प्रभूचें आगमन व गजेंद्राचें उद्धरण | १३६–१३८ |
| १४८–१७१ | नक्राचे विनतीवरून त्याचाही उद्धार | १३८ |
| १७२–१७७ | गरुड वेगानें आल्यावर त्याच्या क्षुधाशांतीकरितां दोघांचे देह त्यास दिले | १३९ |
| १७८–१८२ | इतक्यात एका भ्रमग पक्ष्यानें दोन्ही कलेवरें धरिलीं | १३९ |
| १८३–१८७ | गरुडानें तिघानाही धरून उड्डाण केलें | १३९ |
| १८८–१९२ | कनकजांबूचे विनतीवरून त्याचे शाखेवर गरुड बसला | १३९–१४० |
| १९३ | त्याबरोबर ती शाखा कडाडली | १४० |
| १९४–२०१ | त्या शाखेवर साठ सहस्र वालखिल्य ऋषींना पीडा होऊ नये म्हणून गरुडाचें अधांत्रींच असणें | १४० |
| २०२–२०६ | गरुडानें श्रीभगवताचा धांवा केल्यावर कश्यप ऋषीचें दर्शन | १४० |
| २०७–२१४ | कश्यपांच्या विनतीवरून वाल-खिल्य ऋषि फांदी सोडून बदरीला गेले | १४०–१४१ |
| २१५–२३३ | गरुडाचे विनतीवरून कश्यपांनीं शिकविल्याप्रमाणें सुवर्णशाखा लंका पाठारावर ठेविली | १४१ |
| २३४–२४० | कुबेराकरिता लंका शहराचें निर्माण | १४१–१४२ |
| २४१–२५० | हनुमानाचे लंकादहनांत सुवर्ण-शाखेचे दहनानें लंका सुवर्ण-मय झाली | १४२ |

## अध्याय २३ वा ( पा. १४२ ते १४९ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–६ | लंकादहन झाल्यावर मारुती सीतेची आज्ञा घेऊन परत येण्यास निघाला | १४२ |
| ७–१२ | अरिष्ट पर्वतावरून उड्डाण, त्या दडपणामुळें पर्वत धुळीस गेला | १४३ |
| १३–२६ | भगवद्भाव-भजन-महिमा | १४३ |
| २७–३४ | व अशा रीतीनें अरिष्ट पर्वत परब्रह्मीं प्रविष्ट झाला | १४३–१४४ |
| ३५–४२ | त्याचा व प्रस्तुत कथेचा संबंध | १४४ |
| ४३–४९ | मारुतीच्या उड्डाणाचा नाद ऐकून महेंद्र पर्वतावरील वानरांना हर्ष | १४४–१४५ |
| ५०–७१ | समस्त वानरांनीं केलेलें हार्दिक स्वागत | १४५–१४६ |
| ७२–८६ | वानरांचा हर्षोद्रेक व लीला; हनुमंताची भेट | १४६ |
| ८७–९७ | अंगदाची सविस्तर वृत्तांताची विनंती | १४६–१४७ |
| ९८–१२३ | हनुमानाचें संक्षेपानें कथन | १४७–१४८ |
| १२४–१३० | हनुमंताचे अंगावर शस्त्रघात दिसल्यावरून जांबुवंत युद्धाचा वृत्तांत विचारतात | १४८ |
| १३१–१३८ | आपणच आपले पराक्रम-वर्णन करणें अप्रशस्त म्हणून हनुमंताचे विनतीवरून ब्रह्म-देवानें वर्णनलेख लिहिला | १४८–१४९ |
| १३९–१४७ | त्याचा अर्थ कळणार नाहीं, म्हणून त्याचें वाचन रामा-वाचून करणें अप्रशस्त, करितां तो तसाच ठेविला | १४९ |

## अध्याय २४ वा ( पा. १४९ ते १५६ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४ | हनुमंतानें सांगितलें कीं सीतेच्या तेजानें रावण भस्मप्रायच झालेला आहे | १४९ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ५–१७ | तें ऐकून अंगदास स्फुरण चढलें व आपणच सर्वांचा संहार करून यावें असें सुचविलें | १४९–१५० |
| १८–२२ | आपला कालातिक्रम झालेला आहे, तेव्हां अपमान करून घेण्यापेक्षा कार्यपूर्ती करून जाणें बरें | १५० |
| २३–२९ | जांबुवताचें म्हणणें कीं श्रीराम सुग्रीव यांच्या आज्ञेच्या बाहेर जातां येत नाहीं | १५० |
| ३०–३२ | व हाच विचार हनुमंतानेंही केला असावा | १५१ |
| ३३–३८ | जांबवताचे सूचनेप्रमाणें सर्व वानर परत जावयास निघाले | १५१ |
| ३९–४९ | वाटेंत मधुवनाचा सुगंध आल्यावर वानरांची मधुपानाची इच्छा | १५१ |
| ५०–५३ | त्याप्रमाणें जांबवंतादि वानरांची हनुमंताकरवीं अंगदास विनंति | १५२ |
| ५४–५८ | अंगदाची तत्काळ अनुज्ञा | १५२ |
| ५९–६२ | वानरांचा हर्ष व अंगदाला धन्यवाद | १५२ |
| ६३–७० | वनरक्षकांना घालवून यथेच्छ मधुपान | १५२ |
| ७१–७५ | व क्रीडाविहार | १५३ |
| ७६–८१ | वनाधिप दधिमुखाकडे वनपाळांचें गाऱ्हाणें | १५३ |
| ८२–९१ | दधिमुखाचा क्रोध; वानरांवर ससैन्य आक्रमण | १५३–१५४ |
| ९२–९६ | दधिमुखानें फेंकलेल्या साल वृक्षाचेच प्रत्याघातानें त्याला मूर्च्छा | १५४ |
| ९७–१०५ | सावध झाल्यावर सुग्रीवाकडे जाऊन गाऱ्हाणें | १५४ |
| १०६–११३ | तें ऐकून सुग्रीव सर्व वृत्तांत विचारतो | १५५ |
| ११४–१२० | तें ऐकून वानरांनीं शुद्धि केली असली पाहिजे असें लक्ष्मण व सुग्रीव यांनीं ताडलें | १५५ |
| १२१–१२४ | त्याशिवाय जांबवंतादि मंत्र्याकडून असा अत्याचार होणें अशक्य | १५५ |
| १२५–१२७ | व हनुमंताला न विचारितां आघात केल्याबद्दल दधिमुखालाच दोष दिला | १५५ |
| १२८–१३९ | दधिमुख अंगद यांचें परस्पर समाधान व श्रीरामदर्शनास प्रयाण | १५५–१५६ |


अध्याय २५ वा ( पा. १५६ ते १६३ )


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–१२ | दक्षिणदिशेचे वानर कालमर्यादेनंतर न आल्यानें श्रीरामास चिंता वाटत असेल म्हणून हनुमंत आधींच येऊन त्यांना भेटला | १५६ |
| १३–३५ | दुरूनच श्रीरामचंद्रास सीताशुद्धि व तिच्या स्थितीचें कथन | १५७ |
| ३६–६८ | श्रीरामाचा आनंद व हनुमंताचें अभिनंदन व हार्दिक कौतुक | १५७–१५९ |
| ६९–७७ | सर्व वानरांचें आगमन. रामास वंदन | १५९ |
| ७८–९८ | सुग्रीवानें केलेलें अंगदाचें कौतुक | १५९–१६० |
| ९९–१४७ | रामाचे सूचनेवरून अंगद वृत्तान्त सांगतो | १६०–१६२ |
| १४८–१७४ | संपातीची भेट व हनुमंताचें लंकेकडे उड्डाण | १६२–१६३ |


अध्याय २६ वा ( पा. १६३ ते १६८ )


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–३८ | ब्रह्मदेवलिखित हनुमंताचा लंकेंतील पराक्रम | १६३–१६४ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ३९–४६ | हनुमताचें उड्डाण | १६४–१६५ |
| ४७–५३ | सुरसा-हनुमत संघर्ष व हनुमच्चातुर्यानें त्याची सुटका | १६५ |
| ५४–५९ | मैनाक पर्वताला अंगुलीनें स्पर्श केला | १६५ |
| ६०–६२ | सिंहिका-विदारण व पडल्का-विध्वसन | १६५ |
| ६३–७९ | लकेंतील दिवे विझून सर्वत्र कल्लोळ | १६५–१६६ |
| ८०–१०७ | रावण-निद्राभवनांतील वृत्तान्त, रावणमदोदरी सवाद | १६६–१६७ |
| १०८–११३ | अशोकवनांत सीतादर्शन; हनुमताची गुप्तता | १६७ |
| ११४–१२३ | वृत्तात ऐकून श्रीरामाचा आल्हाद | १६७–१६८ |

अध्याय २७ वा ( पा. १६८ ते १७३ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४ | ब्रह्मलिखित पत्रवाचन | १६८ |
| ५–२९ | गुप्त राहून हनुमंतानें नगरांत केलेला कल्लोळ | १६८–१६९ |
| ३०–५७ | दिवे मालवून सर्वत्र अंधार व त्याचे परिणाम | १६९–१७० |
| ५८–६२ | रावणावर आघात व त्याला ताकीद | १७० |
| ६३–६५ | श्रोत्यांचा हर्ष | १७० |
| ६६–७४ | हनुमत अशोकवनांत जातो | १७०–१७१ |
| ७५–८५ | सीतेचें कडक उत्तर | १७१ |
| ८६–८८ | त्यामुळें रावणाचा क्रोध | १७१ |
| ८९–९३ | हनुमंताचा क्षोभ | १७१ |
| ९४–९५ | मदोदरीचें आगमन व रावणाचें निजमदिरीं गमन | १७१ |
| ९६–१०७ | सीतेचा अनुताप व शोक; हनुमंत राममुद्रा टाकतो | १७१–१७२ |
| १०८–१२१ | त्याची सीतेवरील प्रक्रिया | १७२ |
| १२२–१२५ | ह्या वर्णनाचा श्रीरामावर झालेला परिणाम | १७२–१७३ |
| १२६–१२८ | हें पाहून सीतेला न आणल्या-बद्दल हनुमताला खेद व उड्डाणाची तयारी | १७३ |
| १२९–१४० | राम त्याचें सात्वन करितात | १७३ |
| १४१–१४३ | मारुतीचें क्षमापन | १७३ |

अध्याय २८ वा ( पा. १७३ ते १७९ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४ | पुढील वृत्तांत-वाचन | १७३ |
| ५–६ | मुद्रिकेमुळें झालेली सीतेची स्थिति | १७४ |
| ७–३९ | सीतेचें भाषण | १७४–१७५ |
| ४०–६२ | त्याचे वाचनाचा राम व सर्व श्रोत्यावर झालेला परिणाम | १७५–१७६ |
| ६३–७० | सीतेचा मुद्रिकेशीं सवाद | १७६ |
| ७१–८५ | सीतेची मूर्च्छा व त्याचा हनुमतावरील परिणाम | १७६–१७७ |
| ८६–१०० | हनुमताचें रामचरित्र कथन | १७७ |
| १०१–१०५ | कथानुवाद ऐकून सीतेचें आव्हान | १७७ |
| १०६–११० | हनुमंताचें सीतेस वदन | १७७–१७८ |
| १११–१२३ | सीतेचा हनुमंतास प्रश्न | १७८ |
| १२४–१३४ | मारुतीवर रामाच्या कथेचा परिणाम | १७८–१७९ |

अध्याय २९ वा ( पा. १७९ ते १८६ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४४ | हनुमतानें केलेलें श्रीराम-लक्ष्मण वर्णन | १७९–१८० |
| ४५–५८ | त्यामुळें सीतेचा आनद व तितकेंच हनुमंताचें कौतुक | १८१ |
| ५९–६१ | श्रीरामास आणण्याची विनति | १८१ |
| ६२–७२ | हनुमंताची तिला आपल्या पाठी-वरून नेण्याची तयारी | १८१–१८२ |
| ७३–८० | सीतेनें अनेक अडचणी सांगितल्या | १८२ |
| ८१–८५ | मारुतीचें उत्तर | १८२–१८३ |
| ८६ | सीतेचें उत्तर, परपुरुषाचा स्पर्श वर्ज्य | १८३ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ८७–१११ | मारुती आपलें सौहार्द सीतेस पटवितो | १८३–१८४ |
| ११२–११९ | सीतेचा सर्वांस निरोप | १८४ |
| १२०–१२३ | सीतेची चिंता | १८४ |
| १२४–१२७ | हनुमंताचें उत्तर व आश्वासन | १८४ |
| १२८–१३१ | राक्षसांशीं कुरापत काढण्याची हनुमताची युक्ति | १८५ |
| १३२–१४० | हनुमताची सीतेला विनंति | १८५ |
| १४१–१५१ | फळें खाण्याची अनुमति | १८५ |
| १५२–१५५ | श्रीरामाचें कौतुक | १८५–१८६ |

अध्याय ३० वा ( पा. १८६ ते १९१ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–१६ | पडत्या फळाची आशा, त्याप्रमाणें वर्तन | १८६ |
| १७–३१ | वनकरांशीं कलह | १८६–१८७ |
| ३२–४१ | किंकराची योजना व त्यांचें निर्दळण | १८७ |
| ४२–६९ | प्रहस्तसुत जंबुमाळीशीं युद्ध व त्याचा घात | १८७–१८८ |
| ७०–१०० | आणखी सैन्य व अक्षयाकुमार पाठविला त्याचा संहार | १८८–१८९ |
| १०१–१०६ | रावणाचा शोक व स्वतः जाण्याची तयारी | १९० |
| १०७–११५ | इद्रजिताची इच्छा | १९० |
| ११६–१२४ | त्याला झालेले अपशकुन व ब्रह्मदेवाचें भविष्य | १९० |
| १२५–१३९ | अक्षाळीचें विदारण | १९०–१९१ |

अध्याय ३१ वा ( पा. १९१ ते १९८ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–१९ | अक्षाळीच्या घातानतर पुढील वृत्तान्त वाचण्यास लक्ष्मणास सुग्रीवाची विनती | १९१–१९२ |
| २०–२७ | नतर इद्रजित युद्धाकरिता पुढें सरसावतो | १९२ |
| २८–३१ | दोघाची तुलना व वर्णन | १९२ |
| ३२–३४ | तें द्वद्व पाहण्यास आकाशस्थ देव येतात | १९२ |
| ३५–४८ | उभयताचें युद्ध चालू | १९२–१९३ |
| ४९–६५ | मारुतीच्या व पुच्छाच्या पराक्रमानें इद्रजित व सैन्य जर्जर | १९३–१९४ |
| ६६–७७ | त्याचेच बाण त्याच्यावर परतविण्याचा मारुतीचा विक्रम | १९४ |
| ७८–८० | सारथी व रथाचा संहार | १९३ |
| ८१–९० | नतर उभयताचें मल्लयुद्ध. इद्रजित मूर्च्छापन्न | १९४–१९५ |
| ९१–१०४ | इंद्रजिताचा उद्वेग व भीति | १९५ |
| १०५–१०७ | इंद्रजिताचें बिळात अंतर्धान | १९५ |
| १०८–१४१ | पुच्छानें केलेला सैन्यसंहार व सर्वत्र हाहा.कार | १९५–१९७ |
| १४२–१४९ | भूतादि शंखिणी-डाकिनी देवतांस आनंद | १९७ |
| १५०–१५५ | तें वर्णन ऐकून कपि सैन्यात हर्ष | १९७ |
| १५६–१६४ | श्रीरामास आनंद व विस्मय; मारुतीला आलिंगन | १९७–१९८ |

अध्याय ३२ वा ( पा. १९८ ते २०५ )

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–५ | लक्ष्मण पुढील वर्णन वाचतो | १९८ |
| ६–७ | इंद्रजिताचा पाडाव केल्यावर पुच्छ आवरून हनुमान बसला | १९८ |
| ८–१४ | उर्वरित सैन्य रावणाकडे सर्व वृत्तांत सांगतात | १९८ |
| १५–१७ | इंद्रजिताचाही ठाव नसल्यानें त्याजविषयीं कुशंका | १९८ |
| १८–२२ | रावणाचा शोक व ब्रह्मदेवास पाचारण | १९८–१९९ |
| २३–२६ | व त्याचें वचन सत्य करण्याचा आग्रह, ब्रह्मदेवाचे उत्तर | १९९ |
| २७–३० | ब्रह्मदेव मारुतीला भेटून ब्रह्मपाशीं बांधून घेण्याचें सांगतो | १९९ |
| ३१–३२ | राक्षसाच्या हातून केव्हांही बांधून घेणार नाहीं असें मारुतीनें स्पष्ट उत्तर | १९९ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ३३–३८ | इंद्रजिताला स्वतः व रावणाविषयीं चिंता | १९९ |
| ३९–४२ | ब्रह्मदेवाचें स्मरण व आगमन | १९९ |
| ४३–४६ | इंद्रजित-ब्रह्मदेवसंवाद | २०० |
| ४७–४९ | इंद्रजितानें टाकलेला पाश मारुती झुगारतो | २०० |
| ५०–५५ | इंद्रजिताचा खेद व ब्रह्मदेवावर दोषारोप | २०० |
| ५६–५९ | ब्रम्हदेवाचा इंद्रजितावर दोषारोप | २०० |
| ६०–६४ | तो स्वतः जाऊन मारुतीस विनवून पाशबद्ध करितो | २००–२०१ |
| ६५–७६ | तें पाहून राक्षसांना आनंद व मारुतीवर सर्वांचे आघात | २०१ |
| ७७–८० | हनुमंताचे पुढील कार्याविषयीं विचार | २०१ |
| ८१–८६ | तो समोर आल्यावर रावणाचा क्रोध | २०१–२०२ |
| ८७–८९ | रावणानें केलेला खड्गप्रहार निष्फळ | २०२ |
| ९०–९८ | त्यामुळें मारुती त्याची निर्भर्त्सना करितो | २०२ |
| ९९–१०४ | रावणाची चिंता | २०२ |
| १०५–११० | त्यामुळें त्याच्यापुढें मारुतीच्या चेष्टा व त्याची अवहेलना | २०२–२०३ |
| १११–११२ | रावण त्यास त्याची माहिती विचारितो | २०३ |
| ११३–१३० | मारुतीचें उत्तर | २०३ |
| १३१–१३३ | त्यामुळें इंद्रजितास कंप | २०४ |
| १३४–१३८ | त्याला व बिभीषणाला रावणाविषयीं चिंता | २०४ |
| १३९–१४२ | रावणाच्या शिरावर मारुतीचा नखाग्रांनीं आघात | २०४ |
| १४३–१५४ | त्याचा मारुती धिक्कार करितो | २०४–२०५ |


अध्याय ३३ वा (पा. २०५ ते २१४)


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–२ | मारुती रावणासमोर पुच्छासन मांडून बसतो त्यामुळें रावण भयभीत होतो | २०५ |
| ३–६ | बिभीषण व इंद्रजित रावणास सूचना करतात | २०५ |
| ७–८ | तें ऐकून रावणास चिंता; परतु त्याची सूचना अमान्य | २०५ |
| ९–११ | कपटानें घात करण्याची योजना | २०५ |
| १२–१३ | मारुतीची स्तुति करून रामाची शपथ घालून त्याचें मरण विचारितो | २०५ |
| १४–१५ | आपण अमर असल्याचें मारुती सांगतो | २०५ |
| १६–१८ | रावणाचा अविश्वास | २०५ |
| १९–२१ | मारुतीचें प्रत्युत्तर व रावणाची निंदा | २०५–२०६ |
| २२–२४ | पुच्छाचें दहन झाल्यास कपीचें मरणच असें सांगतो | २०६ |
| २५–२७ | तें कसें करावें असें रावण विचारितो. वस्त्रें गुडाळून तेल-तूप शिंपणें हा मार्ग सांगतो | २०६ |
| २८–३७ | वस्त्राकरितां सर्व नागरिकांना नग्न केलें | २०६ |
| ३८–५० | राणीवशांतही आक्रमण, तरी पुच्छ मोकळेंच | २०६–२०७ |
| ५१–५३ | सीतेचें वस्त्र आणण्याचा विचार निघताच पुच्छ गुडाळलें गेलें | २०७ |
| ५४–५९ | पुच्छ पेटविण्याकरितां लोहाराच्या भात्याची योजना | २०७ |
| ६०–६६ | अचेतन भात्यांनीं सचेतन पुच्छ कसें पेटणार ? | २०७–२०८ |
| ६७–७५ | तरीही पेट न घेतल्यावर हनुमंताचे सूचनेप्रमाणें रावण स्वतः फुंकर घालूं लागला | २०८ |
| ७६–७७ | तेव्हां एकदम भडका होऊन दाही शिराच्या दाढी मिशा दग्ध | २०८ |
| ७८ | रावणानें वर तोंड केल्यावर पुच्छही वर झालें | २०८ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ७९–८४ | हा वृत्तान्त ऐकून राम, लक्ष्मण सुग्रीवादि सर्वांस परम हास्य आलें व वानरसमूहात हनुमंताचा जयजयकार | २०८ |
| ८५–९१ | मारुतीचें रामचरणीं वंदन व श्रीरामस्तवन | २०८–२०९ |
| ९२–९५ | पुढें वृत्तात वाचून पुच्छानें केलेलें कंदन | २०९ |
| ९६–१०४ | ते सत्पाश तोडून मारुती मोकळा होतो | २०९ |
| १०५–११२ | नाममहिमा, रामरक्षेचा प्रभाव | २०९–२१० |
| ११३–११६ | मारुती मेल्याचें सोंग करितो | २१० |
| ११७–१२३ | राक्षसास हर्ष | २१० |
| १२४ | वैद्याचें मत | २१० |
| १२५–१२६ | मारुती मेल्याच्या वार्तेनें तेथें प्रचंड गर्दी | २१० |
| १२७–१२८ | असें पाहून जळत्या पुच्छाचें त्याजवर एकदम आक्रमण | २१० |
| १२९–१३१ | पुच्छानें सर्वांचा मार्ग बंद केल्यानें सर्वत्र त्रेधा | २१० |
| १३२–१३५ | मारुती राजद्वारीं जातो | २१०–२११ |
| १३६–१४२ | रावणानें विचारल्यावरून हा सर्व पुच्छाचा भावरेपणा आहे असें मारुती त्यास सांगतो | २११ |
| १४३–१५० | सर्व लक्ष नतर राजमंदिराकडे वळलें | २११ |
| १५१ १५७ | घरोघरीं पुच्छप्रवेश व दाह | २११ |
| १५८–१६२ | नरनारी व नागरिकांची दैन्यावस्था | २११–२१२ |
| १६३–१६९ | पुच्छानें सर्व वाटा अडविल्यामुळें जनतेचा कोंडमारा | २१२ |
| १७०–१७६ | नगराभोंवतीं सुरक्षास्थानें असलेले सर्व भस्मसात् | २१२ |
| १७७–१८४ | रावणाच्या निवासस्थानावर | २१२–२१३ |
| १८५–२०५ | मारुतीवर सर्व योद्धयाचा मार; परतु सर्व व्यर्थ | २१३ |
| २०६–२१८ | यामप्रमाणें मारुतीचा पराक्रम झाला | २१३–२१४ |
| | **अध्याय ३४ वा ( पा. २१४ ते २२२ )** | |
| १–१४ | हनुमंताच्या लंकेंतील विक्रमाचें संक्षिप्त सिंहावलोकन | २१४–२१५ |
| १५–२१ | ब्रह्मलिखिताचे श्रवणानें श्रीरामचंद्रास आनंद व मारुतीस आलिंगन | २१५ |
| २२–३६ | श्रीरामांनीं केलेली हनुमंताची स्तुती | २१५–२१६ |
| ३७–३९ | हनुमंताचें रामनामस्तवन | २१६ |
| ४०–५३ | श्रीरामचंद्रास लंकादुर्गाविषयीं माहिती | २१६ |
| ५४–६३ | लंकेची निर्मिती व रक्षणव्यवस्था | २१७ |
| ६४–७२ | मारुतीच्या दहनामुळें दुर्ग घेणें सुकर झालें | २१७ |
| ७३–७८ | समुद्रापलीकडे जाण्याच्या योजना | २१८ |
| ७९–८५ | विजयादशमीच्या मुहूर्तावर मध्यान्हीं प्रयाण करण्याचा सुग्रीवास आदेश | २१८ |
| ८६–११२ | सुग्रीव-अगंदादींना आनद व प्रयाणाकरिता सैन्यरचना | २१८–२१९ |
| ११३–११४ | हनुमंतावर श्रीरामचद्र व अंगदावर सौमित्र आरूढ होऊन प्रवास | २१९–२२० |
| –११५१२५ | दक्षिण दिशेकडे गमन | २२० |
| १२६–१३६ | मार्ग शोधण्यास व करण्यास पुढें सैनिक पाठविले | २२०–२२१ |
| १३७–१४५ | मध्यें न थांबता नीट जाण्याचा आदेश | २२१ |
| १४६–१५० | विंध्याद्री, मध्याद्री व विविध वनें उल्लंघून समुद्रतीरीं आगमन | २२१ |
| १५१–१६० | रामसेना व समुद्र याची तुलना | २२१–२२२ |
| | **अध्याय ३५ वा ( पा. २२२ ते २२९ )** | |
| १–२ | श्रीरामचंद्र व वानरसैन्य समुद्रतीरावर आले | २२२ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ३–४ | राजमाता कैकसीची चिंता | २२२ |
| ५–१६ | बिभीषणाकडे जाऊन रावणाचीं अपकृत्यें व त्याचे परिणाम सांगते | २२२-२२३ |
| १७–२१ | बिभीषणाला रावणास उपदेश करण्यास पाठविते | २२३ |
| २२–२३ | बिभीषणाची तयारी व रावणानें बात केल्यास रामाकडे जाण्याचा बेत | २२३ |
| २४–२९ | मातेची संमती व वंशरक्षणाबद्दल आशीर्वाद | २२३ |
| ३०–३३ | मात्राज्ञेप्रमाणें बिभीषण रावणाकडे जातो | २२३ |
| ३४–३६ | रावण सभेंत त्याचें स्वागत करून अर्धासनीं बसवितो | २२३ |
| ३७–४५ | बिभीषणाचें रावणाशीं भाषण. लंकेची स्थिति | २२३–२२४ |
| ४६–५२ | सीता चोरून आणल्याची लंकेवर प्रतिक्रिया व पुढील कार्याविषयीं सूचना | २२४ |
| ५३–६५ | रावणाचा प्रधानावर कोप. प्रधानांचीं भाषणें | २२४–२२५ |
| ६६–७१ | राम व वानरसेनेचा निःपात करण्याची प्रतिज्ञा | २२५ |
| ७२–७९ | हें ऐकून बिभीषणाचा संताप व त्यांची निर्भर्त्सना | २२५–२२६ |
| ८०–८२ | बिभीषणाच्या दोषाविष्कारानें प्रधान लज्जायमान | २२६ |
| ८३–८८ | प्रधानाची आत्मप्रौढी. प्रहस्ताची आढ्यता | २२६ |
| ८९–९४ | महोदराची गर्जना | २२६ |
| ९५–१०५ | महापार्श्वाची आत्मश्लोक्ति | २२६-२२७ |
| १०६–११३ | दुर्मुखाची उक्ति | २२७ |
| ११४–१२४ | वज्रहनूची गर्जना | २२७–२२८ |
| १२५–१२९ | त्याच्या दर्पोक्ति ऐकून बिभीषणाचें उत्तर | २२८ |
| १३०–१३७ | योग्य उपाय न सांगण्याबद्दल त्यांस दोष | २२८ |
| १३८–१४० | प्रहस्ताचा अधिक्षेप | २२८–२२९ |
| १४१–१४५ | तसेंच महोदराची निर्भर्त्सना | २२९ |
| १४६–१५२ | महापार्श्व, दुर्मुख व वज्रहनु याचीही तशीच संभावना | २२९ |
| १५३– | याप्रमाणें प्रधानाचे मिथ्या जल्पवाद ऐकूं नये व सीता परत करावी | २२९ |
| १५४–१५७ | प्रधान लज्जायमान | २२९ |


**अध्याय ३६ वा ( पा. २२९ ते २३८ )**


| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १–४ | बिभीषणाचे भाषणांत हनुमत्पराक्रमाचे वर्णनानें सर्व सभा लज्जायमान | २२९–२३० |
| ५–२२ | इंद्रजिताचा क्रोध, आत्मपराक्रम, प्रौढी व बिभीषणाची निंदा | २३० |
| २३–२६ | बिभीषणाचा कोप व इंद्रजिताचें उत्तर | २३१ |
| २७–४३ | श्रीराम पराक्रम वर्णन | २३१–२३२ |
| ४४–४६ | पापकर्मास पाठिंबा केल्याबद्दल त्यांस दोष | २३२ |
| ४७–५० | इंद्रजिताचे वल्गनेचा आविष्कार | २३२ |
| ५१–५९ | हनुमंतापुढें इंद्रजिताची असहायता | २३२ |
| ६०–६४ | त्याच्या मिथ्या प्रौढीचे परिणाम | २३२ |
| ६५–७३ | बिभीषणाच्या भाषणानें सर्व सभा स्तब्ध | २३२–२३३ |
| ७४–७७ | तें पाहून महापार्श्वाची दर्पोक्ति | २३३ |
| ७८–८१ | बिभीषण शांतपणें स्वस्थ व महापार्श्वाची उपेक्षा | २३३ |
| ८२–८३ | बिभीषणाच्या अनुचराचें भाषण | २३३ |
| ८४–८६ | राजपुरुषाचे संभाषणांत अनुचराची लुडबुड कशाला ! | २३३ |
| ८७–९५ | राजनीति अशी आहे | २३४ |
| ९६– | महापार्श्व लज्जायमान | २३४ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| ९७–१२५ | बिभीषणाचें पुनर्भाषण व भावी दुष्परिणामाचें आविष्करण | २३४–२३५ |
| १२६–१४३ | पुढील कार्याची सूचना | २३५–२३६ |
| १४४–१५१ | तें ऐकून रावणाचा क्रोध व बिभीषणावर अधिक्षेप | २३६ |
| १५२–१५९ | बिभीषणाचें उत्तर | २३७ |
| १६०–१६५ | ज्याअर्थी माझें सांगणें तुला पटत नाहीं तेव्हा मी रामाकडे जातों | २३७ |
| १६६–१६७ | तें ऐकून रावणाचा संताप व क्रोधाविष्कार | २३७ |
| १६८–१७५ | खड्ग घेऊन बिभीषणावर वार करणार तों हात लचकून रावण खालीं पडला | २३७–२३८ |
| १७६–१७८ | बिभीषणावर लत्ताप्रहार | २३८ |
| १७९–१८३ | बिभीषणाला मूर्च्छा | २३८ |
| | **अध्याय ३७ वा ( पा. २३८ ते २४५ )** | |
| १–२ | नंतर कांहीं न बोलतां शांतपणें बिभीषण प्रधानासह परतला | २३८ |
| ३–१० | त्याचे विचार | २३८–२३९ |
| ११–२४ | क्रोधाचा प्रभाव व त्याचे दुष्परिणाम | २३९ |
| २५–३१ | बिभीषणाची रावणास शेवटची उक्ति | २३९–२४० |
| ३२–३३ | त्याचा रावणावर परिणाम | २४० |
| ३४–३७ | मातेला वंदन करून रामाकडे जाण्याचा विचार | २४० |
| ३८–३९ | मातेची प्रतिक्रिया व त्याला आशीर्वाद | २४० |
| ४०–४१ | बिभीषणाचें प्रयाण | २४० |
| ४२–४४ | लाथा मारून श्रीरामाकडे पाठविल्याबद्दल आकाशांतून बिभीषण रावणाचे धन्यवाद मानितो | २४० |
| ४५–४६ | तें ऐकून रावणास अनुताप | २४० |
| ४७–४९ | सैन्य व सर्व लोकांकडून बिभीषणाची प्रशंसा | २४०–२४१ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| ५०–५४ | बिभीषणाची रावणास शेवटची विनंती | २४१ |
| ५५–५९ | चारी प्रधानांसह बिभीषण रामाकडे जातो | २४१ |
| ६०–७६ | त्यास पाहून वानर सैन्यांत गडबड | २४१–२४२ |
| ७७–८६ | तें पाहून अंतराळातूनच बिभीषणाचें भाषण व सुग्रीवास विनंति | २४२ |
| ८७–९२ | सुग्रीवाचें रामास निवेदन | २४२ |
| ९३–९५ | तें ऐकून रामास आनंद | २४३ |
| ९६–९८ | सर्व वानर प्रमुखाचें मत राम विचारितात | २४३ |
| ९९–१०३ | सर्वांचें मत कीं त्यास मारावें | २४३ |
| १०४–१०५ | जांबुवंताचें मत कीं त्याची अंतर्बाह्य स्थिति पाहून काय तें करावें | २४३ |
| १०६–१०७ | शरणागताला मरण देऊं नये असें अंगदाचें मत | २४३ |
| १०८–११२ | हनुमंताला लंकेची सर्व माहिती तेव्हा त्यास विचारितां | २४३ |
| ११३–१२० | तो बिभीषणाच्या संबंधीं पूर्ण निर्वाळा देतो | २४४ |
| १२१–१३२ | बिभीषणाचें चारित्र्य, पावित्र्य इ. | २४४ |
| १३३–१४४ | त्यापासून तोटा कांहींही न होतां लाभच होईल | २४४–२४५ |
| १४५–१४७ | रामाच्या मनोगताप्रमाणेंच हनुमंताचें मत पडलें | २४५ |
| १४८–१५६ | रामास आनंद व बिभीषणाचें स्वागत व लंका राज्यदान | २४५ |
| | **अध्याय ३८ वा ( पा. २४५ ते २५० )** | |
| १–३ | मारुतीचे वचनानें रामचंद्रास संतोष | २४५–२४६ |
| ४–१५ | शरणागताला केव्हांहि अभयच, रावण आला तरी तेंच | २४६ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १६–२७ | बिभीषणाला आणवून त्यास अभय व त्याचें स्वागत | २४६–२४७ |
| २८–३७ | चार अनुयायांसह बिभीषणाची शरणागती | २४७ |
| ३८–५० | साधकाच्या ब्रह्मार्पणासारखी हीही शरणागती | २४७–२४८ |
| ५१–५७ | बिभीषणाचें आश्वासन | २४८ |
| ५८–६१ | त्याला लंकेचें राज्यपद दिलें, त्याचा राज्याभिषेक | २४८ |
| ६२–८० | श्रीरामाच्या आज्ञेनें हनुमतानें निर्मिलेली प्रतिलंका | २४८–२४९ |
| ८१–८८ | रावणवधापावेतों प्रतिकृति लंका बिभीषणाजवळ गहाण | २४९ |
| ८९–१०१ | बिभीषणास राज्याभिषेक | २४९–२५० |
| | **अध्याय ३९ वा (पा. २५० ते २५७)** | |
| १–३ | बिभीषणास लंका दान दिल्यावर सर्वत्र आनंदीआनंद | २५० |
| ४–९ | हनुमान व सुग्रीव समुद्रपार जाण्याचा विचार करितात | २५० |
| १०–१३ | सुग्रीवाची चिंता | २५० |
| १४–१९ | हनुमताचें स्फुरण व बलाविष्कार | २५०–२५१ |
| २०–२२ | त्यामुळे सर्वांची गजबज श्रीरामचंद्राचें सांत्वन | २५१ |
| २३–३५ | बिभीषणाचें मार्गदर्शन कीं सागराला प्रार्थना | २५१ |
| ३६–३९ | श्रीरामचंद्रास मान्य | २५१–२५२ |
| ४०–४६ | त्याप्रमाणें समुद्रपूजन व त्रिरात्र अनुष्ठान | २५२ |
| ४७–५० | समुद्राच्या असहकारामुळें सर्वांस चिंता व हनुमंताचा त्वेष | २५२ |
| ५१–५३ | श्रीरामचंद्राचा क्रोध व धनुष्य-बाण आणण्याचा आदेश | २५२–२५३ |
| ५४–६३ | मार्दवाचा अनादर. राजाना मार्दव कामाचें नाहीं | २५३ |
| ६४–७१ | श्रीरामाच्या कोपानें देवादिकांचा उद्वेग | २५३ |
| ७२–७८ | श्रीरामचंद्राची रौद्रवृत्ति पाहून समुद्राचें स्त्रीपुत्रांसह आगमन | २५३–२५४ |
| ७९–८१ | मूळ ब्रह्मापासून उत्पत्ति त्यामुळें तो ब्राह्मण म्हणून त्यास श्रीरामानें नमन केलें | २५४ |
| ८२–८६ | सागराची विनंति | २५४ |
| ८७–८८ | रामाचें उत्तर | २५४ |
| ८९–९३ | न येण्याचें कारण | २५४ |
| ९४–९५ | पूर्वजाच्या कीर्तीच्या विरुद्ध बनाव झाला | २५४ |
| ९६–१०६ | सागराचा सूर्यवंशीं उत्पत्तीचा वृत्तान्त | २५४–२५५ |
| १०७–११० | दोघे बंधू असतांना सीता जाणें मला खेद आला | २५५ |
| १११–११३ | श्रीराम लज्जित होतात | २५५ |
| ११४–११५ | रावणानें सीता नेल्यावर रडता व मी न आल्यानें धनुष्यावर बाण लावला | २५५ |
| ११६–१२४ | सागराचा व दशरथाचा पूर्व-संबंध, सगरांना शाप, भगीरथानें केलेला उद्धार | २५५–२५६ |
| १२५–१२६ | समुद्र मार्गदर्शन करितो | २५६ |
| १२७–१३६ | त्याप्रमाणें नळाची सेतुबंधनावर योजना, नळाचा आनंद | २५६ |
| १३७–१४० | धनुष्यावरील बाणाचें मरु-देशावर विसर्जन | २५६ |
| १४१–१४२ | त्याचे परिणाम. धरेची दीन अवस्था | २५६–२५७ |
| १४३–१४८ | धरेचें सांत्वन व वरप्रदान | २५७ |
| १४९–१५२ | समुद्राचें आश्चर्य | २५७ |
| १५३–१५६ | रामानें त्याचा केलेला सन्मान | २५७ |
| | **अध्याय ४० वा (पा. २५७ ते २६४)** | |
| १–२४ | समुद्र गेल्यावर सेतुबंधाची तयारी; वानरांना आदेश | २५७–२५८ |
| २५–२६ | किलकिला शब्दव्युत्पत्ति | २५८ |

| ओव्या | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| २७–३४ | पर्वतादि पाण्यात बुडूं लागले; नळाचा विषाद | २५८–२५९ |
| ३५–४२ | हनुमताचें निदान व त्याचा अनुभव | २५९ |
| ४३–४९ | श्रीरामचरणाचा महिमा | २५९ |
| ५०–५३ | हनुमंताचें अभिनंदन | २५९–२६० |
| ५४–७१ | सेतुबंधन चालू, सर्व भूतांना तो चमत्कार | २६० |
| ७२ | बंधनक्रमः पहिले दिवशीं चौदा योजनें | २६० |
| ७३–८३ | दुसरे दिवशीं सव्वीस | २६०–२६१ |
| ८४–१०० | मारुतीचा विक्रम | २६१–२६२ |
| १०१–१०८ | सात योजनांचे सात पर्वत हात-पाय वगैरेवर येक येक आणून एकुणपन्नास योजनें एकट्यानें काम केलें, सर्वांना आश्चर्य | २६२ |
| १०९–१२० | राहिलेले दहा योजन बांधून सेतु संपविला | २६२–२६३ |
| १२१–१३१ | त्यानिमित्त भेरी निनाद व निशाणें फडकाविलीं | २६३ |
| १३२–१३८ | अंगदाचा हर्ष व प्रतिज्ञा | २६३–२६४ |
| १३९–१४२ | सर्व वानराचा आवेश | २६४ |
| | **अध्याय ४१ वा ( पा. २६४ ते २७० )** | |
| १–७ | सेतुबंधन संपूर्ण झाल्यावर राम लक्ष्मणाला घेऊन लंकेच्या वाटेला लागतात | २६४ |
| ८–२१ | जांबुवताची भीति व रामास विनति | २६४–२६५ |
| २२–३० | ती मान्य करून मारुतीच्या पाठीवर रामचंद्र व नीलाच्या पाठीवर सौमित्र बसून सर्व सेना निघाली | २६५ |
| ३१–४६ | वानरांचा उल्हास व दुर्वोदर्क | २६५–२६६ |
| ४७–५० | बिभीषण अनुयायासह पुढें निघतो | २६६ |
| ५१–५४ | त्याच्या जिवाला धोका असू नये म्हणून राम त्याला आपल्याजवळ ठेवतात | २६६ |
| ५५–६० | ससैन्य राम लंकेच्या दाराशीं आल्यावर आकाशांतून त्यावर पुष्पवृष्टि | २६६–२६७ |
| ६१–७५ | समुद्राचें सहकुटुंब आगमन | २६७ |
| ७६–८० | युद्धाला मुनिवेषात न जातां क्षत्रियामप्रमाणें जावें | २६७–२६८ |
| ८१–९२ | मुनिवेष केव्हां चालेल ? | २६८ |
| ९३–१२० | तें पाहून समुद्राला आनंद | २६८–२६९ |
| १२१ | व त्यानें रामावरून रत्नें ओवाळिलीं | २६९ |
| १२२–१२८ | तें पाहून समुद्राला आनंद | २६९ |
| १२९–१३१ | तीं वानरानीं उधळिलीं तीं रावणाचे सभेंत पडलीं | २६९–२७० |
| १३२–१३४ | तेव्हा चौकशी करितां राम-सैन्य आल्याचें त्यास समजलें | २७० |
| | **अध्याय ४२ वा ( पा. २७० ते २७४ )** | |
| १–१० | लंकेंत सर्वत्र हलकल्लोळ व रावणावर सर्व दोष | २७० |
| ११–२५ | रावणानें प्रधानांचा केलेला धिक्कार व निर्भर्त्सना | २७०–२७१ |
| २६–३२ | बिभीषणाच्या वाक्याची आठवण | २७१ |
| ३३–४७ | मेघनादाचें आश्वासन | २७१–२७२ |
| ४८–५१ | नंतर प्रहस्ताचें भाषण | २७२ |
| ५२–५६ | तसेंच धूम्राक्षाचें भाषण | २७२ |
| ५७–६६ | महोदर त्याचा धिक्कार करितो | २७२–२७३ |
| ६७–७८ | अतिकायाची स्पष्टोक्ति | २७३ |
| ७९–१०४ | व रावणास विनंति | २७३–२७४ |
| १०५ | त्याचा रावणादिकावर झालेला परिणाम | २७४ |
| १०६–११६ | सुंदरकांड संपूर्ण | २७४ |

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः

# श्रीएकनाथमहाराजकृत

# श्रीभावार्थरामायण

## ★ सुंदरकांड ★

ग्रंथ संग्रहालय क्र. ९०४६०

### अध्याय पहिला

श्रीसीतारामाभ्या नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीराम समर्थ ॥

राम लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरं ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेंद्रं सत्यसंधं दशरथतनयं श्यामलं शांतमूर्तिं ।
वंदे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥१॥

रामनामाची थोरवी —श्रीरामें पावन[1] कथा । श्रीरामें पावन वक्ता । श्रीरामें पावन श्रोता[2] । श्रीराम स्वतां ग्रंथार्थी[†] ॥१॥ श्रीरामें धन्य धरणी[3] । श्रीरामें धन्य करणी । श्रीरामें धन्य वाणी । जे रामायणीं विनटली[4] ॥ २ ॥ श्रीरामें पावन संसार । श्रीरामें पावन चराचर । श्रीरामें पावन नर । जे तत्पर नित्य स्मरती ॥ ३ ॥ रामनाम शुद्ध साधन । रामनाम शुद्ध ज्ञान । रामनामें सुटे बंधन । नाम पावन सर्वार्थी ॥ ४ ॥ रामनामें सरतें[1] तोंड । रामनामें सरलें किष्किंधाकांड । आतां उगवलें सुंदरकांड । अति प्रचंड प्रतापी ॥ ५ ॥ पहा रामनामाची थोरी । श्रीराम आहे सर्वांतरीं । रामनाम सत्वर उच्चारी । तेणें भवसागरीं तरतील ॥ ६ ॥

लंकेच्या उच्च भागावर बसून मारुती पुढील बेत आंखतो:— सुंदरकांडींची कथावृत्ती[2] । आदि मध्य आणि प्रांतीं[3] । हनुमंताची परम ख्याती । सीताशुद्धयर्थी प्रताप ॥ ७ ॥ त्याच्या प्रतापाची थोरी । राहोनि लंकेच्या शिखरीं । शोधावया सीता सुंदरी । विचार करी तो ऐका ॥ ८ ॥ त्रिकूटाच्या शिखरावरी । हनुमान[*] वेंघोनिया[4] पाहे चौफेरीं । तंव देखे कनककळसांचिया हारी । गगनोदरीं लखलखती ॥ ९ ॥ जैसीं नक्षत्रें नभाच्या पोटीं । सुप्रभा शोभती गोमटी । कनक कळस लखलखिती त्रिकूटीं । कोटयनुकोटी[‡] लंकेमध्यें ॥१० ॥

---

१ पवित्र. २ ऐकणारा. ३ पृथ्वी. ४ रंगली.
† श्री

१ मान्य, श्रेष्ठ. २ कथेचा क्रम. ३ शेवटीं. ४ चढून.
* हनुमा ‡ कोटयान कोटी.

लंकेचें वर्णन व अभेद्यत्व:—द्यावी अमरावतीची उपमा। त्याहूनी अधिक इची महिमा। लंका निर्माण करी ब्रम्हा। विश्वकर्मा प्रेरुनी[1] ॥ ११ ॥ कुबेराची अलकावती। रावणें हिरोनि घेतां वस्ती। त्यासी शंकूनीऽ उमापती[2]। अलकावती सोडविली ॥ १२ ॥ ते काळीं विश्वकर्म्याचे हातीं। लंका करवी प्रजापती। दुर्गें[3] दुर्गम अति निगुतीं। अगम्य गति सुरासुरां* ॥ १३ ॥ अमरावती अलकावती। अवलोकूनियां भोगावती। देखोनि अधिक लंकेची स्थिति। संतोषें वस्ती रावणें केली ॥ १४ ॥ पाहतां कैलासा समान। शोभे§ लंकेचें महिमान। दुर्धर[4] राक्षसांसहित जाण। दशानन संरक्षी ॥ १५ ॥ उत्तम मध्यम नरीं। शुद्ध अशुद्ध नरनारीं। नांदिजे कनकाच्या मंदिरीं। लंकेची थोरी अलुगम्य ॥ १६ ॥ अगाध लंकेचें महिमान। स्वयें संरक्षी रावण। कोट्यनु-‡ कोटी राक्षसगण। परिभ्रमण सदा करिती ॥ १७ ॥ तेथें रिघावया जाण। संधि न लभे अणुप्रमाण। लंकादुर्ग अति दारुण। केंवी आपण रिघावें ॥ १८ ॥

†अवकाशो न वायोरस्तु राक्षसैश्चाभिगम्यते ।
न दानस्य न भेदस्य नैव युद्धस्य दृश्यते ॥२॥
ततः स चिंतयामास मुहुर्तं कपिकुंजरः ।
गिरिशृङ्गे स्थितस्तस्मिन् रामस्याभ्युदये स्थितः ॥६॥

लंकादुर्गीं रिघोनि वारा। स्वयें जाऊं न शके सैरा। त्यासही रावणाचा दरारा[5]। केला कामारा[6] केर[7] काढणारा†† ॥१९॥ जेथें पुंजेनी[8] ¶गवळली[9] वाट। तेथें वायूसीं वाजती साट[10]। त्या लंकेमाजी मी मर्कट। कैसेनि परिस्पष्ट[11] वागावें ॥ २० ॥ वानररूपें लंकेआंत। हिंडतां होईल अनर्थ। कौतुकें जो तो धरील येथ रामकार्यार्थ नासेल ॥ २१ ॥

वानर किंवा राक्षसरूप घेऊन कार्यसिद्धि होणें कठीण:—राक्षसरूप धरितां क्रूर। तेथेंहि अनर्थ आहे थोर। ब्राह्मणमांसाचा आहार निशाचर करविती ॥२२॥ राक्षसजातीचा परीक्षी। द्विजमांस स्वेच्छा भक्षी। तो राक्षस शुद्धपक्षी। येरु विपक्षी[1] मारिती ॥२३॥ द्विजमांस मज भक्षितां। समुद्रलंघन होईल वृथा। कैंचा राम कैंची सीता। अधःपाता मी जाईन ॥ २४ ॥ राक्षसरूपाचा विटाळ। मज न व्हावा अळुमाळ[2]। कांटाळोनि गोळांगुळ[3]। विचार स्थूळ मांडिला ॥ २५ ॥ मग स्मरोनि रामनाम। हनुमंत पावला विश्राम। लंकाप्रवेश अतिदुर्गम। नीतिधर्म उपपादी ॥ २६ ॥ करूं जातां स्वयें शिष्टाई। गर्वे †रावण न मानील पाहीं। सीता सुटेसें दान नाहीं। दानें वैदेही सुटेना ॥ २७ ॥ राक्षसांसीं करितां भेद। न घडे आप्तत्वाचा बोध[5]। मांसभक्षणीं संबंध। आप्तवाद तेथें कैंचा ॥ २८ ॥ भेदूं जातां राक्षसांसी। भेद जाईल ‡त्यासचि पासीं। भेद न चले तयासीं। युद्धही त्यापासीं [4]दुस्तर ॥ २९ ॥ लंकादुर्ग अति दुर्धर। इंद्रजित कुंभकर्ण झुंझारऽ। भोंवता आहे हा सागर। नरवानर केंवी येती ॥ ३० ॥ श्रीराम निधडा झुंझार। †रावण छेदील सपरिवार। आडवा सागर दुस्तर। तो लंकापुर केंवी पावे ॥ ३१ ॥ नीतिशास्त्राचा अवबोध[5]। साम दाम भेद युद्ध। रावणीं न चले संबंध। नीतिविरुद्ध राक्षस ॥ ३२ ॥ बैसोनी लंकेच्या शिखरीं। नानापरी विचार करी। लंका-

१ पाठवून. २ शंकर. ३ किल्ले. ४ भयकर. ५ भीति. ६ चाकर. ७ केर काढणारा, झाडू. ८ कचऱ्याच्या ढिगांनीं. ९ मलिन झाली. १० चाबूक. ११ उघडउघड.

ऽ शकोन. * सुरां असुरां § शोभो. ‡ कोट्यान कोटी.
† सु. का. २१ ५२,४६,४७. †† काढी. ¶ गदिली.

१ अन्यपक्षीय, शत्रू. २ किंचितही. ३ वानर. ४ कठिण. ५ उपदेश.

‡ अथवा—दशग्रीवासी
ऽ झुंजार. † पाठक—रावणा.

दुर्ग अटक भारी। ¶कोणेंपरी शोधावें ॥ ३३ ॥ असो हा लंकेचा वृत्तांत। मज साह्य श्रीरघुनाथ। लंका शोधीन समस्त। सीताशुद्धयर्थ निजांगें ॥ ३४॥

वंचनीया मया सर्वे जानकीपरिमार्गतः। †
लक्ष्यालक्ष्यात्मरूपेण द्रक्ष्यामि जनकात्मजाम् ॥ २ ॥
इति सञ्चिन्त्य हनुमान्वैदेह्या दर्शनं तदा।
*पृषदंशमात्रः स कपिर्बभूवाद्भुतदर्शनः ॥ ३ ॥

अत्यंत सूक्ष्म रूपानें लंकेत प्रवेशः—लक्षालक्ष स्वरूपविधि[१]। ठकोनी राक्षसांच्या बुद्धि। मी करीन सीताशुद्धि। कार्यसिद्धि श्रीरामें ॥ ३५ ॥ सुरां असुरां निशाचरां[२]। अलक्षगती मज वानरा। घरधांडोळी घेऊनी नगरा। सीता सुंदरा पाहीन ॥ ३६ ॥ ऐसा करोनियां विचार। हनुमंत जाला मशकमात्र। ऐसें‡ धरुनि शरीर। अति§ लघुतर कपि जाला ॥ ३७ ॥ मुंगिचिया नखनाआंत। खुपों नेणेचि हनुमंत। येणें रूपें लंकेआंत। प्रवेशोनि पहात रामकांता ॥ ३८ ॥ कोणा न कळतां मात। जगाचें न दुखवितां चित्त। हनुमंत निघे लंकेआंत। असे पहात रामप्रिया ॥ ३९ ॥ खंदकपाळीं[३] आटाळीं[४]। उपरियाउपरीं माळ्यामाळीं। दुर्गाचिया पौळीमोळीं‡। जनकबाळी पहातसे ॥ ४० ॥ वनें उपवनें काननें। देवालयें शिवस्थानें। मठ मठिका ध्यानभुवनें। सीतेकारणें शोधित ॥ ४१॥ कडे कपाटें स्रोत ऽकांतारें। पर्वत गुहा गिरिकंदरें। सूक्ष्मस्थानें अनेक विवरें। साक्षेपें वानरें शोधिलीं ॥ ४२ ॥ आराम विराम उपरम। सम विषम विपमीं सम। आश्रमाचें आश्रमधाम। प्लवंगम[६] स्वयें शोधी ॥ ४३ ॥ नाना वाटिका[७] उदंड। शैल्यकक्षें[८] पैं वितंड सरोवरस्थानें प्रचंड। शोधी सुदृढ हनुमंतु ॥४४॥ चूतखंडें अन्युतखंडें। कुशकर्दमपाणिपाखंडें। डावलोनि[१] वंडें उदंडें। मध्यमादंडें[२] सीता पाहे ॥ ४५ ॥ ऐसा शोधूनी बाह्यप्रांतु। मग निघाला नगराआंतु। सीता शोधावया हनुमंतु। अति उद्युतु* साक्षेपें ॥ ४६ ॥ तत्वें निरसूनी समस्त। साधक आत्मा साधी निश्चित। तेंवी घरोघर धांडोळित। असे पाहत वैदेही ॥ ४७ ॥

ब्रह्मराक्षस वसति, शैवदीक्षा, त्रिपुंड्धारी, वगैरे विविध राक्षसजातीः—पाहतां लंकेमाझारी। ब्रह्मराक्षस वसती नगरीं। त्यांच्या निवासाची थोरी। निजनिर्धारीं अवधारा ॥ ४८ ॥ एक राक्षस लंकेमाझारी। रुद्राक्षमाळा गळां शिरीं। शैवदीक्षाधारी। त्रिपुंड्धारी मंत्रोक्त ॥४९॥ दान अन्न× देऊनि भूतांसी। काषायवस्त्रें[३] एक संन्यासी। दृष्टीं देखिल्या मनुष्यासी। साक्षेपेंसीं गिळिती ॥ ५० ॥ सर्वेचि करीती आचमन। स्वाहा करिती होमहवन। कर्में दाविती विचक्षण। धरिती ध्यान आहारार्थ ॥ ५१ ॥ एक नागवे जटाधारी। भस्मधारी शरीरीं। रिघोनिया †वनांतरीं। गायी मारिती भक्षणार्थ ॥ ५२ ॥ तेंचि गोचर्म धरूनि करीं। आम्ही गोजिनांबरधारी। ऐसे मिरविती लोकाचारीं। वेषधारी राक्षस ॥ ५३ ॥ मांस भक्षावयाचा स्वार्थ। ऐसी संपादिती मात। ऐसे राक्षस लंकेआंत। देखे हनुमंत विचरतां ॥ ५४ ॥ मांस भक्षितां स्वइच्छेसीं। वांटा न देती कोणासी। संन्याशाचें¶ घेतां तुम्हांसीं। नरकवासी पैं व्हाल ॥ ५५ ॥ अग्निहोत्री राक्षस तेथ। कुंड मंडप वेदिकायुक्त‡। दोन्ही कर कुशमंडित। साथं-

---

१ रूपान्तर. २ राक्षसांना. ३ खदकाच्या जागेत. ४ गच्च्यांवर. ५ तटांवर. ६ वानर. ७ बागा. ८ पर्वतांचे कडे.

† वा. रा. सु. का. २।४७.

¶ कैशा. * क–द्विदश, बड–द्विदश. ‡ क–दों मशकांचा अधिकभाव. § क–ऐसा, ‡ पौळी पौळी, † अ–आणि. ऽ क–कासारें.

१ टाकून. २ मध्यम स्थितीनें. ३ भगवीं वस्त्रें स्वीकारून.

* अ–उदित, ब–उदिक, क–उदितु. × अभयदान. † क–विमाना माझारी. ¶ बड–ऐसा सन्यास. ‡ बड-वेदि. वेदिका=होमकुंडाच्या ओट्यावरील जागा.

प्रातः होम देती ॥ ५६ ॥ मुष्टी मुष्टी कुश करीं । देखिल्या मनुष्या तेणेंचि मारी । मांस भक्षावया होम करी । पापचारी राक्षस ॥ ५७ ॥ होत्या† पोत्याचा पुरोडाश[1] । त्याचाहि स्वयें करिती ग्रास । वांटा न देती कोणास । अति कर्कश मांसार्थी ॥ ५८ ॥ जेथें जेथें अति [2]गौल्यता‡ । तेथें कैंचा राम कैंची सीता । तेथोनी निघतां हनुमंता । होय देखता आश्चर्य ॥ ५९ ॥ वेदपाठक लंके-आंत । विजनीं आरण्यकें पढत । मनुष्य देखिल्या तेथ । स्वयें भक्षित फळाहारा ॥ ६० ॥

अग्निहोत्राश्च वेदाश्च राक्षसानां गृहे गृहे ।
दया सत्यं च शौचं च राक्षसानां न विद्यते ॥ ४ ॥

अग्निहोत्री, क्षत्रिय, चारादिकांचीं घरें शोधिलीं — अग्निहोत्र वेदाध्ययन । राक्षसांघरीं संपूर्ण । दया सत्य शुचित्वपण । राक्षसां जाण असेना ॥ ६१ ॥ ऐसी शोधितां ब्रह्मपुरी । ब्राह्मण गोंविले दोरीं । कर्माभिमान त्यावरीं शिरीं । सीता सुंदरी तेथें नाहीं । ॥ ६२ ॥ सर्वां भूतीं असे भगवंत । ऐसी दया नाहीं तेथ । कैंचा राम कैंची सीता तेथ । मुद्रा मंत्र ते दीक्षा ॥ ६३ ॥ पाहतां क्षत्रियांच्या थाटा । वाढीवेचा[3] गर्व ताठा । लागतां हनुमंताचा चपेटा । स्वयें पटपटां पडतील ॥ ६४ ॥ नाहीं वीरवृत्ती पुरी । मरणभयाची न फिटे शिरीं । ऐसें भित्रेपण क्षत्रियां घरीं । सीता सुंदरी न भेटे ॥ ६५ ॥ मरणभय पोटाआंत । ते तंव क्षत्रिय अति अशक्त । तयांसी नपुंसक म्हणत । सीता निश्चित तेथें नाहीं ॥ ६६ ॥ ऐसें शोधिला क्षत्रियपुरीं । तेथें न लभे सीता सुंदरी । मग निघाला वैश्यांचे घरीं । श्रीरामनारी शोधावया ॥ ६७ ॥ वैश्यांचें उदर्मी चित्त । अति लोलुप वांच्छिती वित्त । शीघ्र प्रवेशोनी पहात । सीता शुद्ध्यर्थ न लभेचि ॥ ६८ ॥ वैश्यांचें कृपण मन । कवडी कवडी सांचविती धन । त्यांचे घरीं सीता निधान । न |लाभे जाण हनुमंता ॥ ६९ ॥ आतां शोधूं शूद्रजाती । तीमाजी अठरा पगड जाती । तीं घरें धुंडाळित मारुती । सीतासतीशुद्ध्यर्थ ॥ ७० ॥ पाहतां साळिशांच्या* मागीं[1] । अवघीं गागीत[2] घातली गुडघी । हनुमान निजपुच्छाच्या संयोगीं । जाळील आगीं सस्नेह ॥ ७१ ॥ चाटे[3] असत्यवादी ऐका । अंगळु मंगळू बोलती देखा । हनुमंत जाणे आगाळिका । लावील सीका[4] पुरदहनीं ॥ ७२ ॥ ऐसी शोधितां चाटेवोळीं । तेथें न लभे जनकबाळी । पहावया सोनारांची[5] आळी । निघाला आतुर्बळी‡ हनुमंत ॥ ७३ ॥ सोनारांचें कर्म खोटें । खार लाविती [6]नेटपाटें । वाहेर मुदियांचे साटे । शिसऽ कांटे भांडवल ॥ ७४ ॥ रूपलग लाविजे एकीं । शीसलग लाविजे आणिकीं । पाहतां अवघेही हीन तुकीं । तेथें जानकी दिसेना ॥ ७५ ॥ सोनाराचा परिपाक । अवघे करिती ठकठक । देहाचा चोर एक एक । नाडिती लोक विश्वासें ॥ ७६ ॥ कर्डीलग मोतींलग । दाविती झळकेंचि झगमग । परी ते अवघे करिती डाकलग । नगे नग हीणकस ॥ ७७ ॥ सोनारकामाचा विवेकू । समूळीं विश्वासघातकू । लटकीं तुकें[7] देती तुकतुकूं । घेती जोखजोखूं वो हातीं ॥ ७८ ॥ सांगोनि विश्वासाच्या गोष्टी । खार लाविती पाठीं पोटीं । घालोनि सलोभाच्या पुटीं । पाडिती तुटी मुदलेंसीं ॥ ७९ ॥ साडेपंधरा[8] घेऊनि हातीं । देतां

---

१ यज्ञद्रव्याचा शेष. २ दांभिकपणा. ३ शौर्याचा

† क-होता प्रेताच्या. ‡ क-लोलुपता.

---

१ सयोगी. २ गार-खड्डा. माल उभा केला असेल त्या ठिकाणीं चाळच्या पावड्या दाबण्यासाठीं केलेला खड्डा ३ कापडवाले. ४ शिक्षा. ५ सोनारांची. ६ कठिणपणें, निर्भयतेनें. ७ वजनें. ८ सोनें.

| अ-ल. * घ-चा. ‡ बड-आतुरदळी. ऽ ब-सिस.

नागवले किती । सोनारकामाची हे ख्याती । सीता सती तेथें नाहीं ॥ ८० ॥ कासारकामाचें कौतुक । एक एक तें नाळिक[1] । अवघें काळेंचि देख । तुळा तुक तुटलें ॥ ८१ ॥ कांसारकामाचे परिपाटीं । अवघीं जनीं केलीं तुटी । तेथें कैंची सीता गोरटी । निघे उठाउठी हनुमंत ॥ ८२ ॥

व्यवहारीः—व्यवहारियांची ऐसी दशा । कळांतराची[2] बहु आशा । मुदल घालुनि फांसा । लाविति आशा अति लोभें ॥ ८३ ॥ लक्ष्मी देऊनि पुढिला हातीं । काळा कागद लिहूनि घेती । तेणेंचि काळमुखें होती । खंती करिती जीवासीं ॥ ८४ ॥ देहींच्या खतां देहींच व्यथा । त्याहूनि थोर कागदाच्या खता । त्याची व्यथा जीवाचे माथां । तिन्ही अवस्था अति दुःखी ॥ ८५ ॥ खत फाडिलें खताखती । जो भेटे त्यास साक्षी करिती । स्वप्नीं व्यवहार सांगती । ओसणती[3] निजेलिया ॥ ८६ ॥ देखोनि स्वतांची संपत्ती । व्यवहारी स्वयें उल्लासती । मागों गेलिया न लगे हातीं । मग कुंथती अति दुःखें ॥ ८७ ॥ व्यवहारियांची ऐसी गती । धरण्या करितां न लभे मुक्ती । धनलोभ्या कैंची मुक्ती । सीता सती तेथें नाहीं ॥ ८८ ॥

तेलि, साळी (९२–९४), तांबोळी (९५–९७), शिंपी (९८–१२१), रंगारी (२–३), वेदपाठक (४–६), शास्त्रनिपुण (७–८), ज्योतिषी (९–१०)·

पाहतां तेलियाचें घर । नित्य करिती करकर । अवघे म्हणती पहारोपहार[4] । भेटा रामचंद्र उठलिया ॥ ८९ ॥ जैंहूनि[5] आणिली जनकबाळा । तैंहूनी गेली लंकेची कळा । हनुमंत † धिक्कारिल सकळां । होईल तळमळा पुरवाहें ॥ ९० ॥ तेलियाची निजजाती । नित्य नवे फेरे खाती । तेथें कैंची सीता सती । निघे मारुति पुढारां ॥ ९१ ॥ मुळींचा तंतु तुटतां सांग । [1]साळी विसरले मार्गेमाग । पांजणीपरवणीचा उद्वेग । अति लगबग खळीलागीं ॥ ९२ ॥ खांचे रिघाले जीवें जीत । घडिया घडी न सांधे तेथ । स्वरूप नुतरेचि सवसूत[2] । मग तणतणीत ताणोनि ॥९३॥ अहर्निशीं घोटें हाणितां । स्वरूप नुतरेचि सर्वथा । साऊट आरूट गेले वृथा । तेथें सीता न लभेचि ॥ ९४ ॥ तांबोळीसन्मान पानभरें । देठझडी झाले एकसरें । म्हणती फेरारे फेरारे । अभ्यंतरें मुरकुटले ॥ ९५ ॥ हसण्या फुगण्याचें कारण । पानापाशीं अति सन्मान । तेणें अंतरीं सडलीं जाण । पडिलें खान निजलोभा ॥ ९६ ॥ पानसन्मानें अति दाटुकी । झडली अभिमानाची आटुकी । तोंडें तांबडीं अति अलुकीं । तेथें जानकी असेना ॥ ९७ ॥ शिंपियाची अति [3]कुसरी । घेवोनि लोभाची कातरी । अखंड खंडी नानापरी । गुप्तत्वें चोरी त्यामाजी ॥ ९८ ॥ पहिलें अखंड खंडिलें । शिविल्या म्हणती त्या दांडिलें । शिंपियें ऐसें कर्म केलें । बाधक झालें त्याचें त्यासीं ॥ ९९ ॥ अखंड खंडोनि करिती चोरी । तेणें शृंगारी कुंवारी नारी । बिरडें लावी गळ्यावरी । घरोघरीं टांचूनी ॥१००॥ ऐसें कर्म केलियापाठीं । शिंपी सलोभ बोटें चाटी । पोट न भरे शिवण्यासाठीं । सीता गोरटी तेथें कैंची ॥ १ ॥ रंगशाळा अलोलिक । काळें करिती शुद्धसात्विक । काळे हात काळें मुख । अति रंगीत रंगारे ॥ २ ॥ नामरूपाच्या ठशावरी । काळेंबेरें पालव धरी । ऐसिया रंगारियाच्या घरीं । सीतासुंदरी लाभेना ॥ ३ ॥ वेदपाठका नवलपरी । अनाध्याय स्वाध्याय घरीं । उदात्त[4] अनुदात्त[5]

१ धुनें, फुटकें. २ व्याजाची. ३ बडबडती. ४ प्रत्येक प्रहरास. ५ जेव्हांपासून. † अ–त ल.

१ कोष्टी, विणकर. २ बरोबर. ३ कौशल्य. ४ र्‍हस्व, लघु. ५ दीर्घ, गुरु.

स्वरीं । वर्णोच्चारीं अभिमान ॥ ४ ॥ सानुनासिक अनुनासिक । उच्चार नेणतां निर्नासिक । त्याशीं हांसती वेदपाठक । एकासी एक उपहासिती ॥५॥ ऐसें करितां वेदपठण । कोरडी शब्दांची खणखण । न वचती मानाभिमान । सीता चिद्रत्न तेथें कैंचें ॥ ६ ॥ पाहतां विद्वासांचें व्याख्यान । शास्त्र-व्युत्पत्ति[1] अति सज्ञान । ज्ञातेपणें गर्वाभिमान । जडला तो जाण सोडीना ॥ ७ ॥ जंव जंव शास्त्राची व्युत्पत्ति । तंव तंव अभिमानाची वस्ती । तेणेंचि गर्वाची होय स्फूर्ती । सीता सती तेथें नाहीं ॥ ८ ॥ पाहतां ज्योतिषांची स्थिती । ते गोंविले ग्रहगतीं । अवघ्या ग्रहगती लाविती । सीता सती तेथें नाहीं ॥ ९ ॥ हाट[२] चोहटे[३] पण विपण । शोधशोधूं पाहे आपण । पदोपदीं सावधान । सीता चिद्रत्न स्वयें पाहे ॥ १० ॥ देखतां कणांचिया राशी । निजबीजत्वें पाहे सीतेसी । फुलें गुंफितां फुलारियासीं । पाहे सुवासीं सीतेतें ॥ ११ ॥ वाणी [४]पसारी पाहतां । सीता पाहे आंतले पोतां । अंतर सांठवणें आतौतां । होय पाहतां सीतेतें ॥ १२ ॥ जे जे मार्गीं जन भेटती । त्यांमाजी पाहे सीता सती । अश्व गजाहि आंतौतीं । सीता सती पहातसे ॥ १३ ॥ उत्तम देखोनि पक्वान्न । सबाह्य सीता पाहे सावधान । हनुमंता नाठवे अन्न । लागलें ध्यान सीतेचें ॥ १४ ॥ घरें चत्वरें[२] परसद्वारें । उपऱ्या[५] आटाळ्या ओवरें[६] । सीतेलागोनि वानरें । सर्वांतरें शोधिलीं ॥ १५ ॥ अंतरीं देखोनि विषमस्थिती । सीता न लभे म्हणे मारुती । लंका शोधित असे ऐशिया रीतीं । सीता सती भेटावया ॥ १६ ॥ दृष्टी पडे जिकडे जिकडे । सीता पाहे तिकडे तिकडे । सवेग तेथूनिया वडे । सीता पुढें पुढें पाहतसे ॥ १७ ॥ पाहता जंबुमाळीमळे । तंव ते लवलवती फळें । हनुमंत उपडी समूळ मूळें । जनकबाळी† शोधावया ॥१८॥ सांदीकोंदीं नदोनदीं । सीता पाहे विदोविदीं[१] । शोधितां लंकेची[२] पैं मांदी[३] । कोणी शुद्धी सांगेना ॥ १९ ॥ शोक नाहीं जिये स्थानीं । सीता वसे अशोकवनीं । ते तंव वार्ता न वदे कोणी । शुद्धि कैसेनि होईल ॥ २० ॥

सर्व स्थळें शोधून पुढें पळाला.—घरें शोधिलीं विचित्र । तेथें न लभेचि सीता सुंदर । उद्भट घरें थोर थोर । तींहि वानरें शोधिलीं ॥ २१ ॥ इंद्रजितकुंभकर्णस्थान । श्रेष्ठ सेनानी[४] प्रधान । रावणाचें निजभुवन । निद्रास्थान शोधिलें ॥२२॥ हनुमंत बळिया महाबळी । घेईल रावणाची घरधांडोळी । नगरामाजी लावील कळी । करील रांडोळी सभेमाजी ॥ २३ ॥ ऐसें आश्चर्य चरित्र । हनुमंत करील अद्भुत । श्रोतीं व्हावें [५]दत्तचित्त । कथा विख्यात श्रीरामें ॥ २४ ॥ एका जनार्दना शरण । गोड घांस रामायण । तें हें सुंदरकांड जाण । समाधान जीवशिवां ॥ २५ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां लंकाशोधनं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ १२५ ॥ श्लोक ॥ ४ ॥ एवं ॥ १२९ ॥

---

## अध्याय २ रा

नगरशोधन झाल्यावर राजवस्तींत हनुमान जातो:—

श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ श्रीराम समर्थ ॥

हनुमंत*महावीरें । लंका शोधिली घरोघरें । हाट[६] चोहाटें चौबारें । गुप्त ओवरें¶ स्त्रियांचीं ॥ १ ॥ ऐसें† शोधितां नगरांत† । न लभेचि सीता शुद्ध्यर्थ ।

१ शास्त्राचें ज्ञान. २ बाजार. ३ चवाटे. ४ व्यापारी. ५ माड्या. ६ धर्मशाळा.

१ प्रत्येक गल्लींत. २ सर्व लंका. ३ वोवरें. ४ सेनापति. ५ सावधान. ६ बाजार.

† ब—ळा. * क—तें. ¶ वोवरिया. † एसीं.

राजवर्गाच्या गृहांत । सीता हनुमंत पाह रिघे ॥ २ ॥

†विचक्रमे गृहान्वेगात्प्रहस्तस्य निवेशनम् ।
ततो न देवीति गृह महापार्श्वस्य वीर्यवान् ॥ १ ॥
महोदरस्य च तथा महाकायस्य चैव हि ।
विद्युज्जिव्हस्य भुवनं जबुमालेस्तथैव च ॥ २ ॥
वज्रदंष्ट्रस्य च तथा शुकसारणयोरपि ।
विद्युन्मालेः सुमालेश्च विकटस्याप्यतुर्बलेः ॥ ३ ॥
बहुशत्रोः सूर्यशत्रोः कुमित्रामित्रयोस्तथा ।
चित्रकस्य विचित्रस्यातिगर्विंशठमित्रयोः ॥ ४ ॥
ताम्राक्षस्य च धूम्रस्य मकराक्षमृगाक्षयोः ।
लवजिव्हविरूपाक्षाक्षादीनां च महाबलः ॥ ५ ॥

उच्च उड्डाणानें प्रहस्तादिकाचीं घरें शोधितो–करोनि§ उड्डाणाची थोरी । हनुमंत रिघे प्रहस्त-मंदिरीं । शोधिलीं घरें वोवरींओवरीं । स्त्रियां-माझारीं जानकी नाहीं ॥ ३ ॥ तेथें न लभेचि जाण । मग करोनियां उड्डाण । प्रहस्त महाबळियां* प्रधान । त्याचेंही भुवन शोधिलें ॥ ४ ॥ तेथोनि उडोनि झडकरी । शोधावया सीता सुंदरी । रिघोनि महापार्श्वाचे घरीं । अंतःपुरीं शोधित ॥ ५ ॥ तेथें न लभेचि सीताशुद्ध्यर्थ । तेथूनि उडाला हनुमंत । महोदराच्या घराआंत । असे पाहत जानकी ॥ ६ ॥ अतिकाय महाकाय । यांचीं घरें शोधित जाय । अखया कुमराचें ठाय । शोधोनि पाहे वैदेही[१] ॥ ७ ॥ वज्रदंष्ट्र आणि जंबुमाळी । तेथें शोधिली जनकबाळी । विद्युज्जिव्ह महाबळी । तेथें घरधांडोळी घेतली ॥ ८ ॥ रावणाचा आप्त पूर्ण । शुक आणि तो सारण । त्या दोघांचीं घरें जाण । पाहे आपण हनुमंत ॥ ९ ॥ विद्युन्माळी आणि सुमाळी । विकटशत्रु आतुर्बळी । यांचे घरीं जनकबाळी । घेतां धांडोळी न लभेचि ॥ १० ॥ बहुशत्रु आणि सूर्यशत्रु । अमित्र कुमित्र शठमित्र । अति गर्वी चित्रविचित्र । पवनपुत्र घरें शोधी ॥ ११ ॥ धूम्राक्ष आणि ताम्राक्ष । विरूपाक्ष आणि मकराक्ष । शोधावया मृगशावाक्ष । परम अति दक्ष कपि शोधी ॥ १२ ॥ घस प्रघस महाघस । चौथा जो कां वीर विघस । हनुमंत शोधी सावकाश । घावया घस[१] रावणासी ॥ १३ ॥ शठ निशठ महाशठ । भट उद्भट महाभट । हींही घरें शोधूनि स्पष्ट । निघे मर्कट पुढारां ॥ १४ ॥ युद्धोन्मत्त महोन्मत्त । वीर वाटीव[२] अति उन्मत्त । घरें शोधोनि समस्त । निघे हनुमंत पुढारां ॥ १५ ॥ भीम महाभीम सभीम । तिघांचीं रूपें अति दुर्गम । देखतां काळास पडे भ्रम । सुखें प्लवंगम तेथही शोधी ॥ १६ ॥ वीरजिव्ह वीर उद्भट । जिव्हा वक्रप्राय तिखट । जिव्हाघायें पर्वत पीठ । करी शतकूट गिरिवरां ॥ १७ ॥ जिव्हा लांब योजन एक । सुरवरपन्नगांसी धाक । तींही घरें एक एक । शोधी निःशंक मारुति ॥ १८ ॥ विद्युज्जिव्ह नाम देख । जिव्हा विद्युत्तेजें देख । विजू कडकडी तैसी हाक । लोकालुलोक कांपती ॥ १९ ॥ ऐसे हे वीर विख्यात । त्यांचे त्यांचे घराआंत । हनुमंत घरधांडोळी घेत । सीताशुद्ध्यर्थ साधावया ॥ २० ॥ विकर्ण नामें वीर निधडा । कर्णस्थानीं विकट दाढा । वृक्षपर्वतां करी रगडा । मुखापुढां कोण राहे ॥ २१ ॥ याचे दाढेचे भयाभेण[३] । वारा वाजों न शके पूर्ण । हनुमान तेथें रिघोनि आपण । सीता शोधोन स्वयें पाहे ॥ २२ ॥ जैशीं शुकाचीं चुचुबाडें । तैसें तिखट नाक गाढें । शुक-नासिक नांव पडे । नाकें रगडी गिरीकूट ॥ २३ ॥ लागतां नाकाचा आघात । दैत्य दानव चळीं

१ जनककन्या ( सीता ).

† सु. काड १७, १९, २०, २१ † ३, ४, ५ श्लोक क–मध्यें नाहींत. § क–करून. * क–ळी.

१ काळेपणा. २ शौर्याचें. ३ भयानें.

कांपत । हनुमंत रिघोनियां तेथ । असे पाहत जानकी ॥ २४ ॥ अश्वमुख गजमुख । तरक्षतगर-व्याघ्रमुख । त्यांचे घरीं हनुमान देख । शोधी सम्यक जानकी ॥ २५ ॥ करालाक्ष विकरालाक्ष । शोणिताक्ष भीमाक्ष । हनुमान शोधोनि अति दक्ष । एकैक मुखें घरें शोधिलीं ॥ २६ ॥ सूर्यरथाचें जेवढें चाक । तेवढें एकैकाचें मुख । यालागीं त्यातें चक्रमुख । नाम निर्दोष[1] तयांसी ॥ २७ ॥ मुख पसरिल्या रणाआंत । तिहीं लोकीं अति आकांत । गिळों शकेल मेरु पर्वत । वीर विख्यात चक्रमुख ॥ २८ ॥ वाफ निघता वदनीहूनी । सूर्य बिंब आच्छादूनि । धुम्र दाटती ह्या गगनीं । तैंपासोनि अद्यापि ॥ २९ ॥

हीं घरें पाहत असता दृष्टीसमोर आणलेले एकांत प्रसंग·——ऐसीं घरें समस्त ।‡ हनुमान साक्षेपें[1] शोधित । स्त्रीपुरुषांचा येकांत । सुरतरत स्वयें देखे ॥ ३० ॥* स्त्रीपुरुषांची एकांतीं । नानापरींची देखोनि रती । हनुमान उद्वेगला चित्तीं । ते श्लोकोक्ती स्वयें बोले ॥ ३१ ॥

परदारावरोधस्य प्रसुप्तस्य निरीक्षणम् । ‡
इदं खलु ममात्यर्थं धर्मलोपं करिष्यति ॥ ३९ ॥
न हि मे परदाराणां दृष्टिर्विषयवर्तिनी ।
अयं चात्र मया दृष्टः परदारपरिग्रहः ॥ ४० ॥

हनुमंत म्हणे निजचित्तीं । श्रमतां सीतेचे शुद्धयर्थीं । हे मुख्यत्वें ग्रहगती । आली उपहती[2] ब्रह्मचर्या ॥ ३२ ॥ नाहीं परदारदर्शन । नाहीं परदारसंभाषण । त्या मज स्त्रीपुरुषमैथुन । योनिदर्शन ये काळीं ॥ ३३ ॥ घरोघरीं सीता सती । पाहतां स्त्रीपुरुष येकांती । देखिल्या नानापरींच्या रती । आली उपहती ब्रह्मचर्या ॥ ३४ ॥

१ काळजीपूर्वक. २ नाश.

‡ वा. रा. सु. का. ११।३९-४०; मद्रास पृ. ५२९. † निर्दोख.

* परिशिष्ट अ पृ. १३ पहा.

देखे जो स्त्रीपुरुषमैथुन । हें ब्रह्मचर्या मुख्य विघ्न । त्या स्त्रियांचें अति मैथुन । अन्योन्य[1] देखिलें ॥ ३५ ॥* श्रीरामसेवा अति प्रीतीं । लंघोनि आलों अपांपती[2] । येथें शोधितां सीता सती ॥ अधोगति मज आली ॥ ३६ ॥ नग्न स्त्रियांचें दर्शन । तेंचि ब्रह्मचर्या नागवण । तेथें देखोनि मैथुन । अधःपतन मज आलें ॥ ३७ ॥

तस्य प्रादुरभूच्चिंता पुनरेव मनस्विनः ॥ +
तिष्ठत्येकान्तचितस्य कार्यनिश्चयदर्शिनः ॥ ४१ ॥

सीता शोधितां संकटीं । ब्रह्मचर्या होईल तुटी । न शोधितां उठावठी । श्रीराम जगजेठी क्षोभेल ॥ ३८ ॥ क्षोभलिया रघुत्तम । वृथा जन्म वृथा कर्म । वृथा गेला भजनधर्म । अति दुर्गम मज आलें ॥ ३९ ॥ शुद्धीकरितां न फिरतां । अपेश येईल माझे माथां । काय करूं श्रीरघुनाथा । बुद्धिदाता मज होई ॥ ४० ॥ 'बुद्धिर्बुद्धिमतामस्मि' । ( भ. गी. ९।३१ ), हे प्रतिज्ञा[3] तुझी आगमनिगमीं । माझे संकटसंभ्रमीं । कृपानुधर्मी पावावें ॥ ४१ ॥ 'न मे भक्त प्रणश्यति' । ( भ. गी. अ.७।१०; ) श्रीदें[4] तुझीं गा श्रीरघुपति । सीताशुद्धीचे आकांतीं । कृपामूर्ति पावावें ॥ ४२ ॥

ही दृश्यें ब्रह्मचर्यविघातक म्हणून हनुमंताचा उद्वेगः— हनुमंताची अति चिंता । कळों सरली श्रीरघुनाथा । प्रकटला हृदया आतौतां । भक्त साह्यार्थी श्रीराम ॥ ४३ ॥ मुखीं श्रीरामनाम मुद्रा । हृदयीं स्मरतां श्रीरामचंद्रा । उल्लास जाला त्या कपींद्रा । श्रीरामभार्या शोधावया ॥ ४४ ॥ करितां श्रीरामाचें स्मरण । हृदयीं आली आठवण । देखतां परदारमैथुन । बाधकपण मज नाहीं ॥ ४५ ॥

\+ वा. रा. अ. ११।४१.

१ परस्पर. २ समुद्र. ३ आज्ञा. ४ बाणा.

* परिशिष्ट ब पृ. १३ पहा.

कामं दृष्टा मया सर्वा विवस्त्राभरणाः स्त्रियः[1] । +
न तु मे मनसः किंचिद्वैरूप्यमुपजायते[2] ॥ ४२ ॥
मनो हि हेतुः सर्वेषामिन्द्रियाणा प्रवर्तते[3] ।
शुभास्ववस्थासु च तच्च मे शून्यवस्थितम्[4]॥४३॥
नान्यत्र हि मया शक्या वैदेहीपरिमार्गिकम्[5] ।
स्त्रियो हि स्त्रीषु दृश्यन्ते सदैव परिमार्गणा[6] । ४४॥

देखतां परदारा नग्न । देखोनि परदारमैथुन । मज नाहीं कामकामन । श्रीरामचरणप्रसादें ॥४६॥ देखतां परदाररती । अल्पही कामाची स्फूर्ती । बाधीना ज्ञानियाचे चित्तीं । श्रीरघुपतिप्रसादें ॥ ४७ ॥ चित्तामाजी कामाची वस्ती । तेणेंचि ते करितां श्रीरामभक्ति । चित्त पावलिया चैतन्यस्थिती । कामा निवृत्ती सहजेंचि ॥ ४८ ॥ जेंवी अंधारिया रातीं । खद्योत[7] नक्षत्रें लखलखिती । तेथें उगवल्या गभस्ती । अस्त पावती अवघींही ॥ ४९ ॥ तेंवी काम क्रोध लोभ चित्तीं । तेणें चित्तें करितां भक्ती । राम प्रगटलिया सर्वां भूतीं । अस्त पावती काम क्रोध ॥ ५० ॥ इंद्रियां प्रवर्तक मन । मनाचे पोटीं स्त्रीपुरुष भान । सकळ कामासी कारण । मनचि जाण बाधक ॥ ५१ ॥ जेंवीं समुद्रजळीं लवणकण[8] । विरोन समुद्र होय आपण । तेंवी करितां श्रीराम स्मरण । मनचि परिपूर्ण परब्रह्म ॥ ५२ ॥ मनाची मावळली मनोवृत्ती । स्त्रीपुरुषांचे एकातीं । शोधितां सीता सती । बाध चित्तीं मज नाहीं ॥ ५३ ॥ मन मावळताचि पाहीं । मी देहींच जालों विदेही ॥ आतां नग्नस्त्रियांच्या ठायीं । शोधीन वैदेही विदेहत्वें ॥ ५४ ॥ नग्न देखतां सूकर श्वान । पुरुषास नव्हे कामकामन ॥ तेवी देखतां स्त्रीपुरुष-मैथुन । बाधकरण मज नाहीं ॥५५॥ शस्त्र घालितां दळां आंत । पुरुष नव्हे कामासक्त । तेंवी रिघतां योनि आंत । काम कामार्थ मज नाहीं ॥ ५६ ॥ माशीवरि बैसल्या माशी । काम नुपजे कोणासी । तेंवी देखतां मैथुनासी । शंका मानसीं मज नाहीं ॥ ५७ ॥ पाविजे सद्गुरुचा वचनार्थ । तेंच कामाचा समूळ घात । तो मज तुष्टला श्रीरघुनाथ । कामकार्यार्थ मज नाहीं ॥ ५८ ॥ स्त्री चुकली सीता सती । ते शोधावी स्त्रियां प्रती । त्या स्त्रियांची देखतां रती । कामस्फूर्ति मज नाहीं ॥ ५९ ॥ स्त्री चुकली सीता सुंदरी । ते शोधितां स्त्रियां माझारीं । वांचून[1] शोधितां श्वानसूकरीं । श्रीरामनारी तेथें कैंची ॥ ६० ॥

‡यस्य सत्त्वस्य या योनिस्तस्या स परिमार्ग्यते[1]+
न शक्या* प्रमदा नष्टा मृगीषु परिमार्गितुम् ॥४५॥
तदिद मार्गित तावच्छुद्धेन मनसा मया ।
इदानीं शोधयिष्यामिऽ सीता जनकनदिनी ॥४६॥

सीता चुकलिया साठीं । वना धावोनि उठाउठीं । शोधूं जातां मृगांची थाटी । मूर्खदृष्टी शोधक ॥ ६१ ॥ तें मज नाहीं मूर्खपण । सीता शुद्ध्यर्थ सी सज्ञान । शोधीन मी समस्त भुवन । गुह्यस्थानें स्त्रियांचीं ॥ ६२ ॥ जें कां अत्यंत विषमस्थान । तेथें रिघतां संकट गहन । तेथें तेथें मी प्रवेशोन । सीता शोधीन साक्षेपें[2] ॥६३॥ मागें शोधिलें भुवनोभुवन । आतां शोधीन दुर्गमस्थान । ऐसी धरोन आगवण । वडे आपण हनुमंत ॥६४॥

इंद्रजिताच्या भुवनांत–भुवनवर्णन–सुलोचना-दर्शन–सीतेविषयीं आलाप व सताप.–

---

+ वा. रा. सु. कां. ११।४२-४४

१ विश्वस्ताः रावणस्त्रियः (मुद्रितपाठः). २ वैकृतमुपपद्यते, ( मुद्रितपाठः ). ३ प्रवर्तने ( मुद्रित. ). ४ सुव्यवस्थितम् ( मुद्रित ). ५ मार्गितुम् ( मुद्रित ). ६ मार्गणम् ( मुद्रित ). ७ काजवे. ८ मिठाचा खडा.

‡ वा. रा. सु. का. ११।४५-४६

+ तत् परिमार्गेन. * शक्य. ऽ रावणांतःपुरं सर्वं दृश्यते न च जानकी । (मुद्रितपाठः ).

१ तें सोडून. २ मोठ्या प्रयत्नानें.

हनुमान वडों पाहे आपण। तंव देखिलें इंद्रजितभुवन। अनर्घ्य[1] रत्नीं विराजमान। तेजें गगन लखलखित ॥ ६५ ॥ घरावरी घरकुसरी। [2]उपरीवरी उपरी। [3]आटाळिका थोरथोरी। त्यांही वरी चौवारें ॥ ६६ ॥ रावणाचे घराहूनी। शोभा इंद्रजिताचे भुवनीं। कनक कळस जडितरत्नीं। लागले गगनीं लखलखीत ॥ ६७ ॥ श्वेतपीत आरक्त भारीं। पताका झळकती अंबरीं। जागेल[4] घालिजे महा असुरीं। द्वारोद्वारीं दीपिका ॥ ६८ ॥ हाकोनिया उपराउपरीं। घरटी घालिजे महावीरीं। वायूसि रीघ नाहीं भीतरीं। पाहे चौफेरीं हनुमंत ॥ ६९ ॥ तीन खण चारी खण पांच खणें। सप्त खणें आणि नव खणें। त्या माजी आहे महा दुखणें। निरय कुंथणें वाटिवा ॥ ७० ॥ आत दुखण्याचें छेदन। करील लक्ष्मणाचा बाण। युद्धचर्या सांडील पूर्ण। पाडील खण गर्वाचें ॥ ७१ ॥ देखोनि इंद्रजित भुवन। हनुमान खवळला आपण। भीतरीं रिघावया जाण। अणुप्रमाण स्वयें जाला ॥ ७२ ॥ रिघोनिया गवाक्ष द्वारीं। वेगें पाहिलीं घरें चारी। शोधोनिया वोंवरी वोंवरी। उपऱ्याउपरी धांडोळी ॥ ७३ ॥ अट्टाळिकांही माझारी। हनुमान पाहे सीतासुंदरी। तंव देखिली नवलपरी। सहित[5] अंतुरी इंद्रजित ॥ ७४ ॥ मरकत [6]मंचक सुंदर। त्यावरी त्राहाटिले[7] मयूर। शेज रचिली सुकुमार। सुमनें अरुवार[8] सुगंधें ॥ ७५ ॥ मुक्तघोसींयुक्त वितान[9]। चवचवीत शोभायमान। कर्पूरवाती तेज गहन। पीकदानें रत्नाचीं ॥ ७६ ॥ अतिसुगंधा सुवर्णभिंती पाचूनिबद्ध अवघी क्षिती[10]। सुलोचना महासती। विडिया देत इंद्रजिता ॥ ७७ ॥ सुलोचना पतिव्रता। कदा नुलंघी पतिवचनार्था। तीसी देखोनि हनुमंता म्हणे हे सीता निश्चित होय ॥ ७८ ॥ नागकन्या सुलोचना। ते तंव [‡]पद्मिनी पद्मनयना। देखोनि हनुमान म्हणे जाणा। रामांगना हे होय ॥ ७९ ॥ पद्मिनी स्त्रियेचा विचार। पाउलीं पाउलीं भ्रमती भ्रमर। अंग सुवास मनोहर। सीता सुंदर हे होय ॥ ८० ॥ माझ्या स्वामीची हे कांता। अनुसरली रावणसुता। दोहींच्या करीन मी घाता। कोप हनुमंता पै आला ॥ ८१ ॥ डोळे आरक्त क्रोधें कडाडी। वळिलीं पुच्छाचीं पैं वेटोळीं। दोघांची मुरडावया नरडी। शेंडी तडतडी हनुमंताची ॥ ८२ ॥ अधर्मी रतलीसे सीता। उभयवर्गा मारीन आतां। कोप आलिया श्रीरघुनाथा। दोघांचे प्रेता दावीन ॥ ८३ ॥ अथवा निजपुच्छीं बांधोनी। जीत[1] धरोनी नेईन दोनी। रागें घुलकाविलो गगनीं। उडी घालोनि मारावया ॥ ८४ ॥ तंव सुलोचना ते पतिव्रता। पतीचे चरणीं ठेविला माथा। कांहीं एक पुसेन मी आतां। प्राणनाथा क्षमा कीजे ॥ ८५ ॥ यावज्जन्म तुम्हां प्रती। नाहीं केली म्या विनंति। हा घातु देखोनि लंकापती। काकुलती पुसतसे ॥ ८६ ॥

अथ मेघप्रतीकाशं कुम्भकर्णनिवेशनम् ॥ ६-१८ ॥
विभीषणस्य च तथा पुप्लुवे स महाकपिः ॥ ६-१८ ॥
ततश्चेन्द्रजितो वेश्मे जगाम हरिपुङ्गवः ॥ ६-२१ ॥

राखों जातां अशोकवन। तुम्ही पावाल अति अपमान। अखया कुमरा आलें मरण। कुळनिर्दळण राक्षसां ॥ ८७ ॥ तंव इंद्रजित पुसे प्रियेप्रती। ऐसें होय कैशा रीतीं। रावणें आणिली सीतासती। कुळसमाप्ती राक्षसां ॥ ८८ ॥ वनीं छळोनी जनकबाळी। आणि छळिला श्रीरामबळी। तेणें तो करील लंकेची होळी। राक्षसकुळीं आकांत ॥ ८९ ॥ तुम्हांवरी ओखटें[2] चिन्ह। देखोनि धाके माझें मन। प्रार्थुनी

१ मूल्यवान. २ मजल्यावर. ३ गच्ची. ४ गस्त. ५ स्त्रीसहवर्तमान. ६ पाचूजडित पलंग. ७ काढले. ८ नाजूक. ९ छत. १० जमीन.

१ जिवंत. २ वाईट. ‡ पद्मिणी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23000 वि. ...
क्रमांक 9709 नों. दि. ...



दशानन। बुद्धी आपण सांगावी ॥ ९० ॥ तूं तंव त्याचा ज्येष्ठ कुमर। तुझा विश्वास त्यास थोर। सीता देवोनि सुंदर। श्रीरामचंद्र करीं सखा ॥ ९१ ॥ सखा केलिया श्रीरघुनाथ। राक्षसकुळ होईल स्वस्थ। तुम्ही अक्षयीं समस्त। यशवंत तिहीं लोकीं ॥९२॥ इंद्रजित सांगे अति एकान्त। रावणासी सीतासन्निपात। जो जो सांगेल हित-स्वार्थ। त्याचा घात करूं धावे ॥ ९३ ॥ सख्य करोनि श्रीरघुनाथा। सीता सोडी मज म्हणतां। माझ्याच करूं धावेल घाता। बैसेल माथा पितृद्रोह ॥ ९४ ॥ ऐके प्रिये सावधान। चुकविलिया न चुके मरण। होणार तें होईल जाण। बुद्धि आपण न सांगावी ॥ ९५ ॥ ऐसी दोघांची एकांतकथा। ऐकोनि हनुमंता। सुलोचना नव्हे सीता। ऐसें तत्वतां मानलें ॥ ९६ ॥ इंद्रजित सुलोचना एकांतीं। कोणे ठायीं सीता सती। राखिली आहे लंकापतीं। तें मारुती नायकेची ॥ ९७ ॥ लंकेमाजी आहे सीता। शुद्धी लागली हनुमंता। तिसी शोधावया तत्वतां। होय निघता तेथोनि ॥ ९८ ॥

कुंभकर्णाचें भुवनः— मेघाहूनि उंच शिखर। मेघवर्ण दीर्घ शिखर। तेथें शोधावया सीता सुंदर। उडे सत्वर मारुती ॥ ९९ ॥ सादरें शोधितां घर। हनुमान दचकला थोर। कुंभकर्ण महाथोर। निशाचर पहुडला ॥ १०० ॥ दीर्घ करितां महाघोर। नादें कोंदलें अंबर। शंख केलिया ही समोर। कानीं उत्तर पडेना ॥ १ ॥ श्वासोच्छासाच्या आवर्तीं[१]। शतानुशत पडले हस्ती। निर्गमू[२] नाहीं तळमळती। म्हैसे[३] आरडती त्या माजीं ॥ २ ॥ दोन्ही [४]नासापुटरंध्रीं। सगळे कळप रिघती करी। त्यांचा निर्गमू नाहीं बाहेरी। प्राणी मारिती प्राण्यातें ॥ ३ ॥ गाई म्हैशी बैल घोडीं। श्वासोच्छासीं घुंगरडी। निदसुरिया नाक रगडी। मरती किडी प्राण्यांच्या ॥ १०४ ॥ हनुमान म्हणे आपुल्या चित्तीं। जैं रचिली याची मूर्ति। तैं आळस नाहीं प्रजापती। अमूप माती रचियेली ॥५॥ बाबरझोटथा[१] अतिविशाळ। जैसे भाले अणियाळ[२]। अंगीचीं रोमें जैसीं शूळ। दांत विक्राळ खतेले[३] ॥६॥ शेवाळले[४] दिसती दशन[५]। कदा न करी दांतवण। देखोनिया त्याचें वदन। आलें वमन हनुमंता ॥ ७ ॥ येथें आलिया श्री-रघुनंदन। याची पहावी आंगवण। प्रथम यासीं माझें रण। केला पण हनुमंतें ॥८॥ देखोनि त्याची देहस्थिति। कंटाळला स्वयें मारुती। येथें कैसी सीता सती। म्हणोनि चित्तीं त्रासला ॥ ९ ॥ अति त्रासें उद्वेगला। अत्यंत खेदें खिन्न जाहला। ब्राह्मण जन्म हा पावला। व्यर्थ गेला निद्रेनें ॥१०॥

निद्रेचा प्रभावः—
निद्रया ह्रीयते नक्तं, व्यवायेन च रात्रयः।
दिवा चार्थपरो राजन्, कुटुंबभरणेन च ॥

अर्धें आयुष्य हातोहातीं। बळेंची हिरोन नेलें रातीं। जागा जालिया स्त्रियेसीं रती। कामासक्ती कामाची ॥ ११ ॥ कुटुंबचिंता बैसली चित्तीं। ते तव न सोडी कल्पांतीं। आयुष्य गेलें याचि रीतीं। द्रव्यासक्ती अति तृष्णा ॥१२॥ भोजनशयन द्रव्यासक्ती। जन नागवले याच रीतीं। कुंभकर्ण नागविलासे सुषुप्तीं। सीता सती येथ कैंची ॥१३॥

बिभीषणाचे घरः— तेथोनि करोनि उड्डाण। देखिलें बिभीषणाचें भुवन। टके पताका वृंदावन। हरिकीर्तन रामाचें ॥१४॥ टाळ घोष मृदंग मेळीं। नैराश्यें निघडा वैष्णव बळी। नामासरसीं वाजवी टाळी। सुख समेळीं डुल्लत ॥ १५ ॥ कीर्तनसुखें सुखावले। आप आपणिया विसरले। परमानंदें

१ भोवऱ्यात. २ सुटका. ३ टोणगे. ४ नाकपुड्यात.

१ दाढी. २ केस अणीदार. ३ क्षतें पडलेले. ४ बुरसटलेले. ५ दांत.

हत जाले । गाऊं लागले रामगुण ॥ १६ ॥ निरपेक्षी विचक्षण । श्रुती उपरमे सावधान । श्रीराम सगुणी निर्गुण । करिती कीर्तन तें ऐका ॥ १७ ॥ श्रीरामें धरणी अति पावन । राम जीवन राम वहन । राम तपन राम गगन । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ १८ ॥ राम मनाचें उन्मन । राम चित्ताचें चैतन्य घन । राम बुद्धीचें सज्ञान । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ १९ ॥ राम जंगमीं स्थावरीं । राम सबाह्य अभ्यंतरीं । राम परमात्मा श्रीहरी । जगदुद्धारी श्रीराम ॥ १२० ॥ देखोनि कीर्तनाची गोडी । हनुमंता अत्यंत आवडी । रंगीं घालोनियां वेगें उडी । गुप्त गडबडीं नाचत ॥ २१ ॥ रंगीं नाचतां हनुमंत । रंगीं ओसंडला परमार्थ । तेणें बिभीषण मूर्छित । परम भक्त परमार्थी ॥ २२ ॥ हनुमंता स्वयें दर्शन । नाठवे देह विदेहभान । बिभीषण मूर्च्छापन्न । आपणा आपण विसरला ॥ २३ ॥ दोघांसीं ओळखी नसतां । दोघां भेटी गोष्टी न होतां । दोघां झाली एकात्मता । श्रीरामकथा-कीर्तनें ॥ २४ ॥ हरिकीर्तन तें स्वकर्म । हरिकीर्तन तो स्वधर्म । हरिकीर्तन प्रेम परम । जें परब्रह्म प्रापक ॥ २५ ॥ बिभीषणाचे भुजेप्रती । दिग्विजयी श्रीराममूर्ती । तें देखोनिया मारुती । परम प्रीतीं सुखावे ॥ २६ ॥ बिभीषण श्रीरामभक्त । हनुमान आनंदें नाचत । भावें भजतां श्रीरघुनाथ । नित्य मुक्त बिभीषण ॥२७॥ राक्षसा श्रीरामाची भक्ती । हरिखें उपरमे मारुती । रामें रावणाची केलिया शांती । राज्यप्राप्ती बिभीषणा ॥ २८ ॥ माझ्या श्रीरामाची भक्ती । राज्य करितां नित्यमुक्ती । असतां स्त्रीपुत्रसंतती । भुक्ति मुक्ति भंगेना ॥२९॥ हनुमंतें केला पण । रामें मर्दिलिया रावण । लंकापती बिभीषण । हें शुभचिन्ह सत्य माझें ॥ ३० ॥ जेथें श्रीरामाची भक्ती । तेथें आहे श्रीरामशक्ती । रामराज्य लंकेप्रती । सीतासती येतांचि देख ॥ ३१ ॥ जेथें रिघाली रामशक्ती । तेथेंचि भुक्ति तेथेंचि मुक्ति । रामराज्याची ऐशी स्थिती । केला मारुतीं निश्चयो ॥ ३२ ॥ सीता-आगमन लंकेप्रती । रावणासी मरण मुक्ती । बिभीषणा राज्यप्राप्ती । केला मारुती निश्चयो ॥ ३३ ॥ मागील श्रम खेद उपहती[1] । येथें आलिया झाली शांती । धन्य वैष्णवांची संगती । महिमा किती मी वानूं ॥ ३४ ॥ संतसंगें निरसे भ्रांती । संतसंगें जड उद्धरती । संतसंगें ब्रह्मप्राप्ती । नित्य मुक्ती संतसंगें ॥३५॥ संत चरणींचे रजःकण । हनुमान वंदी पै आपण । चरणरजीं घाली लोटांगण । परम पावन पदरज ॥ ३६ ॥ चरणरज स्नानापुढें । तीर्थमात्र तें बापुडें । चरणरजें मुक्ति जोडे । ब्रह्म आतुडे[2] पदरजें ॥३७॥ बिभीषणाच्या भवनाप्रती । हनुमान पावला सुखविश्रांती । भगवद्भक्त जेथें भेटती । भ्रमनिवृत्ती आकल्प[3] ॥ ३८ ॥ अर्थी स्वार्थी परमार्थी । गेलिया भक्तभवनाप्रती[4] । त्याचेनि सुखप्राप्ती । भ्रमनिवृत्ती आकल्प ॥ ३९ ॥ एका जनार्दना शरण । दुरोनि देखिल्या भक्तभवन । हनुमान झाला सुखसंपन्न । समाधान जीवशिवां ॥ १४० ॥ प्रत्यक्ष झालिया भक्तभेटी । त्यासी पुसतां गुह्य गोष्टी । परमानंदीं पडली मिठी । धन्य सृष्टीं हरिभक्त ॥ ४१ ॥ एका जनार्दना विनंति । शोधूं जातां सीता सती । बिभीषणाच्या भवनाप्रती । सुखसंपत्ती मारुतीसी ॥ ४२ ॥ स्वस्ति श्री भावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताशोधनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ ओव्या ॥ १४२ ॥ श्लोक ॥ ५ ॥ एवं ॥ १४७ ॥

---

१ दुःख. २ प्राप्त होतें. ३ पृथ्वीक्षयापर्यंत. ४ भक्तगृहाला.

टीपः—खालील लिहिलेला पाठ व सशिस मुद्रित पोथींत आहे. त्याचे अतरंगावरून तो प्रक्षिप्त असावा असें भासतें. तथापि कदाचित् मूळ प्रतींतहि असल्यास अनुल्लेख-दोष न व्हावा म्हणून हे दोन्ही भाग परिशिष्ट अ व परिशिष्ट ब असे दिले आहेत.

( परिशिष्ट अ )

परिशिष्ट अ. अध्याय २ मध्यें पृष्ठ ६ ओवी ३० "ऐसी घरें समस्त . ..स्वयें देखे" ॥३०॥ नतर—

स्त्रीपुरुष एकान्तस्थानीं । उन्मादमदें मद्यपानीं । नागवीं नाचती पैं दोन्ही । निजमैथुनीं रममाणें ॥३१॥ स्त्रीपुरुषांचें आलिंगन । परस्परें मुखचुंबन । स्त्रियांचें करिता कुचमर्दन । देखे आपण हनुमत ॥ ३२ ॥ हावभाव कटाक्ष गोष्टी । डोळे मोडणें चिमटाचिमटी । येरयेरा झोंबतीं कठीं । सुखसंपुटीं रममाण ॥ ३३ ॥ करितां स्त्रियांचें अधरपान । सकळ गोडी त्यापुढें तृण । सोमपान अमृतपान । निंबलोण स्त्रीभोगा ॥ ३४ ॥ स्त्रीपुरुष येकांतगती । विपरीत करिती रतीची प्रीती । नाना यातीची मैथुनस्थिति । स्वयें मारुती देखत ॥ ३५ ॥ पुरुष होय स्त्रियेची नारी । स्त्रियेसि पुरुष भर्तार करी । तीस बैसवोनि कामचारी । विपरीतपरी संभोगी ॥ ३६ ॥ येक स्त्रियेसीं करी अश्विनी । आपण घोडा होय हीं हीं करूनी । तिची स्वयें योनी हुंगोनी । अश्वमैथुनीं रमतसे ॥ ३७ ॥ येक स्त्रियेतें करी खरी । भुंकत धांवे खराचे परी । पदतळें हाणी उरावरी । खरसंस्कारीं विचरत ॥ ३८ ॥ येक राक्षस अति मूढ । स्त्रियेचीं स्तनें चोखी दृढ । तुझें दुध मज लागे गोड । पुरे कोड तेणें माझें ॥ ३९ ॥ येक तो अतिशय कुश्चितु । स्त्रियेचे योनीस दांत देतु । केश रिघती मुखा आतु । मग कोपतु स्त्रियेसीं ॥४०॥ केश वाढविले योनीवरीं । तू तव निःसगळ भारी । म्हणोनि तीतें स्वेच्छें मारी । ध्याय धरी रुसीं नको ॥ ४१ ॥ अपत्य मायेतें स्वेच्छें मारी । माता त्याचा कोप न धरी । तूही मज †शिश्यापरी । क्षमा करी बाळकत्वें ॥ ४२ ॥

(परिशिष्ट ब)

पान ६ ओवी ३५ ( देखे जो.. .अन्योन्य देखिले ॥ ३५ ॥) नंतर—

सर्पवेष्टणें स्त्रीरमणें । करकर करिती धाररमणें । खराचे परी नरमैथुनें । हें अनुचित देखिलें ॥ ४८ ॥ श्वानाचें हेंड तात्काळ सुटे । त्याहूनि नराचें पैं मोठें । जन्मशताचीं शकटें । हेंड न सुटे दोहींचीं ॥ ४९ ॥ अनेक पुण्य जोडोनि जिवीं । स्वर्गी हेंड गुल गोंवी । पावे न नरदेहाची पदवी । योनीविभवीं निमग्न ॥५०॥ श्वान मैथुन करोनि सोडी । मोतडु बुथडु सुनीस निघडी । धन्य नरदेहाची आवडी । कडोविकडी योनीपूजा ॥५१॥ योनीस पाटावें पिंवळीं । योनीस घाली मोतियाची जाळी। योनीवरी चवरें ढाळी । योनी प्रतिपाळी छत्रछाया ॥५२॥ ऐसी नरदेहाची ख्याती । योनीद्वारें नरका जाती । सर्वेचि योनीद्वारें जन्मती । अधोगती योनीसगें ॥५३॥ योनींसी जन्मणें योनीसी रमणें । ते तव नरकाचे पाहुणे । योनीसंभोगा बैसले धरणें । न करी रमणें स्त्रियासीं ॥ ५४ ॥ उदरीं वाहे नवमासांत । नरकवास सोशी सुत । ते मातेतें त्यागोनि सुत । मानी अति आप्त स्त्री-योनी ॥ ५५ ॥ योनीभोगाचे संगती । अमित गेले अधोगती । ऐश्या योनी आजिचे रातीं । नेणों किती देखिल्या ॥ ५६ ॥

† शिष्यां.

## अध्याय ३ रा

विभीषणाचें मंदिर, बाजारपेठा वगैरे सर्व पाहून सीताशुद्धि झाली नाहीं:—श्रीरामचंद्रायनमः ॥ शोधितां विभीषणमंदिर । सुखी झाला तो कपींद्र । शुद्धी न लभेचि सीता सुंदर । तेणें वानर उद्वेगी ॥ १ ॥ शोधिलें समस्त नगर । शोधिलीं [१]हटकें† घरोघर । शुद्धि न लभेचि *अणुमात्र । तेणें वानर उद्वेगी ॥ २ ॥ शोधिलें समस्त नगर जाण । जन आणि अवघें वन । स्वयें शोधिलें सावधान । तेणें उद्विग्न वानर ॥ ३ ॥ सीताशुद्ध्यर्थी उद्विग्न । अति चिंता कंपायमान । आतां करूं बुद्धि आपण । सीता चिद्रत्न तेणें लाभे ॥ ४ ॥

ततस्तां हनुमान् चिंतामवधूय व्यवस्थित: ।

जगाम चिंतामपरां सीतामति महाकपिः॥

मारुतीची अभिनव योजना.—येथें ‡शोधावया सीताशुद्ध्यर्थ । कळी माजवूं नगराआंत । लागतां निष्ठुर आघात । सीताशुद्ध्यर्थ वदतील ॥ ५ ॥ रावणआज्ञा अतिदारुण । त्याभेणें न सांगती जन । बुद्धि निर्धारी आपण । कलहो पूर्ण उत्पादी ॥ ६ ॥ आपण राहोनिया गुप्त । [२]कळी लाविजे जेथिले तेथ । वर्में कर्में आक्रंदत । सीताशुद्ध्यर्थ वदतील ॥ ७ ॥ ऐसें विचारोनि जाण । प्रवेशला लंका भुवन । राजद्वारीं संपूर्ण । करी [३]विंदान कलहाचें ॥ ८ ॥

आपण अदृश्य राहून पुच्छाचे योगानें सर्वत्र कलह पसरविला:—गुप्त राहोनि जनाआंत । वानरचेष्टा करी चेष्टित । ¶कलहा माजवी जेथिचा तेथ । कथा अद्भुत अवधारा ॥९॥ हनुमान विनोदें पैं जाण । निजपुच्छासी करी नमन । सीताशुद्ध्यर्थी आपण । साह्य संपूर्ण मज व्हावें ॥ १० ॥

घरोघरीं पाणी साठलेल्या घागरींची आपटाआपट व स्फोट:—पुच्छें गोवोनि फोडी घागरी । तीवरी पाडी दुसरी । सवेंचि ढकली तिसरी । चौथी तीवरी घटस्फोट[१] ॥ ११ ॥ पांचवी जाण पैं चांचरी[२] । सहावीचा आधार धरी । शतानुशतें असंख्य नारी । फोडी घागरी निजपुच्छें ॥ १२ ॥ कोण मेला गेला आम्हांआंत । रिघोनी घागरी फोडित । हनुमान पुच्छ भोवंडी नाकांत । नारी नाचत चमकोनी ॥ १३ ॥ पुढिल्या चमकोनि नाचती । मागील दचकोनि झाडिती । नाकीं पुच्छ भोवंडी मारुती । नारी शिंकती खसखसा ॥१४॥ नारी शिंकती थटथटां । घागरी फुटती फटफटां । नगरीं उदकाचा *तोटा । लावी वेढा निजपुच्छें ॥ १५ ॥ भरली घागरी नगराआंत । रिघों नेदीच हनुमंत । द्वंद्व मांडिलें परी गुप्त । तोटा नगरांत उदकाचा ॥ १६ ॥ राजा निमाला[३] ये नगरीं । घटस्फोट राजद्वारीं । शंख करिती नरनारी । सीता सुंदरी क्षोभली ॥ १७ ॥

सीता आणिल्यामुळे हा प्रसंग आला–पौर जनाचा कलकलाट.—श्रीरामाची निजकांता । चोरोनि आणिलीसे सीता । तिनें उठविलें आकांता । लंकानाथा वधावया ॥ १८ ॥ सीता क्षोभली दारुण । शोषिलें राक्षसांचें जीवन । आतां कैसेनि वांचती प्राण । जीवनेंवीण जिणें कैचें ॥ १९ ॥ आंगोळ्या मोडिती नरनारी । क्षोभें क्षोभली सीतासुंदरी । आतां राक्षसां नुरे उरी । करील बोहरी[४] लंकेची ॥ २० ॥ राजद्वारीं घटस्फोट । खापरें पडलीं घनदाट । बुजाली राजद्वाराची वाट । विघ्न दुर्घट लंकेसी‡ ॥ २१ ॥ ऐसा हा घटस्फोट वृत्तांत ।

---

१ बाजार. २ तंटा. ३ युक्ति.

† ड–अटकेनि. * बड–अनु. ‡ डस–साधावयासी. ¶ कलहो डस–कलह.

---

१ घागरी फोडणें. २ वाकडी. ३ मृत्यु पावला. ४ नाश.

* क्ष–सदा. ‡ क्ष–चे, ड–शा.

वेगळा बैसोनि हनुमंत । कलहो माजवी नगरा-आंत । सीताशुद्धयर्थ शोधावया§ ॥ २२ ॥

राजभवनाकडे जाणाऱ्या मानकऱ्यावर पुच्छप्रयोग. अश्वारूढ, गजारूढ, रथारूढ, शिबिकारूढांची दैनाः—

राजसन्मानी महावीरीं । अश्वीं चढोनि राजद्वारीं । होहो मामा जीजीकारी । नानापरी नाचविती ॥ २३॥ पुच्छ गोवोनि† अश्वपायांत । वीरा तोंड-घसीं पाडित । दांत घालोनि घशांत । करी आरक्त मुख त्याचें ॥ २४॥ पुच्छ अश्वाचे पाय डखळीत । वीरांमुखीं अशुद्ध[1] वाहत । ऐसे योद्धे असंख्यात । पडले* कुंथत अतिदुःखी ॥२५॥ ऐशिया वीरांच्या कोडी । उचडचकू त्याचीं घोडीं । राजद्वारीं घाली रपडीं । दांत पाडी वीरांचे ॥ २६ ॥ तोडें ठेचलीं अश्वपती । तैसीच Sगजारूढांची गती। पुच्छें दंडिलें मारुती । तीही ख्याती अवधारा ॥ २७ ॥ गजयोद्धे महाशूर । चरणीं बिदांचा[2] ‡तोडर । माथां धरूनि आतपत्र[3] । राजद्वारीं ठाकले ॥ २८ ॥ राजद्वारीं प्रवेशती । पुच्छें ¶ खुंटोनि गजगती । मागील ओढोनियां हस्ती । हाणी दातीं पुढिल्यातें ॥ २९ ॥ माझ्या हस्तीवरी हस्ती । कांरे आणिला उद्धतीं । वीर वीरांतें हाणिती । गज भिडती गजांसी ॥३०॥ गजदंतांची खणखण । शस्त्रें तुटती सणसण । राजद्वारीं महारण । अति दारुण मांडिलें ॥ ३१ ॥ पुढील पडलिया माहुता । पार्श्ववर्ती पुढें बैसतां । गज गजासी †झुजतां । अत्यद्भुत गजयुद्धें ॥३२ ॥ वीर विजयो पावुं पहात । गुप्त पुच्छाचा वाजे घात । गज गडबडी जैसें प्रेत । वीर कुंथत रगडोनी ॥ ३३ ॥ ऐसे नेणों किती हस्ती । गुप्तपुच्छाचे आघातीं । लोळविले ते कुंथती । गजपंक्ती गांजोनी ॥ ३४ ॥ रथीं बैसोनि राजकुमर । कनकदंड ढळती चवर । पुढें वाजंत्र्यांचे भार । राजद्वारा ठाकिले ॥ ३५ ॥ गुप्तगतीं थोकिलीं[1] घोडीं । पुच्छें सारथि-यातें ओढी । लागवेगें ध्वज आसुडी । कुमर पाडी क्षितीसी[2] ॥ ३६ ॥ महावीर पडतां क्षितीं । त्याचा रथ त्यावरी उलथी । चारी घोडीं होतां पालथीं । कुमर कुंथती दडपोन ॥ ३७ ॥ वारू सारथी महारथी । एक वेळीं ते पडती । वाजंत्री शंख करिती । क्षितीं लोळती चवरधर ॥ ३८ ॥ ऐसिया रथांच्या कोडी । हनुमान गुप्तघातें मोडी । पुच्छ नाचविलिया बुडीं । रथाचीं घोडीं फडफडती ॥ ३९ ॥ ऐसे वीर नेणों किती । पडिले राजद्वारीं हुबती । साट दाडिया उचलोनि नेती । तेही भीती गुप्तघाता ॥ ४० ॥ मागिला मागें ये* पांपरी । पुढिला पुढें ¶रणभरी । एवढा वळसा[3] कोण करी । निज निर्धारीं लक्षेना ॥ ४१ ॥ क्षोभली श्रीरामाची कांता । तिणें सोडिलें अति उत्पाता । करील राक्षसांचे घाता । लंकानाथासमवेत ॥ ४२ ॥ प्रधानवर्ग राजसन्मानी । बैसोनि येतां सुखासनी । पुच्छ भोवंडितां भोयाचे कानीं । दोघे चमकोनि पाहती ॥ ४३ ॥ भोई नाचती तडतडां । कान झाडिती फडफडां । पुच्छें लाविताँचि वेढा । पालखी †पुढां आदळली ॥४४॥ धरणींS आदळतां पालखी । दांडी मोडोनि वाजे मस्तकीं । प्रधानवर्ग झाले दुःखी । अधोमुखी आदळत ॥ ४५ ॥

इतर मानकऱ्यावर त्याप्रमाणें प्रयोगः—बोभाट केला सेवकीं । एक शिंपिती उदकीं । सावधान होतां एकाकीं । हासिजे लोकीं लंकेच्या ॥ ४६ ॥ रावणापासीं अति सन्मान । त्यासी राजद्वारीं

---

१ रक्त. २ बिरुदावळीचा. ३ छत्र.

§ डक्ष—साधावया. † ब—ऊ. * डक्ष—येती कुचा निजधाम. S डक्ष—गजा प्रहगती. ‡ ड—चे. ¶ क्ष—खुंडोनि, ड—खडुनि. † क्ष—वेढे देत.

---

१. थाबविली. २ पृथ्वीवर, जमिनीवर. ३ उपद्रव.

* ब—आपापरी, ड—अपरापरी; क्ष—अपवरी. ¶ ब—रानभरी. † ब—पुढें. S बक्ष—अडखळला. * डक्ष—भोई.

अपमान। हांसतां देखोनि जन। क्षोभायमान त्यावरी ॥ ४७ ॥ सघृत त्यातें नित्य चौशेरी। या वेगळें भोजन घरीं। उचित वेतन देतां करीं। राजद्वारीं †पडियेलें ॥४८ ॥ भोयांसि देतां बुक्क्या लातां। ते म्हणती कां मारितां वृथा। भूत चेतवी श्रीरामकांता। अपमानता तेणें तुम्हां ॥ ४९ ॥ ऐसिया पालखियांच्या हारी[१]। हनुमान उलथीं पुच्छें करी। अवकळा करोनि भारी। धुळी माझारीं मेळविलें ॥ ५० ॥ पालखी मोडली नये कामासी। खाटदांडी प्रधानांसी। कुंथत धाडिलें *घरासी। अपमानासी राजवर्गा ॥ ५१ ॥ लंकेमाजी आहे सीता। ऐकोनि आल्हाद हनुमंता। तिचे साधावया इत्यर्था। कळी ‡कल-हार्थी उपपादी[२] ॥ ५२ ॥

मल्लाचा सघर्ष, वारेवाले, बाजत्री, वेदपाठक वगैरे:—पुढें त्रिदाचे माल[३] जात। मागेंही माल येती उन्मत्त। हनुमान उचलोनी त्यांची लात। वेगीं हाणीत पुढिलियां ॥ ५३ ॥ कांरे हाणितो लाता। तो म्हणे चांचरली अवचिता। तूं तरी मातलासी सर्वथा। तुझिया घाता मी करीन ॥ ५४ ॥ दांत खावोनि सक्रोधीं। भिंवया चढवोनि नाकाटी। येरयेरा हाणिती मुष्टी। क्रोधदृष्टी खव-ळोनी ॥ ५५ ॥ उरीं शिरीं मुंडपीं देखा। बाहु आसडोनि लाविती धडका। परस्परें हाणिती झडका।§गुडघा[४]ढका हाणोनी॥५६॥तळवे हाणिती रागें करीं। उफराटिया निजकरीं वर्मी हाणिता कोपरीं। शिरीं उरीं चंडघातें ॥ ५७ ॥ वेगें आणा-वया तळासीं। दोघे उडती आकाशीं। शिर हाणोनि शिरासीं निजबाहुसीं ¶आफळीं ॥ ५८ ॥

१ ओळी. २ उपद्रव. ३ मल्ल. ४ जोराचा हिसका.

† ड-पाडिले. * ब-सी. ‡ ब-काळहंता. § ब-गांडगुडघा. ¶ ड- आस्फाळ. S उलन करी.

एक रिघे एका तळीं। तंव तो त्यासी चेंपी भूतळीं। वरील उलथोनी तत्काळीं। धरी नळी निमटावया ॥ ५९ ॥ नळी[१] चेंपितां प्रबळ। पायामाजी लावी कळ। तेणें होवोनि विव्हळ। नळी तात्काळ सोडिली ॥ ६० ॥ सवेंचि धरोनि दोहीं पायीं। उपटावया दोन्ही बाहीं। बळें आदळिनां भुयीं। तळपोनि हृदयीं हाणी लातां ॥ ६१ ॥ ऐसी मल्ल-विद्या गाढी। दोघांची समान घडमोडी। झोंबी घेतां कडोविकडी। [२]समपरवडी दो वीरां ॥ ६२ ॥ घेतां मल्लविद्येचा झाडा। मृदंग्या लाविला वाद्य गाढा। त्यापुढें राउतांचा झगडा। काढोनि जम दाढा हांकिती ॥ ६३ ॥ त्यापुढें ब्राह्मण वेदांती। घडपट बोलती युक्ती। कोठें आहे सीतासती। तेहि नेणती निश्चयें ॥ ६४ ॥ वेदपाठकांचा वेवाद। अक्षरें चुकलीं स्वर अबद्ध। सीता शुद्धीचा अनुवाद। तेही विशद न बोलती ॥ ६५ ॥

रावणाचे सभेंत हेराचा वृत्तान्त; सर्वत्र अधार:—ऐसी लावितां नगरीं कळी। ठायीं न पडे जनक-बाळी। आता रावणाचे जवळीं। सभा समूळीं शोधूं पां ॥६६॥ तंव झाली निशी[३] तेथ। रावणाचे सभे आंत। रिघता झाला पै हनुमंत। तोही प्रताप अवधारा ॥ ६७ ॥ सिंहासनीं दशानन। सभेसी राक्षस प्रधान। निजयुद्धीं सावधान। पार्श्वदगण असंख्य ॥ ६८ ॥ सभेसि येऊनि घरटी-कार[४]। करूनि रावणासी जोहार। सांगती नगरींचा विचार। विन्न दुर्धर दिसताहे ॥ ६९ ॥ जितुकी दृष्टी संचारी। तितुकी आजिच्या प्रथम प्रहरीं। अवची उठली राजद्वारीं। क्षयकारी नृपनाथा ॥ ७० ॥

पूर्वीच्यानीं दुर्लक्ष केल्याचा परिणाम:—अमरवरदें खटाटोप। ऐसीं अरिष्टें मानितां अल्प। स्वयें निमाला हिरण्यकशिप। सप्रताप अहर्निशीं ॥७१॥

१ गळा; कंठ. २ सारखेपणा. ३ रात्र. ४ हेर.

त्याचें आमंत्रण घेऊन । त्याचे घरीं अन्न खावोन । अधर्मे हरी द्विजधन । सहस्रार्जुन निमाला ॥७२॥ त्याचे दुश्चिन्हाचे संधी । सहस्र भुजाचे खांदी । पुत्रांसहित सैन्यमांदी । त्यातें वधी द्विजपुत्र ॥ ७३ ॥ मग सांगती ज्योतिषी । जावोनी सांगा रायापाशीं । अधर्मे आणिलें सीतेसी । तें विघ्न नगरासी पैं आलें ॥ ७४ ॥ अश्वपति गजपती । अतिरथी महारथी । राजद्वारीं स्वयें उलथती । घायें हुंवती दडपोनि ॥ ७५ ॥ कोणी न दिसतां आघाती । वीर मरणांत कुंथती । अश्व गज तळमळती । मूर्च्छा येतां प्राणांत ॥ ७६ ॥ आणीक अरिष्टांची थोरी । घटस्फोट राजद्वारीं । असंख्यात शतसहस्रीं । करिती नारी महाशब्द ॥ ७७ ॥ पालखी[1] पदस्थ आतुर्बळी । शिबिकाभंगें मेळविले धुळी । म्हणती क्षोभली जनकबाळी । करील होळी नगराची ॥ ७८ ॥

अशा वार्ता आणणाऱ्यास शासन.—रावणें ऐकोनि ही कथा । दुष्ट वदला हे वार्ता । म्हणे करारे याचे घाता । *द्वंद्व सर्वथा हा होय ॥७९॥ आणा संमुख बांधा हात । जिव्हा छेदा रे सदंत । कान कापोनि येथ । न्या नगरांत खरारोहें[2] ॥ ८० ॥ ऐकोनि रावणाचें वचन । हनुमान क्षोभला दारुण । असत्य मानितो विघ्नचिन्ह । सत्य यासी करूनि दाखवूं ॥ ८१ ॥ विघ्न समस्त सत्य मानिती । रावण चळीं कांपे चित्तीं । ऐसी सभेसि लावी ख्याती । कोपें मारुती खवळला ॥ ८२ ॥ माझीं सर्व दुश्चिन्हें सांगतां जरी । दंड पाविजे घरटीकारीं । तरी भूमिभार संसारीं । आतांचि बाहेर मोवंडीन॥८३॥ आयुष्य व्हावें माझिया पुच्छासी । रावण सभा हे कायसी । ख्याती लावीन सकळांसी । रावणासी गाजोनि ॥ ८४ ॥

१ पालखींत बसणारे. २ गाढवावर बसवून.

* अ—द्वद्व, दर्डी.

हनुमन्ताच्या सभास्थानावर प्रयोग, दिवे विझविणें — सभा समवेत प्रधानीं । रावण बैसला सिंहासनीं । हनुमान ते काळीं कोपोनी । केली करणी ते ऐका ॥ ८५ ॥ सुगंध तैलदीपिका[1] अनेक । कर्पूर दीप अठरा लाख । दोही बाहीं लखलख । सभा सम्यक शोभत ॥ ८६ ॥ तंव हनुमंता आला तवक[2] । पुच्छ हाणोनियां देख । विझविल्या दीपिका सकळिक । चमकले लोक सभेचे ॥ ८७ ॥

त्याचे परिणाम. सर्वत्र अंधार, सर्वत्र गोंधळ, सीता-हरणाचे परिणाम —सभेसी पडतां अंधारी । हनुमंतें मांडिली चोरी । मुकुट कुंडलें छत्रें हारी । शस्त्रास्त्रीं नागविले ॥ ८८ ॥ एक म्हणती माझीं नेलीं वस्त्रें । दुजा म्हणे माझीं नेलीं शस्त्रें । भट म्हणे माझीं नेलीं धोत्रें । सभा वानरें नागविली ॥ ८९ ॥ कुंडलें घेतां कान तोडी । वस्त्रें घेतां डोळे फोडी । बाहु-वटें घेतां बाहु मोडी । केली धांदडी राक्षसां ॥९०॥ मुकुट घेतां मस्तक फोडी । [3]कटिसूत्रासी [4]माज मोडी । मुद्रिका घेतां आंगोळ्या उपडी । केली धांदडी राक्षसां ॥ ९१ ॥ कंठमाळा घेतां कंठ मुरडी । पदका काढितां हृदय फोडी । नेसणें घेतां लिंग तोडी । केलीं बापुडीं राक्षसें ॥ ९२ ॥ नेसणीं सांडा रे लौकरी । नातरी लिंगा करील बोहरी । नपुंसकता ये संसारीं । कैशापरी सोसेल ॥ ९३ ॥ पायीं भिदे वीरासी पूर्ण । तयांसाठीं मोडी चरण । बोंबलूं जातां छेदी प्राण । फें फें वचन राक्षसां ॥ ९४ ॥ येरयेरां सांगती बुद्धी । बोंबलूं नका रे त्रिशुद्धि । बोंबलूं जातां नाक छेदी । निःशब्दवादी उगे रहा ॥ ९५ ॥ रावणाचे उरीं शिरीं । हनुमान सुबद्ध टोले मारी । तेणें त्यासी आली अंधारी[5] । भयेंकरीं न बोलवे ॥ ९६ ॥ अंधारीनें न दिसे व्यक्त । आंगीं वाजती आघात । तेणें भयें लंकानाथ।

१ सुगंधि तेलाचे दिवे. २ आवेश. ३ करगोटा. ४ कमर. ५ भोंवळ.

चळीं कांपत थरथरां ॥ ९७ ॥ वस्त्रें अलंकार जोडती पुढें । तैसें नाक तव न जोडे । ख्याती लाविली माकडें । येरू दडे येरामागें ॥ ९८ ॥ †जो बोलिला घरटीकार[१] । तें विघ्न आलें दुस्तर । सीता क्षोभली साचार । दशशिरवधार्थी ॥ ९९ ॥ जानकी कोपोनि अद्भुत । तिणें सोडिला पुच्छकेत । रावण मेला कीं जीत । कोणी मात न सांगे ॥ १०० ॥ रावण निमाला अंधारीं । विघ्न आलें त्यावरी । बोंब पडली सभेमाझारीं । *ये पांपरी राक्षसां ॥ १०१ ॥ मारिला इंद्रजित कुंभकर्ण । तयांमागें येथें रावण । आतां धावण्या धावे कोण । राक्षसगण कांपती ॥ २ ॥ पिता क्षोभला पवन । दीपिका गेल्या रिघोन । राक्षसां ओढवलें कंदन[२] । दशवदन निमाला ॥ ३ ॥ भंगलें राजाज्ञेचें सूत्र । सभेमाजी Sरिघाले चोर । नागविले थोर थोर । निशाचर[३] पळों पाहती ॥ ४ ॥ जो कोणी निघे सभेबाहेरी । त्यासी पुच्छ ‡सुबद्ध मारी । अवघे दडाले अंधारीं । ये पांपरी राक्षसां ॥ ५ ॥ सीता क्षोभली अति उद्भट । आम्हांसी आलें अति संकट । बाहेर जातां न फुटे वाट । विघ्न दुर्घट ओढवलें ॥ ६ ॥

रावणाचा मुकुट ओढून पाडणें, शीर्षावर आघात—

पुढें रावणाचा मुकुट । अतिबळें ओढी मर्कट । तेणें धाकें दशकंठ[४] । म्हणे शेवट मज आला ॥ ७ ॥ सत्य बोलती घरटीकार । विघ्न आलें मज साचार[५] । गुप्त घात अति दुर्धर । लागली निष्ठुर प्राणान्त ॥ ८ ॥ हनुमान सांगे कानीं बीजाक्षर । तुवां चोरिली सीता सुंदर । तुझें छेदावया शिर । आलों साचार रामदूत ॥ ९ ॥ रावणाचीं दाही शिरें । हनुमान छेदिता नखाग्रें । निवारिलें हो श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें राखिला ॥ ११० ॥ तूं जरी मारशील लंकानाथ । तरी माझा पुरुषार्थ जाईल व्यर्थ । ऐसें बोलिला श्रीरघुनाथ । तेणें हनुमंत न मारी ॥ ११ ॥ वानरें लावितांचि हात । रावण झाला अति भ्रांत । कानीं जो पडला गुप्तार्थ । लंकानाथ तो नेणें ॥ १२ ॥

दिवे आल्यावर दृष्टीस पडलेलें विचित्र दृश्य—

दीपिका आणितांचि तेथ । अवघे नागवे हळहळित । § येरयेरां जैं पाहत । मग लाजत अधोमुखें ॥ १३ ॥ एकाची पळली बोबडी । एक धाक धाकें दवडी[१] । एक केवळ जाहलीं वेडीं । आला धाडी पुच्छकेत ॥ १४ ॥ एका झाली दांतपाडी । एक केवळ झालीं मढीं । एक धाकती बापुडीं । आला धाडी पुच्छकेत ॥ १५ ॥ एका झाला अधोवात¶ । एका सुटला कंपवात । सभेचा निमाला पुरुषार्थ । पुच्छकेत लागला ॥ १६ ॥ रावणाचे सभेआंत । करोनि राक्षसां आकांत । नागवोनिS गेला हनुमंत । लंकानाथ काळमुख ॥ १७ ॥ राक्षस गांजिले उदंड[२] । सभेचे निघाले वळबड । रावणाचें काळें तोंड । तोही वितंड[३] गांजिला ॥ १८ ॥ संमुख देखिला दशानन[४] ।

---

१ गस्त घालणारा, २ नाश, ३ राक्षस, ४ रावण, ५ खरोखर.

† अ—जो बोलिली. * ब—अपांपरी. S ब—नि.
‡ ब—सबद्ध, क्ष—सबध.

---

ब्दक्ष—पाठ
§शब्दें लाव हात हात । मग लागत येरयेरा ॥ १३ ॥
एकाचें लिंग केलें पतन । एकाचें लिंग छिन्नभिन्न ।
एकाचें लिंग तृणासमान । अवघे नग्न हळहळती ॥ १४ ॥
एकाचें लिंग रालोडें । एकाचें लिंग निलग थोटें ।
एकाचें लिंग अत्यंत मोठें । पादरीं शब्दें शोभती ॥ १५ ॥
उभाउभी मुतत । एक टरटरा पादत । एक झाला
अति भ्रांत । पुच्छकेत लागला ॥ १६ ॥

---

१ घाबरलेली, २ पुष्कळ, ३ अतिशय, ४ रावण.

¶ ब—अधःपात. S क्ष—निघोनि.

सभेमाजी पडिलें खान[१] । अवघे हल्हळती नग्र । दंतभग्न राक्षस ॥ १९ ॥ सभेसी बैसोनि हनुमंत । रावणराक्षसां अति आकांत । हनुमान महात्मा याचा अर्थ । व्यर्थ ग्रंथ न म्हणावा ॥ १२० ॥ एक श्लोकाचा श्लोकार्थ । इतुका आहे गुप्तार्थ । श्रोतीं पहावें सावचित्त । मी अपत्य संतांचें ॥ १२१ ॥

जगाम चिंतामपरां सीतां प्रति महाकपिः ॥

अपत्यभाग्य कैचें मज । मी तंव त्यांचें चरण-रज । ग्रंथार्थी निजओज[२] । श्रीरघुराज स्वयें वदवी ॥ २२ ॥ माझें भावार्थरामायण । त्याचें मूळ म्यां दावावें कवण । श्रीराम मूळीं मूळकारण । कथार्थ गहन श्रीराम ॥ २३ ॥ श्रीराम माझें वदतें वचन । अक्षरीं-अक्षरीं श्रीराम पूर्ण । माझें बुद्धीचें गुह्य ज्ञान । चैतन्यघन श्रीराम ॥ २४ ॥ हृदयीं श्रीराम रिघोनि जाण । बळेंचि करवी रामायण । ग्रंथाचे मूळीं श्रीरघुनंदन । ग्रंथार्थ गहन श्रीराम ॥ २५ ॥ नेणें वेद नेणें शास्त्रार्थां । माझे अंगीं अतिमूर्खता । ग्रंथ आवडला श्रीरघुनाथा । वदनीं वदविता श्रीराम ॥ २६ ॥ एका जनार्दना शरण । रामें रम्य रामायण । रामें रम्य कथा गहन । कथा पावन श्रीरामें ॥ २७ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसभालुंठनं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओंव्या ॥ १२७ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

## अध्याय ४ था

पुष्कळ शोध करूनही सीतेचा शोध लागत नाहीं:—

श्रीरामचंद्राय नमः ॥ रावणाचे सभे आंत । न लभे सीताशुद्धीची मात । तेणें दुःखें हनुमंत । चिंताग्रस्त दृढ झाला ॥ १ ॥

१ खणका, दांडगाई. २ आपले सामर्थ्य, बळ.

+दृष्टमन्तःपुरं सर्वं दृष्टा रावणयोषितः ।
न ददर्श ततः सीतां निरीक्षति मुहुर्मुहु.[१] ॥१॥
चतुरंगुलमात्रोऽपि नावकाशः स विद्यते ।
दृष्टा हनुमता तत्र न तु सा जनकात्मजा[२] ॥२॥
चिंतामुपजगामाशु शोकोपहतचेतनः ।
नात्र सीतेति हनुमांश्चक्रे बुद्धिं महाकपिः ॥३॥

दृढ प्रयत्न केला भारी । समस्त शोधिली लंका-पुरी । धांडोळिलें घरोघरीं । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ २ ॥ विनोदें वाटिका आरामशिरीं । नद-नदी बापी[१] पोखरी[२] । राजकुमारांच्या घरोघरीं । सीतासुंदरी तेथें नाहीं ॥३॥ प्रत्यावर्तीं[३] लंकापुरी । शतावृत्ती[४] घरोघरीं । शुद्धि घेतां नानापरी । सीता-सुंदरी तेथें नाहीं ॥ ४ ॥ स्त्रीपुरुषांचे शेजारीं । त्या स्थानांचे वपराउपरीं । शोधितां कोट्यानुकोटी नारी । सीतासुंदरी तेथें नाहीं ॥ ५ ॥ रावणाचे सभे-माझारीं । धुराचि[५] गांजिल्या नानापरी । शुद्धी न लभेचि निर्धारीं । लंकेमाझारीं नाहीं सीता ॥ ६ ॥ म्या तव आपुले निजबुद्धी । जानकी शोधिली नानाविधी । विधाता पावो नेदी सिद्धी । लंकेमधीं नाहीं सीता ॥ ७ ॥ मज शोधितां गुप्त गतीं । लंके-माझारीं लक्षितां ती । चारी अंगुळें नुरेचि रिती । सीतासती एथें नाहीं ॥ ८ ॥

क्षिप्रमुत्पतितो मन्ये सीतामादाय राक्षसः ।
वित्रस्तो रामबाणानामतरा पतिता भवेत् ॥४॥+
अथवा ह्रियमाणा या त्यक्तजीवितजानकी ।
रावणस्योरुवेगेन भुजाभ्यां पीडितेन च ।
विचेष्टमाना पतिता समुद्रे जनकात्मजा ।

+ अ पाठ—सु. कां. १३, ७, ८, ९, ११

१ दृढं चकार बहुधा प्रयत्नं भजते विधिः। ब पाठ
१ दृढं कृत्वा प्रयत्नेन भजते विधिवत्ततः । ड पाठ
२ न दृष्टा जानकी तत्र हनुमान् मारुतात्मजः। ब पाठ

१ पायऱ्याच्या विहिरी. २ पुष्करणीमध्यें. ३ पुन-रागमनानें. ४ शेंकडों वेळा. ५ मुख्य मुख्य मडळी.

त्यामुळें हनुमंताची चिंता:—शुद्धि न लभेचि सीता। हनुमंतासी परम चिंता। चकसावुकसीं होय स्फुंदतां। केवि रघुनाथा मुख दावूं॥ ९॥

कदाचित् तिनें देहत्याग तर केला नसेल?—आणिक एक उपपत्ती। पाहतां रावणाचे हातीं। देह त्यागितां योगगतीं। सीतासती तेथें नाहीं॥ १०॥ रामबाणाच्या धाकें। रावण पळतां अति तवकें। सीता निष्ठोनियां तवके। पडोनि कुटके होवोनी गेली॥ ११॥ रावण नेटें पळतां। दृढ आवळितां रामकांता। कळ लागोनी निमाली सीता। कैंची आतां शुद्धि लाभे॥ १२॥ रावणापासोनि एकसरीं। निष्ठोनि पडली सागरीं। सीता भक्षिली मत्स्यमगरीं। कैसेपरी शुद्धि लाभे॥१३॥ म्यां चाळिल्या नाना युक्ती। माझ्या मिथ्या मजचि प्रती। संपातीनें लंकेप्रती। सीता सती सांगितली॥ १४॥

किंवा रावणानेंही खाल्ली असेल:—मिथ्या नव्हे संपातिवचन। सीता लंकेस आहे जाण। दुष्ट नष्ट हा रावण। सीता भक्षण तेणें केलें॥ १५॥ हर्षें नेलिया एकांता। वश्य नव्होचि जनकदुहिता। रावणें रागें भक्षिली सीता। कैंची आतां शुद्धि लाभे॥ १६॥

अथवा त्याच्या पत्न्यानींही:—रावणपत्न्या नेणों किती। सुंदर देखोनि सीता सती। अवघियांवरी श्रेष्ठ सवती। म्हणोनि समस्तीं खादली॥ १७॥ राक्षसीं स्वयें खादली सीता। ऐसें मानलें कपीचे चित्ता। कैंची शुद्धि लाभे आतां। म्यां कां वृथा कष्टावें॥ १८॥

मारुतीचें दुःखः—अश्रुपूर्ण झाले डोळे। दुःखें गडबडोनियां लोळे। न भेटतां जनकबाळे। कष्ट केले ते वृथा॥ १९॥ वृथा समुद्रलंघन। वृथा लंकेचें शोधन। वृथा माझें दादुलपण[१]। सीता चिह्नन न साधेचि॥ २०॥ घेवोनि आलों श्रीराममुद्रा। ते न साधेचि रामभद्रा। कैसेनि भेटों श्रीरामचंद्रा। आणि कपींद्रा सुग्रीवा॥ २१॥

जनकस्य कुले जाता रामपत्नी सुमध्यमा।
विनष्टा व प्रणष्टा वा मृता वा जनकात्मजा॥७॥
रामस्य प्रियभार्यायां न निवेदयितुं क्षमम्।
निवेद्यमाने दोषः स्याद्दोषः स्यादनिवेदने॥८॥
कथं नु खलु कर्तव्यं व्यसनं लक्ष्यिद महत्॥९॥

सीता मारिली कीं मेली। किंवा रामविरहें निमाली। किंवा तरळ भरोनि मेली। कीं उतटली अति दुःखें॥ २२॥ सीता निःशेष नासली। श्रीरामापाशीं वार्ता नेली। ऐसी ऐकतांचि बोली। मज आली अपकीर्ति॥ २३॥ 'सीताप्रियो'* कांतेकारणें। राम बैसलासे धरणें। तिचें ऐकतांचि मरणें। निजप्राणें तो तुटे॥ २४॥ वेगीं लंघोनि उदधी। जेणें श्रीराममरण¶ त्रिशुद्धी। ऐसी आणिली शुद्धी। म्हणती हा दुर्बुद्धि वानर॥ २५॥ सेवक नव्हे हा अधःपाती†। आप्त नव्हे हा अतिघाती‡। कुशल नव्हे हा मंदमती[२]। श्रीरामघाती हनुमंत॥ २६॥ म्हणती हनुमान बुद्धिवंतु। तरी कां केला अति अनर्थु। याचेनि निमाला रघुनाथु। येणें कार्यार्थु नाशिला॥ २७॥

त्या वार्तेचे परिणाम—सांगतां सीतेची हे कथा। अपेश येईल माझे माथां। राहों नये न सांगतां। तेणेंही माथां अति दोषु॥ २८॥

गुरुजवळ विकल्परहित सर्व सांगावें:—स्वामीपाशीं अति गोष्टी। न सांगे तो सेवक कपटी। नरका जाइजे उठाउठीं। होईन सृष्टीं अति दोषी॥२९॥ जैसें तैसें मनोगत। गुरुसी सांगावें इत्थंभूत[३]। ऐसा विश्वास नाहीं जेथ। नरकपात त्या नरा

१ मोठेपण.

१ सीतेचा पति. रामचंद्र. २ मूढ.
३ जसें घडलें असेल तसें, यथास्थित.

* ढक्ष—प्रियकोपे. ¶ ढक्ष—मरे.
† ब—अत. ‡ क्ष—विघाती.

॥ ३० ॥ गुरूसी सांगतां मनोगत । संकल्प विकल्प मनीं मुक्त[1] ऐसा विश्वास नाहीं जेथ। नरकपात त्या नरा ॥ ३१ ॥ सांगों जातां अति अनर्थ। न सांगतां नरकपात। कांहीं न चले उपाय येथ। चिंताग्रस्त मारुति ॥ ३२ ॥

अस्मिन्नेव गते काले प्राप्तकाल क्षम च किम्।
भवेदिति मतिं भूयो हनुमान् प्रविचारयत् ॥१०॥
यदि सीतामदृष्ट्वाऽहं वानरेंद्रपुरीमितः।
गमिष्यामि ततः को मे पुरुषार्थो भविष्यति ॥११॥
न सीतामभिगच्छामि रामस्त्यक्ष्यति जीवितम्।
भृशानुरक्तो मेधावी न भविष्यति लक्ष्मण. ॥१२॥
विनष्टौ भ्रातरौ श्रुत्वा भरतोऽपि मरिष्यति।
भ्रातॄन् विनष्टान् ज्ञात्वा तु शत्रुघ्नोऽपि मरिष्यति॥१३
पुत्रान् मृतान् समीक्ष्याथ न भविष्यति मातर.।
रामकृच्छ्रगत दृष्ट्वा सुग्रीवोऽपि मरिष्यति ॥१४॥

उल्लंघोनियां सागरा। मज आणिलें लंकापुरा। सीता न भेटेचि सुंदरा। पुढील विचारा विवंची ॥ ३३ ॥ मज कल्याण येथें राहतां। किंवा किष्किंधेसी जातां। ऐसें चिंतितां हनुमंता। अति उत्पाता पावला ॥३४॥

या वार्तेचे परिणाम, सूर्यवंश व वानरवंश नष्ट होईल.—तेथें जातां¶ पैं आपण। सांगतां सीतेचें मरण। श्रीराम सांडील प्राण। आणि लक्ष्मण तत्काळ ॥ ३५ ॥ राम आणि लक्ष्मण। दोघे निमाले ऐकोन। दुःखें भरत देईल प्राण। आणि शत्रुघ्न त्यासवें ॥ ३६ ॥ ऐकोनि पुत्रांचें निधन*। तिघी माता पावती मरण। प्रधानही सांडिती प्राण। अयोध्येचे जन निमतील ॥ ३७ ॥ निमाला देखोनि रघुनंदन। दुःखें सुग्रीवा येईल मरण। त्यासवें अंगद देईल प्राण। वानरगण निमाले ॥ ३८ ॥ निधन[1]† सुग्रीवश्रीरामां। देह त्यजिती तारा रुमा। अति दुःख प्लवंगमां[1]। मरणधर्मी रिघतील ॥ ३९ ॥ नळ नीळ जांबवंत। आणि [1]जुत्पती समस्त। श्रीरामआप्त त्यां प्राणांत। निमेषार्धांत निमतील ॥ ४० ॥ श्रीरामदुःख अति अचाट। दुसरें सुग्रीवाचें दुःख श्रेष्ठ। वानर होतील सपाट। कडेलोट करूनी ॥ ४१ ॥ मज तेथें करितां गमन। सूर्यवंशा निःसंतान। वानरवंश पडिला शून्य। तो मज कोण पुरुषार्थ ॥ ४२ ॥

बरें, मी येथेंच राहणें बरें नाहीं:—मज येथेंचि राहतां। श्रीराम‡ माझी परमावस्था। गुरुवंचकता[2] बैसेल माथां। कैंवी रघुनाथा उपेक्षूं ॥ ४३ ॥ उपेक्षोनि श्रीरघुनाथा। मज तेथें न वंचतां[3]। पृथ्वीचे दोष माझे माथां। अधःपाता जाईन मी ॥ ४४ ॥ अति अनर्थ तेथें जातां। परम दोष येथें राहतां। अति विचार हनुमंता। कर्तव्यता लक्षेना ॥ ४५ ॥

त्याचे परिणाम—मज राहतां निजनिवाडें। सीता शुद्धि मागिलांकडे। माझीच शुद्धि पडेल पुढें। अति सांकडें श्रीरामा ॥ ४६ ॥ माझे शुद्धीचे कैवाडें[4]। अगाध उदधि कवण उडे। श्रीरामा सुग्रीवा सांकडें। रहाणें कुडें येथें माझें ॥ ४७ ॥ अति संकटीं त्यजूं प्राण। तंव मज नयेचि मरण। जाळूं न शके हुताशन। न शके पवन मज मारूं ॥ ४८ ॥ जरी करूं पर्वतपतन। तरी तें माझें नित्य उड्डाण। बुडवों न शके मज जीवन। मरतां मरण मज न ये ॥ ४९ ॥ वज्रदेही जो मी लाठा। सीताशुद्धीचिया वाटा। तो मी झालों अति करंटा। मरण कटकटा[5] मज न ये ॥ ५० ॥

---

१ शेवट.

१ योद्धे, पराक्रमी. २ गुरूपाशीं प्रतारणा. ३ जातां. ४ निमित्तानें. ५ हायहाय.

---

¶ अ—जाउनी. * ब—विंदान. † अ—निदान. ‡ बक्ष—श्रीरामा.

हनुमंताचा शोक व श्रीरामचंद्राचा धांवा.–म्हणोनि क्षितितळीं पडे। [1]धाय मोकलोनि दीर्घ रडे। माझें दुस्तर सांकडें। कोणापुढें मी सांगों ॥ ५१ ॥ ऐशा माझिया आकांता। धांवें पावें गा श्रीरघुनाथा। मज तुजेंवीण सर्वथा। कृपावंता श्रीरामा ॥ ५२ ॥ भावें स्मरतां श्रीरघुनाथा। चित्तचैतन्या निमाली चिंता। परमानंद हनुमंता। श्रीरामकांता शोधावया ॥ ५३ ॥ सीताशुद्धीनें शोधितां। इंद्रजित कुंभकर्णासमवेता। करीन रावणाचे घाता। आणि समस्तां राक्षसां ॥ ५४ ॥

त्यामुळें हनुमंतास आल्हाद व आत्मविश्वासः–नाहीं तरी जीवें जितां। पुच्छीं बांधोनि लंकानाथा। श्रीरामापाशीं नेईन आतां। त्यासी तो सीता पुसेल ॥५५॥ ¶राडवे स्त्रियेचे परी। मी कां रडतों लंकापुरीं। स्वामी श्रीराम माझे शिरीं। भक्तसहाकारी श्रीराम ॥ ५६ ॥ मज साह्य श्रीपती। म्हणोनि उल्हासे मारुती। सीता शोधीन मागुती। प्रत्यावृत्तीं[2] साक्षेपें[3] ॥ ५७ ॥

+अनिर्वेदो हि सततं सर्वार्थेष्वनुवर्तकः।
करोति सफलं जातो जीवितं जीवितेष्वपि ॥ १५ ॥
भूयस्तावद्विचेष्यामि न यत्र विचयः कृतः।
तस्मादनिर्वेदकरं यत्नं चेष्टेऽहमुत्तमम् ॥ १६ ॥
यावत्सीतां न पश्यामि रामपत्नीं यशस्विनीम्।
तावदेतां पुरीं लंकां विचिनोमि पुनः पुनः १७ ॥

प्रयत्नाची प्रशंसा व फळः–आळस सांडोनि सभ्रम। त्यजोनि विषयविषकाम। प्रयत्न करितां पैं परम। परब्रह्म आतुडे ॥ ५८ ॥ प्रयत्न करोनि विचक्षण। वैकुंठवासी होय पूर्ण। शेषशायनी नारायण। होती आपण अति प्रयत्नें ॥ ५९ ॥ अति प्रयत्न तो मानसिक। तेणें पावती परम सुख। मी तंव रामाचा सेवक। सीता सम्यक शोधीन ॥ ६० ॥

हनुमंतास उल्लास व पुढील बेत.–उल्लास हनुमंताचे चित्ता। आलस्य सांडोनि विकल्पवार्ता। अति साक्षेपें शोधीन सीता। श्रीरघुनाथाचेनि बळें ॥ ६१ ॥ पूर्वीं केलें स्वयें शोधन। समस्तही लंकाभुवन। शोधितां राहिलें जें जें स्थान। सावधान अवधारा ॥ ६२ ॥ रावणाचें शयनभवन। आणिक कामग[1] विमान। तेथें रिघोनि सावधान। सीता चिद्रत्न शोधीन मी ॥ ६३ ॥ ऐसा करोनि इत्यर्थ[2]। रावणाचे गृहाआंत। रिघावया पाहे हनुमंत। स्मरे रघुनाथ सद्भावें ॥ ६४ ॥

‡उदतिष्ठन्महाबाहुर्हनूमान्मारुतात्मजः ॥१८॥
नमोऽस्तु रामाय सलक्ष्मणाय
देव्यै तस्यै जनकात्मजायै ॥
भूयश्च रामाय सलक्ष्मणाय
देव्यै च तस्यै जनकात्मजायै ॥ १९ ॥

पुढील प्रयत्नाची दिशा व निश्चयः–श्रीरामा तुज मी अनन्य शरण। लक्ष्मणा तुजलागीं माझें नमन। जनकात्मजेसी लोटांगण। निजदर्शन मज द्यावें ॥ ६५ ॥ मी तंव तुझें अत्यंत तान्हें। मज धाडिलें रघुनंदनें। वत्साप्रति धेनु धावणें। तैसी देणें मज भेटी ॥ ६६ ॥ तूं तव श्रीरामाची शक्ती। तुजेनि मजला निजगती। म्हणोनि लोटांगण क्षितीं। करी मारुती जानकीये ॥६७॥ स्वयें सीतेच्या शुद्ध्यर्था। नमूनियां श्रीरघुनाथा। जानकी शोधावया मागुता। होय निघता हनुमंत ॥ ६८ ॥

हनुमंताचा सूक्ष्म रूपानें रावणगृहांत प्रवेशः–शोधावया रावणाचें भवन। सूक्ष्मरूप धरोनि जाण। कपी करितां झाला गमन। सीता चिद्रत्न शोधावया ॥ ६९ ॥ रावणगृहीं उपराउपरी। एकवीस माडिया-

१ मोठ्यानें रडू लागला. २ पुनः, फिरून. ३ प्रयत्नानें.
+ ड–पाठ.
¶ब्रक्ष–बाइलेचे. ब–श्रीरघुपती. १अ–भुवन.ऽ ड्ख.

१ इच्छिल्या स्थानीं जाणारें. २ निश्चय. ३ जमिनीवर.
‡ ड–पाठ.

वरी घरीं । गोपुरादि द्वारोद्वारीं । घरटीकारीं गडगजरू ॥ ७० ॥

तेथील वर्णनः-सिंदूरारक्त श्वेत पीत । गज गर्जती चतुर्दंत । सैन्य थोवे थोवे समस्त । वीर जागत गडगजरें ॥ ७१ ॥ अश्व गज पदपदाती । सेनाधर सेनापती । राजगृहीं नित्य जागती । शस्त्रसंपत्ति अति गजरें ॥ ७२ ॥ ढोल दमामे शंख किंकाटी* । विराणीं बाजती थापटीं । घरटीकार देताती घरटी[१] । सावधवृत्तीं क्षोभक ॥ ७३ ॥ आड्नीपाड्नी[२] येकमेकां । उपरा-उपरी जागती देखा । हलकल्लोळें देवोनि हाका । एकमेकां गर्जती ॥ ७४ ॥ दडदडां निशाणें भेरी । त्राहाटिलिया राजद्वारीं । काहळा चिनकाहळा थोरी । तुरंगे गजरीं गर्जती ॥ ७५ ॥ सप्तकक्षांतर[३] वाट । ऐसें सैन्य घनदाट । वाऱ्या तेथें न फुटे वाट । दृढ कपाट राजद्वारीं ॥ ७६ ॥ हनुमान सप्तद्वारांतरीं । रिघोन सैन्याचे भीतरीं । शोधित असे सीता सुंदरी । गुप्ताचारीं अति युक्तीं ॥७७॥ राजपत्न्या शिबिकेआंत । बैसोनि जाती अति गुप्त । हनुमान रिघोनि घुंगटाआंत । सीता शोधित अति युक्तीं ॥ ७८ ॥ अश्वशाळा गजशाळा शस्त्रशाळा । अस्त्रशाळा चित्रशाळा । आणि नाना विचित्र शाळा । जनकबाळा शोधित ॥ ७९ ॥ स्नानशाळा पान-शाळा । गायनशाळा शयनशाळा । पाठशाळा अति विशाळा । यज्ञशाळा शोधित ॥ ८० ॥ शाकशाळा पाकशाळा । लतामृगसुमनशाळा । रत्नशाळा प्रयत्न शाळा । टांकशाळा शोधित ॥ ८१ ॥ कर्मशाळा धर्मशाळा । मठमठिकापर्णशाळा । ब्राह्मणांच्या ब्रह्म शाळा । अति विशाळा शोधित ॥ ८२ ॥ बावन्न चंदनइंधनशाळा । कंडणीपेषणी[१] अन्नशाळा । यंत्र-तंत्रनाटकशाळा । रंगशाळा शोधित ॥ ८३ ॥ नाना-परींचीं वातायनें । नानापरींचीं [२]वितानें । गोपुरीं उपरी नानास्थानें । †गौप्यस्थानें शोधित ॥ ८४ ॥

कामग विमानः-ऐसें शोधिलें बाह्यभवन । आतां रावणाचें शयनस्थान । आणिक कामग विमान । कपि सावधान शोधित ॥ ८५ ॥

> *तस्यालयमविष्टस्य मध्ये[१] विपुलमायतम् ।
> [२]दशयोजनविस्तीर्णं ‡ शतयोजनमायतम् ॥२॥
> ब्रह्मार्थे हि कृत दिव्य दिवि यद्विश्वकर्मणा ।
> विमान पुष्पक नाम सर्वरत्नविभूषितम् ॥ ११ ॥
> परेण तपसा लेभे यत्कुबेर. पितामहात् ।
> कुबेरात्तेजसा लेभे रावणस्तद्गृहोत्तमम् ॥ १२ ॥

ऐशिया भुवनांमाझारीं । रावणशयनाची ओवरी । दहा योजनें विस्तीर्ण वरी । रुंदीची परी तदर्ध ॥ ८६ ॥ रत्नजडित सुवर्णभिंती । घोटींव पाचबद्ध अवघी क्षिती । सूर्यप्रभासम ज्योती । रत्नदीप्ती दीपक ॥ ८७ ॥ ओंवोनियां मुक्ताफळा । वातायनीं हेममाळा । हेममंचकीं माणिक्यकिळा[३] । हेममाळा मोतीलग ॥ ८८ ॥ हेममुक्तमणी विराजमान । हेमसूत्रीं शोभे वितान । सुवासें कोंदलें गगन । वसंतपवन कामारे[४] ॥८९॥ वितानातळीं वातायन । सुगंध सुवासें झळके पवन । त्यामाजी कामग विमान । देदीप्यमान तेजस्वी ॥ ९० ॥ ब्रह्मया-कारणें देदीप्यमान । विश्वकर्मा करी विमान । तेथें बैसोनि चतुरानन । सुखसंपन्न विचरत ॥ ९१ ॥ त्याचि विमानाकारणें । कुबेर तप करी प्रयत्नें । एकांगुष्ठ धरोनि चरणें । एकाग्र राहणें निराहार ॥ ९२ ॥ करितां तप शतानुशतें । ब्रह्मा प्रसन्न

---

१ गस्त. २ आळीपाळीनें. ३ सातखणीमधून.

¶ क्ष-स्तोमे स्तोमे, च-थोगी भोगी. * क्ष-किंकिटी; च-किंकडी.

१ उखळ आणि जातें. २ छतें. ३ माणिकाचें तेज. ४ कामकरी.

† च-गोरज, ष-माणीक. * च-पाठ. ‡सर्वकामगम शुभ.

होवोनि त्यातें। कुबेरासी विमान देत। हर्षयुक्त तो जाला ॥ ९३ ॥ घेवोनि कामग विमान। चाले पहावया चैत्रवन। तपोवन नंदनवन। सुखसंपन्न क्रीडत ॥ ९४ ॥ ऐसें देखोनियां रावण। सांडोनि बंधुसुहृदपण। कुबेरासीं करोनि रण। घेतलें विमान हिरोनी ॥ ९५ ॥ तें हें विमान पैं तेथ। रावणाचे घराआंत। तेथें बसोनि लंकानाथ। सुखें क्रीडत स्त्रियांसीं† ॥ ९६ ॥ विमानशोभा पुष्कळ। खांबोखांबीं इंद्रनीळ। त्यावरी शोभती महानीळ। अति सुनीळ भूमिका ॥ ९७ ॥ विमाना मुक्ताफळांची[1] झालरी। रत्नें जडलीं उपराउपरी। पाच प्रदीप्त द्वारोद्वारीं। चढे त्यावरी हनुमंत ॥ ९८ ॥ अति सूक्ष्म तो हनुमंत। लघुलाघवें विमानांत। रिघोनि पाहतसे वृत्तांत। सीताशुद्ध्यर्थ शोधावया ॥ ९९ ॥

रावणाचें निजभुवनः—रावणाचें निजभुवन। अति शोभा देदीप्यमान। त्यामाजि शोभत विमान। विराजमान निजस्त्रियां¶ ॥ १०० ॥

तादृश तद्विशिष्टा वा तस्य रक्षपतेर्गृहम्।
सदा तिष्ठति वै पद्मा नित्यमेवानुपायिनी ॥

जे लक्ष्मी स्वयें इंद्रापाशीं। जें वैभव यमवरुणांसीं। त्याहूनही अति विशेषीं। रावणगृहासी अति शोभा ॥ १ ॥ जें वैभव कुबेरासी। जें वैभव स्वर्गवासीं। त्याहूनिही अति विशेषीं। रावणगृहासीं श्रीशोभा ॥ २ ॥

त्याचें शयनस्थान; तेथील योषिता—नित्य नूतन अनपायिनी[2]। श्री विराजे दशाननीं। त्याचिया शयनस्थानीं। दिव्ययोगिनी योषिता[3] ॥ ३ ॥ शुद्ध पद्मिनींची† जाती। नागकन्या नेणों किती। देवकन्या दिव्यदीप्ती। असंख्यात राजकन्या ॥ ४ ॥ सुरवरनरकन्यका। गंधर्वांच्या निजनायिका। दैत्यदानवांच्या अनेका। रावणें देखा आणिल्या ॥ ५ ॥

१ मोत्याची. २ अपाय न करणारी. ३ स्त्रिया.

† ब—णी. ¶क—साधावया.

जीं जीं अपूर्वे स्त्रीरत्नें। तीं तीं करोनि भोगायतनें[1]। स्वयें आणिलीं दशाननें। विराजमानें तेजस्वी ॥ ६ ॥ ऐशा भोगिल्या अमित[2] कांता। तैसीच आणूं गेला सीता। ते तंव न जिरे लंकानाथा। अपमानितां हनुमंतें ॥ ७ ॥ रावणाचे शयनाशेजारीं। ऐशिया स्त्रियांच्या हारी। सुकुमारा अति सुंदरी। अलंकारीं¶ शोभती ॥ ८ ॥

त्यांची स्थितिः—S

ऐशा योषिता नेणों किती। नाना यंत्रें[3] घेवोनि हातीं। रावणाचे शेजेप्रती। ओळंग[4] करिती गीतनृत्यें ॥ ९ ॥ वृद्धा नाचती व्युत्पत्तीं। वोपत्रीप तल्प देती। संगीताच्या गतिविगती। अंग मोडिती थैथाकें ॥ ११० ॥ तरुण कामिनी कामासक्तीं। न लभती पुरुषासीं संगती। उन्मादकामकामार्ती। दुःखी होती अति कामें ॥ ११ ॥ न पवे कामाचा संभव। नाडळे भोग भोगवैभव*। जळो हें रावणाचें दैव। रती† गौरव आम्हां नाहीं ॥ १२ ॥ गाढ देती आलिंगन। तरी रति नव्हे समाधान। मग करिती आनेंआन। सावधान अवधारा ॥ १३ ॥ भक्षिती उन्मादअन्न। करिती उन्माद प्राशन। तेणें स्त्रिया आनेआन। करिती रमण तें ऐका ॥ १४ ॥

§ अन्या वक्षसि चान्यस्ता अन्ये चाप्यपरा कुचौ ॥ ६० ॥
ऊरू पार्श्वकटिपृष्ठमन्योन्यस्याः समाश्रिताः ॥
परस्परनिविष्टांग्यो मदस्नेहवशानुगा ॥ ६१ ॥

१ सुखोपभोगाचीं स्थानें. २ असंख्यात.
३ मनोरंजनाचीं साहित्यें. ४ सेवा.

S त्यांचें वर्णन—

येकी बदरी कुचकल्याणी। नारिंगकुचगजगामिनी।
येक निंबपीतस्तनी घनस्तनी मातुलिंगें ॥ ९ ॥
येकी वृताकी सदेठी। येकी भोपलिया कुचदाटी।
कूष्माण्डकुच येक गोटी। येक चिरमुटी काचरिया ॥ १०

¶ ब—सालंकर. * अ—भोगभोग, ब—भोगाभोग. † तरी.
‡ ब—अन्योन्य. § सु. कां. ९।६०, ६१.

*ऐशिया योषिता नेणों किती। परस्परें आलिंगिती। परस्परें कुच मर्दिती। मुख चुंबिती परस्परें ॥ १५॥ ऐशिया रावणाचे घरीं। मद-विव्हळा अमित नारी। फुलें गुंफवीजे फुलारीं। तैसी हारी§ स्त्रियाची ॥१६॥ हनुमंत रिघोनि त्यां-माझारीं। शोधिता श्रीरामअंतुरी[1]। त्या तंव अवघ्या कामाचारी। सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ १७॥

रावणाच्या शय्याः—शोधितां असंख्यात नारी। येथें नाहीं सीता सुंदरी। तेंचि शोधावया पुढारी। साटोप[2] धरी हनुमंत ॥ १८॥ पुढें जातां एक एक। देखिला रावणाचा मंचक। रत्नखचित अलौकिक। सेज सम्यक सुमनाची[3] ॥ १९॥ पहुडावया दशशिर। पवनें आह्याटिला ¶स्वर। शेज रचिली सुमनाकार। सुगंधसेजार वसंत ॥ १२०॥

मंदोदरीदर्शनः—तया मंचकाशेजारीं। एकली निजली मंदोदरी। हनुमान म्हणे हे सीता खरी। शोभा साजिरी देखोनि ॥ २१॥ श्रीरामाची निजकांता। मज सांपडलीसे सीता। उल्लास हनुमंताचे चित्ता। होय नाचता स्वानंदें ॥ २२॥

तीच सीता असा हनुमंताचा समज व त्याची मनः-स्थितिः—रावणाची क्रिया भली। सुमनसेजे सीता एकली। असे निष्पाप राखिली। नाहीं अभिलाषिली तेणें पैं ॥२३॥ सीता सती निरुपम। अभिलाषिता करील भस्म। रावणाचा परमधर्म। सीता निजधर्में रक्षिली ॥ २४॥ जागी जाहलिया सीता गोरटी। रावण कपटी कीं हे कपटी। पुसावया गुह्य गोष्टी। मंचका नेहटीं अति गुप्त ॥ २५॥

सभेंतील विघ्नाबद्दल रावणाचें शान्तिकर्मः—सभेसीं देखोनि अति विघ्न। त्याचें करावया शांतिविधान। रावण करूं गेला हवन[4]। अति उद्विग्न भयभीत ॥ २६॥ सभेचा आठवतां आघात[1]। रावणा होऊं पाहे प्राणांत। तेणें भयें होम करित। विघ्नशांत्यर्थ अनुतापें ॥ २७॥ यालागीं एकली मंदोदरी। निजली देखिली सेजेवरी। हनुमान मानी सीता सुंदरी। निजजिव्हारीं निश्चित ॥ २८॥ मंदोदरीरावणां भेटी। त्या दोघांच्या गुह्य गोष्टी। हनुमान ऐकोनि कर्णपुटीं। होईल भेटी सीतेची ॥ २९॥ एका जनार्दना शरण। सीता-शुद्धीचें महिमान। कथाकौतुक गहन। अति पावन पवित्र ॥ १३०॥ सीताशुद्धीचा विधी[2]। श्रवणें जाती आधिव्याधी। छेदोनि दुष्ट दुर्बुद्धी। चित्त-शुद्धी श्रीरामें ॥ ३१॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमद्रावणशयनभवन-शोधो नाम चतुर्थोऽध्यायः ॥४॥ ओंव्या ॥१३१॥ श्रीराम जय राम जय जय राम॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

## अध्याय पांचवा

रावणाचा शान्तिहोम.—॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ विघ्न देखिलें सभेआंत। रावण होम करी शांत्यर्थ। मंदोदरी सेजे गुप्त। देखे हनुमंत एकाकी ॥ १ ॥

मंदोदरीलाच सीता समजून हनुमंताचे विचार व मनोविकारः—ही निश्चयें होय सीता। ऐसें मानलें हनुमंता। तेंचि अवधारा पैं कथा। श्लोकीं श्लोकार्था अवधारिजे ॥ २ ॥

† तासामेकान्तसन्यस्ते शयाना शयने शुभे।
ददर्श रूपसंपन्नां सुश्रोणीं स कपि. स्त्रियम् ॥१॥
कृष्णा मंदोदरी तत्र यौवनोत्तमशालिनी।
तां समीक्ष्य स महाबाहुर्हनुमान् मारुतात्मजः ॥२॥

१ श्रीरामपत्नी (जानकी). २ डाव. ३ फुलाची. ४ होम.

* ब—पाठ. § ब—तैशा—स्या. ¶ ब+ह

१ विघ्न. २ प्रकार.

† ड—पाठ.

† सुं. कां. अ. १०।५०।५४.

तर्कयामास सीतेति रूपयौवनसंपदा ।
हर्षेण महताविष्टो ननंद कपिकुंजरः ॥ ३ ॥
आस्फोटयामास चुचुंब पुच्छं
ननर्त क्रीडा हि जगौ च वल्गुः ।
स वानराणामृषभः प्रतीतो
ज्ञात्वा नरेंद्रस्य सुतां च सीताम् ॥ ४ ॥

विमानीं¶ उपराउपरीं । शोधितां एकांत ओवरी[१] । रावणाचे सेजेवरी । मंदोदरी देखिली ॥ ३ ॥ ठाण माण गुणलक्षण । रूपरेखास्थान यौवन । सीतेसारिखी समसमान । दोघी अनुपम्य* स्वरूपें ॥ ४ ॥ हेचि श्रीरामाची कांता । हेचि माझी स्वामिनी सीता । ऐसें मानिलें हनुमंता । उल्हासतां[२] नाचत ॥ ५ ॥ हर्षे निजबाहु आफळी । पुच्छा चुंबी सुखमेळीं । परमानंदें पिटी टाळी । जनकबाळी भेटली ॥ ६ ॥ मज जोडली सीताशुद्धी । जाहली श्रीरामकार्यसिद्धी । ही जानकी होय त्रिशुद्धीं । हर्षानंदीं नाचत ॥ ७ ॥ आतां फिटेल सांकडें[३] । कैसें रावण बापुडें । वांकुल्या दावी देवाकडे । वेगें उडे स्वानंदें ॥ ८ ॥ हनुमान आनंदें डुलत । माझा जाहला निजस्वार्थ । मज तुष्टला श्रीरघुनाथ । चुकला अनर्थ वानरा† ॥ ९ ॥ ऐकतां सीताशुद्धीची गोष्टी । श्रीरामासी आनंदकोटी । हर्षे माझी पाठी थापटी । सुखसंतुष्टी वानरा ॥ १० ॥ हर्षे जातां हनुमंत । करोनि रावणें होम समाप्त । सेजे आला लंकानाथ । चिंतायुक्त उद्वेगी ॥ ११ ॥ देखोनि विघ्नांची पैं थोरी । रावणासी भय भारी । न उठवितां मंदोदरी । सेजेवरी पहुडला ॥ १२ ॥

होम-समाप्तीनंतर मंदोदरी रावणाची पूजा करितेः—रावणाचे सांचलेंवरी[४] । जागी झाली मंदोदरी । वेगें उठोनि चरण धरी । नमस्कारी सद्भावें ॥ १३ ॥ घेवोनि जांबुनदतस्त[१] । पतिचरण प्रक्षाळित[२] । तें देखोनि हनुमंत । अत्यद्भुत कोपला ॥ १४ ॥

तें पाहून हनुमंताचा कोपः—माझिया स्वामीची हे कांता । अनुसरली लंकानाथा । मी काय उगाचि पाहूं आतां । करीन घाता दोघांच्या ॥ १५ ॥ दाहीं शिरें लंकानाथा । अकरावा सीतेचा माथा । नखें खुडूनियां आतां । नेईन रघुनाथा भेटीसीं ॥ १६ ॥ सीता रतली लंकानाथा । त्या दोहींच्या केलिया घाता । कोपलिया¶ श्रीरघुनाथा । चरणीं माथा ठेवीन ॥ १७ ॥ किंवा जीत पुच्छीं बांधोनी । श्रीरामापासीं नेईन दोन्ही । मग तो दंडील निजबाणीं । ऐसेंही मनीं विचारी ॥ १८ ॥ अथवा करूं आणीक एक । पुच्छीं बांधोनि मंचक । दोघें किष्किंधे नेलिया देख । दोष निर्दोख राम जाणे ॥ १९ ॥ ऐसें करितां जाण । श्रीरामें सांगितली खूण । आधीं पाहों पां आपण । नाममहिमान सीतेचें ॥ २० ॥ सीतेचे स्तंभभिंती लावितां कर्ण । तेथें नुठी रामस्मरण । कानीं लावितां पाषाण । नामोच्चारण तेथें नाहीं ॥ २१ ॥ पतिव्रता त्यागितां पती । तेथोनि पळे नामशक्ती । सीता सती ते असती । नामकीर्ति मावळली ॥ २२ ॥ सीता रतली अनाचारीं । नाम नुठी चराचरीं । इसी मी आतां जीवें मारीं । आला वानरीं अति कोप ॥ २३ ॥ रागें कांपत थरथरां । दांत खातसे करकरां । डोळे भोवंडी गरगरां । रोम* थरथरां थरकती ॥ २४ ॥ दोघां मारावया कडाडीं । वळिली पुच्छाची पैं विडी । रागें पिंजारिली दाढी । शेंडी तडतडी हनुमंताची ॥ २५ ॥

---

१ खोली. २ आनंदानें. ३ सकट. ४ चाहुलीनें.

¶ बड—विमान. * बकड—अन्योन्य; क्ष—अनन्य.
† अक—वानराचा.

१ सुवर्णाचें तस्त. २ धूत.

¶ डक्ष—कोपूं नको. * ड—रोमांच.

त्याचे आधीं सत्यान्वेषणाचा विचारः—कोपामाजी† हनुमंतु । अतिशयेंसीं बुद्धिवंतु । ऐकतां सुलोचना-वृत्तांतु । इंद्रजितु वांचला ॥ २६ ॥ आतांही कोप करूं शांतु । या दोहींची ऐकों मातु । विचारोनि शब्दार्थु । निजकार्यार्थु साधावा ॥२७॥

क्रोधाचे परिणामः—कोप आलिया दुर्धर । जयाचा लोपेना विचार । तोचि ‡मोक्षगामी[1] नर । परम धीर तो एक ॥ २८ ॥ कोपामाजी सावधान । अवतारी पुरुषाचें हें चिन्ह । तें तें चालतें ब्रह्मज्ञान । जग पावन त्याचेनि ॥२९॥ लोभ क्रोधाचें कारण । तो हनुमंता नाहीं जाण । यालागीं क्रोधीं सावधान । रघुनंदनगुरुकृपा ॥ ३० ॥

दोघांचा सवाद, मंदोदरीचें स्वप्नः—कपीनें कोप शांत करूनी । दोहींच्या कथा ऐकाव्या कानीं । राहिलासे गुप्त होउनी । सावधानीं सादर ॥ ३१ ॥ मंदोदरी म्हणे लंकानाथा । दुष्ट स्वप्न म्यां देखिलें आतां । तेणें पावलें अति आकांता । तें सादरता अवधारीं ॥ ३२ ॥ ऐसें स्वप्न¶ देखिलें नयनीं । पद्दलंके क्रौंचा निर्दाळोनी । तो पुरुष निघोन अशोकवनीं । श्रीरामपत्नी शोधित ॥३३॥ तो रिघतां अशोकवनीं । त्रिविध शोक लंकाभुवनीं । पुत्रशोक पतिअपमानीं । पुरदहनीं आकांत॥३४॥ अशोकवनीं अति आप्त । केला सीतेसीं एकांत । करोनि वनकरांचा घात । समुद्रांत निक्षेपी[2] ॥ ३५ ॥ अशोकवनाची खदळी[3] । तो मारिला जंबुमाळी । राक्षसकुमरां करोनि होळी । उपटिली* पौळी अखयातें ॥ ३६ ॥ सैन्यासी करोनि निःपात[4] । इंद्रजित गेला युद्धाआंत । करितां राक्षसांचा घात । भयें पडत मेघनाद ॥ ३७ ॥ तो ब्रह्मयानें आणिला बांधोनी । रागें पुच्छातें पेटवोनी । तुमच्या दाढया मिशा जाळोनी । प्रथम कंदनी हें केलें ॥ ३८ ॥ लंका जाळीत भडभडां । पुच्छें नगरा लाविला वेढा । रिघें नेदी मागांपुढां । चहूंकडा आकांत ॥३९॥ ऐसें दुष्ट स्वप्न देखोनी । वेगें उठलें गजबजोनी । थोर धाक लागला मनीं । निद्रा नयनीं लागेना ॥ ४० ॥ मग चरणक्षाळण करोनी । शुद्धाचमनातें सेवूनी । सदाशिवाला स्मरोनी । ठावे कानीं निजेलें ॥ ४१ ॥ तंव स्वप्न देखिलें दुर्धर । शिळीं बांधोनि सागर । लंके आले नरवानर । निशाचर-निर्दळणीं ॥ ४२ ॥ इंद्रजित कुंभकर्ण दोनी । दोघे मारिले दोघे जणीं । तुमचीं शिरें रामबाणीं । गिधाचे चरणीं लोळती ॥ ४३ ॥ रणीं निमाला दशानन । माझ्या चुडियां पडलें खान[1] । ऐसी करितसे रुदन । आक्रंदोन उठियेली ॥ ४४ ॥ ऐसें सांगतां एकाएक । मंदोदरी भुलली देख । बैसोनि रावणाचे संमुख । करी शोक‡ अति दुःखें ॥४५॥ बोंब पडली लंकेआंत । रणीं निमाला[2] लंकानाथ । म्हणोनि महाशब्द करित । तेणें हडबडित रावण ॥ ४६ ॥

रावणाचें सांत्वनः—मग धांवोनि लंकानाथ । तिचे धरिले दोन्ही हात । मी तंव आहें जीवें जीत । तूं कां वृथा तळमळसी ॥ ४७ ॥

मंदोदरीची विनतीः—सावध§ म्हणे लंकानाथा । माझें स्वप्न नव्हे मिथ्या । अशोकवनीं राहिली सीता । तुमचे घाता ते करील ॥ ४८ ॥ सख्य करोनि श्रीरघुनाथा । त्यासी संतोषें देइजे सीता । तेणें तुज कल्याण लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥ ४९ ॥ मी तंव होतें तुमची दासी । म्हणोनि लागलें पायांसी । भुक्ति मुक्ति होय आम्हांसी । सीता रामासी अर्पिलिया ॥५०॥

---

१. स्वर्गी पावणारा. २ फेंकून देई. ३ नाश. ४ खंडण.

† ब—कोपदजितु. ‡ ब—मोक्षाचा अधिकारी नर.
¶ क—ऐसा स्वप्नु देखिला. * क—उपटला पौळी अखया तो.

१ खंडण. २ मृत्यु पावला.

† क्ष—दहन. ‡ क्ष—महा शोक. § क्ष—सावधान.

सीतेचा ठाव लागल्यानें हनुमंताला आनंद व पुढील बेत:–सीता ऐकतां अशोकवनीं । हनुमान उल्लासला मनीं । हर्ष न माय त्रिभुवनीं । श्रीरामपत्नी चोजवळी[1] ॥ ५१ ॥ सीता आहे अशोकवनीं । अशोकवनिका कोण स्थानीं । तें समूळ ऐकावया कानीं । सावधानी हनुमंत ॥ ५२ ॥ रावणमंदोदरी एकांत । समूळ परिसा वृत्तांत । गुप्त राहोनि हनुमंत । चित्तीं सावचित वचनार्थी ॥ ५३ ॥

सीतेच्या नामनिर्देशानें रावणाचा चित्तक्षोभः–जानकी आठवितां चित्ता । काम खवळला लंकानाथा । अशोकवना जाऊनियां आतां । बळेंचि सीता भोगीन ॥ ५४ ॥ नाठवे सभेचें अति विघ्न । नाठवे मंदोदरीचें स्वप्न । सीतासंभोगीं दशानन । अति उद्विग्न कामार्थी ॥ ५५ ॥ सहा महिने अशोकवनीं । म्या कां ठेविली जनकनंदिनी । आतां निजबळेंकरूनी । रामपत्नी भोगीन ॥५६॥ सीताकामें सकामता । सन्निपात लंकानाथा । विसरला हितहितार्था । नाठवे चित्ता निजस्वार्थ ॥ ५७ ॥ सीताचिंता नित्य चिंतनीं । सीता नाम नित्य वदनीं । सीता स्मरे अनुदिनीं । ध्यानीं मनीं जानकी ॥ ५८ ॥ सकाम स्मरतां पैं सीता । पापघुर्णा लंकानाथा । हें सामर्थ्य श्रीरामभक्ता । भेटी रघुनाथा तिचेनि ॥ ५९ ॥ रावणासी सकामता । कळली मंदोदरीची चिंता । सीता अर्पावी श्रीरघुनाथा । लंकानाया नमनेंसीं ॥ ६० ॥ सीता करावी रामार्पण । कदा न मानी दशानन । मंदोदरीस कळलें चिन्ह । स्वहितवचन अनुवादे[2] ॥ ६१ ॥ मीच जावोनि आपण । इंद्रजित आणि कुंभकर्ण । प्रधानांसी पाचारून । रामार्पण करीन सीता ॥६२॥ सीताकामें रावण वेडें । सांगो नये तयापुढें । अर्पितां सीता मज राम जोडे । फिटे सांकडें[3] भवाचें ॥ ६३ ॥ सखा जोडोनि रघुनंदन । विघ्न तें होय निर्विघ्न । चित्त होय चैतन्यघन । दुःख संपूर्ण सुख होय ॥ ६४ ॥ श्रेष्ठ सुख तेंचि मरण । मरतां स्मरल्या श्रीरामचरण । मरण होय ब्रह्म पूर्ण । सुखैकघन श्रीराम ॥ ६५ ॥ ऐसेंच मी करीन आतां । शरण रिघेन श्रीरघुनाथा । स्वयें अर्पिताची सीता । लंकनाथा कल्याण ॥ ६६ ॥

१ जाणवली; समजवली. २ बोलू लागली. ३ संसाराचें संकट.

रावणानें योजिलेली युक्तीः–
ऐकतां मंदोदरीचें वचन । रावण जाहला अति उद्विग्न । प्रिया नव्हे महाविघ्न । सीता हरोन नेऊं पाहे ॥ ६७ ॥ मंदोदरीचें वचन । इंद्रजित आणि कुंभकर्ण । नुल्लंघिती अणुप्रमाण । प्रधानजनही अवघे ॥ ६८ ॥ मंदोदरीचे वचनार्थी । करिती मजही न पुसतां । इणें हिरोनि नेली सीता । दुःखावस्था रावणा ॥ ६९ ॥ अत्यंत खळबळला रावण । करावया मंदोदरीछळण[1] । युक्ति करी दशानन । सावधान अवधारा ॥ ७० ॥ विघ्न निरसावया समस्त । अनुसरावया श्रीरघुनाथ । आधीं पूजूं उमाकांत । कुळदैवत तो आम्हां ॥ ७१ ॥ सदाशिवाचे आज्ञेवरी । श्रीरामा अर्पूं सीता सुंदरी । यापरी छळोनि निजनारी । कार्यांतरीं[2] गोंविली ॥ ७२ ॥ रावणें पूजिला श्रीशंकर । मंदोदरीसी हर्ष थोर । येरीकडे दशशिर । करी विचार तो ऐका ॥ ७३ ॥

दूतिकाप्रेषण.–दूतिका पाचारोनि विश्वासी । वेगें जाय अशोकवनासी । शरमा आणि त्रिजटेसी । गुप्त त्यांपासी सांगावें ॥ ७४ ॥ अति सन्मान इंद्रजिता । जरी तो माझा पढियंता । तेणेंहि सोडा म्हणतां सीता । तुम्हीं सर्वथा न सोडावी ॥ ७५ ॥ कुंभकर्ण माझा भ्राता । तोही सोडा म्हणतां सीता । तुम्हीं न सोडावी सर्वथा । सोडिल्या घाता करीन मी ॥७६॥ मंदोदरी माझी कांता । आवडती आणि पतिव्रता । तिणेंही सोडा म्हणतां सीता ।

१. मदोदरीला फसविण्यासाठीं. २ अन्य कार्यांत.

तुम्हीं सर्वथा न सोडावी ॥७७॥ अति महिमेचा सन्मान । सोडा म्हणतां श्रेष्ठ प्रधान । तरी न सोडावी आपण । सोडिल्या प्राण घेईन मी ॥७८॥ भट जोशी विद्वांस जन । मज पूज्यत्वें अति सन्मान्य । त्यांचेनिही सोडिल्या जाण । तुमचा प्राण घेईन मी ॥ ७९ ॥ आलिया स्वर्गींचे देवगण । स्वयें आलिया चतुरानन । सीता न सोडावी आपण आज्ञा प्रमाण हे माझी ॥ ८० ॥ ऐसें रावणाचें वचन । ऐकोनियां गुह्य ज्ञान । अशोकवना शीघ्र गमन । करी सावधान दूतिका ॥८१॥

मारुतीनें केलेलें दूतिकानुगमनः—दूतिका चालतां लगबगें[१]। हनुमान लागला मागेंमागें । कृपा केली श्रीरामरंगें । अनुद्वेगें[२] सीताशुद्धि ॥८२॥ दूतिका सवेग चालतां । अति उल्लास हनुमंता । कृपा केली श्रीरघुनाथा । भेटली सीता अनायासें ॥ ८३ ॥ दूतिका चालतां पुढें पुढें। हनुमान मागें नाचे उडे। हर्षें लोळत गडबडे । कृपा चंद्रचूडें[३] मज केली ॥८४॥ आपआपल्या दावी वांकुली । आपआपणा करी गुदगुली । सीता माझी निजमाउली । ती भेटली अनायासें ॥८५॥ मंदोदरी रावणें छळिली तैं रघुनाथें मज कृपा केली । सीता माझी निजमाउली । मज भेटविली अनायासें ॥ ८६ ॥ रावणाचा उपकार । आजा मज घडला थोर । न शोधितां अति दुस्तर । सीता सुंदर भेटली ॥८७॥ ऐशा हर्षाचेनि पूरें। हनुमान चालिला अति गजरें। पुढे अशोकवन अति साजिरें । स्वयें वानरें देखिलें ॥ ८८ ॥ श्रीरामाची निजपत्नी । सीता नाहीं शोकस्थानीं । नित्य वसे अशोकवनीं । हें सत्य मानी हनुमंत ॥ ८९ ॥

सीता व अशोकः—सोडोनि अशोकवनाची गती। सीता शोधितां शोकाप्रती । अशोकवनीं सीतेची वस्ती । नित्य मारुति स्वयें मानी ॥ ९० ॥ अशोक सीतेचे चरणीं । अशोक सीतेचे दर्शनीं । अशोक सीतेचे नयनीं । सत्य मानी मारुति ॥ ९१ ॥ अशोक सीतेचे वचनीं । अशोक सीतेचे स्मरणीं । सीता वसे अशोकवनीं । सत्य मानी मारुति ॥९२॥ अशोक सीतेच्या अंगुष्ठीं । अशोक सीतेच्या पोटीं । अशोकीं वसे सीता गोरटी। मानी जगजेठी हनुमंत ॥ ९३ ॥ अशोकवस्ती सीतेच्या पोटीं । अशोकीं वसे सीता गोरटी । अशोक सीतेचे निजपृष्ठीं । अशोक सृष्टीं सीतेनें ॥ ९४ ॥ रावणें आणिलें हिरोनी । शोक न देखे तिचेनी । तेणें ठेविली अशोकवनीं । श्रीरामपत्नी अशोक ॥ ९५ ॥ होतां अशोकाची वस्ती । सकळ शोका जाहली शांती । अशोकवन त्यालागी म्हणती । मानी मारुति निश्चयें ॥ ९६ ॥

सीतादर्शनानें हनुमताला झालेला हर्षः—परम आल्हाद हनुमंता । आला अशोकवनाआंतौता[१] । सीता देखोनि हर्षयुक्ता । उल्लासत स्वानंदें ॥९७॥ सीता देखतांचि जाण । हनुमान घाली लोटांगण । रामनाम स्मरती पाषाण । अणु रेणु तृण राम जपती ॥ ९८ ॥ वृक्षांचीं पानें वातगती। रामनामें दुमदुमती । धरा[२] रामस्मरणीं गर्जती। सीता सती ही होय ॥ ९९ ॥ तेथें करितांचि आचमन । श्रीरामें स्वादिष्ट जीवन[३] । मंद सुगंध लागतां पवन । होतें संपूर्ण रामनामें ॥ १०० ॥ सावध पाहतां साचार[४] । रामनामें गर्जे अंबर[५] । सीता सती ही सुंदर । सत्य वानर स्वयें मानी ॥ १ ॥ जेथें हरिभक्तांची वस्ती । नाम कोंदे पंचभूतीं । नामें ओसंडतां[६] क्षिती[७] । सीता सती ही होय ॥२॥ रामें सांगितली खूण । ती तेथें बाणली संपूर्ण । नामें गर्जताहे तृण । वृक्ष पाषाण नामेंसीं ॥ ३ ॥

---

१ घाईने. २ निर्भय, कष्टावाचून. ३ शंकरानें.

१ अशोकवनामध्यें. २ पृथ्वी. ३ उदक. ४ खरोखर. ५ आकाश. ६ भरून वाहता. ७ पृथ्वी.

एका जनार्दना शरण। नामें¶ जीवन नामें¶ दहन*। नाम पावन नाम गहन। नामें त्रिभुवन कोंदलें ॥ ४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनूमद्शोकवनप्रवेश-जानकीदर्शनं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ १०४ ॥

## अध्याय ६ वा

सीतेची देहस्थितीः—श्रीजानकीजीवनाय नमः। श्रीरामाची निजभक्ती। भजनें दादुगी सीता सती। तृण पाषाण नामें गर्जेती। नामें त्रिजगती कोंदली ॥ १ ॥ श्रीरामाची परम भक्ती। स्वयें जाणे सीता सती। तिचे भजनाची देहस्थिती। भजती युक्ती अवधारा ॥ २ ॥

अंतर्यामी भजनभक्ती, वाचिक, श्रवण, घ्राण, त्वचेनेंः—हृदयीं आत्मा श्रीरघुपती। पाहतां वेद-शास्त्रव्युत्पत्तीऽ। ऐसी जे कां निजप्रतीती[१]। भजनभक्ति† ते नांव ॥ ३ ॥ तेचि भक्ति धरितां चित्तीं। श्रीराम दिसे सर्वां भूतीं। हे दृष्टीची भजनस्थिती। केला वेदांतीं निश्चय॥ ४॥याचि स्थितीं वचनोच्चार। हेंचि वाचिक भजन निर्धार। श्रीराम अक्षरीं अक्षर। नामोच्चार श्रीराम ॥ ५ ॥ श्रीराम जयराम अक्षरें। क्षराक्षरातीत परें। भवानीसी[२] शंकरें। अत्यादरें सांगितलीं ॥ ६ ॥ याचि स्थितीं करितां श्रवण। अक्षरार्थ श्रीराम पूर्ण। सांगता झाला श्रीरघुनंदन। हें निजभजन श्रवणाचें ॥ ७ ॥ रसांसी श्रीराम स्वादता[३]। रसने[४] राम रसज्ञता। ऐसेनि रसभोग भोगितां। श्रीरघुनाथा निजभजन ॥ ८ ॥ याचिपरी गंधघ्राण। सुगंधासी श्रीराम जीवन। तेचि अवघ्राणीं सर्वज्ञ। हें निजभजन घ्राणाचें ॥ ९ ॥ त्वचेचें करितां स्पर्शन। त्वचेची त्वचा रघुनंदन। स्पर्शी सबाह्य श्रीराम पूर्ण। हें निजभजन त्वचेचें ॥ १० ॥ श्रीराम मनाचें निज-मन। श्रीराम चित्ताचें चैतन्यघन। श्रीराम बुद्धीचें समाधान। विवेकें सज्ञान श्रीराम ॥ ११ ॥

अनन्यता— अहंसोहंकोहंपरता। श्रीराम वसे स्वभावतां। ऐसेऐसिया अनन्यता। भजे श्रीरघु-नाथा जानकी ॥ १२ ॥ श्रीरामगतीची§ ही गती। श्रीराम सीतेची निजशक्ती। श्रीराम सबाह्य सर्वां भूतीं। तयाची स्थिति जानकी ॥ १३ ॥ ऐशिया श्रीरामभजनापुढें। रावणभय तें बापुडें। येवों न शके सीतेपुढें। सीताही रडे लटिकेंचि ॥ १४ ॥ रामसीतेची अनन्यता[१]। श्रीरामावेगळी नव्हे सीता। सीतेवेगळें श्रीरघुनाथा। नाहीं सर्वथा दूरी जाणें ॥ १५ ॥

याप्रमाणें हनुमंतास दिसली, त्याचें कारण'—ऐशापरी भजे सीता। समूळ कळलें हनुमंता। भक्तरक्षणें श्रीरघुनाथा। तेंही मज आतां कळों आलें ॥१६॥ मंदोदरी मानोनि सीता। हे कां रतली[२] लंकानाथा। कोपें करितां दोहींच्या घाता। रामें अनर्था चुकविलें ॥ १७ ॥ मी तव वानर उन्मत्त। समूळ विचार न करित। दोघांचा करीत होतों घात। रायें अनर्थ चुकविला ॥ १८ ॥

मंदोदरी हीच सीता असा हनुमंतास भास कां झालाः—मंदोदरी हेचि सीता। कैसें मानलें हनुमंता। मंदोदरी विष्णुसंभूता। समूळ कथा अवधारा ॥१९॥

मूळ कथा'—रावणाची माता कैकसी। पंचधान्यांचे पिष्टासीं[३]। [४]पंचवक्त्र भाऊनि¶ त्यासी। करी पूजेसी शिवलिंगा ॥ २० ॥

१ आत्मानुभव. २ पार्वतीला. ३ गोडी. ४ जिव्हेला.

¶ब—नाम. *तु—ग्रहण.

ऽब—विरक्ती. ‡ब—मचीती, क्ष—प्रीति. †ड्ड—मुख्यत्वें.

१ ऐक्य. २ रममाण झाली. ३ पिठाचें करून. ४ महादेव.

† ब—नें. § बक—भक्तीचा. ¶ ब—भवानी.

कैकसीची पंचधान्यपिष्टाची पचवक्त्र-लिंगपूजाः–पंचधान्य तें पंचवदन । ऐसी भावना भावून । पूजा करी अनुदिन । सावधान कैकसी ॥ २१ ॥ पंचधान्यांचा पंचवक्त्र । पूजितां अक्षय दशवक्त्र[1]। अक्षय होती माझे पुत्र । हें निजसूत्र पूजेचें ॥२२॥

शिवरात्रीला ध्यानस्थ असतां इंद्रानें लिंग समुद्रांत टाकलें:–शिवरात्रीचे दिवशीं । येवोनि समुद्रतीरासी । निर्मोनियां शिवलिंगासी । करी कैकसी महापूजा ॥ २३ ॥ षोडशोपचारीं पूजा जाहली । त्यावरी बेलाची लाखोली । तिपानी शिवनामीं वाहिली । पूजा केली अनुपम्य ॥ २४ ॥ तिपानी बेलाचें पत्र । एक एक शिवनामें स्वतंत्र । भावें पूजिला श्रीशंकर । मनोहर ती पूजा ॥ २५ ॥ ऐसें करोनियां पूजन । लावोनियां दोनी नयन । कैकसी बैसतां धरोनि ध्यान । आनेंआन[2]* तेथें जाहलें ॥ २६ ॥ राक्षसद्वेषी इंद्र येऊन । लिंग समुद्रीं करोनियां मग्न[3] । सागर न करीच भग्न । स्थापी सर्वेश हाटकेश्वरीं ॥ २७ ॥ त्या लिंगाची हाटकेश्वरीं । पूजा होतसे अद्यापवरी । विल्वप्रवाह गोमतीसागरीं । देखती शिवरात्रीं सर्व† लोक ॥ २८ ॥

कैकसीचा आक्रोशः–कैकसी जंव उघडी नयन । तंव पूजालिंगा पडलें खाण[4] । पुत्र पौत्र निमे संतान । तें अति विघ्न लिंगहानी ॥ २९ ॥ कैकसी दीर्घ रुदन करी । माझी देवपूजा नेली चोरीं । जळो रावणाची राज्यथोरी । काय संसारीं नांदत ॥३०॥

रावणाचें आश्वासनः–ऐकतां मातेचें रुदन । रावण आला स्वयें धांवोन । येरी म्हणे लिंगा पडलें खाण । काय वदन दाविसी ॥ ३१ ॥ न करितां विसर्जन । जें लिंगासी होय विघ्न । तें संताना निःसंतान । शिववचन शैवागमीं ॥ ३२ ॥ येरू म्हणे माते अवधारीं । बतरले साही सूत्रीं । रत्नलिंग आहे घरीं । पूजा करीं तूं तयाची ॥ ३३ ॥

१ रावण. २ चमत्कारिक. ३ बुडवून. ४ विघ्न, संकट.

¶बक–भवानी. *बक–अन्नोविघ्न. †बक–ते.

कैकसीचें असमाधानः–अनेकपरी लिंगाची थोरी । बोलिली आहे आगमशास्त्रीं । कैकसी त्या लिंगातें । हातीं न धरी । अनाचारीं केंवी रिघों ॥ ३४ ॥ माझें लिंग न येतां हाता । आणिक मी न घें सर्वथा । शैवदीक्षेची हे अवस्था । लिंग न घेतां प्राणत्याग ॥ ३५ ॥ अद्यापवरी शैवमार्गी । दुजिया लिंगाची सांडोनि मार्गी[1] । पूजन करिती लिंगालागीं¶ । प्राणत्यागीं निजनेटें ॥ ३६ ॥

आत्मलिंग आणण्याकरितां रावण कैलासास जातोः–रावण विनवी मातेसी । तूं कां व्यर्थ प्राण देसी । मी जाईन शिवापासीं । तुझ्या लिंगासी आणीन ॥ ३७ ॥ शिवस्वामी माझे माथां । तूं तंव जाणसी तत्वतां । प्रसन्न करोनि विश्वनाथा । लिंग मी आतां आणीन ॥ ३८ ॥ कैकसी सांगे रावणासी । नारदें सांगितलें मजपासीं । आत्मलिंग शिवापासीं । तें आणिसी तैं धन्य ॥३९॥ ऐकोनि मातेचें वचन । सवेग निघाला दशानन । शिवापासीं स्वयें येऊन । करी नमन साष्टांगीं ॥ ४० ॥

शंकराचें दुर्लक्षः–जवळी आलिया रावणासी । शंकर न पुसे तूं कां आलासी । आजि कां झालासी उदासी । रावणासी पुसेना ॥ ४१ ॥ बाण आणि रावण । हेचि शिवाचे पढियंते पूर्ण । त्यांचें वचन अणुप्रमाण । शिव आपण उल्लंघी ॥ ४२ ॥ त्याचि रावणासी आतां । शिव न पुसे सर्वथा । परम चिंता लंकानाथा । यासी मी आतां काय करूं ॥४३॥ जया भक्तासी निष्कामभावो । तया संमुख सदाशिवो । तोचि सकाम होतां पहाहो । शिव स्वयें पुसेना ॥ ४४ ॥ रावणें देखिली शिवाची कांता । जे कां पार्वती जगन्माता । हे मी शिवासी मागेन आतां । सकामता दुसरी ॥ ४५ ॥

१ विचार, मार्ग. २ इच्छा धरून आलेला.

¶ बक–लिंगी.

शृंगीच्या झणत्काराने शिव तल्लीनः—रावण उभा दोन प्रहर । सदाशिव नव्हेचि सादर । कोठें गुंतला श्रीशंकर । पाहे अंतरीं रावण ॥ ४६ ॥ शृंगीच्या झणत्कारीं । शिव गुंतला नादांतरीं । ऐसें जाणोनि निर्धारीं । रावण करी तें ऐका ॥ ४७ ॥

रावणाचें शिरार्पण व गायनः—उतरोनियां निजमाथा । शिर लावोनियां युक्ता । रावणें केला वीणा हाता । होय वाजविता अति युक्तीं ॥४८॥ रावणहस्ताचा पैं स्वर । मधुर मंजुळ आणि अरुवार[१] । तेणें सुखावला श्रीशंकर । गौरीहर तुष्टला ॥ ४९ ॥

प्रसन्न होऊन शंकराचें वरदानः—रावणासी माग म्हणतां । मागतां नये मोडिला माथा । कृपा उपजली विश्वनाथा । वर देता स्वयें झाला ॥५०॥ तुवां मोडोनियां निजशिर । मज सुखी केलें अपार । तूं होशील दशशिर । वीर शूर तिहीं लोकीं ॥५१॥

रावणाला दहा शिरें, वीस भुजा व अमृताची कुपी.—शिरा काढोनि हातींच्या* सत्वर । तंतु लाविले साचार । एकएकाचे† दहादहा कर । भुजाभार विंशति पैं ॥ ५२ ॥ वर देतां [२]वृषभध्वज । रावणा दहा शिरें वीस भुजा । अमृतकुपी देवोनि ओजा । बळसमाजी आतुर्बळी ॥ ५३ ॥

शिव रावणाचें अभीष्ट देण्यास उत्सुकः—शिव म्हणे लंकानाथा । जें जें आवडे तुझे चित्ता । तें तें देईन मी आतां । प्रसन्नता गर्जत ॥ ५४ ॥ सदाशिव स्वयें भोळा । तो नेणे राक्षसाची कळा । दुष्ट बुद्धि त्याचे डोळां । मागती कळा तें ऐका ॥ ५५ ॥

पार्वती व आत्मलिंग रावण मागतोः—पार्वती लावण्याची राशी । ते मज द्यावी निजभोगासीं । आत्मलिंग निजपूजेसीं । कैकसीसी तें द्यावें ॥५६॥

१ नाजूक. २ बैलाचें चिन्ह ज्याच्या ध्वजावर आहे असा शंकर.

* ब—दोहींकर. † येकयेक दोनीं कर.

रावणमागणें ऐकतां । गेली उदारवरदउल्हासता । सुत मातेसी रति मागतां । परम क्षोभता[१] शिवासी ॥ ५७ ॥

शंकराचें आश्चर्य, परंतु वरदानानें बद्ध, म्हणून दोन्ही देतातः—परम क्षोभ शिवाचे चित्ता । यासी वरदान न देतां । असत्यता माझिया माथां । नेदी म्हणतां म्हणवेना ॥ ५८ ॥ माता सुत जवळीं उल्हासतां । सुतें मातेसी रति मागतां । प्राणांत क्षोभें क्षोभे माता । शिवाचे चित्ता तैसें जाहालें ॥ ५९ ॥ गुरुपत्नी ते शिष्यमाता । तिचा अभिलाष करितां । आली रावणा गुरुतल्पगता[२] । कैसेनि आता वांचेल ॥६०॥ पार्वती देतां रावणाहातीं । हिचेनि तुम्हां सर्वशांती । न कळोनि ते वचनोक्ती । लंकापति उल्हासे ॥६१॥

आत्मलिंगासंबधानें शंकरांचा इशाराः—शिव म्हणे रावणासी । आत्मलिंग देतां तुजपासीं । शुचित्व पाहिजे अहर्निशीं । ठेविल्या भूमीसीं नये हाता ॥६२॥ आकर्षोनि चैतन्यज्योती । तेज मुसावोनि[३] आत्मशक्ती । तें आत्मलिंग उमापती । नित्य पूजिती नेमेंसीं ॥ ६३ ॥ तें लिंग देतां रावणाहातीं । लिंग जाईल हातोहातीं । तृतीयनेत्रीं क्षोभेल शक्ती । लावील ख्याति रावणा ॥ ६४ ॥

दोन्ही घेऊन रावण जातोः—रावणें घेवोनि पार्वती । आत्मलिंग घेवोनि हातीं । वल्लासें सुचित्तवृत्ती[४] । लंकेप्रती निघाला ॥६५॥ रावणासी देखतां जाण । उमा[५] जाली हीन दीन । चिंतातुर अति गहन । दीनवदन ते जाली ॥ ६६ ॥

उमा विष्णूचा धांवा करतेः—शिवें दिधले रावणापासीं । माझी सुटका होय कैसी । उमा चिंती श्रीविष्णूसी । पावें वेगेंसीं कृपाळुवा ॥ ६७ ॥ ग्राहें गिळितां गजेंद्रासी । त्या उद्धरिलें अति वेगेंसीं ।

१ क्रोध. २ गुरुस्त्रीगमनाचें पातक. ३ एकत्र करून. ४ आनंदित होत्साता. ५ पार्वती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थल
अनुक्रम 23000 . वि. ...
क्रमांक 2709 नों. दि. ...



रावणग्रस्त¶ मज* दीनासी। शीघ्र पावावें ॥६८॥ राम उद्धारिल्यासाठीं। कुंटिणी वाहिली वैकुंठीं। तैसिया गा कृपादृष्टीं। पावें जगजेठी कृपाळुवा ॥६९॥ महापातकांची राशी। नामें उद्धार अजामिळासी। मी तंव तुझी निजदासी। पावें वेगेंसीं कृपाळुवा॥७०॥ शिवासी छळितां भस्मासुरें। तुवां तारिलें कृपाकरें। ऐकोनि उमेचीं उत्तरें। हरी सत्वरें धाविन्नला॥७१॥ शिवाची जे निजकांता। ते तंव माझी सखी माता। तिचा अभिलाष करितां। लंकानाथा गांजीन॥७२॥

पार्वतीस सोडविण्यांत गणेश व कुमार याची असहायता—पार्वती सोडविता एकाएक। गणेशस्वामी कार्तिका अटक। शिववरदान होतां लटिक। शिव सम्यक कोपेल॥७३॥ रावणाच्या पाडोनि दांतां। निमेषें सोडवीन माता। शिववरदान मिथ्या होतां। आमचे घाता शिव करील॥७४॥

विष्णू व या दोघाची भेट, व सगनमत—सोडवावया पार्वतीसी। धांवण्या येतां श्रीविष्णूसी। दोघे भेटले त्यासी। वृत्तांत त्यांसी सांगोनि॥७५॥ पूर्ण छळावया रावण। विष्णूनें मांडिलें विंदान। द्विज[२]-गौंचें रक्षण। सांगे आपण गणेशा॥७६॥

विष्णू धर्मऋषि होतात, कुमार शिष्य व गणपति गोपाल—आपण जाला धर्मऋषी। शिष्य केले गुहकासी[३]। उल्लासें येतां रावणापासीं। संमुख‡ त्यासी भेटला॥७७॥ ऐसा उल्लास लंकापती। शिवें दिधली पार्वती। आत्मलिंग कृपामूर्ती। तेंही मजप्रती ओपिलें॥७८॥

शिष्य-रावण-संवाद—शिष्य रावणासी सांगती। आत्मलिंग सत्यप्राप्ती। परी हे नव्हे गा पार्वती। शिवें तुजप्रती ठकविलें॥७९॥ शिव देईल निजकांता। हे तंव न घडे गा सर्वथा। ठकिलें ठकिलें लंकानाथा। पाहें तूं आतां पार्वती॥८०॥

उमेची विकृती व रावणाचा उद्वेग—जंव पाहे तो दशानन। तंव उमा न दिसे शोभायमान। निंद्य कुत्सित हीन दीन। देखे उद्विग्न मुख तिचें॥८१॥ डोळे पिचके वाहे पाणी। वदनीं माशांची गोंगाणी। श्लेष्मा[१] विडिविडित घ्राणीं[२]। मुखीं पोह्याणी[३] घाणत॥८२॥ ती देखतांचि वक्रा[४]। रावणा आला अति ओकारा। विष्णु लाघवी खरा। दशशिरा छळियलें[५]॥८३॥ रावण म्हणे ऋषींप्रती। माझेनि भाग्यें भेटलेती। आतां जावोनि शिवाप्रती। मुख्य पार्वती मागेन॥८४॥ शिव राखोनि निजदशा। तुज दिधली अवदसा। त्रिसत्य सत्य मानीं गा लंकेशा। भोळा¶ महेश मानूं नको॥८५॥ उमा लपवी उमापती। ते खूण सांगेन तुजप्रती। आसनाखालें लखलखिती*। ते पार्वती तू मागें॥८६॥

रावणाची शंकराकडे धाव—ऐकोनि रावण अति आवेशी। धाविन्नला शिवापासीं। विष्णू तेथे लघुलाघवेंसीं। मंदोदरीसीं निर्मिलें॥८७॥

विष्णूनें केलेली मंदोदरीची उत्पत्ती—केशराची अति गोसटी। रमेनें दिधली उटी। उदरीं आढळतां मळवटी। केली गोरटी मंदोदरी॥८८॥ निर्मोवया† सुंदर पुतळी। काहीं नातुडे हातातळीं। उदरीं गौर चंदनाची मळी। त्याची निर्मिली मंदोदरी॥८९॥

मंदोदरी शब्दाची व्युत्पत्ती—श्रीविष्णूचे‡ उदरोदरीं। सुगंधचंदनकरीं। विष्णुमध्यांगीं जन्मली नारी। मंदोदरी त्या हेतू॥९०॥माज[६] समादे मुष्टिमाझारीं।

१ रावणानें पीडित. २ ब्राह्मणाच्या गाईचें. ३ कार्तिकस्वामीला.

¶ब- रावण ग्रहगता. *ड—अति वेगेंसी.
‡ ब—सन्मुख.

१ शेंबुड. २ नाकांत. ३ दुर्गंधी. ४ वाकडी. ५ फसविलें. ६ कमर.

¶ डक्ष—भले. * खालतो. † ब—निर्माल्य.
‡ ब—चा; क्ष—च्या.

यालागीं म्हणती मंदोदरी । विषयतृष्णा नाहीं उदरीं । मंदोदरी तेणें नांवें ॥ ९१ ॥ जे जन्मली विष्णूचे करीं । संकल्प विकल्प नाहीं उदरीं । यालागीं म्हणती मंदोदरी । शोभा सुंदरी शोभत ॥ ९२ ॥

विष्णू ती पुतळी शिवाच्या आसनाखालीं घालतात–

नयन वदन श्रवण[1] घ्राण[2] । रूपरेखा ठाण माण । गुणगांभीर्य वदनभान । श्रीसमान करी विष्णु ॥९३॥ विष्णु लाघवी तत्काळीं । ऐसी निर्मोनी पुतळी । घातली शिवासनाचे तळीं । तेजें वेल्हाळी शोभत ॥ ९४ ॥

रावणाचा राग व अधिक्षेप व शिवाची प्रतिक्रिया–

रावण म्हणे शिवाप्रती । तुवां लपवोनि पार्वती । ते अवदसा दिधली माझे हातीं । धन्य वरदोक्ती हे तुझी ॥ ९५ ॥ शिव विचारी निजचित्तीं । येणें अभिलाषिली पार्वती । ते अवदसेची प्राप्ती । छळिला निश्चितीं जगदंबा ॥ ९६ ॥ तीस विष्णु जाहला साह्य । तेणें रावणा आला अपाय । तेथें न चलती उपाय । यासी म्यां काय करावें ॥ ९७ ॥ रावण पाठींचा माझा गण । उमाभिलाषी[3] पूर्ण । गुरुतल्पगदोष[4] दारुण । अचुक मरण या आलें ॥९८॥ जेचि उमा तेचि सीता । जिचेनि अभिलाषें तत्वतां । मरण आलें लंकानाथा । पेटला घाता श्रीविष्णु ॥ ९९ ॥ रावण पेटला अति अवेशा । म्हातारपणीं लोभ कैसा । तुज वाढला गा महेशा । मज अवदसा दिधली ॥ १०० ॥ तथास्तु म्हणोनि सदाशिवु । बहु अवदसा भोगील जीवु । रावण विषयांध बहु । त्यावरी गर्व वरदानाचा ॥ १ ॥ रावण म्हणे शिवाजवळी । उमा लपविली आसनातळीं । मज दिसताहे सोज्ज्वळी । किती चंद्रमौळी[5] चाळविसी ॥ २ ॥ आसनीं देखोनि सुंदर कांता । अति विस्मयो लंकानाथा । उमा सांडोनि जगन्माता । दिधली लंकानाथा मंदोदरी ॥ ३ ॥ रावण बोलिला कोपेंकरीं । म्हातारपणीं स्त्रीलोभ भारी । माझी प्रिया जगदात्मा नारी । अभिलाषें उरी उरों नेदी ॥ ४ ॥ असो याउपरी लंकापती । रावणें सांडोनि पार्वती । मंदोदरी अति प्रीतीं । घेवोनि चित्तीं निघाला ॥ ५ ॥

रावणाचें प्रयाण व मार्गांत मूत्रोत्सर्गाचा विकार–

स्कंधीं घेवोनि मंदोदरी । आत्मलिंग घेवोनि करीं । रावण निघतां झडकरीं । नानापरी छळी विष्णु ॥ ६ ॥ रावण पावून हरिखा । अनुलक्षोनिशां लंका । जातां लागली लघुशंका । पाऊल देखा नुलंघवे ॥ ७ ॥ लिंग देऊं कोणाचे हातीं । कैसेनि करूं शंकानिवृत्ती । रावण थोर पडला गुतीं । पुढती गति खुंटली ॥ ८ ॥ अभिलाषितां शिवाची नारी । रावण अशुचि चराचरीं । मृत्तिकाजळें शौच करी । शुचित्व तरी उमजेना ॥ ९ ॥ मृत्तिकाजळें शुद्ध करिती गुद । तैसें हृदय न करिती शुद्ध । शौचाचार तो अवद्ध । कर्ममंद कर्मठ ॥ ११० ॥

गणेशास लिंग घेण्याची विनती; त्याची सशर्त समती–लिंग द्यावें कोणापासी । रावण पाहे चौपासीं । तंव देखिलें गणेशासी । द्विजगोंसी संरक्षी ॥ ११ ॥ दर्भ पवित्र यज्ञोपवीत । टिळे द्वादश नामांकित । गणेशा देखे लंकानाथ । लिंग घ्यावया प्रार्थित ॥१२॥ जंव मी करीं शंकानिवृत्ती । तंववरी लिंग धरावें हातीं । गणेश म्हणे गाई जाती । वासरें पितीं धेनूंसी ॥ १३ ॥ गाई पाजलियावरी । द्विज कोपतील भारी । तुझें लिंग मी नागीकारीं[1] । पाय धरी रावण ॥ १४ ॥ गणेश त्यासीं नेम करी । तुज न येतां झडकरी । लिंग ठेवीन भूमीवरी । निजनिर्धारीं नेम माझा ॥१५॥ त्रिवार गर्जेनेंसीं । प्रतिज्ञा नेमू जाण ऐसी । तुज न येतां त्वरेंसीं । लिंग भूमीसीं ठेवीन ॥ १६ ॥ ऐसी निगुती[2]

---

१ कान. २ नाक. ३ पार्वतीची इच्छा करणारा. ४ गुरुपत्नीशीं गमनाचा दोष. ५ शंकरा.

१ घेत नाहीं. २ नियम.

करोनि देखा । करूं गेला लघुशंका । मुतीं गुंतविलें दशमुखा । कांहीं आवांका चालेना ।। १७ ।।

रावणाचा मूत्रातिरेक, गणेशाची हांक व लिंग-प्रक्षेप—कहीं मूत मोकळें होत । तंव तें झालें अत्यद्भुत । धारावर्ती प्रवाहत । मूतीं लंकानाथ गुंतला ।। १८ ।। गणेश करी गर्जनेसी । रावण गुंतला मुतापासीं । लिंग ठेवोनि भूमीसीं । घेवोनि गाईसी तो गेला ।। १९ ।।

रावणाचा उद्वेग व लिंगोद्धरणाक्षमता—रावण करुनि[५] शौचाचारी । वेगें येतां झडकरी । लिंग देखोनि भूमीवरी । श्रद्धे करीं घेऊं गेला ।।१२० ।। एक हातें दोहीं हातें । उचलितां रावण कुंथे । नुचलेचि विंशति[१] हातें । म्हणे लिंगातें महाबळ ।। २१ ।। अहाच दिसे भूमीवरी । परी तें सबळ आहे भारी । उचलितां विंशति करीं । तिळभरी उचलेना ।। २२ ।। सर्व शक्ति अति प्रबळ । रावणें वेंचितां सर्व बळ । लिंग उचलेना अलुमाळ[२] । महाबळ तें लिंग ।। २३ ।। रावणें आपुल्या निज-करीं । आंदोळिला[३] कैलासगिरी । महाबळ लिंग हें भारी । तिळभरी नुचलेचि ।। २४ ।। लिंग भूमीवरी ठेवोनि गेला । रावणें गणेशा दिधला टोला । अद्यापि असे उभा केला । रावण क्षोभला निभ्रंशें ।। २५ ।।

त्याचा शोक—आत्मलिंग नये हातासी । उपाय न चले कांहीं त्यासी । रावण स्फुंदे उकसाबुकसीं । कैकसीसी काय सांगूं ।। २६ ।। लिंग गेलें अति मुततां । कांहीं केलिया नये हाता । नगरा जातां क्षोभेल माता । भयें उभयता अपावो[४] ।। २७ ।। नाहीं देव ना पितर । उभयतां अपवित्र । विष्णूनें छळिलें अपार । दशकंधर तळमळी ।। २८ ।।

पंचलिंगोत्पत्ती—लिंगबंधनीं उभय मुद्रा । शिवें लाविला शिवदोरा । रावणें सांडितां अल्हापल्हा[१] । पंचमुद्रां पंचलिंग ।। २९ ।। मुरडोनियां सारितां वस्त्र । तेथें जाला मुरडेश्वर । मुद्रिका टाकितां पवित्र । गुप्तेश्वर तेथें जाला ।। १३० ।। रागें टाकितां शिव-दोर । तेथें जाला गणकेश्वर । कानडे म्हणती धनेश्वर । लोकव्यवहार पैं ऐसा ।। ३१ ।। शिवसेज टाकितां साचार । तेथें जाला शेजेश्वर । ऐशियावरी पंचवक्त्र[२] । श्रीशंकर नांदत ।। ३२।। गोकर्ण हें तंव अनादि क्षेत्र । तेथें महाबळ ईश्वर । यालागीं गोकर्ण महाबळेश्वर । लोकव्यवहार प्रसिद्ध ।। ३३ ।।

गोकर्ण महाबळेश्वर व ब्रह्मानिर्मित महाबळेश्वर भिन्न—गौतमपर्वत समुद्रतीर । तेथें गोकर्णमहाबळेश्वर । वांईच महाबळविचार । भिन्न परिचार ब्रह्मयागीं ।। ३४ ।। ब्रह्मयानें याग करितां प्रबळ । प्रगटला ते ठायीं महाबळ । दोहींचें भिन्नभिन्न स्थळ । लोक सकळ जाणती ।। ३५ ।। असो तीर्थांची हे वार्ता । संख्या करितां असंख्याता । कैसेनि हे कथा । मूळ-संमता अवधारा ।। ३६ ।।

हा कथेचा आधार ब्रह्मोत्तर खंड—मंदोदरीसमान हे सीता । कैंवी मानली हनुमंता । ब्रह्मोत्तरखंडींची हे कथा । विष्णुसंभूता मंदोदरी ।। ३७ ।।

मारुतीला वाटलेलें सीता-मंदोदरी साम्य—मंदोदरी सुंदर कांता । स्वयें विष्णु तिसी निर्मिता । तिसीं सीतेची साम्यता । स्वभावतां पैं आली ।। ३८ ।। विष्णु करी अवलोकन । ते तंव होय श्रीसमान । मंदोदरी विष्णुनिर्माण । सीतेसमान मानी कपि ।। ३९ ।। दोघी अयोनिजा तत्वतां । दोघी जणी पतिव्रता । मंदोदरीसमान सीता । हनुमंता मानली ।। १४० ।। रावणाचे अति एकांता । मंदोदरीची ऐकोनि कथा । अशोकवनीं हनुमंता । भेटेल सीता तें ऐका ।। ४१ ।। अशोकवनामाजी मारुती । नमस्कारोनि सीता सती । श्रीरामाच्या कथानुवर्ती ।

१ वीस. २ किंचितही. ३ हालविला. ४ वाईट.

५ब—करोनि.

१ इकडे तिकडे. २ शंकर.

सुखानुभूति दोहींसी ॥ ४२ ॥ एका जनार्दना शरण। हनुमान लाघवी आपण। करील वन विदारण। राक्षसकंदन तें ऐका ॥ ४३ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां मंदोदरीजन्मकथनं नाम षष्ठोऽध्याय ॥ ६ ॥ ॥ ओव्या ॥ १४३ ॥ श्रीराम ॥ जय राम ॥

---

## अध्याय ७ वा

मारुतीचें अशोकवनात आगमन–॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगाप्रती। दूतिकांमागें[1] मारुती। आला अशोकवनाप्रती। सीता सती वंदावया ॥१॥ देखोनिया अशोकवन। हनुमान घाली लोटांगण। करोनियां श्रीरामस्मरण। सीतादर्शन करूं निघे* ॥ २ ॥

†स मुहूर्तमिव ध्यात्वा[2] संहृष्टमनसा कपिः ॥ १ ॥
ज्यामुक्त इव नाराचः पुप्लुवे वृक्षवाटिकाम् ॥ ४ ॥
आपुप्लुवे[3] महातेजा. प्राकारं तस्य वेश्मनः ॥ १ ॥
स तु संहृष्टसर्वांगः प्राकारस्थो महाकपिः ॥ २ ॥

अशोकवनवर्णन –साधावया सीता चिद्रत्न। हनुमान क्षण एक धरी ध्यान। देखोनियां अशोकवन। आलें स्फुरण हनुमंता ॥३॥ जैसा श्रीरामाचा बाण। तैसें करोनि उड्डाण। अशोकवनामाजी जाण। आला आपण हनुमंत ॥ ४ ॥ वृक्ष सफळ आणि सरळ। वन देखोनि विशाळ। करी हर्षाचा§ गोंधळ। घोटी लाळ मिटक्या देत ॥ ५ ॥ दाट देखोनियां झाडा। उल्हास आला माकडा। वृक्षोवृक्षीं चढे नडतडां। नाचवी पुढां निजपुच्छ ॥ ६ ॥ सांपडली श्रीरामाची कांता। फिटली आधिव्याधिचिंता। विचकोनियां निजदांतां। देवां देवतां वांकुल्या दावी ॥ ७ ॥ नारळी घडघडती घडें। हनुमान पाहे तिकडे। पक्व खर्जूरी देखोनि पुढें। वेगें चढे गटकावया ॥ ८ ॥ पिकले आंबे देखोनि तेथ। हनुमान डोळे मिचकावित। द्राक्षाचे घड लोंबत। हालवी तेथ निजपुच्छ ॥ ९ ॥ मातुलिंगी[1] आणि नारिंगी। देखोनि हनुमान नाचे रंगीं[2]। माझे दांत सभाग्यभागी। फळांलागीं करंडावया[3] ॥ १० ॥ फणसें परिपक्व घनदाटें। हनुमंतें¶ नखें खुडिले कांटे। पिकलीं केळें चेपोनि बोटें। निंबें आंबटें‡ मी नेघे ॥ ११ ॥ जांबुळें देखोनि कुळकुळितें। हनुमान विचकी दांतातें। आंवळे न सेवीष हातें। कार्तिकव्रतें§ स्वीकारी ॥ १२ ॥ देखोनि उंबरें टेंबरें। बिल्वे विधामणें चारं बोरें। पिकलीं करवंदें नागरें[4]। मिटक्या वानरें देइजेति ॥ १३ ॥ तोरणें अळुवें मव्हकें घोंटीं। याळकें कांकड्या भरल्या पाटीं। मोहळें मधु देखोनि दाटी। लाळ घोटी वानर ॥ १४ ॥ भरले खर्बुजांचे भारे। देखोनि पिकलीं भोंकरें। उल्हास कीजे पैं वानरें। पुच्छ पुढारें नाचवित ॥ १५ ॥ देखोनिऽ साकरेची राशी। हनुमान खाजवी दोन्ही कुशी। कोण खाईल या गुळासी। नावदेसी[5] गटकावूं ॥१६॥ देखोनियां ऊंसपेरणी। वानर नाचे पैं रंगणीं। रसें देखोनि भरली मांदणी[6]। पुच्छ घाली त्यामाजी ॥ १७ ॥ त्या प्रक्षाळून निर्मळ जळीं। गुज सांगे पुच्छाजवळी। भेटलिया जनकबाळी। वनरवंदळी मग करूं ॥ १८ ॥ हनुमान पुच्छासीं करी एकांत। सीतेसी पुसोनि वृत्तांत। मग या फळांसी लावूं हात। तंववरी शांत त्वां असावें ॥ १९ ॥

---

१ दासींच्या मागून. २ मनसा चाधिगम्यताम् (मुद्रित रामायणे). ३ अवप्लुतो.

* डक्ष–रिघे. † सु. कां. १४।४(२), २(१). §हरिखाचा.

---

१ महाळुंगें. २ आनंदानें. ३ चावण्यास. ४ चांगली. ५ खडीसाखर. ६ रस ठेवण्याचें मृत्तिकापात्र.

¶ हनुमान. ‡ ड–आंबे, क्ष–अंबट. § व्रतधारी. ऽडक्ष–देखतां.

हनुमताचें प्राकारगमन—ऐसी सांगोनि निजखूण। वेगें करोनि उड्डाण। प्राकारावरी[1] जाण। हनुमान आपण वळंघला[2] ॥ २० ॥ अशोकवनामाझारीं। रावणाची शृंगारओवरी। उपराउपरी गोपुरी। हनुमान त्यावरी वळघला ॥ २१ ॥

तेथून दृष्टीस पडलेली रमणीयता—त्यावरी बैसोनि आपण। अवलोकी अशोकवन। नित्य वसंतें शोभायमान। सदासंपन्न फळपुष्पीं ॥२२॥ अशोकवनाचिया आंत। नित्य नांदे वसंत। सदा सफळित सर्व वृक्ष। देखे हनुमंत स्वानंदें ॥ २३ ॥

+शालानशोकान् भव्यांश्च चंपकांश्च सुपुष्पितान्।
उद्दालकान्नागवृक्षांश्चूतान् कपिमुखानपि ॥ ३ ॥

शाल तमाल तरु तमाळ। सरळ शोभा अति विशाळ। कर्णिकारी¶ पुष्प प्रबळ। अशोकी विशाळ विश्रांति ॥ २४ ॥ कपीत्थ[3] बिल्व चूत चंपक। पिचुमंद[4] नीप[5] शिंसिपक[6]। आवळी सालफळी मधुक। वृक्ष अनेक शोभती ॥ २५ ॥ नागचंपक वधाळक। मांदार कल्पतरू पारिजातक। फणस पाटल* नदानक। टवटवित† शोभती ॥२६॥

§राजतैः कांचनैश्चापि पादपैः सर्वतो वृताम्।
अशोकवनिकां सीतां प्रविवेश महाकपिः ॥ ४ ॥
मनोहरां नेत्रहरां सौगंध्यघ्राणहारिणीम्।
स ददर्श विहारं चैत्यप्रासादमुत्तमम् ॥ ५ ॥
धृतं स्तम्भसहस्रेण तं कैलासपाण्डुरम्।
प्रवालकृतसोपानं तप्तकांचनवेदिकाम् ॥ ६ ॥
गदापाणिभिरेकाग्रैरासीनैर्द्वारि राक्षसैः।
गुप्तद्वारां महाद्वारामनाधृष्यां सुरैरपि ॥ ७ ॥
सबलं तत्समावृत्य हनुमान् प्रविवेश ह ॥ ८ ॥

१ तटावर. २ चढला. ३ कवठीचा वृक्ष. ४ कडीनिंब. ५ कळंब. ६ अशोक.

+ वा. रा. सु. कां. १४।३. ¶ब—प. *ड—पाटल-नेटक, क्ष—पलवृक्ष पाटल तदक. † ड—वटवटित, क्ष—कौटविटक. § १४।४-८.

रजतवृक्ष कैलासगिरीं। रावणें प्रार्थोनि त्रिपुरारी। सार्द्रसुमनसुगंध भारी। अशोकामाझारीं रजतवृक्ष ॥ २७ ॥ विभांडोनि कुबेरनगरी। सुमनवृक्ष नानापरी। सुगंध न माये अंबरीं। अशोकामाझारीं रावण आणी ॥ २८ ॥ यक्ष राखितां सुगंधिनी। साद्रां सुवर्णकमलिनी। रावणें आणिलिया हिरोनि। अशोकवनीं घमघमिती ॥ २९ ॥ सुवर्णरजतवृक्षमेळीं। पुष्पें सुगंध पांढरीं पिवळीं। फळें स्वादिष्ट चवी आगळी। बीजरत्नावळी त्यांमाजी ॥ ३० ॥ तया बीजापासोनि पुढतीं। नव्हे वृक्षाची उत्पत्ती। एक वेळ फळें येती। मग शोभती नुसतींचि† ॥ ३१ ॥ ऐशिया वृक्षांचिया जाती। अशोकवनीं नेणों किती। शोभा स्वयें शोभती। उडे मारुति त्यांमाजी ॥ ३२ ॥ वृक्षशोभा देखिलियावरी। मन मूर्च्छित त्यामाझारीं। दृष्टि जावोनी विसरे बाहेरी। सुगंध हरी घ्राणातें ॥ ३३ ॥

व सुरक्षितता—ऐशिया वृक्षोवृक्षीं जाण। गदापाणि वीर दारुण। राक्षस§ ठेविले रक्षण§। पाहे कोण तयांकडे ॥ ३४ ॥ दुर्धर वृक्षांमाझारीं। हनुमान स्वइच्छा क्रीडा करी। राक्षसबळाची थोरी। तृणावारी गणीना ॥ ३५ ॥

तेथील देउळें व प्रासाद राक्षसांनीं सुरक्षित—अशोकवनीं देऊळ। रावण करी अति विशाळ। सहस्र स्तंभांचें प्रबळ। रत्नप्रवाळें मेखळा ॥३६॥ पाच पादुका माणिकें वरी। हिरे मुक्ताफळें हारोहारीं। कळस लखलखिती अंबरीं। तयांवरीं पताका ॥ ३७ ॥ सुवर्णवेदिका[1] दोहीं बाहीं। रत्नें जडलीं त्यांमाजी पाहीं। ओटंगणें ठायीं ठायीं। दिसे भुयीं¶ प्रतिबिंब ॥ ३८ ॥ नंदनवन चैत्रवन।

१ सोन्याचे ओटे.

† ब—नुसतेची. § बकड—रावणें. ¶ ब—भुई; क्ष—दीपभूमी मतीरुपा.

त्यांहूनि दिसे शोभायमान। आनंदवनेंसीं समान। कैलासभुवन तेंवी शोभे ॥ ३९ ॥ वनद्वारीं प्रासाद-द्वारीं। राक्षस सावधान शस्त्रास्त्रीं*। वारा यावया वाट नव्हे भीतरी। सुरासुरीं दुर्धर ॥ ४० ॥ बोट दाखवितां हात तोडी। डोळा दाखविल्या डोळा फोडी। दुर्धर राक्षसपरवडी[1]। कडोविकडीं[2] घर राखत ॥ ४१ ॥ लंकेप्रति आड सागर। पुढें दुर्ग अति दुर्धर। त्यामाजी रावणमंदिर। अति दुस्तर प्रवेशा ॥ ४२ ॥ त्याहीमाजी स्त्रियाचें भुवन। अतिशयेंसीं दुर्गम गमन। त्याच्यामाजी अशोक भुवन। दुर्गम गमन सुरासुरां ॥ ४३ ॥ दुर्गमीं रिघावया हनुमंत। अति दक्ष आणि समर्थ। हेम-रजतवृक्षांआंत। नि:शंक क्रीडत तें ऐका ॥ ४४ ॥ असो हा वनविचार। सीतादर्शनीं अति सादर। संमुख चालिला वानर। धरोनि सूत्र लक्षावें ॥४५॥

† तस्मिन्मलेन[3] सवीतां राक्षसीभिः समावृताम्।
उपवासकृशां दीनां भर्तुर्दर्शनलालसा[4] ॥ १८ ॥
ददर्श हनुमान् सीतां रुद्धा गजवधूमिव।
क्लिष्टैनकेन[5] सवीतां पीतेनोत्तरवाससाम्[6] ॥
ऊरुस्था जीर्णवस्त्रेण प्रतिच्छन्नकुचोदरी ॥

सीतेची अंतर्बाह्य स्थिती—वरीवरी सीता दिसे समळ। अंतरीं रामध्यानें निर्मळ। बाह्य अति चिंतें व्याकुळ। अंतरीं निश्चळ चिन्मय राम ॥४६॥ बाह्य उपवासें आक्षिप्त[7]। अंतरीं परमानंदें तृप्त। बाह्य दिसे बंदीं प्राप्त। आंत निर्मुक्त चहूं देहीं ॥ ४७ ॥ बाह्य रोडेली दिसे काष्ठ। अंतरीं रामनामें धष्टपुष्ट। बाह्य राक्षसा मानी दुष्ट। अंतरीं निर्दुष्ट आत्मा मानी ॥ ४८ ॥ बाह्य रामें दिसे वियुक्त। अंतरीं श्रीरामें नित्ययुक्त। बाह्य दिसे दु:खाभिभूत[1]। अंतरीं सदोदित स्वानंदें ॥ ४९ ॥ बाह्य दिसे हीन दीन। अंतरीं दिसे सुप्रसन्न। बाह्य दिसे अति खिन्न। अंतरीं चैतन्यचिन्मात्रज्योति ॥ ५० ॥ बाह्य दिसे लंके नेली। परी ते रामापासोनि नाहीं ढळली। बाह्य दिसे कोमेजली। अंतरीं टवटविली श्रीरामें ॥ ५१ ॥ बाह्य दिसे मलिनांबर। अंतरीं शोभे चिदंबर†। बाह्य दिसे अनलंकार। अंतरीं शृंगार श्रीरामें ॥ ५२ ॥ दिसे श्रीरामावेगळी। परी ते सबाह्य रामें रचिली। ऐसी देखोनि जनकबाळी। पिटिली टाळी हनुमंतें ॥ ५३ ॥

सीतेचें ठाणमाण—सीता अनुभवी रामचंद्रा। कैसेनि कळलें वानरा। श्रीरामें दिधली निजमुद्रा। तेणें कपींद्रा लक्षलें ॥५४॥ सांगतां सीतेचें लक्षण। श्रीरामें सांगितली जी जी खूण। त्याची स्थिती पाहतां जाण। देखे पूर्ण वानर ॥ ५५ ॥ ऐसें सीतेचें पूर्णपण। हनुमान लक्षी स्वयें आपण। बाह्य लौकिक लक्षण। दिसे तें चिन्ह अवधारा ॥ ५६ ॥ नियानाभोंवतीं[2] विवसी[3]। तैशा राक्षसी सीतेपासीं। खाऊं गिळूं घेऊं रक्तासी। देखे चौपासीं हनुमंत ॥ ५७ ॥ गजपतीचे चुकोनी। [4]पागडीमाजी पडे हस्तिनी। तैसी सीता अशोकवनीं। दीनवदनी दिसत ॥ ५८ ॥ नाहीं अभ्यंग ना स्नान। तेणें सर्वांग मलिन संपूर्ण। वस्त्र पीतांबर अति जीर्ण। नाहीं प्रावरण दुसरें ॥५९॥ कुचांसी उदर आच्छादोनी। दोनी गुडघे हृदयीं धरूनी। बैसली असे श्रीरामपत्नी। अनुदिनीं चित्तीं श्रीराम ॥६०॥ ध्यावया श्रीरामाची भेटी। आत्मा धरिलासे कंठीं। ऐसियापरी सीता गोरटी। देखे दृष्टीं हनुमंत ॥६१॥

१ राक्षसांचा समुदाय. २ अत्यंत सावधानतेनें. ३ मुद्रित रामायणे ततोमलिन. ४ नि:श्वसन्तीं पुनः पुनः. ५ क्लिष्टेनोभय. ६ पीतेनैकेन. ७ व्यापलेली.

* ब—सशस्त्री, ध—शस्त्रास्त्री.

† वा. रा. १५।१८, २२.

१ दु:खानें पीडलेली. २ ठेव्याभोंवतीं. ३ अवदसा. ४ सापळ्यात.

† ब—चिदांबर.

शांत व निर्भय वृत्ति–कराळ विकराळ दुष्ट नष्टी। भोंवत्या राक्षसींच्या कोटी। सीतेसी त्यांचें भय तुटी। निर्भय पोटीं श्रीराम ॥ ६२ ॥ जंव नाठवे श्रीरघुनाथ। तंवचि भयाचा आवर्त[1]। श्रीराम आठवल्या हृदयाआंत। भवभयार्थ मग कैचा ॥६३॥

नैषा पश्यति राक्षस्यो नेमान्पुष्पफलद्रुमान्।
एकस्थहृदया नूनं राममेवानुपश्यति ॥ २५ ॥
धारयत्यात्मनो देहं न दुःखेनावसीदति ॥
भर्ता नाम परं नार्याः शोभनं भूषणादपि ॥ २६ ॥

देखतां राक्षसी क्रूरदर्शन। सीता श्रीराम देखे संपूर्ण। वृक्ष वल्ली तृण पाषाण। देखे परिपूर्ण श्रीराम ॥ ६४ ॥ भय पावले भयाप्रती। सुख पावलें सुखावर्ती। ऐशिया निष्ठें सीता सती। देखे मारुति आनंदें¶ ॥ ६५ ॥ हृदयीं श्रीरामप्रतीती। श्रीराम देखे सर्वां भूतीं। भयामाजी निर्भयप्राप्ती। सीता सती स्वयें भोगी ॥ ६६ ॥ श्रीराम देखतां सर्वां भूतीं। सकळ भयासी समाप्ती। भय तें होय ब्रह्ममूर्ती। सुखसंवित्ती[2] श्रीरामें ॥ ६७ ॥

अखंड नामस्मरण, नाममहिमा–ऐसिया अनुभवेंसीं जाण। श्रीरामनाम मुख्य साधन। नामें निरसे जन्ममरण। नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ६८ ॥ नामापासीं विरक्ति शांती। नामस्मरणें* परम भक्ती। नामापासीं चारी मुक्ती। नामें निश्चितीं परब्रह्म ॥ ६९ ॥ नामासीं नाहीं स्नानबंधन। नाहीं नामापासीं विधिविधान। अबद्ध नाम अति पावन। नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७० ॥ नामें दूषण होय भूषण। नामें पापी अति पावन। नाम स्मरतां यम शरण। नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७१ ॥ नामासी नाहीं कर्मबंधन। वेगळ्या कर्मा नामस्मरण। अच्युतनामें कर्म पावन। हें स्मृतिवचन श्रुत्यर्थ ॥ ७२ ॥ नामा नाहीं अनध्यावो[3]। नामापासीं नित्य स्वाध्यावो[1]। नाम परब्रह्म स्वयमेवो। नाम निर्वाहो सभाग्य ॥ ७३ ॥ नाम चैतन्याचा मुद्दा। नाम परब्रह्माचा हुडा[2]। ब्रह्म नामाचिया पुढां। नाचे घडघडां स्वानंदें ॥ ७४ ॥ स्त्रियांसी रामनामस्मरण। तें भूषणाचें निजभूषण। अहेवपणा अहेवपण। नामें पावन स्त्रीशूद्र ॥ ७५ ॥ स्त्रियांसी गळसरी कृष्णमणी। पुरुषां गळसरी नामस्मरणी। ते तुटलिया रांडपणीं। काळकर्मणी करावी ॥७६॥ सीतेसी श्रीराम स्वधर्म। सीतेसी श्रीराम नित्यकर्म। सीतेसी भ्रतार श्रीराम। राम परब्रह्म सीतेसी ॥ ७७ ॥ श्रीरामनाम स्मरतां सीता। देहीं वर्ते विदेहता। भय न मानी लंकानाथा। हेंही हनुमंता कळों[3] सरलें[3] ॥ ७८ ॥ श्रीरामनामांकित सीतापत्नी। भूषणा भूषण शिरोमणी। नामें निःशंक अशोकवनीं। अनुदिनीं निर्द्वंद्व ॥ ७९ ॥

हनुमताला भेटीची उत्सुकता:–ऐसी देखोनि जनकबाळी। हनुमान भेटीसी तळमळी। कराळा राक्षसींच्या किंकाळी। देखोनि जवळी शंकला ॥८०॥

†रामस्य महिषीं देवीं लक्ष्मीनारायणस्य च।
न शक्या प्रसभं द्रष्टुं राक्षसीसंनिधौ मया ॥ १९ ॥
शंकेयुर्हि राक्षस्य: कार्यनाशस्ततो भवेत्।
कार्यतत्त्वमविज्ञाय विक्रमो मे भवेद् वृथा ॥ १७ ॥

जैसी नारायणाची रमा। तैसी सीता श्रीरामा। तिची भेटी घेतां आम्हा। राक्षसी अधमा प्रतिबंध ॥ ८१ ॥ यांदेखतां भेटी घेतां। या मज झोंबती सर्वथा। यांच्या मी करितां घाता। रावण सीता वधील ॥ ८२ ॥ वधिलिया रामकांता। माझे कष्ट जाती वृथा। म्या मारिलिया लंकानाथा। सुख रघुनाथा उपजेना ॥ ८३ ॥

१ भोंवरा. २ सुखाचा अनुभव. ३ अनध्ययनाचा दिवस.

† वा. रा. १६।२५,२६

¶ब–स्वानंदें. *ब–स्मरण; अ–स्मरणी.

१ अभ्यासाचा दिवस. २ किल्ला. ३ समजलें, कळून चुकलें.

† प्रवृध्या जनकात्मजाम् ॥

म्हणून सर्वतो निद्रा येई पावेतों थांबणेचा निश्चयः– यालागीं आपण तत्वतां। जंव राक्षसी होती निद्रिस्ता। तंव वृक्षीं राहूं गुप्तता। एकांतीं¶ सीता जंव भेटे ॥ ८४ ॥ ऐसें स्वयें विचारून। हनुमान वृक्षीं होय[१] लीन[१]। जैंवी कां चपळ पवन। होय सुलीन आकाशीं ॥ ८५ ॥ जैंवी अभ्रामाजी भास्वत[२]। स्वयें असे* अति गुप्त। तेंवी वृक्षांमाजी हनुमंत। सावचित गुप्तत्वें ॥ ८६ ॥ जैंवी आत्मा हृदयाआंत। असोनि न देखती समस्त। तेंवी वृक्षीं हनुमंत। अति गुप्त राहिला ॥ ८७ ॥ जैंवी का वेदींचा वेदार्थ। असोनि कोणा नव्हे व्यक्त। तेंवी वृक्षीं हनुमंत। अति गुप्त राहिला ॥ ८८ ॥

अरुणोदय वेळा व वर्णन– वृक्षीं राहतां मारुती। जाहली अरुणोदयप्राप्ती†। गौळी दोहावा करिती। गोपी आरंभिती गोरसमंथन ॥ ८९ ॥ वेदपाठक वेदाध्ययनीं‡। राजद्वारीं मंगळध्वनी। ललितगंधर्वगायनीं। जयजयध्वनि देवद्वारीं ॥ ९० ॥ अग्निहोत्रिहोमाज्यगंध। उन्मत्त गजाचा मदगंध। शुद्ध सुमनांचा सुगंध। सुधूपगंध देवालयीं ॥९१॥ नेसली प्रिया काळिमागुंथी[३]। सोडोनि पीतांबर दे पती। तेंवी अंधार त्यजोनि राती। दे गभस्ती पीतप्रभा ॥ ९२ ॥ झाली सूर्योदयप्राप्ती। व्यवहार पर त्रिजगती। निशाचरें लीन होती। सुखसंभूती दिवाचरां[४] ॥ ९३ ॥ हनुमंताचे निजचित्तीं। एकांतीं भेटावी सीता सती। अति शीघ्र व्हावी राती। वृक्षांतरवर्ती तिष्ठत ॥ ९४ ॥

§हनुमानपि सहृष्टः सीतासंभाषणोत्सुकः।

सूर्यास्तमानमाकांक्षः तस्थौ वृक्षान्तरे स्थितः ॥१८॥

हनुमताची उत्सुकता व सूर्याचें अस्तगमन– ऐसें हनुमंतें धरितां चित्तीं। श्रीरामकार्याचे निजस्वार्थी। कपीस भेटावया सीता सती। गेला गभस्ती अस्तमाना ॥ ९५ ॥ जैसी श्यामसुंदर बाळी। लेइली मोतीयांची जाळी। तैशा नक्षत्रांच्या ओळी। नभोमंडळीं शोभती ॥ ९६ ॥ रात्री नव्हे ते सखी हनुमंता। भेटावया श्रीरामकांता। दोघां संवाद गुप्तकथा। साधूं एकांता आली असे ॥ ९७ ॥ भेटावया सीता स्वामिनी। रात्री नव्हे ती सखी जननी। जानकीसंवादपान्हा पाजूनी। समाधानी बैसवील ॥९८॥ संवादपान्ह्याचे तुष्टपुष्टीं। अखया[१]-क्षयासी करी भेटी। इंद्रजिताची पुरवोन पाठी। राक्षसकोटी गांजील ॥ ९९ ॥ रात्री नव्हे ते महाकाळी। येवोन हनुमंताजवळी। भेटवोनि जनकबाळी। करील होळी लंकेची ॥ १०० ॥ रात्री नव्हे ते सप्तशती। शुंभनिशुंभां केली समाप्ती। आतां येवोनि हनुमंताप्रती। करील शांती राक्षसां ॥ १ ॥ रात्री नव्हे ते चामुंडा। धरोनि काळिमेचे वळवंडा। छेदावया रावणाच्या मुंडा। कपी प्रचंडा भेटो आली ॥ २ ॥ रात्री नव्हे ते काळरात्री। प्रवेशोनि कपींद्रीं। रिघोनियां लंकेमाझारीं। करील बोहरी राक्षसां ॥ ३ ॥ ऐसी देखोनियां राती। रावणा आठवे सीता सती। जाली विरहज्वरप्राप्ती। सीता कामार्थी सकाम ॥ ४ ॥

†दिव्यमाल्यांबरधरो वैदेहीमनुचिन्तयन्।

न शशाकात्मनः काममागत विनिगूहितुम्।

भृश नियुक्तस्तस्या हि मदनेन मदोत्कटः ॥

ऐसी देखोनियां राती। आनंदें उल्हासे मारुती। पुढील कथेची अनुवृत्ती[२]। सावध श्रोतीं परिसावी ॥ ५ ॥

---

१ लपून बसला. २ सूर्य. ३ अंधकाररूप आच्छादन. ४ मनुष्यप्राण्याना.

¶ क्ष–एकांती भेटी सीतादेवी. * क्ष असोनि. † क्ष–व्याप्ती. ‡ डक्ष–वेदध्वनी. § वा. रा.

१ अखया नावाच्या रावणपुत्राचा वध.
२ अनुसधान.

† वा. रा. २०।४, ९.

रावणाची मनःस्थिति, सीतेचें चिंतन–वस्त्राभरणीं भूषित। दिव्य चंदनअगरुलिप्त। सीताकामें लंकानाथ। पुष्पसेजेआंत तळमळी ॥ ६ ॥ जैसे का खदिरांगार। तैसा लागे सुमनसेजार[१]। सुमनमाळा पोळी जिव्हार ¶। चंदनें शरीर तप्त होय ॥ ७ ॥ नावडती भोगोपचार। नावडे वीणातंती मधुर। नावडे स्त्रियांसी सेजार। नावडे मधुर रसपान ॥ ८ ॥ जैसी देखिली स्वयंवरीं। तैसी आठवली सीता सुंदरी। शेंदूरचर्चित भांग शिरीं। चांफेगोरटी सुकुमार ॥ ९ ॥ कमलनयन कमलवदन। टाणमाण गुणलक्षण। आठवितां घनस्तन। मूर्च्छापन्न रावण ॥ १० ॥ नावडे दुजयाचा संचार। नावडे गायन सुस्वर। सीतेनें झडपिला[२] दशशिर। भूतसंचार जानकी ॥ ११ ॥ सीता लागली महद्भूत। जीवें घेईल लंकानाथ। झाडणी भरणी न चले तेथ। सांडणीची मात* मानीना ॥ १२ ॥ आवरूं न शके निजचित्त। सीता लागली तिहीं अवस्था†। धीर न धरवे लंकानाथा। सकामता विव्हळ ॥ १३ ॥ सीताकामें कामातुर। त्यजिली शय्या स्त्रीशेजार। अल्पही होतां सचार। कोपे दुर्धर सेवकीं ॥ १४ ॥ ब्रह्मा वेद पढे घडघडाट। पढती नित्य शांतिपाठ। त्यांसी वारिती राजभाट। मौननिष्ठ राहा स्वामी ॥ १५ ॥

ब्रह्मन्नध्ययनस्य नैव समयस्तूष्णीं बहिः स्थीयतां
स्वल्पं जल्प बृहस्पते जडमते नैषा सभा वज्रिणः।
वीणां संहर नारद स्तुतिकथालापैरलं तुंबर
सीतारल्लकभल्लभग्नहृदयः स्वस्थो न लंकेश्वरः ॥१॥

सर्वत्र शांतता प्रस्थापित–दूत म्हणती बृहस्पती। वृथा बडबड करिसी किती। जल्पसी इंद्रसभेप्रती। तैसी वदंती[३] न करावी ॥ १६ ॥ नारदा वीणा आंवरीं। तुंबरा आलाप पुरे करीं। रावणा स्वस्थता नाहीं शरीरीं। नाचणी[१] दूरीं दवडाव्या ॥ १७ ॥ भाटीं गर्जावें ना बाहेरीं। ब्रीदें[२] पढावीं ना कैवारीं। उगें रहावें समर्थी। रावणशरीरीं अति व्यथा ॥ १८ ॥ दूत ब्रह्मयातें नमस्कारिती। समयो नव्हे अध्ययनाप्रती। कोण व्यथा लंकापती। पुसे प्रजापति दूतांसी ॥ १९ ॥

रावणाची अस्वस्थता–दूत म्हणती हे गुप्त मात। प्रकट करों नये लोकांआंत। तुमचा समर्थ वचनार्थ। ऐका वृत्तांत व्यथेचा ॥ २० ॥ सीतेचा भांग शेंदूराचिंत। तोचि भाला धगधगित। रुतला रावणाचे हृदयाआंत। तेणें अस्वस्थ लंकेश ॥ २१ ॥ जानकीकामें रावण भ्रांत। सर्वथा नेणे निजस्वार्थ। हित सांगे त्याचा करी घात। सीतासन्निध लंकेशा ॥ २२ ॥ ब्रह्मवंशज लंकानाथ। न सांगावा जानकीमुख्यार्थ। करूं धांवेल अति अनर्थ। सीतासन्निपात रावणा ॥ २३ ॥ ऐसा सांगतां एकांतगोष्टी। अशोकवन लक्षोनि दृष्टीं। रावण कामक्षोभें उठी। सीता गोरटी देखावया ॥ २४ ॥ चारी महिने म्यां सीता। अशोकवनीं ठेविली वृथा। बळेंचि भोगीन मी आतां। म्हणोनि सकामता ऊठिला ॥ २५ ॥

सीतेकडे जाणें; स्त्रियांचा परिवार–कामोन्मत्त चाले लंकापती। सवें योषिता[३] शतानुशतीं। सुवर्णदीपिका घेवोनि हातीं। तैल सिंचिती सुगंध ॥ २६ ॥

अशोकवनिकामेव विवेश बलवाहनः।
अंगनाशतसंयुक्तं व्रजंतं च समन्वयुः ॥ २२ ॥
क्षीबो विचित्राभरणः शंकुकर्णो महाबलः।
जगाम मदनोन्मत्तो दशग्रीवोऽतिविह्वलः ॥ २३ ॥
कांचनदीपिकाश्चित्रा जगृहुस्तत्र योषितः।
गंधतैलाभिषिक्ताभिः ध्रियमाणाभिरग्रतः ॥ २४ ॥
द्वारदेशमनुप्राप्तं ददर्श हनुमान् कपिः ॥ २५ ॥

१ फुलांची शेज. २ झपाटला. ३ बडबड.

¶ वक–जव्हार. * वक–सांडणी, चित्त. † क्ष–हनुमता.

१ कळावंतिणी. २ बिरुदें, कीर्ती. ३ स्त्रिया.

‡ डबक–समुद्री.

कनकदंडें युक्त माणिकीं । शशांकच्छत्रें धरिलीं एकीं । व्यजनें[1] वारिती अनेकी । विडिया कितेकी देताती ॥ २७ ॥ कांसे पाटोळा नीळांबर । त्यावरी कटिसूत्र कटार । किंकिणीज्वाळमाळा विचित्र । ब्रह्मसूत्र सांगद ॥ २८ ॥ मुकुट कुंडलें अलंकार । मणिमुक्तामाळा नीळहार । वांकी अंदुवांचा गजर । चरणीं तोडर श्रीदांचा ॥ २९ ॥ सुगंध चंदनाची उटी । पदकें शोभती दशकंठीं । खड्ग वसवोनि[2] मुष्टीं । सीताभेटी चालिला ॥ १३० ॥ चालिला अशोकवनाप्रती । सवें स्त्रिया नेणों किती । एक दीपिका दाविती । वळी ये म्हणती पैं एकी ॥ ३१ ॥ दडपती द्राक्षाचीं आळीं । खचती नागवेलीपाळी । लखलखिती¶ सोनकेळी । वरिल्या पौळी चालिला ॥ ३२ ॥ देखोनि वनकरांचा थाट । स्त्रिया चालती घडघडाट । लवोन वृक्ष होती सपाट । स्पर्शे दुष्ट स्त्रियाचा ॥ ३३ ॥ स्त्रियांच्या स्पर्शातळीं । वाटिका वाळती समूळीं । वृक्ष झडती पुष्पीं फळीं । वरिल्या पौळीं चालिला ॥ ३४ ॥ दीपिकातेजाचे कडाडीं । वृक्षां होईल फळपानझडी । अमृतवल्ली तडातडी । रोपें रोकडीं जळतील ॥ ३५ ॥ स्त्रिया आघातें मोडती चांफे । मोडती हेमकमळिणीवाफे । वरिलें‡ पौळीचे साटोपें । सीतेसमीप तो आला ॥ ३६ ॥

रावणाचे आगमनानें हनुमंताचा कोप–रावण येतां सीतेप्रती । कोप हनुमंताचे चित्तीं । वृक्षीं सरसावला मारुती । लंकापतीतें घुमसावया ॥ ३७ ॥ रावण झोंबतां सीतेसीं । बांध नेतां रामापासीं । सांगों जातां सुग्रीवासी । लाजेल मजसीं पुरुषार्थे ॥ ३८ ॥ हेंचि वानरें सांगों जातां । हनुमान म्हणे नपुंसकता । घायें मारीन लंकानाथा । न पुसतां श्रीरामासी ॥ ३९ ॥ मजदेखतां श्रीरामभाजा । गांजों जातां राक्षसराजा । दाही शिरें वीस भुजा । घायें पूजा करीन मी ॥ १४० ॥

पचोन्मत्त रावणाचे वर्तनावरून पुढील उपक्रम–आधींच न करावा घात । सीतेपासीं लंकानाथ । कैसी कैसी बोली बोलत । तो वृत्तांत ऐकों पां ॥ ४१ ॥ सीता अनुसरली रावणासी । हे तों न घडे कदा काळेंसीं । जरी हा भोगील बळेंसीं । तरी मी यासी धुमसीन[1] ॥ ४२ ॥ मानोन्मत्त पानोन्मत्त । राज्योन्मत्त बळोन्मत्त । ज्ञानगर्वें ज्ञानोन्मत्त । पचोन्मत्त रावण ॥ ४३ ॥ पंचोन्मत्त अति उन्मत्त । यालागीं त्यातें क्षीब[2] म्हणत । सीताकामें अति भ्रांत । भ्रमोन्मत्त रावण ॥ ४४ ॥ यापरी अशोकवनाआंत । लंकानाथ आणि हनुमंत । साधूं पाहती निजस्वार्थ । तो कथार्थ अवधारा ॥ ४५ ॥ आधींच गोड रामायण । श्रीरामाचें चरित्र गहन । त्याहीमाजी हनुमंतकथन । गोड निरूपण अवधारा ॥ ४६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणाशोकवनाभिगमनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ १४६ ॥ श्लोक ॥ १ ॥ एवं ॥ १४७ ॥

## अध्याय ८ वा

रावणाच्या आगमनानें झालेली सीतेची स्थिति–श्रीरामचंद्राय नमः ॥ ॥ पूर्वप्रसंग संपतां तेथ । रावण होऊनि पचोन्मत्त¶ । येवोनि अशोकवनाआंत । सीता पाहत भोगेच्छा ॥ १ ॥

†तस्मिन्नेव ततः काले राजपुत्री त्वनिंदिता ।
[1]मलसदिग्धसर्वांगीमासीना धरणीतले ॥ १ ॥
ततो दृष्ट्वा च वैदेही रावणं राक्षसेश्वरम् ।
प्रावेपत वरारोहा कदलीवानिलाहता ॥ २ ॥

१ पंखे. २ घेऊन.

¶ घ–खळखळितीं, ख–खदली, ड–खदळ. ‡ ब–विरळा पौळीचे साटोपे.

१ रगडीन, मारीन. २ उन्मत्त.

¶ पचोन्मदीं उन्मत्त.

† वा. रा. सु. कां. १९।१, ५, २, ३.

प्रच्छाद्योदरमूरुभ्यां बाहुभ्यां च पयोधरौ ।
आच्छादयती सव्रीडा पीतस्यांतेन वाससः ॥ ३ ॥

रावणें ऐसी देखिली सीता । कंपायमान अति भयार्ता । जैवीं कदली[1] वायुघाता । श्रीरामकांता तैंवी कांपे ॥ २ ॥ देखोनियां दशानन । ऊरुउदर बाहुभूषण । पीतांबर अति जीर्ण । तेणेंचि आपणा आच्छादी ॥ ३ ॥ पीतांबर तो अति जीर्ण । तेणें अवयव आच्छादून । जानकी अति लज्जायमान । अधोवदन राहिली ॥ ४ ॥ नाहीं अभ्यंग ना स्नान । सर्वांग मलिन मळकण । नाहीं आच्छादन आस्तरण । नाहीं आसन बैसावया ॥ ५ ॥ सीता धरणिजा[2] आपण । धरासनीं सुखसंपन्न । बैसली असे सावधान । लज्जायमान दशवक्त्रा ॥ ६ ॥

अंतरीं सतत रामचिंतन—धनलोहीं[3] खतेली[4] असे । तीमाजी निजनिधान वसे । सीता बाह्य मलिन भासे । अंतरीं वसे श्रीराम ॥ ७ ॥ सीता बाह्य भासे भयमान । अंतरीं निःशंक सावधान । हें नेणोनि दशानन । करी प्रार्थना भोगार्थ ॥ ८ ॥

†स ता परिवृतां दीनां निरानन्दा तपस्विनीम् ॥ १ ॥
साकारैर्मधुरैर्वाक्यैर्न्यदर्शयत रावणः ॥ १ ॥
मां दृष्ट्वा नागनासोरु गूहमाना स्तनोदरम् ।
अदर्शनमिवात्मानं भयान्नेतुं त्वमिच्छसि ॥ २ ॥
रमेयं त्वां विशालाक्षि भर्ता मन्यस्व मां प्रिये ।
त्वां समासाद्य वार्रोगी रूपयौवनशालिनीम् ।
करते राम महाबाहू राममोह विसर्जय ॥
वन्हीनामुत्तमस्त्रीणा ममाग्रमहिषी भव ॥ १६ ॥

रावणाचें भाषण, आत्मश्लाघा, रामनिंदा—स्वमुखें

रावण म्हणे सीते । मज भिऊं नको प्रियकांते । मज देखोनि निजांगातें । वृथा आपणियातें गुप्त करिसी ॥ ९ ॥ मी प्रार्थितों दशानन । मजला व्हावें सुप्रसन्न । सकळ लज्जेसी सांडोन । सुखसंपन्न रम मजसी ॥ १० ॥ सांडीं श्रीरामाची आस । हे घे माझी सत्य भाष । मज तुज जालिया आश्लेष[1] । भोगीं अशेष निजराज्य ॥ ११ ॥ ऐशींसहस्र माझ्या नारी । तयांत मुख्य जे कां मंदोदरी । तुझी करीन ते किंकरी । अवघ्यांवरी तूं श्रेष्ठ ॥ १२ ॥ इंद्रादिक देव समग्र । तुझे करीन वो किंकर । मीही होईन आज्ञाधर । साक्ष शंकर प्रमाण ॥ १३ ॥ स्वर्गमृत्युपाताळींची । संपत्ति आणिली त्रिभुवनींची । तेही अर्पीन मी तुजची । घे आमुची निजभाक ॥ १४ ॥ सवेग मलिनांबरें फेडीं । माझीं दिव्यांबरें वेढीं[2] । सांडोनि श्रीरामाची ओढी । भोगीं आवडीं तूं मज ॥ १५ ॥ मस्तक दिसताहे मलिन । करीं जवादीचें[3] मंगळ स्नान । तुज मी चर्चिन चंदन । घनस्तन निववावया ॥ १६ ॥ रत्नजडित अलंकार ।¶ रत्नकुंडलें पदक हार । कंकणें बाहुवटे मनोहर । अर्धचंद्र रत्नांचे ॥ १७ ॥ सहित किंकिणीज्वाळमाळा । कटीं विराजे मेखळा । वांकी अंदुवांचा खळाळा । कळिकाळा भिऊं नको ॥ १८ ॥ तुझें देखोनि रूप यौवन । ब्रह्मा पडे मूर्च्छापन्न । माझें उतावेळ मन । दे आलिंगन जानकी ॥ १९ ॥ त्रिदशां[4] न खालवीं मान । तो मी येतों लोटांगण । तुझे धरितों चरण । पाणिग्रहण करीं सीते ॥ २० ॥ कुंभकर्ण द्वारवंटेकर[5] । इंद्रजित करीन फुलधर । अखयादि समग्र कुमर । करीन किंकर आज्ञांकित ॥ २१ ॥ मंदोदरी स्वयें आपण । नित्य करील चरणक्षालण । मी करीन संवाहन । अंगस्पर्शनसुखार्थ ॥ २२ ॥ तुझा अंगस्पर्श सहज । घडावया भाग्य कैंचें मज । माझी सांडोनियां लाज । भोगीं

१ केळ. २ भूमिकन्या. ३ द्रव्य ठेवण्याची लोखंडी पेटी. ४ गजलेली.

† वा. रा. सुं. का. २०.

१ आलिंगन. २ परिधान कर, नेस. ३ कस्तुरीचें. ४ देवांना. ५ सेवक.

¶ व–फरा ( कुडलें ).

निर्लज्ज भोग माझे ॥२३॥ सिद्ध कामगविमानीं[१]। दोघें एकत्र बैसोनी। चैत्रवनीं नंदनवनीं। अशोकवनीं क्रीडूं पैं ॥ २४ ॥ सांडोनियां श्रीरामचंद्र। माझा करीं अंगीकार। राम बापुडें कोण किंकर। मजसमोर यावया ॥ २५ ॥

+किं करिष्यसि रामेण सुभगे चीरवासिना।
निक्षिप्तविजयो रामो गतश्रीर्वनगोचरः ॥ ८ ॥
जटी स्थण्डिलशायी च शङ्के जीवति वा न वा।
न च वैदेहि वै राम श्रोतुमप्युपलप्स्यसे ॥ ९ ॥
न चापि मम हस्तात्त्वां प्राप्तुमर्हति राघवः।
न रामस्तपसा सीते न बलेन पराक्रमैः ॥ १० ॥
न धनेन मया तुल्यस्तेजसा यशसाऽपि वा।
पिब विहर रमस्व भुङ्क्ष्व भोगान् धनानि च ॥ ११ ॥

राम बापुडें तें किती। तूं कां त्याची करिसी खंती[२]। ऐक त्या रामाची स्थिती। ते मी तुजप्रती सांगेन ॥ २६ ॥ वनवासी चीरवासी। अन्नावीण तो उपवासी। काय तूं त्यातें भोगिसी। भोगीं मजसीं त्रिविध भोग ॥ २७ ॥ गतविजयो श्रीरामचंद्र। गतश्रीक वनगोचर। त्यासी तूं काय भोगिसी सुंदर। भोगीं निरंतर भोग माझे ॥२८॥ रामासी नाहीं शौर्यसाटोप*। स्त्री हारविली अल्पतप। नाहीं परमकर्मप्रताप। धैर्यही स्वल्प श्रीरामा ॥ २९ ॥ धैर्यें राम निधडा[३] असता। तरी कां स्त्रीलागीं रडत पडता। झाडोझाडीं कां खेंव[४] देता। सीता सीता म्हणोनि ॥ ३० ॥ नाहीं धैर्य मजसमान। नाहीं राज्य मजसमान। नाहीं मजसीं समान धन। हीन दीन श्रीराम ॥ ३१ ॥ नाहीं यश मजसमान। नाहीं समान सेनाधन। न चले मजसीं आंगवण। हीन दीन श्रीराम ॥ ३२ ॥

१ इच्छित मार्गी जाणाऱ्या विमानात. २ दुःख. ३ पराक्रमी. ४ आलिंगन.

+ सु. कां. २०।२५–२८, ३३
* ब–शौर्यसाटोपु.

नाहीं ज्ञान मजसमान। स्त्री हारविली अपेश गहन। वनोवनीं करी रुदन। हीन दीन श्रीराम ॥ ३३ ॥ श्रीरामाची कथावार्ता। तुज मी ऐकों नेदीं सर्वथा। मजपासुनि सुटलिया आतां। केंवी रघुनाथा पावसी ॥ ३४ ॥ व्यर्थ जातें तुझें यौवन। तें तंव न ये वो परतोन। सेजे भोगीं दशानन। सुखसंपन्न तूं होसी ॥ ३५॥ परदारा स्वयें भोगितां। पाप लागेल लंकानाथा। राक्षसांची स्वधर्मता। ऐक आतां जानकीये ॥ ३६ ॥ आम्हीं हरोनि परनारी। बळेंचि भोगाव्या निजघरीं। परराज्याची थोरी। बळेंचि करीं हरावी ॥ ३७ ॥ देव दैत्य दानव मानव। बळेंचि विभांडोनि[१] सर्व। स्त्रियादि अपूर्व वैभव। आम्हीं स्वयमेव भोगावें ॥ ३८ ॥ आग्रह सांडोनि आपुला। सीते ऐक माझ्या बोला। राम अति दुःखें निमाला[२]। प्राण दिधला लक्ष्मणें ॥ ३९ ॥ राम लक्ष्मण आहे कीं नाहीं। हा संदेह फिटला पाहीं। सुखें अनुसरें माझे ठायीं। म्हणोनि पायीं लागला ॥ ४० ॥ तुझी भीड म्यां धरिली भारी। राखिलीसे षण्मासांवरी। आतां भोगीन बलात्कारीं। अंगीकारीं मज सीते ॥ ४१ ॥ आणा पालखी धरा छत्र। सीतेनें वरिला दशवक्त्र। निशाणें त्राहाटा रे सर्वत्र। करा गजर वाद्यांचा ॥ ४२ ॥

सीतेचा रोष–ऐसें रावणाचें वचन। सीतेनें टाकिलें उपेक्षून। गजापासीं भुंके श्वान[३]। दशानन तेंवी भुंके ॥ ४३ ॥ देखोनि उत्तम पक्वान्न। स्वयें वसवसिजे श्वान। रावण दहा तोंडाचें शुन[३]। सीतेकारणें वसवसी ॥ ४४ ॥ देखोनि वहीं भाताचा गोळा। झडपूं धांवे जेंवी कावळा। तेंवी देखोनि जनकबाळा। रावण काळा डोंबकाग ॥ ४५ ॥

†तस्य तद्वचनं श्रुत्वा तदा रौद्रस्य रक्षसः।
सचिंत्य राम वैदेही पतिमेव पतिव्रता ॥ १२ ॥

१ पराभव करून. २ मरण पावला. ३ कुत्रें.

† सु. कां २११।१–५, ७.

तृणमंतरत[1] कृत्वा प्रत्युवाच शुचिस्मिता ।
निवर्तय मनोन्मत्त, स्वजने क्रियतां मनः ॥ १३ ॥
न मां प्रार्थयितुं शक्तस्त्वं सिद्धिमिव पापकृत् ।
अकार्यं न मया कार्यमेकपत्न्या विगर्हितम् ॥१४॥
एवमुक्त्वा तु वैदेही रावणं तं तपस्विनी ।
राक्षसं पृष्ठतः कृत्वा भूयो वचनमब्रवीत् ॥१५॥
यथा तव तथाऽन्येषां रक्ष्या दारा निशाचर ।
आत्मानमुपमां कृत्वा स्वेषु दारेषु रम्यताम् ॥१६॥

रावणा देखोनियां सीता । अल्पही बाधा न बाधे चित्ता । बैसली असे निःशंकता । श्रीरघुनाथाचेनि नेटें ॥ ४६ ॥ सीता पतिव्रता आपण । सबाह्य श्रीराम परिपूर्ण । हें स्मरणेंवीण नित्यस्मरण । मानी रावण तृणप्राय ॥ ४७ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । प्रलोभयुक्त समाधान । साधूपुढें भुंके श्वान । तत्समान मानी सीता ॥ ४८ ॥ जेंवी दहा तोंडांचें घुवड । तैसी रावणाची बडबड । ते सीतेसी न लागे गोड । तद्विधि चाड अपवित्र ॥ ४९ ॥ आमिषालागीं[1] तळपे मासा । परदाराभोगीं रावण तैसा । श्रीरामबाणाचा पडेल फांसा । हें लंकेशा लक्षेना ॥ ५० ॥ कामसर्प लागला रावणासी । कडू परदारा गोड होय त्यासी । लहरी येतां रामबाणेंसीं । क्षणार्धेंसीं निमेल ॥ ५१ ॥ असो हें सावधान सीता । लोकलज्जेच्या लौकिकार्था । आडकाडी करोनि हाता । लंकानाथा शिकवितसे ॥ ५२ ॥

सीतेचें उत्तर, रावणाला धिक्कार, अधिक्षेप—

जन्मोनि ब्रह्मयाचे वशीं । रावणा भाग्यें वेद[2] विभागिसी[2] । तो तूं परदारा अभिलाषिसी । वृथा मरसी अधमें ॥ ५३ ॥ जेंवी अशुची विकल्पवंता । ऋद्धि सिद्धि नये हाता । तेंवी मी सती श्रीरामकांता । तुज लंकानाथा अपवित्रा ॥ ५४ ॥ साळी भोज्य त्या शुकासी । सांडोनि जातां नाळीसी । तें फळ भक्षूं म्हणतां त्यासी । चंचुभंगेंसीं तळमळी ॥ ५५ ॥ तेंवी तूं त्यजूनि स्वदारा । भोगूं जातां परदारा । दुःखी होशील गा दशशिरा । बाणधारा श्रीरामाच्या ॥ ५६ ॥ तुझ्याचि स्त्रिया लंकानाथा । स्वइच्छें परपुरुषासीं रमतां । त्यांची तुज न मानें पवित्रता । दोहींच्या घाता तूं करिसी ॥ ५७ ॥ तेंवी मी श्रीरामाची कांता । तुजसीं बोलणें अपवित्रता । कैंची अंगसंगाची कथा । मरसी वृथा अभिलाषें ॥ ५८ ॥ आत्मौपम्येन[1] सर्वत्र । जो पाहे तो ज्ञाता नर । जैसी रक्षावी स्वदार । तैसी परदारा संरक्षीं ॥ ५९ ॥ म्हणसी श्रीराम जरी दूरी । परी तो तुज मजमाझारीं । नांदताहे निरंतरीं । त्याचि चोरी चालेना ॥ ६० ॥ भोईभेणें जो पळोनि जाये । जिकडे पाहे तिकडे भोये । तैसाचि श्रीराम माझा पाहे । सबाह्य आहे परिपूर्ण ॥ ६१ ॥ त्यासीं न चले चोरी मारी । तयाची भोगितां पैं नारी । घसा निवटील[2] सेजेवरी । संसारा उरी उरों नेदी ॥ ६२ ॥ मजपासोनि न सुटे सीता । ऐसें बोलसी तें वृथा । रामें गिळिलासी लंकानाथा । सबाह्यता निवटोनि ॥ ६३ ॥ जोचि भोग स्वदारेंसीं । तोचि भोग परदारेंसीं । एकें पाविजे स्वधर्मासी । एकें नरकासी जाइजे ॥ ६४ ॥ जो भोग सूकरासूकरींसीं । तो भोग इंद्राउर्वशीसीं । भोग समता सर्वांसी । परदारेपासीं अधःपात ॥ ६५ ॥ हित सांगे ते दशशिरा । सुखें भोगावी स्वदारा । मज अर्पावें श्रीरामचंद्रा । कुळगोत्ररक्षणार्थ ॥ ६६ ॥ परदारा ते तंव माता । सकळ संमत वेदशास्त्रार्था । मातृगामी परदारभोक्ता । अधःपाता जाशील ॥ ६७ ॥ ऐसें बोलोनि सीता सुंदरी । रावण महापापी भारी । त्याचें अवलोकन न करी । जाली पाठमोरीं

---

१ गळाला लावलेल्या मासासाठीं. २ वेदांचीं खंडें केलीस.

१ आपल्याप्रमाणें. २ छेदील.

जानकी ॥ ६८ ॥ सीता होतांचि विमुख। जालें रावणा परम दुःख। क्रोधलोभशांतवनपूर्वक¶। दशमुख अनुवादे[१] ॥ ६९ ॥

† सीतायास्तद्वचः[२] श्रुत्वा प्रकर्षं राक्षसेश्वरः ।
प्रत्युवाच ततः सीतां विप्रियं प्रियदर्शनाम् ॥१७॥
भाषसे परुषाण्येव विश्रब्धं गतसाध्वसा ।
न युक्तं परुषं वक्तुमीश्वरे ह्यप्रियाणि च ॥ १८ ॥
जनस्य विहितो मध्ये प्रभविष्णोर्विशेषतः ।
यादृशोऽयं मम क्रोधो यथा च त्वमवस्थिता ॥ १९॥
वधाय विसृजेयं त्वां स्त्रीभावेनाभिसार्यते ।
शमियच्छति मे क्रोधं त्वयि कामः समुच्छ्रितः॥२०॥

रावणाचा क्रोध व सीतेला धमकी—ऐकोनि सीतेचें दुष्ट चिन्ह। क्रोधाविष्ट दशानन। सर्वांगेंसीं कंपायमान। काय आपण बोलत ॥ ७० ॥ मी तव स्वयें राक्षसराजा। देव दानव माझ्या प्रजा। दुष्ट वचनें अपमान माझा श्रीरामभाजा[२] तूं करिसी ॥७१॥ मज रावणा देखतां दृष्टीं। देव दानव कांपती पोटीं। तूं तंव धीट आहेस मोठी। वदसी गोष्टी अपमानें ॥ ७२ ॥ माझ्या स्त्रीपुत्रांदेखतां। मज निर्भर्त्सिलें लंकानाथा तुझ्या करावें म्यां घाता। परी स्त्री वधितां निषिद्ध ॥ ७३ ॥ तुझे अंगसंगाची आर्ती[३]। कामक्रोधांची करीन शांती। तुझी मज अति प्रीती। वध तदर्थी[४] न करवे ॥ ७४ ॥ शेखीं तूं न देशी अंगसंग। तुझा करीन अंगभंग। वेगवेगळाले विभाग। तुझें सर्वांग छेदीन ॥ ७५ ॥ वानिसी श्रीरामाची शक्ती। तें तंव मनुष्य बापुडें किती। केंवी येईल लंकेप्रती। विचार चित्तीं न करिसी ॥ ७६ ॥

श्रीरामाच्या दैन्यावस्थेचें चित्रण—सीता नेली लंकेसी। हें कोण सांगेल रामापासीं। दुर्घट मार्ग न कंठे त्यासीं। समुद्रासी काय करी ॥ ७७ ॥ श्रीराम बापुडें चरणचाली। सीताविरहें भुललें भुली। अगाध समुद्राची खोली। उतरवली केंवी जाय ॥ ७८ ॥ श्रीराम राक्षसां भातुकें[१]। तें मी भक्षीन महाकौतुकें। लक्ष्मण गिळीन चुळोदकें। यथानुसुखें मज भजें ॥ ७९ ॥ तुज सीतेसी रामसंगती। कदा न घडे कल्पांतीं। मज अनुसरें अनन्यप्रीतीं। सांडीं आसक्ती रामाची ॥ ८० ॥ पित्यानें दिधला दवडून। राज्यहीन स्वधर्महीन। नाहीं अन्न नाहीं धन। अति दीन श्रीराम ॥८१॥ नित्य तृणाचें शयन। मुखीं घालावया न मिळे पान। वनवासीं न मिळे अन्न। अति दीन श्रीराम ॥ ८२ ॥ नाहीं वस्त्र नाहीं भूषण। नाहीं अभ्यंग तैलमर्दन। जटा वल्किल्या वल्कल परिधान[२]। अति दीन श्रीराम ॥ ८३ ॥ श्रीरामासीं बळ असतें। तरी कां वनीं रडत राहतें। तयासी येववेना पैं येथें। राम निश्चितें अती दीन ॥ ८४ ॥ मजसमान नाहीं बळ। मजसमान नाहीं दळ। मजसीं न करवे सळ। राम केवळ अति दीन ॥ ८५ ॥ बैसोनियां वनवासीं। झुंझावया राक्षसांसीं। रामें मिळविलें वानरांसीं। तेही आम्हांसी निजभुक्ती[३] ॥ ८६ ॥ श्रीराम होवोनि वनचर। वनीं मेळविले वानर। त्यांतें गिळती निशाचर। भक्ष्य आचार ते आम्हां ॥ ८७ ॥

डमरुपुराणांतर्गत ऋषिभाष्य.—रावण सांगे साक्षेपूनी। ऋषिभाष्य डमरुपुराणीं। जें भाष्य ऐकिलें कानीं। तें सीते सावधानीं अवधारीं ॥८८॥

भवित्री रम्भोरु त्रिदशवदनग्लानिरधुना
स ते रामः स्थाता न युधि पुरतो लक्ष्मणसखः ।
इयं यास्यत्युच्चैर्विपदमधुना वानरचमू-
र्लघिष्ठेदं षष्ठाक्षरविपरिलोपात्पठ पुनः ॥ १ ॥

१ बोलूं लागला. २ हे रामपत्नि सीते. ३ इच्छा, आवड. ४ त्यामुळें.

¶ वक–शांतत्व. २ वचन. † सुं. कां. २२।१.

१ खाद्य. २ नेसावयास वस्त्र. ३ भक्षण, अन्न. ४ प्रयत्नानें.

रंभास्तंभगर्भ[1] अति सुकुमारु । त्याहूनि अरु-वार[2] तुझा ऊरु । यालागीं बोलिजे रंभोरु । श्लोकार्थ सादर अवलोकीं ॥ ८९ ॥ त्रिदशवदन जे का देव । थोर आपत्ती पावती सर्व । माझे रणीं भंगेल राघव । विमुख स्वयमेव लक्ष्मणेंसीं ॥ ९० । माझिया कंदनाआंत । रणीं भंगलिया रघुनाथ । वानरें होतां वाताहत । राक्षस समस्त भक्षितील ॥ ९१ ॥ सीता सज्ञान बोले सुंदर । रावणा श्लोक हा साचार । लोपोनियां तिन्हीं समाक्षर । करीं उच्चार श्लोकाचा ॥ ९२ ॥ रावणा तूं अति लघिष्ठ[3] । मूर्खत्वें वाहसी दाही कंठ । सातवें अक्षर लोपोनि स्पष्ट । याचीं घडघडाट श्लोकार्थ ॥ ९३ ॥ ऐकोनि भाष्य लंका-नाथा । असत्य वचन न वदे सीता । श्लोकाचिया भविष्यार्था । सावधानता अवधारीं ॥ ९४ ॥

त्याचा अर्थ—भविष्यार्थ आहे अति गहन । ग्लानि पावेल दशवदन । रणीं विजयी रघुनंदन । सखा लक्ष्मणसमवेत ॥९५॥ वानरसेना आघवी । वंचावेल विजयगौरवीं । रावण निर्दळोनि राघवीं । राम-राज्यपदवी तिहीं लोकीं ॥ ९६ ॥ सीतेनें कथितां श्लोकार्थ । कोपें तिचा करावया घात । रावणें उचलिला हात । वृक्षीं हनुमंत कोपला ॥ ९७ ॥

त्यामुळें रावणाचा क्रोध व सीतेचा अधिक्षेप व निर्भर्त्सना –

रावणें उचलितां हात । सीता निर्भर्त्सी लंकानाथ । कामोन्मत्त गर्वोन्मत्त । मरणोन्मत्त जाहलासी॥९८॥

+उवाचात्महितं वाक्यं वृत्तशौटीर्यगर्वितम् ।
तस्य राक्षसराजस्य सीता न मम्नृषे वचः ॥२३॥
( ड. वृत्तसौंदर्यगर्विता ) पुण्यकीर्तिरिवाकीर्ति
पुनः कोपादुवाच च ।
राक्षसाधम रामस्य भार्याममिततेजसः ॥ २४ ॥
उक्तवानसि यदिदं वाक्यं क्व गतस्तस्य मोक्ष्यसे ।
कथं व्याहरतो मां ते न जिव्हा पाप शीर्यति ॥२५॥
असंदेशात्तु रामस्य तपसश्चानुपालनात् ।
न त्वा करोम्यहं क्रुद्धा भस्म भस्मार्हतेजसा ॥२६॥
विधिस्तव वधार्थाय विहितो नात्र संशयः २ ॥

कोपला देखोनि लंकानाथ । सीता मशकप्राय मानित । श्रीरामस्मरण अति समर्थ । निःशंक नित्य जानकी ॥९९॥ दुःखदायक रावणवचन । अखंड-धारा वर्षे घन । तेणें डळमळेना सीतेचें मन । जैंवी कां गगन तिंबेना[1] ॥ १०० ॥ रावणाचीं वचनें लाघवें । मानी मृगजळहेलावे । त्याचीं झाडावया गर्वपर्वें । निजानुभवें बोलत ॥ १ ॥ सीतेचें वचन अति गुह्यार्थ । स्वहित आणि परहित । दोन्ही अर्थी असतां समर्थ । शुद्ध शब्दार्थ अनुवादे ॥२॥ जैंवी कां शुद्ध पुण्यकीर्ती । तीस† नातळे अपकीर्ती । तैसी रावणाची दुष्ट दुरुक्ती‡ । सीता सती स्पर्शेना ॥ ३ ॥ देव दानव सेवा करिती । लंकाराज्य यश-कीर्ती । यावरी जोडिली अपकीर्ती । सीता सती चोरोनि ॥ ४ ॥ शिवाचा सेवक प्रसिद्ध । चोरितां श्रीरामाची वधू । ऐसा रावण बुद्धिमंदू । पापबद्ध जालासी ॥ ५ ॥ चोरी करोनि लंकानाथा । पळूं पाहसी तूं केउता[3] । श्रीरामबाणाचे आघाता । तुज कोण आतां राखील ॥ ६ ॥ धाता पिता सोम सविता । अनळ यम विधाता । कोपलिया श्रीरघु-नाथा । हे सर्वथा न राखिती ॥ ७ ॥ रूपें जातां शिवपुरीं । शिव मारील त्रिशूळेंकरीं । माझिया स्वामीची चोरिली नारी । प्रत्यक्ष वैरी तूं माझा॥८॥ श्रीरामकांता जगत्त्रयजननी । विशेषें माझी गुरुपत्नी । कां चोरिली हे अभिलाषोनी । तृतीयनयनीं जाळील ॥९॥ यापरी गा लंकानाथा । चोरिलिया श्रीरामकांता ।

१ केळीच्या गाभ्याप्रमाणें. २ नाजुक. ३ योग्यतेनें हलका, हलकट.

+ सु. कां. २२।१२, १५, १९.

१ ओलें होत नाहीं. २ पायांचें पाणी, गंगा. ३ कोणीकडे, कोठें.

† ड–यावरी जोडली. ‡ बकडक्ष–दुरोक्ती.

कोणी नाहीं गा रक्षिना। तुज तत्वतां मारील॥११०॥ म्हणसी मज आहे दळबळ। श्रीराम एकाकी निर्बळ। श्रीरामाचें बळ प्रबळ। ऐक प्रांजळ सांगेन ॥११॥ ताटका मारिली आणि सुबाहु। मारीच मारिला त्याचा भाऊ। विराध करिता गर्व बहु। रणगौरवु बाणें एकें ॥ १२ ॥ एकलेनि बाणें रामें जाण। चवदा सहस्र राक्षसगण। त्रिशिरा मारिला खर दूषण। रणकंदन जनस्थानीं ॥ १३ ॥ लाज नाहीं तुजलागूनी। शूर्पणखा सखी भगिनी। तिचें नाक कान कापूनी। विटंबोनी धाडिली ॥ १४ ॥ तुज येतां तिच्या कैवारीं। प्रथम जाहलासी भिकारी। चोरोनि श्रीरामाची अंतुरी। भयेंकरीं पळालासी ॥ १५ ॥ मुख न दावितां रामासी। बाणभयें पळालासी। धाकें लंकेमाजी लपसी। आणि जलपसी[1] बाढिव[2] ॥१६॥ जटायूसीं करितां रण। मजदेखता आपण। दांतीं तुवां धरिलें तृण। काय आंगवण बाणिसी ॥ १७ ॥

मारुतीचा विस्मय—सीता निर्भर्त्सीं[†] लंकानाथ। हनुमान हांसे वृक्षावरुतें। देखोनि जानकीचा पुरुषार्थ। अति विस्मित वानर ॥ १८ ॥ श्रीरामें मारुनि खर दूषण। दोघे बंधु स्वयें बैसोन। वांटा केला आपणा आपण। सावधान अवधारीं ॥१९॥ ज्येष्ठ वांटा श्रीराम द्विगुण। रावण आणि कुंभकर्ण। कनिष्ट वांटा लक्ष्मण। इंद्रजित जाण एकाकी ॥ १२० ॥ उद्भट वीर वाढिवेसीं। वांटा दिधला हनुमंतासी। शिष्टाई दिधली अंगदासी। नळ नीळांसी सेतुबंध ॥ २१ ॥ येर समस्त सैन्यासी। श्रीरामें दिधलें सुग्रीवासी। वीरवृत्ति विभागांसीं। वानरांसीं समजावी ॥ २२ ॥

श्रीराममहिमा—श्रीराम स्वयें सच्चिदानंदघन। त्यासी तूं म्हणसी अति दीन। श्रीरामाचें महिमान। सावधान अवधारीं ॥ २३ ॥ श्रीरामनाम नित्य-स्मरणीं। शिव वंदित पायवणी[1]। ब्रह्मा घाली लोटांगणीं। देवां शिरोमणि श्रीराम ॥२४॥ एकांतीं बैसोनि चंद्रचूडे। नित्य श्रीरामनाम पढे। त्यातें निंदिजे तुवां मूढें। मरण रोकडें तुज आलें ॥२५॥ जो जो श्रीरामाची निंदा करी। शिव साक्षेपें त्यातें मारी। आपुला स्वामी तुवा केला वैरी। मूर्ख संसारीं तूं एक ॥ २६ ॥

श्रीरामनिंदेनें सीतेचा कोपाविष्कार— श्रीराम निंदिता जाणा। जिव्हा झडेल गा रावणा। होसिल नरकाचा पाहुणा। आंदणा[2] महादुःखा ॥ २७ ॥ निंदिता देखोनि रघुनंदन। सीता जाली कोपायमान। रावणा तुझें भस्म करीन। अर्ध क्षण न लागतां ॥ २८ ॥ बळेंचि भोगीन म्हणसी सीता। आणि निंदिता श्रीरघुनाथा। तुझें भस्म करीन आतां। क्षण न लागतां रावणा ॥ २९ ॥

कोपसंयमन, कामक्रोधाचे परिणाम—परी आज्ञा समर्थ रघुनाथा। लागलिया अति आघाता। कोप न यावा सर्वथा। केंवी लंकानाथा भस्म करूं ॥१३०॥ आंगा येतां क्रोधसंग। अपवित्र होय सर्वांग। ब्रह्मचर्या होय भंग। तपा संहार होय क्रोधें ॥३१॥ यज्ञदानव्रतदक्षिणा। कोप येतांचि पैं जाणा। सर्व क्रियाकर्म व्यर्थ जाणा। करी उगाणा[3] तपाचा ॥ ३२ ॥ छिद्र पडतां घट गळे। क्रोधानळें तप जळे। योगी संन्यासी पडती मैळे। क्रोधें निजबळें गाजिले पैं ॥ ३३ ॥ बाह्य मांगाचा विटाळ। जळ-मार्जनें फिटे मळ। क्रोध अतिशयें चांडाळ। नव्हे निर्मळ प्रयागीं ॥ ३४ ॥ करितां काशीवासस्नान। तेंव क्रोध खवळे गहन। क्रोधाऐसा पापी पूर्ण। नाहीं आन संसारी ॥ ३५ ॥ काम क्रोध लोभ जाणें। हे नरकाचे पाहुणे। तिन्ही त्यजावे आपणें। आज्ञा संपूर्ण रामाची ॥ ३६ ॥ श्रीरामाज्ञा प्रतिपाळितां

१ बडबडसी. २ कीर्ति, मोठेपणा.

† ब—निर्भर्त्सी.

१ दास. २ ग्रास. ३ नाश, भंग.

पाळितां । क्रोध आतळों नेदी चित्ता । तेणें वांचलासी लंकानाथा । अपघाता चुकलासी ॥ ३७ ॥

रावणाला भावी घटनांचे कथनः—आतां मी वांचलों तत्वतां । ऐसें न मानीं लंकानाथा । करील श्रीराम तुझ्या घाता । हेही कथा अवधारीं ॥ ३८ ॥

+रामस्य धनुषः शब्दं श्रोष्यसि त्वं सुदारुणम् ।
शरास्तीक्ष्णाः पतिष्यन्ति रामलक्ष्मणलक्षिताः ॥ २८ ॥
रक्षसां हन्यमानानामस्यां पुर्यां समततः ।
तोयमल्पमिवादित्यः प्राणानादास्यते शरैः ॥ २९ ॥
अकृतात्मानमासाद्य राजानमनये स्थितम् ।
समृद्धानि विनश्यन्ति राष्ट्राणि च पुराणि च ॥ ३० ॥
तथैव त्वां समासाद्य लङ्का रत्नौघसंकुला ।
अपराधात्तवैकस्य न चिराद्विनशिष्यति ॥ ३१ ॥
इह सन्तो न वा सन्ति सतो वा नानुवर्तसे ।
यथा हि विपरीता ते बुद्धिराचारवर्जिता ॥ ३२ ॥

श्रीराम धनुष्याचा ध्वनी । पडतांचि लंकाभुवनीं । राक्षस पडती मूर्च्छापन्नीं । त्रिकूट खचोनी पडे धाकें ॥ ३९ ॥ पायीं उतरोनी अपांपती । शरवृष्टि संपातीं । वीरें वीर पडती क्षितीं । अश्वगजरथी-समवेत ॥१४०॥ इंद्रजित लक्ष्मणाचा भाग जाण । तो निकुंबळे घालील [1]खाग । मेघनादाचा[2] घेईल प्राण । शस्त्रें दारुण वर्षोनी ॥ ४१ ॥ श्रीराम विंधोनियां जाण । बाणीं फोडील कुंभकर्ण । रावणा तुझा घेईल प्राण । अर्ध क्षण न लागतां ॥ ४२ ॥ जेंवी [3]थिल्लरीं अल्प जळ । रवि शोषितां न लगे वेळ । तेंवी श्रीरामाचे बाण प्रबळ । प्राण तत्काळ घेतील ॥४३॥ राजया उन्माद कामासक्तीं । तोही काम अधर्मरतीं । त्याचीं राष्ट्रें पुरें नासती । राज्य-संपत्तीसमवेत ॥ ४४ ॥ लंका रत्नाढ्य कनकगिरी । रावणा तुझी परदारचोरी । भस्म होईल क्षणा-माझारीं । सहपरिवारीं सहपुत्र ॥ ४५ ॥

रामबाणाचा महिमाः—निवारेल वज्रधार । निवारेल काळचक्र । परी श्रीरामाचा बाण अनिवार । दशशिरवधार्थ ॥ ४६ ॥ पाठीं लागलिया काका । ज्याचे हातींचो दर्भशिखा । नावरेचि तिहीं लोकां । शिवादिकां समवेत ॥ ४७ ॥ त्या रामाचे सकोप बाण । येथें निवारू शकेल कोण । घेतील राक्षसांचा प्राण । मुख्य रावणा लक्षूनी ॥ ४८ ॥ म्हणसी सबळ दशानन । राम नव्हे मजसमान । श्रीराम सिंह तूं [1]श्वान । पलायमान होसी चोरा ॥ ४९ ॥

रावणाच्या निंद्य कृत्याबद्दल त्याचें निर्भर्त्सनः—मुखीं धरोनि पक्वान्न । हडहड करितां पळे श्वान । सीता चोरून चिद्रत्न । पलायमान तूं तैसा ॥ १५० ॥ श्रीराम चिन्मात्र गजेंद्रु । रावण विषयाचा काळेंद्रु । घरींचियांवरी करी कुरकुरु । श्रीरामासमोरु न राहवे ॥ ५१ ॥ तूं तंव शूर्पणखेसमान । चोरी करोनि शूर पूर्ण । त्यावरीही वुचाट[2] आंगवण[3] । काळें वदन रावणा ॥ ५२ ॥

रावणाचा क्रोधः—ऐकोनि सीतेचा अनुवाद । रावणा आला सुबद्ध क्रोध । तिचा करावया वध । जाहला सिद्ध साटोपें ॥ ५३ ॥

†सीतायानुवचः श्रुत्वा रावणो ‡राक्षसाधिपः ।
विवृत्य नयने क्रूरे जानकीमवधावत ॥ २२ ॥

सीतावचनाचे बाणाग्रीं । रावण खोंचला जिव्हारीं[4] । दांत खावोनियां करकरीं । नेत्र वटारी अति क्रोधें ॥ ५४ ॥ संतापक्रोधें वचंबळे । फोडा इचे दोन्ही डोळे । वेगें मोडा रे सिसाळें[5] । अंत्रमाळा[6] काढा इच्या ॥ ५५ ॥ जिव्हा छेदा रे सवेग । वेगीं करा अंगभंग । विदारोनियां अष्टांग । भिन्न भाग करा इचे ॥ ५६ ॥

मारुतीचा अवेशः—तिचा करावया घात । रावण शस्त्रेंसीं धांवत । तें देखोनियां हनुमंत । रागें

1 नाग. 2 इंद्रजिताचा. 3 डबक्यात.

\+ सु. कां. २१।२४, २५, ११, १२, ९

1 कुत्रा. 2 व्यर्थ. 3 पराक्रम. 4 मर्मस्थानीं. 5 मस्तक. 6 आंतडीं.

† सु. का. २२-२३. ‡ अन्ववैक्षत.

कांपत थरथरां ॥ ५७ ॥ हात दोनी कुसकरी । पुच्छ भोंवंडी वक्राकारीं । शेंडी माथेवरी थरारी । वृक्षावरी पिलंगत[1] ॥ ५८ ॥ डोळे भोंवंडीत गरगरां । दांत खातसे करकरां । रोमें थरकती थरथरां । आला वानरा अति कोप ॥५९॥ सीतेसी लावितां हात । करीन रावणाचा घात । येणें साटोपें हनुमंत । झुलकावित वृक्षेंसीं ॥ १६० ॥ कोपला देखोनि वानरा । हाहाकार सुरवरां । कोपला देखोनि दशशिरा । स्त्रिया समग्रा कापती ॥६१॥

मंदोदरीचें आगमन–सीता गांजितां रोकडी । हनुमंत जंव घाली उडी । मंदोदरीची प्रज्ञा [2]गाढी। आली तांतडी ते संधीं ॥ ६२ ॥ खड्ग घेवोनि लंकानाथ । करिता सीतेचा पैं घात । मंदोदरी धांवोनि तेथ । धरिला हात खड्गाचा ॥ ६३ ॥ मंदोदरी धरितां हात । दचकलासे लंकानाथ । हनुमान वृक्षीं राहे गुप्त । पुढील कथार्थ अवधारा ॥ ६४ ॥ कपिरामायणाआंत । सीतारावणशब्दो[3]न्मथित । कथा आहे अत्यद्भुत । तितका ग्रंथ न धरेचि ॥ ६५ ॥ कथा सांगतां संकळित[4] । इतका वाढला पैं ग्रंथ । वदनीं वदवितां श्रीरघुनाथ । गुह्य गुह्यार्थ तो जाणे ॥६६॥ श्रीराम आणि जनार्दन । दोहींमाजी ब्रह्म परिपूर्ण । एका जनार्दनाशरण । कथा पावन श्रीरामें ॥ १६७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीतारावणसंभाषणं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ १६७ ॥ श्लोक ॥ १ ॥ एवं ॥ १६८॥

---

## अध्याय ९ वा

मंदोदरीचा अनुनयः–श्रीरामचंद्राय नमः ॥ रावण सीतेसी लावितां हात । हनुमान त्याचा करिता घात । तों मंदोदरी येऊनि तेथ । अति अनर्थ चुकविला ॥ १ ॥

१ कोंडू लागला. २ श्रेष्ठ. ३ सीता आणि रावण यांचे संवादापासून निघालेली. ४ थोडक्यांत.

+उपगम्य ततस्तूर्णं राक्षसी वनमालिनी ।
परिष्वज्य दशग्रीव इदं वचनमब्रवीत् ॥ १ ॥
मया क्रीड महाराज सीतया किं करिष्यसि ।
अकामा कामयानस्य शरीरमुपतप्यते ॥ २ ॥

अतिकायाची जननी । रावणप्रिया वनमालिनी। तया रावणा आलिंगूनी । युक्तवचनीं बोलत ॥२॥ स्वदारकाम[1] मजसीं रम । मजसीं रमणें हा स्वधर्म । सीता अकाम चित्तां† काम । परम अधर्म अधःपात ॥ ३ ॥ सांडीं अकाम सीतेसीं । स्वेच्छा रमावें मजसीं माझेनि कामें सुखी होसी । सीतेपासीं अति दुःख ॥ ४ ॥

सीताहरणामुळें होणारे भावी अनर्थ–श्रीरामकांता सीता सती । तिचे कामाचे आसक्तीं । राक्षसांची जावयां‡ व्यक्ती । होईल समाप्ती वंशाची ॥ ५ ॥ कुमार प्रधान सेनापती । अश्व गज रथ पदाती । इंद्रजित कुंभकर्ण लंकापती । भस्म होती सीताक्षोभें ॥ ६ ॥ सर्व रस चाखी माशी । दीप चाखितां दाहो तिसीं । तेंवी सांडोनि स्वदारेसी । सीतेपासीं भस्मार्थ ॥ ७ ॥ निजपुत्राचा द्वेष करी । खांब हाणितां शस्त्रधारीं । हिरण्यकशिपु नखाग्रीं । सहपरिवारीं निमाला[2] ॥ ८ । खांबीं उठिला नरहरी । येथें वनीं उठेल वनकेसरी[3] । सीता सती क्षोभल्यावरी । होईल वोहरी[4] राक्षसां ॥ ९ ॥

परदारासक्ति-निंदा जानकीचे निजगुह्यांत । काय¶ भरलें आहे अमृत । आमचें गुह्य विषप्रयुक्त । कढू लागत रावणा ॥ १० ॥ स्वस्त्रीपरस्त्रीकामकामुक । समान सुखाचे परिपाक । स्वदारकामें परम सुख । परम दुःख परदारा ॥११॥ परदारेची आसक्ती । पूर्वजां होय अधोगती । आपण

१ स्वपत्नीची इच्छा धरून. २ मृत्यु पावला. ३ वनसिंह. ४ संहार, नाश.

+सु. कां. २२।४. † क्ष–अ; कामकामतीचा, ड–तिचा. ‡ इय– जातिव्यक्ति. ¶ डस–होका.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... क्र. 90487

पावे नरकाप्रती । वंशसमाप्ती परदारें ॥ १२ ॥ वनमालिनी नानायुक्ती । शिकवितां त्या लंकापती । मंदोदरीनें धरोनि हातीं । नेला एकांतीं रावण ॥ १३ ॥

नारदोक्ति कथन—बैसवोनि प्रिया एकांतीं । †नारदभाष्यकल्पोक्ती§ सांगतसे रावणाप्रती । मुनि वदंती[१]‡ जे वदला ॥ १४ ॥ आंगिंचिये वधाचे मस्ती । तुवां पुसिलें नारदाप्रती । मज वधी कोण त्रिजगतीं । देवीं दैत्यीं कीं दानवीं ॥ १५ ॥ देवां अटक तूं दशकंठ । दैत्य तुज पुढें फोलकट[२] । दानवेंशीं धीट तिखट । परी नर तुज दुर्धर संग्रामीं ॥ १६ ॥ भविष्य पुसों नको रावणा । संकल्पभावी भावना । भविष्य चुकवावया जाणा । नाना विंदान करिती प्राणी ॥ १७ ॥ रावणें धरिले दोनी चरण । मज सांगावें माझें मरण । नारद जाणे रामायण । सत्य भाषण तो वदला ॥ १८ ॥ रावणा तुझ्या वधार्थी । कौसल्यासुत राम दाशरथी । तो येवोनि लंकेप्रती । करील समाप्ती राक्षसां ॥ १९ ॥ ऐसें सांगोनि रावणाप्रती । नारद निघे ऊर्ध्वपथीं[३] । त्याचे गमनाची गती । त्रिजगतीं अनुपम्य ॥२०॥ रामनामें वीणा वाजत । श्रीरामनाम मुखीं गात । नामामृतें नित्य तृप्त । स्वयें डुल्लत स्वानंदें ॥ २१ ॥ कीर्तनाच्या संतुष्टीं । श्रीरामरूप देखे दृष्टीं । पदोपदीं आनंदकोटी । सुखसंतुष्टीं उल्हासे ॥ २२ ॥

रावणाचा ब्रह्मदेवास प्रश्न—ऐसें नारदें केलिया गमन । मागें रावण उद्विग्न । पाचारोनि चतुरानन । पुसे आपण तें ऐका ॥ २३ ॥ कौसल्या ते कोण कैसी । दशरथ तो कोण कोणाचे वंशीं । त्याची वस्ती कोणे देशीं । हें मजपासीं सांगावें ॥ २४ ॥

नाहीं कौसल्येचें विवाह झाला । नाहीं दशरथ उपजला । नाहीं राम जन्मा आला । तें बोलिला नारद ॥ २५ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । चहूं मुखें हांसे चतुरानन । नारदाचें जें भाषण । अन्यथा कोण करूं शके¶ ॥ २६ ॥

ब्रह्मदेवाचें कथन—ब्रह्मा सांगे रावणापासीं । कौसल्या कन्या कोसलरायासीं । दशरथ तो सूर्यवंशीं । अयोध्येसी निजराजा ॥ २७ ॥ त्या दोहींचें पाणिग्रहण । होतां रावणें केलें विघ्न । अन्यथा नव्हे नारदवचन । लागलें लग्न समुद्रीं ॥ २८ ॥ कौसल्या आणि दशरथ । केंवी पां गेले समुद्राआंत । कैसेनि लग्न लागलें तेथ । श्रोते वृत्तांत पूसती ॥ २९ ॥ हे तंव जुनाट परिपाटी । कालिकाखंडीं गुह्य गोष्टी । नारदें देखोनि ज्ञानदृष्टीं । वदे जगजेठी निःशंक ॥ ३० ॥

सेतुबंधमाहात्म्यांतर्गत कौसल्या-दशरथ विवाहवर्णन—सेतुबंधमाहात्म्यांत । दुसरे एके लघुमाहात्म्यांत । थोरलिया महात्म्यांआंत । ग्रंथ समस्त लिहिला असे ॥ ३१ ॥ अहिरावण महिरावण । त्यांचें जनन आणि मरण । [१]कौसल्यादशरथपाणिग्रहण । तेथें संपूर्ण लिहिलें असे ॥ ३२ ॥ असो या ग्रंथाची ग्रंथोक्ती । झाडा सुचावा* पैं† किती । वदनीं वदविता श्रीरघुपती । कविता करिता श्रीराम ॥ ३३ ॥ माझे अंगीं सूर्खपण । लटिकें लिहिलें रामायण । तेंही वाचितां पैं जाण । होय क्षालन महापापा ॥३४॥ ग्रंथ असंख्य आनआन[२] । तेथेंही आनआन निरूपण । माझें भावार्थरामायण । सावधान अवधारा ॥ ३५ ॥ कौसल्यादशरथपाणिग्रहण । रावणें करितां अति विघ्न । समुद्रामाजी लागलें लग्न । तें अतिविंदान[३] अवधारा ॥ ३६ ॥

१ भाषण, वाणी. २ क्षुल्लक. ३ आकाशमार्गानें. ४ युक्ति.

† ड—काव्याची; क्ष—भाषाचा. § क्ष—पूर्वोक्ती. ‡ डक्ष—निश्चिती.

१ कौसल्यादशरथांचें लग्न. २ निरनिराळे. ३ महच्चमत्कार.

¶ कक—शके. * अ—सुचावया. † क्ष—स्या.

कौसल्येला पेटींत घालून समुद्रार्पण—ब्रह्मा सांगे रावणापासीं । कौसल्यादशरथलग्नासी । वऱ्हाड जातें कोसलदेशीं । पांचवे दिवशीं लग्नसिद्धि ॥ ३७ ॥ ऐसी रावणें ऐकतां गोष्टी । कौसल्येवरी क्षोभक दृष्टी । धाडी घालोनि उठाउठीं । हरिली गोरटी कौसल्या ॥ ३८ ॥ रावण पोटीं भयभीत । कौसल्या न ठेवी लंकेआंत । देव चिंतिती माझा घात । ते विपरीतार्थ करितील ॥ ३९॥ देव कामारे[1] मजपाशीं । माझा मृत्यु आवडे त्यांसी । ते कौसल्या दशरथापासीं । लघुलाघवेंसीं[2] नेतील ॥ ४० ॥ ऐसा धाक रावणासीं । कौसल्या न ठेवीच लंकेसीं । तीतें घालूनि पेटीसीं । समुद्रापासीं ठेवणें धाडी ॥४१॥ द्वीपद्राक्षें अमृतफळें । लाडू पक्वान्नें रायकेळें । पात्रें भरूनि शीतळ जळें । सांठविलें पेटींत ॥ ४२ ॥ त्या पेटीमाजी कौसल्येसी । घालोनि धाडी समुद्रापासीं । समुद्रें ठेविली मीनापासीं । मीनें दाढेसीं[3] घातली ॥ ४३ ॥ मीन क्रीडतां समुद्रीं । त्यासीं[4] तिमि धांवे युद्धावरीं[5] । मीन म्हणे युद्धाचे[6] संचारीं[6] । पेटी चकचुरी होईल ॥ ४४ ॥ म्हणोनियां उठाउठीं । पेटी ठेवोनि समुद्रबेटीं । मीन परतला युद्धासाठीं । सक्रोधदृष्टीं संग्रामा ॥ ४५ ॥

त्याप्रमाणेंच दशरथावर आक्रमण व समुद्रार्पण — दशरथ लग्नत्वरा¶ करी । पायवाट मार्गे दुरी । तारवीं बैसोनि समुद्रीं । जाऊं त्रिरात्रीं कोसलदेशा ॥ ४६ ॥ चेउलींहूनि जेंवी द्वारका । पायवाट दूरी देखा । तारवीं बैसोनि जातां लोकां । दिवसा दों कां जाऊ पावती ॥ ४७ ॥ राया दशरथें यापरी* । वऱ्हाड घालोनि नावेवरी स्वयें निघाला समुद्रीं । त्वरेंकरीं† जावया ॥ ४८ ॥ टकेपताका नावेवरी । निशाणें त्राहाटिल्या भेरी । वऱ्हाड चालिलें समुद्रीं । अति गजरीं उल्हासें ॥४९ ॥ रावणें पाळती करोनि पुरी । विमानबळें येवोनि अंधारीं । दशरथ बैसला जे नावेवरी । ते निशाचरीं फोडिली ॥ ५० ॥ बाप होणार कैसें बळी । तें न चुके कदाकाळीं । दशरथ बुडतां पैं जळीं । जालें ते काळीं अपूर्व ॥ ५१ ॥ दशरथ बुडतां पैं तळवटीं । रामनाम स्मरे वाक्पुटीं[1]। तंव सांपडली फुटकी पाटी । राम संकटीं तारक॥५२॥

दशरथकौसल्या मीलन, अन्योन्य वृत्तकथन—श्रीराम दशरथाचे कुशीं । म्हणोनि नाम आठवे त्यासी । बुडतां नव्हे कासाविसी । नामें रायासी तारिलें ॥ ५३ ॥ नाम आठविल्या आकांतीं । आकांतामाजी अति विश्रांती । नामें तारक त्रिजगती । ‡सुखसंवित्ती[2] श्रीरामें ॥ ५४ ॥ सांपडलां फुटकी पाटी । समुद्रलाटांच्या पैं लोटीं । जेथें कौसल्येची पेटी । राजा त्या बेटीं लागला ॥ ५५ ॥ दशरथ पैं उठावटीं । सवेग चालिला त्या बेटीं । संमुख§ देखोनियां पेटी । आश्चर्य पोटीं मानिलें ॥ ५६ ॥ भोंवतीं समुद्राची घरटी । येथें कोणें ठेविली पेटी । पाहतां दुसरें न दिसे दृष्टी । विस्मय पोटीं अनिवार ॥ ५७ ॥ तेणें ती पेटी हातीं धरिली । होणारें किल्ली उघडली । भीतरीं कौसल्या देखिली । असे बैसली सचिंत ॥ ५८ ॥ दशरथ पुसे तूं कोण । येरी विस्मयो पावली पूर्ण । तुम्ही कोणाचे कोण । येथें आगमन कैसेनि ॥ ५९ ॥ राजा म्हणे तूं गोरटी । तुज कैसेनि प्राप्त पेटी । तुज कोणें ठेविलें ये बेटीं । समूळ गोष्टी सांगावी ॥ ६० ॥ पयोनिधि[3] अगाध गहन । मत्स्य मगर अति दारुण । ऐसें दुस्तर दुर्गम स्थान । येथें आगमन कैसेनि ॥ ६१ ॥ कोसलरायाची मी राजबाळ[4] । रायें¶

१ चाकर. २ मोठ्या चातुर्यानें. ३ दाढेमध्यें. ४ एक प्रकारचा मोठा मासा. ५ युद्धार्थ. ६ युद्ध सुरू असतां.

¶ब–त्वरे, *बक–यथापरी, क्ष–याची. †ब–त्वरा करी.

१ तोंडानें. २ सुखानुभव. ३ समुद्र. ४ राजकन्या.

‡ ड–सेविती; क्ष–सहति. § ब–सन्मुख.

¶ ब–राया; क्ष–राव.

दशरथू वरू नेमला। तंव रावणें घालोनि घाला। घेऊन आला मज लंके ॥ ६२ ॥ भविष्यें रावण दचकला पोटीं। भयेंचि मजला घालोनि पेटीं। ठेवणें धाडिलें समुद्राचे पोटीं। तेणें चे बेटीं ठेविलें॥६३॥ ऐसिया सांगतां गोष्टी। कौसल्या बाष्पें[१] दाटली[१] कंठीं। भाग्यें अभाग्य मीच सृष्टीं। नव्हेचि भेटी दशरथा ॥ ६४ ॥ न व्हावें दशरथाचें लग्न। या-लागीं रावणें केलें विघ्न। दशरथा करावया भग्न। सवेग सैन्य मोकलिलें[२] ॥ ६५ ॥ जळो जळो तो दशानन। स्वप्नींही न व्हावें संभाषण। धरोनि दशरथाचें ध्यान। प्राण त्यागीन स्वानंदें ॥ ६६ ॥ ऐकोनि कौसल्येचें वचन। राजा जाला विस्मया-पन्न। सप्तसागरीं होतां मग्न। होणार पूर्ण चुकेना ॥ ६७ ॥ राजा सांगे निजवृत्तांत। रावणें माझा करितां घात। रक्षिता झाला श्रीरघुनाथ। समुद्रा-आंत बुडवितां ॥ ६८ ॥ तो समुद्र भरिल्याआत। येथें आलों मी दशरथ। येरी पुसे तू अजाचा सुत। रघूचा नातू सूर्यवंशी ॥ ६९ ॥

उभयताचा विवाह –ऐकोनि निश्चयवचन। कौसल्या जाली सुखसंपन्न। मज तुष्टला जनार्दन। केलें सुलग्न एकांतीं ॥ ७० ॥ नाहीं कर्माची खटपट। नाहीं लौकिक अंतःपट[*]। नसतां लोकीं कटकट। लग्न लागलें निर्दोषी[†] ॥ ७१ ॥ दोहींचा जो निजहरिख[२]। तोचि तयांचा मधुपर्क। बोल बोलिलीं जे अनेक। मंगळाष्टकें तीं तेथें ॥ ७२ ॥ विकल्पाचीं झाडिलीं पळें। संकल्पासीं मूद ओंवाळे। स्वधर्माचा दीप उजळे। सुखकल्लोळ लग्नार्थ ॥ ७३ ॥ अनोळखता मार्गें सांडे। तेंचि पायीं पायमांडे। परमानंद वाडे-कोडें[४]। सुखसुरवाडें लग्नार्थ ॥ ७४ ॥ उदरा येईल रघुनाथ। लग्नीं पावला अभिजित। लग्नघटिका पाहे भास्वत[१]। काल सांगत सावधान ॥ ७५ ॥ दोहींसी ओळखी होतां स्पष्ट। सुटोनि गेला अंतः-पट। ॐपुण्याहंवचनें श्रेष्ठ। मौननिष्ठ होवोनि ठेले ॥ ७६ ॥ लग्नधरा समुद्रवेटी। बोहोलें तेंचि मुख्य पेटी। लग्न लागलें उठाउठीं। दृष्टादृष्टी होतांचि ॥ ७७ ॥ यापरी कौसल्येनें निजकांत। लग्नीं वरिला दशरथ। पुढील कथेचा अर्थार्थ। आश्चर्यार्थ अवधारा ॥ ७८ ॥ कौसल्या आणि दशरथ। दोघें बैसलीं पेटीआंत। फळें पक्कान्नें भक्षित। जळ प्राशित स्वानंदें ॥ ७९ ॥ कौसल्या पुसे दशरथासी। पुढें निर्गती[२] आमुची कैसी। राजा सांगे कौसल्येसी। रामनामेंसीं आम्हां मुक्ति ॥ ८० ॥ वसिष्ठसद्गुरुवचन। करितां रामनाम-स्मरण। भवभयाचें निर्दाळण। बंधमोचन तें किती ॥ ८१ ॥ आम्ही तुम्ही मिळोन आतां। सावधान एकाग्रता। भावें स्मरतां श्रीरघुनाथा। भव सर्वथा आम्हां नाहीं ॥ ८२ ॥ पृथ्वी बुडावया हडबडे। आकाश तुटोनियां पडे। तरी रामस्मरल्याकडे। भय बापुडें केंवी निघे ॥ ८३ ॥ ऐकतां रामनाम-गोष्टी। विघ्नें पळती बारा वाटीं। भिवों नको वो गोरटी[३]। सुखसंतुष्टी श्रीरामें ॥८४॥ उदरा यावया श्रीरघुनाथ। निजसामर्थ्यप्रतापवंत। प्रवेशला दश-रथाआंत। नामीं भावार्थ तेणें त्यासी ॥ ८५ ॥ ऐशीं दोघें करितां गोष्टी। मीनें मीना जिणोनि[४] हाटीं[५]। दोघांसहित घेवोनि पेटी। उठाउठीं निघाला ॥ ८६ ॥

रावणाच्या दर्भगर्भ प्रश्नास ब्रह्मदेवाचें उत्तर–ब्रह्मयासी पुसे रावण। कौसल्यालग्नसमय कोण। आजिचें होतें संधान। लागलें लग्न दशरथासीं ॥ ८७ ॥ ऐकोनि ब्रह्मयाची मात। रावण खदखदां हांसत।

१ अश्रूनीं कंठ भरून आला. २ पाठविलें. ३ अत्यानंद. ४ कौतुकानें.

* क्ष–चाटा, ड–भट. † ड–निर्दुष्ट; क्ष–निर्दष्ट.

१ सूर्य. २ सुटका. ३ हे सुंदरी. ४ जिंकून. ५ आवेशानें.

पहा हो सत्यलोकनाथ[१]। असत्य वदत मजपासीं ॥८८॥ सत्यलोकीं मज असतां। असत्य मानिसी लंकानाथा। तरी ब्रह्मलिखितार्थ। तुज तत्वतां कळलें नसे ॥ ८९ ॥ ज्यां केला दशरथाचा घात। कौसल्या घातली समुद्रांत। आतां लग्नीं कैंचा दशरथ। वचन असत्य न मानें ॥ ९० ॥ जिणें मरणें भगवत्सत्ता। ते तुज आली लंकानाथा। म्हणसी ज्यां मारिलें दशरथा। हें तत्वतां असत्य होय ॥ ९१ ॥

रावणानें पेटी आणविता दशरथ कौसल्या दर्शन. त्याची निःशकता –ऐसी वक्रोक्ति ब्रह्मवचन। ऐकोनि कापिजे¶ दशानन। पेटी आणोनि पाहे आपण। तंव दोघां जणा देखिलें ॥ ९२ ॥ प्रथम निवता दशरथ। दचकला तो लंकानाथ। त्याचा करावया घात। शस्त्रा हात घातला ॥ ९३ ॥ पुढां देखोनि रावण। दशरथा आलें स्फुरण। दहा कंठ विंशति[२] नयन। भुई पाडीन करघातें ॥ ९४ ॥ ते काळीं श्रीरघुनाथ। पूर्णप्रतापें दशरथाआंत। यालागीं रावणा नाहीं भीत। निःशंकित पुरुषार्थें ॥ ९५ ॥

रावण वचोचला, मंदोदरीचें निवारण –निःशंक देखोनि दशरथ। रावण तद्वधीं[३] उद्यत। मंदोदरी आली तेथ। निवारित रावणा ॥ ९६ ॥ त्यासी नेवोनि एकांता। बुद्धि सांगे लंकानाथा। मारूं जातां दशरथा। तूं अपघाता पावसी ॥ ९७ ॥ पेटी आणोनि अकस्मात। आतांचि निघाला दशरथ। तैसाचि निघालिया रघुनाथ। मरण प्राप्त रावणा ॥ ९८ ॥ ऐसी ऐकतां गोष्टी। रावण भय घे पाठीं पोटीं। डोळां देखतांचि पेटी। रामभयें पोटीं चळीं कांपे ॥ ९९ ॥ दशरथलग्ना करितां विघ्न। रावण जाला अति उद्विग्न। दाही मुखें हीन दीन। कंपायमान भयभीत ॥ १०० ॥

१ ब्रह्मदेव. २ वीस. ३ त्याचा वध करण्याला.

¶ ब–पाठ, अ–कां.

मंदोदरीची सूचना व कौसल्या-दशरथास अयोध्येस धाडणें –बुद्धि सांगितली रावणासी। कांहीं न चले होणारासी। कौसल्येसहित दशरथासी। अयोध्येसी धाडीं वेगीं ॥ १ ॥ कौसल्या आणि दशरथासी। मारितां न मारवे आम्हांसी। ठेवों नये गा लंकेसीं। अयोध्येसी धाडवीं वेगीं ॥२॥ अन्यथा[१] करूं जातां आपण। यांसी सर्वथा न ये मरण। रावणा मानलें वचन। वेगीं विमान आणविलें ॥ ३ ॥ आणोनियां विमानासी। कौसल्यायुक्त दशरथासी। विमानीं बैसवोनि दोघांसी। अयोध्येसी स्वयें धाडी ॥ ४ ॥ राजा बुडाला समुद्रांत। अयोध्यानगरी अति आकांत। तंव तेथें आला दशरथ। कौसल्येसहित सुलग्न ॥५॥ राजा आला देखोनि नगरीं। निशाणें त्राहाटिल्या भेरी। गुढिया मखरें घरोघरीं। नरनारी-आल्हाद ॥ ६ ॥ ऐसा पूर्वील वृत्तांत। मंदोदरी सांगे साद्यंत[२]। रावणा तूं कां होसी भ्रांत। होणारार्थ चुकेना ॥७॥ ऐसें शिकवोनि रावणासी। साडूनि सीताप्रलोभासी[३]। हातीं धरोनिया त्यासी। निजभुवनासी चालविला ॥ ८ ॥ एका जनार्दना शरण। कौसल्यादशरथाचें लग्न। परम गोड रामायण। निरूपण स्वयें वदवी ॥९॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां दशरथ-कौसल्याविवाहकथनं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ ओंव्या ॥ १०९ ॥

## अध्याय १० वा

सीतेला रावणाच्या धमक्या –श्रीरामचंद्राय नमः ॥ रावणें भेडसावितां सीता। त्याच्या पत्न्या ज्या समस्ता। आश्वासिती श्रीरामकांता। [४]नेत्रवक्त्रा खुणावूनि ॥ १ ॥

१ विपरीत. २ परिपूर्ण, मुळापासून. ३ सीतेचा अभिलाष. ४ डोळे व तोंड यानीं खुणा करून.

अनुक्रम क्रमांक २३०

+देवगंधर्वकन्याश्च विषेदू राक्षसीस्तदा ।
ओष्ठप्रकारैरपरा नेत्राकारैस्तथा परा: ॥ १ ॥
सीतामाश्वासयामासुस्तर्जितां तेन रक्षसा ॥ २ ॥

सीतेसी म्हणे स्वयें रावण । माझी भार्या न होतां पूर्ण । तुझा घेईन मी प्राण । नाक कान कापूनी ॥ २ ॥ फोडा इचे दोनी डोळे । वेगें मोडा रे सिसाळें[1] । स्तन कापा मांसगोळे । अंत्रमाळें[2] काढा वेगीं ॥ ३ ॥ तुझिया पातिव्रत्याची थोरी । भीड धरिली सहा मासवरी । आतां भोगीन बलात्कारीं । राम भिकारी वनवासी ॥ ४ ॥

त्याच्या पत्न्यांनीं तिचें आश्वासन केलें—ऐसी गांजितां नानापरी । क्षोभोनी रावणाच्या नारी । आश्वासिती नानापरी । भय न धरीं तूं याचें ॥ ५ ॥ देवी गंधर्वी अति सुंदरी । नागकन्या निशाचरी । आश्वासिती सीता सुंदरी । खुणा करिती तें ऐका ॥ ६ ॥ एकी खुणाविती नेत्रांतरीं । एकींची सज्ञा ओष्ठांतरीं । एकी त्या निवारिती करीं । अंगुष्ठावरी अनेका ॥ ७ ॥

रावणाला ब्रह्मशाप —ब्रह्मशाप रावणशिरीं । झोंबों न शके परनारी । याचें कांहीं भय न धरीं । धीर धरीं श्रीरामकांते ॥ ८ ॥ सत्यलोकीं वनप्रदेशीं । रावण झोंबतां उर्वशीसीं । आजी नेम दिधला नलकूबरासी¶ । तूं कां झोंबसी परदारें ॥ ९ ॥ बळें झोंबतां दशानन । उर्वशी करी आक्रंदन । तेथें आला चतुरानन । कोपायमान रावणा ॥१०॥ दुष्टा नष्टा लंकानाथा । येथोनि परदारेसी झोंबतां । पावसील मस्तकपाता । ब्रह्मशापता दुर्लंघ्य ॥ ११ ॥ ज्याचा निजभाव निर्मळ । त्यावरी कृपा करी सकळ । रावणशापाचें निजमूळ । स्त्रियांनीं समूळ सांगितलें ॥ १२ ॥ असो हा मागील वृत्तांत । स्वयें देखे हनुमंत । मंदोदरीयें लंकानाथ नेला घरांत तें ऐका ॥ १३ ॥

+इत्युक्तो भार्यया राजा रावणः शत्रुकर्शनः ।
समादिश्य ततः सर्वा राक्षसीर्निर्जगाम ह ॥३॥
राक्षस्यो भीमरूपास्ताः सीतां सन्मतिमब्रुवन् ।
पौलस्त्यानां वरिष्ठस्य रावणस्य महात्मनः ॥४॥
दशग्रीवस्य भार्यात्वं सीते न बहु मन्यसे ।
ततः शूर्पनखा नाम राक्षसी वाक्यमब्रवीत् ॥४६॥
सुरामानीयतां क्षिप्रं सर्वशोकविनाशिनीम् ।
मनुष्यमांसेन समं विभुज्य रसमेततः ॥ ६ ॥
तेन सोन्मादसानंदं नृत्यामश्च निकुंभिले ॥ ७ ॥

रावणाचे सांगण्याप्रमाणें राक्षसींचें सीतेला भिवविणें—मंदोदरीयें नाना युक्ती । कौसल्यादशरथउत्पत्ती । शिकवोनियां लंकापती । निजधामाप्रती नेती जाली ॥ १४ ॥ विकटा[1] विक्राळ अति क्रूरी । राक्षसी पाचारिल्या समग्री । रावण त्यांसीं एकांत करी । सीता सती वश्य करा ॥ १५ ॥ भय दाखवावें गाढें[2] । जें भय देखतांच पुढें । वश्य होय मजकडे । तैसीं चांभाडें पसरावीं ॥ १६ ॥ सामदामभेदकरीं[3] । भय दाखवोनियां भारी । वश्य केलिया सीता सुंदरी । कृतोपकारी मी तुमचा ॥ १७ ॥ ऐसा करोनियां एकांत । रावण मंदोदरीसमवेत । निघता जाला निजधामांत । राक्षसी येत परतोनि ॥१८॥ रावणें प्रेरिलिया सत्वरा । विकटा विक्राळा वक्रनेत्रा । मुखें पसरोनियां क्रूरा । सीतेसामोऱ्या धांविन्नल्या ॥ १९ ॥ एकी जटाकृतभारी¶ । हरितजटा ते दूसरी । विस्तीर्ण कर्ण उदरावरी । स्थूळोदरी विक्राळा ॥ २० ॥ अहिमुखी हयमुखी महामारी । विकटा तिखटा चंडोदरी[4] । आणिक राक्षसी घर्घरी । सीतेवरी धांविन्नल्या ॥ २१ ॥ शूळ पट्टिश मुद्गल

१ मस्तक, डोकें. २ आतडीं.

+ सु का. २२।१, २१ ¶ ब—कुबेरासी.

१ भयंकर. २ मोठें. ३ साम, दाम, भेद इत्यादि उपायांनीं. ४ मोठ्या पोटाची.

+ सु. कां. २३।१–७,४६. ¶ ब—क्रूर.

लहुडी। शब्दें लखलखीत गाढीं। इची करा गे ताडातोडी। भीड येवढी ते काय ॥ २२ ॥ तड-तडां तोडोनि मांस नेऊं। इचे काळीज भाजोनि खाऊं। इचे हाडांचे मणी नेऊं। शिरा घेऊं *ओरपोनि ॥ २३ ॥ रावणा वरीना जनकबाळा। हिच्या काढा अन्नमाळा। वेगें निमटोनि[1] हिचा गळा। खाऊं सगळा वांटूनि ॥ २४ ॥ काढा मारा आणी धरा। हिचीं शतखंडें करा। हाका मारिती दुर्धरा। दशशिरा वरीना ॥ २५ ॥

शूर्पणखेच्या वल्गना —अन्नधियांचे शेवटीं। आली शूर्पणखा नकटी। सीता लक्षोनियां दृष्टीं। सांगे गोष्टी फेंफांत ॥ २६ ॥ आईक सीते रावणोत्पत्ती। मुख्य ब्रह्मयाचा पौलस्ती। त्याचा विश्रवा प्रजापती। रावण निश्चितीं तयाचा॥ २७॥ रावण ब्रह्मयाची चौथी पिढी। वेदविभागीं[2] प्रज्ञा[3] गाढी। राज्यप्राप्त चौदा चौकडी। त्यासी तूं वेढी वरिसी ना ॥ २८ ॥ रावण ब्रह्मवंशी ब्राह्मण। श्रीराम सूर्यवंशीं क्षत्रिय| हीन। त्याची तुज आवड कोण। श्रेष्ठ वर्ण रावणाचा ॥ २९ ॥ रावणसत्ता सुरीं असुरीं। श्रीराम केवळ भिकारी। ऋद्धि सिद्धि रावणाघरीं। राम फळाहारी वनवासी ॥ ३० ॥ माझा बोल आईक आतां। होईं रावणाची प्रियकांता। दिव्य भोग भोगीं तत्वतां। सभाग्य सीता जग मानी ॥ ३१ ॥ साडोनिया खरवाहन[5]। गजस्कंधीं बैसतां जाण। जग वानी‡ सभाग्यपण। तैसें पर्णन[6] रावणाचें ॥ ३२ ॥

सीतेनें दर्शविलेली अवहेलना —शूर्पणखेचें ऐकोनि वचन। सीता साडी हेळसून। जैसा हंस न पोह शेण। तैसें वचन उपेक्षी ॥ ३३ ॥ सीता नेदी प्रतिवचन। शूर्पणखा कोपायमान। हिची जिव्हा कान कापून। रक्त पिईन नळीचें ॥ ३४ ॥

१ मोडून. २ वेदाचीं खंडें करण्यात. ३ बुद्धि. ४ गाढवावर बसणें. ५ वाखाणी. ६ पाणिग्रहण.

* ब—वर—; ड—वोर—. | व—क्षेत्री. ‡ ब—वाणी.

शूर्पणखेचा कोप —आणा मद्यमैरेयांसी[1]§। इचे मांसें करूं उपहारासीऽ। अंगें विभागूं सकळांसी। खाऊं सीतेसी अवघ्याही ॥ ३५ ॥ सीतामेदमांस मेळें। मद्यासीं येथ चांगलें। खातां आनंदकल्लोळें। नाचूं निकुंबळें[2] गोंधळीं ॥ ३६ ॥

सीतेची निर्भय व शांत वृत्ती —राक्षसी त्या ऐशा-परी¶। भेडसाविती अति दुर्धरी। सीता त्यांचें भय न धरी। श्रीरामचंद्रीं निजबोध ॥ ३७ ॥ न करी रुदन नव्हे दीन। श्रीरामसुखें सुखसंपन्न। राक्षसींचें भयमान। तृणासमान सीतेसी ॥ ३८ ॥ नित्य श्रीरामनाम स्मरतां। सीतादेहीं विदेहता। शंका न मनीं देह छेदितां। तेंचि श्लोकार्था अनुवाद ॥ ३९ ॥

+छिन्ना भिन्ना विभक्ता वा दीप्ते वाग्नौ प्रवेशिता।
रावणायोपतिष्ठेति* किं प्रलापेन वश्चिरम् ॥ ८ ॥

नांव वैदेही सीता सती। देहभयाची नाहीं भ्रांती। श्रीरामध्यानें भयनिवृत्ती। न मानी क्षिती[3] देहाची ॥ ४० ॥

सीतेचा रामावरील अचल भाव —छेदा भेदा खा समस्तीं। श्रीराम भोक्ता सर्वां भूतीं। परि नांवें न पाहें लंकापती। स्वप्नस्थितीं स्पर्शेंना ॥ ४१ ॥ देह करावा रामार्पण। तुम्हांत सबाह्य श्रीराम पूर्ण। तुम्हीं करितांची भक्षण। ब्रह्मार्पण देह माझा ॥ ४२ ॥ देह ठेवितां कृमि[4] होती। तो लावावा उपकारार्थीं। मज भक्षावें तुम्हीं समस्तीं। भोक्ता सर्वां भूतीं श्रीराम ॥ ४३ ॥ देह छिन्नभिन्न करा समस्तीं। अथवा घाला अग्नीप्रती। परी नातळों[5]

१ दारू, आसव वगैरे. २ निकुंबलेमध्यें. ३ पर्वा. ४ किडे. ५ न शिवो.

§ डबकक्ष—मैरेयासी. ऽ ड—उपदेसी; क्ष—उपद्री अगेसी. ¶ व—ऐश्यापरी, क्ष—ऐशियापरी.
+ सु. का. २६।१०, ८. * ‘रावणं चोपतिष्ठते’ इति मुद्रितरामायण.

लंकापती । जाणा निश्चितीं नेम माझा ॥ ४४ ॥ करालविकरालवदनाकृती । घर्घर हाका मारील किती । नाहीं वरणें लंकापती स्वप्नसुषुप्तीं जागृतीं ॥ ४५ ॥

त्याचा राक्षसींवर परिणाम—निधडी[१] देखोनि सीता सती । राक्षसी चळचळां कांपती । हे क्षोभलिया आम्हांप्रती । करील शांती अवश्यांचि ॥ ४६ ॥ आमुचा द्वेष न करी सीता । सर्वां भूतीं देखे रघुनाथा । रावण आक्षेसीं छळितां आम्हां समस्तां अवश्य निमणें[२] ॥ ४७ ॥ इच्छेनि अभिलाष रावण । सन्निपातें पावेल मरण । ऐशा राक्षसी आपआपण स्वयें गुणगुण त्या करिती ॥ ४८ ॥

+राक्षसी त्रिजटा वृद्धा† इतरा स्वयमब्रवीत् ।
आत्मानं खादतानार्या‡ न सीताभक्षणं हितम् ॥ ९ ॥
स्वप्नोऽप्यय मया दृष्टो ह्यशुभो रोमहर्षणः ।
राक्षसानामभावाय भर्तुरस्या भवाय च ॥ १० ॥
श्रुत्वा पप्रच्छ सा भीता त्रिजटां तामिदं वचः ।
अशेषं श्रोतुमिच्छामि तव तु स्वप्नदर्शनम् ॥ ११ ॥
राघवश्च मया दृष्टः चतुर्दंत§ महागजम् ।
आरूढः शैलसंकाशं सीतया सहलक्ष्मण. ॥ १२ ॥

त्रिजटेचें स्वप्नकथन—देखोनि महाभयगर्जन । करितां सीतेसी तर्जन[३] । वृद्ध त्रिजटा क्षोभोन । कोपायमान बोलत ॥ ४९ ॥ त्रिजटा बिभीषणाची भगिनी । राक्षसी सत्त्वशिरोमणी । क्रूरा राक्षसींतें निवारूनी । सत्यवचनीं अनुवादे ॥ ५० ॥ म्यां केलें असतां शयन । सभाग्य देखिलें म्यां स्वप्न । सीतेसी घालोनि लोटांगण । विरुद्ध वचन न वदावें ॥ ५१ ॥ सीतेसी खाऊं पाहतां राक्षसी । तुम्हीं खावें आपआपणांसी । सीता सती सत्त्वराशी । विरुद्ध इयेसी न वदावें ॥ ५२ ॥ सीता सर्वां भूतीं समान । तुम्हीं कां वदावें विरुद्ध वचन । जानकी जगदंबा परिपूर्ण । वंदा चरण तुम्ही हिचे ॥ ५३ ॥ ऐकोनि त्रिजटेचें वचन । राक्षसी झाल्या कंपायमान । कैसें कैसें देखिलें स्वप्न । कृपा करोन सांगावें ॥ ५४ ॥

रामसीतादर्शन—स्वप्नीं देखिला श्रीरघुनाथ । श्वेत गज चौदंत । सीतासमवेत सालंकृत । लक्ष्मणयुक्त गजस्कंधीं ॥ ५५ ॥ चवरें ढाळिती सुरासुर । भाटीव[१] करिती नरवानर । ऋषी करिती जयजयकार । वाद्यें अपार वाजती ॥ ५६ ॥ श्रीरामसीता अभेदस्थितीं । म्यां देखिली स्वप्नाप्रती । ते ऐका हो उपपत्ती । यथानिगुतीं सांगेन ॥ ५७ ॥ सूर्यासवें प्रभा संगतीं । चंद्रीं चंद्रिका[२] निववितीं । वायुसवें जैसी गती । सीता सती तेंवी रामीं ॥ ५८ ॥ गुळासवें सुस्वादता[३] । कर्पूरासवें सुगंधता । जळासवें शीतळता । तैसी सीता श्रीरामीं ॥ ५९ ॥ ऐसा श्रीराम सीता सती । स्वप्नीं देखे मी सभाग्यस्थितीं । देखिली रावणाची दुर्गती । तेही उपपत्ती अवधारा ॥ ६० ॥

+वराहेण दशग्रीवः शिशुमारेण सत्कृत. ।
उष्ट्रेण च मया दृष्टो रक्तमाल्यानुलेपनः ॥ १३ ॥
प्रयातो दक्षिणामाशां प्रविष्टो गोमये ह्रदे ।
कुंभकर्ण इंद्रजिच्च¶ सर्वे राक्षसपुंगवाः ॥ १४ ॥
पीत्वा तैलं प्रनृत्ताश्च क्रीडतो गोमये ह्रदे ॥ १५ ॥

रावणादींची स्थिति—स्वप्नीं रावण देखिला दृष्टीं । सर्वांगीं शेंदुराची उटी । शेंदूर ओतिला ललाटीं । माळा कंठीं आरक्त पुष्पांच्या ॥ ६१ ॥ दाहीं बोडकीं शिरा शिरीं । मसीचा टिळक लाविला नाकावरी । दुसरी रावणातें धरी । अधोद्वारीं न्यावया ॥ ६२ ॥ सर्वांचि बैसोनि उष्ट्रावरी[४] ।

१ धैर्यवान्, पराक्रमी. २ मरणें. ३ उपहास.

+ अ. २७।४, ५, ६, ११, १२.

† प्रबुद्धा, ड—शयना. ‡ बक—आत्मनो स्वादतोनार्यो.

§ संनद्धस्त.

१ वर्णन. २ चांदणें. ३ गोडी. ४ उंटावर.

+ अ. २७।२०, २९. ¶ बक—इंद्रजित.

दक्षिणदिशे गमन करी । सवेंचि देखें सूकरावरी[1] । वैश्वानरीं[2] क्रीडत ॥ ६३ ॥ गोमयाचे[3] डोहाआंत । स्वेच्छा क्रीडे लंकानाथ । आणिक स्वप्नींचा वृत्तांत । अति अद्भुत तो ऐका ॥ ६४ ॥ इंद्रजित ससैन्य कुंभकर्ण । करोनियां तैलपान । गोमयऱ्हदीं[4] क्रीडतां नग्नी । उन्मज्जनीं निमज्जनीं ॥ ६५ ॥ रावणनिद्रा-गृहावरी । वीज पडली एकसरीं । ऐसें देखिलें स्वप्नांतरीं । रावणावरी दुश्चिन्ह ॥ ६६ ॥

सीतेचें दुःख —यालागीं सभाग्य सीता सती । तुम्हीं वंदावें सत्ववृत्ती । ऐकोनि [5]त्रिजटावदंती । गेल्या समस्ती ओसरोनि[6] ॥ ६७ ॥ हनुमान म्हणे त्रिजटा भली । राक्षसी हे सात्विक देखिली । अति युक्त बोलिली बोली । साह्य झाली सीतेसी ॥६८॥ सीता सभाग्य अशोक । अशोकवनीं बैसली देख । लौकिक रीतीं करी दुःख । तें कौतुक अवधारा ॥ ६९ ॥

+राक्षसीवशगा याऽहं भर्त्स्यमाना सुदारुणम् ।
नाहं शक्ष्ये परित्यक्तुमात्मच्छंदेन जीवितम् ॥१६॥
मोघं चरित्वा च तपो व्रतं च
त्यक्ष्यामि चेज्जीवितमत्यनल्पम् ।
विषस्य दाता तु न मेऽस्ति किंचि-
च्छस्त्रस्य वा वेश्मनि रावणस्य ॥ १७ ॥
इहस्थां मा न जानीते शङ्के लक्ष्मणपूर्वजः ।
इतेति का मा गत्वा च राघवाय निवेदयेत् ॥१८॥

रावणाचे बंदींत मी येथ राक्षसींअधीन वनांत । स्वयें देवों न शके जीवित । रक्षण समस्त राक्षसी ॥ ७० ॥ राक्षसी असतां राखणी जीव तों न देववे माझेनी । मज एथें विष देतें कोणी । रावणजाचणी चुकती माझी ॥ ७१ ॥ शस्त्र घालावें म्यां पोटीं । तंव शस्त्रदाता न दिसे दृष्टीं । श्रीरामें सांडिली माझी गोष्टी । थोर संकटीं मी पडिलें ॥७२॥

१ डुकरावर. २ अग्नींत. ३ शेणाच्या. ४ शेणाच्या डोहात. ५ त्रिजटेनें बोलणें. ६ परतून.
+ सु. का. २८।१५, १६.

राम शोधायला न येण्याचें कारण —रावणें हिरोनि वेगेंसीं । मज आणिलें लंकेसी । हें ना कळलें श्रीरामासी । म्हणोनि [1]लागेसी न पवेचि ॥७३॥ मज राखिलें लंकेसीं । ऐसें कोण सांगेल श्रीरामासी । अमित पुण्य आहे त्यासी । संख्या पुण्यासी असेना ॥ ७४ ॥

शुद्धिदानाचें फल —अन्नदानें उदकदान । सामवेदाचें अध्ययन । [2]द्विजदारबंधमोचन । शुद्धी समान न येती ॥७५॥ कोटि अर्बुदें राजसूययज्ञ । ग्रहणीं कोटिगोदान । सुवर्णपूर्ण [3]धरादान । शुद्धी समान नव्हेती ॥ ७६ ॥ सीताशुद्धीचें उत्तर एक । श्रीरामासी परम सुख । ब्रह्मज्ञान त्यापुढें रंक । होय अल्पक निजमोक्ष ॥ ७७ ॥ श्रीराम पावे परम सुख । भ्रांतिगत मोक्ष न ये तुक[4] । ब्रह्मज्ञान तैसेंचि देख । यज्ञदानादिक कोण पुसे ॥ ७८ ॥ माझें व्रत तप दान शीळ । मी पतिव्रता¶ निर्मळ । माझीं मजचि नव्हेति सफळ । झालीं निष्फळ रामेंवीण ॥ ७९ ॥ घाटां[5] पडलिया हिरवा चणा । घाटा दिसे परी नाहीं दाणा । तैसें निष्फळ व्रत तप दान । रघुनंदनावांचोनी ॥ ८० ॥ श्रीराम पुरुष प्रकृती सीता । जो करी नित्य यांची ऐक्यता । तो पुण्यपुरुष याहीपरता । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥ ८१ ॥ त्याचेनि सुखी इहलोक । त्याचेनि सुखी परलोक । त्याचेनि पितरां मोक्षसुख । शिवादिक तेणें सुखी ॥ ८२ ॥

हनुमानाची मनःस्थिति —सीतेसी[क्ष] श्रीरामाची गोष्टी । त्या मज होतील पुण्याच्या कोटी । हनुमान नाचे [6]वृक्षसंपुटीं । लाळ घोंटी भेटावया॥८३॥

१ शोधाला. २ ब्राह्मणस्त्रीची सुटका. ३ अत्यंत क्षुद्र. ४ वजनास. ५ शेंगेंत. ६ वृक्षाच्या घनदाट फांद्यावरून.

¶ ड—पातिव्रत्यानें निर्मळ; ब—जें तपव्रत निर्मळ; ख—त्या तीव्रता अतिनिर्मळ. क्ष—श्रीरामभेटी.

धन्य धन्य सीता गोरटी । अनुवादली गोड गोष्टी । शब्दामृतें कर्ण घोटी[१] । अर्थ चाटी अक्षरांचा ॥८४॥ श्रवणीं[२] पडताचि शब्द । अर्थ न घेतां परम मंद । हनुमंत तदर्थीं अति प्रबुद्ध । अर्थावबोध बुटकोनी ॥ ८५ ॥ बुद्धि स्फुरली हनुमंता । आतां इची भेटी घेतां । विकल्प[३] मानीलपैं सीता । आला मागुता रावण ॥ ८६ ॥ तैं होऊनि आला सन्यासी । आता आला वानरवेषीं । विकल्प रिघालिया सीतेसीं । मग भेटीसीं ठाव कैंचा ॥८७॥ भेटी न घेवोनि स्वयें जातां । काय सांगू श्रीरघुनाथा । दुरून देखिली म्यां सीता । हेंही सांगतां मूर्खत्व ॥ ८८ ॥ जो तो पुसेल हनुमंता । कैसी काय बोलली सीता । काय सांगावें समस्तां । वानरनाथा सुग्रीवा ॥८९॥ एकांतीं श्रीराम आपण । मज पुसेल जे जे खूण । तेव्हां माझें काळें वदन । प्रतिवचन[४] न देववे ॥९०॥ समुद्र लंघोनि हनुमंत। आला गेला अवघें वृथा। वानर टोले देतील माथां। फटमारता करतील ॥ ९१ ॥ सीतेची न घेतां एकांतभेटी । हिच्या न पुसता गुह्य गोष्टी । मज गेलिया परतटीं । राम जगजेठी क्षोभेल ॥ ९२ ॥

+सीतासंदेशरहितं मामितस्त्वरया गतम् ।
निर्दहेदपि काकुत्स्थः क्रोधनिर्दग्धचक्षुषा ॥१९॥
यद्यनाश्वास्य गच्छामि शोकेनाभिनिपीडितम् ।
सर्वथा नास्ति संदेहो देहं त्यक्ष्यति जानकी ॥२०॥
प्राप्तदोषो भविष्यामि देशस्याकथने महान् ।
यदि चेद्योजयिष्यामि भर्तारं रामकारणात् ॥ २१ ॥
व्यर्थमागमनं तस्य ससैन्यस्य भविष्यति ॥ २२ ॥

एकांतीं न भेटतां सीता । तीतें गुह्यगोष्टी न पुसता । जरी मी भेटलों श्रीरघुनाथा । काळकृतांत तो क्षोभेल ॥ ९३ ॥ श्रीरामनेत्रींचा क्रोधाग्नी । मज जाळील तत्क्षणीं । भेटी न घेतां सीता जननी। जातां येथूनी प्रमाद[१] ॥ ९४ ॥ राक्षसीं गांजिली हे सीता । रामविरहें अति दुःखिता । तिसी आश्वासन न देतां । प्राण त्यजितां सांडील ॥ ९५ ॥ सीतेनें सांडिला प्राण । अवघें खुंटलें रामायण । हेंही अपेश मजचि जाण । श्रीराम पूर्ण क्षोभेल ॥ ९६ ॥ सीतेनें सांडितां प्राणांसी । हेंही अपेश माझे शिरासीं¶ । हे न सांगतां श्रीरामापासीं । महादोषी मी होईन ॥ ९७ ॥ शुभाशुभ यथार्थ[२] वार्ता । सद्गुरूसी न सांगता । परम दोष शिष्याचे माथा । वंचकता[३] गुरुद्रोही ॥ ९८ ॥ दुःख नव्हे रघुनाथा । सुख पाहे सती सीता । सुख उपजे श्रीरघुनाथा । युक्ति हनुमता आठवली ॥ ९९ ॥ न कळतां राक्षसासी । स्कंधीं वाहोनि सीतेसी । स्वयें नेतां श्रीरामापासीं । सुख श्रीरामासी उपजेना ॥ १०० ॥ घेवोनि वानरांचें सैन्य । करीं सज्जोनि धनुष्यबाण । रामें वधावे रावण कुंभकर्ण । सपुत्र प्रधानसैन्येंसीं ॥ १ ॥ सोडावी देवांची [४]बांदवडी । तोडावी नवग्रहांची बेडी । उभवावी रामराज्याची गुढी । कीर्ति चोखडी श्रीरामाची ॥ २ ॥ तेथें मज नेता सीता सती । एवढी श्रीरामाची कीर्ती । माझेनि होऊं पाहे अपकीर्ती । हे तंव युक्ती न ये करूं ॥ ३ ॥

सीतेला एकातात भेटण्याचा निश्चय –

एवं अवश्य भेटावी सीता । तेही भेटी अति गुप्तता । रावणराक्षसीं न देखतां । अति एकांता भेटावें ॥ ४ ॥ मज भेटता सीतेपासीं । विकल्प धरील मानसीं । पूर्वी छळिलें संन्यासवेषीं । [५]वानरवेषीं छळों आला ॥ ५ ॥ विश्वासावया श्रीरामभद्रा । आधीं टाकूं श्रीराममुद्रा । भावार्थ देखोनि सीता सुंदरा । भेटी वानरा ते संधी ॥ ६ ॥

---

१ तृप्त करी. २ कानांत. ३ संशय. ४ उत्तर, जबाब.

+ सु. का. ३०।१४, ८, १२, १५.

१ मोठी चूक. २ असेल तसी. ३ शठपणा. ४ बंधन. ५ वानररूपानें.

¶ ढ–शिरी.

सीताश्रीरामचंद्रां भेटी । सीतामुद्रिकासंवादगोष्टी । अनुपम्य कथाकसवटी । गोड गोष्टी सीतेच्या ॥७॥ सीतामुद्रिकासंवादकथा । अति गोड त्या हनुमंता । यापुढें फिकेंपण अमृता । सावधानता[१] अवधारा ॥ ८ ॥ याचें नाम सुंदरकांड । अमृतापरीस गोड । पुरवी ब्रह्मज्ञानाचें कोड । करी निवाड श्रोतयां ॥ ९ ॥ एका जनार्दना शरण । गोडिया गोड निरूपण । कथा नव्हे हें ब्रह्म परिपूर्ण । समाधान जीवशिवां ॥ १० ॥ करितां कथानिरूपण । जीवाचें उडे जीवपण । शिवाचें झडे शिवपण । ब्रह्म परिपूर्ण कोंदाटे ॥ ११ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीतानुतापो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ओंव्या ॥ १११ ॥ श्लोक ॥२२॥ ॥ एवं ॥ १३३ ॥

---

## अध्याय ११ वा

मागील गोष्टीचें स्मरण व सीतेचा अनुताप –

श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ सवेग भेटी श्रीरामकांता । परम आल्हाद हनुमंता । तिच्या निरपेक्ष एकांता । वृक्षाग्रांतौता बैसला ॥ १ ॥ स्वस्थानीं राक्षसी समस्ता । स्वभावें जाहलिया निद्रिस्ता । अशोकवृक्षातळीं सीता । सावधानता बैसली ॥ २ ॥ म्हणे मज नाहीं पापकर्मपरता[२] । आणि कां भोगितें दुःखावस्था । वृथा लक्ष्मणाभिशापता[३] । तेणें पापें लंकेशा [४]आतुडलें ॥३॥ लक्ष्मणाची मर्यादारेखा । म्यां उलंघितां देखा । अंतरोनी श्रीरामसखा । त्या दशमुखा आतुडले ॥ ४ ॥ छळूं जातां श्रीरामभक्ता । मुकलें मी श्रीरघुनाथा । हें पाप माझें माथां । दुःखावस्था मी भोगीं ॥ ५ ॥ अवज्ञा केली मी पापिणी । रावण म्हणे होय पत्नी । म्यांच केली खोटी करणी । श्रीरामस्वप्नीं मी न देखें ॥ ६ ॥ छळणपाप सबळ जनीं । त्या पापाची पाहें पां करणी । श्रीरामशब्द नायकें कानीं । श्रीराम स्वप्नीं न देखें ॥ ७ ॥ यालागीं कोणाचेंही छळण । प्राणांतींही न करावें आपण । छळणाचें पाप पूर्ण । आपलें आपण मी भोगीं ॥ ८ ॥ छळणपापाचे पातकीं । कैसी अनुतापली जानकी । बैसोनियां एकाकी । पुढील श्लोकीं अनुवादे ॥ ९ ॥

नूनं स कालो मृगरूपधारी ममाल्पपुण्येन समागतोऽभूत् ।†
मोहान्मया तत्र तदा नियुक्तो रामानुजो लक्ष्मणपूर्वजश्च ॥ १

जितात्मनो महाज्ञाना येषा नास्ति प्रियाप्रियम् ।
प्रियाप्रियविमुक्तानां प्रपश्याम्यहमात्मना ॥ २ ॥

निश्चयें मानिलें निजनिष्ठा । मृग नव्हे तो काळिकाळकांटा । तिघां केल्या तीन वाटा । हेंही कटकटां म्यां केलें ॥ १० ॥ मृगरूपी केवळ काळ । माझा लोभ तो काळवेळ । खवळोनियां तत्काळ । मज म्यांचि केवळ नाडिलें[१] ॥ ११ ॥ माझिया लोभाची कुबुद्धि मोठी । मृगलोभाच्या सलोभ दृष्टीं । म्यां राम धाडिला मृगापाठीं । तेव्हांचि करंटी मी झालें ॥१२॥ करंटी बुद्धि वाणली कैसी । लक्ष्मण रक्षण सत्वराशी । रामें ठेविला मजपाशीं । म्यां छळूनि त्यासी दवडिलें ॥ १३ ॥ लक्ष्मण न मानी अल्प छळणासी । माझी पापबुद्धी कैसी । एकला राहतोसी मजपासीं । रामपत्नीसी भोगावया ॥ १४ ॥ धांवण्या न जासी रामापाशीं । स्वयें भोगावया सीतेसी । तूं काय येथें राहतोसी । ऐशा वक्रोक्तीसीं[२] छळियेलें ॥ १५ ॥ ऐकोनि माझी पापगोष्टी । बोटें घातलीं कर्णपुटीं । लक्ष्मण पळे उठाउठीं । ऐसी मी खोटी पापिणी ॥ १६ ॥ श्रीरामआज्ञें लक्ष्मण । असतां मजपाशीं संरक्षण । तो रामआज्ञा उल्लंघून । छळोन परता म्यां दवडिला ॥ १७ ॥ श्रीरामआज्ञा उल्लंघितां । भेटणे टेलें रघुनाथा । आतडोनियां

---

१ लक्षपूर्वक. २ पापाविषयीं आसक्ति. ३ लक्ष्मणाला वर्मी बोलणें. ४ सांपडलें.

१ फसवून घेतलें. २ वाईट शब्दांनीं. † अ. २८।१०

लंकानाथा। दुःखावस्था तेणें पावें ॥ १८ ॥ लक्ष्मण सर्वत्र सुमित्र। तो म्यां छळोनि केला कुमित्र। तेणें पापें दशवक्त्र। मज अपवित्र झोंबला ॥१९॥ धन्य लक्ष्मणाची मर्यादरेखा। नुल्लंघवेचि दशमुखा। ते म्यां उल्लंघितां देखा। दुःखशोका पावलें ॥ २० ॥ श्रीराम पाठविला मृगाचे पाठीं। हेचि माझी बुद्धि खोटी। तेणें रामीं पडली तुटी। दुःखकोटी मज प्राप्त ॥ २१ ॥ भ्रतारापासीं स्वयें मागणें। हेंचि स्त्रियांचें निंद्य जिणें। तेणेंचि निंद्यत्वें मज रावणें। धरोनि आणिलें लंकेसी ॥ २२ ॥ लोभें मागतां मृगकांचोळी। माझ्या व्रतासी जाहली होळी श्रीराम अंतरला महाबळी। दुःखसभेळीं निजलोभें ॥ २३ ॥ श्रीराम केवळ आत्माराम। लक्ष्मण सबाह्य निष्काम। लाभ अलाभ दोन्ही सम। देहीं आराम निर्द्वंद्व ॥ २४ ॥ लाभालाभीं समान। ते [1]निधडे रामलक्ष्मण। त्यांसी माझें लोटांगण। अनन्य शरण मी त्यांसी ॥ २५ ॥

हनुमंत मुद्रा टाकितो–देखोनि अनुतापिनी सीता। कृपा उपजली हनुमंता। श्रीराममुद्रिका होय टाकिता। दुःखावस्था शमावया ॥ २६ ॥ श्रीराममुद्रेचा बडिवार। दुःख निर्दाळी समग्र। सुख द्यावया अपरंपार। सच्चिन्मात्र[2] श्रीराममुद्रा ॥ २७ ॥

त्याचा सीतेवर परिणाम –दीपिका जेवीं अंधार। श्रीराममुद्रा क्लेश ग्रासी समग्र। खद्योत[4] करी रवि चंद्र। प्रकाशवंत राममुद्रा ॥ २८ ॥ श्रीराममुद्रा प्रकाशवंत। सीता देखोनि अकस्मात। स्वयें जाहली विस्मित। कैसेनि एथ ही आली ॥ २९ ॥

+रामनामाकितं दिव्यं श्रीरामस्यांगुलीयकम्।
सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्य च भामिनी ॥ ३ ॥

१ राहिलें, बंद पडलें. २ धैर्यवान्. ३ सत्यज्ञानस्वरूपमय. ४ काजवा. + सुं. कां. ३६।२, ४, १३.

गृहीत्वा प्रेक्षमाणा सा निजभर्तुर्विभूषणम्।
नेत्रे महर्षज वारि समुद्भूतमधोमुखी ॥ ४ ॥
भर्तारमिव संप्राप्तं जानकी मुदिताऽभवत्।
कुशली यदि काकुत्स्थो लक्ष्मणेन यवीयसा ॥ ५ ॥
किन्न लंका समासाद्य मोचयेन्मामिह स्थिताम् ॥६॥

सुवर्णमुद्रा वरी सुवर्णवर्ण। श्रीरामसंगें शुद्ध सुवर्ण। जानकी स्वयें सुवर्णवर्ण। देखे सुवर्णमुद्रिका॥ ३० ॥ मुद्रिकापीठीं पत्रावळी। सहस्रनामप्रभावळी। अक्षरीं अक्षर लिहिल्या ओळी। अक्षरें न्याहाळी जानकी ॥ ३१ ॥ अक्षरीं निबद्ध मुद्रिका। दशावतारांची टीका। जडितपाची[1]¶ माणिका। सुखदायका सीतेसी ॥ ३२ ॥ मुद्रिकागर्भ अति पवित्र। त्याहीमाजी सार परात्पर। श्रीरामनामें निरक्षर। चिच्चिन्मात्र[2] मुद्रिका ॥३३॥ ऐसी देखोनि मुद्रिका तेथ। सीता जाहली सद्गदित। नेत्रीं आनंदजळ स्रवत। हर्षयुक्त जानकी ॥३४॥ मुद्रिका शोभे नामेंकरीं। श्रीरामनाम मुद्रिकेवरी। श्रीराम मुद्रिके सबाह्य अंतरीं। सीता सुंदरी स्वयें देखे ॥ ३५ ॥ देखतांचि चमत्कार जाहला। स्वयें श्रीरामचि आला। सीतेसी ऐसा भाव गमला। सरसावला अंचळु[3] ॥ ३६ ॥ श्रीराम आला एकाएकीं। लाजें जाहली अधोमुखी। सर्वांगें हर्षेली जानकी। सुखोन्मुखी डुल्लत ॥ ३७ ॥ केउता आहे लक्ष्मण। दुष्ट दुरुकें केलें छळण। त्याचे केशीं झाडीन चरण। त्यासी लोटांगण घालीन पैं ॥३८॥

जानकीचें अवलोकन व मुद्रिकेशीं भाषण –सावध होतांचि देखा। पुढें देखिली अंगोळिका। ओळखोनि श्रीराममुद्रिका। प्रेमोन्मुख जानकी ॥३९ ॥ पहिली* वंदिली निढळीं[4]। मग आलिंगिली हृदय-

१ पाच आणि माणकें जडलेली. २ जडचैतन्यस्वरूपी. ३ पदर. ४ मस्तकावर.

¶ डक्ष–चरित्र. * ब–पहिलें.

कमळीं । स्वानंदें चुंबी जनकबाळी सुखें बेल्हाळी आलीसी ॥ ४० ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । वेंस करूं दे चरणक्षाळण । तुझें तीर्थ मी सेवीन । करीन संवाहन चरणांचें ॥ ४१ ॥ तूं माझी [1]सखी श्रीराममुद्रा । घालूं सेजे करिसी निद्रा । श्रमलीस उतरतां समुद्रा । आणि गिरिवरां उल्लंघितां ॥४२॥ न म्हणे अचेतन[2] सचेतन[3] । भक्तिप्रेम संपूर्ण । तेणें हनुमंतास आलें रुदन । करी स्फुंदन वृक्षाआड ॥ ४३ ॥ आम्ही म्हणवितों भक्त । परी प्रेम नाहीं पोटाआंत । जानकीप्रेमें सदोदित । हिशीं रघुनाथ तुष्टला ॥ ४४ ॥ अचेतनीं प्रेमपान्हा हो । हा कोणासीं नाहीं सद्भावो । हिसी तुष्टला श्रीरामरावो । वंद्य स्वयमेवो सर्वांसी ॥ ४५ ॥ सगुण निर्गुण सद्गुरु भक्त । जो वंदिलो तो होय मुक्त । जो निंदितो त्या नरक प्राप्त । देवशास्त्रार्थ गर्जती ॥ ४६ ॥ मुद्रिका देखताचि दृष्टीं । अत्यानंद मानी गोरटी । सीता सप्रेम पुसे गोष्टी । अवस्था पोटीं जे वर्ते ॥ ४७ ॥ कुशल असतां रामलक्ष्मण । माझी कां न करिती सोडवण । करावया नाहीं आंगवण । दुर्धर बाण असोनी ॥ ४८ ॥ सुटलिया श्रीरामाचे बाण । शोषोनि टाकितील समुद्र संपूर्ण । सकुळ निवटोनि रावण । माझी सोडवण का न करी ॥ ४९ ॥ त्या दोघां वीरीं टाकिली सृष्टी । हे न सांगवे दुःखकोटी । यालागीं सुचली मौनदृष्टी । सज्ञान मोठी तूं होसी ॥ ५० ॥ श्रीराम गेला परलोकता तूं मज मूळ आलीस आतां । तो जरी स्वस्थ असता । मज सोडविता निमेषार्धें ॥ ५१ ॥

जानासि त्वं प्रिये राम किंवा शत्रुघ्नपूर्वजम् ।
जीवतौ तौ न कुर्यातां कथं हि मम मार्गणम् ॥ ७॥

नूनं मृतौ मे शोकेन तौ वीरौ रामलक्ष्मणौ ।
न्यस्त शस्त्रमुभाभ्यां हि गतौ सुपरमां गतिम् ॥८॥

१ सखीप्रमाणें. २ निर्जीव. ३ सजीव.

अथवा राक्षसेंद्रेण रावणेन दुरात्मना ।
व्यापादितौ स्नानपानाशनकर्माणि कुर्वतौ ॥ ९ ॥
अथवा न्यस्तशस्त्रौ तौ वने मूलफलाशिनौ ।
भ्रातरौ हि नरश्रेष्ठौ चरतौ वनगोचरौ ॥ १० ॥

मुद्रिके तूं सांगे गोष्टी । रावणें मातें हरिल्यापाठीं । दोघे येवोनी पंचवटीं । अति संकटीं काय केले ॥५२॥ मज न देखतां पर्णकुटीं । दोघे जाहले कडेलोटी । अथवा शस्त्रें घातलीं पोटीं । केले संकटीं गळां फास ॥ ५३ ॥ किंवा लोकलज्जे लाजले । दोघे विष घेवोनि निमाले । किंवा माझ्या शोकें मूर्च्छा पावले । कीं विकळ होतां गेले प्राण त्यांचे ॥ ५४ ॥ सीता सीता आक्रंदोनी[1] । प्राण सांडिले दोघे जणीं । नातरी मागता पाणी । ताहना फुटोनि निमाले ॥ ५५ ॥ माझेनि दुःखें दुःखी प्रबळ । आहार त्यजिला फळमूळ । दोघां भरोनियां तरळ[2] प्राण तत्काळ सांडिले ॥ ५६ ॥ पर्वतपाठारीं प्रचंड धोंडीं । दोघीं घातलिया मुरकुंडी । तेथें वाळोनि जाहली करवंडी । दुःखनिर्वंडीं[3] निमाले ॥५७॥ विजनीं[4] मूर्च्छित पडिले । कीं वृकव्याघ्रीं[5] ते फाडिले । किंवा सिंहें विभांडिले । कीं रगडिले वनगजीं ॥ ५८ ॥ किंवा गिळिले मत्स्यसुसरीं । कीं बुडाले असती सागरीं । अथवा रिघता राहिले विवरीं । तरसीं तगरीं भक्षिले ॥५९॥ ते तों महावीर निधडे । सिंह व्याघ्र काय बापुडे । शार्दूळ[6] पळती तयांपुढें । केलें कुडें[7] रावणें ॥६०॥ रावणें छळोनि केलें घाता । स्नानतर्पण सारितां । अथवा फळ मूळ भक्षितां । दोघां निद्रिस्तां मारिलें ॥ ६१ ॥ देखतां श्रीरामाचा बाण । रावण भयें पलायमान । श्रीराम नित्य सावधान । त्यासी छळण चालेना ॥६२॥ विश्वामित्रयागप्रती श्रीराम सावध

१ ओरडून. २ भ्रम. ३ दुःखातिशयानें. ४ निर्जन प्रदेशीं. ५ लांडगे व वाघ यांनीं. ६ वाघ. ७ खोटें कृत्य.

अहोरात्रीं । सुबाहूच्या छळणोक्ती । ¶त्यास रघुपतीं मारिलें ॥ ६३ ॥ छळावया सुंदरपणें । शूर्पणखा आली आपण । तिचें केलें विटंबण । न चले छळण रामासीं ॥ ६४ ॥ माझेनि दुःखशोकें जाणा । स्वयें रामें सोडिलें प्राणा । येरवीं निवटोनि रावणा । माझें सोडवणा येता कीं ॥ ६५ ॥ श्रीरामभातां दुर्धर शर । निवटून दुष्ट निशाचर । शोषोनियां महा सागर । नरवानर येते कीं ॥ ६६ ॥ वर्षोनियां बाणजाळीं । लंकेची करोनियां होळी । रावण निर्दाळोनि समूळीं । जनकबाळी सोडविता ॥६७॥ विराधें लावितांचि हात । एकेचि बाणें केला घात । श्रीराम असता जीवें[1] जीत । लंकानाथ निर्दाळिता ॥ ६८ ॥ चवदा सहस्र राक्षसगण । त्रिशिरा मारिला खर दूषण । त्यासी मारितां रावण । अर्धक्षण न लगे पैं ॥ ६९ ॥ श्रीराम सहजें उदासी । रावणें हरितां स्त्रियेसी । न्यस्तशस्त्र[2] जाहला संन्यासी । वनवासीं विचरत ॥ ७० ॥ संन्यासियासी स्वभावतां । धरू नये देहाची ममता । करूं नये स्त्रियेची चिंता । तुटली कथा धांवण्याची ॥ ७१ ॥ संन्यासधर्म स्वभावतां । अभयदान दिधलें भूतां । आतां वधूं नये लंकानाथा । खुटली कथा लंकेची ॥ ७२ ॥ अथवा आणिक आहे गुज । श्रीराम आत्माराम सहज । रावणें हरितांचि भाज[3] । समाधिसेजे प्रवेशला॥७३॥ समाधिसुखें स्वभावतां । कैंचा राम कैंची सीता । रावणें हरिली माझी कांता । हेंही रघुनाथा नाठवे ॥ ७४ ॥ समाधिसुखें सुखसंपन्न । मिथ्या हें प्रपंचाचें भान । मिथ्या श्रीराम रावण । धांवण्या कोण येथें धांवे ॥ ७५ ॥ मुद्रिके सत्य सांग मजपासीं । श्रीराम तरी जाहला संन्यासी । अथवा समाधिसेजेसीं । किंवा देहासी त्यागिलें ॥ ७६ ॥ मुद्रिके मौनाचें लक्षण । निमाले[1] श्रीराम लक्ष्मण । हेंचि तुझें मौनवचन । अति सावधान निजमौनें ॥ ७७ ॥ अबोलणें ज्याचे ठायीं । त्याचिया ज्ञाना मर्यादा नाहीं । तें तंव वर्तते तुझे ठायीं । वानूं कायी गुण तुझे ॥ ७८ ॥ माझी वस्ती वामभागीं । तूं वर्तसी दक्षिणांगीं । श्रीरामाचे अंगसंगीं । तूं सर्वांगीं सर्वज्ञ ॥ ७९ ॥ सद्गुरुअंगींचें अचेतन । मिथ्या न मानी सीता सज्ञान । तिचें न करीच हेळण । उपेक्षण न करीचि ॥ ८० ॥

सीतेला आलेली मूर्च्छा –श्रीराममुद्रा अचेतन । तीस देवोनी अति सन्मान । मृदु मंजुळ विनवून । काय आपण पुसतसे ॥ ८१ ॥ कैसेनि चालवलें वाटा । कैसेनि उल्लंघवलें घांटा । समुद्र तरोनि दुस्तर मोठा । कैसेनि परतटा आलिसी ॥ ८२ ॥ मज संबोखावया[2] येथें । तुज काय धाडिलें श्रीरघुनाथें । ऐसें बोलत बोलत तेथें । पडे मूर्च्छित जानकी ॥ ८३ ॥

त्यामुळें हनुमंत घाबरले –सीता पडतांचि मूर्च्छित । हनुमान जाहला साशंकित । श्रीरामविरहें अति संतप्त । प्राण निश्चित त्यागील ही ॥ ८४ ॥ देखतां श्रीराममुद्रेसी । श्रीराम निमाला वनवासीं । धरोनि हा निश्चय मानसीं । निजदेहासी त्यागील ॥८५॥ देह त्यागितांचि सीता । श्रीराम म्हणेल हनुमंता । समुद्रलंघन तत्वतां । कवण्या अर्थी साधिलें ॥८६॥ मज आलिया लंकेआंत । ना सीता ना रघुनाथ । ओढवला अति अनर्थ । तेणें हनुमंत महादुःखी ॥ ८७ ॥

†इति सञ्चिन्त्य हनुमांश्चकार मतिमान्मतिम् ।
राममक्लिष्टकर्माणं सबंधुमनुकीर्तयन् ॥ ११ ॥

सीता पडतांचि [3]मूर्च्छापन्न । हनुमंत मनीं अति उद्विग्न । हृदयीं स्मरतां रघुनंदन । बुद्धि निर्विघ्न आठवली ॥८८॥

१ जिवत. २ शस्त्रें टाकिलीं आहेत असा. ३ स्त्री.

¶ डक्ष–तोही रघुपतीनें मारिला.

१ मृत्यू पावले. २ शांतवन करण्याकरितां. ३ मूर्च्छित.

† सुं. कां. ३०।४०, ४१.

श्रीरामवृत्तान्त कथन —सीता व्हावया सावधान । आतां करूं [1]श्रीरामसंकीर्तन । म्हणोनी रामकथागायन । करी आपण मारुति ॥ ८९॥ कौसल्यागर्भीं गर्भातीत । दाशरथि श्रीरघुनाथ । परब्रह्म मूर्तिमंत । सूर्यवंशीं अवतरला ॥ ९० ॥ श्रीराम परब्रह्म सीता प्रकृती । श्रीराम चैतन्य सीता[2] चिच्छक्ती । श्रीराम धैर्य सीता [3]धृती । श्रीराम अनन्यगती अवतारू ॥९१॥ श्रीरामाचें आचरित । गुरुपितृआज्ञाविकीत । ब्राह्मणाचा निजभक्त । गुरुमाहात्म्यार्थ श्रीराम ॥९२॥ कैकेयीवरदें दशरथें । श्रीराम धाडिला दंडकारण्यातें । सीतालक्ष्मणसमवेतें । निघे रघुनाथ वनवासा॥९३॥ वनवास गंगातटीं । वसतिस्थान पंचवटीं । श्रीराम राहिला जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ९४ ॥ शूर्पणखा करी छळण । तें जाणोनि श्रीराम सज्ञान । तिचे घेवोनि नाक कान । विटंबोन सोडिली ॥ ९५ ॥ तिचे कैवारी दारुण । त्रिशिरा मारिला खर दूषण । श्रीरामें घेवोनि जनस्थान । दिधलें दान ब्राह्मणां ॥ ९६ ॥ मृगकंचुकीस[4] लोभतां[4] । मृगापाठीं धाडिलें श्रीरघुनाथा । छळोनि दवडिलें सौमित्रा । हरिली सीता रावणें ॥ ९७ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । करितां सीतागवेषण[5] । जटायुरावणेंसीं रण । दोघे जण तेथें आले ॥९८॥ रथघात छत्रपात । पक्षियें गांजिला लंकानाथ । जटायु रावणें पाडिला तेथ । श्रीरघुनाथ तेथ आला ॥ ९९ ॥ श्रीराम कृपाळु परिपूर्ण । करोनि जटायुउद्धरण । कबंध मारोनियां जाण । आले आपण किष्किंधे ॥ १०० ॥ श्रीरामें निर्दळोनि वाळीसी । राज्य दिधलें सुग्रीवासी । यौवराज्य अंगदासी । वानरांसी निजसख्य ॥ १ ॥ तुझे शुद्धीसी निरुतें । श्रीरामें पाठविलें मातें । तुझे भेटीलागीं व्रतें । श्रीरघुनाथें धरियेलीं ॥ २ ॥ शिळीं बांधोनि सागर । सपुत्रप्रधाननिशाचर । येणेंसीं वधोनि दशशिर । सीता सुंदर उद्धरणें ॥ ३ ॥ विश्वासू न मानील वानरा । म्हणोनि खूण आणिली मुद्रा । सांडोनियां दुःखनिद्रा । भेटें कपींद्रा रामदूता ॥ ४ ॥

तें ऐकून सीता सावध होते व पाठविणाऱ्याला भेटीला बोलाविते —ऐकोनि श्रीरामचरित । सीता जाहली सावचित । कथानुवाद वृक्षाआंत । अति विस्मित जानकी ॥ ५ ॥ कृपेनें कोंवळा श्रीरघुनाथ । मज आश्वासावया येथ । वृक्ष कथा अनुवादत । आला निश्चित श्रीराम ॥६॥ वृक्षासी पुसे करोनि नमन । कोण करितो श्रीरामकीर्तन । त्याचें पाहीन मी वदन । लोटांगण त्यासी माझें ॥ ७ ॥ ज्यासी श्रीरामकथेची शैली । त्याच्या चरणींची धुळी । मी वंदीन सुखसमेळीं[1] । मुख मजजवळी दावावें ॥ ८ ॥ ज्याचे मुखीं श्रीरामकीर्तन । त्याचें मज देखतां वदन । परम सुखसमाधान । कृपा करोन भेटावें ॥ ९ ॥ सीता सप्रेम निजचित्तें । परमोत्कंठ अति भावार्थे । जेणें खूणमुद्रा आणिली येथें । कृपावंतें भेटावें ॥ ११० ॥

तामब्रवीत् महातेजा हनूमान्मारुतात्मजः ।
शिरस्यंजलिमाधाय सीतां मधुरया गिरा ॥ १२ ॥

मारुतीचें खालीं उतरून सीतेला वंदन —ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान स्वयें उतरोन । सीतेसी घाली लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ११ ॥ सीता देखोनियां दृष्टीं । सीतेसीं हनुमान निकट भेटी । हनुमंतासी हर्ष पोटीं । आनंद सृष्टीं न समाये ॥ १२ ॥ महानिधीचा लाभ जाहला । क्षीराब्धि¶ चुळोदकें प्राशिला । कीं कळिकाळ जिंकोनियां ठेला । तो पाड[1] जाहला हनुमंतासी ॥ १३ ॥

---

१ रामाचें गुणवर्णन. २ ज्ञानशक्ति. ३ धैर्य.

४ सुवर्णमृगचर्माच्या चोळीचा लोभ करून. ५ सीतेचा शोध.

१ भाग्या तुळोन.

¶ क्षब्ध—सुधाब्धी.

मारुतीचा आनंद व सात्विक भाव – तेणें हर्षाचेनि मेळें। गडबडा पायांवरा लोळे। आनंदाश्रू स्रवती डोळे। सुखकल्लोळें नाचत ॥१४॥ धांवधांवोनि पायां पडे। सद्गद कंठें सप्रेम रडे। पुच्छ नाचवोनियां पुढें। हर्षे उडे वानर ॥१५॥ येथें सांपडली सीता। कार्यसिद्धी श्रीरघुनाथा। यश आलें हनुमंता। उल्लासतां उन्मत्त ॥ १६ ॥

सीतेची शंका, खरा दूत कीं प्रच्छन्न राक्षस ? – सीता विचारी हृदयांत। हा म्हणवितो श्रीरामदूत। श्रीरामासी कैंचा हनुमंत। पूर्ववृत्तांत मी जाणें ॥ १७ ॥ श्रीरामलक्ष्मण दोघे वीर। त्यासवें नाहीं नर वानर। कैंचें नेणों हें वानर। नाना विकार करिताहे ॥ १८ ॥ हा तरी रावण निश्चयेंसी पहिलें होवोनि आला संन्यासी। आतां आला वानरवेषीं। न ये यासीं विश्वासों ॥ १९ ॥ परी हा वदतो श्रीरामकथा। कपटी म्हणों नये हनुमंता। मी देखतें स्वप्नावस्था। तेंचि सीता अनुवादे[१] ॥ १२० ॥

+स्वप्नो मयाध किमु दृश्यते वा
शाखामृगोऽय मम भागधेयम् ।
स्वप्नोऽपि नाय नहि मेऽस्ति निद्रा
भयेन शोकेन च पीडितायाः ॥

मज श्रीरामाचें नित्य ध्यान। तेणें मी हें देखें स्वप्न। रामदूताचें आगमन। सर्वथा जाण घडेना ॥ २१ ॥ दुर्गम दुर्ग लंकापुर। आड दुर्धर सागर। अशोकवन अति दुस्तर। केंवी वानर प्रवेशे ॥२२॥ रावण राणिवसाआंत[३]। अशोकवन अति गुप्त। तेथें प्रवेशेल रामदूत। हा सत्यार्थ[४] घडेना ॥२३॥ जरी मी हें मानूं स्वप्न। तरी मी आहें सावधान। नाहीं निद्रा ना स्वप्नभान। सत्यगमन वानरू ॥२४॥ श्रीरामकथा अनुवादत। धन्य धन्य हा श्रीरामभक्त। माझेनि भाग्यें हनुमंत। आला शुद्धयर्थ[५] कैवारी ॥२५

पूर्ववृत्तान्तजिज्ञासा – मिथ्या म्हणों नये हनुमंता। जे बोलेल ते सत्य वार्ता। याचिया पूर्ववृत्तांता। पुसे आतां यापासीं‡ ॥२६॥ सीता पुसेल वृत्तांत। स य सांगेल हनुमंत। तया कथेचा कथार्थ। मुख्य मोक्षार्थ मुमुक्षां ॥२७॥ श्रोतीं दिधलिया अवधान। कथा होय चैतन्यघन। श्रोतीं कथेसीं निजजीवन[१]। एका जनार्दन कृपाळू ॥ २८ ॥ एका जनार्दना शरण। सीतामारुतिसंभाषण। हें गोड रामायणीं रामायण। श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ २९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताहनुमद्दर्शनं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ओंव्या ॥ १२९ ॥ श्लोक ॥ १३ ॥ एवं ॥ १४२ ॥

## अध्याय १२ वा

सीतेचो हनुमन्ताला पूर्ववृत्त-कथनाची सूचना – ॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ एकाएकीं अशोकवनाआंत। आला देखोनि हनुमंत। त्यासी समूळ वृत्तांत। पुसे साद्यंत जानकी ॥ १ ॥

ततो रामकथां श्रुत्वा वैदेही वानरर्षभम् ।
उवाच वचनं सीता प्रिय मधुरया गिरा ॥ १ ॥
कथ रामेण संसर्गः कथ जानासि लक्ष्मणम् ।
वानराणा नराणा च कथमासीत्समागमः ॥ २ ॥
रामस्य यानि लिंगानि लक्ष्मणस्य च वानर
तानि भूयस्त्वामाचक्ष्व न मां शोकः समाविशेत् ॥३॥

मज वनवासीं असतां। तैं तूं नव्हतासी हनुमंता। कैंचा आलासी तूं आतां। निजवृत्तांता सांगावें ॥ २ ॥ कैसेनि राम देखिला दृष्टीं। तुज रामासीं कैसेनि भेटी। कैशा कैशा केलिया गोष्टी। जेणें पोटीं अति प्रीति ॥ ३ ॥ कैसा बाणला तो

१ प्रकार. २ बोले. ३ राणीवशात. ४ खरेपणा. ५ शोधार्थ. + सुं. का. ३२।११

१ प्राणधारण.

‡ ब–ययासी, क्ष–त्या.

वचनार्थें ।° साधावया श्रीरामकार्यार्थ । हनुमान प्राणेंसीं सह्यभूत । तो गुह्यार्थ मज सांगें ॥ ४ ॥ श्रीराम भेटलिया कैसें सुख । श्रीरामवचनीं कैसें पीयूख[1] । श्रीरामसंगें कैसा हरिख[2] । योगपरिपाक मज सांगें ॥ ५ ॥ श्रीरामाचें ठाणमाण[3] । रूपरेखा गुणलक्षण । कैसा आहे लक्ष्मण । जीवींची खूण मज सांगें ॥ ६ ॥ ऐकतां श्रीरामाची कथा । दुःख शोक नाठवे चित्ता । निमे संसारभयव्यथा । कथा ऐकतां आनंद ॥ ७ ॥ याचलागीं तुजप्रती । कथा पुसें मी पुढतपुढतीं । कथेमाजी निजविश्रांती । जाण मारुति निश्चित ॥ ८ ॥

रामकथाश्रवणफळ —केलिया कथेचें श्रवण । नाहीं मनन निदिध्यासन । ते कथा जाय वाळोन । जीवनेंवीण जेंवी धान्य ॥ ९ ॥ श्रद्धें श्रीरामकथा-श्रवण । ऐकती त्यांचें निजमहिमान । मननें मन होय उन्मन । अहं विरोन होय [4]सोहम् ॥१०॥ चित्त तें¶ होय चैतन्य । बुद्धी* समसाम्य समाधान† । कर्मचि होय ब्रह्म पूर्ण । इंद्रियाचरण चिन्मात्र ॥११॥ ऐसी श्रीरामस्वरूपावस्था । सादरें पुसतां पैं सीता । ठक[5] पडियेलें हनुमंता । कथावार्ता विसरला ॥ १२ ॥ धन्य धन्य हनुमंताचें ज्ञान । करितां श्रीरामाचें कीर्तन । आठवविसरातें गिळोन । सावधान स्वयें जाहला ॥ १३ ॥

+एवमुक्तस्तु वैदेह्या हनूमान्मारुतात्मज. ।
ततो रामकथातत्त्वमाख्यातुं च प्रचक्रमे ॥ ४ ॥
देवि रामस्य लिंगानि लक्ष्मणस्य च यानि मे ।
लक्षितानि विशालाक्षि तानि वै शृणु तत्त्वतः ॥ ५ ॥

हनुमताचें कथन—सीता पुसे श्रीरामकथा । तेचि श्रीरामस्वरूपसंस्था । हनुमंत होय सांगता । यथार्थता स्वरूप ॥ १४ ॥ लक्ष्मणाचें निजलक्षण । ठाणमाण गुणलावण्य । समूळ सांगे आपण । सावधान अवधारा ॥१५॥ सांगावया श्रीरामकथा । उल्हास हनुमंताच्या चित्ता । देखोनि सीतेची सादरता । होय सांगता स्वानंदें ॥ १६ ॥

श्रीरामवर्णन —श्रीराम रूपें अति सुरूप । रूपें जिंकिला कंदर्प । परी तो रूपेंचि अरूप । चित्स्वरूप[1] श्रीराम ॥ १७ ॥ श्रीराम राजीवलोचन[2] । जगाचें नयनाचें नयन । परी तो देखणा डोळेवीण । देखणे-पण हें जानकी ॥ १८॥ दृश्य देखणें हें तंव गौण । श्रवणान्त[3] देखणें नयन । देखण्यास देखणेपण । श्रीराम पूर्ण देखतसे ॥ १९ ॥ कुंडलें वर्णिती साकार । एक म्हणती मकराकार । श्रवणें मावळती विकार । निर्विकार निजलेणें ॥ २० ॥ श्रीरामाचे श्रवणें । श्रवणा होती निजभूषणें । श्रवण श्रवणाचें लेणें । श्रवणें देखणें परब्रह्म ॥ २१ ॥ परमार्थाचें निजवीक[4] । निरपेक्ष तें नासिक । तेणेंवीण तें निर्नासिक । कैंचें सुख साक्षेपें ॥ २२ ॥ श्रीरामाची नासिकास्थिति । प्राणिप्राणां नित्य विश्रांति । श्रीराम प्राणें प्राण्यां गती । त्यांसी विश्रांती श्रीराम ॥२३॥ श्रीरामाचा मुखशशांक[5] । नित्यानंद निष्कलंक । ब्रह्मादि देवां सुखदायक । जीवशिवां सुख श्रीराम ॥ २४ ॥ जीवशिव दोन्ही अधर[6] । श्रीरामअधरीं जाहले सधर । [7]मिळणीं मिळती एकाकार । शिव-सुखसार[8] श्रीराम ॥२५॥ श्रीराममुखींची दंतपंक्ती । जैंवी ओंकारामाजी श्रुती । श्रुतीची ही विश्रांती । श्रीराममूर्तिमुखचंद्र ॥ २६ ॥ श्रीरामाचे निज-निढळीं[9] । सच्चिदानंद हेचि त्रिवळी । त्याचे ललाटभाग्यमेळीं । लोकीं सकळीं नांदिजे ॥ २७ ॥

---

१ अमृत. २ आनंद. ३ आंगाची ठेवण. ४ तो मी. ५ तटस्थपणा.

+ सु. कां. ३६।५, ७

¶ डक्ष—चैतन्यें. * बुद्धीस मान्य. † डक्ष—समाधिवतन.

१ ज्ञानस्वरूप. २ कमलनेत्र. ३ कानापर्यंत. ४ सौंदर्य, तेज. ५ मुखचंद्र. ६ कमी. ७ आधारयुक्त. ८ शंकराचें सर्व सुख. ९ मस्तकीं.

प्रेमकेशरसमेळा । टिळक रेखिला पिंवळा । निर्धार† अक्षता निढळा । राम प्रेमळां पढियंता ॥ २८ ॥ अहंमृग विंधिला निर्लोभेंसीं । सोहं काढोनि मृग-नाभीसीं[1] । तेही अर्पिलें श्रीरामासीं । निजांगासी चर्चोनी ॥ २९ ॥ जन विजन विवंचून । काढिला निजधैर्यचंदन । त्याचेंही सुगंध काढून । उद्वर्तन[2] श्रीरामा ॥ ३० ॥ त्यजूनि स्वधर्मकर्मफळा । तोचि मुक्ताफळमाळा । शोभे श्रीरामाच्या गळां । राम प्रेमळां पढियंता ॥ ३१ ॥ ओंकार तोचि कंबुकंठ[3]। तेथोनि वेदांसी वाहती वाट । गर्जती विधिशब्दें उद्भट । होती प्रकट त्रिकांडीं ॥ ३२॥ त्वंपदतत्पदा-तीत । हृदयीं पदक सदोदित । साधु चिद्रत्नजडित । लखलखीत निजतेजें ॥ ३३ ॥ म्हणती कांसे कशिला पीतांबर । श्रीरामकांसे चिदंबर । झांकी शून्यत्वाचें छिद्र । कांसे अच्छिद्र श्रीराम ॥ ३४ ॥ श्रीरामकांसेसी दृढ भारी । एकपत्नीव्रतधारी । कांसे लागलियातें तारी । भवसागरीं तारक ॥३५॥ श्रीराम आकळे सगळा । भक्तिभावार्थे कटीं मेखळा । क्षुद्रघंटिकाज्वाळमाळा । जाहल्या सकळा ऋद्धि-सिद्धि ॥ ३६ ॥ सूक्ष्ममध्याची रचना । अभिमान होता पंचानना । श्रीराममध्य देखोनि नयना । लाजोनि राना तो गेला ॥ ३७ ॥

श्रीरामदर्शन-फळः— पाहतां श्रीराममध्यासी । सिंहाडे[4] जडले मेखळेसी । सर्वस्वें लोभले श्री-रामासीं । जावों रानासी विसरले ॥ ३८ ॥ श्रीराम चरणींची स्थिती । श्रीराम गतीची निजगती । श्रीराम गतीसी विश्रांती । जाण निश्चितीं जानकिये ॥ ३९ ॥ श्रीरामचरणाचें निजभूषण । वांकीनें वेदां आणिलें उणें । तंव धरोनि ठेले मौन । राम-कीर्तन हें गर्जे ॥ ४० ॥ चहूं[5] वाचां परात्पर । चरणीं गर्जे तोडर । श्रीरामपद चिन्मात्र[1] । श्रीराम-चंद्र परब्रह्म ॥ ४१ ॥ लक्षितां श्रीरामाचें ठाण[2] । त्यासी ठेंगणें गगन । पाहतां श्रीरामाचें मन । पडिलें मौन श्रुतिशास्त्रां ॥ ४२ ॥ पाहतां श्रीरामाचे गुण । सगुण दिसताहे अगुण । श्रीरामें हरिले त्रिगुण । निजनिर्गुण श्रीराम ॥ ४३ ॥ लक्षितां श्रीरामलक्षण । जो लक्षी तो विचक्षण । लक्ष्यालक्ष्यविलक्षण[3] । लक्षणालक्षण त्या नाहीं ॥ ४४ ॥ श्रीराममुखींचीं अक्षरें । अमृतापरीस अति मधुरें । सभाग्य सेविती श्रवणद्वारें । आनंदरस भरे सर्वांगीं ॥४५॥ देखतां श्रीरामाचें मुख । फिकें होय समाधिसुख । स्वप्नींही न देखे दुःख । हरिलें हरिख कोदाटे ॥ ४६ ॥ कोदाटलें परब्रह्म । ब्रह्मरूप क्रियाकर्म । हरपले धर्माधर्म । जाहला[4] उपरम[4] वेदवादा ॥४७॥

लक्ष्मणवर्णन— ऐसा श्रीराम नेटका । तैसाचि सौमित्र निजसखा । दोघां अभिन्नत्व देखा । भिन्न आवांका दिसताहे ॥ ४८ ॥ घालोनियां लोटांगण । तुज कुशल कल्याण । स्वयें पुसे लक्ष्मण । पुसे कल्याण श्रीराम ॥ ४९ ॥

त्याचा सीतेवर परिणाम —ऐसें हनुमंतें सांगतां । तटस्थ ठेली श्रीरामकांता । आपआपणा विसरे सीता । हनुमंताचेनि बोलें ॥ ५० ॥ हनुमंतें बोला-आंत । अवघाचि आणिला श्रीरघुनाथ । तेणें सीतेचा मनोरथ । सदोदित स्वानंदें ॥ ५१ ॥ हर्ष न माये पोटीं । संतोषाचिया कोटी । तेणें सुखें सीता गोरटी । घातली मिठी हनुमंता ॥ ५२ ॥ वानर वदे मनुष्यवाणी । श्रीरामकथा त्याचे वदनीं । जिये कथेच्या श्रवणीं । भवबंधनीं निर्मुक्त ॥ ५३ ॥ ऐकतां वानराच्या गोष्टी । सत्य श्रीरामासी जाहली भेटी । निरसोनियां दुःखकोटी । ओतिली सृष्टी सुखरूपें ॥ ५४ ॥ हर्षाचिया लवलाह्यां । स्वानंदें

१ कस्तूरीसह. २ उटी. ३ शंखाकृति कंठ. ४ सिंह. ५ परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी.

† बक—निधी

१ ज्ञानस्वरूप. २ शरीररचना. ३ लक्ष्य आणि अलक्ष्य यांहून वेगळा. ४ कुंठित झाला.

पसरोनि बाह्या । आलिंगिलें कपिराया । जेंवी कां माया प्रियपुत्रा ॥ ५५ ॥ सीतेसी सुख जाहलें गाढें । पुत्रसुख तें तृण त्यापुढें । हनुमंत वाडेंकोडें । प्रेमपडिपाडें[१] पढियंत ॥ ५६ ॥

कपे त्वामभिनंदामि चिरजीवी सुखी भव ।
सानुज कुशली रामो येन मेऽद्य निवेदित. ॥ ६ ॥
बलेन यशसा चैव वर्धस्व प्रज्ञयापि च ।
+शतयोजनविस्तीर्णं सागरं मकरालयम् ॥ ७ ॥
विक्रमेण समुल्लंघ्य मदर्थं प्राप्तवानसि ।
न हि त्वां प्राकृतं मन्ये वानर वानरर्षभ ॥ ८ ॥
येनाय राक्षसात्रासस्त्वयैकेन प्रधर्षितः ॥ ९ ॥

रामलक्ष्मणाचें कुशल ऐकून सीतेला झालेला आनंद—श्रीराम भर्ता लक्ष्मण दीर । दोघे सुखसंपन्न वीर । हें ऐकतांचि उत्तर । सुख अपार मज जाहलें ॥ ५७ ॥ श्रीरामस्वरूपाची कथा । जे वदलासि गा हनुमंता । तेणें सुखें ब्रह्मसायुज्यता । न ये तुकिता[२] तुकासी[२] ॥ ५८ ॥

सीता हनुमताची स्तुती करिते —श्रीरामकथा अनुवादोन । तुवां मज केलें सुखसंपन्न । तुज मी वंदेन वरदान । सावधान अवधारीं ॥ ५९ ॥ हनुमंता होईं चिरंजीवी । तेंही जीवित्व ज्ञानानुभवी[†] । नित्य नवे सुखसंभवीं । श्रीरामपदवीवैभवें ॥ ६० ॥ तुज कळिकाळ कांपे चळीं । ऐसा होसी आतुर्बळी[३] । यश पावसी भूमंडळीं । नामसमेळीं श्रीरामें ॥ ६१ ॥ निरसोनियां[४] विज्ञाना[५] । श्रीरामभजनें प्रबुद्ध प्रज्ञा । ज्ञेय मुकलें ज्ञेयपणा । श्रीरामस्मरणाचेनि बळें ॥ ६२ ॥ श्रीरामाचिया स्मरणीं । अपयश निमे तत्क्षणीं । यश न माये त्रिभुवनीं नामस्मरणीं प्रताप ॥ ६३ ॥ चिरंजीव सुखानुभवी । बळ प्रज्ञा आणि यशस्वी । याहून तुझी अधिक पदवी । देवीं दानवीं दखिजे ॥ ६४ ॥ शतयोजन सिंधु अगाध । तुवां लंघिला जैसें गोष्पद । त्यापुढें कायसें माझें नरद । प्रज्ञाप्रबुद्ध हनुमंत ॥ ६५ ॥ तुज म्हणों नये वानर । सुरासुरां दुर्धर । धांडाळोनि लंकापुर । निशाचरें गांजिलीं ॥ ६६ ॥ एकला एक हनुमंत । रावणाचे सभेआंत । राक्षसां करोनि आकांत । लंकानाथ गांजिला ॥ ६७ ॥ लंकेमाजी कडोविकडी । गांजिल्या राक्षसांच्या कोडी । रावणाची सभा उघडी । केली रोकडी तुवां एकें ॥ ६८ ॥ देखतांही दशानन । सभेमाजी घालोनि खाण[१] तुवां नागविले राक्षसजन । शेखीं[२] रावण गांजिला ॥ ६९ ॥ एवढा करितां आकांत । येथें आला हनुमंत । नाहीं कळलें लंकेआंत । ऐसा समर्थ तूं एक ॥ ७० ॥ ऐसा प्रतापिशिरोमणी[३] । पावलासी अशोकवनीं । तूंचि जनक तूंचि जननी । राम घेवोनि शीघ्र यावें ॥ ७१ ॥ तुझी होवोनियां दासी । तुझे चरण झाडीन केशीं । शीघ्र आणावें श्रीरामासी । म्हणोनि पायांसी लागली ॥ ७२ ॥

हनुमंत सीतेजवळ खूण मागतात—आलें हनुमंतासी स्फुरण । व्यर्थ कशाला करिसी रुदन । वेगें देईं आपुली खूण श्रीरघुनंदन आणावया ॥ ७३ ॥ तुज मीं आणिली खूण मुद्रा । तेणें तूं ओळखसी वानरा । खूण देईं श्रीरामचंद्रा सत्य कपींद्रा मानावया ॥ ७४ ॥ काय करिसी देवोनि खूण । न लगे भाक[४] न लगे आण । मज आठवली युक्ति आन । सावधान अवधारीं ॥ ७५ ॥

+पृष्ठमारोह* मे देवि मा भूत्कालस्य पर्ययः ।
त्वमहं पृष्ठलीनायां संतरिष्यामि सागरम् ॥ १० ॥

---

१ प्रेमभरानें. २ तुलना करिता येत नाहीं. ३ पराक्रमी. ४ नाहींसें करून. ५ प्रापंचिक ज्ञानाला.

* क्ष—स्मरण. † बक—ज्ञान अनुभव. ‡ बक—जवें.

+सु. कां. ३६।८, ९

१ शून्याकार. २ शेवटीं. ३ पराक्रमी पुरुषांमध्यें श्रेष्ठ. ४ वचन.

+ सु. का. ३७।२६, २४, २८ * ब—मारोहयदेवी.

शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सकाननाम् ।
द्रक्ष्यस्यद्यैव वैदेहि राघवं सहलक्ष्मणम् ॥ ११ ॥
न हि मे सम्प्रयातस्य त्वां गृहीत्वा वरानने ।
अनुगन्तुं गतिं शक्ताः सर्वलंकानिवासिनाम् ॥ १२ ॥

अथवा पाठीवर येण्याचे सुचवितात—पृष्ठीं बैसल्या सीता। तेच क्षणीं श्रीरघुनाथा। तुज भेटवीन आतां। विलंब वृथा करूं नको ॥ ७६ ॥ शुद्धि सांगावया श्रीरघुनाथा। तुज येथें सांडोनि जातां। राक्षसीं केलिया तुझ्या घाता। शुद्धि वृथा होईल ॥ ७७ ॥ येथें मजचि देखतां। रावण वधूं आला होता। दैवें चुकविलें अनर्था। सांडोनि जातां मज नये ॥ ७८ ॥ शूर्पणखा केली नकटी। तुझा राग तिचे पोटीं। तुज मारील उठाउठीं। महा खोटी राक्षसी ॥ ७९ ॥ सांडोनि जाणें न घडे गोष्टी। वेगीं बैसें माझे पृष्ठीं। करीन श्रीरामासीं भेटी। विकल्प[1] पोटीं धरूं नको ॥ ८० ॥ लंका त्रिकूट कनकगिरी। उपटोनि आपुले बळेंकरीं[2]। एकें उड्डाणें[3] समुद्रीं। नेईन पैलतीरीं जानकीये ॥ ८१ ॥ करोनि एकचि उड्डाण। भेटवीन रामलक्ष्मण। वाहतों श्रीरामाची आण। करीं आरोहण पृष्ठभागीं ॥ ८२ ॥ तुज म्यां नेतां अति त्वरेसीं। राक्षस-महावीरशूरांसी। वेगें न येववेल मजपासीं। त्या मशकांसी काय ठावें ॥ ८३ ॥ आलिया इंद्रजित कुंभकर्ण त्यांसी रणीं विभाडून[4]। रावणातेंही गांजोन। भेटवीन श्रीरामा ॥ ८४ ॥

कथमाकाशपथानं क्रमस्युपरि सागरम् ।
पतिष्यामि हि ते पृष्ठाद्भयाद्वेगेन गच्छतः ॥ १३ ॥
ततो मां पतितां दृष्ट्वा सागरे मकरालये ।
भक्षयत्यप्रतिभया ग्राहाः सागरवासिनः ॥ १४ ॥
+ह्रियमाणां तु मां दृष्ट्वा राक्षसा‡ भीमविक्रमाः ।
§अनुगच्छेयुरादिष्टा रावणेन दुरात्मना ॥ १५ ॥
कथं शक्ष्यसि सयातुं मां चापि परिरक्षितुम् ।
युध्यमानस्य रक्षोभिस्ततस्तैः क्रूरकर्मभिः ॥ १६ ॥
प्रपतेयं च तान्दृष्ट्वा भयार्ता कपिसत्तम ।
अथवा युध्यमानस्य पतेयं विमुखस्य ते ॥ १७ ॥
पतितां मां हनिष्यंति राक्षसा भीमविक्रमाः ॥ १८ ॥

सीतेचें उत्तर. वाटेंत अडथळा किंवा अपघाताचें भय—सीता म्हणे गा अवधारीं। बैसतां तुझे पाठीवरी। तुझिया* वेगें उड्डाणकरीं। पडेन सागरीं हिसळोनी ॥ ८५ ॥ पडतां समुद्राप्रती। मत्स्य मगर मज भक्षिती। तेव्हां तूं पडसी आवर्ती[1]। कैंवी मारुती म्यां† यावें ॥ ८६ ॥ कां धांवणें आलिया मागें वेगीं। तूं परतसील युद्धालागीं। समरांगणीं युद्धभागीं। मी रणरंगीं पडेन ॥ ८७ ॥ मज पडतांचि क्षितीं। क्षोभोनि[2] राक्षस मज मारिती। हेही न घडे गा युक्ती। कैंवी मारुति म्यां यावें ॥ ८८ ॥ मज मारिलियापाठीं। जरी त्वां मारिल्या राक्षसकोटी। सुख नव्हे श्रीरामाचे पोटीं। बुद्धि खोटी हे हनुमंता ॥ ८९ ॥

मारुतीचें उत्तर व सीतेची शंका—सीते ऐक सावध गोष्टी। मज न लगे ¶आटाआटी। माझें पुच्छ कोपलियापाठीं। मारील कोटी राक्षस ॥ ९० ॥ तुज मी राखीन राहीं स्वस्थ। माझें पुच्छ प्रतापवंत। करील राक्षसांचा घात। अर्बुदांत[3] जरी आले ॥ ९१ ॥ सीता म्हणे तूं अल्प मारुती। पुच्छ तंव तुझें किती। कैंवी राक्षसां लावील ख्याती। सत्यत्व चित्तीं मानेना ॥ ९२ ॥

+न मे जानाति सत्त्वं सा प्रभावं वासितेक्षणा ।
तस्मात्पश्यतु वैदेही यद्रूपं परमं मम ॥ १९ ॥
विंध्यमंदरसंकाशो बभौ दीप्तानलप्रभः ।
अग्रतो व्यवतस्थे स सीताया वानरर्षभः ॥ २० ॥

---

१ संशय. २ बळाचे योगानें. ३ उडीनें. ४ पराभवून.

+ सुं. कां. ३७।४१, २२, २४, २८

‡ बक—मकरैः. § बक—प्रहृदिष्यति ते व्योम्नि राक्षसास्त्वां निरायुधम्.

१ भोंवऱ्यात, संकटांत. २ रागावून. ३ दशकोटीपर्यंत.

* ब—तू जया. † बक—मी. ¶ क्ष—युद्ध.

+ सुं. कां. ३७।३४, ३७

मारुतीचें पुच्छप्रतापवर्णन व आश्वासन—सीते म्हणसी वानर किती । काय पुच्छाची शक्ती । पाहें माझी[‡] स्वरूपस्थिती । म्हणोनि मारुति वाढला ॥ ९३ ॥ विंध्याद्रि मेरु मांदार । त्यांहूनि वाढला वानर । जैसा प्रळयकाळीं रुद्र । तैसा दुर्धर जाहला ॥ ९४ ॥ सीते नेणसी माझें सत्व । पाहें माझें स्वरूप प्रभाव । देव दानव आणि मानव । राक्षस सर्व गांजीन मी ॥ ९५ ॥ माझें पुच्छ पाहें प्रतापवंत । राक्षस मारोनियां समस्त । सगळी लंका तुजसमवेत । निमेषार्धांत नेईन ॥ ९६ ॥ विकल्प सांडोनियां पोटीं । सीते बैसें माझे पृष्ठीं । करीन श्रीरामासीं भेटी । सुखसंतुष्टीं स्वानंदें ॥ ९७ ॥ तुज न्यावया श्रीरामाप्रती । पाहें माझी दुर्धर शक्ती। विकल्प सोडोनियां चित्तीं । बैस मारुतिपृष्ठभागीं ॥ ९८ ॥ दुर्धर देखोनि मारुती । देव दानव चळीं कांपती । निधडी[1] निःशंक सीता सती । अनुवादली स्वधर्म ॥ ९९ ॥

[+]त दृष्ट्वाऽचलसंकाशमुवाच जनकात्मजा ।
भर्तृभक्तिं पुरस्कृत्य रामादन्यस्य वानर ॥ २१ ॥
न युक्तो गात्रसस्पर्शः पुरुषस्य मयानघ ॥ २२ ॥

रामावाचून परपुरुष-स्पर्श वर्ज्य —मज भेटावया श्रीरघुपती । निधडी शक्ती तुज मारुती । तुझी देखोनि अचलस्थिती । मज निश्चितीं मानलें ॥ १०० ॥ एका रामावांचोनि जाण । परपुरुषीं आरोहण । तेंचि पतिव्रतेसी दूषण । वेदपुराणसंमत ॥ १ ॥ सांडोनि राम उत्तम पुरुष । नरवानरीं गात्रस्पर्श । तो [2]पातिव्रत्या[*] महादोष । हा इतिहास हरिहरां ॥ २ ॥ अंगोअंगीं प्रवेशून । करितां गुरुपत्नीरक्षण । तेंचि विधूसी[3] दूषण । जाहला संपूर्ण प्रायश्चित्ती ॥ ३ ॥ तैसेंचि मज खांदी वाहतां । दोषी होसील हनुमंता । मी तंव नयें गा सर्वथा । दोहींचे माथां महादोष ॥ ४ ॥ परपुरुषीं अनुसरोन । एकाकीं सहगमन । करितां दोघेंही[¶] दूषण । सत्य जाण हनुमंता ॥ ५ ॥

मारुती सीतेला आपली व रामाची आप्तता सांगतात—ऐसें जानकी बोलतां । हांसों आलें हनुमंता । मज श्रीरामाची अति आप्तता । समूळ कथा अवधारीं ॥ ६ ॥ म्यां अंजनीस पुसिली गोष्टी । माझा स्वामी कोणता सृष्टीं । ते म्हणे सगर्भ कांसोटी । देखे जो दृष्टीं तो स्वामी ॥ ७ ॥ श्रीराम निजला तरुतळवटीं । मज बैसतां वृक्षसंपुटीं । सगर्भ ब्रह्मचर्यकासोटी । देखे दृष्टी श्रीराम ॥ ८ ॥ राम सांगे सौमित्रासी । गर्भीं ब्रम्हचर्य वानरासी । सगर्भकौपीन पाहें यासीं । आश्चर्यासीं सांगत ॥ ९ ॥ एकोनि श्रीरामाचें वचन । माझे ठायीं हें लक्षण । दोघे मनुष्य हीन दीन । स्वामी तयांतें केंवी मानूं ॥ ११० ॥ सेवक सबळ स्वामी निर्बळ । तो स्वामीच सकळ विकळ । पहावया श्रीरामाचें बळ । रणकल्लोळ म्यां केला ॥ ११ ॥ वृक्ष सांडिले शतानुशत। निर्वाणीं[1] सोडिले पंच पर्वत । निद्रा न सांडोनि रघुनाथ । वृक्ष पर्वत छेदिले ॥ १२ ॥ श्रीराम कृपाळु पैं पुरा । बाणीं न मारोनि वानरा । बाणपिसारीं सोडिला वारा । मज अंबरा[2] उडविलें ॥ १३ ॥ बाणपिच्छाचे[3] झडाडें । हात पाय जाहले वेंव्हडे[4]। दांत विचकिले म्यां माकडें । उगवीं वेढे निजपुच्छा ॥ १४ ॥ ऐसी पडतां मुरकुंडी । पिता पवन लवडसवडीं । येवोनिया अति तांतडीं । बुद्धि गाढी सांगितली ॥ १५ ॥ श्रीराम परमात्मा परिपूर्ण । त्याची पाहतां आंगवण । तुझा तत्काळ जाईल प्राण । श्रीरामार्पण देह करीं ॥ १६ ॥ रामाझे

१ धैर्यवान्. २ पतिभक्तीच्या व्रताला. ३ चंद्राला.

[‡] बक—मारुतस्थिती. * व—पतिव्रता माझ्या दोष.
+ सु. कां. ३७, ४१, ६२

१ अखेरीला. २ आकाशांत. ३ बाणपिसाऱ्याच्या. ४ वांकडे.

¶ ड—दोहींसी.

विकावें जीवित्व । श्रीरामसेवेसीं देह विकीत । श्रीरामासवें नित्य तृप्त । द्वंद्वनिर्मुक्त तूं होसी ॥ १७ ॥ ऐकोनि पितयाचें वचन । काया वाचा मनें अनन्य शरण । मस्तकीं वंदोनि श्रीरामचरण । श्रीरामार्पण देह केला ॥ १८ ॥ राम ध्यानीं राम मनीं । श्रीराम नित्य निदिध्यासनीं । राम कानीं राम नयनीं । वस्ती वदनीं श्रीरामनामा ॥१९॥ श्रीराम आसनीं शयनीं । श्रीराम नित्य गमनागमनीं । श्रीराम सुस्वादुभोजनीं । जागृतिस्वप्नीं श्रीराम ॥ १२० ॥ ऐसा मी अनन्य श्रीरामभक्तीं । तुझा विकल्प परपुरुषार्थीं । सावध ऐक तेही अर्थीं । अतिगुह्योक्ती सांगेन ॥ २१ ॥

व स्वतःचें गुह्य कथन करितात–गर्भीं ब्रह्मचर्य-कौपीन । अंजनी माता न देखे नग्न । माझ्या लिंगाचें दर्शन । स्रष्टा[1] आपण पावेना ॥ २२ ॥ ऐसी देखोनि माझी स्थिती । मुद्रिका देवोनि माझे हातीं । मज धाडिलें वो तुजप्रती । तुझ्या चित्तीं विकल्प ॥ २३ ॥ श्रीरामें सांगितली खूण । कर-विलीं वल्कलें परिधान । तुज नेसतां न ये जाण । श्रीरामें आपण नेसविलीं ॥२४॥

सीतेचा प्रश्न. रामाची आज्ञा काय आहे ? शुद्धी का स्वतःला आणणें ?–खूण सांगतां हनुमंता । चित्तीं चमत्कारली सीता । विकल्प सांडोनि तत्वतां । गुज एकांता अनुवादे ॥२५॥ श्रीरामाज्ञा वंद्य आम्हांसी । श्रीरामें काय सांगितलें तुजपासीं । तुवा आणावें सीताशुद्धीसी । किंवा सीतेसी आणावें ॥ २६ ॥ जरी आणविलें सीतेसी । तरी मी येईन तुजसरसी[2] । आणविलें असेल शुद्धीसी[3] । तरी वेगेंसीं त्वां जावें ॥ २७ ॥

हनुमंताचें उत्तर व सीतेचा निरोप— ऐसें तिणें पुसतां । गहिंवर आला हनुमंता । धन्य धन्य सती सीता । निर्लोभता सज्ञान ॥ २८ ॥ सावध अवधारीं वो माते । असत्य न बोलें मी येथें । रामें आणविलें शुद्धीतें । हेचि निश्चितें श्रीरामाज्ञा ॥ २९ ॥ सीता म्हणे हे हनुमंता । विलंबू न करावा सर्वथा । शीघ्र जावोनियां आतां । शुद्धि रघुनाथा सांगावी ॥ १३० ॥ माझी कृपा आहे हनुमंता । तरी जाऊन शीघ्रता । शुद्धि सांगावी श्रीरघुनाथा । चरणीं माथा ठेवोनी ॥ ३१ ॥ सीतानेत्रीं अश्रू मुखीं दीन । करिता हनुमंता गमन । वानरें अंगुष्ठ दांतीं धरून । घातलें लोटांगण सीतेसी ॥ ३२॥ ऐकोनि सीताकरुणावचन । तेणें हनुमंता आलें स्फुरण । शीघ्र देईं आपली खूण । आताचि गमन मी करितों ॥३३॥ मुद्रिका देवोनि जाण । निरोपें सांगितली खूण । तेंवीच त्वां देखोनि भूषण । मुखें वचन मज सांगें ॥३४॥ तुवां निजवस्त्रां भूषणांसी । साडिलें किष्किंधे वानरांपासीं । तेंचि दावितां श्रीरामासी । उकसां-बुकशीं स्फुंदत ॥३५॥ ऐसी तुझी वो अवस्था । अतिशयेंसीं श्रीरघुनाथा । नित्य स्मरणीं सीता सीता । प्रिय कांता [1]पढियंती ॥३६॥ सत्य मानी लंकागमन । तैसें देईं निजभूषण । तैसेंचि सांगें मुखें वचन । श्रीराम पूर्ण सुखावे ॥ ३७ ॥

+अभिज्ञान तु रामस्य ददावात्मविभूषणम् ।
क्षिप्त्वेषीकामिंद्रकाकः काकुत्स्थेन पलायितः ॥२३॥
मनःशिलायस्तिलको गंडपार्श्वे निवेशित' ॥ २४ ॥

सीता हनुमताजवळ खुणेचा मणी देते व लक्ष्मणाला क्षमापन सांगते–ऐसें हनुमंतें सांगतां । सुखें सुखावोनि सीता । वेणिये मणी माथां होता । धाडी रघुनाथा खुणेसीं ॥ ३८॥ श्रीरामसुखें सुखसमेळा । मनशिळेचा युक्त टिळा । निजहस्तें लावी कपाळा । हेही गोळांगूळा[2] खूण सांगे ॥ ३९ ॥ माझें ऐकतांचि उत्तर । [3]कागावरी सोडी ब्रह्मास्त्र । ही

१ ब्रह्मदेव. २ तुझ्याबरोबर. ३ शोध.

१ आवडती. २ वानरा. ३ कावळ्यावर.

+ सु. कां. ४०।४, ५

गुह्य गोष्टी सांगतां गंभीर । श्रीराम साचार मानील ॥ १४० ॥ काग हिंडतां तिहीं लोकां । कोणाही नव्हे आवांका[१] । शरण आला रघुकुळटिळका । मग दर्भशिखा निवारिली ॥४१॥ वामनेत्र घेवोनि जाण । कागाचा वांचविला प्राण । हे सांगतां निजखूण[२] । श्रीरघुनंदन सुखावे ॥ ४२ ॥ ऐसीं शस्त्रास्त्रें तुजपासीं । तरी का धांवण्या न धांवसी । मृगापाठीं धाडिलासी तेणें रुसलासी श्रीरामा ॥ ४३ ॥ तो अपराध करोनि क्षमा । धांवण्या येवोनि श्रीरामा । बंधमोचन करीं आम्हां । पुरुषोत्तमा कृपाळुवा ॥ ४४ ॥ लक्ष्मणासी लोटांगण । तुझें म्यां व्यर्थ केलें छळण । त्या पापाचें फळ हें जाण । मज रावण गांजितो ॥ ४५ ॥ छळणपाप अति अद्भुत । सीता आणि श्रीरामाआंत । आडवे आले सिंधु पर्वत । दूरी दूरस्थ निर्बंध[३] ॥ ४६ ॥ छळणपापाची हे ख्याती । पापिष्ठ रावणाचिये हातीं । बंदीं पडली सीता सती । श्रीरघुपति क्षोभला ॥ ४७ ॥ छळणपाप अति दारुण । ना श्रीराम ना लक्ष्मण । राक्षसांचें नित्य छळण । मज म्यां पूर्ण छळियेलें ॥ ४८ ॥ लक्ष्मणासी लोटांगण आतां । अनन्य[४] शरण श्रीरघुनाथा । शुद्धि सांगतां हनुमंता[५] । अति शीघ्रता पावावें ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । वानर वनविध्वंसन । करील निर्दळण राक्षसां ॥ १५० ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताहनुमत्संवादो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ १५० ॥ ॥ श्लोक ॥ २४ ॥ एवं ॥ ॥ १७४ ॥

---

१ धैर्य. २ मोठी खूण. ३ अडथळा, प्रतिबंध. ४ एकनिष्ठतेनें. ५ मारुतीनें. ६ कारणानें.

## अध्याय १३ वा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

+मणिं दत्वा ततः सीता वानरं वाक्यमब्रवीत्
मणिं दृष्ट्वा रघुपतिस्त्रयाणां संस्मरिष्यति ॥ १ ॥
वीरो जनन्या मम च राज्ञो दशरथस्य च ।
त्वमस्मिन्कार्यनियोगे प्रमाणं हरियूथप ॥ २ ॥
स तथेति प्रतिज्ञाय मारुतिर्भीमविक्रमः ।
शिरसा वंद्य वैदेहीं गमनायोपचक्रमे ॥ ३ ॥

मणी पाहून श्रीरामचंद्रास गतगोष्टींचें स्मरण होईल तें सीता सांगते—मणि देवोनि वानराहातीं† । स्वयें बोले सीता सती । मणि देखोनि रघुपती । स्मरेल चित्तीं तिघांतें ॥१॥ कौसल्या माता आणि सीता‡। आठवेल दशरथ पिता । तिघे आठवती श्रीरघुनाथा । कोण्या अर्थी[६] तें ऐका ॥ २ ॥ पूर्वी समुद्रमंथनीं । तेथें निघाला कौस्तुभमणी । तो घेतां श्रीविष्णूनीं । इंद्र तें क्षणीं तळमळी ॥ ३ ॥ ब्रह्मशापाच्या शापोक्तीं । सिंधुनिमग्न[१] सर्व संपत्ती । त्यांतील कौस्तुभ श्रीपती । माझा मजप्रती देइजे ॥ ४ ॥ इंद्र मणि मागे करोनि ग्लानी । विष्णु त्यास दे फणिमणि बदलोनी । इंद्रें देखतांचि नयनीं । केला कंठमणि आल्हादें ॥ ५ ॥ इंद्रें नमुचीचिया[२] युद्धासीं । साह्य नेलें दशरथासी । रायें निर्दाळोनियां[३] दैत्यासी । युद्धीं इंद्रासी जयो दिधला ॥६॥ युद्धीं इंद्र संतोषोनी । दिधला दशरथासी कंठमणी । रायें निजनगरासी आणोनी । दिधला प्रियपत्नी कौसल्ये ॥ ७ ॥ कौसल्येनें अति प्रीतीसीं । तो मणि दीधला जानकीसी । तिणें घालोनि वेणीसीं । वनवासासीं आणियेला ॥ ८ ॥ तोचि मणी हनुमंताहातीं । खूण पाठवितां श्रीरघुपती । राजा माता

---

१ समुद्रांत बुडलेली. २ नमुचिनामक दैत्याच्या. ३ मारून.

---

+ अ. ३९।१,२

† ब–हनुम्या, क–हनुमत. ‡ ब–+ मी.

सीता सती। तिचे आठवती श्रीरामा ॥९॥ ही खूण देवोनि तत्वतां। आणावें गा श्रीरघुनाथा। हेंचि कार्य प्रमाणता। तुझे माथां कपिराया ॥ १० ॥ हनुमान म्हणे न करीं चिंता। शीघ्र आणीन श्री रघुनाथा। साष्टांगें सीता नमिली माथां। येरी हनुमंता कुरवाळी ॥ ११ ॥

हनुमानुवाच—इदं वनमशोकं च नंदनोपममुत्तमम्।
+बलाद्विध्वंसयिष्यामि शुष्कें वनमिवानलः ॥४॥
ततो महत्साश्वमहारथाधिकं बलं समानेष्यति राक्षसाधिपः
निहत्य तद्रावणचोदितं बलं
सुखी गमिष्यामि कपीश्वरालयम् ॥ ५ ॥

खूण घेतल्यावर कुरापत काढावी म्हणून मारुती सीतेची आज्ञा मागतात—खूण पुसोनि सीतेपाशीं। हनुमान विचारीं मानसीं। युद्ध न करितां राक्षसांसीं। श्रीरामापासीं [1]नवजावें† ॥ १२ ॥ येथें कलहासी कारण। रावणाचें अशोकवन। नंदनवनासीं समान। तें विध्वंसीन[2] निजबळें ॥ १३ ॥ ऐकोनि वनविध्वंसनकथा। कोप येईल लंकानाथा। धाडील असंख्य गजरथां। दृढ युद्धार्थां महावीर ॥ १४ ॥ युद्ध करावया सैन्यासीं। निर्दाळोनि त्या राक्षसांसी। इंद्रजिता करोनि कासाविसी। श्रीरामापासीं मग जावें‡ ॥ १५ ॥ मारोनि राक्षसांच्या कोडी। लंका करोनि फडाफोडी। मग श्रीरामापासीं जातां गोडी। ऐसी आवडी हनुमंता ॥ १६ ॥ इतकें करोनि जातां। सुख कपिकुळा समस्ता। सुख होईल श्रीरघुनाथा। सुख हनुमंता युद्धाचें ॥ १७ ॥ सीतेचें न घेतां आज्ञापन। मज विध्वंसितां नये वन। सीतेसी पुसावया जाण। करी विंदान[3] हनुमंत ॥१८॥ पुढती सीतेस लोटांगण। येरी म्हणे बा शीघ्र करीं गमन। हनुमंत खालती घाली मान। लज्जायमान बोलेना ॥ १९ ॥ सीताशुद्धि सांगावया जाण। उल्हास न देखे संपूर्ण। दिसतोसी अति उद्विग्न। काय कारण मज सांगें ॥ २० ॥ बोले तुझें करितां शोधन। नाहीं अन्न ना जीवन[1]। क्षुधेनें जावूं पाहे प्राण। सिंधूल्लंघन न करवे ॥ २१ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। सीतेसी आलें पैं रुदन। यासी न देतां समाधान। केंवी गमन मी करवीं ॥ २२ ॥ याचें न पुसतां स्वागत। नाहीं केलें अभ्यागत। महा पापिणी मी येथ। धाडितें श्रीरामभक्त भुकेला ॥ २३ ॥ ऐकें सखया हनुमंता। शिणलासी मज शोधितां। जीवें ओंवाळीन तत्वतां। सांगतें आतां तें करीं ॥२४॥ हें घेवोनि करकंकण। लंकेमाजी जावोनि आपण। घेवोनि चतुर्विध[2] अन्न। करीं भोजन यथेष्ट ॥ २५ ॥ हनुमान पुसे सीतेपासीं। अन्नाची चवी आहे कैसी। सीता विस्मित मानसीं। तरी तुम्हांसी काय भक्ष्य ॥२६॥ जे खाताती लवण[3]। त्यांसी शीघ्र ये म्हातारपण। चुना लावोनि तांबूलभक्षण। दंत भग्न तेणें त्यांसी ॥ २७ ॥ आम्ही श्रीरामदूत वानर। वनवासी निरंतर। नित्य वनफळांचा आहार। सत्य साचार जानकी ॥ २८ ॥ माझें मोडोनि कांकण। लंकेमाजी फळें पूर्ण। आवडतील तीं घेवोनि जाण। फळभोजन करीं बापा ॥२९॥ सीते ऐकें माझें शीळ। मी तंव स्वयंपाकी[4] केवळ। त्यासी मनुष्याचा विटाळ। तें फळ अपवित्र वानरा ॥ ३० ॥

पुढील परिणामपरंपरा मनात आणून सीतेचा अनिश्चय—स्वहस्तें तोडोनि फळसंभार। स्वयें भक्षूं आम्ही वानर। आतळल्या सुरनर। तें फळ वानरें भक्षूं नये ॥ ३१ ॥ सीता म्हणे या वनाआंत। मधुर सुंदर फळें अद्भुत। तुवां लावितांचि हात।

१ न जावें. २ नासून टाकीन. ३ युक्ति.

+ अ ४१।११ १२ † क्ष—मी न वचे.

‡ क्ष—जाणें.

१ पाणी. २ भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य इत्यादि चार प्रकारचें. ३ मीठ. ४ स्वतः पाक करून खाणारा.

करील घात रावण ॥ ३२ ॥ तूं निमालिया हनुमंत। तोचि मजला प्राणांत। दुःखें निमेल श्रीरघुनाथ। समवेत सौमित्रा ॥ ३३ ॥ श्रीराम निमाल्यापाठीं। निमती सुग्रीव कपींच्या कोटी। भरत शत्रुघ्न जगजेठी। उठाउठीं निमतील ॥३४॥ या फळांसी लावितां हात। येवढा होईल अनर्थ। हनुमान म्हणे असो वृत्तांत। जातों येथोनि* भुकेला ॥ ३५ ॥

हनुमंताचा उद्वेगाविष्कार–वन दिसताहे सफळ। माझेंचि कपाळ निष्फळ। निरोप नेदी जनकबाळ†। काळवेळ मज आली ॥३६॥ मार्गीं क्षुधेनें जातील प्राण। श्रीरामापासीं सांगेल कोण। तुझी न होईल सोडवण। विघ्न दारुण ओढवलें ॥ ३७ ॥ क्षुधा नव्हे हा कल्पांत। माझा होईल प्राणांत। ऐसें बोलतां हनुमंत। सीता हृदयांत कळवळली ॥ ३८ ॥

सीतेचा कळवळा व क्षुधाहरणापुरती आज्ञा–जंव होय क्षुधाहरण। पडलीं फळें खाईं संपूर्ण। घालितें श्रीरामाची आण[1]। फळें तोडोन न खावीं ॥३९॥

हनुमंताचा आनंद–ऐकोनि सीतेच्या आणेसी। हनुमान खाजवी दोन्ही कुशी। हें मानलें मज मानसीं। आला वृक्षांसी पैं अंत ॥ ४० ॥

व पुढील कार्यांचा विचार व प्रारंभ–सांडोनि सीतावनपैसार। दूरी जावोनि बैसला वानर। करावया फळाहार। करी विचार मारुती ॥ ४१ ॥ मेळवी‡ प्रळयकाळाग्नी। अभिमंत्री जठराग्नि। मग बैसला फळभोजनीं। सावधान हनुमंत ॥ ४२ ॥ भोजनसमयींचे अतीत[2]। मुख्य द्विज[3] मुखाआंत। आधीं यांसी करोनि तृप्त। धर्मयुक्त भोजन ॥४३॥ द्विजीं न घेतां अवदान[4]। स्वयें घेवों नये अन्न। प्रथम द्विजांचें भोजन। करी सर्वज्ञ मारुति ॥४४॥ द्विज दोन्ही पंक्तीं सादर। पुच्छा आज्ञा देवोनि वानर। वेगीं अर्पी फळसंभार। रुचिकर स्वादिष्ट ॥ ४५ ॥ देखोनि साकरेचे टेक[1]। लिंबरसेंसीं आवश्यक। आधीं सेवूं पित्तशामक। मग अनेक फळें भक्षूं ॥ ४६ ॥ उपडोनियां निंबोणी नारंगी। साकरनिंबोणी मातुलिंगी[2]। मेळवोनि साकरेच्या भागीं। मग आरोगी[3] गटगटां ॥४७॥ श्रीरामाची आण पाळित। वृक्ष उपडोनिया सांडित। पडलीं फळें खाय हनुमंत। आज्ञा नेमस्त सीतेची ॥४८॥ आंबे जांबळें फणस जंबेरी। कर्दळीफळांचा गटका करी। पिंपळ्या मिरें घोस माझारी। लोणच्यावारी भक्षित ॥४९॥ द्विजांसी सांगे हनुमंत। भोक्ता म्हणा श्रीरघुनाथ। द्विज कांहीं न बोलत। अति लोलुप[4] रसस्वादा ॥ ५० ॥ द्वीपद्राक्षाचे घड। खर्जुरीफळें अति गोड। पुच्छें पुरविलें कोड। करोनि उपाड झाडांचा ॥ ५१ ॥ हनुमान आपोशन न मोडी। बैसली बैसका न सोडी। पुच्छ करी वाढावाढी। फळें झोडित आहेचि ॥ ५२ ॥ चोरें बोरें मोहें भोकरें। आवळे उंबरें टेंबरें। भोक्ता श्रीराम येणें उत्तरें। फळें वानरें भक्षिलीं ॥ ५३ ॥

विशेष वर्णन–धामणें येरमणें तोरणें। झेपे† जेथ पाण्यावळें गोंदणें। पिकल्या करवंदांचें खाणें। श्रीरामार्पणें गटकावी ॥ ५४ ॥ पिकलीं खाय गटगटां। हिरवीं खाय तोंडपालटा। जारसें‡ खाय मटमटां। सुरां श्रेष्ठां विटावित[5] ॥ ५५ ॥ ऊसरसें भरली मांदणी[6]। जेंवी तान्हेला प्राशी पाणी। तेंवी तें नेलें प्राशूनी। ढेकर देवोनि पाहत ॥ ५६ ॥ डोळे मिचकावी देवांकडे। आंगठा दावी दैत्यांकडे। वांकुल्या दावी दानवांकडे। मानवांकडे घुलकावी* ॥ ५७ ॥ हनुमंताचे अंगवातें। सुगंधसुमनें पारिजातें। चंदनागुरु तरु समस्तें। उन्मूळती समूळीं

१ शपथ. २ अतिथी. ३ दात ब्राह्मण. ४ आहुती.

* ड्रक्ष–कुथत. † ब–बाळी. ‡ ड्रक्ष–मेळवुनी.

१ ढीग. २ महाळुंगें. ३ खाई. ४ लोभी, लुब्ध. ५ पक्व. ६ वेडावीत. ७ भाडें (मातीचें).

† बड–सेंबे, क्ष–सैप पाणी आवळे. ‡ बक–जारतें.

* बक–घुलकावीं.

॥ ५८ ॥ भोंवता पुच्छाचा आवर्त[१] । पक्षी किलकिलती गगनाआंत । वृक्ष कडकडां मोडित । होत आवर्त वृक्षांसी ॥ ५९ ॥ उपडोनियां पोफळी । मुखशुद्धीच्या पैं मेळीं । पोफळी घाली दाढेतळीं । वनरांगोळी मांडिली ॥ ६० ॥ शाल ताल तमाल नारिकेळी । उपडोनियां केळी वरवाळी[२] । घेतां राक्षसांसवें फळीं[३] । हातातळीं हाणावया ॥ ६१ ॥ ऐसी युद्धाची सामग्री । रचोनियां देवद्वारीं । हनुमंत बैसलासे शिखरीं । त्याहून दूरी वृक्ष टाकी ॥ ६२ ॥

+तद्वनं मथितं वृक्षैर्भग्नाश्च सलिलाशयाः ।
लतागृहं चित्रगृहं नाशितश्च गृहातरः ॥ ६ ॥
तत्कृत्वा सुमहत्कृत्यं हनूमान्दर्शयद्बलम् ।
चकार सुमहद्रूपं राक्षसीना भयावहम् ॥ ७ ॥
ततो गतायां निद्रायां राक्षस्यो विकृताननाः ।
तद्वनं ददृशुर्भग्नं तं च वीरं महाकपिम् ॥ ८ ॥

रक्षकाची गडबड व समुद्रार्पण—ऐकोनि वनभंग आघात । वनकर भयें चकित । राक्षसिणी उठल्या समस्त । ज्या कां विरूप विक्राळा ॥ ६३॥ स्वयंभू वृक्षांचे उत्पाट । मोडल्या सारणी रहाट पाट । विचित्र गृहें केलीं पीठ । केलीं सपाट लतागृहें ॥ ६४ ॥ न लावी देवाल्यां हात । मोडिया गोपुरें[४] समस्त । अंतरगृहें विध्वंसित । तेणें विस्मित वनकर[५]॥ ६५ ॥ राक्षस वृक्षांतळीं निद्रित । जे कां सबळ रावणाईत । ते वृक्ष उपडोनि समस्त । केले दूरस्थ हनुमंतें ॥ ६६ ॥ तंव वनकर जागृत होत । तों वृक्षमात्र न दिसती तेथ । तेणें ते जाहले अति विस्मित । केलें विपरीत महेशें[६] ॥ ६७ ॥ मागोनि आणिले महेशापासीं । ते वृक्ष नेले कैलासासीं । किंवा उडाले आकाशीं । वनकरांसी लक्षेना ॥६८॥ दुर्धर रावणाचें शासन । मिथ्या वनविध्वंसन । आम्हीं देखतों हें स्वप्न । म्हणोनि नयन लाविले ॥ ६९ ॥ तंव त्या राक्षसी कळवळित । वानर नव्हे हा काळ कृतांत । संचरोनि वनाआंत । राक्षसां घात करूं आला ॥७०॥ ऐकोनि वनकर धांवती । कोठें कोठें तो मारुती । धरा धरा तो बहुतां हातीं । रावणाप्रती नेऊं आम्ही ॥ ७१ ॥ वनकर अति दुर्धर । एकवटले चवदा सहस्र । स्वयें धरावया वानर । अति सत्वर धांवले ॥७२॥ एक विंधिती बहुतकांडें । एक हाणिती गोफणगुंडे । एक सवेग हाणिती धोंडे । हनुमान पुढें लक्षोनी ॥ ७३ ॥ वनकर आले अति गर्जत । हनुमान बैसला सावचित्त । करावया वनकरांचा घात । पुच्छ प्रेरित साटोपें ॥ ७४॥ पुच्छघातीं अति उद्भट[१] । धरितां ओढोनि करी पीट । शस्त्रें करोनियां सपाट । वीर उद्भट गांजिले ॥७५॥ वाजतां पुच्छाचा पैं साट[२] । वनकरां भोंवलासे आट[३] । पुच्छें कवळिले सगट । हृदयस्फोट राक्षसां ॥ ७६ ॥ जो जो पळोनि जाय जिकडे । पुच्छ आडवें तिकडे तिकडे । राक्षसां ओढवलें सांकडें[४] । मागें पुढें रिघवेना ॥ ७७ ॥ ऐसें गोवोनि वनकरांसी । हनुमंतें बांधोनि पुच्छासीं । निक्षेपिलें[५] समुद्रासीं । मत्स्य मगरांसी आहारार्थ ॥ ७८ ॥ भूतें जाहलीं दीनवदन । वनकर चवदा सहस्र जण । दिधलें सागरीं मीनां[६] भोजन । आम्हांसी लंघन चुकेना ॥ ७९ ॥ तंव बोलली महाकाळी । हनुमान मारील राक्षस बळी । मेदमांसरुधिरांजुळीं । भूतां सकळ अति तृप्ति ॥ ८० ॥ दिधलें मीनां मीनभोजन । देईल भूतांसी भूतभोजन । वृक[७] जंबूक[८] घारी गीध जाण । तृप्ति भोजन काळासी ॥ ८१ ॥ भूतें पुसती जगदंबेसी ।

१ वेढा. २ नाश. ३ युद्ध. ४ पुरद्वारें. ५ राखणे. ६ शंकरानें.

+ सु. का. ४१–१२, १९. ४२–४, ३.

१ भयंकर. २ तडाका. ३ अटकाव. ४ सकट. ५ टाकिलें. ६ माशाना. ७ लांडगे. ८ कोल्हे.

† ब—पुच्छ आघात.

ऐसें होईल कवणे दिवसीं। येच क्षणीं येच दिवसीं। तृप्ति सर्वांसी हनुमंतें ॥ ८२ ॥

+राक्षस्यो वानरं दृष्ट्वा पप्रच्छुर्जनकात्मजाम्।
कोऽयं कस्य कुतो वाऽयं किंनिमित्तमिहागतः ॥९॥
कोऽयं वा त्वयि संवादं वानरः कृतवानसौ।
अथाब्रवीत्तदा साध्वी सीता सर्वांगविज्वरा ॥ १० ॥
रक्षसां कामरूपाणां विज्ञाने मम का मतिः।
वैदेह्या वचनं श्रुत्वा राक्षस्यो भयविह्वलाः ॥११॥
स्थिताः काश्चिद्गताः काश्चिद्रावणाय निवेदितुम्। १२ ॥

चवदा सहस्र वनकरांसी। हनुमान निर्दाळी पुच्छेंसीं। तेणें भयभीत राक्षसी। सीतेपासीं पुसताती ॥ ८३ ॥

राक्षसींची सीतेजवळ चौकशी—कोण कोणाचा कैंचा थोर। येथें आला हा वानर। तुज करोनि नमस्कार। कोण विचार दृढ केला ॥ ८४ ॥ तुझ्या घेवोनि आज्ञेसी। येणें मारिलें वनकरांसी। तुझेनि बोलें वन विध्वंसी। तुवां द्वंद्वासी पेटविलें ॥ ८५ ॥ सीतेभोंवत्या राक्षसी। कलकल करिती चौपासीं। धरा मारा बांधा केशीं। इणें वानरासी चेतविलें ॥ ८६ ॥

सीतेचें उत्तर—सीता निःशंक मानसीं। भय न मानी राक्षसींसीं। यथोचित[1] बोले त्यांसी। राक्षसांपासीं बहु माया[2] ॥ ८७ ॥ मारीच होवोनि मृगवेषी। प्रतारितां[3] श्रीरामासी। स्वयें मुकला निजदेहासी। राक्षसांपासीं बहु माया ॥ ८८ ॥ शूर्पणखा सुंदरवेषीं। छळों आली लक्ष्मणासी। कपटें नाडिलें नासिकासी। राक्षसांपासीं बहु माया ॥ ८९ ॥ छळोनि हरावया सीतेसी। रावण जाहला संन्यासी। मूळींच भीक लागली त्यासी। राक्षसांपासीं बहु माया ॥ ९० ॥ अमित माया राक्षसांपासीं। कोण कोणाचा वानरवेषी। हें काय पुसतां मजपासीं। निजमाया तुम्हीं जाणा ॥ ९१ ॥

हनुमानाचें गुरकावणें व राक्षसींची दाणादाण—राक्षसी देखोनि सीतेपासीं। हनुमान गुरकावी तयांसी। वेगीं पळती विव्हळतेसीं। अति भयासीं भयभीत ॥ ९२ ॥ एकी चळचळां कांपती। एकी फळफळां मूतती। एकी भयें भुली भूलती। एकी पडती मूर्च्छित ॥ ९३ ॥ बोंब न करवे गाढी। जिव्हेसी वळली बोबडी। एकी अंधारीं देती दडी। आंत[1]† तों तोंडी पैं एकी ॥ ९४ ॥ एक भयचकित भीती। नेसणीं गळालीं नेणती। नागवीं रावणापासीं जाती। मग सांगती वनबोंब ॥ ९५ ॥ एकी त्या भयाचे निर्भरें। राक्षसां म्हणती पळा रे त्वरें। पुच्छें मारिलीं वनकरें। घायवारें घेतलें ॥ ९६ ॥ एकी दडती सीतेपाशीं। एकी पळती चौपासीं। आपपर नसे राक्षसींसी। हनुमंतासी देखोनी ॥९७॥ करितां हनुमंतें गर्जन। सीता जाहली निर्बंधन। श्रीरामभक्तांचें वचन। ‡बंधमोचन तत्काळ ॥ ९८ ॥

रावणाकडे वृत्तांत-कथन, रावणाचा संताप व सैन्य-नियोजन—राक्षसी सांगती रावणापासीं। वानरवीर प्रतापराशी। विध्वंसोनियां वनासी। वनकरांसी मारिलें ॥ ९९ ॥ नेणों कैंचा वीर वानर। बळें जैसा काळाग्निरुद्र। सीतेसी करोनि नमस्कार। केला मार वनकरांसी ॥ १०० ॥ जे प्रदेशीं जनकबाळी। ते वन राखिलें पुष्पीं फळीं। येरां वनाची केली रवंदळी[2]। वृक्षां समूळीं उपडोनी ॥ १ ॥ सीतेसीं करोनि एकांत। मग मांडिला वनविघात। ऐसा ऐकोनि वृत्तांत। लंकानाथ क्षोभला ॥ २ ॥ पाचारोनि घरटीकार[3]। त्यांसी सांगे दशशिर। धरोनि आणावा तो वानर। वन विचित्र विध्वंसी ॥ ३ ॥

१ अगदीं योग्य. २ कपट. ३ फसवितां.

+अ. ४२।५, ६, ८, ११.

१ आतडें. २ नाश. ३ रक्षक.

† क—आंत तो बोबडी, क्ष—आंतडे तोंडी.

‡ ब—बदी.

रावणासी राक्षसी सांगती । घरटीकार बापुडे किती । त्याच्या पुच्छाची दुर्धर शक्ती । लाविली ख्याती वनकरां ॥४॥ चवदा सहस्र वनकरांसी । भारा बांधोनियां पुच्छेसीं[†] । निक्षेपिलें समुद्रासीं । जलचरांसी आहारार्थ ॥५॥ रणीं मर्दोनि राक्षसांसी । मेदमांसें तृप्ति भूतांसी । द्यावया [1]आवंतिलें महाकाळीसी । आजिचे दिवसीं हनुमंतें ॥ ६ ॥ धरोनि आणावया वानर । तेथें कायसे घरटीकार । मूळ करोनि विचार । दुर्धर भार प्रेरावा ॥ ७ ॥ ऐसें राक्षसी सांगती । सर्वेचि चळचळां कांपती । बहुता नाटोपे तो मारुती । दुर्धर शक्ती पुच्छाची ॥ ८ ॥ सीतेपासील वन सकळ । नाहीं मोडिलें देऊळ । वानर दिसे स्वधर्मशीळ । त्यावरी प्रबळ प्रतापी ॥ ९ ॥ ऐकोनि राक्षसींचें वचन । दचकला तो दशानन । सभा जाहली कंपायमान । बळसंपन्न वानर ॥११०॥

+राक्षसीनां वचः श्रुत्वा रावणो राक्षसाधिपः ।
आत्मनः सदृशान्वीरान्किंकरान्नाम राक्षसान् ॥१३॥
व्यादिदेश महातेजा निग्रहार्थं हनूमतः ॥ १४ ॥

‡ऐकोन वनविध्वंसन । रावण जाहला कंपायमान । आपुलिया बळासमान । योद्धे दारुण [2]अनिवर्ती* ॥ ११ ॥ युद्ध देखिलिया दृष्टीं । नाहीं परतावयाची गोष्टी । रणपाडे[3] कोट्यनुकोटी । महाहटी रणगाढे ॥ १२ ॥ किंकर नांवें अति दुर्धर । नांवाजिले महावीर । पाचारोनि ऐशीं सहस्र । धरावया वानर धाडिले ॥ १३ ॥ रावण जाणे आमुची ख्याती । शेखीं धाडी वानराप्रती । वानर बापुडें तें किती । हतुक्याहातीं केवी उरे ॥ १४ ॥ ऐसें करोनि गर्जन । शस्त्रास्त्रीं [4]सन्नद्ध पूर्ण । धांवोनि आले अवघे जण । अशोकवना ठाकिले ॥ १५ ॥

सैन्याचा पाडाव व रावणाकडे निरोप—अशोकवनाच्या प्रासादांत । पुढिल्या दुर्धर तोरणांत । नेटका बैसला हनुमंत । काळकृतांत प्रळयाग्नि ॥१६॥ वानरा देखतांचि दृष्टीं । शस्त्रें कवळोनियां मुष्टीं । किंकर धांविन्नले उठाउठीं । शस्त्रवृष्टी समकाळें ॥ १७ ॥ शूल मुद्गल गदा फरश । त्रिशूल तोमर पट्टिश । चेंडुचक्रें लहुडी फरश । केली बहुत्र शस्त्रवृष्टी ॥ १८ ॥ खंगला भंगला तुटला । शस्त्रास्त्रीं निवटला[1] । घायीं तिळप्राय जाला । म्हणती निमाला[1] वानर ॥ १९ ॥ किंकरीं पिटिली टाळी । म्हणती वानर आतुर्बळी[2] । आम्हांसी न करितां रणफळी । रणरांगोळी होऊनि गेला ॥ १२० ॥ ऐशीं सहस्र महावीर । बळें हाणिती निशाचर । जैसी पर्वतीं पर्जन्यधार । तैसा वानरीं शस्त्रपात ॥ २१ ॥ किंकरीं पिटतां टाळी । आम्ही यशस्वी रणकल्लोळी । तें देखोनि हनुमान बळी । क्रोधानळीं खवळला ॥ २२ ॥

+समाविध्यच्च लाङ्गूलं ननाद च महाध्वनिं ।
सभूत्वा च महाकायो हनुमान्मारुतात्मजः ॥ १५ ॥
पुच्छमास्फोटयामास लंकां शब्देन पूरयन् ।
जयत्यतिबलो रामो लक्ष्मणश्च महाबलः ॥ १६ ॥
राजा जयति सुग्रीवो राघवेणानुपालितः ।
दूतोऽहं कोशलेंद्रस्य हनुमान्शत्रुसूदनः ॥ १७ ॥
राक्षसानां सहस्रं तु जघान कपिकुंजरः ॥ १८ ॥

स्वयें पुच्छाची पाठी थापटी । पुच्छासी सांगे गुह्य गोष्टी । मारावया राक्षसांच्या कोटी । निज¶बुद्धिप्रतापें ॥ २३ ॥ ऐसी सांगितली गुह्य गोष्टी ।

१ आमंत्रण केलें. २ मागें न फिरणारे. ३ रणशूर. ४ सिद्ध.

† ब–पुच्छीं. + अ. ४२।२२, २४.
‡ निर्ययुर्भुवनात्सर्वे हनूमत्स्थानमुत्सुका ।
* क्ष–च्छासनोत्सुकाः, बकक्ष–वृत्ती.

१ मृत्यु पावला. २ पराक्रमी.

+ अ. ४२।३२, ३१, ३३, ३४.
¶ ब–पुष्टी; क्ष–पुच्छ, क–पुष्टी.

लांगूल[1] आहाटिलें[2] उठाउठीं। निधा[3] उठिला गिरिकूटीं। लंकात्रिकूटीं आकांत ॥ २४ ॥ राक्षसांचा प्राणहार। दुर्धर केला भुभु:कार। तेणें किंकराचा संभार। जाहला भूमिभार दचकोनी ॥ २५ ॥ धाकें टवकारिल्या दृष्टी। शस्त्रें गळालीं निजमुष्टी। राक्षसीं धाक घेतला पोटीं। पुच्छें पाठी पुरविली ॥ २६ ॥ धाकें राक्षस पळोनि जाती। पुच्छें बांधोनि मारी मारुती। एक मारिले शिळाघातीं। पर्वतपातीं समस्त ॥ २७ ॥ मारोनि राक्षस समस्त। वानर स्वानंदें गर्जत। श्रीरामाचा निजदूत। नामें हनुमंत मारुति ॥ २८ ॥ येथें मारोनि दशकंधर[4]। विजयी स्वामी रामचंद्र। विजयी लक्ष्मण महावीर। विजयी वानरेंद्र सुग्रीव ॥ २९ ॥ मी आलों सीताशुद्धीसी। म्या विध्वंसिलें या वनासी। जावोनि सांगा रावणापासीं। म्यां राक्षिसांसी मारिलें ॥ १३० ॥ एका जनार्दना शरण। आलें हनुमंतासी स्फुरण। करील थोरथोरां निर्दळण। रणकंदन अवधारा ॥ ३१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमद्वनविध्वंसो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ओंव्या ॥ १३१ ॥ श्लोक ॥ १८ ॥ एवं ॥ १४९॥

— —

## अध्याय १४ वा

+किंकरान्सुबहून्हत्वा हनूमान्मारुतात्मजः ।
द्रुमान्बभञ्ज परमान्वृक्षपालाञ्जघान च ॥ १ ॥
निहतान्राक्षसाञ्श्रुत्वा रावणो लोकरावण ।
प्रहस्तस्य सुतं वीरं जंबुमालिनमादिशत् ॥ २ ॥
अहत्वा वानरं वीरं न निवर्तितुमर्हसि ॥ ३ ॥

ऐंशी हजार किंकर, चौदा हजार वनकर व वन विध्वंसामुळें रावणाचा कोप–किंकर मारिले ऐंशीं सहस्र। चवदा सहस्र वनकर। वन विध्वंसिलें मनोहर। तेणें दशशिर कोपला ॥ १ ॥ वानर जाणोनि महाबळी। प्रहस्तसुत जंबुमाळी। रावणें पाचारोनि जवळी। गुज त्याजवळी सांगत ॥ २ ॥ मारिले किंकर वनकर। वन विध्वंसिलें मनोहर। तो तुवां मारावा वानर। युद्धीं दुर्धर गांजोनी ॥ ३ ॥ वानर न मरतां देख। तुज परतल्या एकाएक। तरी तुवां हारविलें नासिक। नपुंसक राक्षसांत ॥ ४ ॥ वानरा न करवे मर्दन। तेव्हांचि तुझें काळें वदन। रासभारोहण[1] अपमान। मूतें वपन[2] मस्तका ॥ ५ ॥ ऐसी ऐकोन वचनावळी। युद्धा धाडिला जंबुमाळी। तोहि वीर आतुर्बळी। क्रोधानळीं चालला ॥ ६ ॥

पराङ्मुख आल्यास अपमानाची धमकी देऊन प्रहस्तसुत जंबुमाळी पाठविलाः–महाखरीं जुंपिला रथ। शस्त्रसामुग्री घालोनि समस्त। धनुष्य घेवोनि अत्यद्भुत। आला युद्धार्थ जंबुमाळी ॥ ७ ॥ टणत्कारोनियां मेंढा[3]। क्रोधें गर्जे वानरापुढां। किंकरां वनकरांच्या सुडा। घ्यावया रोकडा मी आलों ॥ ८ ॥ हनुमान सांगे गोड गोष्टी। तुम्हीं चोरिली सीता गोरटी। मारीन राक्षसांच्या कोटी। अवघ्यां-शेवटीं रावण ॥ ९ ॥ जंबु तुझी आवड मोठी। किंकरां वनकरांसीं भेटी। तुज मी करीन उठाउठीं। रथसंपुटीसमवेत ॥ १० ॥ अर्धचंद्रबाण समेळीं। हनुमान् विंधिला कपाळीं। बाण हिसळोनि[4] ते काळीं। लागला निढळीं[5] जंबूच्या ॥ ११ ॥ लागतां बाणाचा आघात। जंबुमाळी पडला मूर्च्छित। हनुमान गदगदां हांसत। विपरीतार्थ येथें जाहला ॥ १२ ॥ सावध होवोनि जंबुमाळी। वर्षलासे बाणजाळीं। बाण कोंदले नभःस्थळीं। भूमंडळीं शरजाळ ॥ १३ ॥ रामस्मरणें अति

---

१ शेंपूट. २ फडकाविलें. ३ प्रतिध्वनि. ४ दहा शिरांचा (रावण).

+अ. ४२।४२, ४४.

१ गाढवावर बसून धिंड काढणें. २ डोकें भादरणें. ३ धनुष्य. ४ परतून. ५ मस्तकावर.

समर्थ। बाणांमाजी हनुमंत। रणधेंडा[1] स्वयें नाचत। अंगीं आघात लागेना ॥ १४ ॥ पंचक्रोश शिळा सोज्वळी। कपीनें हाणिली जंबुमाळी। येरें विंधोनि बाणजाळीं। केली रांगोळी शिळेची ॥ १५ ॥ कोपोनियां हनुमंतें। विशाळ वृक्ष घेवोनि हातें। वेगें हाणितां जंबूतें। बाणें वृक्षातें छेदिलें ॥ १६ ॥ लागवेगाचेनि[2] लवलाहें[2]। चौं बाणीं विंधोनि पाहें। वृक्ष केला तिळप्राये¶। जाहलें आश्चर्य हनुमंता ॥ १७ ॥ जीवें घ्यावा हनुमंत। निर्वाण[3] परिघ घंटायुक्त। रागें काढिला धगधगित। करावया अंत वानरा ॥ १८ ॥ परिघ घेवोनि करतळीं। गर्जिन्नला जंबुमाळी। वानरा तुझी करीन होळी। घावो सांभाळीं हनुमंता ॥ १९ ॥ माझ्या परिघाचा आघात। निश्चयें निमाला हनुमंत। कैसेनि राखेल रघुनाथ। रणवृत्तांत पाहों याचा ॥२०॥ रावणें नेमिलें आहे मातें। जीवें मारावें वानरातें। कोण निवारील माझ्या परिघातें। हनुमंतातें वांचवावया ॥ २१ ॥ परिघ येतां अति वेगेंसीं। हनुमान जाणे लघुलाघवासी। अंग चुकविलें घायासीं। वेगें आकाशीं उडाला ॥ २२ ॥ शस्त्रदेवता पैं लाठी[4]। परिघ गेला हनुमत्पाठीं। पुच्छें परिघा घातली मिठी। चेपिली घाटी देवतेची ॥ २३ ॥ देवता म्हणे गा हनुमंता। तुज मी शरण आलियें आतां। शस्त्रशक्ती ज्या समस्ता। शरणागता तुज होती ॥ २४ ॥ शस्त्रशक्ती भूतशक्ती। आणिक मंत्राच्या मंत्रशक्ती। अवघ्या तुज शरण येती। मज मारुति वांचविलिया ॥ २५ ॥ सोडोनि पुच्छाचें बंधन। शस्त्रदेवता वांचवोन। शक्तिमंडळा लोटांगण। घाली आपण हनुमंत ॥ २६ ॥ मारूं नये शरणागता। म्हणोनि वांचविली शस्त्रदेवता। भूतीं भजावें श्रीरघुनाथा। या बुद्धी समस्ता शक्ती वंदी ॥२७॥ तंव त्या शक्ती पैं समस्ता। ओंवाळिती हनुमंता। करितां राक्षसांच्या घाता। आम्ही युद्धार्थी तुज साह्य ॥ २८ ॥ सीता आमुची आद्यशक्ती। तीस गांजितो लंकापती। राक्षसां विमुख याचि अर्थीं। साह्य सर्वार्थीं रामभक्तां ॥ २९ ॥ हनुमान म्हणे पुच्छा जगजेठी। युद्धीं माझी राखिजे पाठी। साह्य शक्ती कोटयनुकोटी। पुच्छासाठीं मज जाहल्या ॥ ३० ॥ ऐसें पुच्छाचें स्तवन। करोनि पुच्छाचें लालन। देवोनि पुच्छासी चुंबन। जाहला सावधान युद्धार्थी ॥ ३१ ॥ परिघ घेवोनियां हाता। येतां देखोनि हनुमंता। जंबु पावला परम चिंता। माझें शस्त्र मज घाता प्रवर्तलें ॥ ३२ ॥ रावण परदारा[1] अधर्म। पापें शक्ती क्षोभल्या परम। नासला आक्रम पराक्रम। मरणानुक्रम राक्षसां ॥ ३३ ॥

+गृहीत्वा परिघं घोरं भ्रामयामास वानरः।
सोऽतिवेगोऽतिवेगेन भ्रामयित्वा महाबलः ॥ ४ ॥
परिघं पातयामास जंबुमालेर्महोरसि।
तस्य चैव शिरो नास्ति न बाहू जानुनी न च ॥५॥
न धनुर्न रथो नाश्वास्तत्रादृश्यत नेषव. ॥ ६ ॥

करावया वानराचे घाता। राक्षसें परिघ सोडिला होता। तो आला हनुमंताचे हाता। जंबूचा माथा छेदावया ॥ ३४ ॥ कोप आला हनुमंता। परिघ भोवंडिला साटोपता[2]। लक्षोनि जंबुचिया माथा। होय हाणितां तें ऐका ॥ ३५ ॥ वेगीं उडोनियां अंबरा। दांत खादले करकरां। परिघ भोवंडिला गरगरां। रहंवरा[3] ठोकिलें ॥ ३६ ॥ निधडी[4] हनुमंताची शक्ती। ना त्या शरीर ना त्यास अस्थी।

१ रणवीर. २ अतित्वरेनें. ३ अखेरचा, निर्वाणींचा. ४ मोठी.

¶ बक– + हैं.

१ परस्त्री २ आवेशानें. ३ रथाला. ४ मोठी.

† ड–पुच्छे केली आढाआंठी.

+ अ. ४४।१९, १३, १७.

हातपाय न दिसती। न दिसे व्यक्ती राक्षसा ॥ ३७ ॥ ना तो रथ ना तो वारू। ना तें धनुष्य ना शस्त्रसंभारू। वानरें केला अव्यक्त मारू। न दिसे गोचरू राक्षस ॥ ३८ ॥ दुर्धर हनुमंताचा घात। जीव मारोनियां तेथ। घायवट न दिसे प्रेत। केला भस्मांत राक्षसां ॥ ३९ ॥ आधीं हनुमंत महाबळी। ऐशियापरी जंबुमाळी। परी घायें मेळविला धुळी। रणरांगोळी करोनी ॥४०॥

उभयतांचें युद्ध, जम्बूचे परिधानें त्याचाच घात—

जंबु मारिला तयीं मारुती। प्रहस्त बोंबले दोहीं हस्तीं। धावया मंत्राग्नी पुरती। शोधितां अस्थी न लभेचि ॥ ४१ ॥ पावोनिया पुत्रशोक। येत्रोनि रावणासंमुख। प्रहस्त करी महाशोख। दुर्धर दु:ख घोटेना ॥ ४२ ॥ झोंटी सुटली मोकळी[1]। प्रहस्त लोळे क्षितितळीं[2]। ज्येष्ठ पुत्र जंबुमाळी। वानरें धुळी मेळविला ॥ ४३ ॥ युद्धीं पडला प्रहस्तकुमर। इतर प्रधानांचे पुत्र। वेगीं मोकली[3] दशशिर। रणीं वानर मारावया ॥ ४४ ॥

+ततस्ते राक्षसेंद्रेण नोदिता मंत्रिणा सुताः।
हेमजालपरिक्षिप्तैर्ध्वजवद्भिः पताकिभिः।
तोयदस्वननिर्घोषैर्वाजियुक्तैर्महारथैः ॥ ७ ॥
कृतास्त्रास्त्रविदां श्रेष्ठाः परस्परजयैषिणः।
विस्फारयन्तः संहृष्टाः सर्वे युद्धजिगीषवः ॥ ८ ॥
जनन्यस्तास्ततस्तेषां विदित्वा किंकरान्हतान्।
बभूवुः शोकसंतप्ताः सबांधवसुहृज्जनाः ॥ ९ ॥
सृजन्तो बाणवृष्टिं ते लघुस्वनमहास्वनाः।
अभिषेक्तु¶ हनूमंतं तोरणस्थं व्यवस्थितम् ॥१०॥

रावणाचे सभेआंत। प्रधानपुत्र अति गर्वित। महा वीरांतें दृष्टी न गणित। बळोन्मत्त प्रतापें ॥ ४५ ॥ ऐसे बळदर्प अतिदृप्त[4]। शस्त्रास्त्रीं निपुण नित्य। येरयेरां नापेक्षित। अति समर्थ युद्धार्थी ॥४६॥ युद्धाग्रणी प्रधानसुत। निवडोनियां समस्त। हनुमंतासीं युद्धार्थ। धाडी लंकानाथ साक्षेपें ॥४७॥ तुमचे अंगीं युद्धक्रम। नित्य [1]वानितां† पराक्रम। वन विध्वंसी प्लवंगम[2]। त्यासीं संग्राम करावा ॥४८॥ तुम्ही अवघे युद्धीं‡ समर्थ। बांधोनि आणावा हनुमंत। नातरी करावा त्याचा घात। पाहों पुरुषार्थ तुमचा ॥ ४९ ॥ थोर वाढिवेची[3] मात। नित्य सांगा सभेआंत। तोच दावावा पुरुषार्थ। युद्धीं हनुमंत जिंकोनी ॥ ५० ॥ ऐसें सांगतां लंकानाथ। प्रधानपुत्र समस्त। वेगीं संजोगोनी[4] रथ। शीघ्र युद्धार्थ निघाले ॥ ५१ ॥ [5]हेमरत्नमाळाविराजित। शृंगारिले अश्वरथ। ध्वज पताका डोलत। रथ शोभत अति शोभा ॥ ५२ ॥ मारिल्यावांचोनि हनुमंत। परते तो मातृगामी येथ। ऐशी करोनिया शपथ। आले समस्त युद्धार्थी ॥ ५३ ॥ रथारूढ धनुष्य हातीं। पुढें वाजंत्रें वाजती। मागें माता शंख करिती। पुत्रसंतती निघाली ॥ ५४ ॥

त्याचे मातांचा शोकाक्रंद—प्रहस्तदुःखासमान। दुःखी करावया प्रधान। हृदीं पेटला दशानन। युद्धीं संतान मोकलिलें ॥ ५५ ॥ प्रहस्तपुत्र महाबळी। रणीं मारिला जंबुमाळी। किंकरांची केली होळी। केली रांगोळी वनकरां ॥ ५६ ॥ तेथें किती प्रधानसंतान। आजचि जाहलें निःसंतान। वानर नव्हे महाविघ्न। आलें निदान[6] राक्षसां ॥ ५७ ॥ स्त्रिया सुहृद तळमळिती। माता पिता शंख करिती। वधूं धाडिता मारुती। पुत्रसमाप्ती वानरें ॥ ५८ ॥

हनुमंतावर सर्वांचे एकत्र प्रहार—येरीकडे कडकडाट।

१ केश. २ पृथ्वीवर. ३ पाठवी. ४ अत्यंत गर्विष्ठ.

+ अ. ४५।१, २, ४, ६, ७.

¶ ब—पेतु, क्ष—पेतु.

१ वर्णन करता. २ वानर. ३ प्रतापाची. ४ जुपून. ५ सुवर्णयुक्त रत्नांच्या माळांनीं सुशोभित. ६ शेवट.

† ब—वाणी + निज, ‡ ड—योद्धे.

प्रधानपुत्र घनदाट। रथचक्रांचा घडघडाट। आले निकट हनुमंता ॥५९॥ देवालयाचे महाद्वारीं। बसला होता तोरणावरी। देखोनि प्रधानपुत्रहारी। उल्लास भारी हनुमंता ॥६०॥ जैसे पतंग दीपावरी। तैशा प्रधानपुत्राच्या हारी। लोटल्या* हनुमंताचेवरी। शरधारी वर्षती ॥ ६१ ॥ बाण सुटती सणसणां। शस्त्रें वाजती खणखणां। बाण विंधिती झणझणां। [1]कालकंडना§ मांडिली ॥६२॥ समकाळ शरसंपात[2]। हनुमान बैसला सावचित्त। बाण चुकवी पिलंगत[3]। अमात्यसुत मारावया ॥ ६३ ॥ बाण वर्षले अत्यद्भुत। जैसे मेघ पर्वतांत। अचुकहस्ती आम्ही समस्त। मारा हनुमंत विंधोनी ॥ ६४ ॥ एक म्हणती विंधा शिरीं। एक म्हणती विंधा उरीं। एक म्हणती करा [4]कांडोरी। चरणां करां चुरा पैं ॥ ६५ ॥ एक म्हणे विंधा पोटीं। एक म्हणे विंधा पाठीं। एक म्हणे विंधा कंठीं। फोडूं [5]घाटी याची पैं। ६६ ॥ एक म्हणती माझें संधान। याचें नासिक मी छेदीन। एक म्हणे छेदीन दोनी कान। पुच्छ छेदीन म्हणे एक ॥६७॥

पुच्छांत आवळून सर्वांचा एकत्र अंत–ऐशा ऐकोनियां गोष्टी। हनुमान हांसिन्नला पोटीं। मग उठोनियां जगजेठी। लांगूल[6] त्राहटी सत्राणें[7] ॥६८॥ देतां भुभुःकार उद्भट। अवघ्यां झाला हृदयस्फोट। पुच्छें कवळोनि एकवट। केले पिष्ट निजघातें॥६९॥ उडी टाकितां हनुमंत। अवघ्यां एकचि प्राणांत। घडघडां पडती पृथ्वीआंत। समवेत रथघोडीं ॥ ७० ॥ प्रेतें नुरती भूतळा। अतळ वितळ ना सुतळा। हनुमान निजबळें आगळा[8]। रसातळा तें नेलें ॥७१॥ लागतां हनुमंताचा घावो। प्रेतपणा नुरेचि देहो। रसातळीं न मिळे ठावो। धाडी महाबाहो वैकुंठा ॥ ७२ ॥

१ उच्छेद. २ बाणाचा वर्षाव. ३ पुढें धांवून. ४ नायनाट. ५ गळा. ६ शेंपूट. ७ जोरानें. ८ मोठा.

* ब–लोटले. § ड–कळणा.

लंकेंत आक्रोश–ऐसियापरी हनुमंत। निर्दळिले प्रधानसुत। बोंब सांगावया नुरे तेथ। केले निर्मुक्त अवघेही ॥ ७३ ॥ दुरोनि पाहती सुहृदलोक। अवघे करिती महाशोक। प्रधानपुत्र एकाएक। रणीं निःशंक मारिले ॥ ७४ ॥ हाकाबोंबांचा कल्लोळ[1]। लंकेमाजी हलकल्लोळ। रावणा आली [2]काळवेळ। करील निर्मूळ राक्षसां ॥ ७५ ॥ प्रहस्तादिक मुख्य प्रधान। रावणापासीं येवोनि जाण। अवघे करिती शंखस्फुरण[3]। निःसंतान त्वां केलें ॥ ७६ ॥ तो वानर नव्हे केवळ। सीताकोपाग्निकल्लोळ[4]। वनीं वाढलासे प्रबळ। राक्षसकुळ निर्दळावया ॥ ७७ ॥

+हतान्मन्त्रिसुतान्बुद्ध्वा वानरेण महात्मना।
रावणः संवृताकारश्चकार मतिमुत्तमाम् ॥ ११ ॥
सदिदेश दशग्रीवो वीरान्नयविशारदान्।
हनूमद्ग्रहणव्यग्रान्हनूमन्निग्रहंप्रति ॥ १२ ॥
सविरूपाक्षयूपाक्षौ दुर्धरं च महाबलम्।
प्रघस भासकर्णं च पञ्च सेनाग्रनायकान् ॥ १३ ॥
महागुणपरिख्यातान्रणकर्मविशारदान् ॥ १४ ॥

रावणाचा संताप–प्रधानपुत्रसंतती। रणीं मारिली [5]मारुतीं। तें ऐकोनि लंकापती। चिंता चित्तीं अनिवार ॥ ७८ ॥ जो जो धाडी युद्धाप्रती। त्याची कपि करी समाप्ती। मग रावणें पांचही सेनापती। संग्रामार्थी पाठविले ॥ ७९ ॥

यूपाक्ष विरूपाक्षादि पांच सेनानी पाठविले–यूपाक्ष विरूपाक्ष दोघे जण। दुर्धर प्रघस भासकर्ण। हे सेनानी वीर दारुण। पांच जण दृढ योद्धे ॥८०॥ रावण त्यांसी सांगे युक्ती। तुम्ही दुर्धर वीर पुरुषार्थी। वानर धरावा युद्धशक्तीं। तुम्हीं समस्तीं मिळोनि ॥ ८१ ॥ संमुख येतां प्रधानसुत। त्यांचा

१ ओरड. २ विनाशकाल. ३ शंखध्वनि, ओरड. ४ सीतेच्या कोपाग्नीचा भडकाच. ५ मारुतीनें. ६ युद्धार्थ.

+ अ. ४६।१, २.

वानरें केला घात । तुम्हीं बुद्धिबळें प्रतापवंत । युद्ध प्रशस्त करावें ॥८२॥ चौघे राहूनि चौं दिशांप्रती । एकें रहावें नभस्थिती । दावोनियां निजशक्ती । युद्धीं मारुति धरावा ॥ ८३ ॥ युद्धीं धरितां नये हाता । तरी करावें त्याच्या घाता । ऐसें सांगोनि समस्ता । होय धाडिता लंकेश ॥८४॥ रथपताका डोलायमान । पांच जण युद्धीं प्रवीण । पांचां ठायीं विखरोन[1] । युद्ध दारुण मांडिलें ॥ ८५ ॥

+तं समीक्ष्य कपिं सर्वे दिक्षु सर्वास्ववस्थिताः ।
तैस्तैः प्रहरणैर्भीमैरभिषेक्तुं† ततस्ततः ॥ १५ ॥

पांच बाजूंनीं हल्ला व पांचाचाही पुच्छें करून एकदम नाश—पांचां ठायीं पांच जण । हनुमंतातें वेढोन । युद्धा झगटले दारुण । शस्त्रास्त्रीं संपूर्ण हाणित ॥ ८६ ॥ दुर्धर पंचमुख पंचबाण । मस्तकीं विंधिलें संमुख येऊन । पाठीशीं तो भासकर्ण । हाणी दारुण गदाघात ॥ ८७ ॥ दक्षिणबाहू यूपाक्ष । वामांगीं विरूपाक्ष । शूळ हाणिती प्रत्यक्ष । कुक्षोपकुक्ष[2] लक्षोनी ॥ ८८॥ घ्यावया हनुमंतासीं घस । गगना चढला तो प्रघस । बाण वर्षे असमसाहस[3] । जैंवी आकाशीं मेघधारा ॥ ८९ ॥ पांचांची उडी अवचितीं । आली हनुमंताभोंवतीं । तेव्हां पुच्छें केली ख्याती । साह्य युद्धार्थी सर्वदा ॥ ९० ॥ भोंवतां पुच्छाचा आवर्त । त्यांच्या शस्त्रां करोनि घात । पांचही आकळिले पुच्छाआंत । वीर विख्यात सेनानी ॥ ९१ ॥ जैंवी योगिया आपण । स्वयें निरोधी पंच प्राण । तैंवी पुच्छें पांचही जण । आकळोन राखिले ॥ ९२ ॥ जैंवी काळ प्रळयांत । पंचभूतां करी आवर्त । तैंवी पांचही पुच्छाआंत । बांधी हनुमंत वधार्थी ॥ ९३ ॥ जैंवी विवेकी साधुजन । पंचही विषयां करिती दमन । तैंवी वीर पांचही जण । पुच्छें गोंवोन राखिलें ॥ ९४ ॥

१ पसरून. २ कुशी व कुशीजवळचा प्रवेश. ३ अतुलप्रताप.

+ अ. ४६।२१ † पेतुस्ततः.

+अभवद्वानरः क्रुद्धो बालसूर्यसमप्रभः ।
समुत्पाट्य गिरेः शृंगं जघान द्वौ निशाचरौ ॥१६॥

कोपें वानर अति आरक्त । बाळसूर्यासम भासत । रागें उपडोनि पर्वत । करील कल्पांत पांचांही ॥९५॥ उपडोनियां महागिरी । घालितांचि पांचांवरी । घायें जाहली चकचुरी । केली बोहरी पांचांची ॥ ९६॥ पांचही विषय जैं निर्दळिती । तैं सुख पावे परमार्थी । वधोनी पांचही सेनापती । सुखें मारुति उल्हासे ॥ ९७ ॥ श्रीरामभक्ताचे आघातीं । अस्थिमांस ना गुणव्यक्ती । अवघे नेले गुणातीतीं । धन्य मारुती सुखमरण[1] ॥ ९८ ॥ श्रीरामभक्ताचें कौतुक । मारून द्यावें परम सुख । कोटि जन्मांचें हरोनि दुःख । सुखदायक संग्रामीं ॥ ९९ ॥

नतर भुभु:कार करून देवालयावर बसला—निर्दळोनि पांचही जण । भुभु:कारें देवोनि किराण[2] । देवालयाचें तोरण । धरोनि स्थान बैसला ॥१००॥ पंचभूतांची निवृत्ती । साधका परमानंदप्राप्ती । वधोनि पांचही सेनापती । सुखें मारुति उल्हासे ॥ १ ॥

रावणास समजल्यावर अखया कुमाराची योजना—मारिले पांचही सेनापती । बोंब गेली लंकेप्रती । दचकलासे लंकापती । वानरें ख्याति लाविली ॥२॥ पारखें केलें अशोकवन । सहजें सीता नेईल हिरोन । क्रोधें कांपे दशानन । पाहे आपण कोण धाडूं ॥ ३ ॥ तंव देखिला समोर । जो कां लाडका अखया कुमर । त्यासी सांगे दशशिर । मारीं वानर प्रतापें ॥ ४ ॥

‡ कुमारमक्षं प्रसमीक्ष्यमाणः
प्रचोदयामास तमेव संयुगे ।
पताकिनं रत्नविभूषितध्वजं
मनोजवाष्टाश्ववरैः सुयोजितम् ॥ १७ ॥

१ सुखदायक मरण देणारा. २ उड्डाण.

+ ४६।३४. ‡ ४७।१.

वानरें केला घात । तुम्हीं बुद्धिबळें प्रतापवंत । युद्ध प्रशस्त करावें ॥८२॥ चौघे राहूनि चौं दिशांप्रती । एकें रहावें नभस्थितीं । दावोनियां निजशक्ती । युद्धीं मारुति धरावा ॥ ८३ ॥ युद्धीं धरितां नये हाता । तरी करावें त्याच्या घाता । ऐसें सांगोनि समस्तां । होय धाडिता लंकेश ॥८४॥ रथपताका डोलायमान। पाच जण युद्धीं प्रवीण । पांचां ठायीं विखरोन[१] । युद्ध दारुण मांडिलें ॥ ८५ ॥

+तं समीक्ष्य कपिं सर्वे दिक्षु सर्वास्ववस्थिताः ।
तैस्तैः प्रहरणैर्भीमैरभिपेक्तुं ततस्ततः ॥ १५ ॥

पाच बाजूंनीं हल्ला व पांचांचाही पुच्छें करून एकदम नाश—पांचां ठायीं पांच जण । हनुमंतातें वेढोन । युद्धा झगटले दारुण । शस्त्रास्त्रीं संपूर्ण हाणित ॥ ८६ ॥ दुर्धर पंचमुख पंचबाण । मस्तकीं विंधिले संमुख येऊन । पाठीशीं तो भासकर्ण । हाणी दारुण गदाघात ॥ ८७ ॥ दक्षिणबाहू यूपाक्ष । वामांगीं विरूपाक्ष । शूळ हाणिती प्रत्यक्ष । कुक्षोपकुक्ष[२] लक्षोनी ॥ ८८॥ ध्याश्या हनुमंतासीं घस । गगना चढला तो प्रघस । बाण वर्षे असमसाहस[३] । जैंवी आकाशीं मेघधारा ॥ ८९ ॥ पांचांची उडी अवचितीं । आली हनुमंताभोंवतीं । तेव्हां पुच्छें केली ख्याती । साह्य युद्धार्थी सर्वदा ॥ ९० ॥ भोंवतां पुच्छाचा आवर्त । त्यांच्या शस्त्रां करोनि घात । पाचही आकळिले पुच्छाआंत । वीर विख्यात सेनानी ॥ ९१ ॥ जैंवी योगिया आपण । स्वयें निरोधी पंच प्राण । तैंवी पुच्छें पांचही जण । आकळोन राखिले ॥ ९२ ॥ जैंवी काळ प्रळयांत । पंचभूतां करी आवर्त । तैंवी पांचही पुच्छाआंत । बांधी हनुमंत वधार्थी ॥ ९३ ॥ जैंवी विवेकी साधुजन । पंचही विषयां करिती दमन । तैंवी वीर पाचही जण । पुच्छें गोंवोन राखिले ॥ ९४ ॥

+अभवद्वानरः क्रुद्धो बालसूर्यसमप्रभः ।
समुत्पाट्य गिरेः शृंग जघान द्वौ निशाचरौ ॥ १६॥

कोपें वानर अति आरक्त । बाळसूर्यासम भासत। रागें उपडोनि पर्वत । करील कल्पांत पांचांही ॥ ९५॥ उपडोनियां महागिरी । घालितांचि पांचांवरी । घायें जाहली चकचुरी । केली बोहरी पाचांची ॥ ९६॥ पांचही विषय जैं निर्दळिती । तैं सुख पावे परमार्थी । वधोनी पांचही सेनापती । सुखें मारुति उल्लासे ॥ ९७ ॥ श्रीरामभक्ताचे आघातीं । अस्थिमांस ना गुणव्यक्ती । अवघे नेले गुणातीतीं । धन्य मारुती सुखमरण[१] ॥ ९८ ॥ श्रीरामभक्ताचें कौतुक । मारून द्यावें परम सुख । कोटि जन्मांचें हरोनि दुःख । सुखदायक संग्रामीं ॥ ९९ ॥

नंतर भुभुःकार करून देवालयावर बसला—निर्दळोनि पांचही जण । भुभुःकारें देवोनि किराण[२] । देवालयाचें तोरण । धरोनि स्थान बैसला ॥१००॥ पंचभूतांची निवृत्ती । साधका परमानंदप्राप्ती । वधोनि पांचही सेनापती । सुखें मारुति उल्लासे ॥ १ ॥

रावणास समजल्यावर अखया कुमाराची योजना—मारिले पांचही सेनापती । बोंब गेली लंकेप्रती । दचकलासे लंकापती । वानरें ख्याति लाविली ॥२॥ पारखें केलें अशोकवन । सहजें सीता नेईल हिरोन । क्रोधें कांपे दशानन । पाहे आपण कोण धाडूं ॥ ३ ॥ तंव देखिला समोर । जो कां लाडका अखया कुमर । त्यासी सांगे दशशिर । मारीं वानर प्रतापें ॥ ४ ॥

‡ कुमारमक्षं प्रसमीक्ष्यमाणः
प्रचोदयामास तमेव सयुगे ।
पताकिन रत्नविभूषितध्वजं
मनोजवाष्टाश्ववरैः सुयोजितम् ॥ १७ ॥

---

१ पसरून. २ कुशी व कुशीजवळचा प्रदेश. ३ अतुलप्रताप.

+ अ. ४६।२१. † पेतुस्ततः.

१ सुखदायक मरण देणारा. २ उड्डाण.

+ ४६।३४. ‡ ४७।१.

+ रथं समारुह्य ययौ स वीर्यवान्
 शतुणमष्टासिनिबद्धधुरम् ।
सपूरयन्ख च महीं च साचलां
 तुरंगमातंगमहारथस्वनै ॥ १८ ॥
बलैः समेतः सहतोरणस्थित
 समर्थमासीनमुपागमत्कपिम् ।
स त समासाद्य हरिं हरीक्षणो
 युगांतकालाग्निमिव प्रजाक्षये ॥ १९ ॥

आज्ञा देतां दशशिर । वेगें निघाला अखया कुमार । छत्र पताका ध्वज मनोहर । स्यंदर[1] रत्नाढ्य ॥ ५ ॥ आठ वारू[2] शिरोमणी । हेमबाण सचाप तूणी[3] । पाठीसीं राजकुमारश्रेणी । निपुण रथीं रणयोद्धे ॥६॥ अंगीं बळाचा गर्व थोर । रथीं बैसोनि अखया कुमार । जेथें आहे हनुमान् वीर । तेथें सत्वर पैं आला ॥ ७ ॥ प्रधान आप्त थोर थोर । रावणासीं करिती मरमर । मरों धाडिला अखया कुमार । बळें दुर्धर वानर ॥ ८ ॥

प्रधानादिआप्तांचा असंतोष—चवदा सहस्र वनकरां । पुच्छें बांधोनियां भारा । मत्स्यमगरां दिधला चारा । आणि किंकरां मारिलें ॥ ९ ॥ प्रधानपुत्र गर्वभरित । अति बळें सदा कुंथत । त्या अवघ्यांचा केला घात । केला निपात जंबूचा ॥ ११० ॥ घालोनि पुच्छाच्या आवर्ती । पांच मारिले सेनापती । अखया बापुडें तें किती । क्षणें मारुति मारील त्या ॥ ११ ॥ तुझा हा लाडका कुमार । जाणोनि हनुमंत करील मार । रावणा तूं चुकलासी थोर । तेथें कां कुमार धाडिला ॥ १२ ॥

दुसऱ्या कोणास धाडण्याची विनंती—दृष्टि पडिलिया हनुमंता । अखया परतेना मागुता । त्याचे रक्षणीं लंकानाथा । वीरां समर्थां धाडावें ॥ १३ ॥ रावणें निवडोनियां चोखट[4] । रणरंग धाडिले वीर उद्भट । महायुद्धाचा कडकडाट । आले निकट हनुमंता ॥ १४ ॥ रावणें चतुरंग एकवट । निवडे[1] धाडिले महाभट[2] । अश्व गज रथी घडघडाट । आले निकट हनुमंता ॥१५॥ न येतां मागिले वीरासी । अखया भिडला हनुमंतासीं । लघुलाघवें शरधारांसीं । हनुमंतासी आच्छादी ॥ १६॥ अभित बाणीं विंधिला शिरीं । दों बाणीं विंधिला भुजांवरी । बाण विंधले स्तनावरी । सर्वांग शरीं व्यापिलें ॥ १७ ॥ तेचि समयीं मागील वीर । वर्षती शस्त्रसंभार । तेणें आच्छादिला वानर । दिवाकर[3] जेंवी अभ्रीं[4] ॥ १८ ॥ गर्जगर्जोनि पर्जन्यधारा । कदा न रुपती गिरिवरा । तेंवी राक्षसशरसंभार[5] । अंगीं वानरा न बाधती ॥ १९ ॥ निधडी हनुमंताची शक्ती । बाण लागतां पिष्ट होती । शस्त्रें भंगोनि पडती क्षितीं । रगीं मारुति नाटोपे ॥ १२० ॥ व्यर्थ करोनि शत्रुशस्त्रांसी । हनुमान उडाला आकाशीं । अखयाची शक्ती कैसी । रथ आकाशीं चालविला ॥ २१ ॥

हनुमंत आणि अखयाचें आकाशांत युद्ध—कुमार आणि हनुमान वीर । दोघे भिडती निराधार । बळ वाणिती सुरवर । चक्राकार संग्रामीं ॥ २२ ॥ रथाचिया गतिविगती । तैसाची पिलंगत[6] मारुती । क्षणैक नभीं क्षणैक क्षितीं । दुर्धर शक्ती दोघांची ॥ २३ ॥ अखया मारूं पाहे हनुमंत । त्यासीं तो घाय नाढळत । कपि कुमाराचा करितां घात । त्यासी तो रथ नाटोपे ॥ २४ ॥ क्षणैक रथ दिसे भूतळीं । क्षणैक दिसे नभःस्थळीं । क्षणैक दिसे समुद्रजळीं । त्रिकूटाचळीं एक क्षण ॥ २५ ॥ अखया कुमार अति समर्थ वेडाविला हनुमंत । तेणें वानर अति विस्मित । कैसेनि घात करूं याचा ॥ २६ ॥ तंव बोलती सैन्यसंभार । निधडा योद्धा अखया कुमार । जाणोनि धाडी दशशिर । घायें वानर मारील हा ॥ २७ ॥ ठाकोनियां अखया

१ रथ. २ घोडे. ३ भाता. ४ उत्तम.
+ ४७।४, ३, ७, ८.

१ छातीचे, धैर्याचे. २ मोठे शूर योद्धे. ३ सूर्य. ४ ढगांनीं. ५ राक्षसाचे शरसमूह. ६ पुढें धावत.

कुमार। पळों जातां हा वानर। आम्ही धांवोनि संग्राम थोर। तीरमार करूं यासीं ॥ २८ ॥

+वधे कुमारस्य महाबलस्य वै
चकार बुद्धिं हनुमान्महाबलः।
रथे नियुक्तान्निजघान वाजिन-
स्तलप्रहारैः पवनात्मजः कपिः ॥
स भग्ननीडः परिवृत्तकूबरः
पपात भूमौ हतवाजिरंबरात्।
स तं परित्यज्य महारथो रथ
सकार्मुकः खड्गधरः खमुत्पतन् ॥

पुच्छानें रथ, ध्वज, सारथी यांचा नाश—रणीं नाटोपे अखया कुमार। त्यासी मारावयाचा विचार। हनुमान विचारी साचार। गुप्त प्रकार तो ऐका ॥ २९ ॥ कैसेनि मारूं अखयासी। ऐसें विचारितां मानसीं। कोप आला पुच्छासी। राजपुत्रासी वधावया ॥ १३० ॥ कामग[1] रथ अखयासी। रणीं नाटोपे तो आम्हांसी। पुच्छ लागोनि पाठीसीं। रथ चौपासीं बांधिला ॥ ३१ ॥ स्वर्ग मृत्यु कैलासपृष्ठीं। रथ पळवितां संकटीं। पुच्छें पुरवोनियां पाठी। कडकडाटीं बांधिला ॥ ३२ ॥ लाता हाणोनि छत्रपात। करतळें ध्वजासी घात। तालवृक्षाचा आघात। भंगिला रथ ते काळीं ॥ ३३ ॥ आंख चक्र रथकुबरू[2]। पोंवळवेलीच्या धुरा थोरू। आठही वारू सारथि वीरू। केला चकचूरू एकें घायें ॥ ३४ ॥ पुच्छ नाचविलें धांदर्डी[3]। रथ उपडिला कडाडीं। अखया कुमारें लवडसवडी। घातली उडी अति वेगें ॥ ३५ ॥ वोडण[4] खांडें[5] घेवोनि करीं। मारावया खड्गधारीं। धांविन्नला हनुमानावरी। गिरा गजरीं गर्जोनी ॥ ३६ ॥ राहें साहें हनुमंता। तुझ्या करीन मी घाता। रणीं भंगिलें माझ्या रथा। झणीं श्लाघ्यता[1] मानिसी ॥ ३७ ॥ धाकें थरकत चमकत। वोडणें धडकोनि धांवत। खड्ग लघुविद्या तळपत। आला त्वरित अति बळें ॥ ३८ ॥

†समेत्य तं मारुतवेगविक्रमः
क्रमेण जग्राह च पादयोर्दृढम्।
स भग्नबाहुः प्रविकीर्णभूषणो
हतः क्षितौ वायुसुतेन राक्षसः ॥ २२ ॥

अखयास धरून गरगरा फिरवून शिळेवर आपटला; त्याचा अंत—कुमार आणि वानरासीं। क्षण भूमीं क्षण आकाशीं। युद्ध होतां अति आक्रोशीं। येरयेरांसी वधावया ॥ ३९ ॥ वानर मारावया ठायीं[2]। अखया उपरमे लवलाहीं। हनुमंतें वायुवेगें पाहीं। धरिला पायीं लघुवेगें ॥ १४० ॥ हनुमान अति आवेशीं। भोवंडितां अति आक्रोशीं। भोवंडी दाटली तयासीं। देहभावासी विसरला ॥ ४१ ॥ वोडण पडिलें त्रिकूटावरी। खड्ग पडिलें सागरीं। मुकुट पडिला सभेमाझारी। अपांपतीं[3] भूषणें ॥ ४२ ॥ आवांकूनी महाबळी। आपटितां[†] शिळातळीं। लंकादुर्ग कांपे चळीं। निघा पाताळीं ऊठिला ॥ ४३ ॥ दिग्गजां टाळी बैसली कानीं। पन्नगां[4] पाताळीं पळणी। मेरू पडला तुटोनी। कांपे अवनी[5] येणें मानें ॥ ४४ ॥ हनुमान श्रीरामभक्त चिद्रत्न[6]। युद्धामाजी कृपाळू पूर्ण। अखया न देखे जन्ममरण। ऐसा संपूर्ण मारिला ॥ ४५ ॥ अखया राखावयासाठीं। रावणें धाडिलें कोट्यनुकोटी। अश्व गज रथ पळता थाटीं। पुच्छें पाठी पुरविली ॥ ४६ ॥ ऐसा केला कोंडमार। वानरें करोनि शिळामार। रणीं पाडिले वीर वीर। धरणीं[5] रुधिर प्रवाहे ॥ ४७ ॥ हनुमंतें ऐशिया रीतीं। केली अखयांची समाप्ती। सुरनर

१ स्वेच्छ जाणारा. २ रथाचा दांडा. ३ वेगानें. ४ ढाल. ५ तरवार.

+ अ. ४७।२०, २१, २२, २३.

१ डौल मारू नकोस. २ मारण्यासाठीं. ३ समुद्रांत. ४ सर्पांना. ५ पृथ्वी. ६ ज्ञानरत्न.

† ब—उपटितां.

ऋषीश्वर वर्णिती। अगाध कीर्ती हनुमंताची ॥४८॥ सुर वर्षती सुमनीं[1]। जयजयकार ऋषिजनीं। कीर्ति पावन त्रिभुवनीं। धन्य अंजनीनिजसुत ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण। जाहलें अखया-निर्दळण। पुढें इंद्रजितहनुमंतां रण। सावधान अवधारा ॥ १५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनूमदक्षवधो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ओंव्या ॥ १५० ॥ ॥ श्लोक ॥ २२ ॥ एवं ॥ १७२ ॥

---

## अध्याय १५ वा

अखयाच्या निधनानें रावण दुःखी—श्रीरामचंद्राय नमः ॥ अखया कुमार पाडिला रणीं। रावणें ऐकतांचि कानीं। शंख करित दाही वदनीं। लोळे धरणीं गडबडां ॥ १ ॥ मुकुट पडिला सभास्थानीं। हें प्रत्यक्ष देखोनि नयनीं। रावण रडे आक्रंदोनी। विरुद्ध करणी म्यां केली ॥ २ ॥ बुद्धिभ्रंश झाला मजसी। कुमार धाडिला युद्धासी। रणीं वानरें मारिलें त्यासी। बोल कवणासीं ठेवावा ॥ ३ ॥ माझें जें कां अशोकवन। तें मज जालें शोकस्थान। कपीनें लंके घालोनि खान[2]। पुत्रनिधान तेणें नेलें ॥ ४ ॥ आम्हां अवघ्यांदेखतां जाण। देहामाजि घालोनि खान। अखया नेला निजनिधान। नागवण मज आली ॥ ५ ॥ नव्हे त्याची चोरी मारी। हनुमान नव्हे पैं खानोरी[3]। लाज लावोनि आमुचे शिरीं। अखया मारी पुरुषार्थे ॥ ६ ॥ अवघे बोलती प्रधान। आमुचे पुत्र पाडिले जाण। स्वयें संपादी रावण। श्रेष्ठ मरण संग्रामीं ॥ ७ ॥ अखया पुत्र पडिला रणीं। शंख करी दाही वदनीं। बोला-सारिखी नाहीं करणी। निंद्याभिमानी रावण ॥८॥ सैन्य धाडिलें कोट्यनुकोटी। तें मारिलें पुच्छासाठीं। वानरें पुरविली पाठी। रावणपोटीं धुकधुकी ॥९॥ अभिलाषितां शिवाची कांता। उमा[1] मागितली भोगातां। तें पाप बैसलें माझे माथां। रुद्र[2] तत्वतां क्षोभला ॥ १० ॥ उमा ते तंव जगत्त्रयजननी[3]। विशेषें माझी सद्गुरुपत्नी। ते म्यां अभिलाषितां नयनीं। रुद्र क्षोभोनी स्वयें आला ॥ ११ ॥ अखयासी क्षयो जाहला। सत्य स्वयें रुद्र क्षोभला। राक्षसांसी क्षयो आला। तो म्यां केला महादोष ॥ १२ ॥ हा तंव नव्हे गा वानर। क्षोभोनि आला काळाग्निरुद्र। कायसा राक्षसांचा भार। सर्व संहार येथें आला ॥ १३ ॥ जो जो धाडिला अशोकवनीं। तो तो पडिला काळाचे वदनीं। आतां धाडिला नवचे कोणी। रावण मनीं विचारी ॥ १४ ॥

स्वतःच जाण्याची तयारी—अखयाचे कैवारासीं। धाडितां नये आणिकासी। मीच जाईन संग्रमासी। कांस सरिसी[4] तेणें केली ॥ १५ ॥ म्यां वानर मारिल्यापाठीं। लंका निर्मुक्त संकटीं। वानरें मज मारिल्यापाठीं। सीता गोरटी निर्मुक्त ॥१६॥ लाज लागली रावणासी। न सांगतांचि कोणासी। आंगीं बांधिलें कवचासी। संग्रामासी निघाला ॥ १७ ॥

हें समजतांच इंद्रजिताचें आगमन—ऐसें ऐकतांचि कानीं। इंद्रजित आला गजबजोनी। रावणातें नमस्कारूनी। सिंहासनीं बैसविला ॥ १८ ॥ एकलें एक पैं वानर। वनवासी ते पालेखाइर। त्यावरी जाणें दशशिर। शुद्ध विचार हा नोहे ॥ १९ ॥ वीरीं घेतला वानरधाक। धाडितां न वचे कोणी एक। मी तरी घरगुती सेवक। आवश्यक मज धाडीं ॥ २० ॥

स्वतःला पाठविण्याची विनति—वीरीं वाढिवेचे[5] बोल। रणांगणीं होती फोल। माझें बोलणें सत्य सखोल। जाणती सकळ सुरसिद्ध ॥२१॥ माझ्या प्रतापाची ख्याती। तूंही जाणसी लंकापती। मज धाडावें

---

१ पुष्पांनीं. २ नाश. ३ लुटारू.

१ पार्वती. २ शंकर. ३ त्रैलोक्याची माता. ४ दृढ. ५ धैर्याचे.

शीघ्रगती । क्षणें मारुती आणीन ॥२२॥ एकलें वानर तें किती । तुवां जाऊं नये लंकापती । मज धाडावें संग्रमार्थी । क्षणें मारुती आणीन ॥ २३ ॥ धरोनि रावणाचे चरण । इंद्रजित घाली लोटांगण । मागतां युद्धा आज्ञापन । आलें रुदन रावणा ॥ २४ ॥

[†] तथा वानरसंग्राम दृष्ट्वा श्रुत्वा परंतपः ।

सुतमिंद्रजितं शूरं कथयामास रावणः ॥ १ ॥
निहताः किंकराः सर्वे जंबुमाली च राक्षसः ।
अमात्यपुत्रा वीराश्च पंच सेनाग्रगास्तथा ॥ २ ॥
महोदरश्च शवितः कुमरोऽक्षश्च सूदितः ।
न तु तेष्वपि मे सारो यस्त्वय्यरिनिषूदन ॥३॥
न खल्वियं मतिः श्रेष्ठा यत्त्वा संप्रेषयाम्यहम् ।
इयं च राजधर्माणां क्षत्रस्य च मतिर्मता ॥४॥

त्याला धाडण्याविषयीं रावण साशंक—चौदा सहस्र वनकर[1]। ऐशीं सहस्र किंकर । जंबुमाळी प्रधानपुत्र। मारिले शूर सेनानी ॥ २५ ॥ देवां दानवांसी दुर्धर । "बळियां बळी वीर शूर । तुझा बंधु अखया कुमार । वानरें मार दृढ केला ॥ २६ ॥ पाचारोनी रणांगणीं । वीर मारिले आइणींपाइणीं[2] । ऐसा वानर दुर्धर रणीं । संमुख कोणी उरेना ॥ २७ ॥ वानरेंसीं समान बळी । कोणी न दिसे भूमंडळीं । त्यासी तुज धेतां फळी[3] । करील होळी रणभारें ॥ २८ ॥ जे गति जाहली अखयासी । ते गति होईल इंद्रजितासी । पुत्र धरोनि पोटासीं । ऊकसाबुकसीं स्फुंदत ॥ २९ ॥

इंद्रजिताचें आश्वासन—इंद्रजित म्हणे लंकानाथा । कायसी वानराची कथा । तूं कां करिसी व्यर्थ चिंता । बांधोनि आतां आणीन ॥ ३० ॥ युद्धसंधीं[4] गळा बांधोन । इंद्र आणिला जिंतोन । इंद्रजित हें अभिधान[5] । तेंपासून मज जालें॥३१॥

१ माळी. २ एकापाठीं एक. ३ युद्ध. ४ युद्धामध्यें. ५ नांव.

† तु—यथा.

त्या मज वानरासीं रण करितां तुज संदेह कोण । वानराचा गळा बांधोन । येथें आणीन भक्ति माझी ॥ ३२ ॥

रावण त्याला पाठवितो व मायिक युद्धप्रकार सुचवितो—ऐकोनि इंद्रजिताचें वचन । सुखावला दशानन । दुर्धर धाडी निजसैन्य । देऊनी सन्मान पाठवी ॥ ३३ ॥

+ततस्तु रक्षोधिपतिर्महात्मा हनूमताऽक्षे निहते कुमारे ।
मनः समाधाय स देवकल्पं समादिदेशेंद्रजितं सरोषः ॥५॥
त्वमस्त्रभृच्छस्त्रविदां वरिष्ठः सुरासुराणामपि शोकदाता ।
सुरेषु सेंद्रेषु च दृष्टकर्मा पितामहाराधनसंचितास्त्रः ॥६॥
न तु ते समरे कश्चित्तुल्योऽस्ति रिपुसूदन ।
तस्माद्गच्छाद्य वै पुत्र युद्धाय विजयाय च ॥ ७ ॥

ऐकोनि इंद्रजिताचें वचन । रावण विचारी आपण । निराहारी ब्रह्मचारी पूर्ण । त्याचेनि मरण मेघनादा ॥ ३४ ॥ वानरा येथें फळभक्षण । याचेनि इंद्रजित न पवे मरण । तरी युद्धासीं संदेह कोण । धाडी रावण आल्हादें ॥ ३५ ॥ अखया मारिला जगजेठी । तेणें रावण क्रोधदृष्टी । इंद्रजितासी सांगे गोष्टी । वानर कपटी मारावा ॥ ३६ ॥ ब्रह्मयापासोनि विद्या सकळ । शिकलासी अस्त्रबळ । तुजपासीं शस्त्रें सकळ । सृष्टीं सबळ तूं एक ॥ ३७ ॥ इंद्रादि देवा रणधांदळी[1] । जिंतोनि अमर तेहतीस कोडी । घातले लंकेचे बांधवडीं[2] । गाढी प्रौढी तुज पुत्रा ॥ ३८ ॥ करोनि मेघांचें तर्जन[3] । हिरोनी त्यांचें गडगर्जन[4] । मेघनाद[5] हें अभिधान । शोभे संपूर्ण तुज पुत्रा ॥३९॥ अस्त्रबळ शस्त्रबळ । बुद्धिबळ निजांगबळ । बळ मेळवोनियां सकळ । धरीं तत्काळ वानर ॥ ४० ॥ जरी नाटोपे करितां बळ । तरी

१ युद्धात धुमाकूळ उडवून. २ कैदेंत. ३ धिक्कार. ४ थोर गर्जना. ५ इंद्रजिताचें नांव.

+ अ. ४९।१, २, ३, ६.

त्वां त्याचा करावा छळ[१] । तुजपासीं विद्या प्रबळ । गोळांगुळ[२] धरावया ॥ ४१ ॥ प्रबळ बळें हनुमंत । तुजसीं तुकों नये एथ । तुजपासीं शस्त्रास्त्रें समस्त । समयीं लागत तीं येई ॥ ४२ ॥ वेळ पाहोनि सावचित्त । युद्धा निघावें त्वरित । जयो पावसी निश्चित । लंकानाथ अनुवादे ॥ ४३ ॥

+ ततः पितुस्तद्वचनं निशम्य
प्रदक्षिणं दक्षसुतप्रभावः ।
चकार भर्तारमतित्वरेण
रणाय वीरः प्रतिपन्नबुद्धिः ॥ ८ ॥
ततस्तैः स्वगणैरिष्टैरिंद्रजित्प्रतिपूजितः ।
युद्धोद्धतकृतोत्साहः संग्रामं संप्रपद्यत ॥ ९ ॥

प्रस्थानाचे वेळीं अशुभ शकुन–पितृवाक्य आशीर्वचन । इंद्रजित ऐकोन आपण । परमभक्तीं प्रदक्षिण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ४४ ॥ इंद्रजित निघतां उल्हासेंसी । नग्न कुमारी शिंके पाठीसीं । दचक पडिला रावणासीं । इंद्रजितासीं आशंका ॥ ४५ ॥ शिंक झाली पाठीसीं । भविष्य पुसे ब्रह्मयासी । ब्रह्मा सांगे रावणासी । अति गुह्यासी गुप्तत्वें ॥ ४६ ॥

ब्रह्मयास विचारितां मरण न येण्याची खात्री–अपेश यशीं यश अपेशीं । मरण नाहीं इंद्रजितासी । वानर आणी लंकेसीं । तुजपाशीं रावणा ॥ ४७ ॥ रणीं धरिजेल वानर । ऐकोनि ब्रह्मयाचें उत्तर । अवघे करिती जयजयकार । सैन्यसंभार सज्जोनी ॥ ४८ ॥

रावणाचे विशेष आदेश–गुह्य सांगे स्वयें रावण । वानर नव्हे साधारण । रणकर्कश अति दारुण । जाण संपूर्ण कृतांत[३] ॥ ४९ ॥ जे जे गेले अशोकवनीं । ते ते पडले काळाचे वदनीं । सैन्य अश्व गज रथ गांजोनी । वीर मर्दोनि निर्दळिले ॥५०॥ जे जे देखिले हनुमंतें । ते ते निमाले निश्चितें । बोंब सांगावया पुरतें । नेदी वीरांतें उरों ॥ ५१ ॥ कवच न चले तयापुढें । वोडणखांडे[१] तें बापुडें । कोण राहे तयापुढें । घायें रोकडें विभांडी ॥ ५२ ॥ शस्त्रें न रुपती बाण । न चले अस्त्रांचें प्रेरण । आपुले वांचवोनी प्राण । रणांगण साधावें ॥ ५३ ॥ गुह्य सांगतां तुजपासीं । परम शक्ति पुच्छासीं । पुच्छें निर्दळिलें सैन्यासी । महावीरांसी मारक ॥ ५४ ॥

मारुतीला बांधून आणण्याची इंद्रजिताची प्रतिज्ञा–इंद्रजित म्हणे असोत युक्ती । सत्य ब्रह्मयाची वचनोक्ती । गळां बांधोनियां मारुती । लंकेप्रति आणीन ॥ ५५ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें उत्तर । वीरीं केला जयजयकार । झाला वाद्यांचा गजर । सैन्यसंभार चालिला ॥ ५६ ॥

+ रथैर्मत्तैश्च मातंगैर्वाजिभिश्च खरोष्ट्रकैः ।
शस्त्रैश्च विविधैस्तीक्ष्णैर्भृश चोपचिता बलैः ॥ १० ॥
छत्रध्वजपताकैश्चालंकृता महती चमूः ।
रथेनादित्यवर्णेन तं वानरमुपागमत् ॥ ११ ॥
मृदंगाश्शंखाः पटहाः स्वनंति
विशालभेर्यश्च स्वनंति दुंदुभीः ।
तूर्याण्यनेकानि च डिंडिमाश्च
युद्धे जयायैव रथस्वनश्च ॥ १२ ॥

महान् सैन्याची स्वारी–मत्तमातंग महाथोर । शायशीं प्रयुतें कुंजर । शतानुशतकोटि रहंवर[२] । असिवार[३] असंख्य ॥ ५७ ॥ एक वळंघले उष्ट्रीं[४] । एक वळंघले महाखरीं । एक चढले अश्वांवरी । गिरागजरीं गर्जत ॥ ५८ ॥ वारु उडविती जैंवी केसरी । नाचविती तीं पायांवरी । हो हो मा मा जी जी करी । यावा[५] स्वरीं दाविजे ॥ ५९ ॥ वीर वांटीव आतुर्बळी । हस्तबाहुकरतळीं । कंगल टोप राघावळी । मुक्तामणिमेळीं पाखरा[६] ॥ ६० ॥

---

१ कपट. २ वानर. ३ यम. + ४७।१६, ७.

१ ढाल, तरवार. २ रथ. ३ स्वार. ४ उंटावर. ५ आवेश. ६ झुली. + ४६।१६.

अंगत्राणें[1] पैं वीरांसी । लखलखीत तेजोराशी । हिरे माणिके जडलीं त्यांसी । रविप्रभेसीं सम प्रभा ॥ ६१ ॥ शेळी सात्वळी शक्ति तोमर । अढाड चव्हाण कोइतेकार । शूळत्रिशूळफरशधर । धनुर्धर पायांचे ॥ ६२ ॥ भिंडिमाळ चेंडू चक्रें । गदा मुद्गल परिघपत्रें । सिद्ध केलीं अग्निशस्त्रें । नाना यंत्रें रणमारा ॥ ६३ ॥ अलंगाईत बाणाईत । तुळणें बोढणें[2] धडकित । कोइतेकार पैं तळपत । जेठी पिलंगत मुष्टिघाता ॥ ६४ ॥ खड्गहस्त[3] खेटकहस्त । पटाईत पट्टीश हस्त । जमदाढा कटारहस्त । अश्मपात[4] पैं एका ॥ ६५ ॥ ऐसे पायाचे[5] मोगर[6] । वीर चालिले अपार । भाट गर्जती कैवार । गजगंभीर गडगर्जे ॥ ६६ ॥ पुढें पायांचे निधडे वीर । तयांमागें असिवार । त्याचे पाठीसीं रहंवर । राजकुमार त्यांमागें ॥ ६७ ॥ दांतीं लोहसेल्या तिखट । वारिया न चले वाट । दोहीं बाहीं गजांचा थाट । मदोत्कट चालती ॥ ६८ ॥ श्वेत पीत अति आरक्त । बहुपताकीं सैन्य शोभत । पताकीं वाढवावया पुरुषार्थ । ब्रिदाईत वागविती ॥ ६९ ॥ सूर्यप्रभासमयुक्त । रथ निजतेजें लखलखीत । ध्वज पताका शोभत । ओळकंबत बहुमाळा ॥ ७० ॥ तडक फुटले एक सरें । भिंडिमाळांचे[6] पागोरे[7] ।खाखाइलीं[8] रणतुरें । वीर गजरें गर्जती ॥ ७१ ॥ धडधडां विधातें पाहीं । निशाणें[9] लागलीं एकचि घाई । विराणीं वाजती लवलाहीं । दुंदुभी पाहीं त्राहाटिल्या ॥ ७२ ॥ शंख मृदंग टाळघोळ । वाजती काहाळा[10] किनकाहाळा । घर्घरित घोगरगळा । ध्वनि आगळा तुरंगांचा¶ ॥ ७३ ॥ पांवे वाजती थापटेकरी । पट त्राहाटिल्या भेरी । चंड वाजिन्नल्या चंडमोहरी । निशाणें गजरीं गर्जती ॥ ७४ ॥ रणीं वाजती गिडबिडीं । भेडां[1] मळसूत्र लिडबिडी । ऐकोनि हनुमंताची प्रौढी । भय धाकही घेतला ॥ ७५ ॥ हनुमान एकला एक वानर । त्यावरी अमित दळभार । तरी धाकती समग्र । झणीं वानर मारील आम्हां ॥ ७६ ॥

हनुमताला आनंद व उल्लास—ऐकोनि वाजंत्र्यांचा नाद । सैन्य देखोनि सन्निध । हनुमान करितो आल्हाद । राम गोविंद तुष्टला ॥ ७७ ॥ करावया राक्षसांसीं झगडा । मुहूर्तें केला बनउपाडा । इंद्रजिताचा पाडाडा । रणीं रोकडा झाडीन ॥७८॥ माझे पुरवावया मनोरथ । आजि तुष्टला श्रीरघुनाथ । रणीं निर्दाळोनी समस्त । इंद्रजित गांजीन ॥७९॥ अखया मारोनि रणीं । प्रथम केली म्यां बोहणी । येथोनि वीरांचिया श्रेणी[2] । रणीं मर्दूनी मारीन ॥ ८० ॥ पुच्छ नाचतें पैं धरणीं । सैन्य मारोनियां रणीं । पूजूं चामुंडा भवानी । मासाची घणी[3] भूतांसी ॥ ८१ ॥ पुच्छ अतिशयें सज्ञान । भूतां दिधलें आमंत्रण । मांसभोजन रुधिरपान । कृपा करोनि सेवावें ॥ ८२ ॥ ज्याचे पोटीं जे आवडी । ते मज सांगावी रोकडी । ते ते पुरवीन परवडी । राक्षसकोडी मारोनी ॥ ८३ ॥ आजि हेचि भाजी भाकरी । तुम्हीं करावी न्याहारी । श्रीराम पुढें रणकेसरी । पंचधारी निववील ॥८४॥

पुच्छाला सर्वांचें निर्दळण करण्याची आज्ञा—पुच्छासी गुज सांगे हनुमंत । जो जो आला सैन्यांत । परतों न द्यावा नगरांत । करावा घात अवघ्यांचा ॥८५॥ जो जो होईल शरणागत । त्यासी राखावें निश्चित । येर मारावे समस्त । आज्ञा समर्थ मानीं पुच्छा ॥ ८६ ॥ मानोनि स्वामीचें वचन । लंकाद्वारीं पुच्छ रक्षण । जो परतेल रक्षोगण[4] । त्याचा प्राण घ्यावया ॥ ८७ ॥

---

१ चिलखतें. २ ढाली. ३ हातात तलवार घेतलेले. ४ धोंडमार. ५ पायदळ. ६ गोफणगुंड्याचीं. ७ वृष्टि. ८ वाजलीं. ९ रणभेरी १० झाजा.

¶ तुरगांचा.

१ मित्रयांना. २ पंक्ती. ३ संतोष. ४ राक्षससमुदाय.

इंद्रजिताचें प्रस्थान—असो हे बहुसाल व्युत्पत्ती । पुढील कथेंची संगती । इंद्रजित आरूढला रथीं । रथप्रयुक्ती अवधारा ॥ ८८ ॥

+स पक्षिराजोपमतुल्यवेगैर्व्याघ्रैश्चतुर्भिः स तु तीक्ष्णदंष्ट्रैः। रथं समायुक्तमसह्यवेगं समारुरोहेंद्रजिदिंद्रकल्पः ॥१३॥

रथचक्र तें प्रवाळ[1]। आंख मरकताचा[2] सुनीळ। धुरा आणि जूं तीतें इंद्रनीळ। उपराड सकळ रत्नांचे ॥ ८९ ॥ रथीं जुंपिले प्रबळ। नखी दंष्ट्री सिंह शार्दूळ[3]। मुखें भयानकें अति विक्राळ। जिव्हा जाज्वल्य अग्निप्राय ॥ ९० ॥ रथीं सारथी कपटराशी। अश्ववागोरे[4]† तयापासीं। इंद्रजित बैसला रथेशीं। निजचापासी सज्जोनी ॥ ९१ ॥ रथध्वज सुनीळनीळा। ध्वजपताका विचित्रलीळा। रत्नमुक्ताफळमाळा‡। रथीं बैसला इंद्रजित ॥९२॥ जैसा इंद्र सुरवरेंसीं। तैसा इंद्रजित राक्षसेंसीं। मुक्ताफळांच्या झालरेसी। अति शोभेसीं सुप्रभा ॥ ९३ ॥ कनकदंडयुग्मचामरीं। उपभोग जाणविती नानापरी। ऐसिया सेनेसीं संभारीं। जयजयकारीं निघाला ॥ ९४ ॥ जैसी गरुडागमनीं शक्ती। तैसीच रथाची सवेग गती। रणीं जिणावया मारुती। शीघ्रगती निघाला ॥ ९५ ॥

असाळीचें आगमन, तिचा आवेश व विक्राळ वदन पसरणें—इंद्रजित येतां समदळीं[5]। पुढें धाविन्नली असाळी[6]। जेणें मारिला अखया बळी। त्याची होळी मी करीन ॥ ९६ ॥ एकलें एक तें पालेखाइर। त्यावरी कोपे सैन्यभार। पिसाळले निशाचर। तो मी वानर मारीन ॥ ९७॥ ठाकोनि आली* अशोकवन। संमुख हनुमंत देखोन। निकट वटारिले नयन। विक्राळ वदन पसरिलें ॥९८॥ एक जाभाडें भूतळीं। दुजें लाविलें नभःस्थळीं। कराळ विक्राळ दांताळी। जिव्हा काळी ममसमसीत ॥ ९९ ॥ करितां स्वानंदें युद्धासीं। आडवी आली हे राक्षसी। जेंवी साधितां निधानासी। पहिलें विवसी पैं उठे ॥ १०० ॥ युद्धनिधानाजवळी। प्रथम विवसी हे असाळी। पहिलें हेचि देवोनि बळी। काळिके काळी चामुंडे ॥ १ ॥ भोजन करावया संतृप्ती। पहिलें ल्हान प्राणाहुती। ते संग्रामसमयीं तृप्ती। प्राणाहुती असाळी ॥ २ ॥ प्रथम समिधा होमून। मग होमिती प्रधान। तैसीच असाळी हे जाण। समिधावदान[1] संग्रामीं ॥ ३ ॥ असाळीनें पसरिलें जाभाडें। न पाहतां मागें पुढें। हनुमंताची उडी पडे। मशकाएवढें धरी रूप ॥ ४ ॥

सूक्ष्मरूपानें तिच्या मुखातून प्रवेश, व काळीज उदरांतून घेऊन निर्गमन—नातळांचि तिचे दांतां। जिव्हेसींही नातळतां[2]। उदरीं प्रवेशता हनुमंता। न कळे तत्त्वतां राक्षसी ॥ ५ ॥ वानर मुखीं प्रवेशलें। मुखींच्या मुखीं हारपले। किंवा दांतांतळीं दडालें। नाडलें† पहिलें जिव्हाग्रीं ॥ ६ ॥ लीन झालें मुखापासीं। कीं पळालें श्वासोच्छ्वासीं। कोण गती वानरासी। असाळीसी लक्षेना ॥ ७ ॥ आंबट तिखट खारट। गोड कडू कीं तुरट। चवी न कळेचि स्पष्ट। करी कटकट राक्षसी ॥८॥ जिव्हांदांतीं नाढळे होटीं। शेवटीं[3] तृप्त नव्हेचि पोटीं। वानरें ठकविलें उठाउठीं। अतर्क्य दृष्टीं कळेना ॥ ९ ॥ असाळीनें गिळिला हनुमंत। चुकला इंद्रजिताचा अनर्थ। लोकीं विस्तारिली मात। रणकंदनार्थ सैन्याचा ॥ ११० ॥ पहिलेंचि गिळिती वानर। तरी कां मरता अखया कुमार। किंकर आणि बनकर। प्रधानपुत्र वांचते ॥ ११ ॥ ऐसे लोक सांगती गोष्टी। तंव असाळीस शूळ पोटीं।

---

१ पोंवळें. २ पाचेचा. ३ वाघ. ४ लगाम. ५ ससैन्य. ६ पडलकेची स्वामिनी, रावणाची बहीण.

१ समिधाची आहुती. २ न शिवतां. ३ शेवटीं.

+४८।४९ † ब–वाग्दोरे. ‡ बक–फळें. * डबक–आलें.

† बक–नाडिलें, नाढळें.

हनुमंतें काळीज धरिलें मुष्टीं । लोळे सृष्टीं गडबडां ॥ १२ ॥ करावया इंद्रजितासीं रण । हनुमंताची आवडी पूर्ण । तिचे उदरीं न राहे क्षण । केले विंदान[1] तें ऐका ॥ १३ ॥ उपडोनि काळिजाचा देंठ । वेंबीपासीं फाडोनि पोट । हनुमंत निघोनियां प्रकट । केला उद्भट भुभुःकार ॥ १४ ॥ ऐकतां तयाचा भुभुःकार । कांपिनले निशाचर । मुख्य दचकला धुर[2] । सैन्यसंभार खळबळला ॥ १५ ॥

असाळीचें निर्दाळण—रावणापासीं सांगती मात । असाळीनें गिळिला हनुमंत । सर्वेचि दुसरी बोंब सांगत । केला निपात असाळीचा ॥ १६॥ राक्षस मावकर[3] भारी । त्यांहूनि वानरीं विद्या थोरी । रिघोनि तियेचे उदरीं । महामारीं मारित ॥ १७ ॥ जैसी वहीण शूर्पणखा । तैसीच हे असाळिका । हनुमंतें मारितांचि देखा । दशमुखा बहु दुःख ॥ १८ ॥ वानर पेटलें इंद्रासीं[4] । करूं कोणकोणाच्या दुःखासी । काय होईल इंद्रजितासी । निजमानसीं धाकत ॥ १९ ॥

इंद्रजित व मारुती द्वंद्वयुद्ध—केला असाळीचा घात । ऐकोनि इंद्रजितें मात । कोपें चालिला कृतांत । हनुमंत दंडावया ॥ १२० ॥ देखोनियां हनुमंता । धिंवसा[5] नव्हे सैन्या समस्ता । ऐसें कळलें इंद्रजिता । होय प्रेरिता निजरथ ॥ २१ ॥

+ आयात सरथ दृष्ट्वा तूर्णमिंद्रजित कपि. ।
ननाद च महानाद व्यवर्धत च वेगवान् ॥१४॥
इंद्रजित्स रथ दिव्यमास्थितश्चित्रकार्मुक' ।
धनुर्विस्फारयामास तडिदूर्जितनिःस्वनम् ॥१५॥
तत' समेतावतितीक्ष्णवेगौ महाबलौ तौ रणनिर्विशंकौ ।
कपिश्च रक्षोधिपतेश्च पुत्रः सुरासुरेंद्राविव बद्धवैरौ ॥१६॥
शराणामंतरेणाशु व्यावर्तत महाकपिः ।
हरिस्तस्याभिलक्ष्यस्य मोक्षयन्लक्ष्यसंग्रहम् ॥ १७ ॥

विजू गडगर्जे अंबर । तैसा धनुष्याचा टणत्कार । इंद्रजित निधडा महाशूर । रहंवर प्रेरिला ॥ २२ ॥ ऐकोनि धनुष्याचा† टणत्कार । वानरें केला भुभुःकार । नादें कोंदलें अंबर । गिरिकंदर दुमदुमिलें ॥२३॥ निधा[1] उठिला पाताळीं । भूतें कळकळिती अंतराळीं । पक्षी भ्रमती नभोमंडळीं । बैसलीं टाळीं दिग्गजांचीं ॥ २४ ॥ इंद्रजिता युद्धाची आवडी । रथ प्रेरिला कडाडीं । वानरें उभविली पुच्छाची गुढी । नाचे आवडी रणरंगीं ॥ २५ ॥ एक रावणी राजकुमर । दुजा रामदूत वानर । एक राक्षसी राक्षसेंद्र । दुजा कपींद्र कपींमाजी ॥ २६ ॥ दोघे वीर अति प्रबळ । समान बळ समान शीळ । दोघे संग्रामीं अति कुशळ । दोघे चपळ रणमारा ॥२७॥ दोघे भिडती महावीर । पाहूं आले सुरवर । सिद्ध गंधर्व ऋषीश्वर । नर किन्नर विमानीं ॥ २८ ॥ शचीसहित[2] शचीपती । सावित्रीसहित प्रजापती[3] । उमेसहित उमापती[4] । पाहूं येती संग्रामा ॥ २९ ॥ खवळले दोघे वीर । काळकृतांत अति दुर्धर । दोघे जैसे काळाग्निरुद्र । युद्धीं सत्वर मिसळले ॥१३०॥ एक गज एक केसरी । एक हिरण्यकशिपु एक नरहरी । सहस्रबाहु परशुधारी । ऐशियापरी मिसळले ॥३१॥ एक सर्प एक सर्पारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । एक मुर[5] एक मुरारी । ऐशियापरी मिसळले ॥ ३२ ॥ इंद्रजित हाणी दुर्धर घाय । हनुमान फळें खाय विटाय । कुशी खाजवी डोळे मिचकाय । दाविता होय आंगठा ॥ ३३ ॥ इंद्रजित खवळोनि रणीं । वर्षलासे दुर्धर बाणीं । वानर वर्षला पाषाणीं । रणांगणीं गर्जोनी ॥ ३४ ॥ विंधी सुवर्णपुंख[6] भाळीं । वानर हाणी सबळ शिळीं ।

---

१ कौतुक, युक्ती. २ मुख्य (इंद्रजित). ३ कपटी. ४ युद्धाला. ५ धैर्य. + अ. ४८।२५, २७, ३१.

१ प्रतिध्वनि. २ इंद्राणीसहित. ३ ब्रह्मदेव. ४ शंकर. ५ मुरदैत्य. ६ सोन्याच्या पिसाऱ्याचे बाण.

† ड–धनुषी; ख–धनुष्य.

एक हाणी गदामुद्गलीं । शाळताळीं पैं दुजा ॥३५॥ इंद्रजित वर्षे विचित्र कांडें[१] । वानर वर्षे चापट धोंडे । रागें उडोन हाणितां खांडें । वृक्षखडें ठोकिला ॥ ३६ ॥ साटोपें हाणितां शिवशक्ती । वानर वर्षे अति पर्वतीं । इंद्रजित वेडावला चित्तीं । रणीं मारुति नाटोपे ॥ ३७ ॥ एक चेंडुचक्र पैं सोडी । दुजा हाणी प्रचंड धोंडी । सवेग हाणितां लहुडी । समूळ धोंडी पैं दुजा ॥ ३८ ॥ पट्टिश हाणितां तवकें[२] वानरें हाणितां खडकें । फुटलें इंद्रजिताचे धैर्यमडकें । पडला अटकें पुच्छाचे ॥ ३९ ॥ इंद्र जिताची रणव्युत्पत्ती[३] । फावल्या रणीं लावी ख्याती । नाटोपता पळे मागुती । पुच्छाप्रती बळ न चले ॥ १४० ॥ सैन्यासभोंवता चहूंकडां । पडला पुच्छाचा पैं वेढा । सरतां नये मागां पुढां । वानरें वेढा† लाविलें‡ ॥ ४१ ॥ पाषाणीं बाण करितां कूट । बाणी पाषाण करी पीठ । युद्ध मांडलें अचाट । अति सकट इंद्रजिता ॥४२॥ वानर नाटोपे निजशक्ती । कपटें मारावा मारुती । कपट न चले पुच्छाप्रती । कपटघातीं" कपिपुच्छ ॥ ४३ ॥ इंद्रजित वर्षे शरधारीं । वानर वर्षे शिळाशिखरीं । सैन्या होतसे चकचुरी । आपांपरी[४] राक्षसां ॥ ४४ ॥ बोंब सुटली सैन्याआंत । इंद्रजित मेला कीं जीत । वानरें केला पर्वतघात । रणीं हुंबत राक्षस ॥४५॥ न चले शस्त्रअस्त्रयुक्ती । मागें सरतां नये पुच्छाहातीं । पुढें नाटोपे मारुती । चिंतावर्तीं[५] इंद्रजित ॥ ४६ ॥

मारुतीच्या पराक्रमामुळें इंद्रजित चिंताक्रान्त—

चिंतातुर देखोनि त्यातें । हनुमंत म्हणे इंद्रजितातें । शिळावृक्षीं न हाणीं तूतें । न हाणीं पर्वतें भाक माझी ॥ ४७ ॥ इंद्रजितनामाची ख्याती । जिहीं बाणीं जिंतिला अमरपती[१] । तया बाणीं विंधोनि मजप्रती । विजयवृत्ति[२] साधीं पां ॥ ४८ ॥ ज्या बाणाच्या कडाडीं । देव घातले बांधवडीं । ते मज विंधोनियां प्रौढीं । विजयाची गुढी[३] उभारीं पां ॥ ४९ ॥ ऐसें बोलतां हनुमंता । राग आला इंद्रजिता । मंत्रयुक्त अस्त्रां समस्तां । होय विंधिता अति कोपें ॥ १५० ॥

+शराणामग्रतस्तस्य पुनः समभिवर्तत ।
प्रसार्य हस्तौ हनुमानुत्पपातानिलात्मजः ॥१८॥
परस्पर दुर्विग्रहौ बभूवतुः समेत्य तौ मारुततुल्यविक्रमौ ।
ततस्तु लक्ष्ये§ प्रविहन्यमाने शरेष्वमोघेषु च संपतत्सु॥१९

इंद्रजिताचीं शस्त्रास्त्रें त्यावरच उलटतात—मंत्र-

युक्तास्त्रप्रयुक्तीं । इंद्रजित वर्षे शरसंपत्ती । परता न सरेचि मारुती । शंका चित्तीं मानीना ॥ ५१ ॥ माझे अंगीं बाण रुपती ' ही शंका नाहीं हनुमंतीं । सुर नर आश्चर्य मानिती । तैसी ख्याती तेणें केली ॥५२॥ रामनामाचिया शक्तीं । नित्य निर्द्वंद्व-स्थिति मारुती । तेणें इंद्रजितासीं ख्याती । हेही† उपपत्ती अवधारा ॥५३॥ पसरोनियां दोन्ही हात । बाण कवळोनियां समस्त । उसळोनियां गगनाआंत। बाण हाणित राक्षसां ॥ ५४ ॥ पडतां बाणांचा संपात[४] । स्वयें सैन्या होय निःपात । घायीं राक्षस कुंथत । जालें विपरीत संग्रामीं ॥ ५५॥ हनुमंतासीं करितां रण । इंद्रजित भुलला संपूर्ण । आपुलें सैन्य मारी आपण । निर्वाणबाण वर्षोनी ॥ ५६ ॥ धनुष्यबाण हनुमंतासीं । हा संग्राम नाहीं त्यासीं । आवेशें भुली इंद्रजितासीं । निजसैन्यासी मारित ॥ ५७ ॥ माझे निर्वाणीचे बाण । वानरें कवळोनि संपूर्ण । आमचीं शस्त्रें आम्हांसी जाण । रणकंदन मांडिलें ॥ ५८ ॥ इंद्रजिताचे बाणांआंत । स्वानंदें हनुमंत विचरत । बाण मंत्रशक्तियुक्त । केले व्यर्थ

१ बाण. २ आवेशानें. ३ युद्धकौशल्य. ४ दुर्दशा. ५ चिंतेच्या फेऱ्यात.

१ इंद्र. २ जयस्थिति. ३ ध्वजा. ४ समूह.

†ब–वेढा. ‡क्ष–लाविला. "ब्ड–कपटा.

+४८।११,१२,१४,१९. § ब–लक्षे. † क्ष–तेही.

हनुमंतें ॥ ५९ ॥ न चले शस्त्रांची खटपट । न चले अस्त्रांचे पैं बेट । न चले वानरासीं कपट । रणीं उद्भट[१] गांजिलें ॥ १६० ॥ दिव्यास्त्रें एक एक । वानरें केलीं निरर्थक । इंद्रजितें घेतला धाक । जीवीं धुकधुक लागली ॥ ६१ ॥ इंद्रजितबाणांची शरसुटी । वानरें करोनियां वटी । धांवोनि झोंबला पैं कंठीं । धनुष्य मुष्टीं मोडिलें ॥ ६२ ॥

मल्लयुद्धातही इंद्रजित जर्जर–सरली बाणांची निजओढी । तरी वानरा प्रौढी गाढी । मल्लविद्येची परवडी । कडोविकडी मांडली ॥ ६३ ॥ उरीं शिरीं आणि कोपरीं । तडवे हाणिती परस्परीं । कळा लावोनि भुजांवरी । हाणिती उदरीं चपेटघात॥६४॥ सांभाळितां वानरलातें[†] । तंव मस्तकीं हाणितला हातें । सांभाळितां दक्षिणहस्तें[२] । तंव गांजीत डाव्यानें ॥ ६५ ॥ करितां मल्लविद्याव्युत्पत्ती । मागें पुच्छाच्या आघातीं । सव्याग्र रथ आणि रथसारथी। नेले समाप्ती वानरें ॥६६॥ मारोनि सारथि भंगिला रथ । इंद्रजित केला दैवहत । न टळे पुच्छाचा आवर्त[३] । रणीं हनुमंत नाटोपे ॥ ६७ ॥ ध्वज भंगिला आघातें । छत्रें भंगिलीं हाणोनि लातें । मुकुट पाडोनियां तेथें । इंद्रजितातें गांजिलें ॥६८॥ भूतळीं समस्त ऋषीश्वर । गगनीं पाहती सुरवर । अवघे करिती जयजयकार । विजयी वानर श्रीरामें ॥ ६९ ॥ एका जनार्दना शरण । जाला इंद्रजिताचा अपमान । पुढें सैन्यनिर्दळण । कपिबंधन अवधारा ॥ १७० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां इंद्रजितअपमानहनुमद्धस्तेन पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ १७० ॥ ॥ श्लोक ॥ १९ ॥ एवं ॥ १८९ ॥

---

१ अत्यंत. २ उजव्या हातानें. ३ वेढा.

† क्ष–लाथा.

## अध्याय १६ वा

अवमानित इंद्रजिताचा उद्वेग व पलायन, बिळात प्रवेश–श्रीरामचंद्राय नमः ॥ इंद्रजित पावोनि अपमान । अतिशयें जाला उद्विग्न । हनुमंताचें बळलक्षण । सर्वथा संपूर्ण लक्षेना ॥१॥ हनुमंताची धैर्यवृत्ती । हनुमंताची संग्रामशक्ती । हनुमंताची सवेग गती । अतर्क्यस्थिति लक्षेना ॥ २ ॥

+ हनूमतो वेद न राक्षसोऽतर
न मारुतिस्तस्य महात्मनोऽतरम् ।
जगाम चिंता महतीं महात्मा
समाधिसंयोगसमाहितात्मा ॥ १ ॥†

अतर्क्य हनुमंताची गती । ते लक्षेना नाना युक्तीं । इंद्रजिताची खुंटली मती । रणीं मारुति नाटोपे ॥३॥ रणीं नाटोपे मारुती । आपुलें पूर्वशौर्यकीर्ती । वानरें नेली निंदेप्रती । सलज्ज चित्तीं इंद्रजित ॥४॥ इंद्रातें रणीं जिंकोन । पावलों इंद्रजित अभिधान[१] । वानरासीं करितां रण । तृणासमान मज केलें ॥ ५ ॥ मी एक गाढा[२] वीर सृष्टीं । ऐसा फुगारा होता पोटीं । रणीं वानरें पुरवोनि पाठी । तृणासाठीं मज केलें ॥६॥ जळो माझी धैर्यशक्ती । माझी जळो वीरवृत्ती । रणीं नाटोपे मारुती । कीर्ति अपकीर्ति मज माझी ॥ ७ ॥ भंगिला रथ आणि सारथी । भस्म केली शस्त्रसंपत्ती । रणीं न जिंकवे मारुती । क्षीणशक्ति इंद्रजित ॥ ८ ॥ न चले शस्त्रास्त्र युक्ती । न चले मल्लविद्याव्युत्पत्ती[३] । कपट न चले वानराप्रती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ९ ॥ कोणी एखादी युक्ती । न चले ह्या वानराप्रती । जळो माझी यशःकीर्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ १० ॥ माझ्या वरदाची वरोक्ती । मारूं न शके मज मारुती । धरोनि नेलिया

---

१ नाव, संज्ञा. २ बलिष्ठ. ३ मल्लविद्येचें ज्ञान.

+ ४८।३४, ३५. † ब्र–विगाईयन्नात्मविमोघकर्म.

रामाप्रती । विटंबिती वानरें ॥११॥ रावणें आणिलें सीतेसी । बांधून नेईल मज रामापासीं । तेथें करितां अपमानासी । वानरांसी कोण वारी ॥१२॥ रावणें होऊनि भिकारी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । वानरें करोनि जुंझारी[१] । मज निर्धारीं नेईल॥१३॥ अंगदाच्या पाळण्यासीं । खेळणें बांधिलें दशमुखासी। पौलस्तीनें मागतां त्यासी । अपमानेंसीं सोडिला ॥१४॥ मुंडोनि दाढया मिशांसी । मसी लावोनियां मुखासी । पांच पाट काढोनि शिरासीं । ऐसा लंकेसीं धाडिला ॥ १५ ॥ मज धरोनि नेलिया मारुती । माझी होईल तैशीच गती । कांहीं न चले उपपत्ती[२] । चिंतावर्ती इंद्रजित ॥ १६॥ पुच्छीं बांधोनि हनुमंता । येथोनि मज धरोनि नेतां । भांवण्या कोणी नये सर्वथा । परम चिंता इंद्रजितां ॥ १७ ॥ सुबद्ध[३] धाक[४] घेतला पोटीं । रणीं वानरा देखोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठीं । पुच्छासाठीं धाकोनी ॥ १८ ॥ पळतां न पळवे पुढें । पडिलें पुच्छाचें बिरडें । तेथल्या विवरामाजी दडे । बहु साकडें गांजिलें ॥ १९ ॥ दुस्तर धाक घेतला मनीं । गुप्त विवर अशोकवनीं । इंद्रजित गेला पळोनी । सुलीन[५] होवोनि दडाला ॥ २० ॥

हनुमंताचा विवेक; पुच्छासी विचारविनिमय— हनुमंत वीर जगजेठी । न लागेचि पळत्यापाठीं। समूळ विचारोनि पोटीं। विवेकदृष्टीं राहिला ॥२१॥ इंद्रजिताचें निजमरण । सर्वथा नाहीं मजअधीन । तरी कां वृथा करूं निर्वाण । आंगवण[६] कां नासूं ॥ २२ ॥ इंद्रजितासी मज मारितां । क्षण न लगे पैं आतां । ब्रह्मवरदाची[७] वार्ता । मिथ्या सर्वथा मी न करीं ॥ २३ ॥ ऐसऐसिया विवेकदृष्टीं । हनुमान न लागे इंद्रजितापाठीं । सैन्य अवलोकिलें दृष्टीं । धांवे कडकडाटीं वधावया ॥ २४ ॥ पुच्छ म्हणे स्वामिनाथा । कवळोनि राखिलें समस्तां । तूं भागलासि युद्ध करितां । मज यथार्थी दे आज्ञा ॥२५॥ हनुमंत म्हणे तुझेनि बळें । म्यां महावीरां मांडिलें छळें । आतां विभांडोनियां दळें । रणकल्लोळें विचरोनि ॥ २६ ॥ मी जातें तूं चाली वैरण। ऐसेनि भरडूं राक्षसधान्य । डोळ उरती जे †सघन । रणकंदन करूं त्यांसी ॥ २७ ॥ मारावया सैन्यसंभार । करोनि पुच्छासीं विचार । मग दिधला भुभुःकार । निशाचर[१] खळबळले ॥ २८ ॥

+अश्वैरश्वान्गजैर्नागान्योधैर्योधान्रथै रथान् ।
लांगूलेनाप्यनेकांश्च सैनिकान्समपोथयत् ॥ २ ॥
तलेनाभ्यवधीत्काश्चित्पद्भ्यां काश्चित्परंतपः ।
मुष्टिभ्यामवधीत्काश्चिन्नखैः काश्चिद्व्यदारयत् ॥ ३ ॥
ममार चोरसा काश्चिदूरुभ्यामपरान्कपिः ।
केचित्तस्यैव नादेन तत्रैव पतिता भुवि ॥ ४ ॥
कृत्वा वै विस्वरान्नादान्निपेतुर्भुवि वाजिनः ।
भग्नीडध्वजच्छत्रैर्भुवि कीर्णोऽभवद्रथः ॥ ५ ॥
स कपिर्नाशयामास राक्षसान्बलदर्पितान् ॥ ६ ॥

हनुमंत व पुच्छानें केलेला सैन्य-संहार—हनुमान देखोनि महाबळीं । असुरीं मांडिली तंव फळी[२] । शस्त्रें सुटलीं समकाळीं । नभीं भूतळीं न समाती[३] ॥ २९ ॥ अतिरथी महारथी । अश्वपती गजपती । शस्त्रें हाणिती पदाती । रणीं मारुती लक्षोनि॥३०॥ शस्त्रघाताच्या समेळीं । हनुमान नाचत गोंधळीं । पुच्छें शस्त्रांची करोनि होळी । रणसमेळीं विचरत ॥ ३१ ॥ हनुमान रणीं ‡निघटघट[४] । वीर हाणिती सुभट । हाणितां शस्त्रें होती पीठ । हाहा कटकटा राक्षसां ॥ ३२ ॥ करावया सैन्यसमाप्ती । रणीं खवळला मारुती । सर्व मारतां निजशक्ती ।

१ युद्ध. २ युक्ति. ३ अत्यत. ४ भीति. ५ अति गुप्त. ६ सामर्थ्य, दळ. ७ ब्रह्मदेवाच्या वराची.

१ राक्षस. २ युद्ध. ३ मावेनात. ४ घटावलेला, निर्ढावलेला.

† बक—सघन. ‡ ड—निघंट; क्ष—हनुमान निघे रणीं रणघटा. + अ.४७,अ.३७,अ.४६।१२,१९,४६।२९

व्युत्पत्ति अवधारा ॥३३॥ अश्वीं अश्वातें मारित । गजीं गजातें संहारित । रथीं रथ उपडित । मारुनी मत्त सारथी ॥ ३४ ॥ पायींचे पायीं रगडित । वीरें वीर पैं झोडित । ध्वज छत्रेंसीं मोडित । रणीं मारित‡ अति मारें ॥ ३५ ॥ पुच्छीं कवळोनि गजकोटी । हनुमान वसवोनि आपटी । गजीं गज ते उपटी । पडिली सृष्टीं गजदळें ॥ ३६ ॥ विदारितां कुंभस्थळें । निघती गजांचीं मुक्ताफळें । रणीं पाडिलीं गजढिसाळें[१]। पुच्छबळें उपडोनी॥३७॥ शायसीं प्रयुतें[२] मत्त हस्ती । पुच्छें केली रणसमाप्ती । हस्तींच्या पिष्ट करोनि अस्थी । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ३८ ॥ पुच्छ रिघोनि सैन्यतळीं । महावीरां बांधोनि मोळी । आपटितां त्यांसी भूतळीं। जाहली रांगोळी सैन्याची ॥ ३९ ॥ खर उष्ट्र अश्वतर । पुच्छीं बांधोनि अपार । तळीं उभे अश्वसंभार । घायें चकचूर करी त्यांचा ॥४०॥ पुच्छें करितां महामार । रणीं उठला हाहाकार । येरीकडे हनुमान वीर । करी वीरमार तो ऐका ॥ ४१ ॥ एक§ मारी करतळीं । असंख्य रगडिले पायांतळीं । अमित मारिले मुष्टिसमेळीं । नखें चिरफळी *एकैकां ॥ ४२ ॥ एक मारिले जानुचक्रीं[३] । वीरीं केली बहुमारी । एक मारिले अर्धचंद्रीं[४] । गिरिवरीं मारिले ॥ ४३ ॥ आंवळोनियां वरावरी । वीर मारिले शतसहस्रीं । तळवे हाणोनि उपराउपरीं । लक्षांतरीं मारित ॥ ४४॥ भुभु:कार देतां अति तवकें[५] । एकें निमालीं उपधाकें । एकें पडिलीं अधोमुखें । मेलीं अनेकें अंगवातें ॥ ४५ ॥ देतां भुभु:कार प्रबळ । रणीं उठला हलकल्लोळ । भेणें करोनि मूत्रमळ । प्राण तत्काळ सांडिले ॥ ४६ ॥ हनुमंताचे गिरागजरीं । वाजंत्री निमाले नादेंकरीं । जो तो रणीं शंख करी । आपांपरी[१] राक्षसां ॥ ४७ ॥ सभोंवता पुच्छाचा आवर्त । मध्यें मारित हनुमंत । जाला सैन्यासी अंत । आला प्राणांत राक्षसां ॥ ४८ ॥ पुच्छें पुरविली पाठी । होऊं नेदी कुटुंबभेटी । लंका पाहूं नेदी दृष्टी । जीवासाठीं राक्षसां ॥ ४९ ॥ रणीं मारितां हनुमंत । पुच्छ पळों नेदी नगरांत । जो तो येवोनि युद्धाआंत । पडे मूर्च्छित अति घाकें ॥ ५० ॥ एक घायें¶ झालीं वेडीं । एकें पडलीं उपडीं । एकें नागवीं उघडीं । मेलीं मढीं होवोनि ठेलीं ॥ ५१ ॥ झाडिला इंद्रजिताचा [२]पादाडा । केला सैन्याचा नितोडा[३] । रामनामें हनुमान गाढा । केला झगडा निजनेटें ॥ ५२ ॥ रथ भंगिले कोटयनुकोटी । मारिल्या अश्वगजांच्या थाटी[४] । छत्रें भंगोनि लोळती सृष्टीं । ध्वजा कोटयनुकोटी विखरलिया ॥ ५३ ॥ अशुद्ध वाहतें गडाडी । तेचि रणनदी गाढी । जाहल्या प्रेतांच्या दरडी । गजकरवडी[५] तेचि ग्राह[६] ॥ ५४ ॥ तीर तरती सपिच्छ । तेचि रणनदीचे मत्स्य । चोडणें[७] वाहती ते कच्छ[८] । सर्प सपुच्छ रणभाले ॥ ५५ ॥ मेद मांस अति दुर्गम । तोचि दोहीं तीरींचा कर्दम[९] । वीर मिसळले* विक्रम[१०] । सुसरी परम दों भागीं ॥ ५६ ॥ मोक्षसुखाची सुरवाडी । रणनदी वाहे पुराडी[११] । सर्वस्वत्यागें घालिती उडी । त्या त्या जोडीतें तो जाय ॥ ५७ ॥ ध्वजेंसीं वाहे रहंवरू । तेंचि शिडेंसहित तारू । तेथें तारक श्रीरामचंद्रु । पापपारू पावती ॥ ५८ ॥ रिघोनियां रणसमुद्रीं । जो बैसे या तारवावरी । त्यासी श्रीराम सूत्रधारी ।

१ मोठमोठे हत्ती. २ प्रयुत=दश लक्ष. ३ गुडध्यानीं. ४ गचांडी देऊन. ५ वेगानें.

‡ड—रण पाडित, क्ष—रण मारीत असीमारे. §अ.४६।१२ * ड—+केलि, व—येकेका.

१ दुर्दशा. २ गर्व. ३ नाश. ४ समुदाय. ५ हत्तीचीं प्रेतें. ६ सुसरी. ७ ढाली. ८ कासवें. ९ चिखल. १० पराक्रमी. ११ पुरानें.

¶ वक—घायवटं. * व—सिसाळे, डक्ष—विषाले.

परपारीं पाववी ॥५९॥ या ताखातें दृढ जो धरी । त्यासी श्रीराम स्वयें तारी । या ताख्याची कीर्ति जो करी । राम परपारीं पाववी ॥ ६० ॥ उदो म्हणुनि भद्रकाळी । घेवोनि आली भूतावळी । खाती मांसाच्या वडवाळी[१] । रुधिरांजुळी प्राशित ॥ ६१ ॥ या रणाचिया युद्धख्याती । जे आवडी नित्य गाती । श्रीराम सुखावोनि चित्तीं । त्यांसी तारी स्वानंदें ॥ ६२ ॥ आनंदें नाचे क्षेत्रपाळ । शिरें चौडकें[२] वाहे वेताळ । भूतें मिळोनियां सकळ । रणगोंधळ नाचती ॥ ६३ ॥ बहुतां दिवसांचें धरणें । दिधलें हनुमंतें पारणें । अवघे घालिती लोटांगणें । विजयी होणें रणरंगीं ॥ ६४ ॥ काळिजें घेवोनि हातीं । रणीं यक्षिणी वाणें देती । शंखिणी डंखिणी वाणें घेती । मग भक्षिती स्वानंदें ॥ ६५ ॥ पिकें पिकली रणनगरी । राक्षस-दांतांच्या राशी थोरी । भूतें मोजती कुडवेवरी । पाहे क्रीडेसी हनुमंत ॥ ६६ ॥ देव ब्राह्मण भैरवासी । बलुतें[३] दिधलें वेताळासी । खळें दान तें भूतांसी । महाकाळीसी राजभाग ॥ ६७ ॥ खळें मातेरें मारकोसी । मेसको तिचे घरची दासी । वेसपेंडी सटवीसी । पाळीच्या मान्यासी काळिका ॥ ६८ ॥ ¶अग्रपिकाची व्युत्पत्ती । विभागिली स्वयें मारुतीं । पश्चिम धान्याची महाख्याती । रघुपति विभागील ॥ ६९ ॥ करोनि सैन्याचा निर्तोडा[४] । काढोनि पुच्छाचा पैं वेढा । देवळाचा पहिला हुडा । हनुमान गाढा बैसला ॥ ७० ॥ गेला देखोनि हनुमंत । सबळवीर* समस्त । आणिक घायाळ कुंथत । स्वनगरांत† निघाले ॥ ७१ ॥ एक कण्हत एक कुंथत । एक हुंबत एक हुंबरत । एक पाणी पैं मागत । एक खुणा हात दावोनी ॥ ७२ ॥ एक रडत एक पडत । एक अतिशयें चडफडित । एक अति दुःखें तडफडित । एक खुरडत कटिभंगें ॥ ७३ ॥ एकाचें फुटलें कपाळ । एक ते अशुद्धबंबाळ[१] । एकाची ओढे अंतरमाळ । एका तळमळ अति घातें ॥७४॥ एकाच्या मस्तका झाला भंग । एकाचें पर्वतीं चेंदलें अंग । एकाचे चरण पडिले व्यंग । एका क्षयरोग शाळताळीं ॥ ७५ ॥ पाडोनि राक्षसांचे दांत । मुष्टिघातें घातले घशांत । नखें नाकें छेदिलीं बहुत । वीर कुंथत अति लाजें ॥ ७६ ॥ रण ओघावयां देख । अशोकवनीं न येती लोक । पुच्छें लाविलासे धाक । एकाएकीं धांवती ॥ ७७ ॥

जनाचा आक्रोश—समस्त सैन्या केली बोहरी[२] । कळकळिती नरनारी । बोंब सुटली घरोघरीं । लंकानगरीं आकांत ॥ ७८ ॥ काळतोंडी रावणाची थोरी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । केली राक्षसाची बोहरी । महामारी वानरें ॥ ७९ ॥ दशमुख तो काळमुखा । सीता चोरोनि आणिली देखा । मारविलें सकळ कटका[३] । दुःखें लंका लवंडिली ॥ ८० ॥ मुळींच राजा जाला भिकारी । त्यावरी निंद्य कर्म चोरी । तेही हरण परनारी । आली महामारी राक्षसां ॥ ८१ ॥

इंद्रजित मेल्याचा प्रवाद—रणीं रावण मरता । तैं लंकालोक स्वस्थ होता । करविलें इंद्रजिताचे घाता । रणीं हनुमतावरी धाडूनी ॥ ८२ ॥ करितां अखयाचा कैवार । रणीं मारविला ज्येष्ठकुमर । शंख करिती निशाचर[४] । दशवक्त्र[५] हडबडिला ॥ ८३ ॥ इंद्रजित मेला किंवा जीत[६] । हे कोणी

१ ग्रास. २ एक प्रकारचें वाद्य. ३ गावचे वतनदार उपाध्या, जोशी वगैरे यास चाकरीबद्दल दिलें जाणारें धान्यादि. ४ नाश.

¶ ड—अगाध. *ब—मीस करवीर समस्त.

† डश—नगरा अंतरी. . ..क ती.

१ रक्तानें भरलेले, माखलेले. २ नाश. ३ सैन्य. ४ राक्षस, ५ रावण. ६ जीवंत.

न सांगती मात। तेणें हडबडिला लंकानाथ। केला घात वानरें ॥ ८४ ॥

रावणाचा शोक—शोधूं जावें जंव रणासीं भूतीं भक्षिलें प्रेतांसी। तेथें ओळखी कायसी। रावणासी अति दुःख ॥ ८५ ॥ रणीं निमाला ज्येष्ठ सुत। रावण मुखीं धुळी घालित। दाही मुखीं शंख करित। आक्रंदत अति दुःखें ॥ ८६ ॥ दुःखें गडबडा लोळे। केश सुटले मोकळे। अश्रुधारा स्रवती डोळे। पिटी कपाळें अति दुःखें ॥ ८७ ॥ इंद्रजिताच्या केलें घाता। काय करावें म्यां आतां। रणीं न धरवे हनुमंता। परम चिंता रावणा ॥ ८८ ॥ ब्रह्मयानें सांगितलें मजपासीं। गळा बांधोनि वानरासी। इंद्रजित आणील तुजपासीं। असत्य त्यासी कां जालें ॥ ८९ ॥ ब्रह्मयाचे ब्रह्मवाणीसीं। नाहीं विटाळ असत्यासी। भय नाहीं इंद्रजितासी। निश्चयेंसीं मी जाणें ॥ ९० ॥

ब्रह्मदेवास पाचारण, ब्रह्मदेव स्वतःच अशोकवनात जातात—पाचारोनि चतुराननर[१]। त्यासी पुसे दशानन। इंद्रजित आणील कपि बांधोन। तें सत्य वचन करावें ॥ ९१ ॥ इंद्रजिताची स्थिति गती। राक्षस आणूं न शकती। वनीं बैसला मारुती। राक्षसघाती महावीर ॥ ९२ ॥ मीच जावोनि अशोकवना। इंद्रजिताची विवंचना। समूळ आणोनियां मना। दशानना सांगेन ॥ ९३ ॥ ऐसें सांगोनि लंकापती। वना आला प्रजापती। हनुमंतें ब्रह्मयाप्रती। घातलें क्षितीं[२] लोटांगण ॥ ९४ ॥

ब्रह्मदेव-हनुमंत संवाद—ब्रह्मा हनुमंता सांगत। आला राक्षसांसी अंत। अवश्य तुवां करावा घात। लंकानाथ न मारूनी ॥ ९५ ॥ कुंभकर्ण आणि लंकानाथ। यांसी वधील श्रीरघुनाथ। लक्ष्मण वधील इंद्रजित। येरांचा अंत वानरीं ॥ ९६ ॥ हनुमान सांगे ब्रह्मयासी। माझी आवडी आहे ऐसी। भेटी घेवोनि रावणेंसीं। करूं लंकेसीं वाताहात[१]¶ ॥ ९७ ॥ ब्रह्मा सांगे हनुमंतासी। इंद्रजित तुझेनि भयेंसीं। लपला विवरप्रदेशीं। मी त्याजपासीं जातसें ॥ ९८ ॥ तुज न लागे पाशबंधन। हें मज आहे निजज्ञान। माझें ऐकावें वचन। ब्रह्मबंधन मानावें ॥ ९९ ॥ इंद्रजित घालील ब्रह्मपाशासीं। तुवां बद्ध मानोनि आपणासी। स्वयें जावें गा लंकेसीं। रावणासी भेटावया ॥ १०० ॥ रावणाची घ्यावी भेटी। आवडी आहे तुझे पोटीं। ब्रह्मपाश मानोनि कंठीं। यावें त्रिकूटीं लंकेसीं ॥ १ ॥ इंद्रजिताचेनि हस्तपातें। हनुमान मानी पाशबंधातें। ब्रह्मदेवा तुझेनि हातें। ब्रह्मबंधातें मानीन ॥ २ ॥ ब्रह्मा म्हणे ऐसेंचि घडे। माझेनि हातें वाडेंकोडें[२]। हनुमंता पाशबंधनीं पडे। रावणापुढें न्यावया ॥ ३ ॥ इंद्रजितें वानरा देवोनि पाठी। विवरीं पळतां अति संकटीं। अनुतापला कपाळ पिटी। उडाली पुष्टी वाढिवेची[३]। ॥ ४ ॥ इंद्रजित अति लज्जायमान। विवरामाजी बैसोन। वानरा ब्रह्मपाशीं बंधन। करी तें †विंदान अवधारा ॥ ५ ॥ एका जनार्दना शरण। वानरा ब्रह्मपाशबंधन। बंधनीं मारुती निर्बंधन। कथाविंदान अवधारा ॥ ६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमत्कृतरावणसैन्यवधो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ओंव्या॥ ॥१०६॥ ॥ श्लोक ॥ ६ ॥ एवं ॥ ११२ ॥

---

## अध्याय १७ वा

इंद्रजिताची दैन्यावस्था; ब्रह्मदेवाचें स्मरण—श्रीरामचंद्राय नमः ॥ रणीं पाठी देवोनि वानरा। लपला असतां विवरा। परम लज्जा राजकुमरा।

---

१ चार मुखांचा, ब्रह्मदेव. २ जमिनीवर.

१ नासाडी. २ आवडीनें. ३ पराक्रमाची.

¶ वडकम—हाताहत. † ब—कथा.

काय महावीरां मुख दावूं ॥ १ ॥ माझी वीरवृत्ति अति [1]लाठी । इंद्रजितनामाची ख्याति मोठी । वानरें नेली पुच्छासाठीं । रणसंकटीं गांजोनी ॥ २ ॥ कपिपुच्छाचा दुर्धर मार । रणीं गांजिला राजकुमर । सैन्या जाला समूळ मार । काय करूं मी आतां ॥ ३ ॥ कैसेनि भेटो महावीरां । केंवी मुख दावूं राक्षसेंद्रा । आतां न वचें लंकापुरा । लाजेचें वीरा अति दुःख ॥ ४ ॥ वाहिली सदाशिवाची आण । शिवलों रावणाचे चरण । प्रमाणें जालीं अप्रमाण । वानरें पूर्ण गांजिलें ॥ ५ ॥ मज रणीं येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । अवकळा वांचले प्राण । वरदान जळो माझें ॥ ६ ॥ अवकळेचें जें जिणें । त्याहूनि श्रेष्ठ रणीं मरणें । जळोत माझीं वरदवचनें । वरदानें नागविलें ॥ ७ ॥ पोटीं घालावयापुरतें । शस्त्र नुरेचि माझे हातें । लाजें जीव द्यावा येथें । वरदान मातें मरों नेदी ॥ ८ ॥ रणीं गांजिलें माकडें । कांहीं उपाय न चले पुढें । इंद्रजित खळखळा रडे । अति साकडें* ओढवलें ॥ ९ ॥ मुख दावूं नये लाजेहातीं[2] । मरण नये वरदोक्ती । इंद्रजित पडला अति आकांतीं । तंव ब्रह्मोक्ति आठवली ॥ १० ॥ गळां बांधोनि मारुति । इंद्रजित आणील लंकेप्रती । ऐसें बोलिला प्रजापती । त्यासी निश्चितीं पाचारूं ॥ ११ ॥ मिथ्या नव्हे ब्रह्मवाणी । तरी कां मी भंगलों रणीं । हनुमान न बांधवे बंधनीं । सत्यवचनी केंवी ब्रह्मा ॥ १२ ॥ पाचारावया[3] चतुरानन । धाडावया नाहीं सेवकजन । बाहेर निघतां आपण रोकडें मरण कपिपुच्छें ॥ १३ ॥ मज बाहेरी निघतां । पुच्छ करील माझे घाता । हनुमंत लागला मजभोंवता । नेदी [4]विधाता मज भेटों ॥ १४ ॥

१ मोठी. २ लाजेमुळें. ३ बोलवावयास. ४ ब्रह्मदेव.

* व–सकटें.

माझ्या [1]पित्याचे पित्याचा [1]पिता । कैसेनि भेटे मज विधाता । ऐसी इंद्रजित करितां चिंता । आला अवचिता परमेष्ठी ॥ १५ ॥

व त्याचें आगमन, इंद्रजिताची असहायता–ब्रह्मा देखोनि अवचिता । हर्ष इंद्रजिताच्या चित्ता । चरण वंदोनियां माथां । होय सांगता उल्लासें ॥ १६ ॥ स्वामी बोलिलेति वचनोक्ती । गळां बांधोनि मारुती तूं आणिसील लंकेप्रती । मज [2]अपहृति कां जाली ॥ १७ ॥

+ततो मतिं राक्षसराजसूनु-
श्चकार तस्मिन्हरिवीरमुख्ये ।
अवध्यतां तस्य कपेः समीक्ष्य
कथं निगच्छेदिति निग्रहार्थम् ॥ १ ॥
ततः पैतामहं वीरः सोऽस्त्रमस्त्रविदां वरः ।
संदधे सुमहातेजास्तं हरिप्रवरं प्रति ॥ २ ॥
अवध्योऽयमिति ज्ञात्वा तमस्त्रेणास्त्रतत्त्ववित् ।
बबंध त महाबाहु मारुतात्मजमिंद्रजित् ॥ ३ ॥

तो राक्षसराजसुत । स्रष्ट्याप्रति असे पुसत । कैसेनि बांधवे हनुमंत । त्यासी निग्रहार्थ मज सांगें ॥ १८ ॥ हनुमान हरिहरां अवध्य । तया माझेनि न करवे बंध । कपीसीं न चले माझा क्रोध । वाक्य अबद्ध बंधनीं ॥ १९ ॥ इंद्रजिताचे निजहस्तीं । बंधन पावोनि मारुती । आणिजेल लंकेप्रती । ते वचनोक्ती सत्य करा ॥ २० ॥ असत्य न व्हावें ब्रह्मवचन कपीस ब्रह्मपाशबंधन । नारदें सांगितलें आपण । ते आठवण मज जाली ॥ २१ ॥ स्वामीनें कृपा करून । द्यावें ब्रह्मपाश-बंधन । तेणें मी हनुमंता बांधोन । मग श्लाघ्यता वाढिवीं ॥ २२ ॥ यासी ब्रह्मपाश नेदितां । मिथ्या मानी ब्रह्मवाक्यता । दिधल्या न बांधवे हनुमंता प्रत्ययार्थी दिधलें ॥ २३ ॥ इंद्रजित ब्रह्मपाश घेऊनी । मोकली मारुति लक्षोनि । कपि न लिंपे

१ पिता रावण, त्याचा पिता पुलस्त्य त्याचा पिता ब्रह्मदेव. २ प्रतिबंध, नाश. + अ. ४८।३६, ३८.

पाशबंधनीं । निर्बंधनी ब्रह्मपाशा ॥ २४ ॥ इंद्र यम वायु वरुण । यांचें हनुमंता वरदान । शशी सूर्य वह्नि ईशान[१] । यांचें वरदान हनुमंता ॥ २५ ॥ हरिहरांचें वरदान । ब्रह्मयाचें ब्रह्मवरदान । कपीस ब्रह्मपाशबंधन । न बांधी जाण वरदानें ॥ २६ ॥ कर्मपाश धर्मपाश । ब्रह्मयाचे ब्रह्मपाश । बांधूं न शके जन्मपाश । नित्य निर्दोष हनुमंत ॥ २७ ॥ हनुमान सबाह्य निराश । निरपेक्षाचे हरिहर दास । त्यासी कैसेनि बांधिती पाश । नित्यनिराश हनुमंत ॥ २८ ॥ पाश न लागती हनुमंता । इंद्रजितासी परम चिंता । ब्रह्मपाश गेले वृथा । तेचि श्लोकार्था अनुवादे ॥ २९ ॥

+अहो महत्कर्म कृतं निरर्थं न राक्षसैर्मन्त्रगतिर्विमृष्टा ।
पुनश्च नास्त्रे विहतेऽस्त्रमन्यत्प्रवर्तते संशयिताः स्म सर्वे ॥४॥
अस्त्रं तद्वितथं दृष्ट्वा चिंतयामास राक्षसः ।
अथागत्य ततो ब्रह्मा मारुतात्मजमब्रवीत् ॥५॥

इंद्रजित ब्रह्मपाश घालितां । ते न लगती हनुमंता । वानरें महाकर्म केलें वृथा । जघन्यता[२] मज आली ॥ ३० ॥ जेथें न चले माझी मंत्रशक्ती । न चले ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । तेथें राक्षसमंत्रयुक्ती । कैसेनि रीतीं सरेल ॥ ३१ ॥ माझी अस्त्रशस्त्रशक्ती । ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । अवघी वृथा केली मारुतीं । राक्षसयुक्ती अति मिथ्या ॥ ३२ ॥ ज्यासी बांधीना ब्रह्मपाशशस्त्र । त्यावरी न चले आणिकाचें अस्त्र । वानर सर्वार्थी दुर्धर । यासी कपींद्र नाटोपे ॥ ३३ ॥ ब्रह्मयानें दियली खोटी शक्ती । म्हणोनि न बांधवे मारुती । इंद्रजित कोपला प्रजापती । दुष्टमति आम्हांवरी ॥ ३४ ॥ तूं आमुचा मूळपुरुष । तुवांचि मांडिला आमुचा द्वेष । रणीं मारावे राक्षस । देशी उपदेश वानरा ॥ ३५ ॥

१ शंकर. २ हीनत्व, कमीपणा.

+ अ. ४८।४४, ५१.

ब्रह्मयाला दोष देतां राक्षसांच्या कपटवृत्तीमुळे पाश प्रभावी होत नाहीं— ब्रह्मा म्हणे तूं विकल्पमूर्ती[१] । ब्रह्मद्वेष तुझ्या चित्तीं । तुज नातळे ब्रह्मशक्ती । रणीं मारुती केंवी बांधवे ॥ ३६ ॥ निष्कपट निर्मळवृत्ती । शम दम नित्य शांती । त्याचेनि होते ब्रह्मशक्ती । विजयप्राप्ती स्वानंदें ॥ ३७ ॥ माझी शक्ती दे मजप्रती । बांधोन देईन मी मारुती । तुमच्या न चलती युक्ती । तुम्हां मारुती न बांधवे ॥ ३८ ॥ मापेंवीण कणांच्या राशी । न मोजवती आणिकांसी । राक्षसीं पीडावें भूतांसी । हनुमंतासी न बांधवे ॥ ३९ ॥ डोळा देखे सर्वरूपासी । देखों न शके आपणासी । जीवपीडा[२] राक्षसांपासीं । हनुमंतासी न बांधवे ॥ ४० ॥ पाशशक्ति घेवोनि हातीं । सन्मुख येवोनि प्रजापती । स्वयें बोले हनुमंताप्रती । तेही उपपत्ती अवधारा ॥ ४१ ॥

+नानृतं मद्वचो बधग्रहणं कुरु वानर ।
एवमुक्तस्तथेत्युक्त्वाऽवदत्कपिवरात्मजः ॥ ६ ॥
अभिवद्य विचेष्टः स पपात धरणीतले ।
अस्त्रेण चापि बद्धस्य भयं मम न जायते ॥७॥

पाशबद्ध होण्याविषयीं ब्रह्मदेवाची हनुमतास विनंति—ब्रह्मा म्हणे हनुमंतासी । तुज न बांधवे ब्रह्मपाशीं । माझें वचन सत्यत्वासीं[३] । मानी आपणांसी पाशबंध ॥ ४२ ॥ असत्यवाद माझे माथां । येवों नेदीं हनुमंता । ब्रह्मवाक्यें बंधनता । पाशबंधनता मानावी ॥४३॥ ब्राह्मणाचें ब्रह्मवचन । नुल्लंघिसी अणुप्रमाण । माझें पाळोनियां वचन । पाशबंधन मानावें ॥ ४४ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । हनुमंत घाली लोटांगण । तुझेनि बोलें देह त्यागीन । पाशबंधन तें किती

१ संशयाची केवळ मूर्तीच, संशयी. २ प्राणिमात्राला छळणें. ३ खरें करून.

+ अ. ४८।३९, ४४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. अनुक्रम २३०८० वि: नों दि



॥४५॥ऐसें बोलोनि हनुमंत । ब्रह्मपाशीं पडे मूर्च्छित । धरणीवरी[1] निचेष्टित । धकधकित जेंवी ध्याड ॥ ४६ ॥

मान्य करून हनुमंताने बांधून घेतलें—ब्रह्मपाशीं हनुमंत । पडला दिसे निचेष्टित । परी तो [2]बंधमोक्षातीत । नित्यनिर्मुक्त रामभक्त ॥ ४७ ॥ ब्रह्मपाशीं हनुमंत । निश्चयेंसीं नित्य निर्मुक्त । ब्रह्माज्ञें बद्धत्व दावित । प्राकृत मानित बांधला ॥ ४८ ॥ जेंवी रवी[3] थिल्लरांत[4] । लोक मानिती थिल्लरस्थ । तेंवी कपि ब्रह्मपाशांत । बांधला दिसत परी मुक्त ॥ ४९ ॥

इंद्रजितानें मारुतीला बांधला अशी नगरात घोषणा—विजयी वीर इंद्रजित । ब्रह्मपाशीं बांधला हनुमंत । ऐशा गोष्टी लंकेआंत । सांगती मात घरोघरीं ॥ ५० ॥ ब्रह्मपाशें बांधला हनुमंत । परी तो ब्रह्मबंधातीत । देखोनि इंद्रजित विस्मित । तेंचि बोलेन श्लोकार्थी ॥ ५१ ॥

+ ततस्ते राक्षसा दृष्ट्वा निर्विचेष्टमरिंदमम् ।
बबन्धुः रज्जुपाशैश्च द्रुमचीरैश्च संहतैः ॥ ८ ॥
स बद्धस्तेन बंधेन विमुक्तस्तेन वीर्यवान् ।
अस्त्रबंधः स चान्यं हि न बंधमनुवर्तते ॥ ९ ॥
कृष्यमाणश्च रक्षोभिस्तैश्च बंधैर्निपीडितः
हन्यमानस्ततः क्रूरै राक्षसैः काष्ठमुष्टिभिः ॥ १० ॥
अथेंद्रजित्तं समीक्ष्य मुक्तमस्त्रेण बद्धं द्रुमचीरसूत्रैः ।
व्यदर्शयत्तत्र महाबलं तं हरिप्रवीरं सगणाय राज्ञे ॥ ११ ॥

पाशबद्ध हनुमंताशीं राक्षसांच्या चेष्टा व ओढाताण—क्षितितळीं निश्चेष्टित[5] । पडिला देखोनि हनुमंत । राक्षस धांवोनि समस्त । त्यासी बांधित वेलवाखीं ॥ ५२ ॥ एक तृणवेंठी वळिती । एक वृक्षसाली काढिती । एक द्रुम चिरफळिती[6] । रणीं मारुती बांधावया ॥ ५३ ॥ एक आणिती चऱ्हाटें । एक वळिती सलंब फांटे । देखोनि हांसिजे मर्कटें । बंधन खोटें मज न लागे ॥ ५४ ॥ राक्षसें बापुडीं वेडीं । व्यर्थ करिती ओढाओढी । फोडीन लंकेच्या उतरंडी । पाडीन दरडी दुर्गांच्या ॥ ५५ ॥ रावणा देखोनियां दृष्टीं । यांचा घावो साहोनि पृष्ठीं । तो घावो नेवोनि तृणासाठीं । लंका वठावठीं जाळूं आजी ॥ ५६ ॥ ऐसा आवांका[1] धरोनि पोटीं । द्रुमचीरबंधन मानूनि कंठीं । ध्यावया रावणाचि भेटी । जातो जगजेठी हनुमंत ॥५७॥ जातां हनुमंताप्रती । भेणें पळाली ब्रह्मशक्ती । ब्रह्मपाशीं मुक्त मारुती । [2]चिंतावर्ती इंद्रजित ॥५८॥ जो बांधवेना ब्रह्मपाशीं । तो केंवी बांधवे द्रुमपाशीं । बंधनमिसें जातो लंकेसी । रावणासी गांजावया ॥ ५९ ॥ बंधन नाहीं हनुमंता । मिथ्या मानोनि बंधनता । स्वयें लंकेसी जातो आतां । लंकानाथा गांजावया ॥ ६० ॥ आम्हांसी गांजिलें अशोकवनीं । रावणा गांजील लंकाभुवनीं । परम चिंता इंद्रजिताचे मनीं । अपेश जनीं मज आलें ॥६१॥ इंद्रजितें हनुमंत । बांधोनि आणिला लंकेआंत । हेची लोकीं विरूढली मात । करील अनर्थ तें न कळे ॥ ६२ ॥

एवंभूत हनुमंताचा लंकेत प्रवेश— ब्रह्मयानें सांगितलें कानीं । तें हनुमंतें धरोनि मनीं । प्रवेशला लंकाभुवनीं । इंद्रजिताचे मनीं चळकांप ॥ ६३ ॥ इंद्रजित म्हणे राक्षसांसी । हनुमान बांधा ब्रह्मपाशीं । ब्रह्मपाशें बंधन नाहीं त्यासी । तो तुम्हांसी न धरवे ॥ ६४ ॥ राक्षस म्हणती वानर किती । सांपडलें आमुच्या हातीं । आम्ही याची करूं [3]शांती । तूं कां चित्तीं भितोसी ॥ ६५ ॥

---

१ पृथ्वीवर. २ बंध व मोक्ष नाहींत असा. ३ सूर्य. ४ डबक्यांत. ५ मूर्च्छित. ६ साली काढूं लागले. +: ३८।४७,४९, ५२-५४

---

१ निश्चय. २ मोठ्या काळजीमध्यें. ३ नाश.

+तं मत्तमिव मातंग बद्ध कपिनरोत्तमम् ।
रक्षोभिर्विकृताकारैः कृष्यमाणं ततस्ततः ॥१२॥
स ददर्श महातेजा रावण कपिसत्तमम् ।
राक्षसा राक्षसेंद्राय रावणाय न्यवेदयन् ॥१३॥
हन्यता बध्यतां चापि भक्ष्यतामिति चापरे ।
राक्षसास्तत्र संक्रुद्धाः परस्परमथाब्रुवन् ॥ १४ ॥
स हन्यमानो बहुभिश्च तत्र
समेत्य रक्षोधिपतेश्च दूतैः ।
न प्राणचिंता न शरीरभग-
स्ते राजदूता व्यथिता बभूवु. ॥ १५ ॥

मत्तमातंग[१] महाबळी । वृथा बांधिजे कमळमृणाळीं[२] । तेंवी हनुमंत महाबळी । बांधिजे सकळीं वृक्षशाखा ॥ ६६ ॥ एक बांधिती रज्जुबंधनीं । एक बांधिती वाक वळूनी । एक बांधिती मुंज चिरूनी । कपि धरोनि आणिला ॥ ६७ ॥ एक ओढिती पूर्वेसी । एक ओढिती पश्चिमेसी । एक ओढिती उत्तरेसी दक्षिणेसी एक पैं ॥ ६८ ॥ एक रागें हाणिती बुकी । जो हाणि तो होय दुःखी । मणगटें मोडोनि तवकीं[३] । महाशंख वामहस्तें ॥ ६९ ॥ एक आक्रोशें हाणिती मुसळ । मुसळ पिष्ट होय तत्काळ । हाणी त्याचा हात उखळे । पडे तत्काळ मूर्च्छित ॥ ७० ॥ एक धांवोनि टोला हाणित । घायें रुधिर स्रवे हात । हनुमान गदगदां हांसत । व्यर्थ पुरुषार्थ राक्षसांचा ॥ ७१ ॥ ओढाओढी हनुमंतासीं । राक्षस करिती कासाविसी । कपि कुंथत लौकिकेंसीं । निजमानसीं उल्लास ॥ ७२ ॥ धरोनि नेला रावणाप्रती । मी गांजीन लंकापती । राक्षस माझा घात करिती । वानरचित्तीं नाहीं शंका ॥७३॥ राक्षस अट्टहासें गर्जती । अखयाचा हा जीवघाती सांपडला आमुच्या हातीं । प्राणाहुती करूं याची ॥ ७४ ॥ हनुमान पुढें नेइजेत । धरोनि इंद्रजिताचा हात । ब्रह्मा त्यामागें पैं जात । मंत्र जपत तो ऐका ॥ ७५ ॥ गृह्य वै प्रतिष्ठासूक्त । ब्रह्मा स्वानंदें जपत । रामराज्य लंकेआंत हनुमंत-प्रवेशें ॥ ७६ ॥ वेगें आणिला रावणापासीं । कोप आला दशमुखासी । रागें सांगे राक्षसासी । भक्षा यासी सगळाचि ॥ ७७ ॥ रावण दांत खाय करकरा । मज देखतां शस्त्रधारा[१] । वानरा तिळप्राय करा । निशाचरां प्रेरिलें ॥ ७८ ॥ कोटयनुकोटि पार्षद[२] । धांविन्नले गदायोध । घाव हाणिती सुबद्ध । करावया छेद कपीचा ॥७९॥ बाण सुटती सणसण । शस्त्रें वाजती खणखण । घाय हाणिती दणदण । कपीचा प्राण घ्यावया ॥ ८० ॥ एक खोंचिती सबल शूळें । एक हाणिती सबळ मुसळें । एक हाणिती काती त्रिशूळें । गदामुद्गलें पैं एक ॥८१॥ आलगाईत कोइतेकार । अढाउ चव्हाण चेंडूचक्र । फरश पट्टिश तोमर । हाणिती वानरा जमदाढा ॥ ८२ ॥ वानरासीं सबतोडी[३] । हाणिती भाले ओढण खांडीं । एक ते हाणिती लहुडी । प्रचंड धोंडी पैं एक ॥ ८३ ॥ जीवें मरावया वानर । मिळोनी अवघे निशाचर । वर्षती शस्त्रांचे संभार । अति निष्ठुर निर्घातें ॥ ८४ ॥ ऐशिया शस्त्रघातीं हाणित रामनामें तो सदोदित । हनुमान सदा सावचित्त । शस्त्रसंपात तृणप्राय ॥ ८५ ॥ वीर वाटिवे[४] हाणित । शस्त्रें मोडलीं समस्त । एकाचे उखळले हात । वीरीं दांत विचकले ॥ ८६ ॥ घाय हाणिता पैं वाट । धापा फुगलें त्यांचें पोट । अशुद्ध[५] वमती[६] समसगट । हृदयस्फोट अवघ्यांही ॥८७॥ एकएकें समस्त । वीर पडियेले मूर्च्छित । हनुमंतासी न लागे घात । लंकानाथ क्षोभला ॥ ८८ ॥ हनुमंताचे अभ्यंतरीं । श्रीराम नांदे सबाह्यान्तरीं । शस्त्रें न रुपती तिळभरी । वीर महामारीं मूर्च्छित ॥ ८९ ॥

१ मदोन्मत्त हत्ती. २ कमळाच्या तत्तूनीं. ३ आवेशानें. + ४८।५२,५१,५२,५१,५४

१ शस्त्रधारेनें. २ सेवक. ३ मोठ्या जोरानें. ४ पराक्रमाचे. ५ रक्त. ६ ओकूं लागले.

१०५६०

रावणाचा खड्गप्रहार हनुमंतावर केलेला निष्फळ—नव्हेचि हनुमंताचा घात । सारथी वीर समस्त । पडिले देखोनि मूर्च्छित । कोपे कृतांत रावण ॥९०॥ श्रोणेनिया लंकानाथ । चंद्रसेन खड्गा घाली हात । कोप हाणितां हनुमंत । कपि हांसत गदगदां ॥९१॥

हनुमंताचें हास्य; रावणाचा प्रश्न—घावो हाणितां प्रचंड । त्यानें दणाणिलें ब्रह्मांड । सरलें रावणाचें बलबंड । खालतें तोंड तेणें केलें ॥ ९२ ॥ रावण म्हणे गा हनुमंता । तूं हांसलासि कवणे अर्था । कपि म्हणे लंकानाथा । ऐक आतां सांगेन ॥९३॥

हनुमंताचें उत्तर—राक्षसस्वामी तूं लंकानाथा । तुझिया बळाचा मज भ्रम होता । घावो हाणोनि त्वां आतां । केला वृथा पुरुषार्थ ॥ ९४ ॥ राक्षसघायाचा समेळ । जैसी पिसाची बुळबुळ । तुझा घावो अति निर्बळ । जैसी पेळ[1] कापसाची॥९५॥ रावण निर्बळी हीन दीन । कैंवी रामासीं करिसील रण । जगीं निर्लज्ज तूं एक जाण । हास्य संपूर्ण तेणें मज ॥ ९६ ॥ सैंवरीं पाहतां हरकोदंड[2] । तुझें झालें काळें तोंड । श्रीरामें तें केलें दुखंड । युद्ध वितंड[3] कैंवी त्यासीं ॥ ९७ ॥ संमुख न येववे श्रीरघुनाथा । चोरोनि पळालासी घेवोनि सीता । त्यासीं युद्ध करीन म्हणतां । निर्लज्ज तूं रावणा ॥ ९८ ॥ तुझें शुभचिन्ह कळलें आतां । भीक लागली चोरितां सीता । त्यासी तुझी राज्यसत्ता नुरे सर्वथा रावणा ॥९९॥ तुझा हात गा हलुवट[4] । घावो अतिशयें पोंचट । माझो लोम[5] न तुटे स्पष्ट । अहा कटकट राक्षसां ॥ १०० ॥

प्रहस्ताकरवीं हनुमंतास प्रश्न—संमुख बैसोनि लंकानाथा । निःशंक बोलतां हनुमंता । चिंता रावणाच्या चित्ता । अवध्यता वानरीं ॥ १ ॥ अवध्य जाणतां वानरासी । प्रहस्ताहातीं[1] पुसवी त्यासी । तूं कोण कोणाचा कैंचा आलासी । वन भंगिलें किमर्थ ॥२॥

मारुतीचें कथन—रावण राजा प्रतापराशी । भेटी न घडे वानरासीं । म्हणोनि भंगिलें वनासी । दशमुखासी भेटावया ॥ ३ ॥ राक्षस आले मारावयासी । म्हणोनि युद्ध केलें त्यांसीं । वांचवावया निजदेहासी । राक्षसांसी मारिलें ॥ ४ ॥

रावणाची अवहेलना, त्याचे समुख मारुतीच्या चेष्टा—ऐसें सांगोनि प्रहस्तासी । हनुमान बोले निजवृत्तांतासी । दृष्टीं नाणी प्रहस्तासी । राक्षसांसी गणीना ॥५॥ दशमुखाचे संमुख । पुच्छासनीं बैसला देख । हनुमंत अतिशयेंसीं निःशंक । नव्हे साशंक रावणा ॥ ६ ॥ रावणासंमुख हनुमंत । बैसला वांकुल्या दावित । सवेंचि डोळे मिचकावित । अंगोठा दावित नोकूनी[2] ॥ ७॥ हनुमंत न भी राक्षसांसी । दृष्टीं नाणी प्रधानासी । रावण जाणोनि मानसीं । स्वमुखें त्यासी पुसतसे ॥ ८ ॥

रे रे वानर को भवानिह गतस्त्वत्सूनुहताहवे
दूतोऽहं खरखंडनस्य नृपते' कोदंडदीक्षागुरोः ।
महोर्दंडकठोरपाटनपटु' को वा त्रिकूटाचले
को मेरौ क्व च रावणादिगणना कोटिस्तु कीटायते॥१६

धिक्ते रावण पौरुषं तव बलं धिग्धिग्यशस्तेजसी
धिक्खड्गं सुरदर्पनोदनकरं धिग्धिग्वृथा जीवनम् ।
यस्माद्राघवबाणभीतमनसा सीता परोक्षे हृता
तद्वैरादहमागतोऽस्मि हनुमान्बद्धो वधार्थे तव॥१७॥

रावणाचा प्रश्न, मारुतीचे उत्तर—रावण हेळसोनि बोले उत्तर । अरे तूं कोणाचा वानर । ऐक रे रावणा प्रत्युत्तर । सत्य साचार सांगेन ॥ ९ ॥ मारिले वनकर किंकर । जंबुमाळी निशाचर । रणीं मारिले प्रधानकुमर । तो मी वानर महावीर ॥११० पंच सेनानी मारिले शूर । निर्दळिला सैन्यसंभार । रणीं मारिला अखया कुमर । तो मी वानर

१ वात. २ शिवाचें धनुष्य. ३ मोठें. ४ हलका. ५ केंस, लव

१ प्रहस्ताकडून. २ धिक्कारून.

महावीर ॥११॥ मारिलासे अखया सुत । ज्येष्ठ गांजिला इंद्रजित । त्याच्या सेने केला निःपात । तो मी हनुमंत महावीर ॥१२॥ वनविध्वंस कवण्या चाडा[1] । जैसें उपडिलें म्यां झाडां । तैसें राक्षसकुळउपाडा । करूं रोकडा मी आलों ॥ १३ ॥ तूं कोणाचा कैंचा कोण । येथें यावया काय कारण । ऐसा पुसिला जो प्रश्न । तयाचें उत्तर अवधारीं ॥ १४ ॥ सुबाहुताटकानिर्दळण । त्रिशिरा मारिला खर दूषण । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ १५ ॥ चौदा सहस्र रक्षोगण[2]। वधूनि घेतलें जनस्थान । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ १६ ॥ विराध मारिला विंधोनि बाणें । मारीच कपटी मारिला जेणें । त्या श्रीरामाचा भक्त मी जाणें । तुझा प्राण घेवों आलों ॥ १७ ॥ कोदंडधारियां[3] दीक्षागुरु । सूर्यवंशी श्रीरामचंद्रु । त्याचा दूत मी वानरु । तुझा संहारु करूं आलों ॥ १८ ॥ दंडधारियां परम गुरू । कामक्रोध वधी रघुवीरू । त्याचा दूत मी वानरू । तुझा संहारू करूं आलों ॥ १९ ॥म्हणसी वचावया रावण । तुज कैंची रे आंगवण[4] । माझें बळ असाधारण । नाहीं प्रमाण रणमारा ॥१२०॥ लागतां बाहुबळचपेट । मेरुमांदार होती पीठ । रावण दशमुख कीट । लंकात्रिकूट तें किती ॥२१॥ दशमुखाचिया हारी । शिरें छेदीन नखाग्रीं । जैंवी पतंग अग्नीवरी । तैसी परी राक्षसां ॥२२॥ रावणाऐसे दशकंठी । मिनलिया कोट्यानुकोटी । त्यांतें निर्दळीन वामागुष्टीं । लंकात्रिकूटीसमवेत ॥ २३ ॥ जळो ती रावणा तुझी पुरुषार्थथोरी । जळो तो राजा जो होय भिकारी । जळो तें कर्म करणें चोरी । परनारी पतिव्रता ॥ २४ ॥ जळो तें रावणा तुझें कुळ । जळो तें रावणा तुझें शीळ । जळो तें रावणा तुझें बळ । पापी तूं केवळ [1]परद्वारी ॥२५॥ धिक् धिक् रावणा राक्षस जाती । धिक् धिक् रावणा तुझी ख्याती[2] । धिक् धिक् रावणा तुझी कीर्ती । झाली अपकीर्ती तिहीं लोकीं ॥ २६ ॥ धिक् धिक् रावणा तुझी श्रीमंती । धिक् धिक् रावणा तुझी शक्ती । धिक् धिक् तो खड्ग तुझ्या मुष्टीं । लव मारुतीची न तुटे ॥ २७ ॥ धिक् धिक् रावणा तुझें जन्म । धिक् धिक् रावणा तुझा धर्म । धिक् धिक् रावणा तुझें कर्म । निंद्य परम तिहीं लोकीं । ॥ २८ ॥ धिक् धिक् जीवित्व तुझी ख्याती । धिक् धिक् रावणा तुझी शौर्यवृत्ती । [3]परोक्ष हरिली सीता सती । बाणभयें भीसी श्रीरामा ॥ २९ ॥ माझ्या स्वामीची चोरिली नारी । तूं तंव माझा प्रत्यक्ष वैरी। मी तंव सीतेचा धांवणेकरी । तुजला मारीन मी आतां ॥१३०॥ तुजसीं प्रत्यक्ष व्हावया भेटी । वनीं वृक्षा केली अटाटी[4] । राक्षस मारिले कोटयनुकोटी । तुज दृष्टीं देखावया ॥ ३१ ॥ तुज म्यां देखावया दृष्टीं । बंधना लावूं दिधलें कंठीं । लत्ता टोले साहोनि मुष्टी । तुझिये भेटी मी आलों॥३२॥ तुझें भेटीचें हेंचि फळ । तुज म्यां मारावें तात्काळ। सिद्धि नेवोनि श्रीरामस्थळ । जनकबाळ सोडवावी ॥ ३३ ॥ त्या तुज मज जाली भेटी । तुवां पुसिली जी गुह्यगोष्टी । ते म्यां सांगितली परिपाटी[5]। मरण ठेवटीं उरलेंसे ॥ ३४ ॥ तुझ्या आंगीं सबळ बळ । सैन्य सेनानी प्रधान प्रबळ । मज मारोनि तत्काळ । जनकबाळ भोगावी ॥३५॥ राक्षसां देखतां स्पष्टा । तुझें मर्दीन मी ओष्ठा । तुझ्या छेदावया दशकंठां । आलों मी वांटा रामाचा ॥ ३६ ॥ ऐसें बोलतां महाबळी । फिंदारल्या रोमावळी । लांगूल त्राहाटिलें भूतळीं । वटारिलें निराळीं कपिपुच्छ ॥ ३७ ॥ माथां शेंडी थरथराट । वटारिले नेत्रवाट । तंव

१ इच्छेनें. २ राक्षससमुदाय. ३ धनुर्धरांला. ४ सामर्थ्य.

१ परस्त्री इच्छिणारा. २ प्रसिद्धि. ३ न कळत. ४ नाश. ५ क्रमानें.

कांपिनला दशकंठ । समसगट राक्षसां ॥ ३८ ॥ करावया सर्व संहार । जैसा वाढे प्रळयरुद्र । तैसा वाढला वानर । निशाचर कांपती ॥ ३९ ॥

एकोऽहं पवनात्मजो दशमुखस्त्वं चापि कोटीश्वर-
स्त्वां जित्वा समरे प्रभुप्रणववान्सीतां च नेतुं क्षमः ।
किं तस्याघटितं बलं बलवता रामेण सुश्रीमता
हत्वा दक्षिणपाणिना वसुमतीं त्वां हनुमुक्तं वचः॥१८

मी तंव एकलें एक वानर । श्रीरामाचा निजकिंकर । तुझे कोटयनुकोटि झुंझार । मजसमोर करीं उभे ॥ १४० ॥ मशकें कोटयनुकोटी झुंझार । मज मारितां दशशिर[1] । कोण राखेल निशाचर । सुरासुर पाहों पां ॥४१॥ क्षोभला देखोनि हनुमंत । इंद्रजित चळचळां कांपत । आजि निमाला लंकानाथ । करी घात वानर ॥४२॥ निश्चयें रावणा आला अंत । ऐसें इंद्रजित चिंतित । तंव बोलिला हनुमंत । तोही वृत्तांत अवधारा ॥४३॥ रणीं मारोनि रावण । करोनि सीतासोडवण । श्रीरामापासीं नेतां जाण । मज कोण निवारी ॥४४॥ इतुकें करितां न लगे क्षण । परी श्रीरामें वाहिली आण । दक्षिणहस्तें विंधोनि बाण । रणीं रावण मारणें ॥ ४५ ॥ मारोनियां दशशिरा । स्वस्थ करीन वसुंधरा[2] । सुखी करावें चराचरा । श्रीरामचंद्रा निजनेम ॥ ४६ ॥ सोडावी देवांची बांधवडी । तोडावी नवग्रहांची बेडी । उभारावी रामराज्याची गुढी । मर्यादा गाढी श्रीरामें ॥४७॥ श्रीराम बळवंतांचें बळ । श्रीरामबळें वीर सबळ । श्रीरामाचें सत्य शीळ । प्रतिज्ञा अढळ रामाची ॥ ४८ ॥ रामें मारावें लंकानाथा । सत्य प्रतिज्ञा श्रीरघुनाथा । माझ्यानें न करवे अन्यथा । कैंवी मी आतां तुज मारूं ॥ ४९ ॥ संमुख देखिल्या दशानन । वानरें वडोनि घ्यावा प्राण । रामें वांचविला रावण । स्वहस्तें आपण न मारावें ॥ १५० ॥

१ रावण. २ पृथ्वी.

मारुतीच्या भाषणानें इंद्रजितास चिंता—श्रीरामप्रतिज्ञेची पाखर[1] । तेणें वांचविला दशशिर । रावणा न मारीच वानर । मर्यादामेरू नुल्लंघी ॥ ५१ ॥ रावणा तुज मी मारीन आतां । ऐसें बोलतां हनुमंता । इंद्रजितासी परम चिंता । आला लंकानाथा अपघात ॥ ५२ ॥

बिभीषणास सांगणें—इंद्रजित बिभीषणा सांगत । आजि निमाला लंकानाथ । क्रोधें खवळला हनुमंत । उपाय येथें चालेना ॥ ५३ ॥ न चले शस्त्र अस्त्र सकळ । न चले वानरासीं बळ । न चले कपटविद्याछळ । बळें प्रबळ वानर ॥५४॥ मंत्रशक्ती तंत्रशक्ती । नातळे आक्रमविद्याशक्ती । न चले मायामोहनशक्ती । रणीं मारुति नाटोपे ॥ ५५ ॥ वानर नाटोपे सैन्यासीं । शेखीं नाटोपे ब्रह्मपाशीं । तो कैंवी आटोपे रावणासी । बिभीषणासी सांगत ॥ ५६ ॥ जें जें बांधावें बंधन । वानर ना म्हणे आपण । तृणासमान[2] त्यासी मरण । निर्बंधन पाशबंधीं ॥ ५७ ॥

बिभीषणाची रावणास सूचना—ऐसें इंद्रजितें सांगतां । बिभीषण म्हणे लंकानाथा । वानर अवध्य तत्वतां । तुज वधितां वधवेना ॥ ५८ ॥ वानर न वधवे सर्वथा । ऐसें कळलें लंकानाथा । श्रीरामा अर्पोनि सीता । शरण रघुनाथा निघावें ॥ ५९ ॥ श्रीरामा निघालिया शरण । आम्हासी नाहीं जन्ममरण । त्रिसत्य सत्य रावणा जाण । विचार आन न करावा ॥ १६० ॥ अन्यथा विचार करूं जातां । रोकडें हनुमंत करील घाता । उपाय न चले सर्वथा । लंकानाथा भुलूं नको ॥६१॥ श्रीरामाचें एक वानर । आम्हां नाटोपे साचार । कोपोनि आलिया श्रीरघुवीर । रण दुर्धर कोण साहे ॥ ६२ ॥ अर्पोनियां जानकीतें । काया वाचा चित्तें वित्तें । शरण निघालिया रघूत्तमातें । कल्याणातें पावाल ॥ ६३॥ एका

१ छल, पांघरूण. २ क.पदार्थ.

जनार्दना शरण । सत्वबुद्धि बिभीषण । ते बुद्धि न मानी रावण । गर्वाभिमान तो ऐका ॥६४॥ वानरा वनचराचें भेण[1] । रिघतां श्रीरामासी शरण । तें मज आलें उणेपण । जगीं जघन्य[2] वाढिवें[3]॥६५॥ मरण पुसोनि कपिनाथा । त्याचेनि बोलें त्याचे घाता । बुद्धि विचारूनि हनुमंता । कुबुद्धिता रावणीं ॥ ६६ ॥ जटायूनें केला कासाविसी । सिंतरोनि[4] म्यां मारिलें त्यासी । तैसेंचि करिन हनुमंतासी । रावणापासीं कुबुद्धि ॥६७॥ एका जनार्दना शरण । पुसतां हनुमंतासी मरण । दहाही मुखें होरपळून । करील दहन लंकेचें ॥ ६८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसभाहनूमदागमन नाम सप्तदशोऽध्यायः ॥१७॥ओव्या ॥ १६८ ॥ श्लोक ॥ १८ ॥ एवं ॥ १८६ ॥

---

## अध्याय १८ वा

त्याचि अर्थी रावण विचार करून—श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ हनुमंतासी न चले घात । स्वयें सांगे इंद्रजित । अवध्य वीर हा हनुमंत । साक्षेपें सांगत बिभीषण ॥ १ ॥

+निश्चितार्थस्ततः साम्ना पूज्य शत्रुजिदग्रजम् ।
उवाच हितमत्यर्थं वाक्यं वाक्यविशारदः ॥१॥

इंद्रजित जो कां ज्येष्ठ सुत । नानायुक्ती स्वयें सांगत । शस्त्रास्त्रीं ब्रह्मपाशांत न चले घात हनुमंता ॥ २ ॥ शस्त्रशक्ती अस्त्रशक्ती । मंत्रशक्ती तंत्रशक्ती । कपटमायामोहनशक्ती । रणीं मारुति न धरवे ॥३॥ कर्मपाश धर्मपाश । ब्रह्मयाचा ब्रह्मपाश । बांधों न शके वानरास । जन्मपाश मुख्यत्वें ॥४॥ बिभीषण प्रिय भ्राता । सांगतसे परम हिता । शरण रिघावें श्रीरघुनाथा । काय म्यां आतां करावें ॥ ५ ॥ सर्वथा अवध्य हा मारुती । इंद्रजिताची उपपत्ती[1] । बिभीषणाची भिन्न युक्ती । लंकापति सचिंत ॥ ६ ॥

+राक्षसाधिपतिः क्रुद्धस्तदकार्यमुपस्थितम् ।
विदित्वा चिंतयामास कार्याकार्यविदां वरः ॥ २ ॥

राग आला रावणासी तरी मारवेना हनुमंतासी । अवध्यता देखोनि त्यासी । दशमुखासी अति चिंता ॥ ७ ॥ हनुमंतासी न वधितां । सकळ कुळाच्या करील घाता । हा न मरे मारूं जातां परम चिंता लंकेशा ॥ ८ ॥

हनुमंतास त्याचें मरण विचारितो—आण घालोनि श्रीरघुनाथा । मरण पुसे कपिनाथा । मरणानुक्रम आणूनि हाता । मग हनुमंता मारावें ॥ ९ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । पुसावया मरणयुक्ती । स्तवूं आदरिला मारुती । लंकापतीनें निजमुखें ॥१०॥ ऐकें वीरा हनुमंता । श्रीरामाच्या परम भक्ता । तुज मी पुसतसें आतां । सत्य तत्वतां सांगावें ॥११॥ असत्य वदों नये हरिभक्ता । शपथ घालितों रघुनाथा । मरण कैसेनि हनुमंता । यथार्थता सांगावें ॥ १२ ॥

हनुमंताचें उत्तर—ऐकोनि श्रीरामाची आण । हनुमान घाली लोटांगण । मज सर्वथा नाहीं मरण । सत्य जाण लंकेशा ॥ १३ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । गदगदां हांसे रावण । जन्मामागें अखंड मरण । मिथ्या भाषण अमरत्व ॥ १४ ॥

रावणाचा अविश्वास व कारणें—म्हणती अमर निर्जरां[2] देवां । तेही पावती मरणार्णवा । तेथें तुझा कायसा केवा[3] । मिथ्या हेवा अमरत्वें ॥१५॥ चौदा कल्पायुषी गरिमा[4]। मार्कंडेयाचा मुख्य महिमा। तो जैं जाय मरणग्रामा । तैं झडे रोमा रोमहर्षणासी ॥ १६ ॥ युगानुयुगीं लोम झडे ज्यासी । ऐसा तो

---

१ भीतीनें. २ नीचपणा. ३ पराक्रमाला. ४ ठकवून. + अ. ९४।४

१ मुख्यार्थ. २ म्हातारपणरहित. ३ पाड. ४ मोठेपणा. + अ. ९२।३.

लोमहर्षण ऋषी । तोही मरे बकदाल्भ्याचे श्वासीं । मरण बकदाल्भ्यासी हंसपक्षें ॥ १७ ॥ हंसाचा पंख जेव्हां झडे । तंव बकदाल्भ्याचें आयुष्य सडे । त्या हंसासी मरण रोकडें । जैं का नख खंडे [1]भृशुंडीचें ॥ १८ ॥ कूर्म हालवी निजमुखा† । तंव भृशुंडीस देख । मरण पावे आवश्यक । मरण अचूक सर्वांसी ॥१९॥ एवं मरणपरंपरा । कदा न सोडी थोरथोरां । तेथें तूं [2]पालेखाइरा । केवीं वानरा अमरत्व ॥ २० ॥ तपस्तेजें महाऋषी । ते काळाची आंदणी दासी । श्रीरामनामीं प्रेम ज्यासी । काळ त्यापासीं कामारा[3] ॥ २१ ॥ जागृतिसुषुप्तिसहित स्वप्न ज्यासीं अखंड नामस्मरण । काळ त्याचे वंदी चरण। तेणें रावणा हे महिमा ॥२२॥ भक्तिभावार्थें भजन। स्वयें जाणे श्रीभगवान । रावण विषयी अति दीन। त्यासीं हें ज्ञान केंवी लाभे ॥ २३ ॥ असो हे रावणाची स्थिती । मज श्रीरामाची भक्ती । माझ्या अमरत्वाची ख्याती[4] । दावूं प्रतीत रावणा ॥२४॥ हनुमंतीं श्रीरामभक्ति लाठी । तरी कां बोले मिथ्या गोष्टी । मिथ्या वदलासी चावटी । कशासाठीं मज सांगें ॥ २५ ॥ आदरें पुसतां रावणासीं । बुद्धि स्फुरली वानरासीं । अपमानावया लंकेशासी । गुह्य त्यापासीं अनुवादे[5] ॥ २६ ॥

रावणाच्या अविश्वासावर मारुतीची प्रतिक्रिया—रावण अतिशयेंसीं कपटी । सत्य वदलों मी ज्या गोष्टी । सत्य वार्ता मानी खोटी । विकल्प[6] पोटीं रावणा ॥२७॥ सबाह्य[7] असत्य सदोदित । त्यास न माने सत्यत्व । सत्यासीं सत्य भावार्थ । रावणांत तो नाहीं ॥२८॥ रावणाचा विकल्प झडे । माझें सत्यत्व दिसे रोकडें । तें साधावया घडफुडें । रावणापुढें गुह्य सांगे ॥ २९ ॥ मरण पुससी विश्वासेंसीं । तुवां मारिलें जटायूसी । तैसेंच मजही तूं करिसी । तेणें धाकेंसीं वदें मिथ्या ॥ ३० ॥ रावण म्हणे हनुमंतासी । मरण भय जयापासीं । श्रीरामभक्ती कैंची त्यासीं । देहलोभ्यासी राम कैंचा ॥ ३१ ॥ हनुमान म्हणे लंकानाथा । परोपदेशीं अति योग्यता। तुझी मी देखतों तत्वतां । शेखीं कपटता तुजपासीं ॥३२॥ कपटें होवोनि संन्यासी । चोरोनि आणिलें सीतेसी । सदाशिवें सोडविलासी कपटें पावसी कुळक्षय ॥३३॥ ऐसें हनुमंतें सांगतां । वर्मे खोचलें लंकानाथा । ऐक माझी मरण अवस्था । तुज तत्वता सांगेन ॥३४॥ ऐकावया मारुतीचें वचन । सरसावला दशानन । कपि सांगे [1]विंदाण । सावधान अवधारा ॥३५॥ असत्य नाहीं तुजसीं । मरण नाहीं माझ्या देहासी । मरण आहे पुच्छासी। तें मारिसी तैं मी मरें ॥ ३६ ॥

पुच्छ गुंडाळण्यास लंकेचें वस्त्रहरण—ऐकोनि कपीचें वचन । ज्येष्ठ इंद्रजित श्रेष्ठ प्रधान । अवघे म्हणती सत्य भाषण । सेनानी सैन्यसमवेत ॥ ३७ ॥ वायूपरीस[2] पुच्छ चपळ । याचे पुच्छासीं प्रबळ बळ। पुच्छें निर्दळिलें सकळ । बळें [3]गोळांगूळ न मारवे ॥ ३८ ॥ पुच्छें मारिला रथसारथी । पुच्छें इंद्रजित वाताहाती । पुच्छें रणीं लाविली ख्याती । वीरां घाती कपिपुच्छ ॥ ३९ ॥ इंद्रजित बोले देखोनि रण । पुच्छ अतिशयेंसीं दारुण । पुच्छा मारूं जातां आपण । रणकंदन करील ॥ ४० ॥ पुच्छ खवळल्या अद्भुत । वीर मारील समस्त । लंका करील वाताहत । लंकानाथ केवीं वांचे ॥ ४१ ॥ इंद्रजित सेनानी प्रधान । अवघे कांपती पुच्छाभेण । तें देखोनि दशानन । स्वयें आपण विचारी ॥ ४२ ॥ हनुमंतासी पुसे रावण । पुच्छ अतिशयें दारुण ।

१ या नावाचा कावळा. २ पाला खाणारा. ३ दास. ४ कीर्ति. ५ बोलू लागला. ६ संशय. ७ आतबाहेर.

† बक–निमिष्य, ड–निमीख, अ–निमख !

१ युक्ती. २ वायूपेक्षा. ३ वानर.

कैसेनि पावेल मरण । सत्य संपूर्ण सांगावें ॥४३॥ हनुमंत म्हणे दशशिरा । पुच्छाचें मरण अति दुस्तरा । तेलें तुपें भिजवोनि वस्त्रा । पुच्छा समग्रा गुंडावें ॥४४॥ हनुमान मारावया निर्धारीं । अग्नि लावावा पुच्छाग्रीं । ज्वाला धडाडिलिया अंबरीं[1] । मरण वानरीं तत्काळ ॥ ४५ ॥ उघडें राहिल्या तिळभरी । मरण नये पुच्छावरी । येईल राक्षसां महामारी । करील बोहरी[2] लंकेची ॥४६॥ हनुमान न म्हणावा कपटी । मी सांगतों सत्य गोष्टी । ऐसी आंगवण[3] असेल लाठी । तरी तूं वेष्टीं कपिपुच्छा ॥४७॥ ऐसी तुज असेल शक्ती । हें घे पुच्छ देतों हातीं । शीघ्रतें[4] स्नेहवस्त्रप्रयुक्तीं[5] । अति निगुतीं गुंडाळावें ॥४८॥ पुच्छ गुंडाळावया ओढा-ओढी । स्त्रीपुरुषें नागवीं उघडीं । लंका नागविली रोकडी । कडोविकडी पुच्छाची ॥ ४९ ॥ सभा नागविली म्या निशीं । लंका नागविली दिवसीं । पुच्छें करोनि कासाविसी । राक्षसांसी उगाणु[6] ॥ ५० ॥ पुच्छ गुंडाळावयाचे मिसीं । राजद्वारीं चोहट्टापासीं । लंका नागवी करीन दिवसीं । राक्षसांसीं गर्जोनी ॥ ५१ ॥ पुच्छ गुंडाळावयाचे चाडा[7] । सांठवणें कापड तडतडा । तेलासाठीं लावूं झगडा । तेलिया राजदंडा करूं ठावो ॥ ५२ ॥ आवडी हनुमंताचे पोटीं । नगर नागवूं पुच्छासाठीं । अग्नि लावूं लंकात्रिकूटीं । राक्षसकोटी आजि भाजूं ॥ ५३ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । पुच्छ दिधलें रावणाहातीं । पुढें पुच्छाची व्युत्पत्ती । लाविली ख्याती ते ऐका ॥ ५४ ॥

+आज्ञापिता रावणेन पार्षदाः पुच्छवेष्टने ।
तस्य तद्वचनं श्रुत्वा राक्षसाः क्रोधकर्कशाः ॥३॥
वेष्टयन्ति स्म लांगूलं जीर्णकार्पासिकैः पटैः ।
संवेष्ट्यमाने लांगूले व्यवर्धत महाकपिः ॥४॥

१ आकाशांत. २ नाश. ३ शक्ति. ४ त्वरा करून. ५ तेलानें भिजलेल्या वस्त्रांनीं. ६ नाश. ७ इच्छेनें.
+ अ. ५३।६,७.

रावण सांगे निजदासांसी । आगी लावा कपिपुच्छासी । भिजवोनि तैलघृतांसीं । जीर्ण वस्त्रांसी गुंडाळावें ॥ ५५ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । वीर शूर क्रोधी पूर्ण । क्रूर कर्कश अति दारुण । पुच्छा वेष्टन करूं आले ॥ ५६ ॥ वस्त्रें सरलीं पैं जीर्ण । नवीं गुंडाळावीं म्हणे रावण । नवींही सरलीं जाण । पुच्छ संपूर्ण गुंडेना ॥५७॥ घोंगडीं बारीक सकटें । सस्नेहें[1] गुंडिलीं धुवटें । सखरें गुंडिलीं चोखटें । तरी न वेष्टे कपिपुच्छ ॥ ५८ ॥ घोंगडीं पांगडीं गुढगीं खांडें । सखरें निखरें गुंडिलीं वदंडें[2] । आणिलीं सगळीं दिंडें[3] । तरी न गुंडे कपिपुच्छ ॥ ५९ ॥ चाटेवळी[4] पडली ओस । तरी न पुरती पुच्छास । राजगृहींचीं असमसाहस । कपिपुच्छास न पुरती ॥ ६० ॥ समस्त चाटियाचे वस्त्रभार । राजगृहींचीं वस्त्रें मात्र । पुच्छ न गुंडेचि चौतकर[5] । अति दुर्धर वाढलें ॥ ६१ ॥ पुच्छ वाढलें दुर्धर । धाकिंनला दशशिर । इंद्रजितादिक निशाचर । सहपरिवार धाकती ॥ ६२ ॥ कपीचें मरण पुच्छापासीं । निश्चयें मानलें आम्हांसीं । पुच्छ गुंडाळावें साक्षेपेंसीं । येरयेरांपासीं सांगत ॥ ६३ ॥ पडदे गुंडिती फाडफाडूं । बैठका गुंडिती बघडबघडूं । चांदवे[6] गुंडिती सोडसोडूं । पुच्छ माकडु नाटोपे ॥ ६४ ॥ पुच्छ गुंडिलें बहुतेक । उरलें असे भाग एक । तें गुंडाळावें आवश्यक । सकळ लोक सांगती ॥ ६५ ॥ पुच्छ गुंडाळावया लवडसवडीं । सभेचीं घेतलीं लुगडीं । वानरें सभा केली उघडी । कडोविकडीं नागविली ॥ ६६ ॥ सभा नागविली वीरें । आणिलीं रावणाचीं वस्त्रें । तरी पुच्छासीं न पुरे । ओढा वानरें लाविला ॥ ६७ ॥ सेवकां सांगे दशवक्त्र । नगरामाजी राहिली वस्त्रें । हिरोन आणा रे सत्वरें । पुच्छीं वानर बांधावा ॥ ६८ ॥

१ तैलयुक्त करून. २ पुष्कळ. ३ कापडाचीं ओझीं. ४ कापडबाजार. ५ चवथा हिस्सा. ६ छतें.

जांवई आणिला दिवाळसणा । कोणाचा पाहुणा कोणाचा मेहुणा । दूत करिती वस्त्रहरणा । शंखस्फुरणा ते करिती ॥६९॥ नगरीं नरनारी वागती । दूत त्यांचीं वस्त्रें हरिती । नागवीं पळती हळहळती । शंख करिती चहूंकडे ॥ ७० ॥ नोवरी कुमारी गरोदरी । सौभाग्याच्या निजगजरीं । वाणें देती घरोघरीं । साळंकारीं शोभती ॥ ७१ ॥ कपिपुच्छवेष्टनावारी । राजदूत वस्त्रें हरी । लाजा उघडिया पडती नारी । लंकापुरीं आकांत ॥ ७२ ॥ राजगृहीं ज्यांची चाली । नेसोनि धोत्रें वोलीं । भट्ट निघाले ते मंडळीं । वस्त्रें हरिलीं बुकलोनि ॥७३॥ भट्ट वस्त्रें न सोडिती । दूत निःशंक ओंबती । महाशंख नाना युक्ती । शंख करिती व्युत्पन्न ॥ ७४ ॥ ओष्ठ मणगट जिव्हायुक्त । स्वर वर्ण अक्षरोक्त । शंख करिती वेदोक्त । रावण जित कीं मेला ॥ ७५ ॥ अनुनासिक सानुनासिक । स्वरप्रयुक्त वेदपाठक । वेदव्युत्पत्ती करिती शंख । दशमुख निमाला ॥७६॥ दिवसा दवळ्या नगराआंत । राजद्वारीं वाट पाडित । राजा असता जीवें जित । पारिपत्य तो करीना ॥ ७७ ॥ बोंब करितां फुगलें पोट । हाका देतां सुकले कंठ । राजा निमाला पैं स्पष्ट । हा हा कटकट ब्राह्मणां ॥ ७८ ॥ हनुमान वीर जगजेठी । लंका नागविली पुच्छासाठीं । शिणतां राक्षस कोट्यनुकोटी । पुच्छा शेवटीं वेष्टवेना ॥ ७९ ॥ अद्यापि पुच्छाचा अगरडा[1] । बुजाला नाहीं दिसे उघडा । पुच्छवेष्टनीं लावोनि वेढा । केला बापुडा रावण ॥ ८० ॥ पुच्छ वेष्टावयासाठीं । शिणतां राक्षसांच्या कोटी । पुच्छ वेष्टवेना वेठीं । अग्र शेवटीं उघडेंचि ॥८१॥ पुच्छ गुंडितां केवढें । अग्र अधिकाधिक वाढे । वेढ लाविलें माकडें । मरण रोकडें राक्षसां ॥८२॥चाटे[2] रडती राजद्वारीं । कळकळती नरनारी । बोंब सुटली घरोघरीं । लंकानगरीं आकांत ॥ ८३ ॥ दुर्गसंग्रहपरवडी[1] । तेलातुपाचीं टांकीं गाढीं । अवघीं पडलीं कोरडीं । तिंबितां[2] लुगडीं पुच्छार्थ ॥ ८४ ॥

तेलातुपाचा दुष्काळ—तेला तुपाचा पैं तडा[3] । नगरीं पडलासे रोकडा । पुच्छ गुंडितां माकडा । लाविलें वेडा लंकेशा ॥ ८५ ॥ तूप न मिळे खावया पुरतें । रावणा लागले रोकडे भाते । भाखोनियां घ्यावया लेंकरातें । तूप कोणातें मिळेना ॥ ८६ ॥ टांकोटांक स्नेहसमाप्ती । घरोघरीं मालवे वाती । गडद[4] पडले लंकेप्रती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ८७ ॥ हनुमंताची कैशी युक्ती । ज्याचें नगर त्याचे हातीं । नागवितां नानाप्रयुक्ती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥८८॥ नाहीं झगडा ना भांडण । करितां कपिपुच्छाचें वेष्टन । तृणप्राय केला रावण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ८९ ॥ अल्प उरलें आहे अग्र । ऐसें सांगे दशशिर । यासी वेष्टोनि पीतांबर । मारूं वानर पुच्छदाहें ॥ ९० ॥ पीतांबरें श्वेतांबरें । पट्टकुळें मनोहरें । गुंडितां ही क्षौमांबरें[5] । पुच्छ नावरे कपीचें ॥ ९१ ॥ इंद्रजित धाके जीवाआंत । पुच्छें नाटोपे हनुमंत । अग्नि लाविलिया तेथ । करील अनर्थ लंकेसीं ॥ ९२ ॥ तंव बोलिला विद्युन्माळी । वानरा आकळावया अति बळी । उघडी करा जनकबाळी । पुच्छ तत्काळीं आकळेल ॥ ९३ ॥ रावणही धाके मानसीं । पुच्छ न गुंडवे आम्हांसी । केंवी मारावें वानरासी । उपायो यासी दिसेना ॥ ९४ ॥ ऐसें ऐकतां हनुमंतें । आवरिलें निजपुच्छातें । दूत सांगती रावणातें । आम्हीं पुच्छातें आकळिलें ॥ ९५ ॥

पुच्छ पेट घेईना—आम्ही सेवक आतुर्बळी[6] । पुच्छ आकळिलें समूळीं । म्हणोनि पिटिली एक टाळी । केला सकळीं गडगर्ज ॥ ९६ ॥ रावण

१ अग्र. २ कापडाचे व्यापारी.

१ पुष्कळ किल्ले. २ भिजविता. ३ नाश. ४ अंधार. ५ रेशमी वस्त्रें. ६ मोठे बळवान्.

सांगे सेवकांतें। अग्नि लावा रे पुच्छातें। पाचारोनि लोहकारातें। लाविले भाते अग्नीसी ॥ ९७ ॥ तिये काळीं हनुमंतें। विनविलें निजपितयातें। वायु सत्य सखा अग्नीतें। ज्वाळा तेथें होऊं नेदीं ॥ ९८ ॥ ज्वाळा होऊं न द्यावी येथें। ऐसें नमून वायूतें। गांजावया राक्षसांतें। हनुमान पुच्छार्थे खवळला ॥ ९९ ॥ भाते फुंकितां चौपासीं। अग्नि लागेना पुच्छासी। राक्षसें होती कासाविसी। अग्नि पुच्छासी स्पर्शेना ॥ १०० ॥ रावण म्हणे हनुमंतासी। अग्नि कां न लागे पुच्छासीं। हनुमंत म्हणे रावणासी। तूं तव आहेसी बहुमूर्ख ॥ १ ॥

मारुतीच्या सूचनेवरून रावण स्वतः फुंकूं लागला—

वेदविभाग केला व्युत्पत्ती। तोही न सरे वेद व्यासोक्ती। सतासंत न कळे स्थिती। तूं तव मूर्ति गवाची ॥ २ ॥ संतासंतविवेक अणुवी[१]। समूळ नाहीं ज्याचे जीवीं। त्यासी न साजे राजपदवी। वृथा गर्वा तूं रावणा ॥३॥ भाते फुंकितां अचेतन। कैंवी जाळवेल सचेतन। हें तुज नाहीं विवेकज्ञान। परम अज्ञान रावणा ॥४॥ वचन मानलें रावणासी। पाचारोनि निजविश्वासी। फुंकोनि अग्नि लावा पुच्छासी। राक्षसांपासीं सांगत ॥ ५ ॥ राक्षस फुंकितां चौपासीं। पुच्छें दडपिलें अग्नीसी। खंवट घाण रिघे घ्राणासीं[२]। कासाविसी राक्षसां ॥ ६ ॥ खंवट घाणी अति प्रबळ। डोळा आसुवें मुखीं लाळ। एक श्वासीं खोकिती सबळ। हलकल्लोळ उठिला ॥ ७ ॥ रावण म्हणे गा हनुमंता। पुच्छ कां न जळे फुंकितां। हनुमान म्हणे लंकानाथा। ऐक तत्वतां सांगेन ॥ ८ ॥ गृहस्थें आमंत्रण नेदितां। भोजना न येववे अतीता। तेंवी तुवां न फुंकितां। अग्नि सर्वथा प्रज्वळेना ॥ ९ ॥ गृहस्थें न करितां ब्रह्मार्पण। अपोशन[३] न घेती ब्राह्मण। अग्नि न फुंकितां रावण। हुताशन[१] प्रज्वळेना ॥ ११० ॥ एकमुखें हे फुंकिती। दहा मुखें तुज आहेती। तुवां फुंकिलिया लंकापती। पुच्छप्रदीप्ती हुताशनें ॥११॥ हनुमंताच्या निजयुक्ती। सत्य मानी लंकापती। पुच्छाग्नि फुंकावयाप्रती। केली [२]आयती ते ऐका ॥ १२ ॥ करोनियां शुद्धाचमन। प्रथम देवोनि घृतावदान[३]। फुंकावया हुताशन[४]। दशवदन बैसला ॥ १३ ॥ रावणाचे पोटीं कपट। कपि जाळावया पुच्छासगट। येणें आवेशें दशकंठ। फुंकूं हव्यवाट[४] बैसला ॥ १४ ॥

+तैलेन परिषिच्याथ तेऽग्निं तत्रोपपादयन्।
लांगूलेन प्रदीप्तेन राक्षसांस्तानताडयत्॥ ९ ॥

रावणाचे निजचित्तीं। माझेनि मुखें पुच्छप्रदीप्ती। सांग जळालिया मारुती। जगीं मत्कीर्ति स्फुरेल ॥ १५ ॥ रावण तोंड परतें करी। हनुमान पुच्छ उचली वरी। पहला अपमान राजशिरीं। केली बोहरी खांडमिशा ॥ १६ ॥

त्यावरोबर भडका उडून रावणाच्या दाढी मिशा जळाल्या—

ऐसा धरोनि अभिमान। रावणें फुंकितां हुताशन। भडका एकसरें उठोन। जालें दहन दाढीमिशां ॥ १७ ॥ प्रथम प्रारंभीं अपमान। दाढ्यामिशांचें जालें दहन। सिंहासनीं काळें वदन। लज्जायमान रावण ॥ १८ ॥ कीर्तीची जाली अपकीर्ती। दुसरी लज्जा रावणाप्रती। पुढें काय करील मारुती। चिंतावर्तीं[५] रावण ॥ १९ ॥ एका जनार्दना शरण। हे प्रथम पुच्छप्रकरण। पुढें राक्षसां गांजणें। पुरदहन अवधारा ॥ १२० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणस्य खांडमिशादहनं नाम अष्टादशोऽध्यायः ॥ ॥ १८ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ १२० ॥ ॥ श्लोक ॥५॥

---

१ तिलप्राय. २ नाकांत. ३ जेवणाच्या आरंभीचें उदकाचमन.

१ अग्नि. २ तयारी. ३ तुपाच्या आहुति. ४ अग्नि. ५ चिंतारूपी भोवऱ्यांत. + ९३।८.

## अध्याय १९ वा

दाढी-मिशा जळाल्यामुळे रावणाची उडालेली धादल–
श्रीगणेशाय नमः ॥ पुच्छाग्नि फुंकितां रावण । भडक्यानें उठला हुताशन । हनुमंत पित्यासी सांगे आपण । करीं अपमान रावणा ॥ १ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन । वायु वन्हि प्रज्वळून । रावणाचें मुख पोळून । केलें दहन खांडमिशां ॥ २ ॥ अपमानला दशानन । ओष्ठ पोळले दारुण । शंख करूं न शके रावण । टिरी पिटोन आक्रंदे ॥ ३ ॥ उफराटें शंखस्फुरण । गुद आहाटोनि करी रावण । प्रथम पावला अपमान । पुच्छदहन भलें नव्हे ॥ ४ ॥

+लांगूलेन प्रदीप्तेन बालसूर्यसमप्रभः ।
ततश्छित्त्वात्मनः पाशं वेगवान्स महाकपिः ॥ १ ॥
प्रदीप्तोऽग्निरयं कस्मान्न करोति च मे रुजम् ।
स पुरद्वारमाश्रित्य शैलशृंगमिवोन्नतः ॥ २ ॥
दह्यमाने च लांगूले चिंतयामास वानरः ।
रामप्रसादादाश्चर्यं न मां दहति पावकः ॥ ३ ॥
शिशिरस्येव संपातो लांगूलाग्रे प्रतिष्ठितः ।
अथ शीतलसर्वांगः स्वस्थसर्वेंद्रियक्रियः ॥ ४ ॥

रावण विचारी विवेकमार्गी । आम्हीं पुच्छासी लाविली आगी । तें हित नव्हे आम्हांलागीं । वानर सर्वांगीं निःशंक ॥ ५ ॥ छळोनि जाळितां कपीसी । छळण न चले रामभक्तांसी । छळितां जाळिलें माझ्या मुखासी । दाढ्यामिशांसी दहनानें[1] ॥६॥ दीप्तपुच्छ हनुमंत । शोभे जैसा बाळादित्य । पुच्छतेज तें किरणावर्त । निशाचरांत कपिपुच्छ ॥ ७ ॥ उगवल्या कपिदिनकर[2] । अस्त पावती निशाचर । रावणा निर्दळी अंधार । घेवोनि समग्र गर्वरात्री ॥ ८ ॥

१ अग्नीनें. २ कपिरूपी सूर्य.

+ ५३।८, ५१. ३६, ३०, ३२, ३१.

पाशातून मारुतीची मुक्तता–उड्डाण देतां वानरास ।
छेदिले रज्जुपाश द्रुमपाश । निर्दळोनि ब्रह्मपाश । नामें भवपाश छेदिले ॥९॥ रामनामाच्या आवर्तीं । सप्तपाशांसी निवृत्ती । पाशोनियां स्वयें मारुती । गर्जे त्रिजगतीं स्वानंदें ॥१०॥ काळपाश कर्मपाश । धर्मपाश ब्रह्मपाश । मायापाश मोहपाश । जन्मपाश सातवा ॥ ११ ॥ काळपाश तो आयुष्यघात । कर्मपाश तो अनैश्वर्यवंत । धर्मपाश तो आश्रमगत । वेदविहितार्थ ब्रह्मपाश ॥ १२ ॥ देहममता तो मोहपाश । मुख्य माया तो आशापाश । कनककांता हा जन्मपाश । सप्तपाशीं जीव बद्ध ॥ १३ ॥ सप्तपाशाची निवृत्ती । रामें करी मारुती । येरांच्या न चलती युक्ती । पडे गुंती देहपाशीं ॥१४॥ आठवा पाश तो वितंड । त्याचे पोटीं पाश उदंड । त्याचें नाम पाषंड । काळें तोंड करवीचें ॥ १५ ॥ सकळ पाशांचें छेदन । करावया रामनाम प्रवीण । नामें हनुमंत संपन्न । पाशछेदन केलें तेणें ॥१६॥ पुच्छीं धडाडितां वन्ही । हनुमंत लोळे गडबडोनी । पाशधर गेले पळोनी । धकधकोनी अपधाकें ॥ १७ ॥ जंव जंव पुच्छ धडाडित । तंव तंव पळे हनुमंत । द्वंद्वनिरासीं साह्य रघुनाथ । नित्य निजभक्तसाहाकारी ॥ १८ ॥ द्वंद्वनिरासीं वाहेंकोडें । सूक्ष्मस्वरूप निजनिवाडें । श्रीरामभक्तां मागेंपुढें । चहूंकडे कोंदाटे ॥ १९ ॥ ऐसा साह्य श्रीरघुनाथ । द्वंद्वबाधा कैंची तेथ । द्वंद्व तें सुखरूप होत । द्वंद्वनिर्मुक्त हनुमंत ॥२०॥ पुच्छीं धडाडी हुताश[1] । हनुमंतासी अति संतोष । पुच्छीं बांधिला अमृतांश[2] । ऐसा उल्लास वानरा ॥ २१ ॥ पुच्छीं पेटला वैश्वानर[1] । खेंवा[3]आला शरच्चंद्र । ऐसा उल्लासे कपींद्र । रामचंद्र निजसाह्य ॥२२॥ रामनामाची नवळगोष्टी । द्वंद्वाचिये पाठीं पोटीं । राम चिद्रूप दावी दृष्टी । निर्द्वंद्व सृष्टी रामनामें ॥ २३ ॥ रामनामापरतें । साधन नाहीं

१ अग्नी. २ चंद्र. ३ आलिंगनाला.

सरतें[1] । अग्नि बाधूं न शके मातें । कृपा रघुनाथें मज केली ॥ २४ ॥

मारुतीचा आवाका–पुढील कथेचा कथितार्थ । जंव जंव पुच्छ धडाडित । तंव तंव हनुमान तळमळित । राक्षस शांत करावया ॥ २५ ॥ नेत्रीं लाविली अर्धचंद्री । खरसी[2] आणिली मुखांतरीं । पुच्छ पसरोनि धरेवरी । मरणानुकारी निचेष्ट॥२६॥

तो मेला असें समजून राक्षसांची प्रतिक्रिया–राक्षस येवोनि समस्त । त्यातें हालवोनि पहात । तंव तो न हालवी पाय हात । वानरें दांत विचकिले ॥ २७ ॥ एक उलथें पालथें करिती । एक उफराटें धरिती । तंव पुच्छाग्नीनें पोळती । मग पळती माघारे ॥ २८ ॥ एक ढुंगीं घालिती काडया । एक हाणिती फडफडां । वानरू निःशंक गाढा । दांत दाढा हालवीना ॥२९॥ मीस करोनि अति निगुतीं । हालों नेदी पातया पातीं । म्हणती निमाला मारुती। करोनि ख्याती रणमारें† ॥ ३० ॥ वानर वीर जगजेठी । मारिल्या राक्षसांच्या कोटी । इंद्रजिता रावणा धुकधुक मोठी । अवघ्यांचे पोटीं अति धाक ॥ ३१ ॥ जरी हा मरण न पावता । करिता अवघ्यांचे घाता । गाढी बुद्धि लंकानाथा । छळें[3] हनुमंता मारिलें ॥ ३२ ॥ आमुचे दळीं इंद्रजित बळी । त्याची केली रणरांगोळी । वीर मारिले आतुर्बळी । कोण त्यासवें फळी[4] घेवों शके ॥३३॥ रावणासीं नाहीं बळ । परी करूं जाणे स्वयें छळ । पेटवोनियां लांगूळ[5] । गोळांगूळ[6] मारिला ॥ ३४ ॥ सत्यवादी वानर पूर्ण । पाळोनि श्रीरामाची आण । सांगोनियां निजमरण । आपणा आपण मारविलें ॥ ३५ ॥ वैद्य पाहती विचक्षण । म्हणती हृदयीं आहे प्राण । तोही अतिशयेंसीं क्षीण । क्षणार्धे पूर्ण निमेल ॥ ३६ ॥ हनुमंत निमाला ऐकोनि वाणी । घावो घातला निशाणीं । इंद्रजित हर्षेला मनीं । रावणें शेरणी[1] वांटिली ॥ ३७ ॥ राक्षसी सांगती सीतेपासीं । तुवा संवाद केला ज्या कपीसीं । आगी लावोनि त्याचे पुच्छासीं । रावणें त्यासी मारिलें ॥ ३८ ॥

+श्रुत्वा तद्वचनं क्रूरमात्मापहरणोपमम् ।
जानकी शोकसंतप्ता हुताशनमुपागमत् ॥ ५ ॥
यद्यस्ति पतिशुश्रूषा यद्यस्ति चरितं तपः ।
यदि वा त्वेकपत्नीत्वं शीतो भव हनूमतः ॥ ६ ॥

सीतेचा अविश्वास, मारुति मरणें अशक्य–मारिलें ऐकोनि कपीसी । सीता जाहली कासाविसी । जठराग्नि आणोनि ध्यानासीं । स्वयें त्यासी प्रार्थित ॥ ३९ ॥ जरी मज श्रीरामाची गुरुभक्ती । श्रीरामसेवा तपःसंपत्ती । श्रीरामभक्ती जरी हनुमंतीं । तरी मारुती वांचवीं ॥४०॥ ऐकोनि सीतेचें वचन । अग्नि घाली लोटांगण । वाहतों श्रीरामाची आण । नाहीं मरण हनुमंता ॥४१॥ ऐकें हनुमंताची प्रौढी । लंका जाळील रोकडी । मारील राक्षसांच्या कोडी । जाळिली दाढी रावणाची ॥ ४२ ॥ रावणाचा अपमान । हनुमान करी पुरदहन । ऐसें ऐकोनियां वचन । सुखसंपन्न जानकी ॥ ४३ ॥

जळत्या पुच्छानें केलेला अनर्थ–हनुमंत निमाला निःशेख । पाहों आले अवघे लोक । त्याचें पहावया मुख । एक एक दाटले ॥ ४४ ॥ मिळावया राक्षसमांदी । मीस घेतलें निजबुद्धी । अवघियां वधावया त्रिशुद्धी । पेटले द्वंद्वी तें ऐका ॥ ४५ ॥ दाटलिया राक्षसांच्या द्वारीं । जळत पुच्छ घाली त्यांवरी । तंव ते पोळती उरीं शिरीं । आली महामारी राक्षसां ॥ ४६ ॥ पळों जातां पैं बाहेरी । जळत पुच्छ लावी द्वारीं । अवघ्यां केली कोंडमारी ।

१ श्रेष्ठ. २ फेंस. ३ कपटानें. ४ युद्ध. ५ शेपूट. ६ वानर.

† ब–मारू.

१ खिरापत.

+ ५३।२५, २७.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23022 ... वि. 3154
क्रमांक ...9229..... नों. दि. 28/3/58



निशाचरीं आकांतु ॥ ४७ ॥ घुसघुसळूं† ज्ञाबरझोंटी । लोंबलिया राक्षसपृष्ठीं । पुच्छ तयांमाजी दाटी । बोंब उठी देहदाहें ॥ ४८ ॥ एकाच्या वस्त्रा लाविली आगी । तेणेंचि जळती सर्वांगीं । पुच्छ घाली एकाचे ढुंगीं । नेसण्या आगी लावी एका ॥ ४९ ॥ एकाचीं मुंडासीं[1] जळत । फेडूं जातां पोळले हात । एकाचे झगे जळत । एकाचे जळत कटिबंध ॥ ५० ॥ आगी लागली धोत्रासी । द्विज पोळले लिंगप्रदेशीं । नागवे नाचती रावणापासीं । दाविती त्यासी निजलिंग ॥ ५१ ॥ रावणा तेथें‡ लावीं हात । कांहीं तरी व्यथा होईल शांत । वेदविभागी तूं पुण्यवंत । पद्महस्त पैं तुझा ॥ ५२ ॥ कन्यासंक्रांतीं दुष्कर्म । करूं नये श्मश्रुकर्म । शर्पे वाढलीं पैं परम । कोपानुक्रम न करावा ॥ ५३ ॥ हनुमान मारिला राजद्वारीं । निशाणें त्राहाटिल्या भेरी । जळो जळो रावणा तुझी थोरी । जोहारमारी[2] त्वां केली ॥ ५४ ॥ लंका नागविली वस्त्रासाठीं । तेलातुपा पाडिली तुटी । दीप लावणें खुंटली गोष्टी । शेखीं जीवा आटी* मांडिली ॥ ५५ ॥ रावण म्हणे गा हनुमंता । लोकां जाळिसी कवण्या अर्था । सावध ऐकें लंकानाथा । तुज तत्वतां सांगेन ॥५६॥ पुच्छासीं मरण आलें निश्चित । मरणभयें झडा[3] देत । भेणें लोकांमाजि दडत । त्यासी म्यां येथ काय कीजे ॥ ५७ ॥ एकाचे चरण धरित । एकाचे पाठीं रिघत । एकाचे पालवा[4] झोंबत । मरणभयातें चुकवावया ॥ ५८ ॥ एकासी होतें शरणागत । एकाचे गळां पडत । विनवोनियां लंकानाथ । मरणमुक्त करा म्हणे ॥ ५९ ॥ उरीं शिरीं जाळी सर्वांसी । या नांव तूं शरण म्हणसी । भली बुद्धि तुज हनुमंतासीं । राक्षसांसी मारावया ॥ ६० ॥ पुच्छ खवळलिया येथ । रावणा चुकलासी निश्चित । तोही सांगेन गुह्यार्थ । सावचित्त अवधारीं ॥ ६१ ॥ पुच्छ उघडें पडल्या तिळभरी । मरण नये पुच्छावरी । करील लंकेची बोहरी[1] । महामारी राक्षसां ॥ ६२ ॥ पूर्वी म्यां सांगितलें होतें । तुवां उपेक्षोनियां त्यातें । न सांभाळितां पुच्छातें । अग्नि तेथें लाविला ॥ ६३ ॥ पुच्छ तीं ठायीं उघडें होतें । तेणें मरण न येचि त्यातें । परतलें अग्निक्षोभार्थें । त्रिविधघातें घालावया ॥ ६४ ॥ राक्षस मारील महाबळी । करील लंकेची होळी[1] । बुजोनि खंदकाची पाळी । पाडील पौळी[2] दुर्गाची ॥ ६५ ॥ पुच्छ क्षोभलें अति क्षोभकता । माझेनि निवारेना आतां । सत्य जाण गा लंकानाथा । करील घाता लंकेशा ॥ ६६ ॥ जरी असेल आंगवण । तरी पुच्छासीं करावें रण । माझेनि निवारेना जाण । क्षोभलें पूर्ण कपिपुच्छ ॥ ६७ ॥ ऐसें बोलतां हनुमंता । जळत पुच्छ राक्षसमाथां । वाजलें पैं अति निघाता । वीरविघाता[3] मांडिलें ॥ ६८ ॥ पुच्छाभिघात महाबळी । सर्वांचि अग्नि सर्वांगें जाळी । राक्षसां मांडली महाहोळी करील रांगोळी महावीरां ॥ ६९ ॥ रावणापासीं हनुमंत । निःशंक बैसला सावचित्त । पुच्छें मांडिला आकांत । अग्निसंताप राक्षसां ॥ ७० ॥ राक्षससैन्यामाझारीं । बोंब सुटली एकसरीं । अग्नि पोळीत उरीं शिरीं । पुच्छ महामारीं मारित ॥७१॥ मिळोनि महावीर समस्त । मारावया हनुमंत । धांविन्नले शतसहस्र । जेंवी कां मत्त मातंग[4] ॥ ७२ ॥ वीर करूं येतां घात । हनुमंत स्वानंदें नाचत । उड्डाण करोनि अद्भुत । मग गर्जत भुभुःकारें ॥ ७३ ॥ जैसें गिरिशिखराकार । तैसें राजगृहाचें पूर्वद्वार । तेथें बैसला वानर । निशाचर

१ पागोटीं. २ अग्नीमध्यें मारणें. ३ धडपड. ४ पदराला.

† इक्ष–घुलघुलऊ. ‡ ब–येथे. * इक्ष–साठा.

१ नाश. २ तट. ३ वीराच्या घाताला. ४ हत्ती.

लक्षोनी ॥ ७४ ॥ पूर्वद्वारीं [१]अर्गळा¶ होती। तीच घेवोनियां हातीं। रणीं मिसळला मारुती। राक्षसां शांती करीतचि ॥ ७५ ॥ पुच्छ महावीरांतें जाळी। हनुमान मारी आतुर्बळी। राक्षसाची रणरांगोळी। केली तत्काळीं वानरें ॥७६॥ हनुमान निमाला म्हणोनी। निशाणघायीं[२] वाटिली शेरणी। तोंचि उठिला राक्षसनिर्दळणीं। महापळणी मांडली ॥ ७७ ॥ पळावया पैं पुरती। सवडी नाहीं यथारितीं[३]। लंका पेटली दहनावर्ती[४]। हंडा मारुति पेटला ॥ ७८ ॥ पुच्छ म्हणिजे अग्निकल्लोळ। लंकापोळीं जाळी सकळ। राक्षस करिती तळमळ। न चले बळ पुच्छासीं ॥ ७९ ॥ रावण अन्यायी परोपरी। वसे नागविलीं नगरीं। तेलतुपा करोनि बोहरी। पुच्छ वानरीं पेटविलें ॥ ८० ॥ पुच्छ पेटविलें मारायासी। तेंचि हत्यार जाहलें त्यासी। जाळों लागलें लंकेसी। राक्षसांसी देहदाहो ॥८१॥

यो ह्ययं मम लांगूले दीप्यते हव्यवाहन. ।
तस्य संतर्पणं न्याय्यं कर्तुमेभिर्गृहोत्तमै. ॥ ७ ॥
ततोऽसौ दीप्तलांगूलः सविद्युदिव तोयदः ।
भवनाग्रेषु लंकाया विचचारानिलात्मज ॥ ८ ॥
मुमोच हनुमानग्निं कालानलशिखोपमम् ।
साचिव्यं तस्य कुर्वाणः सुतस्य सुतवत्सलः ॥ ९ ॥
ततोऽनलानिलौ क्रुद्धौ हनुमांश्चैव वीर्यवान् ।
परिदीप्य तदा लंकामासमंताद्दिदीप्यते ॥ १० ॥
भवनानीव सिद्धानामंबरात्पुण्यसंक्षये ।
तानि भग्नविमानानि निपेतुर्धरणीतले ॥ ११ ॥

हनुमान विचारी निजमानसीं। अग्नि लागला माझे कांसेसी परमातिथ्य करूं यासीं। देऊं भक्षावयासी गृहें उत्तम ॥ ८२ ॥ विचारितां मूळानुवादु। वेदानुवादें सखे बंधु। दोहींचा वायु पिता प्रसिद्धु। परम सुहृदु आप्तत्वें ॥ ८३ ॥ सखा बंधु साचोकारें[१]। तृप्ती देऊं परमादरें। रत्नखचित माडिया गोपुरें। हेममंदिरें मणियुक्त ॥८४॥ ज्येष्ठ बंधु अति वरिष्ठ। भोजनीं लंकाभुवन ताट। राजमंदिरें परम श्रेष्ठ। भक्ष्य चोखट तें ऐका ॥ ८५ ॥ श्वेत पीत क्षौमांबरें। प्रथम भोजनीं क्षीरसाकरें। मणिमुक्ताहारसंभारें। घृता[२]-भिघारें शोभती ॥ ८६ ॥ चंदनमंदिरें तें ओदन। उपस्कर[३] तें वरान्न[४]। पताका खडखडिती जाण। कथिका पूर्ण फुरफुरित ॥ ८७ ॥ तिळतंदुळकणांचे राशी घृतशर्करा प्राणाहुतीसीं। नगरगृहें ग्रासोग्रासीं। पूर्ण तृप्तीसी भक्षावया ॥ ८८ ॥ जे जे आवडेल गोडी। ते ते पुरवीन रोकडी। घरोघरींच्या उतरंडी। स्वेच्छा परवडी सेवावी ॥ ८९ ॥ जे जे गृहीं गृहसामुग्री। ते ते लोणचीं कोशिंबिरी। तिखट शस्त्रें रायतीं* खरीं†। कवाडें करी पापड ॥ ९० ॥ विचित्र पडदे आणि वितानें[५]। नानाकुसरीचीं वरासनें तींचि परवडी पक्वानें। चांदवे ते§ चाकुळिया ॥ ९१ ॥ बांधलें वोचकें लाडूभक्षण। स्त्रियांचीं पोतीं तिळवे जाण। पर्यंक आणि परिस्तरण[६]। फेणिया पूर्ण सपदरा ॥ ९२ ॥ गादिया पसारे पोतडीं। सांडया काचऱ्या कुरवडी। तेथेंचि पैं मुगवडी। तबक परवडी आंबवडे ॥ ९३ ॥ ध्वजस्तंभ वरी लवण। मंडपदाह दधिओदन। ¶तृणघराचें जें दहन। उत्तरापोशन समाप्ती ॥ ९४ ॥ सखा बंधु हुताशन। आदरें स्वावया भोजन हनुमंतासी उल्हास पूर्ण। पुरदहन अवधारा ॥ ९५ ॥ अनिळानळ[७] हनुमंत। दीर्घ क्षोभले अत्यद्भुत। लंका करावया हुत। तिचे

१ आडसर. २ वाद्यें (भेरी) वाजवून. ३ खरेपणानें. ४ अग्नीचा वेढा पडून.

¶ ब—आगळ. † दख—वेढिली.

१ खरोखर. २ तुपाच्या शिंपडण्यानें. ३ सामान. ४ वरण. ५ छतें. ६ आच्छादनें. ७ वायु आणि अग्नि.

* ब—रायतें. † बक—खरी. § ड—करवे.

¶ बक—तण.

समवेत चालिले ॥ ९६ ॥ पुच्छाग्नि अति प्रदीप्त । हनुमान विचरे लंकेआंत । अग्नि लावी जेथींचा तेथ । अति आकांत लंकेसीं ॥ ९७॥ कपि बैसोनि लंकाशिखरीं । आगी लावी घरोघरीं । कळकळती नरनारी । आपांपरी[१] राक्षसा ॥ ९८ ॥ जळती घरें धवलारें । हाट[२] हाटवटिया चौबारें । माडया उपरिया गृहे‡ गोपुरें । अग्नि वानरें लाविला ॥९९॥ घरें तळघरें वोवरें । पीतांबरसांठवण पेटारे मठ मंडप चत्वरें । आगी वानरें लाविली ॥ १०० ॥ पाकशाळा पाठशाळा । आगी लावी विचित्रशाळा । यंत्र तंत्र मृदगशाळा । निघती ज्वाळा धडधडित ॥ १ ॥ अश्वशाळा गजशाळा । कनककोठारें संग्रहशाळा । रंगशाळा भोगशाळा । गंधर्वशाळा जाळित ॥ २ ॥ लंकादुर्गी सभोंवतें । गडपाळ सैन्य पैं जाळित । तेंही छळें वळें समस्त । हनुमंतें जाळिलें ॥३॥ लंकादुर्गदारवंटे । जाळिल्या अर्गळा* कपाटें । मोकळे सातही दारवटे । आगड मर्कटें बुजविले ॥ ४ ॥ आगी लावोन प्रबळबळी । खचले हुडे दुर्गांच्या पौळी । आगड बुजिले तत्काळीं । मांडिली होळी दुर्गाची ॥ ५ ॥ आगी लावोनि भडभडां । दुर्गाचे हुडे[३] चहूंकडां । खचोनि पडती धडधडां । होत रगडा राक्षसां ॥ ६ ॥ हुडे खचती धडधडां । तळीं राक्षसांचा होय चुराडा । तेणेंचि बुजित आगडा । पुढें झगडा जिंतावया ॥ ७ ॥ पाडित दुर्गीचिया[४] पौळी । आगड बुजीत समूळीं । श्रीराम यावया सहदळीं[१] । वाट मोकळी करितसे ॥ ८ ॥ हनुमान बैसला निवात । पुच्छ धावे जेथींचें तेथ । आगी लावोन समस्त । ज्वाळाकुळित केली लंका ॥ ९ ॥ कपि म्हणे पित्या पवनासी । भोजन देतां सख्या बंधूसी । ज्येष्ठ बंधू† पूज्य आम्हांसी । साह्य त्यासी त्वां व्हावें ॥ ११० ॥ ऐसें विनवितां मारुती । वायु सुखावला चित्तीं । दोघे बंधू पढियंती । साह्य सर्वार्थीं तो जाहला ॥ ११ ॥ अग्नि वायूचा ज्येष्ठ सुत । भेटला कनिष्ठ हनुमंत । सुतें आलिंगिला सुत । उल्हासत स्वयें वायु ॥ १२ ॥ वायु साह्य जाहला अग्नीसी । लंका कवळोनि चौपासीं । ज्वाळा उठिल्या बहुवर्णेसीं । सावकासीं अवधारा ॥ १३ ॥

कचित्कांचनवर्णाभास्तपनीयनिभाः कचित् ।
कचित्ततसुवर्णाभाः कचिच्च रजतोपमा. ॥ १२ ॥
फुल्लाशोकनिभा. कापि कचित्किंशुकसन्निभाः ।
कचिद्धूमावृतः श्यामो विधूमो ज्वलनः कचित् ॥१३
इंद्रनीलनिभो भूत्वा नानावर्णः कचित्कचित् ॥१४॥

कोठें कांचवर्णज्वाळा । कोठें केवळ पिवळा । कोठें कर्कोटकाळा । भासती ज्वाळा अग्नीच्या ॥ १४ ॥ कोठें हिरण्यवर्णे[१] निर्मळा । भासती अतिशुभ्र ज्वाळा । कोठें अशोककुसुमकळा । आरक्त ज्वाळा भासती ॥ १५ ॥ किंशुक[२] फुलले वसंतीं । तैसी सिंदूरवर्णदीप्ती । कोठें ज्वाळा धुमाकुळिती । कोठें लखलखिती सोज्ज्वळा ॥ १६ ॥ आरक्त श्याम एकत्र प्रभा । इंद्रधनुष्यासम शोभा । नीलोत्पलसन्निभा । पद्मगर्भा भासती ॥१७॥ ज्येष्ठीं पुष्करीं कमळानेका । तैसी ज्वाळाकुळित लंका । विमानीं आभासत लोकां । आणि सकळिकां भूतळीं ॥१८॥ ज्वाळा भरताचि गगनीं । जावोनि झोंबलिया विमानीं । ज्वाळमाळाकिंकिणी । पडती धरणीं विमानें ॥ १९ ॥ वेंचल्या निजपुण्यसंपत्ती । जेंवीं स्वर्गस्थां होय च्युती[३] । तेंवीं विमानें ज्वाळाकुळिती । सवेग पडती भूतळीं ॥ १२० ॥ जैसा प्रळयकाळींचा अग्नी । जाय सत्यलोका ठाकोनी

१ दुर्दशा. २ बाजार. ३ बुरूज. ४ किल्ल्यांच्या.

‡ड–गुह्य,क्ष–माड्यागोपुरे गृहहीमवर. *ड–आणिगि, बक–आगळिया.

१ सुवर्णकांतीच्या. २ पळस. ३ पतन.

† बक–ज्येठक.

तेंत्री लंकादहनवन्ही। झोंबे धांवोनि निराळीं[1] ॥ २१ ॥ श्वापदें पळालीं जीव घेऊनी। पक्षी किलकिलती गगनीं देव पळती विमानीं। पाताळीं पळती पन्नग ॥२२॥ [2]मारुत मारुति आणि वन्ही। लंका जाळिती तिघीं जणीं। तापें तापली धरणी सर्व फणी पोळले ॥ २३ ॥ सर्व पोळोनियां फणी। दडाले अर्णवजीवनीं[3]। शेष पोळेना फणिमणी[4]†। शेषशयनीं श्रीराम ॥२४॥ लंका जाळितां मारुती। तापें तापली त्रिजगती। लंकाजन अति आवर्ती। आली शांती राक्षसां ॥ २५ ॥

ततस्ते राक्षसाः सर्वे सरावणमहाबला। ।
बाला वृद्धाश्च शोचंतो निर्ययुर्नगराद्बहिः ॥ १५ ॥
परस्परमवष्टभ्य हस्तं हस्तेन वेश्मनि ।
धूमावच्छन्ननयनाः क्रोशंतश्चेतरेतरम् ॥ १६ ॥
स्त्रियश्च ज्वालाबाधार्ता भ्रमत्यो वै ततस्ततः ।
आक्रोशत: स्खलतश्च धरण्यां रजनीचरा ॥ १७ ॥
बभ्रमुस्तत्र तत्रैव ज्वालामालाकुलेक्षणाः ॥ १८ ॥

राक्षस सांगती रावणातें। तुवां पुच्छ पेटवोनियां येथें। का खवळिलें वानरातें। मारिलीं समस्तें कपिपुच्छें ॥ २६ ॥ पहिलें कपिपुच्छ दुर्धर। त्यासी अग्नि जाहला साहाकार। लंका जाळिली गिरि[5]-कंदर। दुर्ग समग्र जाळिले ॥ २७ ॥ अग्निवळाच्या समेळीं। दुर्गांची रे करोनि होळी। पाडोनि दुर्गांचिया पौळी। खंदक समूळीं बूजिला ॥ २८ ॥ बळें दुर्धर माकड। अवलीळा[6] हाणोनि झड। दुर्ग पाडोनि [7]आगड। सभोंवता बूजिला ॥ २९ ॥ दुर्गासभोंवतीं चौफेरें। भरलीं होतीं अग्नियंत्रें[8]। आगी लावितां वानरें। तीं एकसरें सुटलीं ॥१३०॥ एक वेळे समकाळ। सुटले यंत्रांचे यंत्रगोळ नगरीं उठला हलकल्लोळ। वीर सबळ निमाले ॥ ३१ ॥ पाडोनि दुर्गांची पैं भटी[1]। नगर जाळिलें उठाउठीं। वृद्धें आतुरें अति संकटीं। स्त्रियां बाळांपाठीं लागी अग्नि ॥ ३२ ॥ जरी वीरांचें बळ गाढें। काय करिती अग्नीपुढें। रावणा तुवां केलें कुडें। मरण रोकडे तुज आलें ॥ ३३ ॥ अग्नि लागला चौफेरीं। बोंब उठली एकसरीं। अति आकांत घरोघरीं। [2]आपांपरी स्त्रिया बाळां ॥३४॥ अगो तूं जळसी रोकडी। दुजी‡ पाउलें* आंसुडी। तंव ते नागवी उघडी। पडे उपडी लोकलाजे ॥ ३५ ॥ पुच्छ येतां देखोनि विदीं[3]। जन पळती सांदोसांदीं। जेथें देखे बहुत मांदी। पुच्छ त्रिशुद्धी घाली तेथें ॥ ३६ ॥ आगी लाविली बळातें। मरण भयें तें फेडित। मागें पुढें देवोनि हात। स्त्रिया धांवत नगरीं पैं ॥ ३७ ॥ अग्नीनें पोळली बहुत। एक कण्हती कुंथत। एक अतिशयें थकित। तळमळती एक पैं ॥ ३८ ॥ अग्नि देखोनि चौफेर। बाळ वृद्ध दीन आतुर। स्त्रिया घेवोनि कुमार। अति सत्वर धांवती ॥ ३९ ॥ एकएकांचे धरोनि हात। हाकाहाक बोंब करित। पिता पुत्रातें पाचारित। पुत्र हाकीत पित्यातें ॥ १४० ॥ दाहो देखोनि स्वधामा। आपांपरी सकळ ग्रामा। राम्या पेम्या धांव रे धर्म्या। पाव रे परम्या¶ आकांतीं ॥ ४१ ॥ धाव वेंकटेशा पाव §वितंकमुखा। धांव रे सुपुत्रा दुर्मुखा। ऐशा आक्रंदें देती हाका। वानरें लंका जाळिली ॥ ४२ ॥ निघावया ग्रामाबाहेरी। मिळोनिया जनाच्या हारी[4]। वेगीं येतां नगरद्वारीं। तंव चौफेरीं कपिपुच्छ ॥ ४३ ॥ जे जे द्वारीं रिघों जात। पुच्छ धगधगीत दिसे तेथ। निर्गम न पुरे

१ आकाशीं. २ वायु. ३ समुद्राच्या पाण्यात. ४ फणेवर मणि असल्यामुळें. ५ पर्वतातील गुहा. ६ सहज, लीलेनें. ७ खंदक. ८ तोफा.

† ड–फणा.

१ रचना. २ दुर्दशा. ३ मार्गांत. ४ रांगा.

† क्ष–अगो जाळती पै रोकडी. ‡ ड–दुजीचे.

* ब–साउलें; ड–सावळें. ¶ ब–पद्म्या. § ब–विकटमुखा.

निश्चित । जन भ्रमत अति भ्रांति ॥ ४४ ॥ जळत्या घरामाझारीं । माता सांडोनि म्हातारी । खांदीं घेवोनि निजनारी । पळे बाहेरी स्त्रीलोभें ॥४५॥ पति सांडोनि जळत्या घरीं । हातीं कुमरू कडिये कारी[1]* । स्त्री निघे घराबाहेरी । तुम्ही वऱ्या परी घर राखा ॥ ४६ ॥ जळत चण्याचें पडिलें टेंक । फुटाणे खावे लागल्या भूक । माथणी भरली शीतोदक । घर सम्यक राखावें ॥ ४७ ॥ घरधणी राखण घरीं । वाळें पडोत अग्निबाहेरी । लेंकरें घेवोनि कडियेवरी । पळती नारी सवेग ॥ ४८ ॥ एकी एकासी म्हणे आतां । तुझी मी होईन कांता । स्वपति न भेटे आकांता । म्यां तो सर्वथा सांडिला ॥ ४९ ॥ एक भुलली सुंदर । भेटे त्यासी म्हणे भर्तार । मी तंव तुझी स्वदार[2] । अंगीकार करीं माझा ॥ ५० ॥ ऐसीं भ्रमलीं नेणों किती । नगरामाजी परिभ्रमती[3] । धुमाकूळ ते नेत्र स्रवती । आक्रंदती अति दुःखें ॥५१॥

+पतत्यो रेजिरेऽम्बरेभ्यः सौदामिन्य इवांबरात् ।
वज्रविद्रुमवैदूर्यमुक्तारजतसंहतान् ॥ १९ ॥
विचित्रान्भवने धातून्स्यंदमानान्ददर्श स ।
नाग्निस्तृप्यति काष्ठानां तृणानां च यथा तथा ॥२०॥

हिरे वैदूर्य[4] प्रवाळें[5] । रत्न माणिकें मुक्ताफळें[6] । रत्नखचित राउळें । जाळिलीं सकळें वन्हिजाळीं ॥ ५२ ॥ जंव जंव जाळी लंकाभवन । तृप्ति न पवेचि हुताशन[7] । लंका न जाळावी आपण । मन न मानी मारुतीचें ॥ ५३ ॥ अग्नि आणि हनुमंत । पिता वायु साह्य तेथ । लंका जाळोनि समस्त । केले वाताहत राक्षस ॥ ५४ ॥ ऐसी जाळोनियां नगरी । आला रावणाचे गृहावरी । अग्नि लाविला राजमंदिरीं । आपांपरी राणिवसा[8] ॥ ५५ ॥

१ कुमारी. २ स्त्री. ३ भटकतात. ४ या नांवाचें रत्न. ५ पोवळीं. ६ मोत्यें. ७ अग्नि. ८ जनानखान्यांत.

* इक्ष–कुमारा. + ३४।२७, २८.

रक्तोत्पलनिकाशाश्च दृश्यंते पावकार्चिषः ।
रावणांतःपुरं चैतद्दह्यते सर्वतोऽग्निना ॥ २१ ॥

रावणाचीं समस्त घरें । सातखणी नवखणी मंदिरें । माडया उपऱ्या गोपुरें । घरें तळघरें जाळिलीं ॥ ५६ ॥ रावणाचें सेजागार[1] । निद्राकरितें मंदिर । राणिवसाचें[2] घरोनघर । वानरें समग्र जाळिलें ॥ ५७ ॥ लंकेच्या कडयाकपाटांत । मंदोदरीसमवेत । राणिया लपाल्या समस्त । अग्नि तेथ पावेना ॥ ५८ ॥ रावण बैसला होता जेथ । कपिपुच्छ पावलें तेथ । राक्षस मिळोनि समस्त । अति आकांत मांडिला ॥ ५९ ॥ रावण काढावा बाहेरी । नाहीं तरी पुच्छ पाडील जोहरी[3] । दुर्ग पाडून निशाचरीं । केला मार्ग बहुकष्टें ॥ १६० ॥ बाप कपिपुच्छाची थोरी । जळत पुच्छ ठाकिलें द्वारीं । निर्गम[4] पुरेना बाहेरी । हाहाकारीं गर्जती ॥ ६१ ॥ विघ्न आलें रावणावरी । बोंब उठली निशाचरीं । इंद्रजित धाके निजजिव्हारीं । होईल बोहरी रायाची ॥ ६२ ॥ तये काळीं निशाचर । निवडोनियां निधडे वीर । सन्नद्धबद्धशस्त्रास्त्र । वानरावरी लोटले ॥ ६३ ॥

प्रेतदत्तैश्च शूलाग्रैः पाशैः खड्गपरश्वधैः
हनूमंतं महावेगं निजघ्नुर्वानरर्षभम् ॥ २२ ॥
ते राक्षसा भीमबला नानाप्रहरणान्विताः ।
अजघ्नन् वानरश्रेष्ठं बाणैरादित्यसन्निभैः ॥ २३ ॥

राक्षसांचें हनुमंतावर आक्रमण—सतेज शूळ असमा†साहस । बोडण खड्ग पाश फरश । आदित्यवर्ण बाण बहुवस । हाणिती राक्षस हनुमंता ॥ ६४ ॥ हाणिती नानापरींचीं शस्त्रें । सोडिती नानापरींचीं यंत्रें । फोडिती भिंडिमाळा पांगोरे । राक्षस समग्र क्षोभले ॥ ६५ ॥ रावणाचे दृष्टीपुढें । युद्ध मांडलें रोकडें । वीर वाटिवे[5] अति निधडे । रणीं वेगाडे[6]

१ शयनमंदिर. २ जनानखान्यातील. ३ अग्नीमध्यें. ४ सुटका. ५ शूर. ६ त्वरेनें.

† बक–असता.

उठावले ॥ ६६ ॥ निशाणें त्राहाटिल्या भेरी। चिणकाहळा[1] रणमोहरी। सिंहनाद करोनि वीरीं। वानरावरी लोटले ॥ ६७ ॥ इकडे वाजतां वाजंत्रीं विविध। वीर करिती सिंहनाद। तिकडे हाका बोंबा प्रसिद्ध। महाशब्द जनांचे ॥ ६८ ॥ मध्यें हनुमंत अग्रगणी। आलिया देखोनि वीरश्रेणी। पुच्छ नाचवीत रणांगणीं। घेई धणी[2] युद्धाची ॥ ६९ ॥ कपि म्हणे निजपुच्छासी। लंका जाळिली चौपासी। तूं अतिशयें भागलासी। विसांव्यासी घे आतां ॥ १७० ॥ आलिया राक्षसवीरश्रेणी। त्यांतें मारीन अर्धक्षणीं। पुच्छ धांवोनि लागे चरणीं। ऐसें स्वामींनीं न करावें ॥ ७१ ॥ अर्धसंग्राम सुप्रासितां। मुखींचा ग्रास हनुमंता। काढों नये गा सर्वथा। राजधर्मता विचारीं ॥७२॥ स्वामी मी सेवक तुझा। माझा संग्राम पाहें कपिराजा। आलिया राक्षसांच्या फौजा। रणसमाजा मर्दीन ॥७३॥ राक्षसें बापुडीं काइसीं। तूं कशासाठीं उठसी। तूं असतां माझ्या पाठीसीं। या मशकासी कोण पाड ॥ ७४ ॥ ऐसें निजपुच्छें सांगतां। हासूं आलें हनुमंता। आलिंगूनियां प्रेमता[3]। होय चुंबिता निजपुच्छ ॥ ७५ ॥ कपिपुच्छ होय साह्यता। माझें मज स्फुरण नावरतां। आम्ही तुम्ही समसाम्यता। वीरां समस्तां निर्दाळूं ॥ ७६ ॥ पुच्छ म्हणे ऐसेंच भलें। स्वामीचें वचन पाहिजे केलें। ऐसें कपिपुच्छ समजलें। सरसावलें संग्रामीं ॥ ७७ ॥ कपि पुच्छासीं करी एकांत। मारूं नको लंकानाथ। त्याचा श्रीराम करील घात। इंद्रजिताचा लक्ष्मण ॥ ७८ ॥ उरले राक्षस समस्त। त्यांचा आम्ही करूं घात। ऐसा करोनि इत्यर्थ। मग युद्धार्थ चालिला ॥ ७९ ॥ तूं आकळीं मी निर्दळीं। ऐसी राक्षसमंडळी। करूं आजी रणरांगोळी। पिटिली

१ झांजा. २ तृप्ति. ३ प्रेमपूर्वक.

टाळी कपिपुच्छें ॥१८०॥ करितां वाद्यांचा गजर। [1]राक्षसभार अति दुर्धर। येवोन हनुमंतासमोर। शस्त्रसंभार सोडिती ॥ ८१ ॥ रावणाचे दृष्टीपुढा। होईल निर्वाण झगडा। हनुमंत करील रणरगडा। करील नितोडा[2] राक्षसां ॥८२॥ राक्षसवीर अत्यंत क्रूर। करीत आले हाहाकार। हनुमंत स्वस्थानीं स्थिर। अणुमात्र ढळेना ॥ ८३ ॥ अंगीं राक्षसांचे घाये। लागती तंव उगाचि राहे। मग उठोनियां लवलाहें। केलें काय तें ऐका ॥ ८४ ॥ राक्षसांचे शस्त्रनिर्घाता। भय नाहीं हनुमंता। करावया राक्षसांचे घाता। केलें तत्वतां तें ऐका ॥८५ ॥ रत्नखचित हेमालंकार। सभामंडपीं खांब थोर। वानरें उपटिला सत्वर। निशाचर मारावया ॥८६॥

+ततो वातात्मजः क्रुद्धो हेमरत्नसमन्वितम्।
प्रासादस्य समुत्पत्य स्तंभं हेमविभूषितम् ॥ २४ ॥
भ्रामयित्वा शतगुणं नाम विश्राव्य चात्मनः।
जघान राक्षसान्वीरान्वज्रेणेन्द्र इवासुरान् ॥ २५ ॥

शस्त्रे हाणितां दुर्धर। आला राक्षसांचा [3]भार। खांब उपटोनि अष्टधार। रणीं वानर मिसळला ॥ ८७ ॥ मी रामाचा रामदूत। आलों राक्षसां करावया घात। बाण सारोनियां तेथ। खांब भोवंडीत शतावर्ती ॥ ८८ ॥ वीर हाणिती शस्त्रास्त्रीं। पुच्छें निवारी वरचेवरी। खांब हाणितां वीरां शिरीं। करीत [4]चुरी शतसहस्रीं ॥ ८९ ॥ पुच्छ स्वेच्छा वीरांतें जाळी। दरी शिरीं सर्वांग पोळी। खांब हाणोनि हनुमान बळी। करी रांगोळी वीरांची ॥१९०॥ कपीस मारावया रोकडे। कवची खड्गी वीर वेंगाडे। थरकोनि सरकोनि चहूंकडे। घाय दॆवडे हाणिती ॥ ९१ ॥ चुकवोनि पुच्छाचा आघात। संमुख चुकवोनियां घात। वीर तळपोनि

१ राक्षसांचा समुदाय. २ निकाल, नाश.
३ समुदाय ४ नाश.

+ ४२।१७, १८

घाय हाणित। रणीं हनुमंत माराावया ॥ ९२ ॥ हनुमान विचारी पोटांत। वीर खवळले समस्त। यांचा पाहूं पुरुषार्थ। अंगीं आघात साहोनी ॥ ९३ ॥

हनुमताचें राक्षसशस्त्रागारांत दडणें व आविष्कार–

यांच्या शस्त्राचे समेळीं। माझी न तुटे रोमावळी। शस्त्रें हाणिती महाबळी। रणकल्लोळीं भिडोनी ॥ ९४ ॥ दडाला त्यांचे शस्त्रांतळीं। वीरीं दिधली आरोळी। अवघे म्हणती बळी रे †बळी। कपी भूतळीं पाडिला ॥ ९५ ॥ सन्मुख हाणिती तोमर। मागोन हाणिती महावज्र। वामसव्य विंधिती तीर। वर्षेति शस्त्रें गगनाहुनी ॥ ९६ ॥ राहिलें वज्राण किराण। निःशेष गेला त्याचा प्राण। आमची गाढी आंगवण। भेरी निशाणें त्राहाटिलीं ॥ ९७ ॥ एक म्हणे म्यां शस्त्रघातु। सन्मुख पाडिला हनुमंतु। एक म्हणे उरा आंतु। शूळ घातु म्या खोंचिला ॥ ९८ ॥ एक म्हणे म्यां खड्गधारी। पुरा केला मस्तकावरी। एक म्हणे बाणशरधारीं। सर्वांग शिरीं खीळिलें ॥ ९९ ॥ ऐशा वदिवा गर्जती वीर। हर्षें वाटिती साकर। आतां विझवा लंकापूर। रणीं वानर मारिला ॥२००॥ वानरें थोर केली ख्याती। तरी आम्ही भद्रजाती। हारीं आणिला मारुती। शस्त्रप्रयुक्ती रणभारें ॥ १ ॥ रण शोधा रे सत्वर। कोणे ठाईं मेला कपिकुंजर। तंव तेथें देवोनि भुभुःकार। वेगीं वानर उसळला ॥ २ ॥ ऐकोनि कपीचें गर्जन। कापिन्नला दशानन। राक्षसांचा पळाला प्राण। रोकडें मरण देखोनी ॥ ३ ॥ पुच्छ कवळोनी समसगट। अवघे केले एकवट। खांब हाणोनि घनदाट। केलें पीठ अवघ्यांचें ॥ ४ ॥ हात पाय ना मणगट। ना त्या अस्थी शीर ना कंठ। पाठीचे पोटिचे करोनि पीठ। केली एकवाट अवघ्यांसी ॥ ५ ॥ ना ते भूतळीं ना ते पाताळीं। शेखीं नेलेच रसातळीं। हनुमंतें ते महाबळी। नेले तत्काळीं निर्गुणत्वा ॥ ६ ॥ इंद्रियें अव्यक्त देहाभिव्यक्ती। नांव रूप त्रिगुण जाती। निर्दळोनिया मारुती। गुणातीतीं ते नेले ॥७॥ श्रीरामभक्ताच्या निजहस्तीं। जे जे निमती मारक युक्ती। ते ते पावती गुणातीतीं। भक्तीची ख्याती पैं ऐशी ॥८॥ श्रीरामभक्ताच्या दृष्टीपुढें। मरे त्याचें भाग्य चोखडें। जिणोनी त्रिगुणाचें सांकडें। पावे रोकडे परब्रह्म ॥ ९ ॥ अंतीं रामनाम वसल्या वदनीं। राममूर्ति ज्याचे ध्यानीं। नित्य सावधान श्रीरामभजनीं। धन्य त्रिभुवनीं‡ तो एक ॥२१०॥ श्रीराम *ज्याचे अखंड स्मरणीं। अथवा सार ऐकिल्या कानीं। कर्माकर्मा होय धुणी। निज निर्गुणीं तो पावे ॥ ११ ॥ श्रीराम ज्याच्या वदनीं। श्रीरामनाम ज्याच्या ध्यानीं। नित्य सावधान श्रीरामभजनीं। धन्य त्रिभुवनीं तो एक ॥ १२ ॥ ऐसी श्रीरामाची भक्ती। नित्य नांदे हनुमंतीं। रणीं राक्षसां लावोनि ख्याती। दिधली मुक्ती कपिराजें ॥१३॥ रावणासी म्हणे हनुमंत। तुझा सर्वथा न करीं घात। आजी सोडिला जीवें जीत। तुज रघुनाथ वधील ॥१४॥ एका जनार्दना शरण। जाहलें लंकापुर दहन। हनुमंताचें पुनरागमन। सावधान अवधारा ॥१५॥ कैसी घेईल श्रीराम भेटी। कैशा सांगेल सीतेच्या गोष्टी। कथा अति गोड गोमटी। कृपादृष्टीं अवधारा ॥ १६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमंतलंकादहनं नाम एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ ओंव्या ॥ २१६ ॥ ॥ श्लोक ॥ २५ ॥ एवं ॥ २४१ ॥

---

† बळी.

‡ क–जनीं. * अ–श्रीरामाचे.

## अध्याय २० वा

॥ श्रीलक्ष्मीनारायणाय नमः ॥

स राक्षसांस्तान्सुबहून्निहत्य
वनं च भंक्त्वा बहुपादपं तत् ।
विसृज्य रक्षोभवनेषु वन्हिं
जगाम रामं मनसा महात्मा ॥ १ ॥

रावणाला अवमानून, लंका जाळून मारुति परतले—कोट्यानुकोटी वीर मर्दून । लंकाभुवना करोनि दहन । रावणातें अपमानून । कपि परतोन निघाला ॥ १ ॥

त्या वेळीं त्यांचे मनात चाललेले विचार—वीर मर्दिता समस्त । सांपडला लंकानाथ । हनुमान करी त्याचा घात । श्रीरघुनाथ क्षोभेल ॥ २ ॥ रामें वाहिली असे आण । विंधोनियां निजबाण । रणीं मारीन रावण । असत्य कोण करूं शके ॥३॥ हातीं सांपडला लंकानाथ । मारितां क्षोभेल रघुनाथ । या लागीं न मारीच हनुमंत । जीवें जीत सोडिला ॥ ४ ॥ असत्य ठेवोनि स्वामीचे माथा । म्यां मिरवावी वाढिवता । जळो ते श्लाघ्यता हनुमंता । भेणें लंकानाथ न मारीच ॥ ५ ॥ अशोकवनीं वन उपाडा । करोनि पेटविला झगडा । निधडे वीरां करोनि रगडा । इंद्रजित गाढा पळविला ॥ ६ ॥ रावणासी जीवें मारितां । क्षण न लगे मज आतां । मर्यादा नुलंघवे मज रघुनाथा । तेणें लंकानाथा न मारीच ॥ ७ ॥ बळें मारोनि जंबुमाळी । अखया उपडोनिया पौळी । राक्षसभुवना करोनि होळी । कपि महाबळी परतला ॥ ८ ॥

हनुमंताचे मनाची उल्लसित वृत्ति—वनें उपवनें शोधितां । भाग्यें सांपडली सीता । शुद्धि सांगावया सीता । हनुमंता उल्हासु ॥ ९ ॥ एकेच उड्डाणें श्रीरघुनाथा । चरणीं ठेवावया माथा । शुद्धि सांगावया सीता । हनुमंता उल्हासु ॥ १० ॥

सागरास त्रास होऊं नये म्हणून पुच्छ लहान करून दाह शमन—केव्हां देखेन रघुनाथा । केव्हां शुद्धि सांगेन सीता । ऐसी आवडी हनुमंता । उल्हासता परतला ॥ ११ ॥ जळत पुच्छ धरोनि वरी । विझवूं जातां पैं सागरीं । समुद्रें निवारिला लहरी । ऐसें न करी हनुमंता ॥ १२ ॥ पुच्छ बुचकळितां सागरा । कढू सुटेल समुद्र नीरा । उकाडा होईल जळचरा । ऐसें कपींद्रा न करावें ॥ १३ ॥ पिता पवनातें प्रार्थुनी । पुच्छाग्रीं पेटविला वज्राग्नि । तेणें कढेल समुद्रपाणी । मरतील श्रेणी जळचरांच्या ॥ १४॥ पुच्छ पसरिल्या समुद्रतीरीं । सिंधु म्हणे मी घालीन लहरी । विझवोनियां क्षणा माझारीं । युक्ति कपींद्रें मानली ॥१५॥

स दीप्तं लीलयोत्पत्य लाङ्गूलं भीमदर्शनम् ।
निर्वापयामास तदा समुद्रे हरिपुंगवः ॥ २ ॥

धरिलें होतें रूप दारुण । पुच्छ वाढविलें गगन व्यापून । तें उग्रपण सांडोन । धरी सामान्य कपिरूप ॥ १६ ॥ सामान्यरूप समुद्रतीरीं । पुच्छ पसरितां लीळेंकरीं । क्षणार्धें विझविलें लहरीं । जाहली वानरीं विश्रांती ॥ १७ ॥

त्या वेळीं आलेला स्वेदबिंदु समुद्रात पडून मगरीचे पोटात गेला—स्वेद निपटोनि शरीरीं । स्वयें साडितां सागरीं । पडिला तो ग्रासिला मगरीं । तेणेंचि उदरीं गर्भ तीसी ॥ १८ ॥

त्यापासून मकरध्वजाची उत्पत्ति—मगरोदरीं गर्भभाजु । हनुमंताचा पुत्र स्वेदजु । जन्म पावला मकरध्वजु । [1]बळसमाजु कपिसम ॥ १९ ॥ हनुमंतें ऐशियापरी । पुच्छ विझवोनि सागरीं । कथा चालिली पुढारीं । निजनिर्धारीं अवधारा ॥ २० ॥

प्रदीप्यमाने लांगूले रावणेन हनूमतः ।
जानकीं शोकसंतप्तां सरमा वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥
प्रसीद मम वैदेहि हनुमंत प्रतिप्रिये ।
गतः सम्प्रति दूतस्ते छित्वा पाशमपि दृढम् ॥ ४ ॥

१ बलवान.

स राक्षसमहासाणि विद्राव्य हरिपुंगवः ।
लंकामादीपयामास वायुपुत्रो महाबल. ॥ ५ ॥
निहत्य राक्षसांस्तत्र दिवमेवोत्पपात ह ।
शरीर स्वामिकार्येभ्यो ददाति मकरालये ॥ ६ ॥

हनुमताचें पुच्छ पेटवून त्याला जाळला असें राक्षसी सीतेला सांगतात—आगी लावोनी पुच्छासी । रावणें मारिलें हनुमंतासी । राक्षसी सांगती सीतेपासी । तेणें तिची अति चिंता ॥ २१ ॥ करोनियां वन उपाडा । राक्षसांसीं केला झगडा । मारोनि धुरा बुजोनि आगडा । आपणही पुढां निमाला ॥ २२ ॥ धुरा मारोनि करोनि रण । आपणही रणीं दिधला प्राण । हें वानराचें उन्मत्तपण । स्वामिकार्य न साधेची ॥ २३ ॥ वानर पालेखाईरा किती । मारूं गेला लंकापती । तेणें जाळिला पुच्छीं प्रदीप्ती । शुद्धि सीता न पवेचि ॥ २४ ॥ आणिक एक मूर्खपण । कां सांगितलें आत्ममरण । आपण मारविलें आपण । हें अभाग्यपण माझें ॥ २५ ॥ रावणें मारिलें हनुमंता । शुद्धि न पवेचि रघुनाथा । यासि म्यां काय करावें आतां । शोकें सीता संतप्त ॥ २६ ॥ दुस्तर सागर शतयोजन । कोणा न येववे उड्डाण करून । शुद्धि न पवेचि रघुनंदन । अभाग्य पूर्ण हें माझें ॥ २७ ॥

सीतेचें दुःख—ऐकोनि हनुमंताचें मरण । अश्रुधारा स्रवती नयन । अति दुःखें आक्रंदोन । मूर्च्छापन्न जानकी ॥ २८ ॥ हनुमंताचें मरणापुढां । पुत्रशोक तो बापुडा । आघातु वाजला येव्हडा । अति चरफडा तळमळी ॥ २९ ॥ माझे आकांताचा सांगाती । तोहि निमाला मारुती । आतां कैसेन भेटेल श्रीरघुपती । चिंतावर्ती जानकी ॥ ३० ॥

लंका जाळून हनुमत परत गेला अशी क्षेमवार्ता सरमा सांगते—त्रिजटेची सखी परमा । हरिखें सांगों आली सरमा । मरण नाहीं वो प्लवंगमा । पराक्रमा ऐक त्याचे ॥ ३१ ॥ तोडितां कमल मृणालास । सायस न पवेचि गजास । तेंवि कपीनें छेदोनि पाश । घेवोनि मीस राहिला ॥ ३२ ॥ पुच्छीं पेटवितां हुताशन । रावणाचीं दशवदनें । खांड मिशातें जाळून । पाडिला अपमान लंकेशा ॥ ३३ ॥ तुझें वस्तीचें अशोकवन । तें न जाळीच हुताशन । येर लंकेचें केलें दहन । भवन भवन शोधोनी ॥ ३४ ॥ पुच्छ पेटविल्या पाठीं । सुभट वीर जगजेठी । राक्षस मारिले कोटयानुकोटी । पुच्छासाठीं वानरें ॥ ३५ ॥ लंकेमाजी भवन भवन । पुच्छें केलें पुरदहन । वानरा गाढी आंगवण । गेला गांजोन लंकेशा ॥ ३६ ॥ इतुकें करोनियां कंदन । समुद्रीं पुच्छ विझवोन । तुझी निजशुद्धी घेवोन । गेला ठाकोन श्रीरामा ॥ ३७ ॥ हनुमंत जावोनियां तेथें । घेवोनि येईल श्रीरामातें । शीघ्र पावेल वो येथें । जाणा निश्चितें जानकियो ॥ ३८ ॥

सीतेला आनद—ऐकोनि सरमेचें वचन । सीता जाहली सुप्रसन्न । तीस देवोन आलिंगन । दिधलें भूषण निजमुद्रा ॥ ३९ ॥ सरमा म्हणे अहो माते । आम्ही तुझीं आज्ञांकितें । कायसा सन्मान आमुतें । राक्षसी मातें नको म्हणों ॥ ४० ॥ सीता म्हणे तूं आकांतसांगातिणी । आम्ही तुम्ही निर्वाणबहिणी[1] । विकल्प न धरीं वो साजणी । सरमा चरणीं लागली ॥ ४१ ॥ ऐकोनि सरमेचें वचन । सीता पावली समाधान । येरीकडे हनुमंत आपण । अति उद्विग्न स्वयें जाहला ॥ ४२ ॥

+संदीप्यमानां विध्वस्तां त्रस्तरक्षोगणां पुरीम् ।
अवेक्ष्य हनुमाल्लंकां चिंतयामास वानरः ॥ ७ ॥
यदि दग्धा मया लंका नूनमार्याऽपि जानकी ।
दग्धा तेन मया भर्तृहृतं कार्यमजानता ॥ ८ ॥

---

१ संकटकालींच्या बहिणी. + ५५।१,४

तस्य क्रोधाभिभूतेन मया मूलक्षयः कृतः ।
विनष्टा जानकी व्यक्तं न ह्यदग्धः प्रदृश्यते ॥ ९ ॥
यस्यार्थमयमारम्भस्तत्कार्यमवसादितम् ।
लङ्कां दहता कार्यं किंस्वित्कृतमिदं मया ॥ १० ॥

लंकादाहांत सीताहि भस्म झाली असावी असा हनुमताचा समज–पुच्छ समुद्रीं विझवून । घ्यावया रामदर्शन । आलें हनुमंतासी स्फुरण । करावया उड्डाण सज्ज जाहला ॥ ४३ ॥ मागील पाहतां आवांका । ज्वलनाकुळ[१] देखिली लंका । कपीसीं पडली आशंका । सीता निःशेखा भस्म जाहली ॥ ४४ ॥

त्यामुळें व पुढील कारणपरंपरेमुळें हनुमंताला उद्वेग–अति चिंता हनुमंता । जाळोन स्वामींची कांता । काय शुद्धी सांगों रघुनाथा । केलें अनर्था मर्कटत्वें ॥ ४५ ॥ लंका साटोपें जाळितां । न पाहेंचि स्वामिकार्यार्था । न पाहेंचि निजस्वार्था । केलें अनर्था मर्कटत्वें ॥ ४६ ॥ मारिले वीर कोटयनुकोटी । लंका जाळितां उठाउठीं । जाळिली सीता गोरटी । ही बुद्धि खोटी पैं माझी ॥ ४७ ॥ जो जो म्यां केला पुरुषार्थ । तो तो जाहला मज निरर्थ । जाळिली श्रीरामाची कांता । काय रघुनाथा मुख दावूं ॥ ४८ ॥ [२]दहनीं जाळिली सीता सती । जळो जळो माझी ख्याती । कीर्ति ते जाहली अपकीर्ती । केंवी रघुपतीस मुख दावूं ॥ ४९ ॥ तिची शुद्धि सांगों जातां । दहनीं जाळिली ती सीता । अपयश आलें मज हनुमंता । केंवी रघुनाथा मुख दावूं ॥ ५० ॥ पुच्छाग्नीच्या आवर्तीं । लंका जाळिली [३]सहितक्षिती । अदग्ध चार बोटें नुरती । सीता केवळी वांचेल ॥ ५१ ॥ विचार न करितां मर्कटा । करोनियां मर्कटचेष्टा । बारा जणां श्रेष्ठश्रेष्ठां । केल्या बारा वाटा तें ऐका ॥ ५२ ॥ ऐकतां सीतेचें मरण । श्रीराम सांडील निजप्राण । प्राण सांडील लक्ष्मण । भरत शत्रुघ्न निमतील ॥ ५३ ॥ निमतील तिघी माता । मरण नळ नीळ जांबवंता । मरण सुग्रीवा कपिनाथा । अंगद तत्वतां निमेल ॥ ५४ ॥ ऐसिऐशिया श्रेष्ठश्रेष्ठां । माझेनि ऐशा बारा वाटा । त्याहून श्रेष्ठा आणि कनिष्ठा । मरण वळकट माझेनि ॥ ५५ ॥ अयोध्येचे नारी नर । मरतील समग्र वानर । एवढया अपेशासी पात्र । सीता सुंदर जाळोनी ॥ ५६ ॥

क्रोधाचा प्रभाव व त्याची निंदा–क्रोध केवळ पैं मांग । क्रोधें अपवित्र पैं सर्वांग । साधिल्या कार्या केला भंग । क्रोधें सांग नागविलें ॥ ५७ ॥ शुद्धि साधिलियापाठीं । क्रोध संचरला पोटीं । लंका जाळिली क्रोधदृष्टीं । सीता गोरटी जाळिली म्यां ॥ ५८ ॥ क्रोध मांगडा अति चांडाळ । जळें निरसे मांगविटाळ । क्रोध त्याहून प्रबळ । नव्हे निर्मळ स्नानदानें ॥ ५९ ॥ क्रोधाऐसा महावैरी । जडला असतां निजजिव्हारीं । जो ज्ञानाची मानी थोरी । तो संसारीं अति मूर्ख ॥ ६० ॥

+धन्याः खलु महात्मानो ये बुद्धया कोपमुत्थितम् ।
निरुन्धन्ति महात्मानो दीप्तमग्निमिवांभसा ॥ ११ ॥

क्रोध जिंकणारे नरांना धन्यवाद–क्रोध येऊं न देती दृष्टी । धन्य धन्य ते नरश्रेष्ठी । क्रोध आलियाही पोटीं । ते विवेकदृष्टीं निर्दळिती ॥ ६१ ॥ ऐसिये दृष्टीचे नर । ते चैतन्याचें[१] निजमंदिर । परब्रह्माचें भांडार । ब्रह्म साकार ते पुरुष ॥ ६२ ॥ मूर्ती पाहतां भगवद्भाव । कामक्रोधासी कैंचा ठाव । ऐसा ज्याचा निजसद्भाव । तोचि स्वयमेव परब्रह्म ॥ ६३ ॥ ऐसा समूळ विचार । न करींच मी पामर क्रोधें नागविलें साचार[२] । सीता सुंदर जाळिली ॥ ६४ ॥ क्रोध आलिया तत्वतां[२] । अणुमात्र

१ अग्नीनें सर्वत्र व्याप्त अशी. २ अग्नींत.
३ पृथ्वीसह.

१ परब्रह्मस्वरूपाचें, ज्ञानस्वरूपाचें. २ खरोखर.

+ ५५.३.

न करींच स्वार्थी । करविलें कोटिकोटी अनर्थी । जघन्यता[1] जगनिंद्य ॥ ६५ ॥ आली मज अति निंद्यता । ऐसेनि श्रीरामासी भेटतां । प्रळयो होईल समस्तां । निमाली सीता ऐकोनी ॥६६॥

+इहैव प्राणसन्यासो ममापि ह्यत्र रोचते ।
किमग्नौ निपताम्यद्य आहोस्विद्वडवामुखे ॥ १२ ॥

पुढें काय करावें हा विचार—न वचोनियां श्रीरामापासीं । येथेंचि घ्यावें संन्यासग्रहणासी । तंव हाडवैर पडलें राक्षसांसीं । इहप्रदेशीं[2] राहों न ये ॥ ६७ ॥ आतां देवों आपुला प्राण । तरी मज सर्वथा न ये मरण । तेंही निजात्मलक्षण । आपणा आपण अनुवादे ॥ ६८ ॥ जाळूं न शके वैश्वानर[3]। बुडवूं न शके मज सागर । भक्षूं न शकती मत्स्यमगर । वज्रशरीर पैं माझें ॥ ६९ ॥ जाणूनि वज्रदेह मारुती । सिंह व्याघ्र वडवाजाती । सर्वथा मजला न भक्षिती । मृत्यु हनुमंतीं असेना ॥७०॥ भेटवेना श्रीरघुनाथा । मरण न ये मरों जातां । संन्यास न घेववे पैं घेतां । काय म्यां आतां करावें ॥ ७१ ॥ ऐसा हनुमंत आपण । सीता निमाली मानून । तेणें जाहला अति उद्विग्न । समाधान पावेना ॥ ७२ ॥

श्रीरामाचें स्तवन व प्रार्थना—मग म्हणे श्रीरघुनाथा। पाव माझिया आकांता[4] । काय करावें म्यां आतां । बुद्धिदाता होय मज ॥ ७३ ॥ ऐसी करितां विनंती । श्रीराम नांदे सर्वां भूतीं । तेचि काळीं पैं मारुती । अगाध[5] युक्ती आठवली ॥ ७४ ॥

†रामस्य च मनःकांता सा कथं विनशिष्यति ।
यद्वा दहनकर्मायं सर्वत्र प्रभुरव्ययः ॥ १३ ॥
न मे दहति लांगूलं कथमार्यां प्रधक्ष्यति ।
तपसा सत्यसंवादादनन्यत्वाच्च भर्तरि ॥ १४ ॥
असौ विनिर्दहेदग्निं न तामग्निः प्रधक्ष्यति ॥१५॥

१ नीचपणानें. २ ह्या ठिकाणीं, येथें. ३ अग्नि. ४ संकटकाळीं. ५ मोठी, उत्तम

+ ५५।१२, १३ † २५, २६, २८

सीता भस्म होणें अशक्य अशा आत्मविश्वास—श्रीराम एकपत्नीधारी¶ । श्रीरामसेवा तपसामग्री । सत्य श्रीरामनाम जिव्हारीं । वन्हि *कैशापरी जाळील ॥ ७५ ॥ श्रीरामव्रतें† सीता सती । श्रीरामाची अनन्य भक्ती । श्रीरामनामीं अनन्य प्रीती । अग्नि कैसा जाळील ॥ ७६ ॥ रावणें आगी लावितां पुच्छीं । पुच्छ न जाळवे अग्नीसी । तो केंवी जाळील सीतेसी । विशेषेंसीं श्रीरामप्रिया ॥ ७७ ॥ श्रीरामाची प्रियकांता । अग्नीसीं न जाळवे सर्वथा । अग्नि जाळूं न शके सीता । श्रीरामसत्ताप्रतापें ॥ ७८ ॥ श्रीरामाचे निजकिंकर[1] पालेखाइरें मी वानर । मम पुच्छ न जाळी वैश्वानर । सीता चिन्मात्र केंवी जाळी ॥ ७९ ॥

अग्नीनें जाळली असल्यास त्यास दंड—जरी जाळिली वन्हीनें सीता । तरी मी त्यासी दंडीन आतां । कोप आला हनुमंता । शेंडी माथां थरारिली ॥८०॥ करकरलिया दांतदाढा । वळला पुच्छाचा आंकोडा । वन्हि दंडावया पुढां । हनुमान गाढा खवळला ॥ ८१ ॥

वायूचें आश्वासन व हनुमंताचें स्वास्थ्य—पिता पवन सांगे कानीं । ज्येष्ठ बंधु तुझा वन्ही । त्यासी करूं नये दंडणी । सीता जननी ते स्वस्थ असे ॥ ८२ ॥ अग्नीनें सीता अभिवंदूनी । स्वस्थ ठेविली अशोकवनीं । ऐसें ऐकतांचि कानीं । उल्हास मनीं वानरा ॥ ८३ ॥ अभिवंदोनि हुताशन । घालोनि पित्यासी लोटांगण । घ्यावया सीतेचें दर्शन । केलें उड्डाण वानरें ॥ ८४ ॥

ततः कपिः प्राप्तमनोरथार्थस्तामक्षतां राजसुतां विदित्वा । प्रत्यक्षतस्तां पुनरेव दृष्ट्वा प्रतिप्रयाणाय मतिं चकार ॥ १६ ॥

१ एकनिष्ठ सेवक.

¶ब—नारी. *बक—कशा. †ब—व्रत, ड—वसत, क्ष—वर्ते.

+ततस्तु शिंशपामूले जानकीं पर्यवस्थिताम् ।
अभिवाद्याब्रवीद्दृष्ट्वा पश्यामि त्वामिहाक्षताम्॥१७॥
ततस्तं प्रस्थितं सीता वीक्षमाणा पुनः पुनः ।
भर्तुः स्नेहादिदं वाक्यं हनुमन्तमथाब्रवीत् ॥ १८ ॥
यदि त्वं मन्यसे तात वसैकाहमिहानघ ।
कचित्सुसंवृते देशे विश्राम्य श्वो गमिष्यसि ॥१९॥
मम चैवाल्पभाग्यायाः सांनिध्यात्तव वानर ।
शोकस्यास्याप्रमेयस्य मुहूर्तं स्यादपि क्षयः ॥२०॥
अदर्शनं च ते वीर भूयो मां दारयिष्यति ॥२१॥

परत लंकेत जाऊन सीतेचें दर्शन—दक्षुण करोनि हनुमंता । स्वयें लंकेमाजी येतां । दग्धगजभग्नदंता । द्वीप देखता पुरध्वंस ॥ ८५ ॥ विमानाकार पुरमंदिरें । जळोन पडलीं समग्रें । भक्ष्यदग्ध पैं मयूरें । वैश्वानरें पुरदाहो ॥ ८६ ॥ पुच्छाग्निदग्ध लंकाभुवन । त्यामाजी अदग्ध[१] अशोकवन । सीता देखोनि सुखसंपन्न । केलें लोटांगण वानरें ॥८७॥ घालोनिया लोटांगण । आवडीं वंदिले चरण । सीताचरणक्षालन । केलें कपीनें नयनाश्रूनीं ॥८८॥ वेगें येवोनि मारुती । मागें पुढें पाहे सीता सती । पाहे मागुती मागुती । पुनरावृत्तीं साक्षेपें[२]॥ ८९ ॥ नाहीं जळली पोळली । नाहीं¶ लोम हुरपळली । सीता सुखरूप देखिली । पिटिली टाळी हनुमंतें ॥ ९० ॥ सीता देखोनि अक्षत[३] । हनुमान आनंदें नाचत । माझा फळला पुरुषार्थ । रामकार्यार्थ साधला ॥ ९१ ॥ सीताशुद्धि लाभली येथ । जालें सीतामनोगत । साधिला श्रीरामकार्यार्थ । माझा पुरुषार्थ मज फळला ॥ ९२ ॥ सीतेचे चरणीं ठेवोनि माथा । कपि म्हणे माते न धरीं चिंता । येवोन येईन वो रघुनाथा । ही घे तत्वतां भाक माझी ॥ ९३ ॥ वानर श्रीरामाचा आप्त । माझाही सखा हनुमंत । संकटीं भेटोनि वनाआंत । भवभयार्थ निरसिला ॥ ९४ ॥ राक्षस मारोनि समर्थ । लंका करोनि हताहत । गांजोनिया लंकानाथ । रामपुरुषार्थ प्रकटिला ॥ ९५ ॥

सीतेला आनंद, व विश्रांति घेऊन जाण्याची सूचना—ऐकता हनुमंताची गोष्टी । फलोत्कट* जनकाची भेटी । ऐसी जाहली सुखसंतुष्टी[१] । हनुमान दृष्टीं देखोनि ॥ ९६ ॥ जो आकांतीं† रक्षिता । तो हनुमंत माता पिता । हनुमान प्रिय श्रीरघुनाथा । वेदशास्त्रार्थी मज पूज्य ॥ ९७ ॥ लंका जाळितां चौपासीं । युद्ध करितां भागलासी । तुज द्यावया विश्रांतीसी । नाहीं मजपासीं शेजबाज ॥ ९८ ॥ सेवा न घडे हनुमंता । ऐसी माझी अभाग्यता । निर्वातस्थळीं एकांता । विश्रांति त्वां आजि घ्यावी ॥९९॥ आजी घेवोनि विश्रांती । प्रातःकाळीं त्वां मारुती । भेटी जावें गा रघुपती । माझी विनंती अवधारीं ॥ १०० ॥

हनुमताचें विश्रांतिस्थान श्रीरामचंद्र—ऐकोन सीतेचें वचन । हनुमान जाहला हास्यवदन । ऐक माते सावधान । विश्रांतिस्थान पैं माझें ॥ १ ॥ जन्ममरणाची निवृत्ती[२] । सकळ श्रमांची विश्रांती । त्या रामनामाच्या आवृत्ती । जाण निश्चितीं जानकिये ॥ २ ॥ युद्ध करितां रणावर्ती । सबाह्य कवच श्रीराममूर्ती । एकाकी जातां दुर्गम पंथीं । नाम सांगातीं[३] निर्भय ॥ ३ ॥ आसनीं भोजनीं शयनीं । नित्यावर्ती गमनागमनीं । राम सांगाती जागृतीं स्वप्नीं । सत्य वाणी हे सीते ॥ ४ ॥ ऐकोनि हनुमंताची स्थिती । जीवें ओंवाळी सीता सती । सबाह्य विकलें श्रीरामभक्ती । धन्य मारुति जन्म तुझा ॥ ५ ॥

१ न जळलेलें. २ प्रयत्नानें. ३ सुरक्षित.

¶ब—हांसें आलेलें मारुती.

+ ९६।१, २, ३, ४, ६

१ अत्यंत आनंद. २ नाश. ३ सोबती.

*क—सुखे जैसी जनकभेटी. ब—फळले कष्ट जनकभेटीं. †ब—अकाळी सरक्षिता.

तें ऐकून सीतेला सुख—ऐकोनि हनुमंताची युक्ती। अकृत्रिम श्रीरामभक्ती। तेणें सुखावे सीता सती। धन्य मारुति जन्म तुझा ॥ ६ ॥ सुखावोनी सीता सती। सर्वेचि दचकली पैं चित्तीं। आतां जाईल मारुती। केंवी मागुती देखेन ॥ ७ ॥ तुझें प्रयाण ऐकतां। प्राण निघों पाहे आतां। काय करूं गा हनुमंता। आवरितां चित्त आवरेना ॥ ८ ॥

सीतेची शंका, वानर समुद्रोत्तरण कसें करितील—आणिक एक हनुमंता। संदेह[१] वर्तताहे चित्ता। तोही सांगेन मी आतां सावधानता अवधारीं ॥९॥

तानि हर्यृक्षसैन्यानि तौ वा नरवरात्मजौ।
कथं नु खलु दुष्पारं संतरिष्यति सागरम् ॥ २२ ॥
त्रयाणामेव भूतानां सागरस्यातिलंघने।
शक्तिः स्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्य च ॥२३॥
तदत्र कार्यनिर्बन्धे समुत्पन्ने दुरासदे।
किं पश्यसि समाधानं त्वं हि कार्यविशारद ॥२४॥
काममस्य त्वमेवैकः कार्यस्य परिसाधने।
पर्याप्तः परवीरघ्न यशस्यस्ते बलोदयः ॥२५॥

कोटि कोटि वानरभार। कैसेनि लंघिती सागर। केंवी पावती पैल पार। दशशिर दंडावया ॥११०॥ समुद्रलंघनाप्रती। तिघां जणां आहे शक्ती। वैनतेय[२] वायु मारुती। चौथियाची गति चालेना ॥ ११ ॥ मिळोनियां नरवानर। केंवी लंघितील महासागर। हेंचि मज चिंता थोर। सत्य साचार हनुमंता ॥ १२ ॥ समुद्र लंघणों कार्यार्थी। आलें हनुमंता तुझे माथां। राक्षसदमनीं तुज दक्षता। लंकानाथा तुझा धाक ॥ १३ ॥ नांव ऐकोनि हनुमंत। रावण उभ्यां चळकांपत। तुज इंद्रजित सदा धाकत। तुझा पुरुषार्थ अनुपम्य[३] ॥ १४ ॥

हनुमंताचें आश्वासन, रामाच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास—ऐकोनि सीतेचें उत्तर। हनुमान म्हणे मी किंकर। श्रीरामप्रताप दुर्धर। ऐक साचार सांगेन ॥ १५ ॥ श्रीरामभातीं† दुर्धर शर। वाणीं वाहोनि नरवानर। राम पाववील समुद्रपार। श्रीरामचंद्र प्रतापी ॥ १६ ॥

स वानरसहस्राणां कोटीभिरभिसंवृतः।
क्षिप्रमेष्यति वैदेहि सुग्रीवः प्लवगाधिपः ॥२६॥
तौ च वीरौ नरवरौ सहितौ रामलक्ष्मणौ।
आगम्य नगरीं लंकां सायकैर्विधमिष्यतः ॥२७॥
सगणं राक्षसं हत्वा नचिराद्रघुनंदनः।
त्वामादाय वरारोहे स्वां पुरीमभियास्यति ॥२८॥
एवमाश्वास्य वैदेहीं हनूमान्मारुतात्मजः।
गमनाय मतिं कृत्वा वैदेहीमभ्यवादयत् ॥२९॥

वानरसेनेचिया हारी[१]। श्रीराम बैसवोनि शरांग्रीं। उतरोनियां समुद्रीं। लंकापरपारीं आणील ॥ १७ ॥ राम लक्ष्मण वीर वरिष्ठ। धनुर्विद्या अति श्रेष्ठ। बाण वर्षोनि अति उद्भट। दशकंठ छेदील ॥ १८ ॥ रणीं पाडिता दशकंठ। इंद्रजित कुंभकर्ण वरिष्ठ। प्रधान मारोनि समसगट। करील सपाट राक्षसां ॥ १९ ॥ इतुकें करावया येथ। शीघ्र आणितों रघुनाथ। विलंबू न लगे वो निश्चित। वचन त्रिसत्य हें माझें ॥१२०॥ वाहतों श्रीरामाची आण। शिवतों तुझे श्रीचरण। शीघ्र आणीन रघुनंदन। निजप्रमाण हे माझें ॥ २१ ॥

सीतेला नमस्कार करून हनुमंताचें उड्डाण. सीतेचा गहिंवर—हनुमंतें ऐसिये परी। आश्वासोनि सीता सुंदरी। सिंधु उडावया परपारीं। नमस्कारी सीतेतें ॥ २२ ॥ कपीनें करितां नमस्कार। सीतेसी आला गहिंवर। तिसी विनंती करी वानर। शुद्धि निर्धार लक्षोनि ॥ २३ ॥

---

१ शंका, संशय. २ गरुड. ३ निरुपम.

† ब—लंघोनि.

---

१ रांगा.

† ब—भाता.

हनुमंताचा आदेश, रामचरणीं लीनता—श्रीराम ध्यानीं धरोनि आता। सांडावी सकळ चित्तचिंता। तेणें सत्य प्राप्ति श्रीरघुनाथा। स्वानंदता उल्लासें ॥ २४ ॥ ध्यानीं धरोनि राघवा। चिंता सांडावी देहभावा। तेणें ब्रह्मत्व जीवीं जीवा। तोचि विसांवा जीवशिवांचा ॥ २५ ॥ चित्तचिंत्य चिंतनवृत्ती। सांडोनि स्मरावा श्रीरघुपती। हाचि विसांवा विश्रांती। जीवशिव होती परब्रह्म ॥ २६ ॥ जीवत्व नाठवे जीवा। शिवत्व नाठवे शिवा। नित्य श्रीराम स्मरावा। ते जीवशिवा विश्रांति ॥ २७ ॥ परब्रह्माचें ब्रह्मपण। राम स्मरतां आठवण। ऐसें श्रीरामस्मरण। विसांवा जाण जानकिये ॥२८॥ ऐकोन हनुमंताचें वचन। सीता जाहली सुखसंपन्न। एका जनार्दना शरण। गोड निरूपण पुढें आहे ॥ २९ ॥ [1]कपिकाकुत्स्थआनंदभेटी। सीताशुद्धीची गोड गोष्टी। ऐकतां परमानंद सृष्टीं। कथाकसवटी अनुपम्य ॥ १३० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकाया हनुमत्सीताश्वासनं नाम विंशतितमोऽध्याय ॥ २० ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ २९ ॥ एवं ॥ ॥ १५९ ॥

---

## अध्याय २१ वा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

लंकादहनाचा परिणाम—श्रीरामभक्ताचें महिमान[2]। अगाध गहन अति पावन। हनुमंतें केलें लंकादहन। ओतिली संपूर्ण सुवर्णाची ॥ १ ॥ रामभक्त करिती कंदन। तें कंदन होय सुखसंपन्न। ऐसें भक्तीचें महिमान। कृपा संपूर्ण रामाची ॥ २ ॥ हनुमंतें जाळिलें लंकेसी। नव्हे काळी कोळसा मसी। सुवर्ण ओतिलें चौपासीं। पीतप्रभेसीं शोभत ॥ ३ ॥

१ मारुति आणि राम यांची आनंदानें भेट.
२ मोठेपणा.

करितां लंकेचें दहन। लंका ओतिली सुवर्ण। याचें मूळ मुख्य कारण। गजोपाख्यान अवधारा ॥ ४ ॥

गजेंद्रोद्धरणाख्यान—भगवताचें कृपाळुपण। नामस्मरणाचें महिमान। गजेंद्राचें उद्धरण। प्रसंगें पूर्ण सुवर्णमय लंका ॥ ५ ॥ चालतां कथा रामायण। त्यामाजी गजेंद्रोद्धरण। लंका ओतिली सुवर्ण। तें कारण सांगेन ॥ ६ ॥

> आसीद्गिरिवरो राजन् त्रिकूट इति विश्रुतः।
> क्षीरोदेनावृतः श्रीमान्योजनायुतमुच्छ्रितः ॥ १ ॥
> तावता विस्तृतः पर्यक् त्रिभिः शृंगैः पयोनिधिः।
> दिशास्वारोचयन्नास्ते रौप्यायसहिरण्मयैः ॥ २ ॥
> अन्याश्च ककुभः सर्वा रत्नधातुविचित्रितैः।
> नानाद्रुमलतागुल्मैर्निर्घोषैर्निर्झरांभसाम् ॥ ३ ॥

हें आख्यान श्रीशुकांनीं परिक्षितीला सांगितलें—जो योगियांचा योगाग्रणी। जो ब्रह्मचर्यशिरोमणी। जो ज्ञानियाचा मुकुटमणी। तो श्रीशुक मुनि सांगत ॥ ७ ॥ जो का वैराग्याचा निधी। ज्ञानविज्ञानाचा[1] उदधी[2]। जो कां सद्बुद्धीची बुद्धी। तो शुक त्रिशुद्धी बोलत ॥ ८ ॥ जो पांडवकुळीं कुळदीपक। कौरवकुळीं कुळनायक। श्रोता परिक्षिति त्यक्तोदक[3]। श्रवणचातक कथार्थी ॥ ९ ॥ त्या परीक्षितीकारण। गजेंद्राचें उद्धरण। श्रीशुक सांगे आपण। वसतिस्थान गजाचें ॥ १० ॥

त्रिकूट पर्वतावर गंडकी गिरीत मोठें सरोवर आहे—त्रिकूटनामा गिरिवर। योजनें अयुत दहा सहस्र। गंडकीपासोनि क्षीरसागर। एवढा थोर पर्वत ॥ ११ ॥ जितुका पृथ्वीवरी विस्तार। तितुका उंच दश सहस्र। त्रिकूटनामा त्रिशिखर। गिरिवर शोभत ॥ १२ ॥ नाना रत्नांचिया खाणी। नाना धातुंचिया

१ शास्त्राध्ययन व गुरूपदेश यांहीं करून जो बोध होतो तें ज्ञान, आणि विज्ञान म्हणजे अनुभवज्ञान.
२ समुद्र. ३ पाणीही पिणें सोडलें आहे असा.

भरणी । निर्मळ जळांचिया श्रेणी[१] । सरें[२] पुष्करणी तेणें भरली ॥ १३ ॥ पर्वताचें निजमहिमान । नाना वर्णी विराजमान । श्वेतश्यामसुवर्णवर्ण । शोभा सपूर्ण गिरिवरा ॥ १४॥ वृक्ष वल्ली लता द्रुम[३] । सिंहव्याघ्रादि पशु प्लवंगम[४] । नाना जातींचे विहंगम[५] । ऋषिआश्रम सिद्धांचे ॥ १५ ॥ निर्मळ जळसरोवरें पूर्ण । नानापक्षिकुळभाषण । गोचमरींचें[६] वसतिस्थान । शोभायमान पर्वत ॥ १६ ॥ सुवर्ण-ताम्ररौप्यखाणी । लोहो[७] निपजे लोहपाषाणीं । नाना धातुप्रवाहश्रेणी । पर्वतांतूनी प्रसवती ॥ १७ ॥

तस्य दिव्यां भगवतो वरुणस्य महात्मन. ।
उद्यान ऋतुमन्नाम आक्रीड सुरयोषिताम् ॥ ४ ॥
सर्वतोलंकृतं दिव्यैर्नित्यं पुष्पफलद्रुमैः ।
मंदारैः पारिजातैश्च पाटलाशोकचंपकैः ॥ ५ ॥
चूतैः प्रियालैः पनसैराम्रैराम्रातकैरपि ।
क्रमुकैर्नारिकेलैश्च खर्जूरैर्बीजपूरकैः ॥ ६ ॥
मधुकैः श्यालतालैश्च तमालैरसनार्जुनैः ।
द्राक्षेक्षुरम्भाजम्बूभिर्बदर्यक्षाभयामलैः ॥ ७ ॥
अरिष्टोदुंबरप्लक्षैर्वटैः किंशुकचंदनैः ।
पिचुमर्दैः कोविदारैः सरलैर्देवदारुभि' ॥ ८ ॥

†जया पर्वताची दुरी । जे लागली गंडकीगिरीं । वनें उपवनें अति साजिरीं । नाना वृक्षांतरीं गंभीर ॥ १८ ॥ जें देखतां उपवन । विश्रांतीतें पावे मन । छाया शीतळ सुगंध पवन । कोकिळाकूजन[८] सुखकारी ॥ १९ ॥ सर्वां ऋतूंचें एकायतन[९] । सर्वां ऋतूंचें फळ पुष्प जाण । त्या वनीं सदा सुखसंपन्न । क्रीडास्थान अप्सरां ॥ २० ॥ अमृतापरिस फळें सुस्वाद । कस्तूरीहूनि सुगंध । मलयानिळ सुस्वर संबद्ध । क्रीडती आनंदें अप्सरा ॥ २१ ॥ कृष्ण-

१ पंक्ती. २ सरोवरें. ३ झाडें. ४ वानर. ५ पक्षी. ६ वनगाईचें. ७ लोखंड. ८ कोकिळेचें ओरडणें. ९ एकस्थान.

† ब–द्रोण्यां. ‖ बक–तया.

सारूप्यें* कृष्णभ्रमर । सुमनीं[१] प्रवेशोनि सादर । आमोद सेविती सुखसार । कैंवी केशर कुचंबे ॥२२॥ वृक्ष शोभती देवतरू । पाटली पारिजातक मांदारू । संतानादिक कल्पतरू । वृक्षविस्तारू चंदनादि ॥२३॥ चंदन चंपक हरिचंदन । चूतवन[२] अशोकवन । खर्जुरीवन तालवन । नंदनवनसम शोभे ॥ २४ ॥ रायकेळी सोनकेळी । मघमघिती कर्पूर-कर्दळी । घडघडित नारीकेळी । शोभा वनफळीं समवेत ॥ २५ ॥ मधुवन विमलार्जुन । औदुंबर अति गहन । तमालवृक्ष शोभायमान । बिल्ववनें साजिरीं ॥२६॥ द्राक्षामंडप शोभायमान । जांबुळी-वृक्ष एकसमान । इक्षुदंड श्वेत कृष्ण । रस उलोन स्रवत पैं ॥ २७ ॥ कंटकहीन बदरी रसाळी । आंवळीवृक्ष रायआंवळी । फणस मघमघिती फळीं । मधूकवृक्षातळीं[३] फळशोभा ॥ २८ ॥ पिचुमंद[४] सुशीतल । सकळ व्याधि निरसी सबळ । गुग्गुळ-वृक्ष सोवन[५] सरळ । वट पिंपळ पलाश ॥ २९ ॥ निंबोणी नारिंगी पोफळी । रायनिंबोणीच्या हारी विशाळी । कपित्थवनाचीं[६] नवाळी । वर्तुळफळीं परिपक्क ॥ ३० ॥ कोरांटे जैंवी कां कोविदार[७] । वृक्षवटाहूनि थोर । श्वेतपीतपुष्पीं सुंदर । आणि बीजपूर मातुलुंगें[८] ॥ ३१ ॥ सुरभिवृक्ष[९] देवदार । [१०]भल्लातकीवृक्षविस्तार । इंगुदीवृक्ष[११] अपार । फळसंभार बहुपुष्पी ॥ ३२ ॥ ऐसिया वृक्षांचिया जाती । असंख्यात नेणों किती । तेणें शोभा पर्वतीं । ऋषी वसती मुनि सिद्ध ॥ ३३ ॥

तस्मिन्सरः सुविपुल लसत्कांचनपंकजम् ।
कुमुदोत्पलकल्हारशतपत्रश्रियार्जितम् ॥ ९ ॥

१ फुलांमध्यें. २ आंब्यांची राई. ३ मोहाच्या झाडाखालीं. ४ निंबाचे वृक्ष. ५ नीट. ६ कवठीच्या झाडांची. ७ कांचनवृक्ष. ८ महाळुगें. ९ सुगंधदायक. १० बिब्याचें झाड. ११ हिंगणबेटीचीं झाडें.

* बक–सारूप्य.

मत्तषट्पदनिर्घुष्टं शकुन्तैश्च कलस्वनैः ।
हंसकारण्डवाकीर्णं चक्राह्वैः सारसैरपि ॥ १० ॥
मत्स्यकच्छपसंचारचलत्पद्मरजः पयः ।
मल्लिकाशतपत्रैश्च माधवीजालकादिभिः ॥ ११ ॥
शोभितं तीरजैश्चान्यैः सर्वर्तुभिरलंकृतैः ॥ १२ ॥

त्या गिरिकंदराचे ठायीं । एक अगाध सरोवर पाहीं । तेथींच्या जळा मर्यादा नाहीं । पूर्णत्व ठायीं परिपूर्ण ॥ ३४ ॥ न्यूनपूर्णता जळीं । असेनाचि कोणे काळीं । रातोत्पळीं[१] सीतोत्पळीं[२] । हेमकमळीं शोभत ॥ ३५ ॥ कुमुदें कल्हारें नीलोत्पळें । मल्लिका शतपत्रें कुड्मळें[३] । जळचांचल्यें चलत्कमळें । ¶जळ परिमळें स्वादिष्ट ॥ ३६ ॥ समस्त ऋतु एकाकाळें । सुपुष्पित सदा फळें । सरोवरींचेनि जळें । क्रीडती सकळें जळचरें ॥ ३७ ॥

त्या सरोवरात एक महान् नक्र होता; तसाच त्या वनात मोठा गज होता—सरोवरीं जळचर । मत्स्य कच्छ पर्वताकार । त्यांसी ग्रासी ऐसा नक्र[४] । थोरां थोर गजग्रहो ॥ ३८ ॥ तेचि वनीं वसे गजेंद्र । तेची सरोवरीं वसे नक्र । दोघांसही पूर्व वैर । अति दुर्धर ब्रह्मशापें ॥ ३९ ॥

ते दोघेही ब्रह्मशापानें त्या योनींत गेले. इंद्रद्युम्न राजा गजेंद्र व हुहु गंधर्व नक्र—एवढी ब्रह्मशापाची थोरी । यांसी घडली कैशा परी । तेही कथीन निजनिर्धारीं । पूर्वानुस्मरीं अवधारा ॥ ४० ॥ पूर्वी इंद्रद्युम्न राजेंद्र । ब्रह्मशापें जाहला गजेंद्र । हूहू गंधर्व अति दुर्धर । तो झाला नक्र[५] ब्रह्मशापें[६] ॥ ४१ ॥

पौंड्र देशचा राजा इंद्रद्युम्न ध्यानस्थ असतां अगस्ती मुनींच्या अनादरामुळें गज झाला—पौंड्रदेशीं[७] राजा इंद्रद्युम्न । भगवद्भक्तिपरायण । तो या सरोवरा घेऊन । एकांत देखोन राहिला ॥ ४२ ॥ एकांत आणि विश्रांती । राव सुखावला चित्तीं । तेथें राहोनि नेमस्तीं । व्रत चालवी तपश्चर्या ॥ ४३ ॥

स एकदाराधनकाल आत्मवान्
गृहीतमौनव्रत ईश्वरं हरिम् ।
जटाधरस्तापस आप्लुतोऽच्युतं
समर्चयामास कुलाचलाश्रमः ॥ १३ ॥
यदृच्छया तत्र महायशा मुनिः
समागमच्छिष्यगणैः परिश्रितः ।
तं वीक्ष्य तूष्णीमकृतार्पणादिकं
रहस्युदासीनमृषिश्चुकोप ह ॥ १४ ॥
तस्मा इमं शापमदादसाधु-
रयं दुरात्मा कृतबुद्धिरद्य ।
विप्रावमन्ता विशतां तमिस्रं
यथा गजः स्तब्धमतिः स एव ॥ १५ ॥
एवं शप्त्वा गतोऽगस्त्यो भगवान्नृपसानुगः ।
इन्द्रद्युम्नोऽपि राजर्षिर्दिष्टं तदुपधारयन् ॥ १६ ॥
आपन्नः कौञ्जरीं योनिमात्मस्मृतिविनाशिनीम् ॥ १७ ॥

तोचि राजा इंद्रद्युम्न । त्रिकाळ करितां संध्यास्नान । केश वळिले जटाग्रंथन । तपस्वी पूर्ण तापसत्वें ॥ ४४ ॥ तो एके काळीं इंद्रद्युम्न । आराधनकाळ लक्षून । ते सरोवरोदकीं करोनि स्नान । घालोनि आसन बैसला ॥ ४५ ॥ तेचि काळीं अगस्तिमुनी । आला शिष्येंसीं[१] परिवारुनी[१] । रायें अभ्युत्थान[२] न करोनी । बैसला आसनीं ध्यानस्थ ॥ ४६ ॥ ऋषि येतां देखोनी । रायें सांडिला[३] उपेक्षोनी । नाहीं नमन ना अभ्युत्थानीं । बैसला ध्यानीं ध्यानस्थ ॥ ४७ ॥

गर्वाचे प्रकार व त्यांचे परिणाम—साधु सर्वांगी चैतन्यघन[४] । त्यासी न भजतां धरी ध्यान ।

१ तांबड्या कमलांनी. २ पांढऱ्या कमलांनीं. ३ कळ्या. ४ मगर. ५ सुसर. ६ ब्राह्मणशापानें. ७ पौंड्रनामक देशात.

¶ व—जळा परिमळ.

१ शिष्यांनीं वेष्टित, शिष्यमंडळी बरोबर घेऊन. २ उठून आदरसत्कार. ३ दुर्लक्ष करून. ४ ज्ञानसंपन्न.

तें ध्यान नव्हे परम विघ्न । अधःपतन[1] ध्यानगर्वें ॥ ४८ ॥ ध्यानगर्व ज्याचे ठायीं । ज्ञानगर्वें जो उताणा[2] पाहीं । विद्यागर्वी मुसमुसी देहीं । तो नर पाही अधःपाती ॥ ४९ ॥ साधु सच्चिदानंद-व्यक्ती । ध्यानीं काल्पनिक* मूर्ती । साधुउपेक्षा ध्यानाप्रती । तें अधःपाती ध्यानगर्वें ॥ ५० ॥ उपेक्षोनि साधुसज्जन । जो साक्षेपें[3] आदरी ध्यान । ध्यान नव्हे ते नागवण[4] । आपणा आपण [5]नाडिलें ॥ ५१ ॥ ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मभाव । मूर्तीं नाहीं भगवद्भाव । त्याचें ध्यानचित्त वाव[6] । आला अपाव[7] ध्यानगर्वें ॥ ५२ ॥

साधूच्या उपक्षेचे परिणाम—ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मत्व-भक्ती । ना भगवद्भाव सर्वांभूतीं । रायाची खोटी ध्यानस्थिती । तेणें अगस्ति कोपला ॥ ५३ ॥ राजा सावधान भगवद्ध्यानीं । परी उपेक्षा साधु-सज्जनीं । परम विघ्न ध्यानस्थानीं । देखोनि मुनि कोपला ॥ ५४ ॥ रायाचा झडे ध्यानाभिमान । भगवत्प्राप्ति पावे पूर्ण । ऐसी कृपा अनुलक्षून । शापवचन देतसे¶ ॥ ५५ ॥ परम कृपाळू अगस्ती । शाप वदला कृपामूर्ती । साधुसज्जनीं गर्वोन्मत्ती । गजत्वप्राप्ती पावसी ॥ ५६ ॥ साधुसज्जनीं गर्वोन्मत्त । तो तूं होसी गज उन्मत्त । ऐसें अगस्ति जंव वदत । गजत्व प्राप्त रायासी ॥ ५७ ॥ ब्राह्मणाचिया अभक्ती । साधुसज्जनीं ध्यानोन्मत्ती । रायासी गजत्वाची प्राप्ती । मुनि अगस्तीचेनि शापें ॥ ५८ ॥ ब्राह्मणशाप अति दुर्धर । तेचि वनीं तो राजेंद्र । जाला उन्मत्त गजेंद्र । बळोद्धार महाबळी ॥ ५९ ॥

१ नरकवास. २ गर्विष्ठ. ३ प्रयत्नपूर्वक. ४ हानि. ५ फसविलें. ६ व्यर्थ. ७ हानि, खराबी.

* ड—विकल्पनिक. मक—ध्यानींची कल्पनिक.

¶ हश—दे मुनी.

हूहू गंधर्व सरोवरात क्रीडत असता ऋषीच्या पायांत झोंबल्यामुळें तो नक्र झाला— ऐसी इंद्रद्युम्नाची गती । हूहू गंधर्व याचि रीतीं । ब्रह्मशापाचेनि प्राप्ती । नक्रत्वस्थिती पावला ॥ ६० ॥ तेचि सरोवरीं माध्यान्हकाळीं । देवऋषि करितां आंघोळी । हूहू गंधर्व तेचि काळीं । करी जळकेळी स्त्रियांयुक्त ॥ ६१ ॥ देवऋषि जळां आंत । उभा सूर्यसूक्त जपत । हूहू गंधर्व जळीं गुप्त । येवोनि धरी ऋषिपाय ॥ ६२ ॥ ग्रह[1] जैसा उदकीं । येवोनि झोंबे एकाएकीं । तैसाचि गंधर्व अविवेकी । झोंबला तवकीं[2] ऋषिपायीं ॥ ६३ ॥ पायीं झोंबतां सत्वर । कोपोनि शापी ऋषीश्वर । गुप्तरूपें जळचर । होसी नक्र गजग्राहो ॥ ६४ ॥

दोघेहि ऋषींस शरण गेल्यावर त्याना उःशाप मिळाला कीं त्यांचें द्वंद्वयुद्ध जुपल्यावर भगवंताच्या कृपेनें उद्धार होईल—ब्रह्मशाप ऐकोनि कानीं । गंधर्व इंद्रद्युम्न दोनी । उच्छाप मागावया लागूनी । कर जोडुनी विनविती ॥ ६५ ॥ आमुचे आम्ही गर्वोन्मत्त । ब्रह्मशाप जाला प्राप्त । तुम्ही दोघे कृपावंत । शापन्मुक्त करावें ॥ ६६ ॥ आम्ही दोघे अति अपराधी । तुम्ही दोघे कृपानिधी । तुम्ही [3]अक्षोभ अगाधबुद्धी । आम्हां [4]निशुद्धी उद्धरावें ॥ ६७ ॥ तुम्ही मायबापाहूनि आप्त । आम्ही अपराधी अत्यंत । दोघे कृपाळू जी समर्थ । शापोन्मुक्त करावें ॥ ६८ ॥ ऐसें ऐकतां प्रार्थन । कृपेनें द्रवले दोघे जण । वदते जाले उच्छापवचन । सावधान अवधारा ॥ ६९ ॥ एक जळीं एक स्थळीं । वैरी व्हाल आतुर्बळी । युद्ध करितां जलकल्लोळीं । तुम्हां वनमाळी पावेल ॥ ७० ॥ युद्ध करितां अत्यंत । जेव्हां मांडेल प्राणांत । तेव्हां पावोनि भगवंत । नित्य निर्मुक्त करील ॥ ७१ ॥ शापोन्मुक्त

१ सुसर. २ आवेशानें. ३ क्षोभ (क्रोध) न पावणारे. ४ खरेपणानें.

जन्मोन्मुक्त। हरि करील [1]भवनिर्मुक्त। ऐसें वदले वरदोक्त। ऋषि समर्थ कृपाळु ॥ ७२ ॥ ब्राह्मण शापिती क्षोभोन। हें समूळ मिथ्या वचन। ऋषी कृपाळु दीनोद्धरण। वरद वदोन उद्धरिले ॥ ७३ ॥ उद्धरावयाची नवलपरी। काढिले जन्ममरणाबाहेरी। एवढी कृपेची थोरी। कोपामाझारी ऋषींच्या ॥ ७४ ॥ जैसा मातेचा निजकोप। वरी कठिण आंत सुखरूप। तैसाचि ब्राह्मणांचा शाप। शापें चिद्रूप पावती ॥ ७५ ॥ ब्राह्मणांचे कोपें निवृती[2]। पाप निर्दळोन ब्रह्मप्राप्ती। संतोषलिया काय देती। श्रुतिस्मृति अगम्य ॥ ७६ ॥

त्यामुळें गजेंद्र सरोवरात कधींही गेला नाहीं—ऐसी वरदोक्ति वदोन। ऋषी गेले करोनि स्नान। गजेंद्र नक्र दोघे जण। जाले आपण ऋषिशापें ॥ ७७ ॥ राजा गजेंद्र वनस्थळीं। गंधर्व नक्र जाला जळीं। दोघे जण आतुर्बळी। जळीं स्थळीं विचरत ॥७८॥ जळीं नक्र महाबळी। तिमिंगिलातें[3] सगळे गिळी। जळचरें कांपती जळीं। जलकल्लोळीं विचरतां ॥ ७९ ॥ ल्हानसान नाणी दृष्टी। पर्वतप्राय मत्स्य घोंटी। ऐसा नक्र जगजेठी। सुखसंतुष्टीं राहिला ॥ ८० ॥ शापें स्मृति गेली समस्त तरी माझा वैरी उदकांत। ऐसें गजेंद्र नित्य स्मरत। न ये उदकार्थ सरोवरा ॥ ८१ ॥ गजेंद्र जो कां माझा वैरी। वसतो याचि वनांतरीं हे आठवण नित्य नक्रीं। न ये बाहेरी आहारार्थ ॥ ८२ ॥ नक्र जळीं महाबळी। गजेंद्र वनीं बळिया बळी। दोघे जण शापसमेळीं। जळीं स्थळीं विचरत ॥ ८३ ॥

तत्रैकदा तद्गिरिकाननाश्रयः
करेणुभिर्वारणयूथपश्चरन्।
सकण्टकान्कीचकवेणुवेत्र-
विशालगुल्मान्प्ररुजन्वनस्पतीन् ॥ १८ ॥
यद्गन्धमात्राद्धरयो गजेन्द्रा
व्याघ्रादयो व्यालमृगाश्च खड्गाः।
महोरगाश्चापि भयाद्द्रवन्ति
सगौरकृष्णाः शरभाश्चमर्यः ॥ १९ ॥
वृका वराहा महिषर्क्षशल्या
गोपुच्छशालावृकमर्कटाश्च।
अन्ये च क्षुद्रा हरिणा शशादय-
श्चरन्त्यभीता यदनुग्रहेण ॥ २० ॥

जो गजेंद्र ते गिरिकंदरीं। गजीगजशावसह परिवारीं। क्रीडा करी वनांतरीं। वनविहारीं उन्मत्त ॥ ८४ ॥

उन्हाळ्यात कळपासह विहार करीत असतां तृषार्त होऊन सरोवरांत आला—चैत्रमासींच्या वनशाखी। तयानें* सेवितां एकाएकीं। मद चालिला पैं तवकीं। अति उद्रेकीं[1] उन्माद[2] ॥ ८५ ॥ तेणें उन्मादें आपण। मांडिलें वनविहरण। वेळु जाळिया उपडून। वेत्रवन[3] विध्वंसी ॥ ८६ ॥ गुल्मलता थोर थोर। गगनचुंबी तरुवर। कांटेसांवरी अपार। उन्मूळी समग्र दंताग्रें ॥ ८७ ॥ हाणितां दांतांची पैं झडें[4]। पाडी पर्वतांचे कडे। त्याचे मदगंधापुढें। पळती रोकडे वनसिंह ॥ ८८ ॥ गजेंद्रमदाचे अवघ्राणें[5]। दिग्गज कांपती संपूर्ण। शरभ[6] शार्दूल[7] पलायमान। सांडिती प्राण व्याघ्रसिंह ॥ ८९ ॥ आस्वल वराह[8] महिष वृक[9]। गौरवानर खड्ग जंबुक[10]। गोचमरी शाळ शशक। मृगादिक भयें पळती ॥ ९० ॥ पळत्या पशूंसी नामीकार[11]। देवोनि राखी त्यांसी गजेंद्र। †घेती उदक साचार। दर्प दुर्धर साहवेना ॥ ९१ ॥

---

१ अतिरेकानें. २ मस्ती. ३ वेतांचें रान. ४ झपाटे. ५ वास घेणें. ६ सिंहाला मारणारा एक पशु. ७ वाघ. ८ डुकर. ९ लांडगे. १० कोल्हे. ससे. ११ अभय.

* ब—तयातें. † ब—तें उदक घे साचार, क—न घेती उदक घोर.

---

१ संसारापासून सोडवणूक झालेलें. २ सुख. ३ एक प्रकारचा मोठा मासा.

स घर्मतप्तः करिभिः करेणुभि
वृतो मदच्युत्कलभैरनुद्रुतः ।
गिरिं गरिम्णा परितः प्रकंपयन्
निषेव्यमाणोऽलिकुलैर्मदाशनैः ॥ २१ ॥

पर्वतीं चालतां गजेंद्र बळी । पर्वत दडपीत पाताळीं । सर्प चेपती फणामंडळीं । पन्नगकुळीं[१] आक्रांत ॥ ९२ ॥ गजेंद्र उन्मादमदमेळीं । करितां वनाची खंदळी[२] । चैत्रींचा रवि मध्यान्हकाळीं । कुंभस्थळीं पोळत ॥ ९३ ॥ गजी गजशाव[३] समस्त । उष्णें जालीं अति संतप्त । अवघीं जालीं तृषार्त । उदकार्थ तळमळती ॥ ९४ ॥ करोनि पचयोजनें गमन । नित्य करिती गंडकीउदकपान । परी सरोवराचें जीवन । नक्रभेण स्पर्शेना ॥ ९५ ॥ गंडकी न ठाके उष्णसमेळीं । किरणीं पोळत कुंभस्थळीं । आला सरोवराजवळीं । भयसमेळीं तृषार्त ॥ ९६ ॥ सोंड घालितां सरोवरीं । गजेंद्र धाकत जिव्हारीं । झणीं[४] मज झोंबेल वैरी । भय भारी जळपानीं ॥ ९७ ॥ सोंड घालितांचि जळीं । गजमदगंध सेवावया अळी[५]‡ । रुंजी करिती गंडस्थळीं । भ्रमरावळी रुणझुणती ॥ ९८ ॥ गजी गजशावयां-संयुक्त । तृषें पीडिलीं जळार्थ । गजेंद्रेंसीं समवेत । आलीं धांवत सरोवरा ॥ ९९ ॥

सरोनिल पंकजरेणुरूषित
जिघ्रन्विदूरान्मदविह्वलेक्षणः ।
वृतः स्वयूथेन तृषार्दितेन त-
त्सरोवराभ्याशमथागमत् द्रुतम् ॥ २२ ॥
विगाह्य तस्मिन्नमृताम्बु निर्मलं
हेमारविंदोत्पलरेणुवासितम् ।
पपौ निकामं निजपुष्करोद्धृतम्
आत्मानमद्भिः स्नपयन्गतक्लमः ॥ २३ ॥

स्वपुष्करेणोद्धृतशीकरो†ऽम्बुभि-
र्निपाययन्संस्नपयन्यथा गृही ।
घृणी करेणूः कलभांश्च दुर्मदो
नाचष्ट कृच्छ्रं कृपणोऽजमायया ॥ २४ ॥

ते तडाग[१] अति पुष्कळ । माजी निर्मळ जळ सुनीळ । कमळगंध सुपरिमळ । अति शीतळ शीकरांबु[२]† ॥ १०० ॥ गज राहोनि जळाबाहेरी । सोंड घालोनि सरोवरीं । जळ प्राशिलें स्वइच्छेवरी । मस्तकावरी शिंपिलें ॥ १ ॥ जळप्राशनें गजपती । जाली सकळ श्रमा शांती । जळशिंपणें जाली विश्रांती । चढला पुढती गजमद ॥ २ ॥ रिघोनि सरोवरजळीं । उन्मादें मांडिली जळकेळी । कमळां करित खंदळी[३] । जलकल्लोळीं क्रीडत ॥ ३ ॥ गजी गजशाव[४] उदकाप्रती । रिघावया अवघीं भीती । शुंडादंडें गजपती । जळ पाजीत सर्वांसी ॥ ४ ॥ पहिलें पाजिलें प्रियभार्येसी । भार्या पाजी प्रिय-पुत्रासी । मग पाजीत इतरांसी । जेंवी कुटुंबासी गृहस्थ ॥ ५ ॥ विसरोनियां निजमरण । गृहस्था कुटुंबपोषण । तैसा गजेंद्र आपण । नक्रग्रहण विसरला ॥ ६ ॥ प्राणी विसरे निजमरणासी । काळ टपतसे तयासी । तेंवी नक्र गजेंद्रासी । जळसहवासीं टपतसे ॥ ७ ॥ जेंवी काळ पाहोनि अंत । मग प्राण्याचा करी घात । तेंवी गजेंद्र सरोवराआंत । नक्र धरित साटोपें ॥ ८ ॥ मायें केला विपरीतार्थ । विसरोनियां अपघात । स्त्रीपुत्रा अति मोहित । केला भ्रांत मोहममतें ॥ ९ ॥

तं तत्र कश्चिन्नृप दैवचोदितो
ग्राहो बलीयांश्चरणे रुषाऽग्रहीत् ।
यदृच्छयैवं व्यसनं गतो गजो
यथाबलं सोऽतिबलो विचक्रमे ॥ २५ ॥

---

१ सर्पकुलांमध्यें. २ नाश. ३ हत्तीचे छावे. ४ कदाचित्. ५ भ्रमर, भुंगे.

‡ ब्रक—आळी.

१ सरोवर. २ जलतुषार. ३ नाश. ४ हत्तीचे छावे.

† ब—सीकराम्बुभि.

तयातुरं यूथपतिं करेणवो
विकृष्यमाण तरसा बलीयसा ।
विचुकुशुर्दीनधियोऽपरे गजाः
पार्ष्णिग्रहास्तारयितुं न चाशकन् ॥ २६ ॥
नियुद्ध्यतोरेवमिभेंद्रनक्रयो-
र्विकर्षतोरंतरतो बहिर्मिथः ।
समाः सहस्रं व्यगमन्महीपते
सप्राणयोश्चित्रममंसतामराः ॥ २७ ॥

सोंडेनें उदक घेत असता नक्रानें सोंड भेदिली–अंगीं¶ देहलोभाचा मद*। दुसरा बळाचा उन्माद। तिसरा गजमदाचा मद। जाला मदांध† गजेंद्र ॥ ११० ॥ जन्ममरणाचा महाबाध। ज्या नाठवे तो मोहांध। न देखे नरकपातबाध[1]। तो मदांध महामूढ ॥ ११ ॥ त्रिविध मोहमदें मोहित। बुद्धिअधत्वें गजेंद्र भ्रांत। विसरोनियां नक्रघात। जळीं क्रीडत स्त्रीलोभें ॥ १२ ॥ ऐसें क्रीडतां जळस्थानीं। नक्रें धांवोनि धरिला चरणीं। गजें निजबळें ओढोनी। बाहेर आणूनी मारूं पाहे ॥ १३ ॥ तंव तो नक्र महाबळी। हवका[2] हाणोनि नेला जळीं। गजें युद्ध केलें ते काळीं। सोंडें कवळी[3] नक्रातें ॥ १४ ॥ सोंड हाणितां तवकें[4] शिरीं। सोंड आदळे जळावरी। नक्र निश्चळ जळाभीतरीं। भय न धरी सोंडेचें ॥१५॥ सोंड बुडवितां जळसंपुटीं। नक्रें खुडिली सोंड आनकुटीं[5]। तेणें गज जाला कष्टी। ‡मगरमिठी सुटेना ॥ १६ ॥ नक्र जाणे गजवर्मस्थ। सोंडेची अणी§ टपोनि खुडित। अमित प्रवाहें पैं रक्त। गज किरकिरित अति दुःखें ॥ १७ ॥

व दोघांची ओढाओढी चालू झाली–गजें ओढितां भूतळीं। नक्र निजबळें ओढी जळीं। सहस्र वर्षें रणखंदळी। जळकल्लोळीं भिडले ॥ १८ ॥ सहस्र वर्षें करितां रण। दोघे सबळ सप्राण। तें देखोनि अमरगण। आश्चर्य पूर्ण करिताती ॥१९॥ नक्रासी जळीं जळाहार। गजा पडिले निराहार। भूतळा नाणवेचि नक्र। शक्ति समग्र क्षीण झाली ॥१२०॥ खंडितां सोंडेच्या अणीसी। गजेंद्र जाला कासाविसी। मग बोभाय स्त्रीपुत्रांसी। ओढोनि पुच्छेंसी मज काढा ॥ २१ ॥ पुच्छीं लागोनि समग्र। बळें ओढिती स्त्रीपुत्र। तिळभरी ढळेना तो नक्र। केलें विचित्र तें ऐका ॥ २२ ॥ समस्तीं ओढितां पुच्छासी। न सोडवे गजेंद्रासी। शेखीं[1] न ओढवेचि नक्रासी। अति बळेंसीं कष्टतां ॥ २३ ॥ नक्रें आसुडितां[2] तेथ। गजीगजशावसमवेत। गजेंद्र नेला सरोवरांत। भयभीत जळमग्न ॥ २४ ॥ नक्रभयें भयभीत। जळमग्न निर्भुजत[3]¶। गजेंद्रा सांडोनियां समस्त। आले पळत तीरासीं ॥ २५ ॥ स्त्रिया म्हणती भाग्य थोर। संकटीं वांचले कुमर। नक्रें गिळिला गजेंद्र। अक्षत[4] पुत्र कडे आले ॥ २६ ॥ माता पुत्रांसी कृपादृष्टी। बुद्धि सांगती गोमटी। सोडा गजेंद्राच्या गोष्टी। जळसंकटीं न रिघवे ॥२७॥ आयुष्य व्हावें निजपुत्रांसी। उदक पाजोनि समस्तांसी। संकटीं सांडोनि भ्रतारासी। घेवोनि पुत्रांसी वना गेल्या ॥ २८ ॥

ततो गजेंद्रस्य मनोबलौजसा
कालेन दीर्घेण महानभूद्व्ययः ।
विकृष्यमाणस्य जलेऽवसीदतो
विपर्ययोऽभूत्सकलं जलौकसः ॥ २८ ॥
इत्थं गजेंद्रः स यदाप संकटं
प्राणस्य देही विवशो यदृच्छया ।
अपारयन्नात्मविमोक्षणे चिरं
दध्याविमां बुद्धिमथाभ्यपद्यत ॥ २९ ॥

१ नरकांत पडण्याचें भय. २ तडाका. ३ धरी. ४ आवेशानें. ५ अग्रभागीं.

¶ अ–आंगीं. * ब–मद, क्ष–मद भ्रम. † ड–बुध्यध. ‡ अक्ष–मकर. § बक–आणि.

१ शेवटीं. २ ओढता. ३ कंटाळत. ४ इजा झाल्यावांचून.

¶ क्ष–निर्भुजित.

न मामिमे ज्ञातय आतुरं गजाः
कुतः करिण्यः प्रभवंति मोक्षितुम् ।
ग्राहेण पाशेन विधातुरावृतोऽ-
प्यहं च तं यामि परं परायणम् ॥ ३० ॥

याप्रमाणें हजार वर्षे युद्ध चालल्यावर गजेंद्र क्षीण झाला व त्यानें प्रभूचा धांवा केला—सहस्र वर्षे पुरुषार्थी। युद्ध करितां नक्राप्रती। निराहारीं युद्धावर्ती। क्षीणशक्ती गजेंद्र ॥ २९ ॥ क्षीण शरीर-बळशक्ती। *मनःशक्ती प्राणशक्ती। क्षीण इंद्रियें इंद्रियशक्ती। मंदगति गजेंद्र ॥ १३० ॥ ऐसा गजेंद्र क्षीणशक्ती। येतां स्त्रीपुत्रां काकुलती। सांडोनि गेलीं पतिप्राणांतीं। कोणी अंतीं न येती कामा ॥ ३१ ॥ गजेंद्र पाहे ममता धरोनी। अंतीं सांडिलें सुहृज्जनीं। ज्येष्ठ कनिष्ठ असंख्य पत्नी। अंतीं त्यागोनी मज गेल्या ॥३२॥ मजसमान बळ दुर्धर। शतानुशत माझे कुमर। अंतीं विमुख[१] समग्र। पुत्र कलत्र[२] न ये कामा ॥ ३३ ॥ सुहृद[३] आणि पुत्र प्रौढ। तिहीं सांडिली माझी चाड[४]। हस्तिणीचा कोण पाड। अति अवघड प्राणांत ॥ ३४ ॥ सोडवावया नक्राप्रती। गजें वेंचिली[५] निजशक्ती। पुत्र कलत्र सुहृद्ज्ञाती। अंतीं न येती उपयोगा ॥ ३५ ॥ सार्थक करावया अंतकाळ। एक भगवंत कृपाळ। नामें मोक्षाचा सुकाळ। कळिकाळ आंकणा[६] ॥ ३६ ॥ ज्याचें आदरें करितां स्मरण। निःशेष निमे जन्ममरण। त्याचे चरणां रिघोनि शरण। भवबंधन छेदावें ॥ ३७ ॥ जीव-शिवांहूनि पर। वहूं वाचां† परात्पर। गुणागुणीं अनिवार। त्यासी साचार[७] शरणार्थी ॥ ३८ ॥ श्रीहरीसी जालिया शरणागत। देहीं असोनि देहातीत। कळिकाळाचे पाडोनी दांत। फाडीन खत विषयांचें ॥ ३९ ॥ गर्जतां रामनामप्रवाहें। कर्मबंधन समूळ वहे। यम अंतक पायां पडे। नक्र बापुडें तें काय ॥ १४० ॥ ऐसी मज जे आठवण। हे श्रीहरीची कृपा पूर्ण। हरीचे अनु-ग्रहाविण। नामस्मरण नाठवे ॥ ४१ ॥

एवं व्यवसितो बुद्धया समाधाय मनो हृदि ।
जजाप परमं जाप्यं प्राग्जन्मन्यनुशिक्षितम् ॥३१॥

करावें श्रीहरीचें स्मरण। ऐसी युक्ति विवंचून[१]। मनबुद्धीं हृदयीं समाधान। देवोनि आपण स्वस्थ जाला ॥ ४२ ॥ नक्रें केला जो का व्यग्र[२]। ते व्यग्रता निरसावया समग्र। धैर्यधारणा धरोनि अव्यग्र[३]। जपे परात्पर तें ऐका ॥ ४३ ॥ धैर्य नाहीं जयांपासीं। ते जन्ममरणाचे आंदणी[४] दासी। †पूर्वभजनसंस्कारेंसीं। धैर्य गजासी हरिस्मरणीं ॥४४॥ पूर्वभजनपरिपाटीं। हरिस्मरणीं धृष्टिपुष्टी। मंत्र जपावया वाक्पुटीं। उल्हास पोटीं गजेंद्रा ॥४५॥ एका जनार्दना शरण। गजेंद्रमुखींचें श्रवण। अनुतापें पशु पावन। त्याचें ज्ञान अवधारा॥१४६॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां गजेंद्रोपाख्यानं नाम एकविंशतितमोऽध्यायः ॥२१॥ ॥ ओंव्या ॥ १४६ ॥ ॥ श्लोक ॥ ३१ ॥ ॥ एवं ॥ ॥ १७७॥ ॥

---

## अध्याय २२ वा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

गजेंद्र उवाच —

ॐ नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ।
पुरुषायादिबीजाय परेशायाभिधीमहि ॥ १ ॥

---

१ पाठमोरे. २ स्त्री. ३ सबंधी, मित्र. ४ गरज, जरूर. ५ खर्ची घातली. ६ अंकित, स्वाधीन. ७ खरेपणानें.

* ब—मनो. † बक—वाचे.

१ योजून. २ चिंतातुर. ३ चिंतारहित होऊन. ४ सुलभ, स्वाधीन.

† बक—पूर्ण.

यस्मिन्निद यतश्चेद येनेदं य इद स्वयम् ।
योऽस्मात्परस्माच्च परस्तं प्रपद्ये स्वयंभुवम् ॥२॥
तस्मै नम परेशाय ब्रह्मणेऽनन्तशक्तये ।
अरूपायोरुरूपाय नम आश्चर्यकर्मणे ॥ ३ ॥

हृदयीं अंतरात्मा सर्वज्ञ । त्याचेनि बुद्धींद्रियें सज्ञान । तेणें काया वाचा मनें नमन । अनन्य शरण गजेंद्र ॥ १ ॥ भगवंतासी अनन्य शरण । होता पालटे देहचिन्ह । इंद्रियांचें विपरीतज्ञान । तेंहि लक्षण अवधारा ॥ २ ॥ अनन्यत्वीं[1] मन उन्मन । चित्त होय चैतन्यघन । बुद्धि होय समाधान । अहंता संपूर्ण सोहंत्वीं विरे ॥ ३ ॥ तेव्हां भूतें होती चिदाकार[2] । विषय होती तन्मात्र । अनन्यशरणत्वाचें सूत्र । संसारचरित्र परब्रह्म ॥ ४ ॥ होआवया अनन्य शरण । पाहिजे भाग्य सत्वसंपन्न । तेणें भाग्यें गजेंद्र गहन । करितो नमन भगवंता ॥ ५ ॥ ओंकार ब्रह्मरूप पूर्ण । त्यासी प्रकाशी चैतन्यघन । त्या भगवंतासी नमन । काया वाचा मनें अनन्यत्वें ॥ ६ ॥ ओमित्येकाक्षरं ब्रह्म । हें भगवद्गीतेचें निजवर्म । स्वयें बोलिला पुरुषोत्तम । ॐकारब्रह्मवेदबीजत्वें ॥७॥ ॐकारबीज† सनातन । स्वरवर्ण उच्चार ब्रह्मपूर्ण । भूतभौतिकें चैतन्यघन । त्या भगवंता नमन अनन्यत्वें ॥ ८ ॥ जो या सर्वां आदिकारण । स्वयें अकारण आपण । त्या श्रीपुरुषोत्तमासी नमन । अनन्यशरण अनन्यत्वें ॥ ९ ॥ ब्रह्मा विष्णु आणि महेश । हेहि ज्याचे अंशांश*। ऐसा परेशाचा जो ईश । नमन माझें त्यास अनन्यत्वें ॥ १० ॥ त्याचें करूं जातां ध्यान । ध्येय ध्याता होय शून्य ध्यानेंचि होय चैतन्यघन त्यासी माझें नमन अनन्यत्वें ॥ ११ ॥ हें सर्व भासे ज्याचे ठायीं । ज्याचेनि सर्व प्रकाशले पाहीं । जो सर्वां कोंदला ठायींच्या ठायीं§। जो कीं सर्वही आपण ॥१२

१ एकनिष्ठेत. २ परब्रह्मरूप.

† ब-ब्रह्म. * बक-अशाअंश. § बक-ठाई.

जेंवी गुळाचें कारलें केलें । देंठकांठियेंनसीं गोडिये आलें । तेंवी हें सर्वही संचलें । असे ओतलें चिद्रूपत्वें[1] ॥१३॥ नावदेचे[2] नारळ गोमटे । कवटी कादितां ते करंटे । तेवीं चैतन्येंचि नेटेंपाटें[3]। भासे समसकटे सर्वरूप ॥ १४ ॥ तेथें जो देखे दोषगुण । तोचि नरकासी जाय आपण । मुनीचेनि शापें जाण । निजात्मखूण पावलों ॥ १५ ॥ जो कां मीतूंपणापरता । अनन्यशरण त्या भगवंता । ज्यासी नाहीं जन्मकथा । मरणवार्ता तो नेणे ॥ १६ ॥

न विद्यते यस्य च जन्म कर्म वा
न नामरूपे गुणदोष एव वा ।
तथापि लोकाप्ययसंभवाय यः
स्वमायया तान्यनुकालमृच्छति ॥ ४ ॥

ज्यासी नाहीं जन्मकर्म त्यासी कैंचें रूपनाम । देहाविणें गुणदोषकर्म । धर्माधर्म असेना ॥ १७ ॥ ऐसा जो का भगवंत । स्वलीला लोकसंग्रहार्थ । ब्रह्मा विष्णु शिव समस्त । अवतार धरीत गुणकर्में ॥ १८ ॥ उत्पत्तिकाळीं चतुरानन । तोचि स्थितिकाळीं विष्णु जाण । तोचि प्रळयीं त्रिनयन । नामाभिधान गुणधर्में ॥ १९ ॥ जोचि पेरी तोचि सोकरी[4] । तोचि संवगणीही[5] करी । तैसा एकचि श्रीहरी । गुणावतारी त्रिरूप ॥ २० ॥ नट नानावेष मांडी । संपादूनि सवेंच सांडी नटासी नाहीं घडामोडी । तैसी [6]परवडी भगवंता ॥ २१ ॥ नाना अवतार धरितां । श्रीहरीस नाहीं जन्मकथा । धरिले अवतार सांडितां । मरणवार्ता तो नेणे ॥२२॥ श्लोकार्थ——तस्मै नम परेशाय । ऐसा परेशा परेश । अनंत शक्तींचा जो ईश । जो ब्रह्मण्य[7] देव जगदीश । परम पुरुष परमात्मा ॥ २३ ॥ जो अरूपरूप परिपूर्ण । अनंत रूपें धरी आपण । त्या भगवंतासी लोटांगण । अनन्य शरण अच्युता ॥ २४ ॥

१ ब्रह्मरूपानें. २ नारळीचे. ३ निश्चयेंकरून. ४ रखी. ५ शेताची कापणी. ६ प्रकार. ७ ब्राह्मणभक्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत.
अनुक्रम 23000 वि: 9164
क्रमांक 9709 नों. दि. 12/7/91

मादृक्प्रपन्नपशुपाशविमोक्षणाय
मुक्ताय भूरिकरुणाय नमोऽलयाय ।
स्वांशेन सर्वतनुभृन्मनसि प्रतीत-
प्रत्यग्दृशे भगवते बृहते नमस्ते ॥ ५ ॥

मजसारिखे अति दीन । स्वार्थी विमुख[१] पशु-समान । तुज आलिया अनन्य शरण । पाशछेदन तूं करिसी ॥ २५ ॥ नक्रपशुपाशग्रहण । हें तुच्छ यासी मानी कोण । कर्मपाश अति दारुण । कृपा करून छेदिसी ॥ २६ ॥ शरणागतांचें पाशछेदन । स्वस्वरूपीं होती लीन । ऐसी कृपा पूर्ण करून । आपुलें मुक्तपण त्यां देशी ॥ २७ ॥ त्यांसी देसी निजात्ममुक्ती । तेहीविशीं एक युक्ती त्यांची छेदिसी समूळ भ्रांती । नित्य मुक्ति सहजेंचि ॥२८॥ ऐशिया श्रीहरि कृपावंता । माझें नमन अनन्यता । तुझेनि नमनें भगवंता दिसे आप्तता सर्वां भूतीं ॥ २९ ॥ सर्वभूतीं हृदयस्थ । अंतरात्मा तो भगवंत । द्रष्टेपणें सदोदित । असे नांदत प्रतिशरीरीं ॥ ३० ॥ भगवंताची सर्वां भूतीं । मनोन्मने नित्य प्राप्ती भगवत्कृपेची ही ख्याती । भक्त पावती अनन्यत्वें ॥ ३१ ॥ प्रत्यग्दृशा[२] हें मात । भूतां सबाह्य सदोदित । देखणेपणें भगवंत । दृश्यद्रष्टातीत कोंदला ॥ ३२ ॥ बृहद्ब्रह्म सनातन । हें भगवंताचें अभिधान[३]। त्यासी माझें अनन्य नमन । पाशबंधन छेदावया ॥ ३३ ॥ भगवंताची कृपा नव्हता । कदा न तुटे अहंममता । ते अहंममतेची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ३४ ॥

आत्मात्मजाप्तगृहवित्तजनेषु सक्तै-
र्दुष्प्रापणाय गुणसङ्गविवर्जिताय ।
मुक्तात्मभिः स्वहृदये परिभाविताय
ज्ञानात्मने भगवते नम ईश्वराय ॥ ६ ॥

मी म्हणणें हा खोडा जाण । माझी स्त्री ती खीळ कठिण । गृहसामुग्री विविध धन । पाचरा संपूर्ण सुबद्ध[१]॥ ३५॥ तेथें अपत्याची [२]आनंदगुढी । तो खोडा घातल्यावरी बेडी । कर्म लौकिक स्वजन-आवडी । ये बेडीची कडी खळखळीत ॥ ३६ ॥ खोडा खिळी त्यावरी बेडी । कृपणतेची हातकडी । हे कुटुंबधाडीची बांधवडी । त्याहीवरी¶ भरडी नित्य विषय ॥ ३७ ॥ खोडयाची खीळ ते स्त्री कठिण । त्या कठिणपणाचें विंदाण । निजमातेतें त्यागून । स्त्री आपणा आप्त होये ॥३८॥ मातृसेवा वेदविहिती। ते सोडूनिया निश्चितीं । स्त्रीकामाची आसक्ती । वश करिती पुरुषातें ॥३९॥ दरवेशियाचें वानर जैसें । पुरुषासी वश करी तैसें । नाचवी तैसें नाचे बैसे । अनारिसे न करवे ॥४०॥ जैसें पाळिलें का श्वान । तैसा होय स्त्रीअधीन । लाविल्या* लागे वसवसून । वारिल्या मौन धरोनि राहे ॥४१॥ मातृसेवा भुक्ति-मुक्ती । जे म्हणती ते माता त्यागिती । स्त्रीकामाची आसक्ती । ज्ञाते होती अति भ्रांत ॥४२॥ मातृसेवा भुक्तिमुक्ती । स्त्रीआसक्ती नरकप्राप्ती । ऐसें व्याख्यान जे करती । तेही मानिती स्त्री आप्त ॥४३॥ भ्रांती-माजी सप्त पाश। अहंदारपुत्रपाश । गृहधनस्वजनपाश। आशापाश सातवा ॥४४॥ सत्संगति नाहीं ज्यांसी। रामनाम नाठवे त्यांसी । ते गुंतले कर्मपाशीं । हृदयस्थेंसीं नव्हे भेटी ॥४५॥ सप्तपाशांचें छेदन । करावया एक सत्संग जाण । त्या सत्संगाचें महिमान । सावधान अवधारा ॥ ४६ ॥

अत्यद्भुत सच्चरित सुमंगल
गायति आनंदसमुद्रमग्नाः ॥ ७ ॥

श्रवणमननीं निश्चळ वृत्ती । निदिध्याससाक्षा-त्कारीं परम प्रीती । नाना चरित्रें श्रीहरीचीं गाती । धन्य त्रिजगतीं ते साधु ॥ ४७ ॥

---

१ पाठमोरे. २ अंतर्मुख दृष्टीनें. ३ नांव.

† क—प्रणीमक्ष.

---

१ उत्तम प्रकारें. २ आनंदसूचक पताका, ध्वज.

¶ क्ष—चणे भरडी विषयाचे. * क्ष—लागवधा लावे.

श्रीकृष्ण व श्रीरामचंद्र अवतारसाम्य व तुलना–
[१]अजन्माजन्म+ सोमवंशीं । [२]अयोनिजा* जन्म सूर्यवंशीं । एकें शोषिलें पूतनेसी । ताटिकेसी पैं एकें ॥४८॥ एकें गुरुपुत्र आणिला । एकें गुरुयाग सिद्धी नेला । एकें गोवर्धन उचलिला । एकें बांधिला शिळासेतु ॥ ४९ ॥ एकें सोडोनि मातेसी । स्वयें गेला गोकुळासी । एकें सांडोनि निजराज्यासी । वनवासी दंडकीं ॥ ५० ॥ जागें न होतां कोणासी । मथुरा नेली द्वारकेसी । रामें अयोध्या निजनगरेंसीं । वैकुंठासी स्वयें नेली ॥ ५१ ॥ एक लोणियालागीं आपण । मातेपासीं करी रुदन । एक सीताशोकें जाण । करी रुदन वनवासीं ॥ ५२ ॥ ठकोनि मारिला काळयवन । वाळी मारिला शिंतरोन[३] । शिशुपाळादिदैत्यकंदन । खरदूषण श्रीरामें ॥ ५३ ॥ कंसचाणूरनिर्दळण । मारिले रावण कुंभकर्ण। उग्रसेना राज्यस्थापन । लंकाभुवन बिभीषणा ॥ ५४ ॥ श्रीरामव्रत एकपत्नी । कृष्ण ब्रह्मचारी स्त्रिया भोगूनी । कृष्णें तारिलें गोकुळ अवनीं । जगदुद्धरणी रामनाम ॥ ५५ ॥ ऐसें करितां हरिकीर्तन । व्यास जारजपुत्र पावन । चोरटा¶ वाल्मीकाचें जाण । रामायण शिववंद्य ॥ ५६ ॥ वर्णितां† श्रीहरीची पदवी । दोघे जाले महाकवी । त्या दोघांचे‡ ग्रंथगौरवीं । मुक्ति सर्वी पाविजे ॥ ५७ ॥ अमंगळां करी मंगळ । ऐसी हरिकीर्ति निर्मळ । नाम §मंगळा मंगळ । सुमंगळ हरिकीर्ति ॥ ५८ ॥

नाममहिमा–रामनामाचे†† परिपाटीं । दोष जळती आकल्पकोटी भुक्ति मुक्ति लागे पाठीं । पावन सृष्टी रामनामेंऽ ॥ ५९ ॥ यमयातनेचे पितर । चिंतिताती निरंतर । एकादशी हरिजागर । वंशीं तत्पर होऊ कोणी ॥ ६० ॥ पुत्र अथवा भ्रातृपुत्र । दुहिता[१] अथवा दौहित्र[२] । करितां एकादशी जागर । यमप्रहार पैं चुके ॥ ६१ ॥ नामें नरकीं उद्धरती । नामें स्वर्गस्थांसी मुक्ती । ब्रह्मादिक अमरपती । जन्म वांछिती कलियुगीं ॥ ६२ ॥ कलियुगाची थोर ख्याती । नामासाठीं लाभे मुक्ती । स्त्रियादि अंत्यज उद्धरती । नामकीर्ति दादुगी ॥ ६३ ॥ नामासीं नाहीं स्नानबंधन । नामासीं नाहीं विधिविधान । आसनीं भोजनीं शयनीं जाण । नाम पावन हरीचें ॥ ६४ ॥ ¹निद्‌सुरा निजशेजेसीं । नामस्मरण जयापासीं । ब्रह्मादिक वंदिती त्यासी । चहूं मुक्तींसी माहेर ॥ ६५ ॥ नामासरसी वाजे टाळी । आशापाश होती होळी । तये कीर्तनसमेळीं । रंगीं वनमाळी डुल्लत ॥ ६६ ॥ हरिकीर्तनीं भक्तांआंत । हरिखें नाचे भगवंत । चरणरजें [३]धूळिभूषितऽ । असे डुल्लत स्वानंदें ॥ ६७ ॥

भगवद्वाक्य–नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायति तत्र तिष्ठामि नारद ॥८॥

संकीर्तनसुखाचेनि उद्भटें । मज वैकुंठीं न कंठे । रविबिंबाही आतुटे‡ । सुख न वाटे मज तैसें ॥ ६८ ॥ मुरडोनि योगियांचे मानसीं । धांवोनि जाय कीर्तनासी । तेथेंचि तिष्ठें अहर्निशीं[४] । स्वानंदेंसीं डुल्लत ॥ ६९ ॥ माझिया भक्तांचे आवडी* । हरिकीर्तनीं घालीं उडी । कीर्तनसुखाची मज गोडी । कडोविकडीं नाचत ॥ ७० ॥ भगवंतें निजगुह्यासी । सांगितलें नारदापासीं । म्हणोनि तोहि हरिकीर्तनासीं । अहर्निशीं डुल्लत ॥ ७१ ॥ नामें निर्मुक्त महादोषी । ओस वस्ती यमलोकासीं ।

१ जन्म नसूनही जन्म ( अवतार ) धारण करणारा श्रीकृष्ण. २ स्त्रीपासून जन्मणारा नसूनही. ३ फसवून.

+ क्ष–जन्मे. * क्ष– अयोनिज. ¶ वक–चोरव्याध. † वक–वाणिता. ‡ वक–दोघाचा. § वक–भगमगळा. †† कक्ष–नामाच्या. ऽ क्ष–श्रीरामें.

१ कन्या. २ नातू–मुलीचा मुलगा. ३ धूळ लागून शोभायमान झालेला. ४ रात्रदिवस.

¹ क्ष–निजसुरा, वक–घूषित, क्ष–धूसत. ‡ ह–आंतुवटे; क्ष–अतबटे, * हस–भेटी.

तीर्थी मरती उपवासीं । यमनियमेंसीं लंघने ॥७२॥ नामगजरेंचि निर्मुक्त । वही पाहे चित्रगुप्त । कोरीं पानें अवघीं तेथ । कर्मनिर्मुक्त हरिनामें ॥ ७३ ॥ रामनामाची प्रभा गाढी । वहीची पानें खोडी ना मोडी । अवघी वहीच उघडी । केली रोकडी हरिनामें ॥ ७४ ॥ ऐसें करितां कीर्तन । श्रोते वक्ते दोघे जण । होती आनंदीं निमग्न । आनंदघन श्रीरामनामें ॥ ७५ ॥

> यस्य ब्रह्मादयो देवा वेदा लोकाश्चराचराः ।
> नामरूपविभेदेन फल्ग्व्या च कलया कृताः ॥९॥

रामनामाच्या आवर्ती । त्यांसी झाली स्वरूपप्राप्ती । ज्यांचिये दृष्टी त्रिजगती । मिथ्या प्रतीती फल्गुत्वें[१] ॥ ७६ ॥ आदिब्रह्मा इंद्रादि देव । लोकपाळादि सर्व विश्व । वेदांतवाद रूपनांव । मिथ्या सर्व रामनामें ॥ ७७ ॥ एक रामनामासाठीं । ब्रह्मादि देवांची ही गोष्टी । फल्गुप्राय उडाले सृष्टी । रामनामपुष्टी अगाध ॥ ७८ ॥ रामनाम हे चित्कळा[२] । आवडीं आलिया हृदयकमळा । रामकळा कोंदल्या डोळां । संसार सगळा तृणप्राय ॥ ७९ ॥ रामनामापासीं विरक्ती । रामनामें परम प्राप्ती । रामनामें भुक्तिमुक्ती । यथानिगुती अवधारा ॥ ८० ॥

> विष्णोर्नामैव पुंसः शमलमपहरेत्पुण्यमुत्पादयेच्च
> ब्रह्मादिस्थानभोगान्प्रदिशति च गुरोः श्रीपदद्वंद्वभक्तिम् ।
> तत्त्वज्ञानं च विष्णोरिह मतिजननभ्रांतिबीजं च दग्ध्वा
> संपूर्णानंदबोधे महति च पुरुषं स्थापयित्वा निवृत्तम् ।१०।

रामनाम स्मरतां नित्य । पाप निर्दळी आकल्पांत । पुण्य उपजवी अद्भुत । जें नित्यानित्यछेदक ॥ ८१ ॥ करितां नित्य नामस्मरण । तेणें उपजे परम पुण्य । जें भोगक्षयें नव्हे क्षीण । ब्रह्म परिपूर्ण प्रापक[१] ॥ ८२ ॥ नाम स्मरतां वैराग्यपूर्ण । इंद्रलोकादि ब्रह्मसदन । मिथ्या देखे जैसें स्वप्न । वैराग्य गहन त्या नामीं ॥ ८३ ॥ ऐसी जालिया विरक्ती । सद्गुरु तोचि ब्रह्ममूर्ती । ऐसी उपजे अभेदभक्ती । सर्व भूतीं भगवंत ॥ ८४ ॥ अभेद गुरुभक्तीचें ज्ञान । सर्व भूतीं भगवद्भजन । भूतभौतिकें चैतन्यघन । ब्रह्मज्ञान यां नांव ॥ ८५ ॥ ऐसऐसिया ब्रह्मस्थिती । जन्ममरणा सहज शांती । सबीज निर्दळे पैं भ्रांती । तेही उपपत्ति[२] अवधारा ॥ ८६ ॥ प्रपंच येथें जाला होता । हे समूळीं मिथ्या वार्ता । पुढें होईल मागुता । कदा कल्पांतीं घडेना ॥ ८७ ॥ ऐसी जे कां सहजस्थिती । या नांव सबीज निरसे[३] भ्रांती । पुरुषा परमानंदप्राप्ती । हे निजख्याति अवधारा ॥ ८८ ॥ देवोनि परमानंदप्राप्ती । पुन.† न परते मागुती । रामनामाच्या आवृत्ती[४] । जडासी मुक्ती द्यावया ॥ ८९ ॥ रामनामस्मरणासाठीं । परमानंदीं पडे मिठी । ब्रह्मरूप प्रकटे सृष्टी । आनंदकोटी हरिनामें ॥ ९० ॥ ज्याचे नामाचें ऐसें महिमान । तो स्वामी जनीं जनार्दन । त्यासी काया वाचा मनेंकरून । अनन्य शरण सद्भावें ॥९१॥ सद्भावेंसीं अनन्य शरण । ऐकतांचि दीनवदन । स्वयें धांविन्नला जनार्दन । कृपाळु पूर्ण दीनांचा ॥ ९२ ॥

शुक उवाच—

> एवं गजेंद्रमुपवर्णितनिर्विशेषं
> ब्रह्मादयो विविधलिंगभिदाभिमानाः ।
> नैते यदोपससृपुर्निखिलात्मकत्वात्
> तत्राखिलामरमयो हरिराविरासीत् ॥ ११ ॥

---

१ कोरीं. २ उपाधिशून्य ज्ञान.

---

१ मिळवून देणारें. २ लक्षण. ३ नाहींशी होते. ४ सतत क्रम.

---

† बक—नाम परते मागुती, ड—नामरूपरते मागुती, नाहीं नामापरती मुक्ती.

तं तद्वदार्तमुपलभ्य जगन्निवासः
स्तोत्रं निशम्य दिविजैः सह संस्तुवद्भिः ।
छंदोमयेन गरुडेन समुह्यमान-
श्चक्रायुधोऽभ्यगमदाशु यतो गजेंद्रः ॥१२॥

गजेंद्राचे आर्त स्वरामुळें प्रभूचें आगमन व गजेंद्राचें उद्धरण—दीनोद्धारीं त्वरान्वित[1] । परम कृपाळु भगवंत । तेणें श्रीशुक हर्षयुक्त । असे सांगत परीक्षितीप्रति ॥ ९३ ॥ सगुण तेंचि निर्गुण । निर्गुण तेंचि सगुण । नामें ब्रह्मप्राप्ति पूर्ण । जगदुद्धार हरिनामें ॥ ९४ ॥ सविशेषनिर्विशेषस्थिति । ऐसी गजेंद्रें केली स्तुति । तेणें तुष्टला श्रीपती । कृपामूर्ति कृपाळु ॥ ९५ ॥ शक्र[2] विरिंचि[3] शंकर । इत्यादिक सुरवर । पदाभिमानी थोर थोर । त्यांसी गजेंद्र उद्धरवेना ॥ ९६ ॥ समस्तांही सुरवरांसी । शिणतां निजसामर्थ्येंसीं । न सोडवे गजेंद्रासीं । तया हृषीकेशीवांचोनी ॥ ९७ ॥ पृथक् इंद्रियाची सत्ता । नित्य अधीन भगवंता । तयावांचूनि सर्वथा । दीनोद्धारता न करवे ॥९८॥ समस्तांही सुरवरांसी । तुद्धरवेचि गजेंद्रासी । तया काळीं हृषीकेशी । अति त्वरेंसीं निघाला ॥ ९९ ॥ ऐकोन गजेंद्राचें स्तवन । सुदर्शन हातीं वसवून[4] । शीघ्र गरुडावरी वळघोन[5] । श्रीभगवान चालिला ॥ १०० ॥ सकळ जीवांचा जीव । सर्व देव ज्याचे अवयव । सर्वात्मा श्रीकेशव । स्वयमेव चालिला ॥ १ ॥ ऐकोनि गजेंद्राचें स्तवन । येतां देखोनि गरुडवाहन । देव करिती दिव्य स्तवन । कृपाळु पूर्ण दीनांचा ॥ २ ॥ जयजयाजी दीनसंरक्षणा । जयजयाजी दीनपाळणा । जयजयाजी दीनोद्धारणा । कृपाळु पूर्णा पूर्णत्वें ॥ ३ ॥ जयजयाजी भवभावना[6] । जय जय भवभावनिर्मूळनिर्दळणा । जय जय भवगजपंचानना । जय जनार्दना जगद्गुरो ॥ ४ ॥ येतां देखोनि श्रीपती । आपुलाल्या निजयुक्तीं । करिती नानापरीची स्तुती । विमानपंक्तीं सुरवर ॥ ५ ॥ गरुडारूढ मेघश्याम । दोहीं पंखांचा आक्रम । रथंतरबृहत्साम[1] । मनोरम सामग ॥ ६ ॥ वामरथंतरसाम । दक्षिणपक्षबृहत्साम । नादें डुल्लत† पुरुषोत्तम । गरुडागमन स्वानंदें ॥ ७ ॥ यालागीं छंदोमय नाम । स्वयें पावला गरुडोत्तम । त्याचे गतीचा संभ्रम । अनुपम्य अवधारीं ॥ ८ ॥ पृष्ठभागीं भगवंत । धरी चरण दोही हातांत । मुखीं श्रीहरिनाम स्मरत । सामगीत दो पक्षीं ॥ ९ ॥ दोही हातीं चरणानुक्रम । पृष्ठीं मेघश्याम हृदयीं राम । मुखीं नेमस्त श्रीहरिनाम । बृहत्साम दो पक्षीं ॥ १० ॥ ऐशी गरुडाची हे स्थिती । सबाह्य व्यापिली हरिभक्ती । यालागीं छंदोमय गाती । वेदानुवृत्तिअनुवाद ॥११॥ सपर्वत धरा सागरेंसीं । तुकितां[2] तृणप्राय हरीसीं । ऐशियासी अहर्निशीं । गरुड पृष्ठेंसीं वाहत ॥ १२ ॥ ऐसा गरुडारूढ भगवंत । येतो परमानंदें डुल्लत । तंव गजेंद्र ग्रहग्रस्त । आर्तभूत देखिला ॥ १३ ॥ चक्र सरसावूनि हातीं । हरि म्हणे गरुडाप्रती । तुवां चालावें शीघ्रगती । गजेंद्राप्रती उद्धराया ॥ १४ ॥ मनोवेगाचिया स्थिती । सहस्राधिक गरुडगती । तोही चालतां सर्वशक्ती । गति भगवंता मानेना ॥ १५ ॥ करावया गजेंद्रोद्धरण । श्रीहरीसी आलें पैं स्फुरण । बाहु थरकती सकंकण । आपणा आपण विसरला ॥ १६ ॥ फिंजारल्या रोमावळी । वीरगुंठी[3] सुटली मोकळी । पुष्पें स्रवती क्षितितळीं ।[4] आतुर्बळी चालिला ॥ १७ ॥ सांडोनियां गरुडवहान । सवेग वेगें उडी घालून । जेथें गजेंद्रग्रहण । शीघ्र आपण तेथें आला ॥ १८ ॥ येरीकडे गजेंद्र जाण । ग्रहग्रस्त अति दीन । काय बोलिला करुणावचन । जेणें भगवंत पावला ॥ १९ ॥

१ त्वरेनें युक्त, त्वरा करणारा. २ इंद्र. ३ ब्रह्मदेव. ४ घेऊन. ५ बसून. ६ संसार उत्पन्न करणाऱ्या.

१ सामवेदांतील साम. २ तुलना करितां. ३ शेंडी. ४ जमिनीवर.

† ब–डुलवो.

सोऽन्तःसरस्युरुबलेन गृहीत आर्तो
दृष्ट्वा गरुत्मति हरिं ख उपात्तचक्रम् ।
उत्क्षिप्य सांबुजकर गिरमाह कृच्छ्रा-
न्नारायणाखिलगुरो भगवन्नमस्ते ॥ १३ ॥

तया अगाध सरोवरीं । नक्रें गर्जून आक्रमिला करी । धरोनिया जलांतरीं । बलात्कारीं गांजिला ॥ १२० ॥ ग्रहग्रस्त मज देखोनी । मज सोडिलें माझिये पत्नीं । पुत्रें सांडिलें स्वजनीं । अंतीं कोणी न ये कामा ॥ २१ ॥ मजला ग्रहाचे मुखीं अर्पूनी । अवघे जणीं जळ प्राशूनी । आम्ही वांचलों महा-विघ्नीं । उल्हासोनी गेलीं वना ॥ २२ ॥ ऐसें तिहीं मज सांडितां । म्यांहीं सोडिली त्यांची ममता । तेव्हां आठवलें चित्ता । हरि रक्षिता प्राणांतीं ॥ २३ ॥ कृपा उपजली भगवंता । तरी तुटली दुस्तर ममता । आतां आठवतें चित्ता । हरि रक्षिता कृपाळु ॥ २४ ॥ अंतकाळींचा सोयरा । एक श्रीहरिच निर्धारा । ऐसें मानला गजेंद्रा । सपुत्रदार¶मोहत्यागें ॥ २५ ॥ निःशेष गेलिया मोहममता । स्मरणादरीं पढिये चित्ता । भजनीं आवडी[१] भगवंता । उल्हासता स्वानंदें २६ ॥ कांहीं अर्पावें भगवंता । अति संचितार्थ नये हाता । त्यावरी स्त्रीपुत्रांची सत्ता । स्वयें मागतां नेदिती ॥ २७ ॥ अंतीं मागतां कांहीं नेदिती । शेखीं सन्निपात झाला म्हणती । संचितार्थीं तोंडीं माती । नागविती स्त्रीपुत्र ॥ २८ ॥ म्हणती हा आतां मरेल । मरतां द्रव्यार्थ वेंचील । आम्हांस भिकेसी लावील । याचा बोल नायकावा ॥ २९ ॥ ऐसें सुहृदांचें संमत । अतीं संचितार्थ नागवित । गृहस्थ मरे चरफडत । तैसेंच प्राप्त गजेंद्रा ॥ १३० ॥ अर्पावया हरीस जवळीं । कांहीं नाहीं हातातळीं । शोधितां सरोवरजळीं । कमळ ते काळीं सांपडलें ॥ ३१ ॥ शुंडादंडीं कमळप्राप्ती । उल्हास गजेंद्राचे चित्तीं । आक्रोशें स्मरावया श्रीपती । विकळगती वाचेसीं ॥ ३२ ॥ प्राण होतां पैं विकळ । वाचा अतिशयें विव्हळ । तरी पशुजन्म प्रेमळ । स्मरण-शीळ गजेंद्र ॥ ३३ ॥ कमळ उचलोनि ऊर्ध्वगती । गजेंद्र पाहे अति प्रीतीं । गरुडारूढ लक्ष्मीपती । शंख चक्र हातीं देखिला ॥ ३४ ॥ दोघां होतां दृष्टादृष्टी । प्रेम उलथलें पोटीं । सुखें कोंदली सृष्टी । आनंदकोटि उल्हास ॥ ३५ ॥ पूर्वीं वाचा अति विव्हळ । हरि देखतां निजात्ममूळ । अक्षरीं अक्षर अविकळीं† । वाचा सफळ अनुवादे ॥ ३६ ॥ अच्युत अव्यय अव्यक्त । व्यक्ताव्यक्तत्वें अनंत । स्वप्रकाशें सदोदित । अजन्मा नित्य अविनाशी ॥ ३७ ॥ नराचें[१] नित्य आयतन[१] । यालागीं नावें नारायण । जगद्गुरुजनार्दन । अनन्य नमन पैं माझें ॥ ३८ ॥ भूतां संसार निगुती । भूता जन्ममरणप्राप्ती । विद्याअविद्यातीतगती । भगवन्मूर्ति नमस्ते ॥ ३९ ॥ वैराग्य आणि ऐश्वर्य । अद्वैतज्ञान औदार्य । श्री अनु-वादे यशःकार्य । तया नमस्कार भगवंता ॥ १४० ॥

तं वीक्ष्य पीडितमजः सहसावतीर्य
सग्राहमाशु सरसः कृपयोज्जहार ।
ग्राहाद्विपाटितमुखादरिणा गजेंद्र
संपश्यतां हरिरमूमुचदुच्छ्रियाणम् ॥ १४ ॥

ऐकतां गजेंद्राचें आर्तवचन[२] । स्वयें गरुडासन सोडून । सरोवरीं उडी घालून । आला भगवान कृपाळू ॥ ४१ ॥ चक्रें हाणोनियां नक्र । चक्रधारें फोडिलें वक्त्र[३] । मगरमिठी अति दुस्तर । नक्र गजेंद्रा सोडीना ॥ ४२ ॥ लागतां श्रीहरीचें चक्र । रुधिरें[४] न्हाला तो नक्र । तरी न सोडी गजेंद्र ।

---

१ आवडे.

¶ ब–दारा. † ब–दरु.

---

१ नराचें (नित्यवस्तूचें) आधारस्थान. २ दीन शब्द. ३ तोंड. ४ रक्तानें.

† ब–विकल.

दृढ वैर द्विजशापें ॥ ४३ ॥ बाप कृपाळु भगवंत । दोही तळीं घालोनि हात । जळाबाहेर अकस्मात । काढिले त्वरित भगवंतें ॥४४॥ लागतां भगवंताचा हात । दोघे जण अति उद्धत[१] । तेही जाले शापोन्मुक्त । भाग्यवंत समभाग्यें ॥४५॥ विमानीं देखती सुरवर । भूतळीं पाहती ऋषीश्वर । गगनीं देखती खेचर । गजेंद्रनक्रउद्धरण ॥ ४६ ॥ भगवंतें कृपा करून । दोघे बाहेर आणून । गजेंद्रा विमानीं घालून । श्रीभगवान निघाला ॥ ४७ ॥

नक्राचे विनतीवरून त्याचाहि उद्धार–जातां देखोनि भगवंत । नक्र गद्गदां हांसत । त्यासी श्रीहरि पुसत । हास्य किमर्थ तुज आलें ॥ ४८ ॥ सर्वां भूतीं हरि समान । गर्जती वेदशास्त्रपुराण । त्या तुजपासीं विषमपण । आजि संपूर्ण देखिलें ॥४९॥ उद्धरिलें गजेंद्रातें । मज कां उपेक्षिलें येथें । याचि देखोनि विषमतेतें । अत्यद्भुत हासिनलों ॥१५०॥ हरि स्वमुखें सांगे आपण । गजेंद्रें केलें माझें स्मरण । पापपुण्या निर्दळण । उद्धरण पावला ॥ ५१ ॥ तुझें जालिया दर्शन । माझें पाप नव्हे क्षीण । पापबळें म्यां आपण । श्रीभगवान जिंकिला ॥ ५२ ॥ तुझेनि नामें पाप निर्दळे । तुज देखिल्या पाप न ढळे । माझे पापभेणें हरि पळे । म्यां जिंकिलें गोविंदा ॥ ५३ ॥ सकळ पापांतें संहारी । यालागीं नांव म्हणिजे हरि । माझ्या पापांची त्याहूनि थोरी । तुज म्यां हरि जिंकिलें ॥ ५४ ॥ अति वक्रोक्ती नक्रवचन । ऐकोनि संतोषला भगवान । तुझें पहावया निज ज्ञान । उपेक्षण म्यां केलें ॥ ५५ ॥ माझ्या दर्शनाची प्राप्ती । तुज जाली ज्ञानस्फूर्ती । ऐसें बोलोनि श्रीपती । नक्र गजपती भेटविला ॥ ५६ ॥ नक्रें धरिले गजाचे चरण । तुझें करितां चरणग्रहण । मज भेटला श्रीभगवान । तुझेनि जाण गजेंद्रा ॥ ५७ ॥ गजें घातलें लोटांगण । तुवां धरिले माझे चरण । मज आठवला श्रीभगवान । मज उद्धरण तुझेनि ॥ ५८ ॥ येरयेराचा[१] उपकार । परस्परें मानिती थोर । श्रीहरि भेटला साचार । पूर्ववैर उपशमे ॥ ५९ ॥ आम्ही तुम्ही दोघे जण । पूर्वी सखे बंधु ब्राह्मण । धनलोभें शाप जाण । गजनक्रपण पावलों ॥ १६० ॥ त्याही वैराची उपशांती[२] । आजि पावलों निश्चितीं । पूर्वापरवैरशांती । भगवन्मूर्ति भेटली ॥ ६१ ॥ श्रीहरिसमान समता । दोघे पावले स्वरूपता । त्याही स्वरूपाची व्यवस्था । यथार्थता अवधारीं ॥ ६२ ॥ श्यामराजीवलोचन । ठाणमाण गुणलक्षण । रूपरेखा समसमान । दोघे अनन्य हरिरूप ॥ ६३ ॥ शंख चक्र गदा पद्म । तिघे दिसती समान सम । मुख्य कोणता पुरुषोत्तम । देवां दुर्गम लक्षेना ॥ ६४ ॥ रमा[३] देखोनि तिन्ही मूर्ती । म्हणे भजावें कोणाप्रती । ब्रह्मादिक विस्मित चित्तीं । मूळमूर्ति लक्षेना ॥ ६५ ॥ संतोषोनि श्रीभगवान । स्वरूपता दे संपूर्ण । नेदी श्रीवत्सलांछन । मज अधीन नाहीं म्हणे ॥ ६६ ॥ ब्राह्मणाची दुर्वाक्यता । हृदयीं साहिल्या म्यां लाता । तैं श्रीवत्स लाभे हाता । सत्यवाक्यता वेदार्थ ॥ ६७ ॥ ज्यासी श्रीवत्सलांछन । तोचि स्वामी श्रीभगवान । येर ते भक्त तत्समान । साधु सज्ञान लक्षिती ॥ ६८ ॥ भगवद्भक्त इंद्रद्युम्न । त्याचें करितां उद्धरण । धरितां भक्ताचे चरण । उद्धरण नक्रासी ॥ ६९ ॥ भक्तसंगती जे जे लागत । ते ते तारी श्रीभगवंत । ऐसें गर्जे भागवत । ते पद प्राप्त नक्रासी ॥ १७० ॥ कृपाळु श्रीभगवंत । उद्धरिले निजभक्त । अवघे जयजयकार करित । सुर वर्षती दिव्य सुमनें[४] ॥ ७१ ॥

१ दाडगे, उद्धट.

१ परस्परांचा. २ शेवट, अंत. ३ लक्ष्मी. ४ पुष्प.

गरुड वेगानें आल्यावर त्याच्या क्षुधाशांतिकरितां दोघाचे देह त्यास दिले—तंव गरुड धांपा देत। वेगें येतां त्वरान्वित। पुढें देखतां श्रीभगवंत। लज्जान्वित तो जाला ॥ ७२ ॥ मज न पुसतां श्रीपती। पुढें गेलासी कैसे रीतीं। गरुडा तुझी देखोनि मंद गती। गजेंद्रार्थी धांविन्नलों ॥ ७३ ॥ ऐकोनि श्रीस्वामीचें वचन। गरुड जाला लज्जायमान। मग घालोनि लोटांगण। धरिले चरण हरीचे ॥ ७४ ॥ आमच्या गतीची तूं गती। आमच्या शक्तीची तूं शक्ती। आमचे मतीची तूं मती। कृपामूर्ति श्रीकृष्णा ॥ ७५ ॥ मज येतां त्वरायुक्त। क्षुधेनें पीडिलों बहुत। तूं तव कृपाळु श्रीभगवंत। कांहीं आहारार्थ मज देईं ॥ ७६ ॥ श्रीहरि सांगे कृपा करून। गजनक्रदेह गहन। माझेनि हातें अति पावन। करीं भक्षण आहारार्थ ॥ ७७ ॥

इतक्यात एका भूभग पक्ष्यानें दोन्हीं कलेवरें धरिलीं—गरुड जंव आला तेथ। तंव देखिलें विपरीत। भूभंगपक्षी[1] आहारार्थ। सवेग धरित ते दोन्ही ॥ ७८ ॥

पक्षिणं तत्र गगने भ्रमत त खगेश्वरः।
तावप्येकत्र संदृष्ट्वा भक्षार्थमग्रहीत्तदा ॥ १५ ॥
नखेन गजमेकेन नक्रमेकेन चाक्षिपत्।
चंच्वग्रे पक्षिणा* गृह्य तदोत्पत्य गरुत्मता ॥ १६ ॥

भूभंगपक्षी भ्रमे गगनीं। गजेंद्र नक्र एकत्र दोनी। तेणें देखतांचि नयनीं। झडप मारोनी धरियेले ॥ ७९ ॥ भूभंगें धरितां ते दोन्ही। तारार्क्ष्य[2] देखे दुरुनी। गरुड येताचि तळपोनी। भूभंग धरोनी उडाला ॥ १८० ॥ तळीं गजेंद्र त्यावरी नक्र। भूभंगपक्षी त्याहुनि थोर। गरुडें उचलितां सत्वर। माळा विचित्र परिलंबे¶ ॥८१॥ गरुड भिडतां भूभंगासी। तेणें सोडिलें गजनक्रांसी। गरुडें धरिलें नखाग्रेंसीं। घेवोनि तिघांसीं उडाला ॥ ८२ ॥

एषा मम महाशाखा शतयोजनमायता।
स्थित्वास्यां त्रीनिमान्भक्ष सुखेन त्व खगेश्वर ॥१७॥
ततो द्रुमं पतगसहस्रसेवित
महीधरप्रतिमवपुः प्रकंपयन्।
खगोत्तमो द्रुतमभिपत्य वेगवान्
बभंज तामविरलपत्रसंचयाम् ॥ १८ ॥
स्पृष्टमात्रा तु सा पद्भ्यां गरुडेन बलीयसा।
अभज्यत तरोः शाखा भग्नान्तामप्यधारयत् ॥१९॥
तां भग्नां स महाशाखां स्मयमानो विलोकयन्।
अथात्र लज्जयाऽपश्यद्वालखिल्यानधोमुखान् ॥२०॥

गरुडानें तिघांनाही धरून उड्डाण केलें—मुखीं धरोनि भूभंगासी। नखाग्रीं गजनक्रांसी। गरुड पाहे स्वस्थानासी। स्वयें आहारासी सेवावया ॥८३॥ येतां देखोनि गरुडासी। उल्हासं† कनकजांबूसी। स्वयें बोले आल्हादेंसीं। खगेश्वरासीं तें ऐका ॥ ८४ ॥ हरिहस्तें गज नक्र पुनीत। गरुड केवळ भगवद्भक्त। यांचा स्पर्श जालिया येथ। मी नित्य मुक्त होईन ॥ ८५ ॥ गजेंद्र भक्ताचे संगतीं। घातकी नक्र पावला मुक्ती। मीही याचिये संगतीं। नित्य मुक्ती पावेन ॥ ८६ ॥ जे जे लागले सत्संगतीं। ते ते नित्य पावले मुक्ती। कनकजांबू तदर्थीं। गरुडाप्रती विनवित ॥ ८७ ॥

एषा मम महाशाखा शतयोजनमायता ॥ २१ ॥

कनकजांबूचे विनतीवरून त्याचे शाखेवर गरुड बसला—शत योजन विस्तार। माझी शाखा अत्यंत थोर। तेथें बैसोनि खगेश्वर। करीं आहार तिहींचा ॥८८॥ गरुड क्षुधेनें पीडिला। तिहींसीं उडतां भागला। ऐकोनि कनकजांबूचे बोला। स्वयें बैसला शाखेसी

१ एक प्रकारचा गिधाडासारखा मांसाहारी पक्षी. २ गरुड. ( तार्क्ष्य—अमर ).

* ब—गुह्य. ¶ क—परिलंबा.

† क—समवेत.

॥ ८९ ॥ गरुड पाहे तो तरुवर । जैसा कां मेरु गिरिवर । भोंवत्या शाखा शतसहस्र । योजनविस्तार शतसंख्या ॥ १९० ॥ पक्षियांची [1]नीडें तयावरी । शतसहस्र लक्षांतरीं । फळपुष्पित संभारीं । तरुवरी विश्रांति ॥ ९१ ॥ पहावया गरुडाची थोरी । वालखिल्य साठी सहस्री । गुप्त पावले शाखांतरीं । गरुड जीवरी बैसला ॥ ९२ ॥

त्याबरोबर ती शाखा कडाडली—गरुड बैसतांचि तेथ । शाखा मोडली कडकडीत । गरुड पाहे साशंकित । ऋषी लोंबत शाखेसीं ॥ ९३ ॥

त्या शाखेवर साठसहस्र वालखिल्य ऋषींना पीडा होऊ नये म्हणून गरुडाचें अधात्रींच असणें— ऋषी लोंबती अधोमुख[2] । शाखा साहों नये देख । ऋषी पावतांचि दुःख । थोर नरक पावेन ॥९४॥ शाखा धरोनि वामचरणीं । गज नक्र दक्षिणचरणीं । मुखीं भ्रूभंग धरोनी । गेला उडोनी आकाशीं ॥ ९५ ॥ शाखा शतयोजनविस्तार । साठी सहस्र ऋषीश्वर । दक्षिणचरणीं गजनक्र । मुखीं महाथोर भ्रूभंग ॥ ९६ ॥ इतुकेनसीं समवेत । गरुड आकाशीं भ्रमत । बैसों न[3] लाहे[3] यथास्वस्थ । ऋषी समवेत दुखवती ॥ ९७ ॥ मज बैसतांचि तळीं । भारें ऋषींची होय रांगोळी । येणें धाकें महाबळी । [4]नभोमंडळीं भ्रमतसे ॥ ९८ ॥ घेवों न लाहे आहारातें । बैसों न लाहे स्वस्थचित्तें । परम संकट गरुडातें तेणें श्रीहरीतें स्मरत ॥ ९९ ॥ थोर पावलों आकांता । वेगीं पाव गा भगवंता । काय म्यां करावें आतां । अनाथनाथा उद्धरीं ॥२००॥ जोहरीं रक्षिलें पांडवांसी । नग्न करितां द्रौपदीसी । पितयानें गांजितां प्रह्लादासी । तेवीं मजपासीं पावावें ॥ १ ॥

१ घरटीं. २ ज्यांचीं तोंडें खालीं आहेत असे. ३ न शके. ४ आकाशांत.

गरुडानें श्रीभगवंताचा धावा केल्यावर काश्यपऋषीचें दर्शन—आतां उद्धरिलें गजेंद्रासी । तो तूं मज विसरलासी । उडी घालावया वेग तुजपासीं । कां रुसलासी गोविंदा ॥ २ ॥ जना सबाह्य जनार्दन । तुझें नांव जगज्जीवन । मी तुझें अनाथदीन । माझें विघ्न निवारीं ॥ ३ ॥ गरुड श्रीहरीचा परम भक्त । तोही आनंदें नाम स्मरत । नामापासीं भगवंत । आहे डुल्लत स्वानंदें ॥४॥ करितां हरिनामस्मरण । स्वयें विघ्न होय निर्विघ्न । गरुड पावला समाधान । तेंही विंदाण[1] अवधारा ॥ ५ ॥ गरुड भ्रमता आकाशीं । भगवंताची कृपा कैसी । देखिलें पित्या कश्यपासी । तेजोराशी तपस्वी ॥ ६ ॥

स गत्वा पर्वतश्रेष्ठं गन्धमादनमञ्जसा ।
ददर्श कश्यपं तत्र पितरं तपसि स्थितम् ॥२२॥
प्रजाहितार्थमारम्भो गरुडस्य तपोधनाः ।
चिकीर्षितं महत्कर्म तदनुज्ञातुमर्हथ ॥ ३ ॥
एवमुक्ता† भगवता मुनयस्ते समाययुः ।
मुक्त्वा शाखा गिरिं पुण्यं हिमवंतं तपोधनाः ॥२४

कश्यपाच्या विनंतीवरून वालखिल्यऋषी फांदी सोडून बदरीला गेले—गन्धमादनपर्वतांत । कश्यप पिता तप आचरत । नभींहूनि देखिला अकस्मात । आला त्वरित त्यापासीं ॥ ७ ॥ येतां देखोनि गरुडासी । वृत्तांत कळला कश्यपासी । देखोनि वालखिल्य ऋषी कश्यप त्यासी प्रार्थित ॥ ८ ॥ घालोनियां लोटांगण । कश्यप विनवी कर जोडोन । गरुड माझें अपत्य दीन । कृपा करोन सोडावें ॥९॥ गरुडाचें मनोगत । आणूनियां परमामृत । माता करावी निर्मुक्त । तदर्थी सामर्थ्य तुम्हीं द्यावें ॥२१० तुज करितां अनुष्ठान । नाहीं याचें सामर्थ्यज्ञान । येणें माता मुक्त करून । झाला वहन विष्णूचें ॥ ११ ॥ पहावया गरुडाचें सामर्थ्य । शाखेसीं[2] बैसलों समस्त । तंव हा बळिया बळवंत । विजयी निश्चित

१ कौतुक. २ डहाळीवर.

† अ—क्ता.

तिहीं लोकीं ॥ १२ ॥ करोनि कश्यपासी नमन । देखोनि गरुडासी आशीर्वचन । वाळखिल्यीं शाखा सोडोन । गेले तपोवन बदरीसी ॥ १३ ॥ गेले वालखिल्य देखोन । गरुड पावला समाधान । करोनि पितयासी नमन । पुसे आपण तें ऐका ॥ १४ ॥

भगवन्कुत्र मुचामि तरुशाखामिमामहम् ।
वर्जितं ब्राह्मणैर्देशमाख्याहि भगवन्मम ॥२५॥
ततो निष्पुरुषं शैलं सागरोदरसंस्थितम् ।
अगम्यं मनसाप्येतैस्तदाचख्यौ स कश्यपः॥२६॥

गरुडाचे विनंतीवरून कश्यपानीं सुचविल्याप्रमाणें सुवर्णशाखा लंका पाठारावर ठेविली–गरुड लोटांगण घाली । थोर जाजावलों[1] वाळखिल्यीं । मुक्त जालों तुझे बोलीं । शाखा आणिली ऋषिबाधे[2] ॥ १५ ॥ कनकजांबुशाखा [3]सधर । शतयोजनें सविस्तर । इशीं सांडावया कोण थार[4] । कोठें आहार म्यां घ्यावा ॥ १६ ॥ देखोनियां कनकजांबूसी । ब्राह्मण धांवती छळावयासी । धनलोभ बहु द्विजांसी । बळ ब्राह्मणांसीं चालेना ॥१७॥ जेथ न पावती ब्राह्मण । सांगावें जी तें कोण स्थान । तेथें शाखा निक्षेपून[5] । करीं भोजन क्षुधार्थी ॥ १८ ॥ क्षुधित ऐकोनि गरुडासी । कृपा उपजली कश्यपासी । दुर्गम स्थान सांगे त्यासी । अगम्य सर्वांसी मनोवाचा ॥ १९ ॥ दक्षिणसमुद्रामाझारीं । सुनाभि पर्वत लंकागिरी । शाखा ठेवोनि त्यावरी । भोजन करीं सुपुत्रा ॥२२०॥ ऐकोनि कश्यपाचें वचन । स्वयें सुवर्णशाखा घेऊन । गज नक्र भूमंगेंसीं उडोन । आला आपण लंकेसी ॥ २१ ॥

ततस्तस्य गिरेः शृंगमासाद्य स खगोत्तमः ।
भक्षयामास गरुडस्तावपि क्षुधयार्दितः ॥ २७ ॥

लंकापाठार निरर्जन[‡] । सुवर्णशाखा तेथ ठेवून । गरुडें केलें पैं भोजन । सावधान हरिस्मरणें ॥२२॥ करितां भूमंगभक्षण । ग्रासोग्रासीं कृष्णार्पण । करी नक्राचें भोजन । ब्रह्मार्पण स्मरणेंसीं ॥२३॥ भक्षितां त्या गजेंद्रासी । भोक्ता म्हणे हृषीकेशी । भक्त सेवी त्या त्या अर्थासी । हरिस्मरणेंसीं सावध ॥ २४ ॥ गरुड पीडला क्षुधेसीं । भोजन करितां ये विधीसीं । पावला परम तृप्तीसी । आल्हादेंसी हरिस्मरणें ॥२५॥ फळ मूळ आणि जीवन । जे भक्त सेविती आपण । तें तें करिती ब्रह्मार्पण । तृप्ती संपूर्ण तेणें त्यांसी ॥ २६ ॥ अन्न ब्रह्म अहं ब्रह्म । हृदयीं भोक्ता आत्माराम । त्याचें कर्मचि परब्रह्म । हें जाणती मर्म ते धन्य ॥२७॥ भोजन करितां ऐसिये पंक्ती । [1]आसहस्रांची पंक्ती पुनाति[2] । ऐसें बोलती वेदश्रुती। सभाग्य पंक्ती हरिभक्त ॥ २८ ॥ ग्रासोग्रासीं हरिस्मरण । ऐसें जे करिती भोजन । तेथ भोक्ता श्रीभगवान । भोक्तेपण त्यां नाहीं ॥ २९ ॥ ऐसिये भोजनप्रयुक्तीं । गरुडासी जाली परम तृप्ती । तेणें घ्यावया विश्रांती । केली आइती[3] ते अवधारा ॥२३०॥ भारेंसीं भ्रमतां अंतराळीं । गरुड भागला महाबळी । तेणें पावोनि पाखातळीं । केली ते वेळीं निजनिद्रा ॥ ३१ ॥ ऐसी घेऊनि विश्रांती । गरुड कैसा गेला शीघ्रगती । भगवद्भक्तपदप्रयुक्ती । भाग्यप्राप्ती लंकेसीं ॥ ३२ ॥ गरुडाचीं नखें स्पष्ट । लंकेसीं रुतलीं तिखट । पडतां पर्जन्याचे वाहावाट । जालें त्रिकूट अति थोर ॥ ३३ ॥

कुबेराकरिता लंकाशहराचें निर्माण – कुबेराची अलकावती । रावणें हिरोनी घेतां वस्ती । त्यासी वारोनि प्रजापती । लंकापति तो केला ॥ ३४ ॥ विश्वकर्म्यातें घेऊन । स्वयें येवोनि चतुरानन । निर्माण केलें लंकाभुवन । दुर्ग दारुण दुर्गम ॥३५॥ विश्वकर्म्यानें झाडोनि कडे । त्रिकूट सज्ज केलें गाढे ।

---

१ त्रास पावलों. २ ऋषींना पीडा होईल म्हणून. ३ बळकट. ४ ठिकाण. ५ टाकून.

१ सहस्रपर्यंत लोकाची. २ पवित्र होतें. ३ तयारी.

‡ ब–निरंतन. † अ–णिइष्य.

लाग न लगे मागेंपुढें । चहूंकडे दुर्धर ॥ ३६ ॥ पडलंका मागिलीकडे । सुवेळा शोभे लंकेपुढें । निकुंबळागड अवघडे । दक्षिणेकडे दुर्गम ॥ ३७ ॥ तया लंकेच्या शिखरीं । कनकशाखा होती बरी । आगी लावितां पुच्छेंकरीं । शाखा एकसरीं रस जाली ॥ ३८ ॥ हनुमंतें जाळिली लंका । सुवर्णाची ओतिली देखा । भगवद्भक्ताचा आवांका । दुःखदायका सुखरूप ॥ ३९ ॥ शाखा बहुकाळ पडली राहे । शेवाळली खडकप्राये । तेणें उपेक्षिली जाये । लक्षा न ये कोणासी ॥ २४० ॥

हनुमानाचे लंकादहनात सुवर्णशाखेचे दहनानें लंका सुवर्णमय झाली—मरुत[1] मारुत[2] प्रलयवन्ही[3] । लंका जाळितां तिघीं जणीं । शाखा ओतली रस होउनी। लंका भुवनीं हेममय ॥ ४१ ॥ हनुमंतें जाळितां देखा । हेममय ओतली शाखा । तैंपासोनि सुवर्णलंका । समस्त लोकां अनुवाद ॥ ४२ ॥ कपीनें करितां लंकादहन । लंका जाली सुवर्णवर्ण । मग सीतेपासीं येऊन । केलें नमन साष्टांगीं ॥ ४३ ॥ नमस्कार करोनि सीतेसी । शीघ्र भेटावया श्रीरामासी । हनुमान आज्ञा पुसे तिसीं । अति त्वरेंसीं जावया ॥ ४४ ॥ भेटावया निजस्वामीसी । स्फुरण आलें हनुमंतासी । बाहु थरकती उल्लासीं । तळपे आकाशीं कपिपुच्छ ॥ ४५ ॥ मनें कवळिलें श्रीरामासी । श्रद्धा सीतेच्या पायांपासीं । आज्ञा पुसावया तियेसी । एकाग्रतेसीं तिष्ठत ॥४६॥ ऐसें देखोनि हनुमंता । उल्हास जानकीचे चित्ता । मारावया लंकानाथा । शीघ्र रघुनाथा आणावें ॥ ४७ ॥ ऐक हनुमंता सावधान । तुज मी देतें आशीर्वचन । मार्गी बाधूं न शके विघ्न । राम चिद्धन पावसी ॥४८॥ ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान घाली लोटांगण । वंदोनि सीतेचे चरण । केलें उड्डाण वानरें ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंतासी श्रीरामदर्शन । तेथील गोड निरूपण । सावधान अवधारा ॥२५०॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां गजेंद्रोद्धरणं हनुमंतश्रीराममदर्शनागमनं नाम द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ओंव्या ॥ २५०॥ ॥ श्लोक ॥ २७ ॥ एवं ॥ २७७ ॥

[1] वायु. [2] मारुत ( मारुती ). [3] प्रलयाग्नी.

---

## अध्याय २३ वा

लंकादहन झाल्यावर मारुती सीतेची आज्ञा घेऊन परत येण्यास निघाला— श्रीरामचंद्राय नमः ॥ आश्वासोनि[1] श्रीरामकांता । भेटावया श्रीरघुनाथा । हनुमंत होय निघता । तेचि कथा अवधारा ॥१॥

+पुनर्दृष्ट्वा च वैदेहीं मैथिलीमभिवाद्य च ।
प्रत्यागतु मनश्चक्रे पुनर्मध्येन सागरम् ॥ १ ॥
ततः स कपिशार्दूलः स्वामिसदर्शनोत्सुकः ।
आरुरोह गिरिश्रेष्ठमरिष्टमरिसूदनः ॥ २ ॥
स च भूमिधरः श्रीमान्बलिना तेन पीडितः ।
दशयोजनविस्तारस्त्रिंशद्योजनमुच्छ्रितः ॥ ३ ॥
धरण्यां समतां प्राप्तो बभूव स धराधरः ॥ ४ ॥

लंकादहन करोनि संपूर्ण । हनुमंतासीं करितां गमन । घ्यावया सीतेचें दर्शन । आला परतोन तीपासीं ॥ २ ॥ सीता सर्वांगीं अक्षत । पाहोनियां सावचित्त । हनुमंत हर्षयुक्त । निघे त्वरित तें ऐका ॥ ३ ॥ घ्यावया श्रीरामाची भेटी । हनुमंतासीं त्वरा मोठी । वंदोनि सीता गोरटी । उठाउठीं[2] निघाला ॥ ४ ॥ वेगीं उल्लंघावया सागर । चौफेर अवलोकी वानर । देखिला अरिष्ट गिरिवर । तेथें सत्वर वळघला[3] ॥ ५ ॥ सकळ अरिष्टां आधार । यालागीं अरिष्ट गिरिवर । अनुवादती[4] ऋषीश्वर । त्याचा विस्तार अवधारा ॥ ६ ॥

[1] शांतवन करून. [2] त्वरित. [3] चढला. [4] बोलतात.

+ ५६।२४, २५.

अरिष्ट पर्वतावरून उड्डाण, त्या दडपणामुळें पर्वत धुळीस गेला–दश इंद्रियीं विक्षेपकता। दशयोजन रुंदी पर्वता। वासनाविस्तार ऊर्ध्वता। शतयोजनता ते उंची ॥ ७ ॥ जागृति स्वप्न सुषुप्तिता। श्रीरामस्मरण हनुमंता। यालागीं चढला अरिष्टमाथां। हाणी लाता नामनेटें ॥ ८ ॥ पूर्ण कृपा श्रीरघुनाथा। पूर्ण प्राप्ती ते हनुमंता। चढोनि अरिष्टाचे माथां। हाणी लाता नामनेटें ॥ ९ ॥ हनुमंताचे नामनेट। उड्डाणाचा कडकडाट। पृथ्वींत रुपला अरिष्ट। केला सपाट भूमिसम ॥ १० ॥ वृक्षशिखरें समसगट। भूमीं दाटला गिरिकूट। श्रीरामभजनीं निजनिष्ठ। केला सपाट हनुमंतें ॥ ११ ॥ हनुमान रामनामें आतुर्बळी। उड्डाणाच्या कल्लोळीं। अरिष्ट मेळविला धुळी। करोनि रांगोळी नामनेटें ॥१२॥

भगवद्भावभजन महिमा–स्वयें अरिष्टाचिये माथां। निर्दळणें हाणोनि लाता। हे ब्रीद साजे हनुमंता। श्रीरघुनाथाचेनि भजनें ॥ १३ ॥

येऽन्येरविंदाक्ष विमुक्तमानिन-
स्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः।
आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः
पतन्त्यधो नादृतयुष्मदङ्घ्रयः ॥ ९ ॥
तथा न ते माधव तावकाः क्वचिद्
भ्रश्यंति मार्गात्त्वयि बद्धसौहृदाः।
त्वयाभिगुप्ता विचरंति निर्भया
विनायकानीकपमूर्धसु प्रभो ॥ ६ ॥

परम भाग्याची भाग्यस्थिती। मनुष्यजन्मातें नर येती। शोधितसत्वाची[1] सत्त्ववृत्ती। जन्म पावती ब्राह्मणाचा ॥१४॥ तेथेंही वेदशास्त्रव्युत्पत्ती। जेणें परब्रह्म आतुडे[2] हातीं। ती सांडोनि मूढमती। बुद्धि यदर्थीं अति योग्य ॥ १५ ॥ मुक्तत्वाचा निजाभिमान। वाग्वादीं अति निपुण। नाहीं भगवद्भावभजन। अलोट पतन तयांसी ॥ १६ ॥ येवोनि ब्रह्मप्राप्तीचे घरा। मुक्ताभिमान नागवी नरा। भार भगवद्भजनीं पाठिमोरा। ऐशिया नरा अधःपात[1] ॥ १७ ॥ भगवद्भजनीं जो पाठिमोरा। त्यासी जन्ममरणयेरझारा। कोट्यनुकोटि योनिद्वारा। अधःपात खरा त्या नांव ॥ १८ ॥ करोनि पत्रावलंबन। परीक्षा म्हणे माझें ज्ञान। हें ज्ञान कीं ज्ञानाभिमान। अधःपतन तयासी ॥ १९ ॥ अहं सोहं कोहं अभिमान। भक्त न धरती अति सज्ञान। त्यांसी बाधू न शके विघ्न। विघ्नासी दमन श्रीरामनाम ॥ २० ॥ रामनामाच्या निजशक्तीं। भक्त विघ्नमाथां चढती। शेखीं विघ्न निर्दाळिती। नित्य निर्वृती[2] रामनामें ॥ २१ ॥ चारा घालोनि मुखाआंत। जेंवी पक्षिणी पिलीं पोशित। तेंवी आपुले निजभक्त। रक्षी भगवंत अहर्निशीं ॥ २२ ॥ विघ्न न येचि नामापासीं। तें केंवी ये भक्तापासीं। भगवंत रक्षी अहर्निशीं। विघ्न भक्तांसी निर्विघ्न ॥ २३ ॥ विघ्न करूं ये छळणार्थ। विघ्नाचा आत्मा तो भगवंत। विघ्न निर्विघ्न होय तेथ। भूतें भगवद्रूप भक्तासी ॥ २४ ॥ सर्वभूतीं भगवद्भाव। तेथें विघ्नासी कैंचा ठाव। विघ्नीं विघ्नत्वा अभाव। विघ्न स्वयमेव देव जाला ॥ २५ ॥ भगवद्भावें चालतां भक्तां। विघ्नें ओढविती माथा। ऐसी हरिभक्ति हनुमता। श्रीरघुनाथाचेनि नामें ॥ २६ ॥

व अशा रीतीनें अरिष्ट पर्वत परब्रह्मीं प्रविष्ट झाला– श्रीरामनामें हनुमान बळी। अरिष्ट पर्वत पायांतळीं। करोनियां पैं रांगोळी। मिळविला[3] धुळी हरिनामें ॥२७॥ अरिष्टाचें भाग्य श्रेष्ठ। लागतां हनुमताचा अंगुष्ठ। विरोनिया गिरिकूट। जाला प्रविष्ट परब्रह्मीं ॥ २८ ॥ अरिष्टाची भाग्यावळी†। हनुमंताचे

१ शुद्ध सत्त्वगुणाची. २ सांपडे.

१ पतन. २ सुख. ३ नमवितात.

† क्ष–भाग्यप्रबळ, द–ते भाग्यवरी.

पायांतळीं । नुरेचि भूतळीं पाताळीं । मिनला तत्काळीं परब्रह्म ॥ २९ ॥ दशशतयोजन विस्तार । नामें अरिष्ट गिरिवर । हनुमंतें हाणोनि पादप्रहार । केला उद्धार अरिष्टाचा ॥ ३० ॥ कपीनें हाणोनि पांपरा[1] । जडत्व दवडोनि भूवरा । ऐक्य केलें धराधरा । गिरिवरा अरिष्टा ॥ ३१ ॥ करावया अरिष्टाचा उद्धार । श्रीरामभक्त हनुमंत वीर । जो करी जडाचा उद्धार तोचि साचार हरिभक्त ॥३२॥ धरा[2] धरी तो धराधर[3]। त्यासीं अरिष्टाचा ऐक्याकार । श्रीरामभजनें करी वानर । जगदुद्धार हनुमंते *॥ ३३ ॥ पुढील कथेची संगती । समुद्र लंघावया मारुती । चढला अरिष्ट पर्वतीं । तेही उपपत्ती अवधारा ॥ ३४ ॥

+पीडितं तं नगवरं त्यक्त्वा गगनमास्थित ।
आप्लुत्य च महावेगं पक्षवानिव पर्वत ॥७॥
हनुमान्मेघजालानि विकर्षन्निव गच्छति ।
भुजयोरन्तरासक्त मेघजाल विकर्षयन् ॥ ८ ॥
दारयन्मेघवृन्दानि निष्पतंश्च पुनः पुन ।
ज्यामुक्त इव नाराचो महावेग उपागमत् ॥९॥
स किंचिदाराल्लप्राप्त, समालोक्य महागिरिम् ।
ननाद सुमहानाद मेघनादसमन्वन. ॥ १० ॥

त्याचा व प्रस्तुत कथेचा संबंध—हनुमान चढतां महाबळी । पर्वत दडपला पायांतळीं । सर्प दडपती पाताळीं । वमिती ते काळीं विषगरळा ॥ ३५ ॥ भारें दडपला पर्वतु† । श्वेत पीत आरक्त धातु† । स्रवोनि निजशोभा शोभतु† । जेंवी वसंत निजसुमनीं ॥ ३६ ॥ जेंवी पर्वत पक्षमेळीं । तैसा कपि जातसे नभोमंडळीं । अभ्रें अडकलीं बाहुमूळीं । वक्षःस्थळीं कपीच्या ॥ ३७ ॥ उत्तरीयवास[4]‡ राजलीळा । वानरा आली राजकळा । सुनीळ भासतसे नीळा । घनसांवळा मारुति ॥ ३८ ॥ अभ्रें अडकलीं हनुमंता । आंगा आली घनश्यामता । पावला श्रीरामसारूप्यता । भासे समस्तां सुरसिद्धां ॥ ३९ ॥ देखोनियां महेंद्रगिरी । हर्ष कोंदला वानरीं । प्रळयांबुदगिरागजरीं[1] । भुभु:कारी गर्जिन्नला ॥ ४० ॥ श्रीरामचापीं सुटला शर । तैसा लघीत सागर । सवेग जातसे वानर । सुरासुर विस्मित ॥ ४१ ॥ नाद कोंदला अंबरीं[2] । नाद कोंदला सागरीं । नाद कोंदला कपींद्रीं । जे महेंद्रीं राहिले ॥ ४२ ॥

मारुतीच्या उड्डाणाचा नाद ऐकून महेंद्र पर्वतावरील वानरांना हर्ष—ऐकोनि गिरागजर । महेंद्रीं राहिले

निशम्य नदतो नाद वानरास्ते समंतत ।
बभूवुरुत्सुकाः सर्वे सुहृद्दर्शनकांक्षिणः ॥ ११ ॥
जाम्बवांश्च हरिश्रेष्ठः प्रीतिसंहृष्टमानस. ।
उपामन्त्र्य हरीन्सर्वानिदं वचनमब्रवीत् ॥ १२ ॥
सर्वथा कृतकार्योऽसौ हनुमान्नात्र संशय ।
न ह्यस्याकृतकार्यस्य नाद एवंविधो भवेत् ॥१३॥
तस्य बाहूरुवेगं च निनादं च महात्मनः ।
सश्रुत्वा हरयो हृष्टाः समुत्पेतुः समंततः ॥ १४ ॥

होते वानर । तेही सावधान होती समग्र । तैसें गंभीर गर्जिन्नला ॥४३॥ गजर ऐकोनि अत्यद्भुत । वानरां सांगे जांबवंत । पैल आला रे हनुमंत । सीताशुद्ध्यर्थ लक्षोनि ॥ ४४ ॥ साधोनियां सीताशुद्ध्यर्थ । हर्षें गर्जे हनुमंत । अंगदादि वानरांआंत । सांगे जांबवंत दूतचिन्ह ॥४५ ॥ कार्य न साधितां जाण । मुख्य दुश्चित्त म्लानवदन । त्याचे वाचेसीं[3] पडे मौन[3] । गिरागर्जन त्या कैंचें ॥ ४६ ॥ सीताशुद्धीचा [4]इत्यर्थ । साधूनि आला हनुमंत ।

१ लात. २ पृथ्वी. ३ पर्वत. ४ अगवस्त्र.

* ही ( ३३ वी ) ओवी क्ष मध्यें नाहीं. † पर्वतु, धातु शोभतु. ‡ डबक—उत्तरी वास.

+ ५६।४८, ५७।१-६, २१, १४,१२, १७

१ प्रलयकालच्या मेघाप्रमाणें. २ आकाशांत. ३ तोंडातून शब्द निघत नाहीं असा. ४ कार्यभाग.

तेणें आल्हादें गर्जत। केला निश्चितार्थ जांबवंतें ॥४७॥ ऊरुवेग बाहुवेग। हनुमंताचा अंगवेग। कार्य साधोनिशां [1]सांग। येतो सवेग मारुति ॥ ४८ ॥ ऐसा जांबवंतीं इत्यर्थ। ऐकोनि वानर समस्त। अत्यंत आल्हादें नाचत। सीताशुद्ध्यर्थ साधला ॥ ४९ ॥

तमभ्रघनसंकाशमापतंतं महाकपिम्।
दृष्ट्वा ते वानराः सर्वे तस्थुः प्रांजलयस्तदा ॥१५॥
स तथैव गिरेः शृंगे निपत्य च महाजवः।
निपपात महेंद्रस्य शिखरे पादपाकुले ॥ १६ ॥
ततस्ते प्रीतमनसः सर्वे वानरपुंगवाः।
हनुमंतं महात्मानं परिवार्योपतस्थिरे ॥ १७ ॥
हनुमांस्तु गुरून्वृद्धान्जांबवत्प्रमुखांस्तदा।
कुमारमंगदं चैव सोऽवदत महाकपिः ॥ १८ ॥
स ताभ्यां पूजितः पूज्यः कपिभिश्च सभाजितः।
दृष्टा देवीति विश्रांतः संक्षेपेण न्यवेदयत् ॥१९॥

समस्त वानरांनीं केलेलें हार्दिक स्वागत—साधोनि सीताशुद्ध्यर्थ। पैल आला रे हनुमंत। इंद्रकीळ नीळपर्वत। तैसा शोभत मारुति ॥ ५० ॥ येतां देखोनि हनुमंत। वानरवीर हर्षयुक्त। उभे ठाकले समस्त। उभय हस्त जोडोनी ॥५१॥ फळीं पुष्पीं वृक्षयुक्त। महेंद्रगिरि सुशोभित। हनुमंत स्ववेगें आला तेथ। वानर जेथ उभे असती ॥ ५२ ॥ एकें उड्डाणें हनुमंत। समुद्र लंघोनि समस्त। वेगें आला महेंद्रांत। वानर जेथ उभे असती ॥ ५३ ॥ धांवतां हनुमंताचेनि वेगें। वायु टणकोनि राहिला मागें। मनोवेगाहुनि वेगें। आला सवेग मारुति ॥ ५४ ॥ नाहीं लागली पैं धाप। नाहीं [2]स्वेद नाहीं कंप। श्रीराम स्मरतां [3]चिद्रूप। आला सुखरूप हनुमंत ॥ ५५ ॥ जैसा श्रीरामाचा बाण। कार्य साधोनि संपूर्ण। परतोनि हाता ये आपण। तैसें आगमन कपीचें ॥ ५६ ॥ नळ नीळ जांबुवंत। अंगदादि वीर समस्त। त्यांतें देखोनि हनुमंत। नाम गर्जत आनंदें ॥ ५७ ॥ श्रीराम जयराम या गजरीं। हनुमान गर्जत अंबरीं[1]। वानरीं गर्जविला गिरी[2]। नामोच्चारीं जय जय राम ॥ ५८ ॥ श्रीराम जय राम नाम। गर्जताती प्लवंगम[3]। नादें गर्जवीत व्योम[1]। आला सप्रेम हनुमंत ॥ ५९ ॥ नामें कोंदलें अंबर। नामें कोंदलें गिरिकंदर। करीत नामाचा गजर आला वानर हनुमंत ॥ ६० ॥ देखोनियां वानरगण। करीत श्रीरामाचें स्मरण। हनुमान घाली लोटांगण। वंदीत चरण सर्वांचे ॥ ६१ ॥ साधोनि आलों सीताशुद्ध्यर्थ। गर्व नाहीं हनुमंतांत। ज्यातें त्यातें अभिवंदित। भूतीं भगवंत देखोनि ॥ ६२ ॥ वृद्धत्वें जांबुवंत गुरु। प्रथम त्यासी नमस्कारु। अंगद जो कां राजकुमरु। केला नमस्कारु तयासी ॥ ६३ ॥ एवं युक्तपरंपरा। हनुमान वंदित वानरां। तेणें आल्हाद समग्रां। पवनपुत्रा[4] देखोनि ॥ ६४ ॥ सन्मानोनि हनुमंतातें। मध्यें बैसवोनि तयातें। वानर बैसले सभोंवते। सीताशुद्धीतें पुसावया ॥ ६५ ॥ जांबुवंतादि पूज्य समस्त। तिहीं¶ पूजिला हनुमंत। तेणें आल्हादें सांगत। सीताशुद्ध्यर्थ साक्षेपें[5] ॥ ६६ ॥ लंका नगरी वसे सागरीं। तेथें रावण राज्य करी। तेथील प्रवेश अटक[6] भारी। सुरासुरीं दुर्धर ॥ ६७ ॥ रामनामाचे निजनेटें। उड्डाण करोनियां नेटें। लंका शोधिली त्रिकूटें। समसगटें[7] पुरगृहें ॥ ६८ ॥ रावणाच्या निजभवनीं। सीता भेटली अशोकवनीं। तियें धाडिलें खूण देउनी। मस्तकमणि हा सीतेचा ॥ ६९ ॥ मणि देखोनि अलंकार। वानरीं केला

१ संपूर्ण. २ घाम. ३ ज्ञानस्वरूप.

† ड– + सीता.

१ आकाशांत. २ पर्वत. ३ वानर. ४ मारुतीला. ५ आग्रहानें. ६ प्रतिबंध. ७ एकदर.

¶ व–तेहीं. † क्ष–तिनें, कष-तयें.

जयजयकार। रामनामाचा गजर। नामें वानर गर्जती ॥ ७० ॥ सीता भेटली साचार। मणि मस्तकालंकार। तें देखोनियां वानर। केला भुभु:कार स्वानंदें ॥ ७१ ॥

+ते नगान्नगमागाणि‡ शिखराच्छिखराणि च।
प्रहृष्टाः समपद्यंत हनुमत दिदृक्षवः ॥ २० ॥
ते प्रीताः पादपाग्राणि द्रुमशाखाश्च पुष्पिताः।
वासांसीव प्रकाशानि समवाप्यत लागुले. ॥ २१ ॥
क्ष्वेडत्यन्ये इसत्यन्ये गर्जत्यन्ये महाबलाः।
चक्रुः किलकिलामन्ये प्रतिगर्जंति चापरे ॥ २२ ॥
केचिदुच्छ्रितलागूला प्रहृष्टाः कविकुजरा.।
आवर्तांचितदीर्घाणि लागूलानि प्रविव्यधुः ॥ २३ ॥
अपरे तु हनूमतं श्रीमत वानरोत्तमम्।
आप्लुत्य गिरिशृंगेषु सस्पृशंति प्रहर्षिता' ॥ २४ ॥
स्तुवंति च नमस्यति परिष्वंजति चापरे ॥ २५ ॥

वानराचा हर्षोद्रेक व लीळा व हनुमताची भेट—वृक्षींहोनि वृक्षांतरीं। पर्वताहोनि पर्वतावरी। हरिखें उडिजे वानरीं। सीता सुंदरी सांपडली ॥ ७२ ॥ श्वेत सुनीळ आरक्त। शाखा कपिपुच्छीं पुष्पित। जैशा वस्त्रगुढिया गगनाआत। तैसी शोभा कपिपुच्छीं ॥ ७३ ॥ फळित पुष्पित शाखांवरीं¶। पुच्छगुढिया गगनांतरीं[१]। उभवोनि नाचिजे वानरीं। सीता सुंदरी सांपडली ॥ ७४ ॥ सीतामस्तकींचें मणिरत्न। पहावया अवघे जण। हरिखें करोनि उड्डाण। वानरगण दाटले ॥ ७५ ॥ मस्तकमणि देखोनि डोळा। हरिख वानरां सकळां। पुच्छ उभविती अंतराळां[१]। स्वानदलीळा नाचती ॥ ७६ ॥ येरयेरां हाणिती धडका। येरयेरां लाविती चडका। येरयेरां देती धक्का। पाडिती देखा येरयेरां ॥ ७७ ॥ येरयेरां दाविती वांकुल्या। येरयेरां गटांगुळिया। येरयेरां गुदगुदल्या। कर्णीगुळिया येरयेरां ॥ ७८ ॥ येरयेरां कौतुकीं। जानुघातें हाणिती ढकी। येरयेरां हाणिती बुकी। वानर हर्षी उपरमोनी ॥ ७९ ॥ येरयेरां निखंदिती[१]। येरयेरां उपहासती। येरयेरां निर्भर्त्सिती। वीर गर्जती आल्हादें ॥ ८० ॥ एक किळकिळती वानरजाती। एक रामनामें गर्जती। एक भुभु:कार देती। सीता सती सांपडली ॥ ८१ ॥ आधीं मधीं हनुमंता। कोण वंदील पाहों आतां। उडिया टाकोनि असंख्यता। चरणीं माथा ठेविती ॥ ८२ ॥ जीव देणें हे गोड गोष्टी। हनुमान वीर जगजेठी। शुद्धि आणिली उठाउठीं। वानरकोटी नाचती ॥ ८३ ॥ विचित्र शाखा धरोनि पुच्छाग्रीं। पुच्छ उभवोनि अंबरीं। वानर नाचती सुखोद्गारीं। सीता सुंदरी सांपडली ॥ ८४ ॥ वानरीं मिळोनि एकमेळीं। रामनामाच्या कल्लोळीं। अवघीं पिटोनियां टाळी। हनुमानाजवळी मीनले ॥ ८५ ॥ वानरीं मिळोनि समस्त। हनुमंताची स्तुति करित। अनुक्रमें आलिंगित। अभिवंदित[२] स्वानदें ॥ ८६ ॥

+त मारुतिं महावीर्यं राक्षसैः क्षतविग्रहम्।
समीक्ष्य हृष्य. सर्वे परिवार्य समततः ॥ २६ ॥
ततस्तमब्रवीद्वाक्य जांबवानगदस्तदा।
ब्रूहि वानरशार्दूल कृत कर्म सुदुष्करम् ॥ २७ ॥
अपि दृष्टा त्वया सीता रामस्य महिषी प्रिया।
प्रशस्तवर्णो हि शुभस्तवागुलिगतो मणि' ॥ २८ ॥

अगदाची सविस्तर वृत्ताताची विनंति—अंगद युवराज प्रज्ञावंत[३]। नळ नीळ पनस जांबवत। गज गवय गवाक्ष युक्त। जुत्पती[४] समस्त

१ आकाशात.

‡ब—ते नगान्नगा. ¶ब—शाखांवरी.

+ अ. ५७।२६, २७, ४२, ४५.

१ निषेध करतात. २ नमस्कार करतात.
३ ज्ञानवान्. ४ वानरवीर.

+ अ. ५७।३२–३८.

बैसले ॥ ८७ ॥ मध्यें बैसविला हनुमान वीर । घायीं सर्वांग जर्जर । तें देखोनि वीर झुंझार[1] । विस्मय थोर पावले ॥ ८८ ॥ हनुमंत हा वज्रदेही । तोही ओरखडला घायीं । दारुण युद्ध जालें पाहीं । कपींतें कांहीं सांगेना ॥ ८९ ॥ आणिकही वानरभार । देखोनि हनुमान घायीं जर्जर । म्हणती युद्ध घोरांदर[2] । अति दुस्तर येणें केलें ॥ ९० ॥ ऐकावया हनुमंताचें रण । वानरां येतसे स्फुरण । करोनि सीताशुद्धिप्रश्न । रणकंदन पुसावें ॥ ९१ ॥ हा तव बलाढ्य स्वयें । हनुमंतें युद्ध केलें आहे । हनुमंताचे निजवायें । कोण साहे रणरंगीं ॥९२॥ सिंह बोराटी¶ ओरबडे । तैसे शस्त्रांचे वरखडे । हनुमंताचे मागेंपुढें । चहूंकडे दिसताती ॥ ९३ ॥ आपुले युद्धाची निजख्याती । स्वमुखें न सांगे मारुती । सीताशुद्धीच्या प्रश्नोक्तीं । युद्धव्युत्पत्ती पुसावी ॥ ९४ ॥ अंगद जो कां युवराजा । वार्ता पुसे पवनात्मजा[3] । कैसेनि भेटली रामभाजा[4] । समूळ ओजा[5] मज सांगें ॥ ९५ ॥ कोणे भुवनीं कोणे स्थानीं । तुज भेटली सीता जननी । कैसेनि दिधला मस्तकमणी । समूळ काहणी मज सांगें ॥ ९६ ॥ ऐकोनि अंगदाचा प्रश्न । हनुमंत परम विचक्षण । सीताशुद्धीचें लक्षण । स्वमुखें आपण सांगत ॥ ९७ ॥

+ एतच्छ्रुत्वा शुभं वाक्यमङ्गदस्य विपश्चितः ।
हनुमानब्रवीद्धृष्टः सर्वांस्तान्हरियूथपान् ॥ २९ ॥
अशोकवनिकामध्ये दृष्टा सा जनकात्मजा ।
रक्ष्यमाणा सुघोराभी राक्षसीभिरनिंदिता ॥ ३० ॥
एकवेणीधरा बाला रामदर्शनलालसा ।
उपवासपरिश्रान्ता जटिला मलिना कृशा ॥ ३१ ॥
यत्नेन महता दृष्टा सा मया जनकात्मजा ।
तया च सह संवादं कृत्वा पृष्ट्वा ह्यनामयम् ॥ ३२ ॥
अभिज्ञानं गृहीत्वा च सिद्धार्थोऽहमिहागत ॥ ३३ ॥

हनुमानाचें संक्षेपानें कथन–अंगदाचें शुभ वचन । ऐकोनि हनुमंत हास्यवदन । सीताशुद्धीचें लक्षण । करोनि गौरव सांगत ॥ ९८ ॥ अंगद युवराजा समर्थ । नळ नीळ जांबुवंत । ऐका वानरवीर समस्त । सीताशुद्ध्यर्थ संक्षेपें[1] । ॥ ९९ ॥ लंकादुर्ग अति दुर्धर । सभोंवता समुद्र दुस्तर । त्यामाजी रावणाचें नगर । लंकापुर ज्या नांव ॥ १०० ॥ तेथें रिघतां अति दुर्घट । मीहि पावलों परम कष्ट । नामें निरसोनि संकट । विघ्नें सपाट रामनामें ॥ १ ॥ त्याहीमाजी रावणभुवन[2] । त्याहीमाजी राणिवसा[3] गहन । त्याहीमाजी अशोकवन । सीता चिद्रत्न त्यामाजी ॥ २ ॥ सीतेपासीं संरक्षण । कराळ विक्राळ दारुण । भयानका राक्षसी रक्षण । तेथें कोण रिघों शके ॥ ३ ॥ दुष्ट दुर्मुख दारुण । ब्रह्मराक्षस रक्षोगण । सप्तावर्ती भ्यासुर पूर्ण । तेथें कोण रिघों शके ॥ ४ ॥ अशोकवन अति दुर्घट । वाऱ्या[4] तेथें न फुटे वाट । तेथेंही रिघालों करुनि कष्ट । अनेक संकटें सोसूनी ॥ ५ ॥ सीता स्वयमेव देखिली दृष्टी । तरी घेवों न शकें भेटी । भोंवती राक्षसांची घरटी[5] । वृक्षसंपुटीं[6] मी लपालों ॥ ६ ॥ सीतानिजदुःखदर्शन । नाहीं आस्तरण[7] ना प्रावरण[8] । एक वस्त्र परिधान । अति मळिण मळगंधी ॥ ७ ॥ नाहीं स्नान ना भोजन । उपवासें कृश दीन वेणी वळिली जटाबंधन । मंगलस्नान असेना ॥ ८ ॥ तरी धन्य सीता सती । श्रीरामभजनीं अति प्रीती । जागृतीं स्वप्न आणि सुषुप्तीं । श्रीरामस्मृती विसरेना

१ लढवय्ये. २ अति भयंकर. ३ वायुपुत्राला (मारुतीला). ४ रामपत्नी सीता. ५ वृत्तांत.

¶ब–सिंहबोराटिये वरखडे. + अ. ६७।२९-४१.

१ थोडक्यांत. २ रावणाचा वाडा. ३ जनानखाना. ४ वाऱ्याला. ५ वेष्टण. ६ झाडांच्या डहाळ्यांत. ७ अंथरूण. ८ पांघरूण.

॥ ९ ॥ सीता सती सावधान। करितां श्रीरामस्मरण। वृक्ष वल्ली तृण पाषाण। श्रीरामभजन जपताती ॥ ११० ॥ धन्य सीतेची रामभक्ती। सर्वेंद्रियीं श्रीरामस्फूर्ती। राम देखे सर्वां भूतीं। त्रिजगतीं रामनामें ॥ ११ ॥ ऐसी असतां सहजस्थिती। श्रीरामभेटीची अत्यासक्ती। मजलागीं ये काकुळती। श्रीरघुपति भेटवीं ॥ १२ ॥ त्यां सांगितली गुह्य गोष्टी। श्रीरामा तुझी आवडी मोठी। मज धाडिलें शुद्धीसाठीं। सीता गोरटी कोठें आहे ॥ १३ ॥ तुझी ठायीं पडलिया शुद्धी। घेवोनि वानरांची मांदी[1]। श्रीराम येईल त्रिशुद्धी। दिधली मुदी रामाची ॥ १४ ॥ मुद्रिका देखतांचि दृष्टीं। हरिखली सीता गोरटी। हरिखें माझी पाठी थापटी। जाईं उठाउठीं शुद्धि सांगें ॥ १५ ॥ सखा जिवलग मज तूं आतां। तुझे चरणीं ठेविले माथा। शीघ्र जावोनि हनुमंता। श्रीरघुनाथा आणावें ॥ १६ ॥ शीघ्र करावया गमन। त्यां मागितलें अभिज्ञान[2]। मस्तकमणि घेवोनि खूण। आलों धांवोनि तुम्हांपासीं ॥१७॥ लंकेसीं आहे सीता सती। शुद्धि त्या आणिली निश्चितीं। विकल्प न धरावा चित्तीं। चला रघुपतीला शुद्धि सांगों ॥ १८ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। वानरां तत्क्षमळ पूर्ण। न सांगेचि युद्ध दारुण। बुद्धि कोण करावी ॥ १९ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। अंगद सुखावला आपण। सीताशुद्धि तुवां आणून। रामाचा प्राण वाचविला ॥ १२० ॥ वानरांच्या कोट्यनुकोटी। पडल्या होत्या प्राणसंकटीं। तुवां वांचविल्या उठाउठीं। शुद्धिसाठीं सीतेच्या ॥ २१ ॥ धन्य जीवित्व हनुमंता। शुद्धि आणिली तत्वतां। हर्ष सांगावया रघुनाथा। उल्लासता अंगदा ॥२२॥ तंव बोलिला जांबवंत। निधडा[3] वीर हा हनुमंत। कैसेनि भेटला लंकानाथ। युद्धकंदनार्थ कां जाला ॥ २३ ॥

+जाम्बवान्सर्ववृत्तान्तमपृच्छन्मरुतात्मजम्।
कथं दृष्टा त्वया सीता कथं वा तत्र वर्तते ॥ २४ ॥
संवादश्च कथं वृत्तः क्रूरकर्मा हि रावणः।
एतत्सर्वं समासेन प्रब्रूहि त्वं महाभुज ॥ २५ ॥

हनुमताचे अंगावर शस्त्रघात दिसल्यावरून जांबुवंत युद्धाचा वृत्तान्त विचारतात–जांबुवंत म्हणे हनुमंता। तूं वज्रदेही तत्वतां। तुझे अंगीं देखों शस्त्रघाता। त्या युद्धार्थी सांगावें ॥ २४ ॥ रावण क्रूर आणि कपटी। कैसी त्यासीं जाली भेटी। सीता भेटली संकटीं। त्या गुह्य गोष्टी सांगाव्या ॥ २५ ॥ तुवां गांजिला इंद्रजित्त। पिता पवन होता सांगत। त्या नीळासीं एकांत। पुत्रपुरुषार्थे तो वदला ॥ २६ ॥ त्या युद्धाची समूळ कथा। कृपेनें सांगावी हनुमंता। समुद्रलंघनाची वार्ता। तेही तत्वतां सांगावी ॥ २७ ॥ येचिविशीं हनुमंतीं। पूर्वीं बुद्धि स्फुरली होती। वार्ता पुसलिया श्रीरघुपती। स्वमुखें कीर्ति नये सांगों ॥ २८ ॥ स्वामीनें पुशिलिया जाण। वार्ता वंचूं[1] नये आपण। वंचितांचि लागे दूषण। बुद्धि कोण करावी ॥ २९ ॥ स्वमुखें सांगों नये कीर्ती। वंचूं नये स्वामीप्रती। ऐसिये संकटीं मारुतीं। प्रजापती विनविला ॥ १३० ॥

आपणच आपले पराक्रम वर्णन करणें अप्रशस्त म्हणून हनुमताचे विनतीवरून ब्रह्मदेवानें वर्णन-लेख लिहिला–वंदोनि ब्रह्मयाचे चरण। हनुमंत विनवी पैं आपण। लंकेमाजीं झालें वर्तन। पत्र लेहोन मज द्यावें ॥ ३१ ॥ स्वामीपासीं निजपुरुषार्थ[2]। जो सांगे तो मूर्खोन्मत्त। वंचितां पावे अधःपात। हा शास्त्रार्थ स्वामीचा ॥ ३२ ॥ नाहीं दुसरा सांगाती[3]। तो सांगता माझी कीर्ती। मज माझी पडली गुंती। पत्र तदर्थीं मज द्यावें ॥ ३३ ॥ माझा समस्तही

१ समुदाय. २ खूण. ३ पराक्रमी.

१ लपवूं नये. २ स्वपराक्रम. ३ सोबती. + ५८।२,४

पुरुषार्थ । ब्रह्महस्तींचें ब्रह्मलिखित । सत्य मानील श्रीरघुनाथ । निश्चितार्थ मज माझा ॥३४॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । हांसिनला चतुराननन । परम प्रीतीं आलिंगून । पत्र लेहोन दिधलें ॥ ३५ ॥ वीर शूर गुणगंभीर । शास्त्रवेत्ता अति चतुर । समयोचित जाणोनि विचार । निधडा वीर हनुमंत ॥ ३६ ॥ उल्हासोनि प्रजापती । आदरें स्तवोनि मारुती । अत्यंत कपीची ख्याती । पत्र प्रीतीं दिधलें ॥३७॥ तेंचि ब्रह्मपत्र घेवोनि हातीं । उल्हासें उडोनि मारुती । वंदोनियां सीता सती । वानराप्रती स्वयें आला ॥ ३८ ॥

त्याचा अर्थ कळणार नाहीं म्हणून त्याचें वाचन रामावांचून करणें अप्रशस्त, करितां तो तसाच ठेविला—जांबवंतें पुसता ख्याती । ब्रह्मलिखित दिधलें हातीं । रिसांसी[1] नळे अर्थशास्त्री । पडली गुंती गुणगुणित ॥ ३९ ॥ लक्ष्मणासीं वाचकशक्ती । तो तंव शेषावतारमूर्ती । कां अर्थ जाणे श्रीरघुपती । येरांची युक्ति सरेना ॥ १४० ॥ जांबवंताची बुद्धि कैसी । अर्थ न कळे आपणासी । कळों नेदीच वानरासी । युक्ति विशेषीं चालविली ॥ ४१ ॥ ब्रह्मलिखित संपूर्ण । श्रीरामावांचोन आपण । वाचितां लागे दूषण । पत्र घेवोन तेथें जावें ॥ ४२ ॥ बैसवोनि श्रीराममूर्ती । बैसवोनि सुग्रीव कपिपती । पत्र देवोनि सौमित्राप्रती । अर्थयुक्तीं वाचावें ॥ ४३ ॥ युक्ति मानली समस्तां । शुद्धि सांगोनियां सीता । अवश्य भेटावें श्रीरघुनाथा । मग पत्रार्थी वाचावें ॥४४॥ ऐसा करोनि समधार[2] । उठिला वानरांचा भार[3] । अवघीं केला जयजयकार श्रीरामचंद्र लक्षोनि ॥४५॥ एका जनार्दना शरण । हनुमंतासी रामदर्शन । आनंदें ओसंडलें[4] गगन । सुखसंपन्न श्रीराम ॥४६॥ वाचितां ब्रह्मलिखितार्थ । उल्हासेल श्रीरघुनाथ । वानरां उल्हास अद्भुत । तो कथार्थ अवधारा ॥ ४७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताशुद्धिहनुमदागमनं नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ओंव्या ॥ ॥ १४७ ॥ श्लोक ॥ ३५ ॥ एवं ॥ १८२ ॥

१ अस्वलाला ( जांबवानाला ). २ विचार. ३ समुदाय. ४ भरल.

---

## अध्याय २४ वा

॥ श्रीजगद्गुरवे नमः ॥

+सर्वथा सीतया दग्धस्तपसा स निशाचरः ।
निमित्तमात्र रामस्तु वधे तस्य भविष्यति ॥ १ ॥
तस्य तद्वचनं श्रुत्वा वालिसूनुरभाषत ।
जाम्बवत्प्रमुखान्सर्वान्हनुमंत महाकपिम् ॥ २ ॥
अहं त रावणं सख्ये ससैन्य सपुरःसरम् ।
सहपुत्रं वधिष्यामि ससुहृद्बांधव युधि ॥ ३ ॥
किं पुनः सहितो वीरैर्बलवद्भिः कृतात्मभिः ।
लकां च त्वरया हतुं रावण च बलोत्कटम् ॥४॥

हनुमतानें सांगितलें कीं सीतेच्या तेजानें रावण भस्मप्रायच झालेला आहे—हनुमंत सांगे वीरांप्रती । सीता तपस्विनी श्रीरामसती । तिनें राक्षसांची वीर्यशक्ती । नेली भस्मातीं कोपाग्नीं ॥ १ ॥ रावणाची शक्ति तेजोराशी । सीतेनें भस्म केलें त्यासी । राम निमित्त मारावयासी । रावणासी रणरंगीं ॥ २ ॥ सीताक्षोभें दशानन[1] । जळोन भस्म जाहला जाण । पतीस यश दिधलें पूर्ण । रामें रावण मारिला ॥३॥ सीता जाळी श्रीराम मारी । ऐसेनि राक्षसांची बोहरी[2] । क्षणें होईल लंकेमाझारी । सांगे वानरीं हनुमंत ॥ ४ ॥

तें ऐकून अंगदास स्फुरण चढलें व आपणच सर्वांचा संहार करून यावें असें सुचवितो—ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगदा आलें अति स्फुरण ।

१ दहा तोंडाचा ( रावण ). २ नाश.

+ वा. रा. ५।५९, ९, ५, ७ ८, ६०।१.

सीतेनें जाळिला दशानन। मारितां आपण भय काय ॥ ५ ॥ एकला एक मी अंगदु। छेदोनि रावणाचा कंदु[१]। स्वजन सुहृद सखे बंधू। करीन वधू ससैन्येंसीं ॥ ६ ॥ सखा सुहृद वीर जगजेठी। तुम्हीं राखिल्या माझी पाठी। ते मी लंकेच्या त्रिकूटीं। राक्षसकोटी मारीन ॥ ७ ॥ कुंभकर्णेंसीं दशवक्त्र[२]। इंद्रजितासहित राजपुत्र। प्रधान मारीन सर्वत्र। सैन्यसमुद्र मंथीन मी ॥ ८ ॥ हनुमंतें मारिले वीर समर्थ। इंद्रजित केला मेला ना जित। रावणा केलें हताहत। असे धुकधुकित वांचला ॥ ९ ॥ हनुमंतासमवेत। आम्हीं गेलिया पैं तेथ। धाकेंचि मरतील समस्त। लंकानाथ तो किती ॥ १० ॥ रणीं मारोनि रावण। सीता घेवोनि आपण। यावें विजयेंसीं गर्जोन। गुढी उभवून स्वानंदें ॥ ११ ॥ पुढें ठेवोनियां सीता। श्रेष्ठ भेटी श्रीरघुनाथा। तेणें उल्लास समस्तां। कपिनाथा सुग्रीवा ॥ १२ ॥ सीतेवीण रामापासीं। जावोनि काय सांगावें त्यासी। बहुत दिवस लागले शुद्धीसीं। लाज आम्हासीं भेटतां ॥ १३ ॥ भेटी घेतां रिते हातीं। पहिले रिते आले जुत्पती। तेचि आम्हा हुरो लाविती। कपिपति क्षोभेल ॥ १४ ॥ राम आणि लक्ष्मण म्हणती। कटीं वानरांची शक्ती। ऐसी पावों उपहती[३]। माझी विनती नायकतां ॥ १५ ॥ जाहलें मर्यादोल्लंघन। त्यावरी रितें जाऊन। तेव्हां सुग्रीव क्षोभोन जाण। करील अपमान तो ऐका ॥१६॥ काळें वदन खरारोहण। उपानहमाळांचें[४] भूषण। गोमयसुमनीं[५] अभिसिंचन। स्तुतिस्तवन फाल्गुनाचें ॥ १७ ॥

आतां कालातिक्रम झालेला आहे, तेव्हां अपमान करून घेण्यापेक्षां कार्यपूर्ती करून आणें बरें—तुम्हां वानरां समस्तां। मानें लोटांगण आतां। सीते- वांचोनि सर्वथा। भेटी रघुनाथा न जावें ॥ १८ ॥ तेथें सहावा अपमान। याहूनि लंकेसी जाऊन। ससैन्य रावण निर्दाळून। सीता घेऊन शीघ्र यावें ॥ १९ ॥ ऐसें बोलतां अंगदासीं। अति स्फुरण आले त्यासी। रोमांच थरकती सर्वांगासीं। पुच्छ आकाशीं तळपत ॥ २० ॥ रणआवेश अंगदातें। देखतां आलिंगिलें हनुमंतें। वीर शूर पुरुषार्थें। जांबुवंतें वंदिला ॥ २१ ॥ वानर लागोनि पायांसी। शांत करिती युवरायासी। जांबुवंतें अति युक्तीसीं। अंगदासी समजाविलें ॥ २२ ॥

+अंगदस्य वचः श्रुत्वा जाम्बवान्वाक्यमब्रवीत्।
नैषा बुद्धिर्महाबाहो यां ब्रवीषि महाकपे ॥ ५ ॥
विचेतुं वयमाज्ञप्ता दक्षिणां दिशमुत्तमाम्।
नानेतुं कपिराजेन नैव रामेण धीमता ॥ ६ ॥
सर्वेषां कपिमुख्यानां कथं मिथ्या करिष्यति ॥ ७ ॥

जांबुवताचें म्हणणें कीं श्रीरामसुग्रीवाज्ञेच्या बाहेर जातां येत नाहीं—अंगदाचें प्रतापवचन। जांबुवंतें आयकोन। त्यासी द्यावया समाधान। पूर्वप्रस्थान[१] अनुवादे[२] ॥ २३ ॥ आम्हांसी धाडितां दक्षिणेसी। श्रीरामसुग्रीवाज्ञा ऐसी। तुम्हीं आणावें सीता- शुद्धीसी। मर्यादेसीं मासांतीं[३] ॥ २४ ॥ मारोनियां रावणासी। शीघ्र आणावें सीतेसी। श्रीरामाज्ञा नाहीं ऐसी। नाहीं नेमेंसीं राजाज्ञा ॥ २५ ॥ रावण मारितां आज्ञेवीण। श्रीराम क्षोभेल आपण। सुग्रीव कोपेल दारुण। तेंही कारण अवधारीं ॥ २६ ॥ श्रीरामें वाहिलीसे आण। स्वहस्तें विंधोनियां बाण। रणीं मारोनि रावण। सीता आपण सोडवूं ॥२७॥ तो आम्हीं मारोनि रावण। सीता आणितां आपण। आम्हीं भंगितां रामपण। तिघे जण क्षोभती ॥ २८ ॥ मिथ्या करितां श्रीरामपण। सुग्रीव कोपेल दारुण। कोपा चढेल लक्ष्मण। श्रीराम पूर्ण क्षोभेल ॥ २९ ॥

१ मूळ. २ दहा तोंडाचा ( रावण ). ३ विटंबना. ४ जोड्याच्या माळांचें. ५ शेणमारानें.

१ पूर्वी ठरलेली गोष्ट. २ सांगूं लागला. ३ महिन्याचे अखेरीला. + अ. ६०।१६,१७,१८.

व हाच विचार हनुमंतानेंही केला असावा—रावण जरी मारूं येता। तरी कां हनुमंत सोडिता। निर्दळोनि लंकानाथा। सीता आणिता निमेषार्धें ॥ ३० ॥ धन्य हनुमंताचें ज्ञान। श्रीराममर्यादा पाळून। यालागीं न मारीच रावण। आला घेऊन शुद्धीसी ॥ ३१ ॥ ऐसा निश्चयो ऐकतां। अंगदें वंदिलें जांबुवंता। वीर शूर विवेकी ज्ञाता तुज-परता[1] असेना ॥ ३२ ॥

+तस्माद्गच्छामहे सर्वे यत्र रामः सलक्ष्मणः।
सुग्रीवश्च महातेजाः कार्यस्यास्य निवेदने ॥ ८ ॥
बाढमित्येव चोक्त्वा वै प्रस्थानं समरोचयन्।
प्रतस्थिरे ततः सर्वे वायुपुत्रपुरस्सराः ॥ ९ ॥
महेंद्राद्रिं परित्यज्य पुप्लुवुर्वानरोत्तमाः ॥ १० ॥

जांबवंताचे सूचनेप्रमाणें सर्व वानर परत जावयास निघाले—जांबुवंताचे वचनमेळीं[2]। शुद्धि सांगावया जनकबाळी। शीघ्र जावया रामाजवळी। पिटिली टाळी वानरीं ॥ ३३ ॥ पुढें करोनि हनुमंत। अंगदादि वीर समस्त। रामनाम स्वयें गर्जत। भुभुःकारत उठावले ॥ ३४ ॥ आधीं वंदोनि श्रीरामासी। सवेंच वंदोनि लक्ष्मणासी। लोटांगण सुग्रीवासी। सीताशुद्धीसी सांगावया ॥ ३५ ॥ त्यजोनियां महेंद्रगिरी। उड्डाण केलें पैं वानरीं। एकाहूनि एकवरी। वीर अंबरीं दाटले ॥ ३६ ॥ हस्तचित्रांचें आभाळ। जैंवी आल्हादी रविमंडळ। तैसे वानर सकळ। उतावीळ चालिले ॥ ३७ ॥ उड्डाण करितां वानरीं। पर्वत खचती धरणीवरी। समूळ उपडोनि तरुवरीं[3]। गगनांतरीं परिभ्रमती ॥ ३८ ॥

वाटेंत मधुवनाचा सुगंध आल्यावर वानरांची मधु-पानाची इच्छा—करीत उल्हासें आल्हाद। कपिकुळें चाललीं विविध। पुढें मधुवनांचा गंध। आला सुगंध वानरां ॥ ३९ ॥ गंध येतां नासापुटीं[1]। एक वानर लाळ घोटी। एक मटमटां देती मिठी। वानरकोटी तळमळिती ॥ ४० ॥ हें तंव सुग्रीवाचें वन। यासी दधिमुख नित्य रक्षण। येथे रिघों शके कोण। काय आपण करावें ॥ ४१ ॥ सीताशुद्धी-होनि देख। आम्हां मधुवन अधिक। कृपा करीं रघुकुळटिळक। एकमेक तळमळिती ॥ ४२ ॥ राम सर्वात्मा सर्वज्ञ। ऐसीं वदती पुराणें। आम्हां दिधलिया मधुपान। आम्ही सर्वज्ञ सत्य मानूं ॥ ४३ ॥ जिभेनें घेतली लोळणी। थाया[2] घेतला होठीं दोन्ही। मुख करताहे ग्लानी। मधुपानीं श्रीरामा ॥ ४४ ॥ सुग्रीवाचें मधुवन। सुरां असुरां अगम्य स्थान। ये वनींचें मधुपान[3]। कैंवी आपण पाविजे ॥४५॥ मनासी मधुपानीं वणवण। चित्तासी मधुपानीं चिंतन। केल्यावीण मधुपान। पुढें मन ढळेना ॥४६॥ ऐसे वानर समस्त। मधुपानीं अति आसक्त। कृपा करील रघुनाथ। तैंचि प्राप्त होय आम्हां ॥ ४७ ॥ राम सर्वांचे हृदयवासी। वानरां बुद्धी दिधली कैसी। प्रार्थोनियां हनुमंतासी। अंगदापासीं मागावें ॥ ४८ ॥ सुग्रीव कपिराजा प्रसिद्ध। तैसाचि युवराजा अंगद। हनुमंतें मागतां मद्य। देईल आल्हादेंकरोनी ॥ ४९ ॥

+ततस्ते वानरा हृष्टा दृष्ट्वा मधुवनं महत्।
हनुमंतमयाचंत जांबवत्प्रमुखास्तथा ॥ ११ ॥
स चांगदमुपागम्य अयाचत तदा मधु।
सिद्धार्थानां किलास्माकं प्रसादं कर्तुमर्हसि ॥ १२ ॥
श्रुत्वा हनुमतो वाक्यमंगदः प्रवगांगदः।
प्रत्युवाच महातेजाः पिबंतु हरयो मधु ॥ १३ ॥
अवश्यं कृतकार्यस्य वाक्यं हनुमतो मया।
अकार्यमपि कर्तव्यं किमंग पुनरीदृशम् ॥ १४ ॥

१ तुझ्याहून. २ बोलण्यावरून. ३ मोठमोठे वृक्षांवर.

+ अ. ५९।६०।१९, अ ६१.

१ नाकामध्यें. २ छद, हट्ट. ३ मद्यपान.

+ अ. ६१।११, १२. अ. ६२।२, ३४।१२.

ततः कुमारस्तान्सर्वान्जांबवत्प्रमुखान्हरीन् ।
अनुज्ञामददात्तेषा नि शर्क मधुभक्षणे ।। १५ ।

त्याप्रमाणें जांबवतादि वानरांची हनुमताकडून अंगदा

विनति– जांबवंतादि वानरांसीं । अवघे आ हनुमंतापासीं । आम्हांसी मधु भक्षावयासी । अंगदापासीं वन मागें ।। ५० ।। हनुमंत म्हणे अंगदासी कांहीं एक मागणें तुजपासीं । तूं तंव युवराज आम्हांसी । अति कृपेसीं मज देईं ।।५१।। अंग म्हणे हनुमंता । तुझेनि बोलें देईन जीविता । इत अर्थाची कोण कथा । सांग पां आतां काय दे ।। ५२ ।। वानर पीडले परदेशीं । श्रमले येतां अ वेगेंसीं । मागताती मधुपानासी । तुजपासी महाराजा ।। ५३ ।।

अंगदाची तत्काळ अनुज्ञा–माझ्या पित्याचें हें वन सत्ता आहे मजअधीन । वनीं रिघोनि वानरगण करोत मधुपान यथेष्ट ।।५४।। बाळवृद्धादि अकर्मवंत त्यासी न मागतां राय देत । दीनदयाळबिरुदें पढत तुम्ही समस्त कृतकार्य ।। ५५ ।। तुम्हासही मागतां । म्यां अर्पावें निजजीविता । कायसी मधुवनाची कथा । हनुमंताचे निजबोलें ।। ५६ ।। ऐक हनुमंता सावधान । वाहतों श्रीरामाची आण वानरीं [1]ओलोडोनि वन । मधुपान करावें ।।५७। जांबवंतादि वीर प्रसिद्ध । आलिंगी कनकांगद अंगद । हनुमंताचे वंदोनि पद । करावें विवि मधुपान ।। ५८ ।।

वानरांचा हर्ष व अंगदाला धन्यवाद– ऐकोन अंगदाचें वचन । उल्लासले वानरगण । आक्रमोनियां हें वन । मधुपान मांडिलें ।। ५९ ।।

+पूजयित्वांगदं सर्वे यूथपालाश्च यूथपाः ।
ते प्रविष्टा मधुवनं पालानाक्रम्य शक्तितः ।।१६
ते ताडयतः शतशः सक्ता मधुवने तदा ।
त्रासयित्वा तु तान्सर्वान्वनपालान्बलोत्कटाः ।।१७
मधूनि द्रोणमात्राणि भक्षयंति प्रहृष्टवत् ।
लोडयंति स्म शतशः सर्वं मधुवनं तदा ।।१८।।
भक्षयंति सुगंधीनि मधूनि रसवंति च ।
जग्मुः प्रहर्षं ते सर्वे बभूवुश्च मदोत्कटाः ।।१९।।

अंगद वीर धीर महाशूर । राजकुमर अति उदार । जुत्पती[1] श्रेष्ठ सेनाधर । सहित वानर वानितीं ।। ६० ।। धन्य अंगदाची मती । धन्य अंगदाची स्थिती । अंगदाची उदार कीर्ती । स्वयें वानिती वानर ।। ६१ ।। लाहोनि अंगदआज्ञापन[2] । वनीं रिघोनि वानरगण । केलें वनकरांसी ताडण । जानुअपानमहामारु ।। ६२ ।।

वनरक्षकांना घालवून यथेच्छ मधुपान–नाहीं घेतले तोंडावरी । नाहीं मारिले बुक्यावरी । गांडगुडघ्याचे महामारीं । वनकर बाहेरी घातले ।।६३।। जानुअपानमारासाठीं । रावणें पळती बारा वाटीं । पळतां धाप लागली पोटीं । सांगती गोष्टी दधिमुखा ।। ६४ ।। पळवोनियां वनकर । वन आलोडिती वानर । मधु प्राशिती अति मधुर । देती वारंवार महामिटक्या ।। ६५ ।। प्रत्येक एक एक वानर । मधु प्राशिती द्रोणमात्र । मदें डुल्लती कपींद्र । वन समग्र व्यापोनी ।।६६।। किराणें[3] करिती तरुवरीं । एक उडती एकाचे शिरीं । एक लपती शाखांतरीं । एक वृक्षाग्रीं नाचती ।। ६७ ।। एक निजती वृक्षमूळीं । एक त्यांच्या पुच्छातळीं । घालिती मद्याची गुंरळी । मदविव्हळीं उन्मत्त ।। ६८ ।। वानर तृप्त मद्यपानीं । उर्वरित मद्य घेउनी । खेळती मद्याची शिंपणीं । आक्रमूनी[4] येरयेरां ।।६९।। येरयेरां पुच्छ हाणिती । येरयेरां पाठीं लागती । एक पडती अडखळती । एक लोळती उन्मादें ।। ७० ।।

१ शोधून, धुडून.

+ अ. ६२।५, ६,८,९, ११

१ युद्धातील मुख्य २ अंगदाची आज्ञा. ३ उड्या.
४ अडवून.

+खादंति केचिद्विहरंति केचित्
नदति केचित्प्रवदति केचित् ।
गायति केचित्प्रणमति केचित्
कुद्धयंति केचित्प्रलपति केचित् ॥ २० ॥
पठति केचित्प्रचरति केचित्
प्लवति केचित्प्रपतति केचित् ।
पिबति केचित्प्रवदति केचित्
नृत्यति केचित्प्लवगाः प्रहृष्टाः ॥ २१ ॥

व क्रीडाविहार–एक ते मधुपाना करिती । एक ते कोशिंबिरींसीं मद्य खाती । एक एकाचें मद्य हरिती । पात्र घेती हिसडोनी ॥ ७१ ॥ एक रडती एक पडती । एक ते ठायीं ठायीं अडखळती । एक ते मद्यानंदें नाचती । एक ते गाती रामकथा ॥७२ एक ते रागें रुसती । एक त्यांतें [1]बुझाविती । एक मद्यसुखें सुखावती । एक झुलती मदोन्मादें ॥७३॥ एक उन्मादका[2] वृत्ती[2] । अति दीर्घ हांका देती । एक ते गोड गोष्टी सांगती । विध्वंसिती वन एक ॥ ७४ ॥ वृक्ष मोडिती वानरें । उलंडिती मद्यपात्रें । फोडिती मद्यसाधकयंत्रें । वनचरें उन्मादें ॥ ७५ ॥

वनाधिप दधिमुखाकडे वनफळांचें गाऱ्हाणें–वानरीं त्रासिले वनपाळ । दुःखें पळाले ते सकळ । दधिमुखापासीं केवळ । आले विव्हळ अति दुःखी ॥ ७६ ॥

*अब्रुवन्परमोद्विग्ना गत्वा दधिमुखं तदा ।
तारांगदहनुमद्भिर्हतं मधुवनं कपे ॥ २२ ॥
वयं विकृष्टा जानुभ्यां देवमार्गं च दर्शिताः ।
यदत्रानंतरं कार्यं तच्च कर्तुमिहार्हसि ॥ २३ ॥

आमचे वानरवीर समस्त । मधुवनातें विध्वंसित। आम्हासीं निवारितां तेथ । दुःखाभिभूत[3] आम्हां केलें ॥ ७७ ॥ लाता बुक्या सुबद्ध[4] घाये । त्या घायांचें भय काये । शिव्या शाळ ताळ येतां पाहें । झेलिलें जाय तळपोनी ॥ ७८ ॥ हाणितां नेटें जानु अपान । गुदें आलीं गा सुजोन । जळो तुझें मधुवन । गुदकंदन कोण सोसी ॥७९॥ गांडगुढघ्याचा आघात । पुच्छें रिघालीं ढुंगांत । दधिमुखासी दुःख सांगत । सुजलीं दावित निजगुदें ॥ ८० ॥ तूं तंव आमचा गा नाथ । दुःख सांगितलें समस्त । यावरी जो कार्यार्थ । कर्तव्यार्थ विचारीं ॥ ८१ ॥

+तदा दधिमुखः क्रुद्धो वृद्धो मधुवनाधिपः ।
हतं मधुवनं श्रुत्वा हतांश्च वनपान्हरीन् ॥२४॥
एत गच्छत गच्छामो वानरानतिदर्पितान् ।
बलेन वारयिष्यामि प्रभुञ्जानान्मधूत्तमम् ॥२५॥
श्रुत्वा दधिमुखस्येदं वचनं वानरर्षभाः ।
पुनर्वीरा मधुवनं तेनैव सहिता ययुः ॥ २६॥

दधिमुखाचा क्रोध व वानरांवर ससैन्य आक्रमण–ऐकोनि वानरांचें वचन । दधिमुख क्रोधायमान । वानरसैन्य आश्वासून । आले परतून मधुवना ॥ ८२ ॥ अंगद हो कां राजसुत । हनुमंत हो कां अति आप्त । राजाज्ञा जे उल्लंघित । तेही समस्त दंडीन ॥ ८३ ॥ वालिसुग्रीवांचा पिता । ऋक्षराजादारभ्यता[1] । मी या वनाचा रक्षिता । कपी समस्तां कळलेंसे ॥ ८४ ॥ त्याही मज न पुसतां । राजाज्ञाही न घेतां । केली मधुवनासीं उद्धतता । त्या समस्तां दंडीन ॥ ८५ ॥ ऐसें सांगोनि वनकरांसी । क्रोध आला दधिमुखासी । दंडिलें माझ्या सेवकांसी । मीही त्यांसी दंडीन ॥ ८६ ॥

*ते स्वामिवचनं वीरा हृदये सन्निधाय च ।
द्रुमः सप्रधृष्यतः शालतालशिलायुधाः ॥२७॥
मध्ये चैषां दधिमुखः प्रगृह्य च महातरुम् ।
समभ्यधावन्वेगेन ते च सर्वे प्लवंगमाः ॥ २८॥
वृक्षस्थाश्च स्थलस्थाश्च वानरा बलदर्पिता ।
अतिचक्रमिरे वीरान्पालान्शतसहस्रशः ॥ २९ ॥

१ समजाविती. २ मदोन्मत्त होऊन.
३ दुःखपीडित. ४ जोराचे.
+ अ. ६१।१६ * अ. १७।१८

१ ऋक्षराजापासून.
+ अ. ६२।१९,२०,२१. * अ. २२।२६,२७

समुक्ष तं दधिमुखमापतत महाबलम् ।
वेगवंत निजग्राह बाहुभ्या कुपितोऽगद. ॥३०॥
मदांधो न कृपा चक्रे आर्य कोऽय ममेति स ।
अथैन निष्पिपेषाशु वेगेन वसुधातले ॥३१॥

ऐकोनि दधिमुखाचे बोल । वानरवीर वनपाळ[1]। घेवोनि शिळा शाळ ताळ । सन्नद्ध[2] सकळ चालिले ॥ ८७ ॥ गांडी सुजल्या गांडगुढघ्यांसीं । तो राग वनकरांचे मानसीं । घेवोनि आले दधिमुखासी । वानरांसी त्राहाटिलें ॥ ८८ ॥ जळस्थ स्थळस्थ वनस्थ । वानर सुग्रीवासीं भयभीत । अंगदापासीं आले धांवत । दुरोनि दावित दधिमुखा ॥ ८९ ॥ मध्यें दधिमुख वीर । हातीं प्रचंड शाळ तरुवर । भोंवता वानरांचा भार । अति दुर्धर लोटला ॥९०॥ जांबवंतासीं समानबळी । दधिमुख जो आतुर्बळी[3]। वृक्ष घेवोनि करतळीं । करी रवंदळी[4] वानरां ॥९१॥

दधिमुखाने फेंकलेल्या साल वृक्षाचेच प्रत्याघातानें त्याचा पाडाव–सुग्रीवआज्ञा अति समर्थ । मधुवन केलें हाताहत । दधिमुख धाडिला दंडार्थ । कपि सांगत अंगदा ॥ ९२ ॥ दधिमुख अविचार । अंगद हनुमंतादि बळी वीर । यांचा न घेतां विचार । कोपें तरुवर सोडिला ॥ ९३ ॥ तमालवृक्ष येतां वरी । अंगद उडोनि ते अवसरीं । वृक्ष झेलिला वरिचे वरी । सवेंच मारी दधिमुखा ॥ ९४ ॥ अंगद कोपला महावीरु । मदोन्मत्त अति दुर्धरु । पित्याचा मातुळ नये मारूं । हाही विचारु विसरला ॥९५॥ दधिमुख कपि वृद्धता[5] । परम पूज्य अति श्रेष्ठता । हेंही नाठवे अंगदाचे चित्ता । क्रोधोन्मत्तता मारिला ॥ ९६ ॥

+स भग्नबाहूरुमुखो विह्वल: शोणितोक्षित. ।
प्रमुमोह महावीर्यो मुहूर्तं कपिकुंजरः ॥ ३२ ॥

१ वनरक्षक. २ सज्ज होऊन. ३पराक्रमी. ४ नाश. ५ वृद्ध अवस्थामुळें + २८, २९

स कथंचिद्विमुक्तस्तैर्वानरैर्वानरर्षभः ।
उवाचैकांतमागत्य स्वान्भृत्यान्समुपागतान् ।
तत्र गच्छत गच्छामो भर्ता नो यत्र वानर ॥३३॥

सावध झाल्यावर सुग्रीवाकडे जाऊन गाऱ्हाणें– दधिमुखें हाणिता तरुवरीं । अंगदें झेलिला वामकरीं[1] । दधिमुख हाणोनि सव्यकरीं । धरणीवरी पाडिला ॥ ९७ ॥ हात पाय अव्यवस्थ विकळ । भग्न मस्तक नेत्र विक्राळ । अशुद्धें[2] जाला बंबाळ । मुख विकाळ विचकिलें ॥९८॥ दधिमुख उचलोनि वानरीं । टाकिला मधुवनाबाहेरी । उदक सिंपिजे वानरीं । वारा वनकरीं घालिजे ॥ ९९ ॥ दधिमुख सावध झाला । सांगे वनकरां सकळां । सुग्रीवापासी सांगों चला । आम्हांसी केला अपमान ॥ १०० ॥ ऐसें सांगोनि वनकरांसी । दधिमुख उडाला आकाशीं । निमिषें आला सुग्रीवापासीं । वनकरांसीं समवेत ॥ १ ॥ श्रीराम स्वामी आणि सौमित्र । उभे वानर जोडोनि कर । सुग्रीव बैसला कपिराजेंद्र । आज्ञा दुर्धर[3] जयाची ॥ २ ॥ आज्ञा उल्लंघिल्या अणुप्रमाण । दंड करी अति कठीण । नाक कान सरकडून । खरारोहण तत्काळ ॥ ३ ॥

+ततो मूर्ध्ना निपतित वानर वानरर्षभः ।
दृष्ट्वैवोद्विग्नहृदयो वाक्यमेतदुवाच ह ॥ ३४ ॥
उत्तिष्ठोत्तिष्ठ कस्मात्त्वं पादयो पतितो मम ।
अभयं ते प्रदास्यामि सत्यमेवाभिधीयताम्॥३५॥

दधिमुख रडत उकसाबुकसीं । आडवा पडला सुग्रीवापासीं । वानरें दिधलें अपमानासी । पारपत्यासी करीं तया ॥ ४ ॥ सुग्रीव बोलिला वचन । तुज दिधलें अभयदान । कोणें वानरें कैसा अपमान । विशद[4] करून मज सांगें ॥ ५ ॥

१ डाव्या हातानें. २ रक्तानें. ३ कडक. ४ स्पष्ट.

+ ६३।१, २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २३०२० वि: ...
क्रमांक ९४०९ नों दि २५/३/५८



तें ऐकून सुग्रीव सर्व वृत्तान्त विचारितो–दधिमुख दुःख सांगत। अंगदादि हनुमंत। मधुवनातें विध्वसित। मधु भक्षित राजपेय[१] ॥ ६ ॥ ऋक्षराज तुझा पिता। तैंपासोनि वन रक्षिता। वनावरी माझी सत्ता। तुजही मागतां मी न देईं ॥ ७ ॥ तुझी राजाज्ञा न घेतां। आणि मजही न पुसतां। केलें मधुवनविघाता। मद्यपानीं उन्मत्त ॥ ८ ॥ स्वादु सुगंध राजपान। वानरीं करी करितां भक्षण। राजाज्ञा करावया दंडण। कोपें धांवोन मी गेलों ॥ ९ ॥ अंगदें मज उपमर्दोन। वनीं सांडिलें मूर्च्छापन्न। वनकरां आघात जानुअपानें। गुदें सुजवोन सोडिले ॥११०॥ वनकर वीर असंख्यात। सघृत तेलें गुद शेंकित। निंदापमानें अति गांजित। शरणागत तुज आलों ॥ ११ ॥ तूं स्वामी असतां शिरीं। आम्ही गांजिलों ऐसियापरी। आमचा होवोनि कैवारी। स्वयें उद्धरीं राजाज्ञा ॥ १२ ॥ राजाज्ञेचें राहे बिक[२]। आमचें निरसे[३] निजदुःख। ऐसी उद्धता लावीं शीक[४]। दधिमुख विनवित ॥१३॥

तें ऐकून वानरांनीं शुद्धी केली असली पाहिजे असें लक्ष्मण व सुग्रीव यांनीं ताडलें–ऐकोनि दधिमुखाचें वचन। सुग्रीव आणि लक्ष्मण। दोघे वीर विचक्षण। कार्यकारणलक्षक[५] ॥१४॥ क्षुधित तृषित परदेशीं। वानर पीडिले उपवासीं। साधिलें सीताशुद्धीसी। वन भक्षासी तरी दिधलें ॥ १५ ॥ अंगद वीर विचारी वीरश्रेष्ठ। राजपुत्र अति वरिष्ठ। जाणोनि सीताशुद्धीचे कष्ट। मधु यथेष्ट पाजिलें ॥ १६ ॥ साधिली सीताशुद्धि इत्यर्थ। तेणें वानरां अति सामर्थ्य। मधुवनासी विध्वंसित। ऐसा निश्चितार्थ मानिला ॥ १७ ॥ ज्याचें कार्य न साधे जाण। तो सदाचा हीनदीन। मुखींहूनि न निघे वचन। काळें वदन तयाचें ॥ १८ ॥ कार्य न साधे जयासी। मुख दाखवितां लाज तयासी। मुखीं उतरे तया मसी। सामर्थ्य त्यासीं असेना ॥१९॥ सीताशुद्धि लाधली खरी। म्हणोनि मधुवनामाझारी। वानरीं केली आपांपरी[१]। मारामारी वनकरां ॥१२०॥

+जाम्बवांस्तत्र नेता स्यादंगदश्च महाबल।
हनुमांश्च प्रतिष्ठाता न तत्र गतिरन्यथा ॥ १६ ॥
दृष्टा देवी न संदेहो न चान्येन हनूमता।
व्यवसायश्च वीर्यं च श्रुतं चापि व्यवस्थितम् ॥ १७

त्याशिवाय जांबवतादि मंत्र्याकडून असा अत्याचार होणें अशक्य–जांबवंत मंत्री जेथें। अंगद वीर अत्यद्भुत। सीताशुद्धी केली हनुमंतें। मज निश्चितें मानलें ॥ २१ ॥ हनुमंतें सिद्धी नेलें सकळ। निश्चयें शोधिली जनकबाळ। तेणें विजयी वानर सकळ। बळें प्रबळ हनुमंत ॥ २२ ॥ हनुमंतावांचून। आणिका न साधे सीता चिद्रत्न। सीताशुद्धि[२] साधोनि पूर्ण। मधुवन भक्षिलें ॥२३॥ सीताशुद्धि जाली पूर्ण। सुग्रीव आणि लक्ष्मण। निश्चय करोनि आपण। कृतकल्याण पावले ॥ २४ ॥

व हनुमंताला न विचारितां आघात केल्याबद्दल त्यालाच दोष दिला–सुग्रीव म्हणे दधिमुखासी। तूं तंव परम मूर्ख होसी। न पुसतां हनुमंतासी। त्वां कां त्यासीं युद्ध केलें ॥ २५ ॥ मद्यपानी नव्हे हनुमंत। आणि तो तुझा परम आप्त। त्यासी न पुसतां वृत्तांत। युद्धकंदनार्थ कां केला ॥ २६ ॥ सीताशुद्धि स्वयें साधून। वना आले वानरगण। तिहीं केलें मधुपान। सुखसंपन्न आम्ही तेणें ॥२७॥

दधिमुख व अंगद यांचें परस्पर समाधान व श्रीरामदर्शनास प्रयाण–तुज जो दिधला अपमान। तो क्षमा करावा मजलागून। अंगदासी तूं भेटोन। समाधान साधावें ॥२८॥ सीताशुद्धि स्वयें साधून। वना आले वानरगण। तेणें दधिमुख हरिखेजोन[३]।

१ राजानें प्यावयाचें असें. २ तेज, सामर्थ्य. ३ नाहींसें होईल. ४ शिक्षा. ५ कार्यकारण जाणणारे.

१ दुर्दशा. २ सीतेचा शोध. ३ आनंद पावून.

+ २१।२२, २० २१

केलें नमन सुग्रीवा ॥ २९ ॥ दधिमुख वानर येऊन । अंगदासी घाली लोटांगण । माझा अपराध संपूर्ण । क्षमा आपण करावा ॥ १३० ॥ अंगद म्हणे उन्मादता[1] । तेव्हां केली अपमानता । तें मज नाठवे गा आतां । क्षमा तत्वतां[2] करावी ॥ ३१ ॥ येरयेरां[3] अभिवंदन । येरयेरां आलिंगन । अंगदें दधिमुखासी जाण । समाधान स्वानंदें ॥ ३२ ॥ तुम्ही आलेति सीताशुद्धीसीं । परम सुख सुग्रीवासी । शीघ्र बोलाविलें तुम्हांसी । श्रीरामासी भेटावया ॥ ३३ ॥ श्रीरामप्रेम वानरांत । जरी जाले मदोन्मत्त । तरी रामनाम स्मरत । विह्वळित मदभरें ॥ ३४ ॥ एक मद्याचे उन्मत्तीं । रामनामें हांका देती । एक ते रामनामें डुलती । एक म्हणती रामनाम ॥ ३५ ॥ एक मदमोहें अडखळती । एक रामनामें लडबडिती । एक अडखळोनि रामनाम स्मरती । एक उपरमती[4] हरिनामें ॥ ३६ ॥ एक मदमोहें नाचती । एक उन्मादें गीत गाती । गातां नाचतां राम स्मरती । चिटाविती रामनामें ॥ ३७ ॥ वानर देखोनि मदोन्मत्त । हनुमान रामकार्यी उद्यत[5] । वंदावया श्रीरघुनाथ । शीघ्रवत निघाला ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंतासी रामदर्शन । पुढें अति गोड निरूपण । सावधान अवधारा ॥ १३९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां वानरमधुवनविध्वंसो नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ओंव्या ॥ १३९ ॥ श्लोक ॥ ३७ ॥ एवं ॥ १७६ ॥

## अध्याय २५ वा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

दक्षिणदिशेचे वानर कालमर्यादेनंतर न आल्यानें श्रीरामास चिंता वाटत असेल म्हणून हनुमंत आधींच येऊन त्यांना भेटला—वानर गेले दक्षिणेसी । मर्यादा लोटली तयासी । कोणी नाणिती सीताशुद्धीसी । श्रीरामासीं अति चिंता ॥ १ ॥ मजसीं करूनि एकांत । [1]मुद्रा घेवोनि गेला हनुमंत । तो कां नयेचि पां त्वरित । अति सचिंत श्रीराम ॥ २ ॥ हनुमंत कार्यकर्ता । मजही हा भरंवसा होता । तोही न येचि वाट पाहातां । परम चिंता लागली ॥ ३ ॥ ऐसी श्रीरामाची चिंता । कळों[2] सरली[2] त्या हनुमंता । शुद्धि सांगावया सीता । होय निघता अति शीघ्र ॥ ४ ॥ श्रीरामाची परम चिंता । सांगतां अंगदा जांबवंता । घांसा आड येऊं नये हनुमंता । घेवों दे आतां धणी[3] आम्हा ॥ ५ ॥ वानरें पीडलीं अति दीन । भाग्यें मिळालें मधुपान । त्यांसीं तुवां न करावें विघ्न । तूं सज्ञान दीनदयाळ ॥ ६ ॥ विषयरसभोगापुढें । परमार्थ समूळ उडे । वानर मद्यपानें जाले वेडे । श्रीरामाकडे न चलती ॥ ७ ॥ वानर गुंतले मद्यपानांत । मद्यपानें बोधेना परमार्थ । ऐसें जाणोनियां हनुमंत । निघे त्वरित एकाकी ॥ ८ ॥ वानरीं सेविलें मधुपानासी । सीताशुद्धि साधली त्यांसी । निश्चयो मानला सुग्रीवासी । सौमित्रीसी[4] सांगत ॥ ९ ॥ सौमित्रि सुग्रीव अति हर्षेसीं । सीताशुद्धि सांगती रामासी । श्रीरामें देखिलें हनुमंतासी । येतां आकाशीं अति शीघ्र ॥ १० ॥ येता देखोनि हनुमंता । अति उल्लास श्रीरघुनाथा । धावोनि आकाशाहीपरता । सीताशुद्ध्यर्थी पुसों पाहे ॥ ११ ॥ ऐसें जाणवलें हनुमंता । उठों नेदितां श्रीरघुनाथा । दुरोनि सीताशुद्धीची कथा । होय सांगता तें ऐका ॥ १२ ॥

दृष्टा सा जनकात्मजा रघुपते युष्मत्प्रसादान्मया
लंका नाम पुरी समुद्रजठरे तत्रास्ति वीर प्रभो
राहुग्रस्तनिशापतेरिव कला लावण्यहीनप्रभा
सीता जीवनहेतु किं वद सखे रामामृत मानसे ॥ १ ॥

१ प्रमादानें, मस्तीनें. २ खरोखर. ३ परस्परांना. ४ समाधान पावतात ५ तत्पर.

१ मुद्रिका, अगठी. २ समजली. ३ इच्छा, तृप्ति. ४ लक्ष्मणाला.

दुरूनच श्रीरामचंद्रास सीता-शुद्धि व तिच्या स्थितीचें कथन—उठों नेदितां रघुनाथा । दुरोनि सांगणें हनुमंता । तुझिये कृपें म्यां तत्वतां । देखिली सीता जनकात्मजा ॥ १३ ॥ समुद्रामध्यें महागिरी । त्यावरी वसे लंकापुरी । रावणाच्या निजमंदिरीं । सीता सुंदरी रक्षिलीसे ॥ १४ ॥ केवळ नाहीं रावणाघरीं । [1]अशोकवाटिकेमाझारी । रक्षण त्रिकाळ खेचरी[2] । त्यांमाझारी जानकी ॥ १५ ॥ एकवस्त्रा भूमिशायी[3] । मलिनांबरा मलिनदेही । मंगलस्नान करणें नाहीं । मस्तकीं पाहीं दृढ जटा ॥ १६ ॥ जैसा तूं श्रीराम जटाधारी । तें व्रत चालवी सीता सुंदरी । स्नेह[4] दृष्टीचा हातीं न धरी । जटाधारी जानकी ॥ १७ ॥ नेघे अंजनादि चंदन । न करी भोजन रसपान । केवळ तिसी उपोषण । जळप्राशन तीस नाहीं ॥ १८ ॥ नित्यतृप्तीचें अवदान । ब्राह्मणां नेदितां ब्रह्मौदन । सीता न पाहे सर्वज्ञ । निद्यां म्हणोन नातळे[5] ॥ १९ ॥ परपुरुषाचें घ्यावें अन्न । ते परदारा जाली जाण । सीतेनें सांडिलें थुंकोन । जैसें वमन श्वानाचें ॥२०॥ रामवियोगाचें अन्न । तें श्वानविष्ठेसमान । [6]रजस्वलेचें रुधिरपान । तत्समान रसभोग ॥२१॥ तुजवांचोनि श्रीरघुपती । जळ स्पर्शेना ते हातीं । किती सांगों उपपत्ती । सीता सती पतिव्रता ॥२२॥ चंद्रग्रहणीं हीनकळा । तैसी हीन दीन जनकबाळा । स्वयें देखिली म्यां डोळां । वीरवेताळा[7] श्रीरामा ॥२३॥ नेघे अन्न ना जीवन । कैसेनि तिचे वांचले प्राण । श्रीराम पुसे कळवळोन । दीनजनकृपाळु ॥ २४ ॥ निजसखया हनुमंता । कैसेनि वांचली माझी कांता । हें मज सांगावें तत्वतां । होन पुसता श्रीराम ॥ २५ ॥ हनुमान अति विचक्षण । सीतासतीनिजजीवन । कैसें सांगेल आपण । सावधान अवधारा ॥ २६ ॥ हृदयीं श्रीराम चिन्मूर्ती । मुखीं रामनाम अहोरात्रीं । राम न्याहाळी सर्वां भूतीं श्रीराम चित्तीं अहर्निशीं ॥ २७ ॥ राम धराधारक पूर्ण । श्रीराम जीवना जीवन । रविचंद्रां दीप्ति गहन । विराजमान श्रीराम ॥ २८ ॥ श्रीराम वायूचा निजप्राण । श्रीराम गगनाचें चिद्गगन । श्रीराम बुद्धीचें समाधिधन । प्राणपोषण श्रीराम ॥२९॥ श्रीराम अहंसोहंनिमग्न । श्रीराम मनाचें उन्मन । श्रीराम चित्तचैतन्य । जीवा जीवन श्रीराम ॥ ३० ॥ ऐसऐसिया निजस्थिती । मीतूंपणाहोनि परती । सीताजीवन श्रीराममूर्ती । सत्य रघुपति बुद्धि माझी ॥ ३१ ॥ [1]निर्विकल्प भजनविधी । कायावाचामनोबुद्धी । म्यां आणिली सीताशुद्धी । सत्य त्रिशुद्धि[2] श्रीरामा ॥३२॥ श्रीरामनाम परमामृत । अमृतपानें अमर मरत । रामनाम ज्यासी प्राप्त । मरण मरत त्याचेनि ॥३३॥ रामनामीं श्रद्धा अढळ । त्यासी बाधेना हळाहळ[3] । पोळूं न शके प्रळयानळ । द्वंद्वें सकळ निर्द्वंद्व ॥३४॥ ऐसें श्रीरामनामामृत । तेंचि सीतेचें जीवन[4] नित्य । श्रीराम जाणे सत्य सत्य । श्रीरघुनाथ सर्वज्ञ ॥३५॥

श्रीरामांचा आनंद व हनुमंताचें अभिनंदन व हार्दिक कौतुक—ऐकोनि हनुमंताचें वचन । श्रीरामचंद्र संतोषोन । परमानंदें बाहु पसरोन । दिधलें आलिंगन निजऐक्यें ॥ ३६ ॥ स्वामित्व विसरे रघुनाथ । दासत्व विसरे हनुमंत । परमानंदें सदोदित । जगाआंत कोंदले¶ ॥ ३७ ॥ अहंकोहंसोहंज्ञान । तें समरस गेलें विसरोन । हारपलें मीतूंपण । सुखसंपन्न स्वानंदें ॥ ३८ ॥ दोघे होतां सुखसंपन्न । विरोन गेलें ज्ञानाज्ञान । खुंटला बोल तुटलें मौन ।

१ अशोकवनात. २ राक्षसिणी. ३ जमिनीवर निजणारी. ४ तेल. ५ शिवत नाहीं. ६ विटाळशीचें. ७ वीरश्रेष्ठा.

† बक—निंदक.

१ विकल्परहित. २ निश्चयेंकरून. ३ विष. ४ आधारस्थान.

¶ ब—कोंदला.

चैतन्य घन कोंदलें ॥३९॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन। ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । ध्येय ध्याता आणि ध्यान। गेलें विरोन स्वानंदीं ॥४०॥ देव देवपणें दाटला । भक्त भावार्थें आटला । परमानंद प्रकटला । सटका[1] तुटला आशेचा ॥ ४१ ॥ भजनआवडीं भावार्थ । भक्तें गिळिला रघुनाथ । नामें गिळिले देवभक्त । मुख्य परमार्थ या नांव ॥ ४२ ॥ ऐसा पावोन परमार्थ । श्रीरामीं भजे हनुमंत । भजनें सदा यशवंत । द्वंद्वनिर्मुक्त हरिभजनें ॥ ४३ ॥ पावोनियां स्वरूपप्राप्ती । ज्यासी अखंड सद्गुरुभक्ती । देव वानिती[2] त्याची कीर्ती । त्यासी वंदिती शिवादि श्रेष्ठ ॥४४॥ ऐसी [3]दादुगी भगवद्भक्ती । भक्तीच्या दासी चारी मुक्ती । भगवद्भजन सर्वांभूतीं । ब्रह्मप्राप्ती हरिनामें ॥ ४५ ॥ ऐसी हनुमंताची स्थिती । भक्ति कीर्ति विनयवृत्ती[4] । तिहीं लोकीं विजयख्याती । सूक्ष्मशांति श्रीरामें ॥ ४६॥ सूक्ष्मशांतीचें लक्षण । मारितां कोट्यनुकोटि रण । शांति न मोडे अणुप्रमाण । दुर्जेनविणे संग्राम ॥४७॥ बुद्धिबळाचे खेळाकडे । तेथें मारितां हस्ती घोडे । मारित्यासी हिंसा न घडे । तेणें[5] पाडें[5] संग्राम ॥ ४८ ॥ ऐसी हनुमंताची गती। साधुजन अनुलक्षिती। येरां भासे वानरवृत्ती। दुर्धरशक्ती श्रीरामें ॥ ४९ ॥ हनुमान आणि रघुनंदन। अनन्य भावें पडलें आलिंगन। पूर्ण पावोनि समाधान। जाले अभिन्न देवभक्त ॥५०॥ सीतामस्तकींचा मणी। ठेवोनियां श्रीरामचरणीं। हनुमंत घालोनि लोटांगणीं। कर जोडोनि राहिला ॥ ५१ ॥ वानरसमूह मदोन्मत्त । पुढें गेला हनुमंत । अंगद नळ नीळ जांबवंत । हा वृत्तांत नेणती ॥ ५२ ॥ हनुमतें वंदोनि रघुनाथ। सांगोनि सीतेचा वृत्तांत । सर्वेचि मधुवनांत । पूर्वस्थित तैसाचि ॥ ५३ ॥ जावोनि आला हनुमंत ।

१ संबंध. २ वर्णन करितात. ३ मोठी. ४ नम्र स्वभाव. ५ त्याप्रमाणें, त्यासारखें.

हें नेणे अंगद जांबवंत । इतरांची कायसी मात[1] । कपिवृत्तांत जाणावया ॥ ५४ ॥ सुग्रीव सौमित्रास[2] सांगत । आम्हां देखतां आला हनुमंत । सांगतां सीतेचा वृत्तांत । श्रीरघुनाथ आलिंगी ॥ ५५ ॥ दोघे देतां आलिंगन। परस्परें जाले लीन[3] । नाहीं देखिलें होतां भिन्न। धन्य महिमान हनुमंता ॥ ५६ ॥ हनुमान नांदे श्रीरामांत। श्रीराम नांदे हनुमंतांत। ऐसी ऐकताचि मात। पडे मूर्च्छित सौमित्री ॥ ५७ ॥ जैसी रामभक्ति हनुमंतासी। तैसें भजनलक्षण लक्ष्मणासी। एकात्मता त्या तिघांसी। येरयेरांसी[4] अभिन्न ॥ ५८ ॥ ऐसें देखोनि अनन्यभजन। सुग्रीव घाली लोटांगण। श्रीरामें दिधलें आलिंगन। समाधान सुग्रीवा ॥५९॥ अनन्यभक्तीचा वृत्तांत। सुखकारी श्रीरघुनाथ। भजनभावें भाविक मुक्त। नामें निर्दोष महादोषी ॥६०॥एक एक श्रीरामनाम। नामें ब्रह्मप्राप्ति सुगम[5]। चहूं मुक्तींचा उडवोनि भ्रम। नामेंचि परम परमार्थ ॥ ६१ ॥ सुग्रीव सौमित्री तये वेळीं। निवोनियां[6] सुखकल्लोळीं[7] । परमानंदें पिटोनि टाळी। श्रीरामाजवळी राहिले ॥ ६२ ॥ येरीकडे सीताशुद्ध्यर्थ। स्वयें साधोनि इत्यर्थ। मुख्य करोनि हनुमंत। अंगद समवेत युवराजा ॥ ६३ ॥ दधिमुख येवोनि जाण। घालोनियां लोटांगण। कथा सांगे सुखसंपन्न। सावधान अवधारा ॥ ६४ ॥ सीताशुद्धीपुढें जाण। मधुवन तृणासमान। सुग्रीव बोलिला आपण। जीवें निंबलोण[8] करूं पाहे ॥ ६५ ॥ शरीरचर्माचे मोचे[9]। केलिया उत्तीर्ण[10] नव्हे तुमचे। परम भाग्य अंगदाचें। कपिवंशाचें उद्धरण ॥६६॥ अंगद कपिवंशमंडण[11]। अंगद कपिवंशभूषण।

१ गोष्ट. २ सुमित्रासुत लक्ष्मणाला. ३ एकरूप. ४ एकमेकांना. ५ सोपी. ६ समाधान पावून. ७ आनंदभरात. ८ ओंवाळणी. ९ जोडे. १० उतराई. ११ वानरवंशाची शोभा.

अंगद कपिवंशतारण । वदला आपण सुग्रीव ॥६७॥ ऐकतां दधिमुखवचनार्थ । वानरीं स्मरिला श्रीरघुनाथ । श्रीरामनामें गर्जत । उल्लासयुक्त निघाले ॥ ६८ ॥

+ततः किलकिलाशब्दं शुश्रावासन्नमंबरे ।
हनूमत्कर्मदृप्तानां नदतां काननौकसाम् ॥ २ ॥
किष्किंधामुपयाताना सिद्धिं कथयतामिव ।
ततः श्रुत्वा निनादं तं कपीनां कपिकुंजरः ॥३॥
आयतांचितलांगूलः सोऽभवत्तुष्टमानसः ।
आगतास्तेऽपि हरयो रामदर्शनकांक्षिणः ॥ ४ ॥
अंगदं पुरतः कृत्वा हनूमतं महाबलम् ।
तेऽङ्गदप्रमुखा वीराः प्रहृष्टाश्च मदान्विताः ॥५॥

सर्व वानरांचें आगमन-रामास वदन—नमस्कारावया रघुवीर । गगनीं उसळले वानर । रामनामाचा गजर । केला भुभु:कार महावीरीं ॥ ६९ ॥ हनुमताची विजयवृत्ती । उल्लासले उपरमले[1] जुत्पती[2] । नामें गर्जती त्रिजगतीं । किष्किंधेप्रती पातले ॥ ७० ॥ वानरांचा गिरागजर । नादें कोंदलें अंबर[3] । दणाणिलें गिरिकंदर । शैलशिखरें[4] दुमदुमिलीं ॥७१॥ कपिकुळांची नादोक्ती । नादामाजीं सीता सती । भेटों आलीसे आइती । ऐसा रघुपति सुखावे ॥ ७२ ॥ ऐकतां अंगदादिकांचा गजर । सुखावे सुग्रीव कपींद्र । पुच्छ थरकोनि समग्र । केला भुभु:कार वानरीं ॥ ७३ ॥ ऐकोनि सुग्रीव भुभु:कार । किष्किंधाभूतळीं वानर । उतरले पैं समग्र । हर्षनिर्भर उल्लासें ॥ ७४ ॥ श्वेत सुनीळ पीत आरक्त । सुवाससुमनीं सुफळित । अंगदसेनासभारांत । [5]टके शोभत वृक्षांचे ॥७५॥ किंशुक[6] फुलले मनोहर । शाल ताल तमाल थोर । विचित्र पताकाअनुकार । तेंवी वानर झेलिती ॥ ७६ ॥

१ विश्रांति पावले. २ युद्धातील प्रमुख वीर. ३ आकाश. ४ पर्वतांचीं शिखरें. ५ फांद्या. ६ पळस.

+ ६४।३७–४१

असो वनवृक्षप्रकार । वानरां पुच्छीं शाखा विचित्र । गुढिया उभविल्या समग्र । तेणें अंबर शोभत ॥७७॥

सुग्रीवानें केलेलें अंगदाचें कौतुक—अंगद युवराज वीर विख्यात । नळ नीळ जांबुवंत । मुख्य मुखरणी हनुमंत । यशवंत त्याचेनि ॥ ७८ ॥ ऐसा अंगदसंभार । शोभा शोभे मनोहर । हर्षें नाचती वानर । करीत गजर नामाचा ॥ ७९ ॥ देखोनि अंगदाचा यावा[1] । सुखसंतोष सुग्रीवा । परम सुख श्रीराघवा । सुख सर्वां अंगदें ॥८०॥ अंगद देखोनियां दृष्टीं । लक्ष्मणासी आनंदकोटी । अति उल्लासें टाळी पिटी । सीता गोरटी साधिली ॥८१॥ भेटावया श्रीरामचंद्रा । अंगदहनुमंतादि धुरा[2] । उल्लास समस्तां कपींद्रां । बहु वानरां आल्हाद ॥ ८२ ॥

+ततः प्रस्रवणं शैलं ते गत्वा चित्रकाननम् ।
प्रणम्य शिरसा रामं लक्ष्मणं च महाबलम् ॥६॥
युवराजं पुरस्कृत्य सुग्रीवमभिवाद्य च ।
आख्यातु तत्र सीतायाः प्रवृत्तिमुपचक्रमे ॥ ७ ॥

प्रस्रवणनामें महागिरी । तेथें वस्ती श्रीरामचंद्रीं । वनें [3]काननें साजिरीं । यावा[1] वानरीं तेथें केला ॥ ८३ ॥ संमुख देखोनि रघुनंदन । स्रवती अश्रुधारा लोचन । अंगदें हनुमतें संपूर्ण लोटांगण घातलें ॥८४॥ मस्तकीं धरिले दृढ चरण । श्रीरामें दिधलें आलिंगन । कोटिजन्मांचें श्रमहरण । दोघे जण पावले ॥ ८५ ॥ सवेंच वंदिला लक्ष्मण । मस्तकीं धरिले त्याचे चरण । सौमित्रीनें दिधलें आलिंगन । कुमित्रपण निमालें[4] ॥ ८६ ॥ कुमित्र जालें निजजन । सुमित्र† चित्त चैतन्यघन । सुमित्र जाला अभिमान । मति चिद्घन§ सुमित्र ॥ ८७ ॥ श्रीरामभजनीं तत्पर । इंद्रियें जालीं सुमित्र । जिव्हा

१ आगमन. २ श्रेष्ठ. ३ रानें. ४ नाहींसें झालें.

† श्लेष—सौमित्र. § श्लेष—सद्घन.

+ ६५।१,२

रामनामीं एकाग्र । वाचा सुमित्र स्वयें जाली ॥८८ हरिदासाचें आलिंगन । ऐसें सबाह्य करी पावन । अभागी* देखती दोषगुण । सभाग्य पूर्ण सद्भावें ॥ ८९ ॥

सद्दर्शनमनुष्वंग. सलापः परम ततः ।
अगागसंगकैवल्यमहो सज्जनसगतिः ॥ ८ ॥

साधूचें जें दर्शन । तेंचि परम अनुष्ठान । साधूचें जें भाषण । तपश्चर्या पूर्ण पूर्णत्वें ॥९०॥ साधूचें चरणस्पर्शन । कैवल्य[1] त्यापुढें तृण । आगाध साधूचे चरण । जेणें पावन महादोषी ॥ ९१ ॥ सज्जनासी आलिंगन । तेणें सर्वांग पावन । देहचि होय चैतन्यघन । कृपा सज्जन जैं करिती ॥ ९२ ॥ साधुसज्जनसंगती । सभाग्य भाग्यातें पावती । सत्संगें [2]भवनिर्मुक्ती । वेदशास्त्रांसी संमत ॥९३॥ सज्जनांचे पादस्पर्शें । तेणें कर्माकर्म निरसे । जन्म-मरण सकळ नासे । त्या रहिवास परब्रह्मीं ॥९४॥ सौमित्र साधु श्रीरामभक्त । त्यासी आलिंगन पैं देत । अंगद आणि हनुमंत । आनंदभरित स्वयें जाले ॥ ९५ ॥ हातीं धरोनि अंगदासी । हनुमान आला सुग्रीवापासीं । सप्रेम वंदितां तयासी। दोहीं उल्हासीं आलिंगी ॥ ९६ ॥ सुग्रीव म्हणे हनुमंता । तुझेनि अंगदासी श्लाघ्यता । तू समस्तांसी जीवदाता । संरक्षिता आम्हांसी ॥९७॥ जांबुवंतादि वानरवीर । निहीं वंदोनि श्रीरामचंद्र । करोनि सुग्रीवासी जोहार[3] । सभा सादर बैसली ॥ ९८ ॥

रामाचे सूचनेवरून अंगद वृत्तांत सांगतो—सीता-शुद्धीचा उत्यर्थ । स्वयें पुसे श्रीरघुनाथ । येथोनि कैसा क्रमिला पंथ । समूळ वृत्तांत मज सांगें॥९९ ऐसें पुसतां रघुनंदन । हनुमंतें धरिलें मौन । तेव्हां अंगद आपण । सांगे गौण सीताशुद्धि ॥ १०० ॥ घेवोनि स्वामीचें आज्ञापन । शतधा शोधिली दक्षिण । सीताशुद्धीचें लक्षण । अणुप्रमाण न लभेचि ॥ १ ॥ पुढती करावया शोधन । वानरीं केली आंगवण । ब्रह्मशापें उपहत[1] वन । तेथें उड्डाण पडियेलें ॥२॥ नाहीं पाला नाहीं फळपान । शोधितां न मिळे जीवन । वृक्ष ठेले †खरकडोन । पडिलें लंघन[2] वानरां ॥ ३ ॥ दंडी नामा ऋषि समर्थ । वेदशास्त्रसंपन्न त्याचा सुत । विद्यागर्वें अति उन्मत्त। त्याचा केला घात वनदेवतीं ॥ ४ ॥ तो विद्यागर्वें अति उन्मत्त । वादीं ब्राह्मणांसी निर्भर्त्सित । तो ब्रह्मराक्षस जीवें जीत । यालागीं घात भूतीं केला ॥ ५ ॥ जाणोनि पुत्राचें निधन[3] । ऋषीनें शापिलें तें वन । तेथें ज्याचें आगमन । नव्हे निर्गमन[4] प्राणांतीं ॥ ६ ॥ आम्हांसी पडतांचि ते वनीं । प्राण जाते तत्क्षणीं । वांचलों रामनामस्मरणीं । संकटीं रक्षी श्रीराम ॥७॥ वनीं नाहीं मुंगी मासी । ठाव नाहीं श्वापदांसी । ‡तृणशलाका नाहीं भूमीसीं । पडे वानरांसी लंघन ॥८॥ तें त्यजावया दुष्ट वन । सबळ बळें करोनि किराण[5]। करी तेथेंचि ये उड्डाण । नव्हे निर्गमन ब्रह्मशापें ॥ ९ ॥ त्या ऋषीचा ऋषि-सुत । ब्रह्मराक्षस त्या वनाआंत । भक्षूं आला वानरांतें । त्याचा निःपात आम्हीं केला ॥११०॥ हनुमंतादेखतां मरण । ब्रह्मराक्षसा उद्धरण । राम-नामाचा प्रताप पूर्ण । जडतारण श्रीरामें ॥ ११ ॥ जालें पुत्राचें उद्धरण । तेव्हां दंडी ऋषि संतोषोन । शापोन्मुक्त केलें वन । हें महिमान हरिभक्तांचें ॥ १२ ॥ जेथें जाती श्रीरामभक्त । तें वन पुण्यश्रम म्हणत । ऐसें अंगद सांगत । सुखें डुल्लत श्रीराम॥१३॥

१ मोक्ष. २ संसारापासून मुक्तता. ३ नमस्कार.

* वक—अभाग्या.

१ ओसाड. २ उपोषण. ३ मरण. ४ परत जाणें. ५ गवताची काडी. ६ उड्डाण.

† ड—करप जोडून, ‡ ख—वळे खाकरजून.

ऐकोनि कृपाळु रघुनाथ। सौमित्री स्वानंदें स्फुंदत। वानरसभा पैं तटस्थ। जाला विस्मित सुग्रीव ॥ १४ ॥ वन मुक्त केलें द्विजवरीं। वानरां लंघनें पडलीं भारी। निघवेना वनाबाहेरी। येती लहरी क्षुधातृषेच्या ॥ १५ ॥ हनुमंतें तिये काळीं। [1]वनबिल्ववृक्षातळीं। [2]विवर देखिलें सफळ जळीं। आम्ही ते बिळीं प्रवेशलों ॥ १६ ॥ पुढें करोनि हनुमंत। विवरीं रिघतां समस्त। तेथें मांडला प्राणावर्त। रक्षी हनुमंत श्रीरामतेजें ॥१७॥ विवरीं गुडुप अंधार। स्वयें स्मरेना स्वशरीर। उबेनें निबुंजले[3] वानर। पडले समग्र अचेतन[4] ॥१८॥ मज अंगदासमवेत। नळ नीळ जांबुवंत। विवरीं अचेतन समस्त। सावधान हनुमंत श्रीरामें ॥१९॥ क्षुधेनें आमचा क्षीण प्राण। तेणें विसरलों रामस्मरण। हनुमंत असे सावधान। सबाह्य पूर्ण श्रीराम ॥ १२० ॥ श्रीराम हनुमताचा प्राण। सर्वेंद्रियें श्रीराम आपण। श्रीरामतेजें देखणे नयन। अंधारीं पूर्ण देखणा रामें ॥ २१ ॥ निधडा[5] वीर हनुमत। पुच्छें बांधोनि कपी समस्त। शतयोजनें विवरांआंत। नेले मूर्च्छित निजांगें ॥ २२ ॥ पाचारोनि पिता पवन। हनुमान गुज सांगे संपूर्ण। वांचवीं वानरांचे प्राण। रघुनंदनसुखार्थ ॥ २३ ॥ ऐसें सांगतांचि जाण। वानरांसी आला प्राण। अवघे जाले सावधान। वीर देखोन विस्मित॥२४ ते हेमहेमविवरभुवनीं। भेटली सुरसा तपस्विनी। तिनें हनुमंता देखोनी। जाली मनीं विस्मित ॥२५ सुरसा पुसे तूं कोण येथ। हनुमान सांगे रामभक्त। विवरीं आलों सीताशुद्धयर्थ। समवेत वानरांसीं॥२६॥ सुरसा म्हणे तुम्ही श्रीरामभक्त। तरीच तुम्हां येववलें येथ। येरांसी हें स्थळ न प्राप्त। मी सनाथ तुमचेनि ॥२७॥ ब्रह्मवरद मज येथ। तुज भेटतील श्रीरामभक्त। तेणें तूं होसील निर्मुक्त। तें भाग्य प्राप्त मज आजी ॥२८॥ विकळ देखोनि वानरांसी। सुरसा ते सज्ञान कैसी। जेणें विश्रांति होय आम्हासी। त्या उपायासी आदरिलें ॥ २९ ॥ दिधलें विश्रांतिरसपान। जीवन दिधलें स्वानंदघन। सुखस्वादिष्ठ फळें संपूर्ण। रामस्मरणेंसीं सेविती ॥१३०॥ श्वासोश्वासीं रामस्मरण। रसपान हरिचिंतन। वानरीं सेवितां जीवन। गडगर्जन नामाचें ॥३१॥ क्षुधा निमाली नित्यतृप्ती। निद्रा निमाली [1]सुखसंवित्ती। सुखस्वानंदें [2]हेलावती। परम विश्रांति वानरां ॥ ३२ ॥ रामनामें तृप्त वानर। नामें कोंदलें विवर। नामें व्यापिलें चराचर। नामें कपींद्र गर्जती ॥ ३३ ॥ नामें कोंदले वैकुंठपीठ। नामें डुल्लत श्रीनीलकंठ। सुरसेचें भाग्य वरिष्ठ। हनुमंत श्रेष्ठ सभाग्य ॥३४॥ हरिभक्तांचिया संगतीं। जड मूढ उद्धरती। सुरसा सभाग्य [3]वानूं किती। हनुमंतीं विश्वास ॥ ३५ ॥ हनुमंतनिष्ठारामस्मरण। कळिकाळाची बोळवण[4]। नामें जन्ममरणा मरण। नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ३६ ॥ वानरां जाली नित्यतृप्ती। सुरसा पावली अति विश्रांती। हनुमंताचिये संगतीं। अवघे डुल्लती स्वानंदें ॥ ३७ ॥ ऐकतां अंगदाच्या गोष्टी। श्रीरामा सुखानुकोटी। हरिखें त्याची पाठी थापटी। स्वानंदपुष्टीं डुल्लत ॥ ३८ ॥ ऐकतां भक्तांची निजकथा। परम सुख श्रीरघुनाथा। त्यांमाजी हनुमंत पढियता[5]। त्याची कथा अतिगोड ॥ ३९ ॥ अंगदासी म्हणे रघुवीर। पुढील सांगें समाचार। आवडे हनुमंताचा पुरुषार्थ थोर। रामा निरंतर ऐकावया ॥१४०॥ अंगद म्हणे श्रीरघुपती। वानरां जाली विश्रांती। शोधावया सीता सती। स्वयें पुसती हनुमंता ॥४१॥ नाहीं रविचंद्रविलासा। विवरीं स्वयंप्रकाशीं ठसा। तेथें लक्षेना दक्षिणदिशा।

१ वनांतील वेलांच्या झाडाखालीं. २ भुयार. ३ कासावीस झाले. ४ निचेष्ट. ५ धैर्याचा, पराक्रमी.

१ आनंदानुभवानें. २ उचंबळतात. ३ वर्णूं. ४ परिहार, पाठवणी. ५ आवडता.

शुद्धीस धिंवसा[१] काय करूं ॥ ४२ ॥ सुरसा सांगे हनुमंताप्रती । ब्रह्मवरदें [२]गतिनिर्गती । मीच जाणें विवरस्थिती । तुमच्या शक्ती न निघवे ॥ ४३ ॥ सुरसा विनवी हनुमंताप्रती । शुद्धि पावेल सीता सती । यश पावाल परम कीर्ती । सत्य वचनोक्ती हे माझी ॥४४॥ हनुमान सांगे सुरसेसी । वेगीं काढीं वानरांसी । येरी लागली पायांसी । सांगेल तैसी स्थिति कीजे ॥ ४५ ॥ डोळे उघडे असतां । बाहेर न काढवे सर्वथा । डोळे झांकलिया समस्तां । निमेषार्धांत‡ काढीन ॥४६॥ डोळे झांकितां वानर । पुढें गडगर्जे समुद्र । मागें न दिसे विवर । विस्मयो थोर वानरां ॥ ४७ ॥

संपातीची भेट व हनुमंताचें लंकेकडे उड्डाण—

डोळे झांकितां वानरीं । ना कडिये ना धरिलें करीं । अवघे विवराबाहेरी । समुद्रतीरीं स्वयें उभे ॥४८॥ रामनामाच्या आवर्तीं[३] । सुरसेसहित विवरोन्मुक्ती । वानर विवरातें पाहती । तंव तेथें [४]व्यक्ती लक्षेना ॥ ४९ ॥ असो हे नव्हेचि सीताशुद्धी । पुढें अडविलें उदधी । मागें जावें तरी लोटला अवधी । वानरमांदी सचिंत ॥ १५० ॥ मागें जातां अपमान । सुग्रीव दंडील दारुण । पुढें समुद्र नव्हे गमन । द्यावया प्राण सिद्ध जालों ॥ ५१ ॥ लक्षोनिया समुद्रतीर । पडतां प्रायोपवेशीं वानर । संपाती पक्षी महाथोर । आला समग्र भक्षावया ॥ ५२ ॥ करोनि बहुकाळ लंघन । मग वानरीं त्यजावा प्राण । श्रीरामें कृपा केली संपूर्ण । सद्य[५] मरण पक्षिभक्षा ॥ ५३ ॥ व्यर्थ देहो घावा समुद्रतीरीं । अति उल्लास वानरीं । देह लागला परोपकारीं स्मरती गजरीं श्रीरामा । ५४ ॥ होतां श्रीरामनामस्मरण । फिटलें संपातीचें मूढपण त्यासीं उपजलें परम ज्ञान । सावधान अवधारा ॥ ५५ ॥ जेथ श्रीरामनामस्मरण । तेथें कल्पांतीं न रिघे मरण । संपाती घाली लोटांगण । तुम्ही धन्य कोण कोणाचे ॥ ५६ ॥ ज्याचे स्मरणीं श्रीरामनाम । सफळ जन्म सफळ कर्म सफळ त्याचा देहधर्म । भाग्यें परम भेटलेति ॥ ५७ ॥ श्रीरामनाम स्मरतां येथ अवघे आलेति किमर्थ । देह त्यागावया उदित[१] । तुम्ही किमर्थ तें सांगा ॥ ५८ ॥ ऐकोनि संपातीचें वचन । अंगद म्हणे करी भक्षण । संपाती म्हणे सत्य संपूर्ण । न रिघे मरण रामस्मरणें ॥ ५९ ॥ ऐकोनि संपातीचा वृत्तांत । बोलता जाला हनुमंत । आम्ही श्रीरामाचे भक्त । सीताशुद्ध्यर्थ येथें आलों ॥ १६० ॥ शोधितां दक्षिण समुद्र समग्र । कोठें न भेटे सीता सुंदर । लोटली श्रीराममर्यादामेर । मरणीं तत्पर यालागीं ॥ ६१ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संपाती जाला हास्यवदन । मज आहे सीतेचें ज्ञान । सावधान अवधारा ॥ ६२ ॥ सिंधुमर्यादा शतयोजन । तेथें आहे लंकाभुवन । त्यामाजी आहे अशोकवन । सीता चिद्रत्न तेथें वसे ॥ ६३ ॥ मज असती पक्षगती । तरी आणितों सीता सती ऐसें बोलतां संपातीसीं । पक्षप्राप्ती पावला ॥ ६४ ॥ सूर्यवरद[२] संपातीसी । भेटलिया श्रीरामभक्तांसी । निर्विकल्प पक्ष पावसी । सीताशुद्धीसी सांगतां ॥ ६५ ॥ निर्विकल्प पक्षप्राप्ती । सांडोनि त्रिगुण गुणवृत्ती । संपाती पावला गुणातीती । पुनरावृत्ती खंडली ॥ ६६ ॥ श्रीरामभक्तांसीं संगती । उद्धरले नेणों किती । आतांचि उद्धरला संपाती । धन्य संगती संतांची ॥ ६७ ॥ सिंधुमर्यादा शतयोजन । वानरां न करवे उल्लंघन । एकें उड्डाणें पैं जाण । गेला आपण हनुमंत ॥६८॥ स्वयें उडतां बळेंचिकरीं । गिरि कडे खचले सागरीं । शिखरें उडविलीं अंबरीं आपापरी[३] पशु-

१ धैर्य. २ जाणेंयेणें. ३ आवृत्तींनी. ४ मागमूस. ५ तावडतोब.

‡ पाठभेद—निमिष्यार्धांत.

१ तयार. २ सूर्याचा वर. ३ मोठी दुर्दशा.

पक्षियां ।। ६९ ।। आम्ही वानर बळवंत । दक्षिणे राहतां होईल अनर्थ । उत्तरभागीं ठेवी हनुमंत धरोनि पर्वत राहिलों ।। १७० ।। हनुमंत उडतां बळेंकरीं । कडे खचले सागरीं¶ । जळ उसळलें अंबरीं । आपांपरी विमानां ।।७१।। श्रीरामबाणाचिया गती[१] । सवेग गेला पैं मारुती । जे जे लंकेसीं केली ख्याती[२] । तें तें रघुपती पुसावें ।। ७२ ।। ऐसें अंगद सांगत । सुखावला श्रीरघुनाथ । त्यासी धरोनि हृदयांत । स्वयें हनुमंत पाचारी ।। ७३ ।। एका जनार्दना शरण । हनुमंतप्रताप संपूर्ण । ब्रह्म-लिखित अनुसंधान । गोड गहन श्रोत्यासी ।।१७४।। स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकार-टीकायां अंगदश्रीरामसंवादो नाम पंचविंशतितमोऽध्याय. ।। २५ ।। ओंव्या ।। १७४ ।। श्लोक ।।८।। एवं ।। १८२ ।।

नौ मीड्यतेभ्रवपुषे तडिदंबराय ।
गुंजावतं सपपिच्छल सन्मुखाय ।।
वन्य स्रजे कवलवेत्र विषाणवेणू ।
लक्ष्मश्रिये मृदुपदे पशुपाग जायू ।।

श्रीरामचंद्रायनमः ।। चरितं रघुनाथस्य शतकोटि-प्रविस्तरं । एकैकमक्षर पुंसा महापातकनाशन ।। १ ।।

टीका· रामकथेचे अक्षर । तें क्षराक्षरातीत पर ।
सभाग्यभाग्याचे नर । कथा सादर परिसती ।।१।।

---

## अध्याय २६ वा

ब्रह्मदेवलिखित हनुमंताचा लंकेतील पराक्रम—

श्रीगजाननाय नमः ।। स्वमुखें निजकीर्ती । सर्वथा न सांगे मारुती । हें जाणोनि श्रीरघुपती । स्वयें प्रश्नोक्ती चालवीत ।। १ ।। आदरें पुसे श्रीरामचंद्र । हनुमंता तूं वनचर । कैसेनि तरलासी सागर । सत्य साचार मज सांगें ।। २ ।। ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । श्रीरामप्रताप-महिमान । समुद्रतरण वानरा ।। ३ ।।

हनुमदुक्ति.—राम राम तव नाम जाप्यतः
पामरा अपि तरति भवाब्धिम् ।
अंगसंगभवदंगुलिमुद्रा॑-
भृच्च चित्रमतरत्कपिरब्धिम् ।। १ ।।

श्रीरामनामाक्षरा‡ उच्चारें§ । जड मूढ तरती भवसागर । राममुद्रांकित वानर । तेणें परपार पावलों ।।४।। रामनामाचा कडकडाट । भवसमुद्रीं पायवाट । पायरी करोनि वैकुंठ । होती प्रविष्ट परब्रह्मीं ।। ५ ।। जे रामनामांकित नर । त्यांतें बुडवूं न शके सागर । श्रीराममुद्रांकित वानर । परपार पावलों ।। ६ ।। श्रीरामें मुद्रा दिधली हातीं । तेव्हांचि मजला विजयवृत्ती । श्रीराममुद्रेची ख्याती । श्रुति[१] बोलती पुराणें ।।७।। श्रीराममुद्रा समुद्रतरण । श्रीराममुद्रा सीतादर्शन । श्रीराममुद्रा रणकंदन । लंकादहन श्रीराममुद्रा ।। ८ ।। श्रीराममुद्रा विजयप्राप्ती । लंकाभुवनीं केली ख्याती । आडनांव मी मारुती । अगाध करणी मुद्रेची ।। ९ ।। नित्य श्रीरामनामस्मरण । तेथें वीर्य धैर्य कीर्ति कल्याण । ब्रह्म पावती सनातन । तें महिमान स्मरणाचें ।।१०।। जेथें नाहीं श्रीरामस्मरण । अकीर्ति अपयश अकल्याण । नित्य निंद्यत्व पापी पूर्ण । अधःपतन महानरकीं ।। ११ ।। यालागीं साक्षेपें[२] आपण । समूळ सांडावें विस्मरण । नित्य करितां श्रीराम-स्मरण । कीर्ति कल्याण निजविजयी ।। १२ ।। श्रीराममुद्रानिजप्राप्ती । म्हणती हनुमंताची ख्याती । जें जें केलें लंकेप्रती । ते ते कीर्ति मुद्रेची ।। १३ ।। हनुमंताची निजस्थिती । स्वमुखें न सांगे निज-कीर्ती । करोनि मुद्रिकेची स्तुती । सांगितली

---

१ गतीप्रमाणें. २ प्रताप, पराक्रम.

¶क्ष—गिरीकडे.

१ वेद. २ प्रयत्नपूर्वक.

॑ ब—मुद्रिकां किंच. ‡ डक्ष—चा. § डक्ष—क्षर.

ख्याती श्रीरामा ॥ १४ ॥ हनुमंताचें मनोगत। अंतर्यामीं जाणे रघुनाथ। हृदयीं धरिला आनंद-युक्त। स्वामी सद्भक्त आल्हादी ॥ १५ ॥ हनु-मंताची युद्धख्याती। ऐकावया वानरें तळमळती। हें जाणोनि श्रीरघुपती। पुसे पुढती हनुमंता ॥१६॥ श्रीराम म्हणे गा मारुती। समुद्रलंघन लंकाख्याती। तुवा सांगितली यथानिगुती[1]। संकळितीं[2] अति गौण ॥ १७ ॥

वैदेहीमक्षतां श्रुत्वा रामश्चोत्तरमब्रवीत्।
क्व सीता वर्तते देवी कथं च मयि वर्तते ॥ २ ॥
राक्षसानां त्वया सार्धं कथं युद्धं च दारुणम्।
एतन्मे सर्वमाख्याहि वैदेहीं प्रति वानर ॥ ३ ॥

सीता ऐकोनि अक्षता[3]। संतोष जाला श्रीरघु-नाथा। राक्षसांसीं युद्धकंदनार्थ। घडला किमर्थ तें सांगें ॥ १८ ॥ तेंचि आतां विशदस्थिती[4]। तुवां सांगावी लंकाख्याती। ऐसें बोलतां श्रीरघुपती। वंदी मारुती श्रीचरण ॥ १९ ॥ स्वमुखें सांगों नये स्वकीर्ती। वंचूं[5] नये स्वामीप्रती। हनुमंतें येचि अर्थी। प्रजापति[6] प्रार्थिला ॥ २० ॥ माझें समुद्र-लंघन। लंकेमाजी सीताशोधन। स्वामीनें कृपा करोन। पत्र लिहून मज द्यावें ॥ २१ ॥ तुझे हातींचें ब्रह्मलिखित। देखोनि सीताशुद्ध्यर्थ। सत्य मानील श्रीरघुनाथ। शीघ्र कार्यार्थ साधेल ॥२२॥ ऐकोनि कपीचें वचन। संतोषला चतुराननं[6]। हनुमंताचें[¶] कीर्तिकथन। दिधलें लिहून साद्यंत ॥ २३ ॥ संतोषोनी प्रजापती। पत्र देवोनि हनुमंतहातीं। आलिंगिला अति प्रीती। विजयी सर्वार्थीं पावसी ॥ २४ ॥ तें पत्र घेवोनि हनुमंत। स्वयें श्रीरामा विनवित। हें ब्रह्मयाचें लिखित। वाचूनि कार्यार्थ जाणावा ॥ २५ ॥ पत्र घेवोनि श्रीरघुपती। वंदोनियां अति प्रीतीं। दिधलें लक्ष्मणाचे हातीं। वाचावया श्रीरामें ॥ २६ ॥ पत्र लिहिता प्रजापती। श्रोता सादर श्रीरघुपती। वाचिता सौमित्र शेषमूर्ती[1]। पत्रप्रयुक्ती अवधारा ॥ २७ ॥ ऐकावया हनुमंताची ख्याती। सुग्रीवादि जुत्पती[2]। सादरें बसल्या वानरपंक्ती। हनुमत्कीर्ति-चातक ॥ २८ ॥ ॐनमो जी श्रीरामचंद्रा। क्षराक्षरातीत परा। त्रिगुणातीत चिदचिन्मात्रा। परात्परा परब्रह्मा ॥ २९ ॥ जेथें नाहीं मीतूंपण। ब्रह्मीं नाठवे ब्रह्मस्फुरण। तो तूं श्रीराम सगुण। पूर्णत्व पूर्ण परब्रह्म ॥३०॥ ब्रह्मया तुझेनि ब्रह्मत्व। धर्मा तुझेनि धर्मत्व। कर्मा तुझेनि कर्मत्व। तूं स्वयमेव चिन्मात्र ॥ ३१ ॥ तुज निर्विकार श्रुति[3] म्हणती। तो तूं भाससी विश्वमूर्ती। विश्व तूं मानितां निश्चितीं। तंव ते श्रीपति तुझी माया ॥ ३२ ॥ तूं साकार ना निराकार। तूं विश्वनाथ विश्वंभर। तुझ्या स्वरूपाचा निर्धार। न कळे साचार श्रुतिशास्त्रा ॥ ३३ ॥ श्रुति म्हणती नेति नेती। शास्त्रें थोटावलीं चित्तीं। चारी वाचा मौनावती। तो तूं रघुपति परमात्मा ॥ ३४ ॥ आतां जैसा आहेसी तैसिया। नमो तुज श्रीराम-राया। तुझिया कृपें श्रीरघुवर्या। स्तुति वदावया सामर्थ्य ॥ ३५ ॥ तो तूं अपरंपार अनंत। अव-तारा अवतारी तूं रघुनाथ। तुझा सेवक हनुमंत। त्याचा अद्भुत पवाडा[4] ॥ ३६ ॥ लंघोनियां अपांपती[5]। येवोनियां लंकेप्रती। हनुमंतें केली जे जे ख्याती। ते तूं रघुपति अवधारीं ॥ ३७ ॥ तूं अवतार श्रीरामचंद्र। तुझें अगम्य चरित्र। तुझा रंक पालेखाईर। हनुमान वानर अगम्य ॥ ३८ ॥

हनुमंताचें उड्डाण—अगम्य हनुमंताची गती। अगम्य हनुमंताची ख्याती। अगम्य हनुमंताची

१ यथार्थ. २ संक्षिप्तपणें. ३ सुरक्षित. ४ उघडपणें, स्पष्टपणें. ५ फसवूं नये. ६ ब्रह्मदेव.

¶प्रफ—ची

१ शेषाचा अवतार. २ योद्धे. ३ वेद. ४ पराक्रम. ५ समुद्र.

कीर्ती । ऐके रघूपति पुरुषार्थ ॥ ३९ ॥ समुद्र लंघोनि हनुमान बळी । महेंद्रगिरि चेंपिला तळीं । सर्प दडपले पाताळीं । तोंडें ते काळीं वांसिलीं[१] ॥ ४० ॥ अंगवाताचेनि झडाडें[२] । समुद्रीं खचले पर्वतकडे । शिखरें उडालीं पैं पुढें । जेंवीं घुंगुरडें आकाशीं ॥ ४१ ॥ उड्डानवाताचेनि घर्घरें । वैसलीं मेघांचीं दांतारें । दिग्गज कांपती थरारें । आले शहारे[३] कळिकाला ॥ ४२ ॥ उड्डानकाळींचा कल्लोळ । उचंबळलें समुद्रजळ । सत्यलोकीं पर्जन्यकाळ । ध्रुवमंडळ तिमिन्नलें[४] ॥ ४३ ॥ उड्डाणकाळ दुर्धर मोठा । उमा[५] झोंबली नीळकंठा[६] । रमा थापटी वैकुंठा । भयें संकटीं संरक्षीं ॥ ४४ ॥ उड्डाणकाळीं कपि दुर्धर । सुर धाकती खेचर । सिद्ध गंधर्व विद्याधर । नरकिन्नर कांपती ॥ ४५ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । तैसें सवेग उड्डाण । कपीस आलें पैं स्फुरण । दुर्धर कोण आंवरी ॥ ४६ ॥

सुरसा-हनुमन्त संघर्ष व हनुमच्चातुर्यानें त्याची सुटका—पहावया हनुमंताची शक्ती । मिळोनियां देव समस्तीं । सुरसा धाडिली छळणोक्ती । मार्गरोधार्थीं[७] हनुमंता ॥ ४७ ॥ दनु जे कां दानवजननी । सुरसा नामें कश्यपपत्नी । विक्राळ मुख योजनमानी । कपीलागोनी गिळावया ॥ ४८ ॥ हनुमान जाला वीस योजन । सुरसामुख तीस योजन । हनुमान वाढला शत योजन । तसत्मान मुख पसरी ॥४९॥ हनुमान अणुमात्र होऊनी । प्रवेशला तिचे वदनीं । न मारोनिया कश्यपपत्नी । गेला निघोनी कर्णद्वारें ॥ ५० ॥ सुरसा आवाळीं[८] चाटित । देव दानव शिव विस्मित । हनुमान गेला हातोहात । बळान्वित श्रीरामें ॥ ५१ ॥ सुरसा कश्यपाची पत्नी । पित्या वायूची सापत्नजननी । कपि न मारीच विवेक-सज्ञानी । गेला निघोनी रामनामें ॥ ५२ ॥ हनुमान गेला न मारून । सुरसा तेणें संतोषोन । कपीस दिधलें आशीर्वचन । विजयी पूर्ण तिहीं लोकीं ॥५३॥

मैनाक पर्वताला अंगुलीनें स्पर्श केला—विसांवा द्यावया मारुती । जळ स्थळ पाहे सर्भोवती । तों मैनाक वाढला उर्ध्वगती । द्यावया विश्रांती हनुमंता ॥ ५४ ॥ कपि गिरिवरा नातळत । ऊर्ध्वगती निघे हनुमंत । मार्गरोधें वाढे पर्वत । योजनशत अति दीर्घ ॥ ५५ ॥ पर्वत देखोनि योजनें शत । हनुमान वाढला पंचशत । गिरि थोरावला सप्तशत । सहस्र-शत कपि जाला ॥ ५६ ॥ हनुमान जातां उल्लंघून । पर्वतासी आलें रुदन । हरिभक्ताचें पादस्पर्शन । अभाग्य पूर्ण मी न पवेंचि ॥ ५७ ॥ पर्वताची सप्रेम बोली । तंव हनुमंतासीं कृपा आली । मस्तकीं ठेविता आंगोळी । गिरि पाताळीं बैसला ॥ ५८ ॥ आंगोळीसाठीं गेला पाताळीं । कपि बैसतां रांगोळी । सुरासुरीं पिटिली टाळी । आतुर्बळी[१] हनुमंत ॥५९॥

सिंहिका विदारण व पडलंका-विध्वंसन—सिंहिका राक्षसी दारुण । छायाग्रहणें ग्रासी पूर्ण । तिचें करोनि[२] विदारण[३] । केलें उड्डाण हनुमंतें ॥ ६० ॥ जीवें मारोनि सिंहिका । उड्डाण करितां अति तवका[३] । मागें सांडोनियां लंका । पडलंका पावला ॥ ६१ ॥ तेथें क्रौंचा निशाचरी[४] । हनुमान तीस जीवें मारी । चौदा सहस्र निशाचरी । घातल्या सागरीं पुच्छाग्रें ॥ ६२ ॥

लंकेतील दिवे विझवून सर्वत्र कल्लोळ—तेथोनि आला लंकेआंत । सीताशुद्धीच्या कार्यार्थ । घरें शोधिलीं समस्त । साक्षेपयुक्त[५] वानरें ॥ ६३ ॥ साधावया सीताशुद्ध्यर्थ । कलहो लाविला नगरांत । सभा नागविली समस्त । हल्हळिती नागवे ॥६४॥ अनेक दीपिका लक्षांतरीं । वानरें विझविल्या

१ पसरलीं. २ झपाट्यानें. ३ रोमांच. ४ भिजून गेले. ५ पार्वती. ६ शंकराला. ७ रस्ता अडविण्यासाठीं. ८ ओंठ.

१ पराक्रमी. २ फाडून. ३ आवेशानें. ४ राक्षसी. ५ प्रयत्नानें.

कीर्ती । ऐके रघूपति पुरुषार्थ ॥ ३९ ॥ समुद्र लंघोनि हनुमान बळी । महेंद्रगिरि चेपिला तळीं । सर्प दडपले पाताळीं । तोंडें ते काळीं वांसिलीं[1] ॥ ४० ॥ अंगवाताचेनि झडाडें[2] । समुद्रीं खचले पर्वतकडे । शिखरें उडालीं पैं पुढें । जेवी धुंगुरडें आकाशीं ॥ ४१ ॥ उड्डानवाताचेनि घर्घरें । बैसलीं मेघांचीं दांतारें । दिग्गज कांपती थरारें । आले शहारे[3] कळिकाला ॥ ४२ ॥ उड्डानकाळींचा कल्लोळ । उचंबळलें समुद्रजळ । सत्यलोकीं पर्जन्यकाळ । भुवमंडळ तिमिन्नलें[4] ॥ ४३ ॥ उड्डाणकाळ दुर्धर मोठा । उमा[5] झोंबली नीळकंठा[6] । रमा थापटी वैकुंठा । भयें संकटीं संरक्षीं ॥ ४४ ॥ उड्डाणकाळीं कपि दुर्धर । सुर धाकती खेचर । सिद्ध गंधर्व विद्याधर । नरकिन्नर कांपती ॥ ४५ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । तैसें सवेग उड्डाण । कपीस आलें पैं स्फुरण । दुर्धर कोण आंवरी ॥ ४६ ॥

सुरसा-हनुमन्त सवर्ष व हनुमच्चातुर्यानें त्याची सुटका--पहावया हनुमंताची शक्ती । मिळोनियां देव समस्तीं । सुरसा धाडिली छळणोक्ती । मार्गरोधार्थीं[7] हनुमंता ॥ ४७ ॥ दनु जे का दानवजननी । सुरसा नामें कश्यपपत्नी । विक्राळ मुख योजनमानीं । कपीलागोनी गिळावया ॥ ४८ ॥ हनुमान जाला वीस योजन । सुरसामुख तीस योजन । हनुमान वाढला शत योजन । तसत्मान मुख पसरी ॥४९॥ हनुमान अणुमात्र होऊनी । प्रवेशला तिचे वदनीं । न मारोनियां कश्यपपत्नी । गेला निघोनी कर्णद्वारें ॥ ५० ॥ सुरसा आवाळी[8] चाटित । देव दानव शिव विस्मित । हनुमान गेला हातोहात । बळान्वित श्रीरामें ॥ ५१ ॥ सुरसा कश्यपाची पत्नी । पित्या वायूची सापत्नजननी । कपि न मारीच विवेक-

१ पसरलीं. २ झपाट्यानें. ३ रोमांच. ४ भिजून गेलें. ५ पार्वती. ६ शंकराला. ७ रस्ता अडविण्या-साठीं. ८ ओंठ.

सज्ञानी । गेला निघोनी रामनामें ॥ ५२ ॥ हनुमान गेला न मारून । सुरसा तेणें संतोषोन । कपीस दिधलें आशीर्वचन । विजयी पूर्ण तिहीं लोकीं ॥५३॥

मैनाक पर्वताला अंगुलीनें स्पर्श केला--विसांवा घ्यावया मारुती । जळ स्थळ पाहे सभोंवती । तों मैनाक वाढला उर्ध्वगती । द्यावया विश्रांती हनुमंता ॥ ५४ ॥ कपि गिरिवरा नातळत । ऊर्ध्वगती निघे हनुमंत । मार्गरोधें वाढे पर्वत । योजनशत अति दीर्घ ॥ ५५ ॥ पर्वत देखोनि योजनें शत । हनुमान वाढला पंचशत । गिरि थोरावला सप्तशत । सहस्र-शत कपि जाला ॥ ५६ ॥ हनुमान जातां उल्लंघून । पर्वतासी आलें रुदन । हरिभक्ताचें पादस्पर्शन । अभाग्य पूर्ण मी न पवेंचि ॥ ५७ ॥ पर्वताची सप्रेम बोली । तंव हनुमंतासीं कृपा आली । मस्तकीं ठेवितां आंगोळी । गिरि पाताळीं बैसला ॥ ५८ ॥ आंगोळीसाठीं गेला पाताळीं । कपि बैसतां रांगोळी । सुरासुरीं पिटिली टाळी । आतुर्बळी[1] हनुमंत ॥५९॥

सिंहिका-विदारण व पडलंका-विध्वंसन--सिंहिका राक्षसी दारुण । छायाग्रहणें ग्रासी पूर्ण । तिचें करोनि[1] विदारण[2] । केलें उड्डाण हनुमंतें ॥ ६० ॥ जीवें मारोनि सिंहिका । उड्डाण करितां अति तवका[3] । मागें सांडोनियां लंका । पडलंका पावला ॥ ६१ ॥ तेथें क्रोंचा निशाचरी[4] । हनुमान तीस जीवें मारी । चौदा सहस्र निशाचरी । घातल्या सागरीं पुच्छाग्रें ॥ ६२ ॥

लंकेंतील दिवे विझवून सर्वत्र कल्लोळ--तेथोनि आला लंकेआंत । सीताशुद्धीच्या कार्यार्थ । घरें शोधिलीं समस्त । साक्षेपयुक्त[5] वानरें ॥ ६३ ॥ साधावया सीताशुद्ध्यर्थ । कलहो लाविला नगरांत । सभा नागविली समस्त । हळहळिती नागवे ॥६४॥ अनेक दीपिका लक्षांतरीं । वानरें विझविल्या

१ पराक्रमी. २ फाडून. ३ आवेशानें. ४ राक्षसी. ५ प्रयत्नानें.

पुच्छेंकरीं । रावणा टोले दिधले शिरीं । सभा अंधारीं नागविली ॥ ६५ ॥

इंद्रजित, कुंभकर्ण, बिभीषणादींचीं गृहें शोधिलीं—

प्रधानवर्ग थोरथोरी । घेतली घरोघर धांडोळी वानरीं। इंद्रजिताचे निजमंदिरीं । जाली परी ते ऐका ॥ ६६ ॥ देखोनि सुलोचना नारी । हेचि होय म्हणे सीता सुंदरी । अनुसरली रावणपुत्री । दोघांतें मारीन मी आतां ॥ ६७ ॥ तंव सुलोचना वदे कथा । रावणें चोरोनि आणिली सीता । तीस सोडवावें इंद्रजिता । वेरी कुळघाता करील ॥ ६८॥ इंद्रजित म्हणे ऐक आतां । सोडीं म्हणों जातां सीता । रावण करूं धांवे घाता । सुहृदता[१] सांडोनि ॥ ६९ ॥ रावणा सीतासन्निपात । बुद्धि सांगतां करील घात । आपण न वदावी हे मात । कुळक्षयार्थ ते सीता ॥ ७० ॥ ऐसें इंद्रजित सांगतां सुलोचना हे नव्हे सीता । खूण पावली हनुमंता । होय निघता तेथूनी ॥ ७१ ॥ वेगीं उडोनि मारुती । गेला कुंभकर्णगृहाप्रती । घोर गर्जे त्रिजगती । श्वासावर्ती गज म्हैसे ॥ ७२ ॥ नासिकेच्या केशांतरीं । ओरडती गुंतलीं कर्‍हीं[२] । मातले हस्ती घेती झुंजारी । चशामाझारी जाती सिंह ॥ ७३॥ प्रबळ देखोनि कुंभकर्णार्थ । हनुमान म्हणे जीवाआंत । याचा पहावया पुरुषार्थ । प्रथम युद्धार्थ मी करीन ॥७४॥ नाहीं दांतवण पाणी । बेखंडल्या[३] दंतश्रेणी । मुखीं उठिली पोह्राणी[४] घाणी[४] । कटाळोनी कपि गेला ॥ ७५ ॥ बिभीषणाचे मंदिरीं । शोधूं जातां सीता सुंदरी । कीर्तनाचे निजगजरीं । सुख वानरीं उलथलें[५] ॥७६॥ ताल छंद गीत नृत्य । ऐकतां श्रीरामचरित्र । हनुमान स्वानंदें डुलत । रंगीं नाचत गुप्तत्वें ॥ ७७ ॥ लंका घेतलिया रघुपती । बिभीषण लंकाधिपती । करणें निश्चयो हा हनुमंतीं । निश्चितार्थो निश्चयो ॥ ७८ ॥ परम पावोनि विश्रांती । रावणगृहीं सीताशुद्ध्यर्थीं । शोधावयालागीं मारुती । शीघ्रगती निघाला ॥७९॥

रावणनिद्राभवनातील वृत्तान्त, रावण-मंदोदरी संवाद—रावणाचे भवनोभवनीं[१] । कपीनें पाहिलें शोधोनी । लंकेशाचे निद्रास्थानीं । सीताशोधनीं[२] करूं आला ॥ ८० ॥ रावणासहित सेजेवरी । हनुमान देखे मंदोदरी । हेचि मानोनि सीता सुंदरी । अभ्यंतरीं क्षोभला ॥ ८१ ॥ मी काय करूं नाट[३] आतां । रडत सांगों श्रीरघुनाथा । रावणा अनुसरली सीता । दोघांच्या घाता मी करीन ॥८२॥ करकरां दांत खात दाढा । वळिला पुच्छाचा आंकोडा । दोहींचा करावया नितोडा[४] । हनुमान गाढा क्षोभला ॥ ८३ ॥ दाहीं शिरें रावणातें । सीतेचे अकरावें तेथें । हें खुडुनियां वामहस्तें । नेईन भेटीतें श्रीरामा ॥ ८४ ॥ नातरी बांधोनि पुच्छासी । दोन्ही नेईन श्रीरामापासीं । श्रीराम दंडील दोघांसी । अधमांसी देखोनी ॥ ८५ ॥ ऐसें चिंतिता हनुमंता । मंदोदरी लंकानाथा । स्वयें सांगे स्वप्नावस्था । दुःखवार्ता अति दुःख ॥ ८६ ॥ आतांचि देखिलें म्यां स्वप्नीं । सीता ठेविली अशोकवनीं । तिचे कैवारालागोनी । आला क्षोभोनि महारुद्र ॥ ८७ ॥ कौंचा प्रिय-भगिनी तुम्हांसी । ते मारोनि पडलंकेसीं । सर्वेचि आला तो लंकेसीं । सीताशुद्धीसी साधावया ॥ ८८ ॥ माझें तुम्हांसी विज्ञापन । समूळ ऐका माझें स्वप्न । सीतारक्षणीं अशोकवन । दूत धांवोन तेथें गेला ॥ ८९ ॥ घेवोनि सीतेसीं तेणें भेटी । अशोकवनाची उत्पाटी[५] । स्वप्न देखिलें म्यां दृष्टीं । राक्षस कोटी मारिले ॥९०॥ चवदा सहस्र वनकर । ऐशीं सहस्र किंकर । जंबुमाळी प्रधानपुत्र । अखया-कुमर मारिला ॥ ९१ ॥ अखया आपटिला शिळीं ।

---

१ आसपण. २ उंटें. ३ बुरसल्या. ४ नरककुंडाची धाण. ५ मिळालें.

१ घरोघरीं. २ सीतेचा शोध. ३ अपकीर्ति. ४ नाश. ५ उपटणें.

त्याचा कैवारी सर्वदळी[1]। इंद्रजित गांजोनि महाबळी। लंकाहोळी तेणें केली ॥ ९२ ॥ ऐसें देखोनि कवन। जागी जालें गजबजोन। शिवस्मरणें शुद्धाचमन। केलें शयन वामभागीं ॥ ९३ ॥ तंव देखिलें दुर्धर स्वप्न। शिळीं सागर बुजोन। लंके आलें वानरसैन्य। राक्षसदळण करीतचि ॥ ९४ ॥ रामें मारिला कुंभकर्ण। लक्ष्मणें वधिला इंद्रजित आपण। तुम्हांवरी ओखटें[2] स्वप्न। म्यां संपूर्ण देखिलें ॥ ९५ ॥ दाही शिरें भूमीवरी। लोळती श्रीरामबाणधारीं। सांगतां भुलली मंदोदरी। शंख करी पतिशोकें ॥ ९६ ॥ रावणासंमुख बैसोन। म्हणे चुडियांसी पहिलें स्नान पुढती करितां शंखस्फुरण। धरी रावण धांवोनी ॥ ९७ ॥ रावण म्हणे मज जितां। तूं कां खेद करिसी वृथा। शिर न देखें तुमचे माथां। मिथ्या वार्ता जिण्याची ॥ ९८ ॥ रावणें पोटासीं धरोन। प्रियेसी करी समाधान। येरी म्हणे मिथ्या नव्हे स्वप्न। आलें विघ्न अनिवार ॥ ९९ ॥ चरणीं ठेवोनियां माथा। मंदोदरी म्हणे लंकानाथा। अशोकवनीं ठेवितां सीता। कुळाचे घाता ते करील ॥ १०० ॥ स्वयें अर्पोनिया सीता। शरण रिघावें श्रीरघुनाथा। निवारे जन्ममरणकथा। अक्षयता सुखरूप ॥ १ ॥ श्रीरामा जालिया अनन्यशरण। कदा बाधेना जन्ममरण। रावणा पावसी कृतकल्याण। सत्य भाषण हे माझें ॥ २ ॥ माझें न करशील वचन। तैं इंद्रजित कुंभकर्ण। पाचारोनि दोघेजण। रामार्पण करीन सीता ॥ ३॥ रावणा हितकुळार्थी रामार्पण करीं सीता। ऐसें रावणें ऐकतां। उद्वेगता[3] पावला ॥ ४ ॥ मंदोदरीचें वचन। सर्वस्वें मानी कुंभकर्ण। इंद्रजित वचनाधीन[4] रामार्पण करितील सीता ॥ ५ ॥ रावण सांगे मंदोदरीसी। निवारावया स्वप्नविघ्नासी। आधीं पूजूं सदाशिवासी[5]। उपचारांसी[1] तूं आणीं ॥ ६ ॥ कार्यीं गोवोनि निजांगना। विश्वासी राक्षसी दुर्मना। रावण धाडी अशोकवना। सीतेच्या यत्ना करावया ॥ ७ ॥

**अशोकवनांत सीतादर्शन; हनुमंताची गुप्तता**—इंद्रजित अथवा कुंभकर्ण। मंदोदरी का बिभीषण। यांचेनि बोलें सीता आपण। सर्वथा जाण न सोडावी ॥ ८ ॥ अशोकवना निघे राक्षसी। हनुमान लागला तिचे मागेंसीं। श्रीरामें कृपा केली कैसी। सीता अनायासीं भेटेल ॥ ९ ॥ सीता देखिलिया दृष्टीं। हनुमान घेवों न शके भेटी। राक्षसी रक्षण कोट्यनुकोटी। वृक्षसंपुटीं राहे गुप्त ॥ ११० ॥ एकांतीं भेटावया सीतेसी। हनुमान गुप्त वृक्षवासी। तेथें सीतेची स्थिति कैसी। वृक्षवल्लीसीं रामस्मरण ॥ ११ ॥ अशोकवनींचें पाषाण। गुल्मलता पक्षी तृण। अवघीं करिती श्रीरामस्मरण। प्रभाव पूर्ण सीतेचा ॥ १२ ॥ जागृतीं स्वप्नीं [2]तुर्यासुषुप्तीं। हनुमान शोधिता सीता सती। मीतूंपणाही परती। सहजस्थिती शोधित ॥ १३ ॥

**वृत्तान्त ऐकून श्रीरामाचा आल्हाद**—परिसोनि[3] सीतास्वरूपस्थिती। ऐकोनि हनुमंतशोधकशक्ती। सुखावोनि श्रीरघुपती। नयना स्रवती स्वानंदबिंदु ॥ १४ ॥ नव्हेती नयनां अश्रुजीवन। पूर्णानंदें अभिषिंचन। हनुमंतासी रघुनंदन। संतोषोन करितसे ॥ १५ ॥ धन्य सीतेचें मनोगत। नित्य श्रीरामीं अनुरक्त। धन्य हनुमंताचें जीवित। सेवानुरक्त श्रीरामीं ॥१६॥ धन्य ब्रह्मयाचें लिखित। अर्थी ओसंडे[4] परमार्थ। श्रवणमात्रें[5] श्रीरघुनाथ। स्वयें डुलत स्वानंदें ॥१७॥ परिसोनि सीतास्वरूपस्थिती। ऐकतां हनुमंताची ख्याती। संतोषोनि श्रीरघुपती। हर्षें मारुति आलिंगी ॥ १८ ॥ दोघां पहिलें आलिंगन। खुंटला बोल तुटलें मौन। एका जनार्दना शरण। रामायण रम्य रामें ॥१९॥

१ समानसैन्ययुक्त. २ अनिष्ट. ३ दुःख. ४ आज्ञाधारक. ५ शंकराला.

१ पूजासामग्री. २ चवथ्या आनंदावस्थेंत. ३ ऐकून. ४ भरून वाहतो ५ ऐकताच.

श्रीरामा विश्रांति हनुमंतीं। हनुमंता श्रीरामीं विश्रांती। एकीं¶ पडती †अनन्यप्रीतीं‡। अगम्य-स्थितीं श्रुतिशास्त्रां ॥ १२० ॥ भक्तभावार्थाचें प्रेम। स्वयें जाणे पैं श्रीराम। भजनव्युत्पत्तीचें वर्म। प्लवंगम[1] स्वयें जाणे ॥ २१ ॥ करितां बहुसाल व्युत्पत्ती। भक्तभावार्थ प्रेमप्रीती। सहसा नये अभिव्यक्ती[२]। कथासंगती अवधारा ॥ २२ ॥ एका जनार्दना शरण। हनुमान पावला अशोकवन। पुढील ब्रह्मपत्रलेखन। सावधान अवधारा ॥ २३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकाडे एकाकार-टीकायां ब्रह्मपत्रहनुमत्प्रतापवर्णनं नाम षड्विंशति-तमोऽध्यायः ॥ २६ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ १२३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ३ ॥ एवं ॥ ॥ १२६ ॥

---

## अध्याय २७ वा

ब्रह्मलिखित पत्रवाचन—श्रीमार्तंडभैरवाय नम ॥ धन्य धन्य तें ब्रह्मलिखित। धन्य धन्य आणिता हनुमंत। सौमित्र वाची सावचित्त। अर्थें रघुनाथ सुखावे ॥ १ ॥ सौमित्र वाची ब्रह्मलिखित। ऐकतां पत्रिकेचा अर्थ। श्रीराम स्वानंदें डुल्लत। हनुमंत-चरित्र परिसोनी ॥ २ ॥ शुद्धि न लभे सीता सती। कळी[३] लाविली लंकेप्रती। सभा नागविली रात्रीं। हनुमंतख्याती तें ऐका ॥ ३ ॥ हनुमंताचें आचरित। अचळ समूळ समस्त। ब्रह्मयानें लिहिलें ब्रह्म-लिखित। सावचित्त अवधारा ॥ ४ ॥

गुप्त राहून हनुमंतानें नगरात केलेला कल्लोळ—गुप्त राहोनि नगरद्वारीं। वानरचेष्टा नानापरी। कलहो लाविला निशाचरीं। कपिकुसरी[४] ते ऐका ॥ ५ ॥ पुच्छीं गोंवोनि नगरनारी। कलशस्फोट राजद्वारीं। भरलिया जाऊं देना घागरी। तोटा नगरीं उदकाचा ॥ ६ ॥ राजा निमाला दशकंठ। त्याचेनि नांवें घटस्फोट। राजद्वारीं होती स्पष्ट। नारी व्यथिष्ट कळफळती ॥७॥ गजारूढ गजपती। त्या गजांची खुंटली गती। मागील महामत्त हस्ती। आणी त्यांप्रती संग्रामा ॥ ८ ॥ गज भिडती गजांसीं। महावत महावतांसीं। कपि गुप्तत्वें बांधोनि पुच्छासी। दोनी तोंडघशीं आदळती ॥ ९ ॥ गज आदळतां तडफडती। वीर रगडले चरफडती। राजद्वारीं ऐशा रीतीं। कलहप्राप्ती कपिपुच्छें ॥१०॥ अश्वस्वारांचिया हारी। हो हो मा मा जी जी करी। नाचती चंव पायांवरी। राजद्वारीं कपि पाडी ॥११॥ अश्व पाडोनि ऐसे रीतीं। हनुमान गांजी कलह-प्राप्ती। तैसेचि अतिरथी महारथी। गांजी मारुति गुप्तत्वें ॥ १२ ॥ पुढील मल्लाची शेंडी ओढी। मागील मल्ल त्यावरी पाडी। मल्लविद्या कडोविकडी। केली बापुडी हनुमंतें ॥ १३ ॥ मल्ल अति बळें उन्मत्त। परस्परें कलहो होत। हनुमंतें करोनि घात। पाडिले कुंथत राजद्वारीं ॥१४॥ विवादती[1] वेदपाठक। सानुनासिक अनुनासिक। रामस्मरणीं नाहीं विवेक। निर्नासिक कपि मानी ॥ १५ ॥ अस्मात् कस्मात् उपपत्ती। विद्वांसीं[२] विवेकयुक्ती। नामस्मरणीं नाहीं मती। मानी मारुति भूभार ॥ १६ ॥ प्रधान गर्वें अति सन्मानीं। बैसोनि येतां सुखासनीं। हनुमान अत्यंतविंदानी। भोयांचे कानीं भोवंडी पुच्छ ॥ १७ ॥ भोई ओसरतां[३] दचकोनी। धूर आदळतां धरणीं। धुळी निघालीसे वदनीं। दंतभग्नीं कुंथत ॥१८॥ राया-पासीं अति सन्मान। त्यांसी राजद्वारीं अपमान। हांसताती लंकेचे जन। तेणें प्रधान क्षोभले ॥ १९ ॥ सघृतभातें चौंशेरी। उंच वरान्न भोजन

---

१ वानर, २ उघडकीला, ३ भाडण, ४ मारुतीचें कौशल्य.

¶अ—एकीं पडती अनन्य प्रीतीं. †ब—पाठ ‡अ—गती.

१ वाद करतात, २ विद्वानांच्या ठिकाणीं, ३ मागें सरतां.

घरीं। आम्हांसी पाडिलें राजद्वारीं। सुबद्ध मारी भोयातें ॥ २० ॥ भोई म्हणती ऐका मात। व्यर्थ कां करा आमुचा घात। सीतेनें सोडिला पुच्छकेत। दंतभग्नार्थ[1] तेणें तुम्हां ॥२१॥ सीता आहे लंकेप्रती। नगरलोक अनुवादती[2]। कोणे ठायीं नेमें निश्चितीं। शुद्धि मारुति न लभेचि ॥ २२ ॥ ऐसें करितां जाली राती। शुद्धि साधावया सीता सती। निघाला रावणसभेप्रती। केली ख्याती तें ऐका ॥ २३ ॥ सिंहासनी दशशिर। सभेसीं निशाचर वीर। निकट प्रधान आणि कुमर। सभा सुंदर शोभत ॥२४॥ सभेसीं येवोनि घरटीकार[3]। करोनि रावणासी जोहार। सांगती नगरींचा समाचार। विघ्न दुर्धर दिसताहे ॥ २५ ॥ मुख्य विघ्नाची पैं थोरी। अतर्क्य कलहो राजद्वारीं। गज रथ यांसी हारी। महावीरीं अपमान ॥ २६ ॥ राजगृहीं अति सन्मान। पालखीपदस्थ[4] प्रधान। शिबिका[5] राजद्वारीं भंगोन। दंतभग्न पावले ॥ २७ ॥ घटस्फोट राजद्वारीं। कळकळती नरनारी। उदकाचा तोटा नगरीं। घरोघरीं आकांत ॥ २८ ॥ लोक जल्पती सम-सकट। नगरीं निमाला दशकंठ। त्याचेनि नांवें घटस्फोट। नारी यथेष्ट कळकळती ॥ २९ ॥

दिवे मालवून सर्वत्र अंधार व त्याचे परिणाम—

रावणें ऐकतां उत्तर। कोपा चढला दुर्धर। धरा मारा घरटीकार। अपवित्र अनुवादती ॥ ३० ॥ माझा सांगता विघ्नप्रकार। जरी मारिला घरटीकार। तरी मी हनुमान भूमिभार। केला चमत्कार तो ऐका ॥ ३१ ॥ सुगंधस्नेहदीपिका। कर्पूर-दीपिका अनेका अठरा लक्ष दोहीं बाहीं देखा। लखलखिता शोभत ॥ ३२ ॥ तंव वानरें पुच्छ हाणितां देख। विझविल्या दीपिका एकाएक। ऐसें पाहतां जनलोक। सभा सकळिक गजबजिली ॥ ३३ ॥ सभेसीं पडतां अंधार। जिहीं बांधिला घरटीकार। ते धुमसोनि[1] निशाचर। करी वानर मुक्त त्यासी ॥ ३४ ॥ घरटीकार करोनि मुक्त। सभेसीं क्षोभला हनुमंत। जें जें केलें अत्यद्भुत। सावचित्त अवधारा ॥ ३५ ॥ सभेसीं पडतां अंधारीं। हनुमंतें मांडिली चोरी। वस्त्रें अलंकार-हारी। शस्त्रें वस्त्रें नागविलीं ॥ ३६ ॥ एक म्हणे नेलीं माझीं त्वां वस्त्रें। तो म्हणे नेलीं माझीं शस्त्रें। भट्ट म्हणती गेलीं धोत्रें। गुप्त वानरें नागविलें ॥ ३७ ॥ कुंडलें घेतां कान तोडी। वस्त्रें घेतां डोळे फोडी। बाहुवटें घेतां बाहु मोडी। गांजी कडोविकडी राक्षसां ॥ ३८ ॥ मुकुट घेतां मस्तक फोडी। कटिसूत्रासाठीं[2] माज[3] मोडी। मुद्रिका-निमित्त आंगोळ्या तोडी। केलीं वेडीं राक्षसें ॥ ३९ ॥ कंठमाळा घेतां कंठ मुरडी। पदकासाठीं हृदय फोडी। नेसणीं घेतां लिंगें तोडी। केलीं बापुडीं राक्षसें ॥ ४० ॥ नेसणीं सोडा रे लौकरी। नातरी लिंगा होय बोहरी। नपुसकता संसारीं। कैशा परी सोसवेल ॥ ४१ ॥ पायीं विरुदें[4] वीराचीं पूर्ण। तयासाठीं मोडी चरण। बोंबलूं जातां छेदी प्राण। फें फें वचन राक्षसां ॥ ४२ ॥ येरयेरां सांगती बुद्धी। बोंबलूं नका रे त्रिशुद्धी। बोंबलूं जातां नाक छेदी। निःशब्दवादी राहा उगे ॥४३॥ वस्त्रें अलंकार जोडती पुढें। तैसें नाक तंव ना जोडे। ख्याति लाविली माकडें। येरू दडे येरा-मागें ॥ ४४ ॥ जें बोलिला घरटीकार। तें विघ्न आलें साचार। सीता क्षोभली दुर्धर। दशशिर-वधार्थी ॥ ४५ ॥ जानकीक्षोभ अत्यद्भुत। तिणें सोडिला पुच्छकेत। रावण मेला किंवा जित। कोणी मात सांगेना ॥ ४६ ॥ रावण निमाला[5]

१ दात पडणें. २ बोलतात. ३ घरत घालणार. ४ पालखींत बसणारे. ५ पालखी.

१ मारून. २ करगोटयासाठीं. ३ कंबर. ४ शौर्यचिन्हें. ५ मेला.

अंधारीं । विघ्न आलें त्याचियेवरी । बोंब पडली सभेमाझारी । आपांपरी[1] राक्षसां ॥ ४७ ॥ मारिला इंद्रजित कुंभकर्ण । तयामागें येथें रावण । आतां धावण्या धांवेल कोण । राक्षसगण कांपती ॥४८॥ पिता क्षोभला पवन । दीपिकातें जाय विझवोन । राक्षसां होताहे कंदन[2] । दशानन निमाला ॥४९॥ भंगलें राजाज्ञेचें सूत्र । सभेमाजी निघाले चोर । नागविले थोर थोर । निशाचर पळों पाहती ॥५०॥ जो कोणी निघे सभेबाहेरी । त्यासी पुच्छ सुबद्ध[3] मारी । अवघीं दडालीं अंधारीं । कोंडमारी राक्षसां ॥ ५१ ॥ सीता क्षोभली उद्भट । राक्षसां आलें अति संकट । बाहेरी जावया न फुटे वाट । मरण दुर्घट ओढवलें ॥ ५२ ॥ अंधारीं रावणाचा मुकुट । पुच्छाग्रीं ओढी मर्कट । तेणें धाकें दशकंठ । म्हणे मज शेवट पैं आला ॥ ५३ ॥ रावणाच्या उरीं शिरीं । हनुमान सुबद्ध टोले मारी । तेणें त्यासी आली अंधारी । धाकेंकरीं[4] न बोलवे ॥ ५४ ॥ अंधारीं न दिसे पैं व्यक्त । अंगीं वाजती अति आघात[5] तेणें भयें लंकानाथ । चळीं कांपत थरथरां ॥ ५५ ॥ सत्य बोलिला घरटीकार । विघ्न मज आलें साचार । गुप्त आघात दुर्धर । लागती निष्ठुर प्राणांत ॥ ५६ ॥ हनुमान सांगे दशशिर[6]। तुवां चोरली सीता सुंदर । तुझें छेदावया शिर । आलों साचार मी रामदूत ॥ ५७ ॥

रावणावर आघात व त्याला ताकाद–रावणाचा दश शिरें । हनुमान छेदिता नखाग्रें । परी वारिला होता श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें सोडिला ॥५८॥ तुवां मारिल्या लंकानाथ । माझा पुरुषार्थ होईल व्यर्थ । ऐसें बोलिला रघुनाथ । तेणें हनुमंत न मारीच ॥ ५९ ॥ नागवोनि राक्षसपंक्ती । गांजोनियां लंकापती । सभेसीं लावोनियां ख्याती[7]। मग मारुति निघाला ॥ ६० ॥ वानरें लावितांचि हात । रावण झाला मूर्च्छाभ्रांत । कपि कानीं जल्पिला गुह्यार्थ । लंकानाथ तो नेणे ॥ ६१† ॥ नांव ऐकतां हनुमंत । एक फळफळां मुतत । एकां सुटला अधोवात । जाला भ्रांत रावण ॥ ६२ ॥

श्रोत्याचा हर्ष–ऐसें वाचितां ब्रह्मलिखित । लक्ष्मण गद्गदां हांसत । वानरां मुरकुंडी वळत । हास्य करी श्रीराम ॥ ६३ ॥ गांजोनियां लंकापती । सभा नागविली काळे रातीं । ऐकतां हनुमंताची कीर्ती । श्रीरघुपति सुखावे ॥ ६४ ॥ सुखावला लक्ष्मण । सुग्रीव सुखावे संपूर्ण । सुखावले वानरगण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ६५ ॥

हनुमंत अशोकवनांत जातो–गांजोनि सभेचा पुरुषार्थ । रावणा करोनि हताहत । आला अशोकवनाआंत । हनुमंत महाबळी ॥ ६६ ॥ सीतेसीं करावया एकांत । हनुमान वृक्षीं अति गुप्त । सीताविरहें विषयासक्त । लंकानाथ तेथें आला ॥ ६७ ॥

तेथील रावणाचें सीतेला आव्हान–सीतेसी सांगे स्वयें रावण । माझें करावें त्वां वरण[1] । तुज मी महिषी[2] करीन । आण प्रमाण शिव साक्षी ॥ ६८ ॥ श्रीराम वनवासी हीन । राज्यभ्रष्ट अति दीन । त्याचें सांडोनियां ध्यान । राजा रावण वरीं सीते ॥६९॥ सीते तूं तंव समूळ वेडी । पाहें माझी प्रतापप्रौढी ।

---

१ दुःखावस्था. २ नाश. ३ अत्यंत. ४ धाकामुळें. ५ घाव. ६ हे रावणा. ७ प्रताप.

१ स्वीकार. २ पट्टराणी.

† ब–पाठ.

[ओव्या ६१ व ६२ यांचेंमध्यें ब–पोथींत खालीं दिलेला भाग आहे.]

दीपिका आणितांचि तेथें । अवघे नागवे हळहळित ।
शश्पें लांब हातहात । मग लाजत येरयेरा ॥ ६२ ॥
येकाच्या लिंगा केलें वपन । येकाचीं लिंगें त्वचा छिन्न ।
येकाचीं तृणें निमग्न । अवघे नग्न हळहळती ॥ ६३ ॥
येकाचीं लिंगें तें सलोडे । येकाचें लिंग लांब
(ब–निकाय) थोटें ।
येकाचें लिंग अत्यंत मोठें । पादरीं शश्पें कुळकुळीत ॥ ६४ ॥

देव जे कां तेहतीस कोडी। बांधवडीं पैं माझे ॥ ७० ॥ इंद्र बारी[1] चंद्र कर्‍हेरी[2]। वसंत सेजेचा फुलारी। रावणा वरिल्या सीता सुंदरी। सुरासुरीं वंदिजे ॥ ७१ ॥ मुख्य करोनि मंदोदरी। ऐशीं सहस्र माझ्या नारी। त्या करीन तुझ्या किंकरी। आज्ञाधारी सेवेसीं ॥ ७२ ॥ माझें करावया वरण। तुज मी होतों अनन्य शरण। तुझे वंदितों मी चरण। पाणिग्रहण करीं माझें ॥ ७३ ॥ जो मी प्रतापी लंकानाथ। सुरनरां काळकृतांत। तुझा होतों शरणागत। त्यजीं रघुनाथ भजें मज ॥ ७४ ॥

सीतेचें कडक उत्तर–ऐकोनि रावणाचें वचन। सीता बोले हास्यवदन। जळो तुझें हें महिमान। काळें वदन लंकेशा ॥ ७५ ॥ स्वयंवरीं वाहतां[3] हरकोदंड[4]। तुझें जाहलें काळें तोंड। श्रीरामें केलें दुखंड। वृथा बळबंड जल्पसी ॥ ७६ ॥ बाळपणीं विंधोनि बाण। घेतला ताटकेचा प्राण। सुबाहु मारोनियां जाण। केला संपूर्ण गुरुयाग ॥ ७७ ॥ शूर्पणखा विटंबून। चवदा सहस्र राक्षसगण। मारिले त्रिशिरा खर दूषण। दिधलें जनस्थान द्विजांसी ॥ ७८ ॥ नाहीं रघुनाथा सारथी। श्रीराम एकला पदाती। तेणें येव्हढी केली ख्याती। तुझी अपकीर्ति तूं ऐकें ॥ ७९ ॥ सहितभवानी[5] त्रिपुरारी[6]। आंदोळिला कैलासगिरी। तो तूं श्रीरामभयेंकरीं। झालासी भिकारी संन्यासी ॥ ८० ॥ कपटी होवोनि संन्यासी। शेलीं परदारा चोरिसी। नाहीं पुरुषार्थ तुजपासीं। वृथा जल्पसी वाढीव ॥ ८१ ॥ श्रीराम परब्रह्मपुतळा। रावणा तूं काळा डोंबकावळा। सीता मानी त्याचे विटाळा। कल्पांतकाळीं स्पर्शेना ॥ ८२ ॥ चोरिता श्रीरामनायिका। निंद्य जालासी तिहीं लोकां। रावणा तूं तंव शूकरमुखा। तुज मी देखा नातळें ॥ ८३ ॥ वायसाचा पांथीकर[7]। जैंवी नव्हेचि चंद्रचकोर। तेंवी सांडोनि श्रीरामचंद्र। दशवक्त्र[1] स्पर्शेना ॥ ८४ ॥ लक्ष्मणाचिया मर्यादा-रेखा। तूतें नुल्लंघवेचि दशमुखा। श्वान शूकर काळमुखा। तुज मी देखा स्पर्शेना ॥ ८५ ॥

त्यामुळें रावणाचा क्रोध–साधु सज्जन सौम्य संत। कदा विष्ठेसी न लावी हात। तेंवी तूं अपवित्र लंकानाथ। तुज मी निश्चित स्पर्शेना ॥ ८६ ॥ ऐकोनि सीतेचें वचन। वर्मीं खोंचला दशानन। जिव्हा सांडा रे छेदून। निंद्य वचन दिसताहे ॥ ८७ ॥ बळेंचि इसी मज भोगितां। कोण निवारील आतां। कैंवी राखवेल रघुनाथा। सती पतिव्रता पाहूं कैसी ॥ ८८ ॥

हनुमंताचा क्षोभ–ऐसें बोलतां लंकानाथ। ऐकोनि क्षोभला हनुमंत। करावया रावणाचा घात। वृक्षांआंत खवळला ॥ ८९ ॥ टवकारिले नेत्रवाट। वळिला पुच्छाचा पैं साट[2]। छेदावया दशकंठकंठ। बळें उद्भट गुरगुरी ॥ ९० ॥ मजदेखतां गांजी सीता। मी काय वार्तिकार[3]† आतां। रडत जावोनि सांगूं रघुनाथा। नपुंसकता मज आली ॥ ९१ ॥ सीतेसी लाविताचि हात। जीवें मारीन लंकानाथ। येणें बळें हनुमंत। वृक्षाआंत गुरगुरी ॥ ९२ ॥ त्याची ऐकतां गुरगुर। कांपिनला दशशिर। सीतारक्षणीं श्रीरामचंद्र। अति सत्वर पातला ॥ ९३ ॥

मंदोदरीचें आगमन व रावणाचें निजमंदिरीं गमन–रावण पडिला विचारीं। तव पातली मंदोदरी। लंकापति धरोनि करीं। निजमंदिरीं तो नेला ॥ ९४ ॥ गुज सांगे तयासी। अखंड राम सीतेपासीं। हात लावितां तियेसी। वृथा तूं मरसी रावणा ॥ ९५ ॥

सीतेचा अनुताप व शोक; हनुमंत राममुद्रा टाकतो–ऐसी सांगतांचि गोष्टी। रावणा धुकधुकी लागली

१ छत्रधारी. २ स्नानगृहाचा अधिकारी. ३ उचलितां. ४ महादेवाचें धनुष्य. ५ पार्वतीसह. ६ शंकर. ७ सोबती.

१ रावण. २ चाबूक. ३ हेर.

† बक–काय वर्ती करूं आता.

पोटीं । येरीकडे सीता गोरटी । वृक्षसंपुटीं[1] विलपत ॥ ९६ ॥ लक्ष्मण छळितां श्रीरामभक्त । तेणें अंतरला श्रीरघुनाथ । मज आकळी लंकानाथ । भक्तच्छळण महापाप ॥ ९७ ॥ श्रीरामाज्ञेचें रक्षण । मजपासीं लक्ष्मण । त्याचें करितां म्यां छळण । बंदीं रावण मज घाली ॥९८॥ छळवाद्याचें वदन । कदा न पाहे रघुनंदन । मज सांडिलें निंद्य म्हणोन । शोकनिमग्न छळणार्थीं ॥९९॥ श्रीरामभक्ताचें छळण । पंचमहापापांहूनि[2] दारुण । मज क्षोभला रघुनंदन । बंदीमोचन कोण करी ॥ १०० ॥ श्रीरामभातां दुर्धर शर । लंका विध्वंसी साचार । रावण निर्दळी सहपरिवार । मज रघुवीर क्षोभला ॥ १ ॥ सुटल्या श्रीरामाच्या बाण । मशक बापुडें तें रावण । मज क्षोभला रघुनंदन । सखा लक्ष्मण छळितांचि ॥ २ ॥ न लागतां निमेषमात्र । श्रीराम वधिता दशवक्त्र । म्यां छळिला सखा सौमित्र । तेणें रघुवीर क्षोभला ॥ ३ ॥ दासासी दडण शिरोमुंडण । स्त्रियेसी दंडण उपेक्षण । ऐसें बोलोनि आपण । दीर्घ रुदन करी सीता ॥४॥ श्रीरामें उपेक्षिलियापाठीं । जीवें जीत मी करंटी । प्राण द्यावया उठाउठीं । सीता गोरटी अनुतापी ॥ ५ ॥ करितां श्रीरामस्मरण । स्वेद रोमांच अश्रु पूर्ण । सीतेसी करितां स्फुंदन । आलें रुदन हनुमंता ॥ ६ ॥ कळवळ उपजली कपींद्रा । तेव्हां टाकिली श्रीराममुद्रा । मुद्रा देखोनि सीता सुंदरा । निद्रा तंद्रा[3] विसरली ॥ ७ ॥

त्याची सीतेवरील प्रक्रिया—दोनी टवकारिले नयन । चिंता गेली हरपोन । मनीं पांगुळलें[4] मन । विस्मयापन्न[5] जानकी ॥८॥ श्रीराममुद्रेचा बडिवार[6] । दुःख निर्दाळोनि समग्र । सुख द्यावें अपरंपार । चिदचिन्मात्र राममुद्रा ॥ ९ ॥ दीपिकातेज अंधारयुक्त । श्रीराममुद्रा ग्रासी समस्त । करोनि शशिसूर्य खद्योत[1] । प्रकाशवंत राममुद्रा ॥ ११० ॥ मुद्रिका शोभे नामेंकरीं । श्रीरामनाम मुद्रिकेवरी । राममुद्रिका बाह्यांतरीं । सीता सुंदरी स्वयें देखे ॥ ११ ॥ मुद्रिकापीठपत्रावळी । सहस्रनामप्रभावळी । अक्षरीं अक्षरें लिहिल्या ओळी । अक्षरें त्याहाळी जानकी ॥ १२॥ अक्षरीं अक्षरमुद्रिका । दशावतार त्यावरी टीका । जडित चरित्रमालिका । सुखदायका सीतेसी ॥ १३ ॥ मुद्रिकागर्भे अति पवित्र । त्याहीमाजीं परात्पर । श्रीरामनाम निजाक्षर । क्षराक्षरातीत[2] ॥ १४ ॥ ऐसी मुद्रिका आनंदयुक्त । देखोनि सीता सद्गदित । नेत्रीं आनंदजळ स्रवत । रोमांचित जानकी ॥ १५ ॥ मुख्यमुद्रा तें सुवर्ण । त्यावरी श्रीराम सुवर्णवर्ण । देखोनि मुद्रेचें महिमान । सुखसंपन्न जानकी ॥ १६ ॥ तेथें चमत्कार जाहला । मुद्रा नव्हे श्रीराम आला । ऐसा सीतेसी भाव गमला । सरसाविला अंचळ[3] ॥ १७ ॥ श्रीराम आले एकाएकीं । लाजे जाली अधोमुखी । सर्वांगें हरिखली[4] जानकी । सुखोन्मुखी डुल्लत ॥ १८ ॥ केउता[5] आहे लक्ष्मण । दुष्ट दुरुक्तीं केलें छळण । त्याचे केशीं झाडीन चरण । लोटांगण त्या माझें ॥ १९ ॥ सर्वेचि श्रीरामेंसीं गोडी । द्या जी फोडी देईन विडी । आलेति मजकारणें तांतडीं[6] । चरण झाडीन निजकेशीं ॥ १२० ॥ ब्रह्मलिखित निरुपम । सीताचरित्र अनुपम । ऐकतां श्रीरामा आलें प्रेम । अति संभ्रम तो ऐका ॥ २१ ॥

ह्या वर्णनाचा श्रीरामावर झालेला परिणाम—सीते देईं आलिंगन । म्हणोनि उठला रघुनंदन । पैल दिसे सीता चिद्रत्न । आली धांवोनि भेटावया ॥ २२ ॥

---

१ वृक्षवाटिकेमध्यें. २ ब्रह्महत्या, सुवर्णाची चोरी, सुरापान, गुरुस्त्रीगमन, हीं चार पातकें व हीं करणाराचा समागम करणारा मिळून पंचमहापातकी. ३ ग्लानी, सुस्ती. ४ तटस्थ झालें ५ आश्चर्यचकित. ६ मोठेपणा.

१ काजवे. २ जें काहीं विनाशी अविनाशी त्यापलीकडील. ३ पदर. ४ हर्ष पावली. ५ कोठें. ६ बाईनें.

दोनी बाह्या पसरोन । हर्षें धांवे रघुनंदन । सीता देखिली चिद्रत्न । आलिंगनालागून उभा असे ॥ २३ ॥ ऐसा धांवतां रघुनंदन । विस्मयो पावती कपिगण । सुग्रीव पडिला मूर्च्छापन्न । मूर्च्छित लक्ष्मण पत्रार्थी ॥ २४ ॥ हर्षे ओसंडे[1] रघुनाथ । पदोपदीं होय नाचता । धन्य सुदिन हनुमंता । माझी मज सीता भेटविली ॥ २५ ॥

तें पाहून सीतेला न आणल्याबद्दल हनुमताला खेद व उड्डाणीं तयारी—ऐकोनि म्हणे हनुमंत । थोर चुकलों मी तेथ । सीता आणितों जरी येथ । श्रीरघुनाथ सुखावता ॥ २६ ॥ अति अनुताप हनुमंता । चुकलों चुकलों मी सर्वथा । मज काय आली नपुंसकता । निमेषें सीता आणीन ॥ २७ ॥ क्षण एक धीर धरीं रघुनाथा । सवेग आणीन मी सीता । चरणीं ठेवोनियां माथा । होय उडता हनुमंत ॥ २८ ॥

राम त्याचें सांत्वन करितात—वेगें उडतां हनुमंता । उमज पडला श्रीरघुनाथा । स्वयें धांवोनि होय धरिता । ऐक आतां सांगेन ॥ २९ ॥ ब्रह्मलिखित ऐकतां । प्रेम उसळलें चित्ता । दुश्चित तें वदलों सीता सीता । तुवां त्या अर्था नवजावें ॥ १३० ॥ घेवोनि श्रीरघुनाथ । वेगें उडों पाहे हनुमंत । अंगदें देखोनि तो अर्थ । धांवोनि धरित हनुमंता ॥ ३१ ॥ अंगद श्रीरामांसमवेत । उडों पाहे हनुमंत । ते देखोनि जांबुवंत । स्वयें धरित तिघांसी ॥ ३२ ॥ घेवोनिया तिघे जण । हनुमान करूं पाहे उड्डाण । सुग्रीव होवोनि सावधान । धरी धांवोन हनुमंता ॥ ३३ ॥ सुग्रीवाही समस्त । उडों पाहे हनुमंत । तों लक्ष्मणें धांवोनियां तेथ । आंवरीत निजबळें ॥ ३४ ॥ स्फुरणें खवळला हनुमंत । अंगद सुग्रीव जांबवंत । रामलक्ष्मणांसमवेत । लंकेआंत नेवों पाहे ॥ ३५ ॥ पंच फळें वृक्षावरी । तेंवी पांच वीर ते अवसरीं । नेवों पाहे लंकेभीतरीं । तेही परी अवधारा ॥ ३६ ॥ श्रीराम मारील रावण । इंद्रजित मारील लक्ष्मण । आम्ही मर्दूं राक्षसगण । सीता घेवोन येवों सुखें ॥ ३७ ॥ ऐसें कपीचें मनोगत । जाणोनियां श्रीरघुनाथ । हनुमंताचे चरण धरित । क्षमा निश्चित वैं कीजे ॥ ३८ ॥ श्रीरामें धरितां चरण । हनुमान घाली लोटांगण । तुझी आज्ञा अणुप्रमाण । प्राणांतीं आपण नुलंघीं ॥ ३९ ॥ तुज कळली सीतेची अवस्था । तिसी आणावया शीघ्रता । धीटपण केलें म्या आतां । क्षमा सर्वथा मज कीजे ॥ १४० ॥

मारुतीचें क्षमापन—ऐसें बोलोनि आपण । धरिले श्रीरामाचे चरण । रामें दिधलें आलिंगन । समाधान स्वामिभक्ता ॥ ४१ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंताचें बळ संपूर्ण । सुग्रीव आणि लक्ष्मण । वानरगण वानिती ॥ ४२ ॥ बळ अद्‌भुत हनुमंता । पुढील सीतेची अवस्था । ब्रह्मलिखिताची कथा । सावधान अवधारा ॥ ४३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखित-हनुमंतपराक्रमवर्णनं नाम सप्तविंशतितमोऽध्यायः ॥ २७ ॥ ओंव्या ॥ १४३ ॥

---

## अध्याय २८ वा

पुढील वृत्तान्तवाचन—श्रीरामचंद्राय नमः ॥ मागील प्रसंग संपतां । अंगदसुग्रीवजांबवंतां । लक्ष्मणेंसीं श्रीरघुनाथा । घेवोनि उडता हनुमंत ॥ १ ॥ हनु-मंताची परम कीर्ती । गगनीं सुरवर वानिती । भूतळीं वाखाणिती भूपती[1] । वानी कपिकीर्ति श्रीराम ॥ २ ॥ आवडीं म्हणे रघुनाथ । सौमित्रा वाचीं ब्रह्मलिखित । मुद्रिका देवोनि हनुमंत । करी एकांत सीतेसीं ॥ ३ ॥ धन्य ब्रह्मयाचें ब्रह्म-पत्र । धन्य श्रवणार्थी श्रीरामचंद्र । धन्य वाचक सौमित्र । धन्य कपींद्र कपिकुळीं ॥ ४ ॥

१ भरला.

१ मोठमोठे वीर, योद्धे.

मुद्रिकेमुळें झालेली सीतेची स्थिति—मुद्रिकातेजदेदीप्यता। श्रीराम आला मानी सीता। तेणें होवोनि सलज्जता। सप्रेमता घाबरी ॥ ५ ॥ सावधान पाहतां देखा। पुढें देखे आंगोळिका[१]। जाणोनि श्रीराममुद्रिका। सुखोन्मुखा जानकी ॥६॥

सीतेचें भाषण—पहिलें वंदिली निढळीं[२]। मग आलिंगिली हृदयकमळीं। स्वानंदें चुंबी जनक बाळी। सुखें वेल्हाळी आलीसी ॥ ७ ॥ म्हणोनि घाली लोटांगण। भागलीस दूराभिगमन। तुझें करीन चरणक्षाळण। तीर्थसेवन हितार्थ ॥ ८ ॥ तुझें सेवितां तीर्थचरण। लक्ष्मणासी केलें म्यां छळण। त्या पापाचें निर्दाळण। प्राप्ती संपूर्ण श्रीरामीं ॥ ९ ॥ तूं तव सती श्रीराममुद्रा। घालूं शेज करिसी निद्रा। श्रमलीस उतरतां समुद्रा। मार्गी गिरिवरां लंघितां ॥ १० ॥ मी वामांगीं तूं दक्षिणांगीं साजणी। आम्ही दोघी स्वानंदभगिनी। श्रीरामाची समूळ कहाणी। कृपा करोनी मज सांगें ॥ ११ ॥ नाठवे सचेतन अचेतन। सद्गुरुभक्तिप्रेम पूर्ण। तेणें हनुमंता आलें रुदन। धन्य भजन सीतेचें ॥ १२ ॥ आम्हीं म्हणवितों श्रीरामभक्त। हें प्रेम नाहीं आम्हांआंत। जानकी सप्रेम सदोदित। हीस रघुनाथ तुष्टला ॥ १३ ॥ सगुणनिर्गुण श्रीरामभक्त। जो वंदी तो नित्यमुक्त। जो निंदी त्यासी नरकपात। वदे हनुमंत वेदार्थ ॥ १४ ॥ मुद्रिका देखतांचि दृष्टीं। अत्यादरें मानी गोरटी। तिसी पुसे सप्रेम गोष्टी। राम जगजेठी काय करितो ॥ १५ ॥ स्वस्थ श्रीरामलक्ष्मण। तरी कां माझी सोडवण। करावया न करिती आंगवण[३]। दुर्धर बाण असतांहि ॥१६॥ श्रीरामभातां दुर्धर शर। समुद्र शोषोनि समग्र। निवटोनियां[४] दशशिर। सीता सत्वर सोडविता ॥ १७ ॥ त्यांहीं दोघीं त्यजिली सृष्टी। हें न सांगवे दुःखकोटी। म्हणोनि सुचली मौननिष्ठी। सज्ञान मोठी राममुद्रा ॥ १८ ॥ श्रीराम गेला परलोकता। मौनमुद्रा सांगे वार्ता। तो जरी येथें स्वस्थ असता। मज सोडविता निमेषार्धें ॥ १९ ॥ श्रीरामाचा एकैक बाण। करील त्रैलोक्याचें कंदन। त्यापुढें कायसें दशानन। गेला त्यजोन परलोका ॥ २० ॥ सखा छळिला म्यां लक्ष्मण। तेणें क्षोभला रघुनंदन। मज उदधींत सांडोन। गेले दोघे जण परलोका ॥ २१ ॥ मुद्रिके सांग सत्य गोष्टी मज रावणें हरिल्यापाठीं। दोघे येऊनि पर्णकुटीं। अति संकटीं काय केलें ॥ २२ ॥ मुद्रिका नेदी प्रतिवचन। तुझ्या मौनाचें हेंचि कारण। माझेनि विरहें दोघे जण। रामलक्ष्मण निमाले[१] ॥ २३ ॥ किंवा लोकलज्जे भ्याले। दोघे विष घेवोनि निमाले। माझेनि दुःखें दुखावले। मूर्च्छेसवें गेले प्राण त्यांचे ॥ २४ ॥ माझेनि दुःखें दुःख प्रबळ। त्यजिला आहार फलमूळ जळ। दोघां भरोनियां तरळ[२]। प्राण तत्काळ सोडिले ॥ २५ ॥ सीता सीता आक्रंदोनी। प्राण सांडिला दोघीं जणीं। नातरी मागतां पाणी पाणी। ताहना फुटोनी निमाले ॥ २६ ॥ मज न देखतां पर्णकुटीं। दोघे जाले कडेलोटी। अथवा शस्त्रें घातलीं पोटीं। केला कंठीं गळफांस ॥ २७ ॥ पर्वतकडे प्रचंड थोंडीं। दोघीं घातल्या मुरकुंडी। तेथें वाळोनि जाल्या करवंडी। दुःखनिर्वंडी[३] निमाले ॥ २८ ॥ कीं विजनीं[४] मूर्च्छित पडिले। वृकव्याघ्रीं ते फाडिले। सिंहशार्दूलीं विभांडिले[५]। किंवा रगडिले वनगजीं ॥ २९ ॥ ते तव वीर दोघे निधडे। सिंह शार्दूळ ते बापुडे। अथवा रावणें केलें कुडें। छळोनि रोकडे मारिले ॥ ३० ॥ विश्वामित्रयागाप्रती।

१ मुद्रिका, आंगठी. २ मस्तकावर. ३ पराक्रम. ४ संहार करून.

१ मरण पावले. २ श्रम. ३ अति दुःखानें. ४ निर्जनस्थळीं. ५ फाडले.

श्रीराम सावध अहोरात्रीं । करितां सुबाहू छळणोक्ती । त्यासी रघुपतीनें मारिलें ॥ ३१ ॥ छळावया श्रीरामलक्ष्मण । शूर्पणखा सुंदर पूर्ण । तिचें केलें विटंबन । न चले छळण श्रीरामीं ॥ ३२ ॥ श्रीराम सहजेंचि उदासी । रावणें हरितां सीतेसी । न्यस्तशस्त्र[1] जाला संन्यासी । वनवासीं वनस्थ ॥ ३३ ॥ अथवा आणिक आहे गुज । श्रीराम आत्माराम सहज । रावणें हरितांचि मज । समाधिशेजे प्रवेशला ॥ ३४ ॥ जन्म मरण आधि व्याधी । जेथें शमती त्रिशुद्धी । श्रीराम सेवीं ते समाधी । देहउपाधि जेथें नाहीं ॥ ३५ ॥ देहबुद्धीचिया माथां । मी राम सीता कांता[2] । हेंही नाठवे रघुनाथा । समाधिअवस्था समपदीं ॥३६॥ समाधिसुखीं स्वभावतां । कैंचा राम कैंची सीता । रावणें हरिली माझी कांता । हेंही रघुनाथा नाठवे ॥ ३७॥ समाधिसेजे सुखसंपन्न । मिथ्या देहादि प्रपंचभान । मिथ्या राम मिथ्या रावण । धांवण्या कोण धांवेल ॥ ३८ ॥ ऐसें ऐकतां ब्रह्मलिखित । श्रीराम जाला समाधिस्थ । सर्वेंद्रियें उपरमत । कर्तव्यार्थ नाठवे ॥ ३९ ॥

त्याचे वचनाचा राम व सर्व श्रोत्यावर झालेला परिणाम—जें लिहिलें ब्रह्मलिखितीं । जें बोलिली सीता सती । तेंचि जाला रघुपति । स्वरूपस्थिति स्वभावें ॥ ४० ॥ श्रीराम परब्रह्ममूर्ती । ब्रह्मलिखित ऐकोनि स्थिती । स्वयें पावला उपरती । स्वरूपस्थिति स्वभावें ॥ ४१ ॥ नेत्र जाले अर्धोन्मीलित । प्राण पांगुळला जेथींचा तेथ । चित्त चैतन्यीं समरसित । जाला सदोदित परब्रह्म ॥ ४२ ॥ ब्रह्मस्थितीचें लक्षण । जेथें नाहीं मीतूंपण । कैंचा राम सीता रावण । आपणा आपण विसरला ॥ ४३ ॥ लक्ष्मणा खुंटली वाचाशक्ती । स्वरूपीं सुलीन रघुपती । सुग्रीव कळवळिला कपिपती । तळमळती वानर ॥ ४४ ॥ लक्ष्मणा खुंटली वाचासिद्धी । श्रीराम पावला समाधी । सीता न सुटे लंकाबंदी । कार्य त्रिशुद्धी नासलें ॥ ४५ ॥ हनुमंतें धरिलें दृढ मौन । कथा ऐके कर जोडून । देखोनि समाधिविंदान । हनुमान संपूर्ण खवळला ॥ ४६ ॥ श्रीरामा समाधि ते उपाधी । मज कळलेंसे त्रिशुद्धी । हनुमंतें कैसी केली बुद्धी । विंदानविधी अवधारा ॥ ४७ ॥ म्यां आणिली सीताशुद्धी । मिथ्या होऊं पाहे त्रिशुद्धी । पुढील खुंटली कार्यसिद्धी । रामसमाधि भली नव्हे ॥ ४८ ॥ म्यां सीतेसी दिधली भाक[1] । कीं येथें आणीन रघुकुळटिळक । कायसें बापुडें समाधिसुख । माझी भाक नव्हे मिथ्या ॥ ४९ ॥ समाधिव्युत्थापनापरता[2] । श्रीराम स्वयें स्वभावता । त्यासी कायसी समाधिअवस्था । सावध आतां मी करीन ॥ ५० ॥ श्रीरामस्वरूपस्थिती । सकळ जाणे स्वयें मारुती । प्रबोधावया[3] रघुपती । केली युक्ती ते ऐका ॥ ५१ ॥ स्थूळ लिंग आणि कारण । तिहीं वेगळा होऊन । जेथें नाहीं मीतूंपण । तेथें आपण प्रवेशे ॥ ५२ ॥ महाकारणीं प्रवेशोन । प्रबोधावया रघुनंदन । वाचेवीण अनुवादोन । गुरुवचन प्रतिपादी ॥५३॥ श्लोक श्रीसद्गुरु वशिष्ठाचा । हनुमान वदे पांचव्या वाचा । तोडावया बंध समाधीचा । अर्थ तेथींचा अवधारा ॥ ५४ ॥ हातींचें हातीं घेतां वस्तु । शब्देंवीण अर्थ प्राप्तु । पांचवे वाचेचा हा अर्थु । श्रोता समर्थ हा राम ॥ ५५ ॥

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः ।
अंतस्त्यागी बहिर्भोगी लोके विहर राघव ॥ १ ॥

अंतरीं अद्वैत एक । बाह्य स्वधर्में पाळीं लोक । अंतरीं निजबोध चोख । वेदविवेक बाह्य पाळीं ॥ ५६ ॥ अंतरीं सर्वस्वाचा त्याग । बाह्यावतार

१ शस्त्रें टाकलीं आहेत असा. २ स्त्री.

१ वचन. २ समाधि उतरण्यापलीकडचा. ३ सावध करावयासाठीं.

भोगीं भोग। सांडोनि समाधिनिजयोग। उद्धरीं जग निजकीर्ती ॥५७॥ सांडोनि समाधिसांकडी[१]। तोडीं नवग्रहांची बेडी। सोडीं देवांची बांधवडी। उभारीं गुढी रामराजा ॥ ५८ ॥ सद्गुरु वशिष्ठाचें वचन। ऐकोनिया रघुनंदन। स्वयें होवोनि सावधान। दिधलें आलिंगन हनुमंता ॥५९॥ श्रीरामाचें जें हृद्गत। हनुमान जाणे भगवद्भक्त। हनुमंताचा भावार्थ। जाणे रघुनाथ हृदयस्थ ॥ ६० ॥ कपीसी दिधलें आलिंगन। श्रीराम जाला सावधान। देवा भक्ताचें अनन्यपण। अगम्य जाण श्रुतिशास्त्रां ॥ ६१ ॥ श्रीरामअनन्यभक्त सीता। अनन्य भक्ति हनुमंता। दोहींची ऐकावया कथा। श्रीरघुनाथा आल्हाद ॥ ६२ ॥

सीतेचा मुद्रिकेशीं संवाद—ब्रह्मलिखितान्या अर्था। ऐकावया आवडी रघुनाथा। अशोकवनीं वदली सीता। ते कथा अति गोड ॥ ६३ ॥ श्रीराममुद्रा अचेतन। तिसी देवोनि अति सन्मान। घालोनियां लोटांगण। सीता आपण पुसत ॥ ६४ ॥ कैसेनि चालवलें वाटा। कैसेनि उल्लंघिलें घाटा। समुद्र तरणीं दुस्तर मोठा। कैंवी परतटा आलीस ॥६५॥ तुज आणिलें रघुपती। किंवा आणिकाचे संगतीं। तें तें सांगें मजप्रती। सीता सती पूसत ॥ ६६ ॥ रामनाम तुजवरी। अटक[२] नाहीं चराचरीं। सुखें तरसी भवसागरीं। धन्य संसारीं तूं राममुद्रे ॥ ६७ ॥ श्रीराममुद्रा ज्यासी लागे। तो संसारीं तरे सर्वांगें। हें तुज पुसणेंचि नलगे। कृपानुरागें आलीसी ॥ ६८ ॥ मी वामांगीं तूं दक्षिणांगिनी। आम्ही तुम्ही दोघी बहिणी। लगबगेंसीं मजलागोनी। कृपानुरागिणी आलीसी ॥ ६९ ॥ माझी कृपा तुझे पोटीं। तरी सांग पां गुह्य गोष्टी। मजमागें पंचवटीं। रामें संकटीं काय केलें ॥ ७० ॥

सीतेची मूर्च्छा व त्याचा हनुमंतावरील परिणाम—मुद्रिका नेदी प्रतिवचन[१]। तुझें मौनाचें कारण। निमाले रामलक्ष्मण। न सांगोन सांगसी ॥ ७१ ॥

श्रीराम गेला निजधामासी। तुज धाडिलें सांगावयासी। मीही त्यजीन या देहासी। कास[३] सरसी[२] तिणें केली[१]॥७२॥ साक्ष करून मुद्रिकेसी। मुद्रा धरोनि हृदयासीं। आठवितां श्रीरामासी। पडे भूमीसीं मूर्च्छित ॥ ७३ ॥ सीता पडतांचि मूर्च्छित। गजबजिला हनुमंत। श्रीराम विरहें सीता संतप्त। प्राण निश्चित त्यागील ॥ ७४ ॥

देखतां श्रीराममुद्रेसी। राम निमाला वनवासीं। धरोनि निश्चयो मानसीं। निजदेहासी त्यागील ॥ ७५ ॥ येथें निमालिया सीता। काय मुख दाखवूं रघुनाथा। तुझी मरोनियां कांता। आलों मी आतां पुरुषार्थी[३] ॥ ७६ ॥ करोनि समुद्रोल्लंघन। मींचि सीतेसी जालों विघ्न। श्रीराममुद्रा स्वयें टाकोन। घेतला प्राण सीतेचा ॥ ७७ ॥ श्रीरामें मुद्रा दिधली खूण। ते म्यां आणोनि आपण। घेतला सीतेचा प्राण। अति उद्विग्न हनुमंत ॥७८॥ खूण दावोनि आणावी सीता। ते खुणेनें मारिली तत्वतां। कैसेनि भेटों श्रीरघुनाथा। प्राणांतावस्था हनुमंतीं ॥ ७९ ॥ मुद्रिका टाकिली उठाउठीं। हेचि बुद्धि म्यां केली खोटी। श्रीराममुद्राविरहासाठीं। सीता गोरटी निमाली ॥ ८० ॥ मज येवोनि लंकेआंत। ना सीता ना रघुनाथ। ऐसा ओढवला अनर्थ। तेणें हनुमंत अति दुःखी ॥ ८१ ॥ माझेनि निमाली पैं सीता। अपेश बैसलें माझे माथां। काय करूं रे रघुनाथा। बुद्धिदाता मज होईं ॥८२॥ श्रीरामा मी तुझें अति दीन। माझे माथां बैसलें विघ्न। तूं कृपाळु रघुनंदन। नित्य निर्विघ्न मज करीं ॥ ८३ ॥

---

१ समाधीचें संकट. २ प्रतिबंध.

१ उत्तर. २ तयार झाली. ३ मोठा पराक्रमी.

+इति संचिंत्य हनुमांश्चकार मतिमान्मतिम् ।
राममक्लिष्टकर्माणं स्वबंधुमनुकीर्तयन् ॥ २ ॥

आदरें स्मरतां रघुनंदन । बुद्धि आठवली अति निर्विघ्न । सीता व्हावया सावधान । श्रीरामकीर्तन करावें ॥ ८४ ॥ श्रीरामकीर्ती हनुमंत । आदरें गाय वृक्षाआंत । जेणें जोडे स्वार्थ परमार्थ । तैसा अर्थ अनुवादे[1] ॥ ८५ ॥

हनुमताचें रामचरित्र कथन–ऐकतां श्रीरामकीर्तन । सीता होय सावधान । तैसें हनुमंतें आपण । हरिकीर्तन मांडिलें ॥ ८६ ॥ कौसल्यागर्भीं गर्भातीत । दाशरथि श्रीरघुनाथ । परब्रह्म मूर्तिमंत । सूर्यवंशांत अवतरला ॥ ८७ ॥ श्रीराम पुरुष सीता प्रकृती[2] । राम चैतन्य सीता चिच्छक्ती । श्रीराम धैर्य सीता धृती[3] । धन्य जगतीं अवतार ॥ ८८ ॥ गोडी आणि साखर पाहतां । दों नामीं एकचि वस्तुता । तेंवी श्रीराम आणि सीता । एकात्मता अवतार ॥ ८९ ॥ श्रीरामाचें आचरित । गुरुपितृआज्ञे नित्य विक्रीत । ब्राह्मणांचा अनन्य भक्त । सुरसाह्यार्थ अवतार ॥ ९० ॥ कैकेयीवरदें श्रीदशरथें । श्रीरामा धाडिलें दंडकारण्यातें । सखा लक्ष्मण सांगातें । निघे रघुनाथ वनवासा ॥ ९१॥ वनवास गंगातटीं । वसतिस्थान पंचवटीं । राम राहिला जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ९२ ॥ शूर्पणखा विटंबून । मारिले त्रिशिरा खर दूषण । श्रीरामें घेवोनि जनस्थान । दिधलें दान द्विजासी ॥९३॥ मृगकंचुकीस लोभतां । मृगामागें पाठविलें रघुनाथा । छळोनि सौमित्रा दवडितां । हरिली सीता रावणें ॥ ९४ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । करितां सीतेचें गवेषण[4] । जटायुरावणांचें रण । दोघे जण तेथें आले ॥९५॥ श्रीराम कृपाळु पूर्ण । करोनि जटायुउद्धरण । कबंधातें मारोन । आले आपण किष्किंधे ॥ ९६ ॥ रामें निर्दाळोनि वाळीसी । राज्य दिधलें सुग्रीवासी । यौवराज्य अंगदासी । वानरांसी निजसख्य ॥९७॥ तुझे शुद्धीलागोनि येथें । मज धाडिलें श्रीरघुनाथें । तुझे भेटीलागीं सीते । व्रत रघुनाथें धरियेलें ॥९८॥ विश्वासावें मनीं द्या वानरा । म्हणोनि रामें दिधली मुद्रा । सांडोनियां निद्रा तंद्रा । भेटे कपींद्रा रामदूता ॥ ९९ ॥ ऐकोनि श्रीरामकथामृत । सीता उठली हर्षयुक्त । कथानुवाद वृक्षाआंत । तेणें विस्मित जानकी ॥ १०० ॥

कथानुवाद ऐकून सीतेचें आव्हान–कृपेनें कळवळला श्रीरघुनाथ । मज आश्वासावया येथ । वृक्ष कथा अनुवादत । आला निश्चित श्रीराम ॥ १ ॥ वृक्षांसी पुसे करोन नमन । कोण करितो रामकीर्तन । त्याचें पाहीन मी वदन । लोटांगण त्या माझें ॥ २ ॥ ज्यासी श्रीरामकथाशैली । त्याचे चरणींची रजधुळी[1] । मी वंदीन सुखसमेळीं । मुख मजजवळी दावावें ॥ ३ ॥ ज्याचे मुखीं रामकीर्तन । त्याचें मज देखतां वदन । परम सुख समाधान । कृपा करोन भेटावें ॥ ४ ॥ सीता सप्रेम निजचित्तें । अति उत्कंठितीं भावार्थें । जेणें खूण मुद्रा आणिली येथें कृपावंतें मज भेटावें ॥ ५ ॥

+तामब्रवीत्पुनर्धीमान्हनूमान्मारुतात्मजः ।
शिरस्यंजलिमाधाय वैदेहीं प्रत्यपूजयत् ॥ ३ ॥

हनुमंताचें सीतेस वंदन–ऐकोनि सीतेचें वचन । हनुमंतें स्वयें उतरोन । सीतेसीं घालोनि लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ६ ॥ महानिधीचा लाभ जाला । सुधाब्धि चूळोदकें प्राशिला । किंवा कळिकाळ जिंकोनि आला । तो पाडु जाला हनुमंता ॥ ७ ॥ तेणें हरिखाचेनि[2] मेळें । गडबडा पायांवरी लोळे । आनंदाश्रू स्रवती डोळे । सुखसमेळें डुल्लत

१ वर्णन करू लागला. २ माया. ३ धीरता (धैर्य). ४ शोध.

+सु. कां. ३०।४०,४१.

१ पायधूळ. २ आनंदाचें.

† ब–उत्कट. + ३२।२

॥ ८ ॥ धांवधांवोनि पायां पडे। सस्वेद[१] सगद्गद सप्रेम रडे। पुच्छ नाचवोनि पुढें। हर्षें उडे वानर ॥ ९ ॥ येथें सांपडली सीता। जाली कार्यसिद्धि रघुनाथा। यश आलें मज हनुमंता। उल्लासता नाचत ॥ ११० ॥

सीतेचा हनुमंतास प्रश्न—सीता विचारी पोटाआंत। हा म्हणवितो श्रीरामदूत। रामासवें कैंचा हनुमंत। पंचवटिकेंत हा नव्हता ॥ ११ ॥ राम लक्ष्मण दोघे वीर। त्यांसवें नाहीं वानर। कैंचें नेणों हें वनचर। नानाविकार करिताहे ॥१२॥ पूर्वी जटायु देखिला होता। नाहीं देखिलें हनुमंता। येथें आलासे अवचिता[२]। सीताछळणार्थी रावण ॥ १३ ॥ पूर्वी होवोनि आला संन्यासी। आतां जाला वानरवेषी। कैंवी विश्वासूं मी यासी। सीता मानसीं विचारी ॥ १४ ॥ श्रीरामकथा अनुवादत। धन्य धन्य हा श्रीरामभक्त। कपटी नव्हे हा हनुमंत। मज निश्चित मानलें ॥ १५ ॥ मिथ्या म्हणों न ये हनुमंता। सत्य सांगितली श्रीरामकथा। याच्या पूर्वापर-वृत्तांता। यासी मी आतां पुसेन ॥ १६ ॥ सीता पुसेल वृत्तांत। सत्य सांगेल हनुमंत। तेंचि कथेचा कथार्थ। मुख्य मोक्षार्थ अवधारा ॥ १७ ॥ एका-एकीं अशोकवनाआंत। आला देखुनी हनुमंत। त्याचा समूळ वृत्तांत। पुसे साद्यंत जानकी ॥१८॥

+ततो रामकथां श्रुत्वा वैदेही वानरर्षभम्।
उवाच वचनं सीता प्रियं मधुरया गिरा ॥ ४ ॥
क्व ते रामस्य संसर्गः कथं जानासि लक्ष्मणम्।
वानराणां नराणां च कथमासीत्समागमः ॥ ५ ॥
रामस्य यानि लिंगानि लक्ष्मणस्य च वानर।
तानि भूयस्त्वमाचक्ष्व न मा शोकः समाविशेत् ॥६॥

मी वनवासीं असतां। तूं नव्हतासि हनुमंता। कैंचा आलासी तूं आतां। निजवृत्तांता मज सांगें ॥ १९ ॥ कैसेनि श्रीराम देखिला दृष्टीं। तुम्हां श्रीरामा कैसेनि भेटी। कैशाकैशा¶ केल्या गोष्टी। जेणें का पोटीं अति प्रीती ॥ १२० ॥ कैसा वाणला वचनार्थें। साधावया श्रीरामकार्यार्थें। हनुमान सर्वांगीं उल्लासत। तो गुह्यार्थ मज सांगें ॥ २१ ॥ श्रीराम भेटल्या कैसें सुख। श्रीराम-वचनीं कैसें [१]पीयूख†। श्रीरामसंगें कैसा [२]हरिख‡। योगपरिपाकें मज सांगें ॥ २२ ॥ श्रीरामाचें ठाण-माण[३]। रूप रेखा गुणलक्षण। कैसा आहे सखा लक्ष्मण। दोहींची खूण मज सांगें ॥ २३ ॥

मारुतीवर रामाच्या कथेचा परिणाम—ऐकतां श्रीरामाची कथा। दुःख शोक नाठवे चित्ता। निमे भवभयाची वार्ता। कथा ऐकतां आनंद ॥ २४ ॥ याचिलागीं पुढतपुढतीं। तुज मी पुसें अति प्रीतीं। कथेमाजी अति विश्रांती। जाण मारुति हरिभक्ता ॥ २५ ॥ केलिया कथेचें श्रवण। नाहीं मनन निदिध्यासन। तरी ते कथा होय शून्य। जेंवी मैथुन वंध्येचें ॥ २६ ॥ श्रद्धा श्रीरामकथाश्रवण। ऐकती त्यांचें महिमान। अहं सोहं कोहं विरोन। ब्रह्मपूर्ण स्वयें होती ॥२७॥ चित्त तेंचि होय चैतन्य। बुद्धि समसाम्य समाधिधन। कर्म होय ब्रह्म परिपूर्ण। इंद्रियाचरण चिन्मात्र ॥ २८ ॥ ऐसी श्रीरामस्वरूपसंस्था। सादरें पुसतां पैं सीता। टक[४] पडली हनुमंता। कथा वार्ता विसरला ॥ २९ ॥ श्रीरामस्वरूप वदे सुंदरा। तेणें अवस्था अति वानरा। नेत्रीं अश्रूंचिया धारा। अंग थरथरां कांपत ॥ १३० ॥ अंग जालें रोमांचित। स्वेद आला डवडवित। मूर्च्छापन्न पडे हनुमंत। तेणें विस्मित जानकी ॥ ३१ ॥ वानर वनचर पालेखाईर। त्यासी श्रीरामीं प्रेमपडिभार। लंघोनि आलें हें सागर। भक्त साचार हनुमंत ॥ ३२ ॥

१ घर्मयुक्त. २ एकाएकीं.

+ ३५।१,२,३.

१ अमृत. २ हर्ष. ३ शरीराची ठेवण. ४ एकाग्रता.

¶ब—कैसकैस्या. † ब—पीयूष. ‡ ब—हर्ष.

ऐसें जाणोनि तत्वतां । आवडीं आश्वासी[१] त्या सीता । सावधान करी हनुमंता । श्रीरामवार्ता पुसावया ॥ ३३ ॥ एका जनार्दना शरण । सीता-हनुमंतसंवादकथन । गोड गोड¶ निरूपण । साव-धान अवधारा ॥ १३४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखित-जानकीहनुमंतसंवादकथनं नाम अष्टाविंशतितमोऽ-ध्याय. ॥ २८ ॥ ओंव्या ॥ १३४ ॥ श्लोक ॥६॥ एवं ॥ १४० ॥

---

## अध्याय २९ वा

हनुमताने केलेलें श्रीरामलक्ष्मण वर्णन–श्रीविघ्नहारकाय नमः ॥ सीता पुसे श्रीरामज्ञान । तें सांगावया हनुमान जाण । गिळोनियां ज्ञानाज्ञान । जाला सावधान श्रीरामें ॥ १ ॥

+एवमुक्तस्तु वैदेह्या हनुमान्मारुतात्मज ।
ततो रामकथातत्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ १ ॥
देवि रामस्य लिंगानि लक्ष्मणस्य च यानि मे ।
लक्षितानि विशालाक्षि तानि वै शृणु तत्वत. ॥२॥

सीतेने पुसिली श्रीरामकथा । तेचि सांगावया स्वरूपता । उल्हास हनुमताचे चित्ता । यथार्थता सांगत ॥ २ ॥ लक्ष्मणाचें निजलक्षण । ठाणमाण सगुणगुण । समूळ सांगेल आपण । सावधान अवधारा ॥ ३ ॥ सादर श्रवणार्थी स्वयें सीता । तेणें आल्हाद हनुमंता । [२]सावधान मिळाल्या श्रोता । वदे वक्ता आल्हादें† ॥ ४ ॥ श्रीरामरूप अति स्वरूप । रूपें जिंतला कंदर्प । परी तो रूपेंचि अरूप । चित्स्वरूप श्रीराम ॥ ५ ॥ राम राजीवलोचन[३] । जगाचे नयना सादृश्य‡ तें नयन । परी देखणा डोळेवीण । देखणेपण हे त्याचें ॥६ ॥ दृश्य देखे हें तत्व गौण । श्रवणान्त[१] देखणे नयन । सर्वांगदेखणा रघुनंदन । डोळेविण¶ देखत ॥ ७ ॥ कुंडलें वर्णिती* साकार । एक म्हणती मकराकार । श्रवणें मावळती विकार । निर्विकार निजलेणें ॥ ८ ॥ श्रीरामाचेनि श्रवणें । श्रवणां होती निजभूषणें । श्रवणां श्रवणचि लेणें[२] । श्रवण देखणें परब्रह्म ॥ ९ ॥ परमार्थाचें मुख्य बीक[३] । निरपेक्षा[४] तेंचि नासिक† । तेणेंवीण तें निर्नासिक । कैचें सुख सापेक्षा ॥१०॥ श्रीरामाची नासिकस्थिती । प्राण्या प्राणें‡ नित्य विश्रांती । श्रीराम जाणे प्राणगती । गतीसी विश्रांति श्रीराम ॥११॥ श्रीरामाचा मुखमयंक[५] । नित्यानंदें निष्कलंक । ब्रह्मादि देवां सुखदायक । जीवशिवां सुख श्रीरामें ॥ १२ ॥ जीव शिव ते दोन्ही अधर[६] । श्रीराम-अधरीं जाले सधर । मिळणीं मिळाले एकाकार । शिवसुख साचार श्रीराम ॥ १३ ॥ श्रीराममुखी दंतपंक्ती । जेंवी §ओंकारामाजी श्रुती । श्रुति-स्मृतींसी निजविश्राति । श्रीराममूर्तिमुखचंद्र ॥१४॥ श्रीरामाचे निजनिढळीं । सच्चिदानंद हेचि त्रिवळी । त्याचे +ललाटभाग्यसमेळीं । लोकीं सकळीं नांदिजे ॥ १५ ॥ प्रेमकेशरसमेळा× । टिळक रेखिला पिवळा । निर्धार अक्षता निढळा । राम प्रेमळां पढियंता ॥ १६ ॥ अहं मृग वधी निर्लोभेंसी । काढिलें सोहं [७]मृगनाभीसी । तेंही अर्पिलें श्रीरामासी । निजांगासी चर्चोनी ॥ १७ ॥ जन विजन विंचून । साधिले निजधैर्य चंदन । त्याचाही सुगंध काढून । उद्वर्तन श्रीरामा ॥१८॥

---

१ धीर दिला. २ लक्षपूर्वक ऐकणारा. ३ कमल-लोचन.

¶ब–गोडागोड. + ३५।५,७. ‡ह–उल्हासें. ‡ ड–साम्य.

---

१ कानापर्यंत. २ भूषण. ३ तेज. ४ निरिच्छता. ५ मुखचंद्र. ६ ओंठ. ७ कस्तुरीला.

¶ ड–डोळेंनविणे. * ड–वानिती व वर्णीत. † ड–निर्नासिक. ‡ ड–प्राणप्राण्या. § ब–वोंकारा. + ब–ललाटीं. × ड–सुमेळा.

विद्याअविद्याशक्तिपडव्यां¶। त्यजोनि काढिलें मुक्ताफळां। तेंच श्रीरामाचे गळां। मुक्तामाळा शोभत ॥ १९ ॥ ॐकार तोचि कंबुकंठ[1]। तेथोनि वेदां वाहती वाट। गर्जती विधिवादें उद्भट। होती प्रकट त्रिकांडीं ॥२०॥ त्वंपदा[2] तत्पदा[3] अतीत[4]। हृदयीं पदक* सदोदित। साधुचिद्रत्नीं रत्नखचित। लखलखीत निजतेजें ॥ २१ ॥ म्हणती कांसे कसिला पीतांबर। श्रीरामकांसे चिदंबर। झांकी शून्यत्वाचें छिद्र। कांसे अच्छिद्र श्रीराम ॥ २२ ॥ श्रीरामकांस दृढ भारी। एकपत्नीव्रतधारी। कांसे लागल्यातें† तारी। भवसागरीं तारक ॥ २३ ॥ श्रीराम आकळे सगळा। भक्तभावार्थ कटिमेखळा। क्षुद्रघंटिकाज्वाळमाळा। जालिया सकळा ऋद्धि सिद्धि ॥२४॥ सूक्ष्म मध्याची रचना। अभिमान होता पंचानना। देखोनि श्रीराममध्यरचना। लाजोनि वना तो गेला ॥२५॥ पहावया‡ श्रीराममध्यासी। शाहाडें[1] जडले मेखळेसीं। सर्वस्वें वेधले श्रीरामासीं। जावों वनासी विसरले ॥२६॥ श्रीरामचरणांची ख्याती। जड पाषाण उद्धरती§। श्रीराम सकळांची गती। गतीस सद्गति श्रीराम ॥२७॥ श्रीरामचरणांचेनि भूषणें। वांकीनें वेदांसी आणिलें उणें। ते तंव धरोनि ठेले मौन। हरिकीर्तन हें गर्जे ॥ २८ ॥ चहूं वाचांसी अगोचर। चरणीं गर्जती तोडर। श्रीराम चिदचिन्मात्र। परात्पर परब्रह्म ॥२९॥ लक्षितां श्रीरामाचें मन ठाण। त्यासी ठेंगणें दिसे गगन पाहतां श्रीरामाचें मन। पडिलें मौन श्रुतिशास्त्रां ॥ ३० ॥ पाहतां श्रीरामाचे गुण। सगुणीं दिसे निर्गुण। रामनामें हरे त्रिगुण। निजनिर्गुण श्रीराम ॥ ३१ ॥ लक्षितां श्रीरामलक्षण। जो लक्षी तोचि सुलक्षण¶। ऐसा श्रीराम विचक्षण। लक्ष्यलक्षणं† त्या नाहीं ॥३२॥ श्रीराममुखींचीं अक्षरें। क्षराक्षरातीत परें। सभाग्य सेविती श्रवणद्वारें। सर्वांगीं सुभरे स्वानंद ॥ ३३ ॥ देखतां श्रीरामाचें श्रीमुख। फिकें होय समाधिसुख। स्वप्नीं न देखिजे दुःख। हरिखें हरिख कोंदाटे ॥ ३४ ॥ कोंदाटल्या परब्रह्म। ब्रह्मरूप क्रियाकर्म। हरपले धर्माधर्म। जाला उपरम वेदवादा ॥ ३५ ॥ ऐसा श्रीराम नेटका। तैसाचि सौमित्र निजसखा। दोघा अभिन्नत्व देखा। भिन्न आवांका दिसताहे ॥ ३६ ॥ घालोनियां लोटांगण। तुज कुशळ कल्याण। स्वयें पुसे लक्ष्मण। पुसे कल्याण श्रीराम ॥ ३७ ॥ ऐसें हनुमंतें सांगतां। तटस्थ ठेली श्रीरामकांता। आपआपणा विसरे सीता। हनुमंताचेनि बोलें ॥३८॥ हनुमंताचे बोलाआंत। अवघा आणिला श्रीरघुनाथ। तेणें सीतेचा मनोरथ। सदोदित स्वानंदें ॥ ३९ ॥ हर्ष न माये पोटीं। होत हर्षाचिया कोटी। तेणें हर्षें सीता गोरटी। घाली मिठी हनुमंता ॥ ४० ॥ वानर वदे मनुष्यवाणी। श्रीरामकथा त्याचे वदनीं। ज्या कथेच्या निजश्रवणीं। भवबंधनीं निर्मुक्त ॥ ४१ ॥ ऐकोनि§ वानराच्या गोष्टी। सत्य श्रीरामीं जाली भेटी। निरसोनियां दुःखकोटी। ओतली सृष्टी सुखरूप ॥ ४२ ॥ हरिखाच्या लवलाह्या। स्वानंदें पसरोनि बाह्या। आलिंगिलें कपिराया। जेवीं कां माया[1] प्रियपुत्रा ॥ ४३ ॥ सीतेसी सुख जालें गाढें। पुत्रसुख तृण[2] त्यापुढें। हनुमंत वाडेंकोडें। प्रेमपडिपाडें[3] पढियंता[4] ॥४४॥

+कपे त्वामभिनन्दामि चिरं जीव सुखी भव।
सानुजः कुशली भर्ता त्वया मेऽद्य निवेदितः ॥३॥

१ शंखाकृति गळा. २ जीवात्म्याला. ३ परमात्म्याला. ४ [illegible] ५ [illegible]

¶ ब–मुक्ति. * क्ष–पक्षोदक. † क्ष–लागलियातें. ‡ ड–पाहतां. § ब–उत्तम गती.

१ आई. २ तुच्छ. ३ [illegible] ४ [illegible]

¶ड–विलक्षण. †ड–लक्षुमण. ‡ड–गोष्टी. § ड–ऐकता. + अ. ३६।८.

बलेन यशसा चैव वर्धस्व प्रज्ञयाऽपि च ।
शतयोजनविस्तीर्णं सागरं मकरालयम् ॥ ४ ॥
विक्रम्य श्लाघनीयेन क्रमता गोष्पदीकृतः ।
न हि त्वा प्राकृतं मन्ये वानरं वानरर्षभ ॥ ५ ॥
येनाथ राक्षसावाखस्वयैकेन प्रधर्षित' ॥ ६ ॥

त्यामुळें सीतेचा आनंद व तितकेंच हनुमताचें कौतुक—श्रीराम भर्ता लक्ष्मण देवर[1] । दोघे सुखरूप महावीर । हें ऐकतांचि उत्तर । सुख अपार मज जालें ॥४५॥ मज येथें सामासांपाठीं । श्रीरामाची कथा गोष्टी । आजि ऐकिली तुझे वाक्पुटीं । धन्य सृष्टीं हनुमंता ॥ ४६ ॥ मरतया अमृतपान । सुकतया मीना मिळे जीवन । दुकळलिया मिळे मिष्टान्न । तेंवी तुझें वचन हनुमंता ॥ ४७ ॥ श्रीरामस्वरूपाची कथा । जेंवी वदलासी हनुमंता । ते मुखीं ब्रह्मसायुज्यता । नये तुकिता तुकेसीं[2] ॥ ४८ ॥ श्रीरामकथाअनुवादन । तेणें मी जालें सुखसंपन्न । तुज मी वदतें वरदान । सावधान अवधारीं ॥ ४९ ॥ हनुमंता होईं चिरंजीवी । तेंही जीवित्व ज्ञानानुभवीं । नित्य नवा सुखसभवी । श्रीरामपदवीवैभवें ॥ ५० ॥ तुज कळिकाळ कांपे चळीं । ऐसा होशील आतुर्बळी । यश पावसी भूमंडळीं नामसमेळीं श्रीरामें ॥५१॥ निरसोनिया ज्ञानाज्ञान । श्रीरामभजनें प्रबुद्ध प्राज्ञ । ज्ञेय मुके जागपण । श्रीरामस्मरणाचेनि बळें ॥ ५२ ॥ शतयोजन सिंधु अगाध । तुवां लंघिला जैसा गोष्पद[3] । त्यापुढें कायसें माझें वरद । प्रज्ञाप्रबुद्ध[4] हनुमंत ॥ ५३ ॥ तुज म्हणों नये वानर । सुरांसुरां तूं दुर्धर । धांडोळिलें लंकानगर । निशाचरें गांजोनी ॥ ५४ ॥ एकला एक हनुमंत । रावणाचे सभेआंत । करोनि राक्षसां आकांत । लंकानाथ गांजिला ॥५५॥ लंकेमाजी कडोविकडीं । गांजिल्या राक्षसांच्या कोडी । रावणाची सभा उघडी । केली रोकडी तुवां एकें ॥ ५६ ॥ एवढा करितांही आकांत । येथें आलासी हनुमंत । नाहीं कळलें लंकेआंत । ऐसा समर्थ तूं एक ॥ ५७ ॥ रावणमंदोदरीएकांत । तिचा ऐकोनि स्वप्नवृत्तांत । आलासी अशोकवनाआंत । अति समर्थ तूं एक ॥ ५८ ॥

श्रीरामास आणण्याची विनति—ऐसा प्रतापशिरोमणी । पावलासी अशोकवनीं । तूंचि जनक तूंचि जननी राम घेवोनि शीघ्र यावें ॥ ५९ ॥ तुझी होईन मी दासी । चरण झाडीन निजकेशीं । शीघ्र आणावें श्रीरामासी । म्हणोनि पायांसी लागली ॥ ६० ॥ तुवां वंदिले माझे चरण । त्यां काय व्हावें वचीर्ण । आलें हनुमंतासी स्फुरण । भेटवीन श्रीरामा ॥ ६१ ॥

हनुमताची तिला आपल्या पाठीवरून नेण्याची तयारी—तुज येवढी अवस्था । विलंब कायसा वो आतां । शीघ्र भेटवीन श्रीरघुनाथा । बैसें आतां मम पृष्ठीं ॥ ६२ ॥

+पृष्ठमारोह वैदेहि मा भूत्कालस्य पर्ययः ।
त्वय्यहं पृष्ठलीनाया संतरिष्यामि सागरम् ॥ ७ ॥
शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सकाननाम् ।
द्रक्ष्यस्यचैव वैदेहि राघवं सहलक्ष्मणम् ॥ ८ ॥
न हि मे संप्रयातस्य त्वा गृहीत्वा वरानने ।
अनुगन्तु गतिः शक्तिः सर्वेलंकानिवासिनाम् ॥ ९ ॥

माझे पृष्ठीं बैसल्या सीता । येचि क्षणीं श्रीरघुनाथा । तुज भेटवीन मी आतां । विलंब वृथा करूं नको ॥ ६३ ॥ शुद्धि सांगावया रघुनाथा । तुज मज सांडोनि जाता । मागें राक्षसीं केलिया घाता । शुद्धि वृथा होय माझी ॥ ६४ ॥ येथें मजचि देखतां । रावण मारूं आला होता । दैवें चुकविलें अनर्था । सांडोनि जातां मज नये ॥६५॥

---

१ दीर. २ तुलनेला. ३ गाईच्या पावलांतील पाणी. ४ महाबुद्धिमान्.

+ ५६।२२,२४.

सांडोनि आणें न घडे गोष्टी। वेगीं बैसें माझे पाठीं। करीन श्रीरामेंसीं भेटी। विकल्प पोटीं धरूं नको॥ ६६॥ शूर्पणखा केली नकटी। तुझा राग तिच्या पोटीं। तुज मारील उठाउठीं[1]। महा खोटी राक्षसी॥ ६७॥ लंकात्रिकूटमहागिरी। उपडोनियां बळेंकरीं। एके उड्डाणें समुद्रीं। नेईन परतीरीं जानकिये॥ ६८॥ करोनि एकचि उड्डाण। तुज भेटवीन रामलक्ष्मण। वाहतों श्रीरामाची आण। करीं आरोहण पृष्ठिभागीं॥ ६९॥ तुज म्यां नेतां अति त्वरेसीं। राक्षसवीरां महासुरांसी। वेगें न येववे मजपासीं। त्या मशकासीं कैंचीं ठाके[2]॥ ७०॥ आलिया इंद्रजित कुंभकर्ण। त्यांसी रणीं विभांडून। रावणातेंही गांजोन। भेटवीन श्रीरामा॥ ७१॥ ब्रह्मलिखिताची व्युत्पत्ती। पूर्वसंवाद सीतामारुती। रामें परिसावया हनुमत्कीर्ती। नाना युक्ती लिहिली असे॥ ७२॥

+कथमाकाशपंथान क्रमस्युपरि सागरम्।
प्रपतेयं हि तें पृष्ठाद्भयाद्वेगेन गच्छतः॥ १०॥
ततो मा पतितां दृष्ट्वा सागरे मकरालये।
भक्षयन्त्यप्रतिभया ग्राहाः सागरवासिनः॥ ११॥
ह्रियमाणां तु मा दृष्ट्वा मकरैर्भीमविक्रमाः।
प्रहरिष्यंति ते व्योम्नि राक्षसास्त्वां निरायुधम्॥ १२॥
कथं शक्ष्यसि संयातु मा चापि परिरक्षितुम्।
युध्यमानस्य रक्षोभिस्ततस्तैः क्रूरकर्मभिः॥ १३॥
प्रपतेयं च तान्दृष्ट्वा भयार्ता कपिसत्तम।
अथवा युध्यमानस्य पतेयं विमुखस्य ते॥ १४॥
पतितां मां हरिष्यंति राक्षसा भीमविक्रमाः॥ १५॥

सीतेनें अनेक अडचणी सांगितल्या–सीता म्हणे अवधारीं। बैसतां तुझे पृष्ठीवरी। तुझ्या उड्डानवेगेंकरीं[3]। पडेन सागरीं हिसळोन॥ ७३॥ पडतांचि सागराप्रती। मत्स्य मगर मज गिळिती। तेव्हां तूं पडसी आवर्तीं[1]। कैंवी मारुति म्यां यावें॥ ७४॥ कां धावणें आलिया लागवेगीं। तूं परतसी युद्धालागीं। झगडा देतां युद्धभागीं। मी रणरंगीं पडेन॥ ७५॥ मज पडतांचि क्षितीं। क्रोधें राक्षस मज मारिती। हेही न घडेगा युक्ती। कैंवी मारुती म्यां यावें॥ ७६॥ मज मारिलियापाठीं। जरी तुवां मारिल्या राक्षसकोटी। सुख नव्हे श्रीरामाच्या पोटीं। हे बुद्धि खोटी हनुमंता॥ ७७॥ सीते ऐकें सावध गोष्टी। मज न लगे युद्धअटाटी[2]। माझें पुच्छ कोपल्यापाठीं। मारील कोटी राक्षसां॥ ७८॥ तुज मी सुखीं राखीन स्वस्थ। माझें पुच्छ प्रतापवंत। करील राक्षसांचा घात। अर्बुदांत[3] जरी आले॥ ७९॥ सीता म्हणे तूं अल्प मारुती। तुझें पुच्छ तंव तें किती। कैंवी राक्षसां लावील ख्याती। सत्यत्व चित्तीं मानेना॥ ८०॥

+न मे जानासि सत्वं त्वं प्रभावमसितेक्षणे।
तस्मात्पश्य तु वैदेहि यद्रूपं परमं मम॥ १६॥
विंध्यमंदरसंकाशो बभौ दीप्तानलप्रभः।
अग्रतो व्यवतस्थे स सीताया वानरर्षभः॥ १७॥

मारुतीचें उत्तर–सीते म्हणसी वानर किती। कायसी पुच्छाची शक्ती। पाहे माझी स्वरूपस्थिती। म्हणोनि मारुति वाढला॥ ८१॥ विंध्य मेरु आणि मंदार। त्यांहून वाढला वानर। जैसा प्रलयकाळाग्निरुद्र। तैसा दुर्धर भासत॥ ८२॥ सीते नेणसी माझें सत्व। पाहें माझें स्वरूप प्रभाव। देव दानव आणि मानव। राक्षस सर्व गांजीन॥ ८३॥ माझें पुच्छ पाहें प्रतापवंत। राक्षसमर्दनीं[4] अति समर्थ। सगळी लंका तुजसमवेत। निमेषार्धांत नेईन॥ ८४॥ विकल्प[5] सांडोनियां पोटीं। सीते बैस

१ आवेशानें. २ गांठवणार. ३ उड्डाणाच्या वेगानें.

+ अ. ३७, ४६, ४७, ४९, ५१, ५२, ५४.

१ घोटाळ्यांत, संकटात. २ लढाईचा खटाटोप. ३ अब्जावारी. ४ राक्षस मारण्याच्या कामात ५ कुकल्पना, शंका.

+ ३७।३४,३७.

माझे पृष्ठीं । करीन श्रीरामासी भेटी । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ८५ ॥

सीतेचें उत्तर, परपुरुषाचा स्पर्श वर्ज्य—परपुरुषीं आरोहण । हेंचि पतिव्रतेसी दूषण । ऐकोनि सीतेचें वचन । पूर्वकथन कपि सांगे ॥ ८६ ॥

मारुती आपलें सोहार्द सीतेस पटवितो—राम सर्वार्थी सर्वज्ञ । गर्भी ब्रह्मचर्यकौपीन । माझी श्रीराम देखोन धाडी आपण तुजपासीं ॥ ८७ ॥ माझी जाणोनि समूळ स्थिती । स्त्रियेसीं भेटी एकांतीं । ऐसें जाणोनि श्रीरघुपती । मज तुजप्रति धाडिलें ॥ ८८ ॥ तुझा विकल्प जावया जाण । निजमुद्रा देवोनि खूण । श्रीरामें धाडिलें आपण । अपत्य जाण मी तुझें ॥ ८९ ॥ आणिक सांगितली खूण । कैकेयी वल्कलें परिधान । तुज नेसतां न येती जाण । श्रीरामें आपण नेसविलीं ॥ ९० ॥ खूण सांगतां हनुमंता । चित्तीं चमत्कारली सीता । विकल्प साडोनि तत्वतां । गुज एकांता पूसत ॥ ९१ ॥ श्रीरामें आणविलें शुद्धीसीं[१] । किंवा आणविलें सीतेसीं । हें सत्य सांगें मजपासीं । त्या कार्यासी मी करीन ॥ ९२ ॥ श्रीरामें आणविली सीता । तरी आतांच येईन हनुमंता । ऐसें सीतेनें पूसतां । आला कपिनाथा गहिंवर ॥ ९३ ॥ आपुला दावोनि पुरुषार्थ । शीघ्र नेईन म्हणे हनुमंत । अगाध सीतेचें महिमासामर्थ्य । पुसे इत्यर्थ आज्ञेचा ॥ ९४ ॥ सावध अवधारीं वो माते । असत्य न बोलें मी येथें । श्रीरामें आणविलें शुद्धीतें । हेचि निश्चितें रामाज्ञा ॥ ९५ ॥ सीता म्हणे हनुमंता । विलंब न करावा सर्वथा । शीघ्र जावोनियां आतां । श्रीरघुनाथा सांगावें ॥ ९६ ॥ मजवरी कृपा आहे हनुमंता । तरी जावोनि शीघ्रता । शुद्धि सांगावया श्रीरघुनाथा । चरणीं माथा ठेविला ॥ ९७ ॥ सीतेनें करितां नमस्कार । पाथावरी लोळे वानर । अहो मी तुझें रंक किंकर[१] । आज्ञाधार नेमस्त ॥ ९८ ॥ श्रीरामसेवक जो जो कोणी । तो मज वंद्य मुकुटमणी । त्याचे चरणीं लोटांगणीं । सत्य वाणी हनुमंता ॥ ९९ ॥ ऐकतां सीतासद्भाववचन । आलें हनुमंता स्फुरण । आतांचि देवीं आपली खूण । शीघ्र गमन मी करितों ॥ १०० ॥ सत्य मानावया वानरा । खूण म्यां आणिली श्रीराममुद्रा । तूंही खूण दे श्रीरामचंद्रा । सत्य कपींद्रा मानावया ॥ १ ॥ ऐकतां कपीचें वचन । सीता खूण दे कळवळोन । कैसी दिधली खूण । सावधान अवधारा ॥ २ ॥

+एष चूडामणिर्दिव्यो मया सुपरिरक्षितः ।
मनःशिलायास्तिलको गण्डपार्श्वे निवेशितः ॥ १८ ॥
अखिलेन यथा दद्यामिति मामाह जानकी ।
चित्रकूटे महाप्राज्ञ वायसं प्रति मानद ॥ १९ ॥
क्षिप्तामिषीकां काकस्य रोषादेकाक्षिशातनीम् ॥ २० ॥
खेदमानस्य काकस्य मां सर्वः स्मर्तुमर्हसि ।
क्षिप्त हि इषिका तत्र रोषादेकागनाशिनी ॥ २० ॥
ऐषिकामस्त्रमपि ते भार्यार्थे सन्निपातिते ।
जहि पापमिमं रक्षःक्रूर दारापहारणम् ॥

खूण म्हणून सीता मारुतीला चूडामणी देते—उकलोनियां निजवेणी । खुणेसीं[२] दिधला चूडामणी । खूण सांगितली मुखवचनीं । श्रीरामालागोनी सांगावया ॥ ३ ॥ श्रीरामें स्वहस्तें स्वलीळा । उगाळोनि मनशिळा[३] । माझे कपाळीं लाविला टिळा । गोळांगूळा[४] हे खूण सांगें ॥ ४ ॥ चित्रकूट पर्वतांत । काकें मज क्षतविक्षत[५] । करितां कुचाग्रीं रक्ताक्त[६] । तेणें रघुनाथ क्षोभला ॥ ५ ॥ कोपें इषीकास्त्र सोडितां । काग[७] तिहीं लोकीं पळतां । शिव शक्र यम विधाता । कोणी रक्षिता नव्हेचि

१ शोधाकरता.

१ चाकर. २ खूण म्हणून. ३ धातुविशेष. ४ वानरा. ५ घायाळ. ६ रक्तबंबाळ. ७ कावळा.

+ ६५।२३.

॥ ६ ॥ नारदवचनें तो मागुता । शरण आला श्रीरघुनाथा । डाव्या डोळ्या करोनि घाता । होय रक्षिता श्रीराम ॥ ७ ॥ ऐसीं दिव्यास्त्रें तुजपासीं । तरी कां मज उपेक्षिसी । मृगामागें धाडिलासी । तेणें रुसलासी श्रीरामा ॥ ८ ॥ महापापीण मी सीता । स्वामीवरी केली सत्ता । तेणें आतुडलें[1] लंकानाथा । अधर्मता महादोषें ॥ ९ ॥ लक्ष्मण ठेविला त्वां रक्षण । त्याचेंहि म्यां केलें छळण । ऐसी पापिणी मी जाणोन । सोडवण[2] न करिसी ॥ ११० ॥ सकळ दोष श्रीरघुनाथा । क्षमा करीं कृपावंता । ऐसें हनुमंतासी सीता । अति दीनता अनुवादे ॥ ११ ॥

+एवमुक्तो हनुमता रामो दशरथात्मजः ।
तन्मणिं हृदये कृत्वा रुरोद सह लक्ष्मणः ॥२१॥
अयं हि जलसंभूतो मणिः परमभूषणः ।
युद्धेन परितुष्टेन दत्तः शक्रेण मे पितुः ॥ २२ ॥
अस्याद्य दर्शनेनाहं तां प्राप्तामिव चिंतये ।
किमिहासीत वैदेही ब्रूहि सौम्य पुनः पुनः॥२३॥

सीतेचा हनुमतावरोबर सर्वांस निरोप–हनुमंतासीं संभाषण । करून सीता दीनवदन । चिंतामणी हृदयीं धरोन । रामलक्ष्मण अति दुःखी ॥ १२ ॥ श्रीरामासी आलें रुदन । अश्रुधारा स्रवती नयन । मस्तकमणि हृदयीं धरून । करी स्फुंदन कृपाळु ॥१३॥ वारिज[3] समुद्रमणी । युद्धीं इंद्रें संतोषोनी । दिधला दशरथालागोनी । नमुचि[4] जैं रणीं पराभविला ॥ १४ ॥ तो हा दशरथें महामणी । दिधला कौशल्ये प्रियपत्नी । तिनें दिधला सीते लागोनी । प्रथमदर्शनीं सूनमुखीं ॥ १५ ॥ मणि देतां हनुमंता । माता पिता प्रियकांता । तिघें भेटलीं तत्वतां । ऐसी मज चिंता होतसे ॥ १६ ॥

१ सांपडलें. २ सुटका. ३ पाण्यांतून उत्पन्न झालेला. ४ या नावाचा दैत्य.

+अ. ३६।२,५,८.

मणि मजपासीं देतां । प्रत्यक्ष भेटलीसे सीता । ऐसा आल्हाद श्रीरघुनाथा । हनुमंता आलिंगी ॥ १७ ॥ आलिंगूनि पुसे हनुमंता । पुढें काय वदली सीता । ते ते सांगें समूळ वार्ता । ऐके सादरता श्रीराम ॥ १८॥ ऐसें पुसतां श्रीरघुनंदन । हनुमान घाली लोटांगण । पुढील सीताअनुवाद । वाची लक्ष्मण अक्षलिखित ॥ १९ ॥

सीतेची चिंता–समुद्रलंघनीं दिसे अभावो[1] । स्वयें सीतेसीं हा संदेहो । तोचि हनुमंतासीं पहा हो । स्वयमेव पूसत ॥ १२० ॥

सीतोक्तिः—+अयं च वीर संदेहस्तिष्ठतीव ममाग्रतः ।
कथं नु खलु दुष्पारं तरिष्यति महोदधिम् ॥२४॥
तानि हर्यृक्षसैन्यानि तौ वा नृपवरात्मजौ ।
त्रयाणामेव भूतानां सागरस्य विलंघने ॥ २५ ॥
शक्तिः स्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्य च ॥२६॥

ऐक बापा हनुमंता । माझे पोटीं परम चिंता । समुद्रलंघनीं तिघांची सत्ता । न देखें चौथा पुरुषार्थी ॥ २१ ॥ गरुड वायो कीं हनुमंता । दुर्धर समुद्र येरां समस्तां । नरवानरसह श्रीरघुनाथा । कैंवी येथें आता येववे ॥ २२ ॥ नुलंघवे गा हा सागर । न आणवे वानरांचा भार । येवों न शकती राम सौमित्र । कैंवी दशवक्त्र मारवे ॥ २३ ॥

हनुमताचें उत्तर व आश्वासन–ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान जाला हास्यवदन । श्रीरामाचें नेणसी महिमान । बाणप्रेरण अनिवार ॥ २४ ॥ श्रीरामभातां दुर्धर शर । बाणीं वाहोनि नरवानर । उतरोनिया परपार निशाचर मारील ॥ २५ ॥ निर्दळोनी निशाचर । विध्वंसोनि लंकापुर । मारोनियां दशशिर । तुझा उद्धार करील ॥ २६ ॥ ऐसें उत्तर ऐकतां । सुखें उल्हासली सीता । वेगीं जाईं बा हनुमंता । शीघ्र रघुनाथा आणावया ॥२७॥

१ असंभव.

+अ. ६८।७.

राक्षसांची कुरापत काढण्याची हनुमंताची युक्ती—न करितां युद्धकंदन। न करितां राक्षसांचें दमन। न करितां लंकादहन। उगा येथोन मी न[1] वचें[1] ॥ २८ ॥ मी काय आलों नाटिकार[2]। मी नेऊं तें प्रतिउत्तर[3]। लंकेमाजी करीन क्षेत्र[4]। दशवक्त्र गांजीन ॥ २९ ॥ राक्षसांचें बळ किती। किती सैन्य शस्त्रशक्ती। अवघी तुकीन मी मारुती। रणव्युत्पत्ती भिडेन ॥ १३० ॥ राक्षसांसीं करावया झगडा। मुख्य मूळ वनउपाडा। हनुमान बुद्धिवंत गाढा। केलें पुढा तें ऐका ॥ ३१ ॥

हनुमंताची सीतेला विनती—ऐसें विचारी जव आपण। सीता म्हणे करीं बा गमन। हनुमान घाली खालती मान। लज्जायमान बोलेना ॥ ३२॥ भेटावया श्रीरघुनाथा। उल्लास न देखे हनुमंता। ऐसी प्रबळ कोण चिंता। ते मज तत्वतां सांगावी ॥ ३३ ॥ माझे सांगतां निजवृत्तांता। तुज लागेल अति चिंता। शोध तुझे हो न करितां। अन्नपानता मज नाहीं ॥ ३४ ॥ नाहीं अन्न नाहीं जीवन। क्षुधेनें जावों पाहे प्राण। न करवे समुद्रलंघन। अति उद्विग्न तेणेंसीं ॥३५॥ कपीचें वचन ऐकतां। गहिवरें रुदन करी सीता। महापापीण मी तत्वतां। धाडीं हनुमंता भुकेलें ॥ ३६ ॥ हें माझें करकंकण। लंकेमाजी जावोनि आपण। घेवोनि चतुर्विधा अन्न। करीं भोजन यथेष्ट ॥ ३७ ॥ हनुमान पुसे सीतेसी। अन्नाची चवी आहे कैसी। सीता म्हणे हनुमंतासी। काय तुम्हासी भक्षणें ॥३८॥ आम्ही वानर वनचर। वनवासी निरंतर। नित्य वनफळांचा आहार। अन्नमात्र स्पर्शेंना ॥ ३९ ॥ माझें मोडोनि कंकण। लंकेमाजी फळें संपूर्ण। आवडे तें घेवोनि आपण। फळभोजन करीं बापा ॥४०॥

फळें खाण्याची अनुमती—ऐक वो माते माझें शीळ। मी तंव स्वयंपाकी केवळ। ज्यासी मनुष्याचा विटाळ। तें मज फळ अपवित्र ॥ ४१॥ हाटवटींचें विक्रीत अन्न। जेंवी न घेती सुब्राह्मण। तैशींच फळें विक्रीत जाण। मजलागून अपवित्र ॥ ४२ ॥ ऐकोनि कपीचिया माता†। साशंकित जाली सीता। हनुमंतासी आहारार्थी। काय म्यां आतां अर्पावें ॥ ४३ ॥ याचि अशोकवनाआंत। फळें आहेत अत्यद्भुत। यांसी लावितांचि हात। करितील घात राक्षस ॥ ४४ ॥ कपे तुझा करितील घात। तोच माझा प्राणांत। साधिला प्रयत्न होय व्यर्थ। स्वामिकार्यार्थ नासेल ॥ ४५ ॥ हनुमान म्हणे असो वृत्तांत। जाईन भुकेला कुंथत। क्षुधा नव्हे कल्पांत। आला प्राणांत मजलागीं ॥४६॥ बोलतां बोलता गेला चाचरीं[1]। मूर्च्छित पडला धरणीवरी[2]। दोहीं डोळां लाविली चंद्री। सीता सुंदरी गजबजली ॥ ४७ ॥ थापटोनियां हनुमंता। स्वयें सावध करी सीता। कोणासही कळों न देतां। गुप्त आहारार्थी तूं सेवीं ॥ ४८ ॥ जोंवरी होय क्षुधाहरण[3]। पडलीं फळें खावीं आपण। घालितें श्रीरामाची आण। फळें तोडोनि न खावीं ॥ ४९ ॥ ऐकोनि सीतेचे वचनासी। हनुमान खाजवी दोन्ही कुसी। मग आला वनवृक्षापासीं। निजमानसीं विचारी ॥ १५० ॥ सीतावचन अति प्रमाण। पाळोनि श्रीरामाची आण। वृक्ष उपटोनि झोडीन। फळें खाईन पडलीं तीं ॥ ५१ ॥

श्रीरामाचें कौतुक—ऐकोनि हनुमंताचें वृत्त। श्रीराम गदगदां हांसत। सुग्रीवादि कपि समस्त। स्वयें हांसत सौमित्र ॥ ५२ ॥ श्रीराम म्हणे गा सौमित्रा। कपीनें दमिलें निशाचरा[4]। लंकेमाजी

---

१ जाणार नाहीं. २ निरोप्या, शिपाई. ३ जबाब. ४ रणक्षेत्र.

१ झेंप गेली. २ पृथ्वीवर. ३ भुकेची पूर्तता. ४ राक्षसाना.

† ड—वृत्तान्ता.

केलें क्षेत्रा। त्या ब्रह्मपत्रा वाचीं वेगीं ॥ ५३ ॥ कैसें विध्वंसिलें वन। कैसें केलें राक्षसकंदन। इंद्रजित गांजिला दशानन। ब्रह्मलेखन तें वाचीं ॥ ५४ ॥ एका जनार्दना शरण। हनुमंताचें लंका-दहन। श्रोता श्रीराम सावधान। वक्ता लक्ष्मण तें ऐका ॥ १५५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदर-काडे एकाकारटीकायां हनुमत्प्रतापब्रह्मलेखनपत्र-वर्णनं नाम एकोनत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ २९ ॥ ओंव्या ॥१५५॥ श्लोक ॥ २६ ॥ एवं ॥ १८१ ॥

## अध्याय ३० वा

पडल्या फळाची आज्ञा, त्याप्रमाणें वर्तन—श्रीविघ्न-हारकाय नमः ॥ हनुमंताचें युद्धकंदन। मुख्यत्वें वनविध्वंसन। घेवोनि सीतेचें आज्ञापन। फळ-भोजन मांडिलें ॥ १ ॥ जोंवरी होय क्षुधाहरण। पडलीं फळें खाय वेंचोन। घातली श्रीरामाची आण। फळें तोडोन न खावीं ॥ २ ॥ जानकी-आज्ञा वंदोनि शिरीं। वनाची करावया बोहरी[1]। हनुमान जाऊनियां दूरी। फळाहारीं बैसला ॥ ३ ॥ काळाग्नि आव्हानूनि[2] जठरीं। मग बैसला फळाहारीं। वना आली महामारी वन संहारी कपिपुच्छ ॥४॥ सीतेची आज्ञा प्रमाण। घातली श्रीरामाची आण। पुच्छें वृक्ष उपडोन। तळीं झाडोन फळें खाय ॥ ५ ॥ पहिलें साकरेचें टेंक। स्वयें सेवी पित्तशामक। वृक्षउपाडा केला अनेक। भक्षोनि वृक्ष झुगारी ॥ ६ ॥ हनुमान आपोशन न मोडी। बैसली बैसका न सोडी। पुच्छ पुरवी नाना परवडी[3]। वनीं वृक्ष उपडी समूळ ॥ ७ ॥ कपि-भोजन धर्मस्थिती। पहिलें द्विजां घाली तृप्ती। ते बैसविले दोही पंक्तीं। फळें अर्पी अति प्रीतीं ॥ ८ ॥ द्विजशेष सेवी हनुमंत। तेणें होवोनियां

१ नाश २ बोलावून. ३ प्रकारांनीं.

तृप्त। घालेपणाचे ढेंकर देत। वनविघातें[1] कपिपुच्छ ॥९॥ अनुसंधानावांचून[2]। हनुमान नेघे अवदान वनफळांचें भाग्य गहन। ब्रह्मार्पण कपिमुखें ॥१०॥ पिकलीं फळें रामार्पण। जारसीं[3] करी कृष्णार्पण। हिरवीं करी ब्रह्मार्पण। सावधान प्रतिग्रासीं ॥११॥ फळें खात गटगटां। मिटक्या देतसे मटमटां। वांकुल्या दावी सुरश्रेष्ठां। दावी आंगोठा दैत्यांसी ॥ १२ ॥ पिकलीं खाय आवडीकरीं। हिरवीं तोंड-पालटावरी। पिंपळी[1] मिरें कोशिंबिरी। लोणच्या-वारीं[4] खातसे ॥ १३ ॥ अलवणता वाटे ज्यासीं। सामुद्रिक मेळवी त्यासीं। पुच्छ विध्वंसी वनासी। वृक्ष चौपासीं उपडोनि ॥ १४ ॥ ताळ तमाळ वृक्ष सरळी। खर्जुरी पोफळी नारिकेळी। उपडोनि करी वडवाळी[5]। रणकल्लोळीं हाणावया ॥ १५ ॥ राक्षस सैन्य आतुर्बळी। रणीं करितां खंदळी। हाणावया हातातळीं। करी वडवाळी वृक्षांच्या ॥ १६ ॥

वनकराशीं कलह–युद्ध होईल निश्चित। ऐसें जाणोनि हनुमंत। शिळा पाषाण वृक्ष पर्वत। आणिले तेथ युद्धार्थी ॥ १७ ॥ वृक्ष उपडितां कपींद्रें। जागीं जाली वनकरें। म्हणती मारा रे मारा रे। वन वानरें भंगिलें ॥ १८ ॥ बोंब उठिली एकसरीं। वन भंगिलें चौफेरीं। शस्त्र घेवोनि वनकरीं। वानरावरी लोटले ॥ १९ ॥ एक सळपती वोडणखाडें[6]। एक विंधिती लक्षोनि काडें[7]। एक हाणिती गोफणगुंडे। एक ते धोंडे टाकिती ॥२०॥ वन उपडिलें माकडें। सांगतां रावो मानील कुडें। यासी धरावें रोकडें। रावणापुढें न्यावया ॥ २१ ॥ पुच्छ लाव आहे विशेष। टपोनि धरा म्हणती एक। एक म्हणती आवश्यक। घालूनि झडप धरूं

१ वनाचा विध्वस करून, २ भगवन्नामकीर्तनावांचून. ३ पाडाचीं. ४ लोणच्याप्रमाणें. ५ प्रास.६ ढालतरवारी. ७ बाण.

1 ब—पारशें.

यासी ॥ २२ ॥ ऐसी वनकरांची मात। ऐकोनियां हनुमंत। त्यांचा करावया घात। मग कृतांत क्षोभला ॥ २३ ॥ हाणितां पुच्छाचा पैं साट[१]। त्यांचीं शस्त्रें करोनि पीठ। अवघे कवळोनि एकवट। बांधिली मोट वनकरांची ॥ २४ ॥ चौदा सहस्र वनकरां। पुच्छें बांधोनियां भारा। निक्षेपिलें[२] पैं सागरा। मत्स्यमकरां आहारार्थ ॥ २५ ॥ राक्षसी आटिती[३] सीतेसी। तुवां संवाद केला ज्यासीं। तेणें मारोनि वनकरासी। केला वनासीं विध्वंस ॥ २६ ॥ एकीं सुटला अधोवात। एकी फळफळां मूतत। एकी चळचळां कांपत। मूर्च्छागत पैं एकी ॥ २७ ॥ द्वंद्वा पिटला वानरू। तुज धरूं चिरूं मारूं। तुझ्या रक्ताचा घोट भरूं। गटका करूं सगळाचि ॥२८॥ सीता गांजितां सुंदरी। हनुमान गुरगुरी तयांवरी। भेणें पळाल्या निशाचरी। आपापरी[४] ते ऐका ॥२९॥ भेणें पळाली देहस्मृती। नेसणीं गळालीं नाठवे चित्तीं। नागव्या जावोनि रावणाप्रती। मग सांगती वनबोंब ॥ ३० ॥ कैंचें नेणों आलें वानर। वन विध्वंसिलें परिकर[५]। चौदा सहस्र वनकर। पुच्छें समग्र मारिले ॥ ३१ ॥

किंकराची योजना व त्यांचें निर्दळण–भरंवशाचे निघडे[६] वीर। ऐशीं सहस्र किंकर। रावणें धाडिले सत्वर। आणा वानर बांधोनी ॥ ३२ ॥ रणीं रगडोनि मारावी धूर। ऐसें ऐशीं सहस्र किंकर। शस्त्रें वर्षती अपार। शेखीं वानर बूजिला ॥ ३३ ॥ हनुमान विचारी पोटांत। मज न रुतती शस्त्रघात। साहोनियां शस्त्रसंपात। काय समस्त करितील ॥ ३४ ॥ हनुमान निश्चळ शस्त्रांतळीं। तंव किंकरीं पिटिली टाळी। वानरें केली रणरांगोळी। महाबळी आम्ही रणमारे ॥ ३५ ॥ घायीं तुटला निवटला। वाणीं तृणप्राय† केला। ऐकोनि किंकरांच्या बोला। कपि कोपला रणरागें ॥ ३६ ॥ कपि पुच्छासी सांगे गोष्टी। आजि निर्दाळूं राक्षसकोटी। हाणितां पुच्छाच्या[१] आधाटीं[१]। जीवा साटीं[२] किंकरां[३] ॥ ३७ ॥ लागतां पुच्छाचा आघात। त्यांच्या शस्त्रां करोनि भस्मांत। किंकर मारिले समस्त। कपि गर्जत जयरामें ॥ ३८ ॥ मी तंव श्रीरामाचा दूत। सीताशुद्धीसी आलों हनुमंत। सीता सांपडली येथ। आला अंत राक्षसां ॥ ३९ ॥ राक्षसां करोनि रगडा। झाडीन इंद्रजिताचा पाडाडा[४]। रावण गांजोनियां गाढा। राम रोकडा आणीन ॥ ४० ॥ ऐकतां हनुमंताची मात। बोंब उठली लंकेआंत। ऐकोनि किंकरांचा घात। लंकानाथ दचकला ॥४१॥

प्रहस्तसुत जंबुमाळीशीं युद्ध व त्याचा घात–प्रहस्तसुत आतुर्बळी। रागें धाडिला जंबुमाळी। कपि बांधोनि गळसमेळीं[५]। मजजवळी आणावा ॥४२॥ जरी येसी कपि न मारून। तरी तुझे मस्तका मूत्रवपन[६]। शेखीं नासिक छेदीन। खरारोहण विटंब ॥ ४३ ॥ जंबुमाळी क्रोधायमान। वर्षला शरधारा दारुण। पृथ्वी आकाश व्यापून। शरीं संपूर्ण कोंदलें ॥ ४४ ॥ माझ्या आंगीं बाण न रुपती। शंका न मानीच मारुती। रामनामाच्या आवृत्तीं। निःशंकस्थिति विचरत ॥४५॥ पंचक्रोश शिळा प्रचंड। वानरें हाणितली वितंड। जंबु धनुर्वाडा अखंड। केली शतखंड बाणें एकें ॥४६॥ कपि हाणितां वृक्षघाय। तोही केला तिळप्राय। हनुमान म्हणे धन्य माय। योद्धा होय जगजेठी ॥ ४७ ॥ माझे शिळाघाय[७] वृक्षसमेळीं। निवारोनि महाबळी। योद्धा होय राक्षसकुळीं। जंबुमाळी

---

१ सपाटा. २ फेंकिलें, टाकिलें. ३ गांजिती. ४ दुर्दशा. ५ समग्र, सुदर. ६ शूर.

१ पुच्छभागानें. २ भय. ३ सेवकांना. ४ अभिमान. ५ गळ्याशीं पाश घालून. ६ मूत लावून हजामत. ७ दगडांचे घाव.

† ड–तिळप्राय जाहला.

महावीर ॥ ४८ ॥ अर्धचंद्रबाणसमेळीं । कपींद्र विंधिला कपाळीं । बाण दिसळोनि ते वेळीं । लागला निढळीं जंबूच्या ॥ ४९ ॥ लागतां बाणाचा आघात । जंबुमाळी पडे मूर्च्छित । हनुमान गदगदां हांसत । विपरीतार्थ येथें जाला ॥ ५० ॥ मज न रुपती तुझे बाण । तुझाचि घेवों पाहती प्राण । आतां कायसें रे रण । जाय परतोन मी न मारीं ॥ ५१ ॥ ऐकोनि कपीचें वचन । जंबु विचारी आपण । परतलिया दंडील रावण । करूं निर्वाण युद्ध यासीं ॥ ५२ ॥ वनचामुंडावरदत्त । परिघ टाकिला घंटायुक्त । करावया हनुमंताचा घात । रागें सोडित राक्षस ॥५३॥ माझे परिघाचा घात । आजि निमाला हनुमंत । कैसेनि राखे रघुनाथ । रणपुरुषार्थ पाहों याचा ॥ ५४ ॥ परिघ[1] येतां आंगापासीं । हनुमान उडाला आकाशीं । वरद-सामर्थ्यशक्ति कैसी । लागे परिघासी कपिपाठीं ॥ ५५ ॥ सवेग जातां हनुमंतासी । परिघ न संडी पाठिलागासी । विस्मयो करी कपि मानसीं । शस्त्राची ऐसी निजशक्ति ॥ ५६ ॥ विचारीं पडतां वानर । स्वर्गीं उठिला हाहाकार । परिघ सुटला दुर्धर । आजि कपींद्र वांचेना ॥ ५७॥ ऐशा ऐकतां गोष्टी । परीघ येतां देखोनि पाठीं । कपिपुच्छें घातली आठी[2] । चेपिली घांटी[3] वनदेवतेची ॥ ५८ ॥ देवता म्हणे श्रीरामभक्ता । तुज मी शरण आलें आतां । शस्त्रदेवता समस्ता । शरणागता तुज होती ॥ ५९ ॥ शस्त्रशक्ति भूतशक्ती । मंत्रतंत्रयंत्रशक्ती । अवघ्या शरण तुज येती । मज मारुति वांचविल्या ॥ ६० ॥ सोडोनि पुच्छाचें बंधन । शस्त्रदेवता वांचवून । शक्तिमंडळा लोटांगण । घाली आपण हनुमंत ॥ ६१ ॥ मारूं नये शरणागता । म्हणोनि वांचविली शस्त्रदेवता । भूतीं देखोनि रघुनाथा । शक्ति समस्ता वंदिल्या ॥६२॥

१ आयुधविशेष. २ मिठी. ३ गळा.

उदो म्हणोनि समस्त शक्ती । हनुमंतातें ओंवाळिती । राक्षसां विमुख आम्ही समस्ती । साह्य युद्धार्थीं श्रीरामा ॥ ६३ ॥ सीता आमुची आदिशक्ती । तिसी गांजितो लंकापती । रणीं राक्षसां लावोनि ख्याती । आम्ही युद्धार्थीं तुज साह्य ॥ ६४ ॥ हनुमान म्हणे पुच्छा जगजेठी । युद्धीं माझी राखोनि पाठी । साह्यशक्ति कोट्यनुकोटी । पुच्छासाठीं मज जाल्या ॥ ६५ ॥ करोनि पुच्छाची पैं स्तुती । युद्धा परतला मारुती । परिघ देखोनि त्याचे हातीं । जंबूचे चित्तीं चळकांप ॥ ६६ ॥ माझा परिघ हा तत्वतां । गेला हनुमंताचे हाता । रावणाच्या अधर्मता[1] । शस्त्रदेवता क्षोभलिया ॥ ६७ ॥ ऐसें जंबु जंव विचारी । तंव परिघ वाजिनला शिरीं । रथसारथींची चकचुरी । जंबूची उरी तुरेचि ॥६८॥ रथ वारू[2] ना सारथी । ना त्याचें शिर ना त्या अस्थी । पाहतां त्याची न दिसे व्यक्ती[3] । नेले अव्यक्तीं वानरें ॥ ६९ ॥

आणखी सैन्य व अखया कुमार पाठविला. त्याचा संहार-हनुमंतें जंबुमाळी । घायें केली रवंदळी[4] । बोंब गेली रावणाजवळी । क्रोधानळीं[5] भयभीत ॥ ७० ॥ मारावया पैं वानर । प्रधानपुत्र दश सहस्र । रागें धाडी दशशिर । महावीर रणयोद्धे ॥७१॥ ध्वज पताका †रणप्रयुक्तीं । पुढें वाजंत्रीं वाजती । मागें माता शंख करिती । पुत्रसंतती निमाली ॥ ७२ ॥ प्रधानपुत्र गजभारीं[6] । येतां देखोनि महागजरीं । हनुमान गर्जे भुभुःकारीं । पुच्छ अंबरीं तळपत ॥ ७३ ॥ पुच्छें कळवळोनि समस्त । हनुमान करी पर्यंतघात । घायें निमाले समस्त । जाला प्राणांत समकाळें ॥ ७४ ॥ प्रधानपुत्रां केला घात । ऐकोनि धाके लंकानाथ । आतुर्बळी हनुमंत । काळकृतांत

१ अधर्मवर्तनानें. २ घोडा. ३ मागमूस. ४ नाश. ५ क्रोधाग्नीमुळें. ६ गजसमूहानें.

† ड–रथ.

रणमारें ॥ ७५ ॥ रावण पडिला चिंतावर्ती । रणीं नाटोपे मारुती । वीर मारोनि भद्रजाती[1] । लाविली ख्याती राक्षसां ॥ ७६ ॥ रणकर्कश रणरगडे । पांच सेनानी[2] निधडे । कपीसी मारावया रोकडे । धाडी वेगाढे[3] युद्धासीं ॥ ७७ ॥ चौघे राहोनि चहूं दिशांसीं । एक राहोनि आकाशीं । मारावया हनुमंतासी । विकट[4] विन्यासीं[5] विंधिती ॥ ७८ ॥ कपिपुच्छ महाबळी । त्यांचे शस्त्रा करोनि होळी । पांच जणांतें आकळी । पुच्छसमेळीं[6] कवळोन ॥ ७९ ॥ स्वयें योगिया आपण । जेंवी निरोधी पंच प्राण । तेंवी कपिपुच्छें पांच जण । आकळोन राखिले ॥ ८० ॥ विवेकवैराग्यसंपन्न । पंचविषयां[7] करिती दमन । तेंवी कपिपुच्छें पांच जण । निर्बंधून राखिले ॥ ८१ ॥ पंचभूतांची निवृत्ती । केलिया सुख पावे परमार्थी । पांचही मारोनि पर्वतघातीं । सुखें मारुति सुखावे ॥ ८२ ॥ एकेचि घायें कपी आपण । घेतला पांचांचाही प्राण । ऐकोनि दचकला रावण । सेना प्रधान कांपती ॥ ८३ ॥ रावणा कोप आला दुर्धर । रणीं मारावया वानर । स्वयें धाडिला अखया कुमर । रणचतुर दिव्यमारें ॥८४॥ अखया जाणे रणकंदनार्थ । शस्त्रीं¶ अस्त्रीं अतर्क्य घात* । निरालंबीं[8] चढवोनि† रथ । मारी हनुमंत साटोपें ॥ ८५ ॥ आज्ञा देतां दशानना । तुरें वाजती निशाणां‡ । अखया आला अशोकवना । रथछत्रसेनागजदळें ॥ ८६ ॥ अखया शरसंपातीं । रणीं आच्छादिला मारुती । वीर सिंहनाद करिती । मारिला म्हणती वानर ॥ ८७ ॥ अखयाविजयाची नवायी[1] । वाजंत्र्यांची लागली एकचि घायी । हनुमंतें तिये समयीं । केलें कायी तें ऐका ॥८८॥ भोंवता पुच्छाचा घे साट[2] । त्याचीं शस्त्रें करोनि पिष्ट । सैन्य मारिलें समसगट । अखया उद्भट त्रासिला ॥ ८९ ॥ पुच्छें आकळितां अखयासी । रथ उडविला आकाशीं । धरितां न धरवे हनुमंतासी । लघुलाघवेंसीं[3] तळपत ॥ ९० ॥ हनुमान अखया दोन्ही वीर । युद्ध करिती निराधार । विस्मयो करिती सुरवर । चक्राकार परिभ्रमती ॥ ९१ ॥ क्षणैक क्षितीं क्षणैक अंबरीं । क्षणैक रथ दिसे सागरीं । क्षणैक दिसे त्रिकूटावरी अखया भारी लाघवी ॥ ९२॥ पुच्छ कोपोनि लागे पाठीं । रथ पर्वतां दिक्पुटीं । पुच्छें बांधोनि कडकडाटीं । रागें आपटी भूतळीं ॥ ९३ ॥ रथ आपटितांचि क्षिती । वोडणखांडें[4] घेवोनि हातीं । अखया उसळोनि लघुगती । मारूं मारुति धांविनला ॥९४॥ मारावया हनुमंत । वोडणखड्गेंसीं तळपत । कपीचा करावया घात । गगनाआंत उसळला ॥९५॥ अखया उडतां आकाशीं । हनुमंतें धरिला पायांसीं । गरगरां भोंवंडितां त्यासी । देहभावासी विसरला ॥ ९६ ॥ खड्ग पडिलें मातेचे वाडां । मुकुट पडिला रावणापुढां । ओडण पडिलें लंकेच्या कडां । केला नितोडा[1] बळाचा ॥९७॥ आपटितांचि शिळातळीं । निधा[6] उठिला पाताळीं । दिग्गजांचीं बैसलीं टाळीं । झाली रांगोळी हाडांची ॥ ९८ ॥ करितां अखयाची समाप्ती । हनुमंताची अगाध कीर्ती । स्वर्गी सुरवर वानिती । वानिती क्षितीं ऋषीश्वर ॥ ९९ ॥ मुकुट पडतांचि पुढें । वार्ता ऐकतां रावण रडे । म्हणे म्यांच केलें कुडें[7] । पुत्र कां पुढें धाडिला ॥ १०० ॥

---

१ उत्तम हत्ती. २ सेनापती. ३ चपळ. ४ भव्य. ५ रचनेच्या योगानें. ६ शेंपटाच्या वेढ्यानें. ७ शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पांच विषय. ८ अधांतरीं, आकाशांत.

¶ क्ष–शस्त्रास्त्रीं. * क्ष–गत. † क्ष–चढवी. ‡ नाना.

---

१ नवल, आश्चर्य. २ गराडा. ३ परम कौशल्यानें. ४ ढालतरवार. ५ नाश. ६ प्रतिध्वनि. ७ खोटें कर्म.

रावणाचा शोक व स्वतः जाण्याची तयारी–वानरें अखया पाडिला धरणीं। बोंब आली वनींहूनी। रावण धुळी घाली वदनीं। पडिला धरणीं मूर्च्छित ॥१॥ पुत्रशोकें कंपायमान। क्रोधें झाला सावधान माझें जें अशोकवन। शोकस्थान तें झालें ॥ २ ॥ रणीं मर्दिलें वानरें। वीरीं घातलें घायवारें। अखयाचेनि कैवारें। धाडावया दुसरें दिसेना ॥ ३ ॥ त्यावया अखयाच्या सुडासी। मीच जाईन वनासी। वानरा मारीन निश्चयेसीं। कास[१] सरसी घातली[१] ॥ ४ ॥ म्यां मारिलिया तो वानर। अखयाचा¶ सूड पावला खरें। मज मारिलिया निर्धारें। सीता सुंदरी निर्मुक्त ॥ ५ ॥ ऐसा करोनि विचार। युद्धा निघाला दशशिर। तंव वेगें धांविला ज्येष्ठ कुमर। महावीर इंद्रजित ॥ ६ ॥

इंद्रजिताची इच्छा–म्हणे एकलें वनचर‡। केवळ जें कां पालेखाइर। त्यावरी जाणें लंकेश्वर। श्रेष्ठ विचार हा नोहे ॥ ७ ॥ वीरीं घेतला रणधाक। म्हणोनि जाणें दशमुख। मी तंव घरगुती सेवक। अवश्यक मज धाडीं ॥ ८ ॥ वाहतों सदाशिवाची आण। शिवतों स्वामी तुझे चरण। वानरा रणीं न मारून। गळां बांधोन आणीन ॥ ९ ॥ निराहारी ब्रह्मचारी। तो इंद्रजितातें मारी। इंद्रजित न मारवे कपीच्या करीं। हा फळाहारी यथेष्ट ॥१०॥ ऐसें विचारोनि रावण। इंद्रजितासी दिधलें आज्ञापन। रणीं वानरा गांजून। गळा बांधोन आणावें ॥ ११ ॥ इंद्रजित युद्धा निघतां वेळीं। निशाणें त्राहाटिलीं ते काळीं। कंगल[२] टोप राघावळी[३]। केली आरोळी महावीरीं ॥ १२ ॥ शायसीं प्रयुत[४] मत्त हस्ती। कोटयनुकोटी महारथी। अनिवार नेणों किती। वीर पदाती असंख्यात ॥ १३ ॥ वीरां कवचें रत्नखचित। शस्त्रें सैन्य लखलखित। पाखरा[१] तेजीं झळकत। वीर गर्जत सिंहनादें ॥ १४ ॥ तडक फुटले एकसरें। भिंडिमाळांचे[२] पांगोरे[३]। खाखाइलीं रणतुरें। निजगजरें चालिले ॥ १५ ॥

त्याला झालेले अपशकुन व ब्रह्मदेवाचें भविष्य–इंद्रजित निघतां उल्हासेंसीं। नग्न कुमारी शिंके पाठीसीं। आशंका पडली इंद्रजितासी। रावणासी चळकाप ॥ १६ ॥ चिन्ह पुसतां ब्रह्मयासी। भविष्य कळलें तयासी। तोहि तैसेंचि सांगे त्यासी। अति गुह्यासीं गुह्योक्ति ॥ १७ ॥ युद्ध करितां वानरासीं। अपेश यशीं यश अपेशीं। इंद्रजित बांधोनि कपीसी। तुजपासीं आणील ॥ १८ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन। जयजयकारें स्वयें गर्जोन। इंद्रजितें केलें नमन पुढील कथन अवधारा ॥ १९ ॥ येतां देखोनि इंद्रजित। आनंदें नाचे हनुमंत। पुरवावया युद्धमनोरथ। श्रीरघुनाथ तुष्टला ॥ १२० ॥ पुच्छ नाचवीत रणीं। चौफेरेंसीं सैन्य आकळोनी। रणीं मारोनि वीरश्रेणी। रुधिरें धरणी न्हाणीन ॥ २१ ॥ कपिपुच्छ विचक्षण। भूतां दिधलें आमंत्रण। मांसभक्षण रुधिरपान। रणभोजन करावें ॥ २२ ॥ वधोनि राक्षसांच्या कोडी। ज्याचे पोटीं जे आवडी। ते ते पुरवीन परवडी[४]। वाढावाढी रणमारें ॥ २३ ॥ आताचि हे भाजीभाकरी। तुम्हीं करावी न्याहारी। पुढें श्रीराम नरकेसरी। पंचधारीं जिववील ॥ २४ ॥

असाळीचें विदारण–इंद्रजित येतां सहदळीं। पुढें धाविंनली असाळी। जेणें मारिला अखया बळी। त्याची होळी मी करीन ॥ २५ ॥ ठाकोनि आली अशोकवन। पुढां हनुमंतें लक्षोन। विकट वटारिले नयन। विक्राळ वदन पसरोनि ॥ २६ ॥ एक जाभाडें भूतळीं। दुजें लाविलें नभोमंडळीं।

१ सज्ज झाला. २ अलंकारविशेष. ३ रक्तवर्ण वस्त्रें (राजावळी) ४ दहा लक्ष.

¶ ड–स्वच्छ होईल लंकापूर. † ड–वानरे दशशिर. ‡ ड– + वानर.

१ झुली. २ गोफिणीचे. ३ दोन्या. ४ प्रकारांनीं.

कराळ विक्राळ दांताळी । जिव्हा काळी लवथवित ॥ २७ ॥ अणुप्रमाण होवोनि तेथ । जिव्हा दांतां नातळत । वेगीं रिघाला घशांत । गेला उदरांत मारुति ॥२८॥ मुखीं रिघाला मारुती । नातळेचि जिव्हादांतीं । असाळी विस्मयो मानी चित्तीं । ठकिलें निश्चितीं वानरें ॥ २९ ॥ गोड कडु कीं खारट । आंबट तिखट कीं तुरट । कांहीं चवी न कळे स्पष्ट । अहा कटकट राक्षसी ॥ १३० ॥ कपि न मरेचि माझे हातीं । वानर गेला अतर्क्यगती । पुढें काय करील त्यातीं । जीवीं धाकली असाळी ॥ ३१ ॥ इंद्रजितासीं करावया रण । हनुमंतासीं आवडी पूर्ण । तिच्या उदरीं न राहे एक क्षण । केलें विंदान[१] तें ऐका ॥ ३२ ॥ काळीज उपडोनि सरेंठ वेंबीपासीं फाडोनि पोट । हनुमान रिघोनिया स्पष्ट । केला उद्भट[२] भुभु:कार ॥ ३३ ॥ असाळियें गिळिला हनुमंत । कथा विस्तारिली लोकाआंत । चुकला इंद्रजिताचा अनर्थ । युद्धकंदनार्थ सैन्याचा ॥ ३४ ॥ पूर्वींच गिळिती वानर । तरी कां मरता अखया कुमर । वनकर किंकर प्रधानपुत्र । जंबुवीर वांचता ॥ ३५ ॥ रावणा हरिखें[३] सांगे दूत । असाळियें गिळिला हनुमंत । सवेंच दुसरी बोंब सांगत । केला नि:पात असाळीचा ॥ ३६ ॥ क्रौंचा मारिली पडलंका । विटंबिली शूर्पणखा । आता मारिली असाळिका । कोण कोण दु:खा मी सोसूं ॥ ३७ ॥ जो रिघोनि उदराआंत । करी राक्षसिणींचा नि:पात । तो इंद्रजिताचा करील घात । चळीं कांपत रावण ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । जालें असाळीनिर्दळण । पुढें इंद्रजितहनुमद्रण । सावधान अवधारा ॥ १३९ ॥ स्वस्ति श्रीभा० सुं० ए० ब्रह्मलिखितहनुमदसाळीवधो नाम त्रिंशत्तमोऽध्याय: ॥ ॥ ३० ॥ १३९ ॥

१ कौशल्य. २ मोठा. ३ आनंदानें.

## अध्याय ३१ वा

असाळीच्या घातानंतर पुढील वृत्तान्त वाचण्यास लक्ष्मणास सुग्रीवाची विनंति—श्रीभवानीशंकराभ्यां नम ॥ इंद्रजित युद्धा निघतां आवेशी । असाळी उठिली विवशी । श्रीरामें निरसिलें तियेसी । अति उल्हासीं हनुमंत ॥ १ ॥ गजदळेंसीं अति उन्नद्ध[१] सैन्य देखोनियां सन्नद्ध[२] । हनुमंतासी अति आल्हाद । श्रीराम गोविंद तुष्टला ॥ २ ॥ राक्षस मारावया अति अद्भुत । वनउपाडा[३] पाहे सुमुहूर्त । इंद्रजित गाजोनियां तेथ । गर्वहत करीन मी ॥३॥ माझे पुरवावया मनोरथ । आजि तुष्टला श्रीरघुनाथ । इंद्रजित आला सैन्यासमवेत । हनुमान नाचत स्वानंदें ॥ ४ ॥ पुच्छ नाचतें पैं रणीं । मारोनियां वीरश्रेणी[४] । पूजूं चामुंडा चवंडायणी । भूतां देऊं धणी[५] मासाची ॥५॥ अखया कुमराची बोहणी । प्रथम केली म्यां रणांगणीं । येथोनि वीरांचिया श्रेणी । मारीन रणांगणीं रणमारें ॥ ६ ॥ हनुमान पुच्छासीं करी एकांत । जो जो आला रणाआंत । परतोनि न जावा नगराआंत । करावा घात अवघ्यांचा ॥ ७ ॥ जो जो येईल शरण । त्यासी येवों न द्यावें मरण । याचि नांवें दादुलेपण[६] । येरां मर्दन रणमारें ॥ ८ ॥ पुच्छा आलिंगोनि पोटीं । हनुमंताची गोड गोष्टी । पुच्छें कवळोनि सैन्यासकटी । राक्षसकोटी मारीन ॥ ९ ॥ स्वामिवचन मानोनि शिरीं । पुच्छ रक्षण लंकाद्वारीं । मागें परतल्या निशाचरीं । महामारीं मारावया ॥ १० ॥ कपिपुच्छसंवादमेळीं । करावया वीरां रणरांगोळी । युद्धानंदीं पिटीन टाळी । आतुर्बळी खवळले ॥ ११ ॥ ऐकोनि कपिपुच्छसंवाद । वानरां वाढिवेचा आल्हाद । ऐकावया हनुमंतयुद्ध । अति

१ आवेशयुक्त. २ सिद्ध, तयार. ३ वनाचा विध्वंस करणें. ४ वीरसमुदाय. ५ तृप्ति. ६ मोठेपणा.

सावध स्वानंदें ॥ १२ ॥ सुग्रीवें उठोनि आपण । धरिले लक्ष्मणाचे चरण । इंद्रजितहनुमंताचें रण । सांग[1] संपूर्ण वाचावें ॥ १३ ॥ उगे रहावया अवघे जण । घातली श्रीरामाची [2]आण । वानर वीर सावधान । हनुमद्रण परिसावया ॥१४॥ परिसावया युद्ध उद्भट । टवकारोनि नेत्रवाट । वळोनि पुच्छाचा पैं साट[3] । वीर मर्कट सावध ॥ १५ ॥ कैसें पत्र वाचितो पुढें । लक्ष्मणाच्या तोंडाकडे । पहात ठेलीं पैं माकडें । युद्धचाडें[4] श्रवणार्थी ॥ १६ ॥ परिसावया कपीचा पुरुषार्थ । अति उल्हासला श्रीरघुनाथ । लक्ष्मण वाची ब्रह्मलिखितार्थ । युद्धकंदनार्थ कपीचा ॥ १७ ॥ ऐसे ऐकता वानरीं सकळीं । हर्षानंदें पिटिली टाळी । जें आमुचे हृदयकमळीं । तेंचि सुखमेळीं रामाच्या ॥ १८ ॥ ऐसियापरी वानरगण । ऐकावया हनुमद्रण । अवघे बैसले सावधान । पत्र वाचणें सौमित्र ॥ १९ ॥

नतर इंद्रजित युद्धाकरिता पुढें सरसावतो—ऐकोनि असाळीचा घात । कोपें खवळला इंद्रजित । कपीचा करावया घात रथ त्वरित प्रेरिला ॥ २० ॥ तडक फुटला अति दुर्धर । निशाणें भेरी शृंगाकार । इंद्रजित आला गडगजर । रणतुरें वाजती ॥ २१ ॥ एकलें एक पैं वानर । यावरी येतां असंख्य वीर । चळीं कांपती महाशूर । दुर्धर मार कपीचा ॥२२॥ जाणोनी सैन्याचा वृत्तांत । इंद्रजितें रथ प्रेरिला त्वरित । पुढें लक्षोनि हनुमंत । शर वर्षत पैं आला ॥ २३ ॥ धनुष्याचा करितां टणत्कार । दुमदुमिले गिरिकंदर । नादें कोंदलें अंबर । वीर दुर्धर इंद्रजित ॥ २४ ॥ कपीनें करितां भुभुःकार । खळबळिले सप्त सागर । ध्यानीं दचकला पंचवक्त्र[5] । सुरासुर कांपती ॥ २५ ॥ नक्षत्रें तुटोनि पडती तळीं । तेंचि रणरंगीं रणरांगोळी । भूतें कांपती कपिआरोळी । भद्रकाळी आश्वासी ॥२६॥ याचिया रणमाराआंत । अति कृपाळु हनुमंत । मेदमांसें करील तृप्त । भय निश्चित तुम्हां नाहीं ॥ २७ ॥

१ समग्र. २ शपथ. ३ आंकडा. ४ युद्धविषयक आवडीनें. ५ शंकर.

दोघांची तुलना व वर्णन—ऐकतां कपिगिरागजर[1] । मरणोन्मुख निशाचर । खळबळिले रथ कुंजर । निधडे वीर कांपती ॥ २८ ॥ इंद्रजितें युद्धाचे कडाडीं । रथ प्रेरिला लवडसवडीं । कपि पुच्छाची उभवोन गुडी । नाचे आवडीं रणमारा ॥ २९ ॥ एक रावणराजकुमर । दुजा रामदूत वानर । येर राक्षसी राक्षसेंद्र । दुजा कपींद्र कपिकुळीं ॥ ३० ॥ दोघे वीर अति प्रबळ । समान बळ समान शीळ । दोघे संग्रामकुशळ । दोघे चपळ रणमारा ॥३१॥

तें द्वंद्व पाहण्यास आकाशस्थ देव येतात—दोघे भिडतां महावीर । पाहूं आले सुरवर । सिद्ध गंधर्व विद्याधर । नाग किन्नर ऋषी पाहती ॥३२॥ सावित्रीसहित चतुर्मुख । उमेसहित पंचमुख । शक्तिसहित षण्मुख । आला देवमुख्य हव्यवाट[2] ॥३३॥ शचीसहित सुरेंद्र । विकटेसहित वीरभद्र । सिद्धिबुद्धींसीं गणेंद्र[3] । युद्धीं कपींद्र पाहूं आले ॥ ३४ ॥

उभयतांचें युद्ध चालू—दोघे खवळले महावीर । काळ कृतांत अति दुर्धर । दोघे जैसे काळाग्निरुद्र । युद्धा सत्वर मिसळले ॥ ३५ ॥ एक त्रिपुर एक शंकर । एक मदन एक शंबर । अनिरुद्ध बाणासुर । जैंवी सूकर[4] हिरण्याक्ष ॥ ३६ ॥ एक गज एक केसरी । एक सर्प एक सर्पारी[5] । वृत्र आणि वज्रधारी[6] । ऐसियापरी मिसळले ॥ ३७ ॥ एक मुरु एक मुरारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । सहस्रबाहु वज्रधारी । जैंवी नरहरि हिरण्यकशिपूसीं ॥ ३८ ॥ एकासीं रथाची रथगती । दुजिया

१ वानराच्या वाणीची गर्जना. २ अग्नि. ३ गणपति. ४ आदिवराह. ५ गरुड. ६ इंद्र.

निजपुच्छ सारथी। दोघे भिडती वीर्यार्थी। रणव्युत्पत्ती महामारें ॥ ३९ ॥ क्षणैक भिडती भूतळीं। क्षणैक भिडती नभोमंडळीं। क्षणैक भिडती समुद्रजळीं। कुळाचळीं पैं दोघे ॥ ४० ॥ जैसी इंद्रजिताची पैं गती। त्याहूनि सवेग हनुमंतीं। न चले शक्ति ना छळणोक्ती। रणीं मारुति नाटोपे ॥ ४१ ॥ इंद्रजित म्हणे दुर्धर घात। हनुमान विदावी फळें खात। कांखा पिटोनि बुलकावित। मग दावित आंगोठा ॥४२॥ इंद्रजित खवळोनि रणीं। वर्षलासे दुर्धर बाणीं। हनुमान वर्षला पाषाणीं। रणांगणीं गर्जोनियां ॥४३॥ बाणीं पाषाण करी तो कूट। पाषाणीं बाण होती पीठ। दोघां जणां समसकट[१]। कडकडाट युद्धाचा ॥ ४४ ॥ विंधी सुवर्णपुंखें[२] भाळीं। वानर हाणी सबळ शिळीं। भाळीं करोनि रांगोळी। मुकुट तळीं पाडिला ॥ ४५ ॥ इंद्रजित तेव्हां मुक्तकेशीं। शस्त्रें हाणी अति आवेशी। जें तें तोडोनियां पुच्छीं। इंद्रजितासी गणीना ॥ ४६ ॥ रागें हाणी चेंडूचक्र। वानर हाणी शिळाशिखर। सवेग हाणितां तोमर। पर्वताग्रें टाकिलीं ॥ ४७ ॥ इंद्रजित वर्षे चक्रकांडें। वानर वर्षे पर्वतधोंडे। उडोनि हाणिता पैं खांडें। ठोकिला तोंडीं चडकणा ॥ ४८ ॥

मारुतीच्या व पुच्छाच्या पराक्रमानें इंद्रजित व सैन्य जर्जर — इंद्रजित गांजिला पुरा। मुखीं सुटल्या रुधिरधारा। मारावया पैं वानरा। निर्वाणशस्त्रा घेतलें ॥ ४९ ॥ साटोपें हाणितां शूलशक्ती। [३]जाजावला अति पर्वतीं। इंद्रजित धोंटावला चित्तीं। रणीं मारुति नाटोपे ॥ ५० ॥ यंत्रादि शस्त्रें हाणितां तवकें। वानरें ढिलाविला खडकें। फुटलें इंद्रजिताचें धैर्यमडकें। पडिलें अटकें पुच्छाचें ॥५१॥ इंद्रजिताची रणव्युत्पत्ती। फावल्या रणीं लावी ख्याती। नाटोपतां पळे मागुती। पुच्छाप्रती तें न चाले ॥ ५२ ॥ सैन्यासभोंवतीं चहूंकडां। पडिला पुच्छाचा पैं वेढा। सरों नये मागां पुढा। वानरें वेढा लाविला ॥ ५३ ॥ मेघाकित इंद्रजितासी। पळोनि जावें मेघापाठीसीं। कपिपुच्छ तळपे आकाशीं। पळावयासी वाट नाहीं ॥ ५४ ॥ इंद्रजित हाणी निर्वाणघात। वानर वर्षे गिरिपर्वत। सैन्यासीं चकचुरी होत। अति आकांत महावीरां ॥ ५५ ॥ बोंब सुटली सैन्याआंत। इंद्रजित मेला किंवा जीत। वानरें केला पर्वतघात। रणीं हुंबत राक्षस ॥ ५६ ॥ वानर न धरवे बळें। जरी धरावा कपटमेळें। कपट निर्दळी लांगूळें। गोळांगुळें लाजविलें ॥ ५७ ॥ कपि नाटोपे शस्त्रघातीं। अस्त्रें शस्त्रें धाकें गळती। रणीं नाकळे मारुती। चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५८ ॥ न चले शस्त्रास्त्रांची शक्ती। मागें न पळवे पुच्छहातीं। पुढें नाटोपे मारुती। चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५९ ॥ चिंताग्रस्त देखोनि त्यातें। हनुमान म्हणे इंद्रजितातें। शिळा शिखरें न हाणीं तूतें। न हाणीं पर्वतें भाक माझी ॥ ६० ॥ इंद्रजित नांवाचा बडिवार। जिहीं बाणीं त्वां जिंतिला इंद्र। तिहीं बाणीं दंडोनि वानर। करीं गजर विजयाचा ॥ ६१ ॥ जया बाणांच्या कडाडीं। देव घातले बांधवडीं। ते बाणीं मज विंधोनि प्रौढी। उभारीं गुढी विजयाची ॥ ६२ ॥ ऐसें बोलतां वानर। इंद्रजित कोपला दुर्धर। निर्वाणशस्त्रांचा विविध मार। महाघोर मांडिला ॥ ६३ ॥

+शराणामग्रतस्तस्य पुनः समभिवर्तत।
प्रसार्य हस्तौ मतिमानुत्पपातानिलात्मजः ॥ १ ॥
परस्परं दुर्विषहौ बभूवतुः समेत्य तौ देवसमानविक्रमौ।
ततस्तु लक्ष्ये प्रविहन्यमाने शरेष्वमोघेषु च संपतत्सु ॥२॥

१ सारखेपणा. २ सोन्याच्या पिसाऱ्याच्या बाणांनीं. ३ त्रासला.

+ अ. ४८।३२, ३४, ३९

रणा पाडिल्या मारुती । मंत्रयुक्ती शरणशक्ती । इंद्रजित विंधी व्युत्पत्ती । कपिप्रयुक्ती ते ऐका ॥ ६४॥ इंद्रजित विंधी मारका शक्ती । हनुमानाचे रणव्युत्पत्ती । रामनामाच्या आवर्ती । निःशंक-स्थिति वानर ॥ ६५ ॥

त्याचेच बाण त्याच्यावर परतविण्याचा मारुतीचा विक्रम—निर्वाणबाण वीर मोकली । हनुमान वरचेवरी झेली । पुच्छें करोनि गटांगुळी । दावी गोळांगुळ[1] वांकुल्या ॥ ६६ ॥ कोपें भडका उठोनि पोटीं । इंद्रजित वर्षे बाणकोटी । हनुमान सावधान दृष्टीं । शरवृष्टी[2] झेलिली ॥ ६७ ॥ कवळोनियां त्याचे बाण । हनुमान गगनीं उसळोन । त्याचेनि बाणें त्यासचि जाण । रणकंदन मांडिलें ॥ ६८ ॥ कपीनें करितां बाणसंपात[2] । इंद्रजित कासावीस होत । सैन्य पडिलें बहुत । जालें विपरीत संग्रामीं ॥ ६९ ॥ हनुमंतेंसीं करितां रण । इंद्रजित भुलला संपूर्ण । आपुलें सैन्य मारी आपण । निर्वाण-बाण वर्षोनी ॥ ७० ॥ धनुष्यबाण कपीपासीं । हे सामुग्री नाहीं त्यासीं । आलीसे भुली इंद्रजितासी । निजसैन्यासी मारित ॥ ७१ ॥ माझे निर्वाणींचे बाण । वानरें कवळोनि संपूर्ण । आमच्या बाणीं आम्हांसीं जाण । रणकंदन मांडिलें ॥ ७२ ॥ माझे सुटलिया शर । भेणें पळती सुरासुर । निःशंक निधडा[3] हा वानर । बाण समग्र झेलिले ॥७३॥ आमचीं शस्त्रें आम्हांवरी । परतलीसे महामारी । आतां राक्षसां कायसी उरी । कपिकेसरी[4] नाटोपे ॥ ७४ ॥ कपिपुच्छाची व्युत्पत्ती । धनुष्य भंगी हातींचे हातीं । रथ उपडितांचि क्षितीं । वारू सारथी निमाले ॥ ७५ ॥ इंद्रजित उडोनि सत्वर । तेणें सांडिला रहंवर[5] । रणीं उठिला हाहाकार । राजकुमार मारिला ॥ ७६ ॥

१ वानर ( मारुती ). २ बाणाची वृष्टी. ३ शूर. ४ वानरश्रेष्ठ. ५ रथ.

रामनामाच्या निजशक्ती । निधडा निःशंक मारुती । इंद्रजितासीं लाविली ख्याती । केला विरथी रणरंगीं ॥ ७७ ॥

सारथी व रथाचा संहार—

बाण मंत्रशक्तियुक्त । रणीं वानरें केले व्यर्थ । मारिला सारथी भंगिला रथ । तेणें धाकत इंद्रजित ॥ ७८ ॥ दिव्य अस्त्रें एकैक । वानरें केलीं निरर्थक । इंद्रजितें घेतला धाक । जीवीं धुकधुक लागली ॥७९॥ न चले शस्त्रांची खटपट । न चले मंत्रास्त्रनेट । न चले कपिपुच्छासीं कपट । रणीं उद्भट गांजिलें ॥ ८० ॥

नंतर उभयतांचें मल्लयुद्ध, इंद्रजित मूर्च्छापन्न—

खुंटली शस्त्रास्त्रांची युक्ती । वानर विचारीत चित्तीं । मल्लविद्येची व्युत्पत्ती । शरीरशक्ती पाहूं याची ॥ ८१ ॥ इंद्रजित पडिला अति संकटीं । तंव वानर झोंबिनला कंठीं । दोघां झाली लटापटी । धिगामस्ती मिसळले ॥ ८२ ॥ उरीं शिरीं आणि कोंपरीं । तडवे हाणिती परस्परीं । कळा लावोनि भुजांतरीं[1] । हाणिती उरीं चपेटघात ॥ ८३ ॥ सदा तूं सेविसी घृतक्षीर । आतुर्बळिया राजकुमार । मी वानर पालेखाईर । मजसमोर राहें पां ॥८४॥ ऐसें बोलोनि हनुमंत । मल्लव्युत्पत्ती हाणी लात । ते जंव चुकवी पिलंगत[2] । तंव ठोकित तळवेनी ॥८५॥ तो जंव चुकावी आघात । तंव तळपोनियां हनुमंत । उरीं शिरीं ललाटीं घात । स्वयें हाणित अनुबंधें[3] ॥ ८६ ॥ करितां मल्लविद्याभार । रणीं गांजिला निशाचर । भवंडोनिया सांडी चक्राकार । जीवें वानर न मारीच ॥८७॥ इंद्रजित रुधिर वमून । रणीं पडिला मूर्च्छापन्न । त्यासी न मारीच आपण । श्रीलक्ष्मण यासी हंता ॥ ८८ ॥ भूतळीं समस्त ऋषीश्वर । गगनीं सुरनर किन्नर । अवघे करिती जयजयकार । विजयी वानर श्रीरामें ॥ ८९ ॥ रणीं

१ काखेत. २ पुढें सरसावून. ३ आवेशानें.

इंद्रजित मूर्च्छापन्न । स्वयें होवोनि सावधान । अतिशयेंसीं लज्जायमान । अति उद्विग्न इंद्रजित ॥ ९० ॥

इंद्रजिताचा उद्वेग व भीति–हनुमंताची धैर्यवृत्ती । हनुमंताची शौर्यशक्ती । हनुमंताची संग्रामगती । अतर्क्य स्थिति तर्कवेना ॥ ९१ ॥ रणीं इंद्रातें जिंकोन । पावलों इंद्रजित अभिधान[1] । वानरेंसीं करितां रण । तृणासमान मज केलें ॥ ९२ ॥ मी एक गाढा वीर सृष्टीं । ऐसा फुगारा होता पोटीं । कपिपुच्छें पुरवोनि पाठीं । तृणासाठीं मज केलें ॥ ९३ ॥ जळो माझी वीर्यवृत्ती । जळो माझी शौर्यशक्ती । रणीं नाटोपे मारुती । कीर्ति अपकीर्ति मज माझी ॥ ९४ ॥ कोणी एखादी युक्ती । न चले वानरासीं निग्रहार्थीं[2] । जळो माझी यश कीर्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ९५ ॥ माझ्या वरदाची वरदोक्ती । मारूं न शके मज मारुती । धरोनि नेलिया रामाप्रती । विटंबिती वानर ॥९६॥ रावणें आणिलें सीतेसी । बदला मज नेईल रामापासीं । तेथें करितां अपमानासीं । वानरांसीं कोण वारी ॥ ९७ ॥ रावण होवोनि भिकारी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । वानरें करोनि जुंझारी । मज निर्धारीं नेईल ॥९८॥ पूर्वी अंगद पाळण्यासीं । खेळणें बांधिलें रावणासीं । पौलस्तीनें मागतां त्यासी । अपमानेंसीं सोडिलें ॥ ९९ ॥ मुंडोनियां खांडमिशी । मसी लावोनि दशमुखांसी । पांच पाट काढोनि शिरांसी । ऐसा लंकेसीं शृंगारिला ॥१०० पडतां लंकेचे चौबारां[3] । हुरो[4] लाविला दशशिरा । कोण आंवरी लहानथोरां । लंकेश्वरा अति लाज । ॥ १ ॥ मज धरोनि नेल्यापाठीं । माझीही होईल ऐशीच गोष्टी । वानर नाटोपे जगजेठी । पुच्छें पाठी पुरविली ॥ २ ॥ पुच्छीं बांधोनि तत्त्वतां । मज हनुमंतें धरोनि नेतां । धांवण्या कोणी न ये सर्वथा । परम चिंता इंद्रजिता ॥ ३ ॥ अखयाच्या कैवारासीं । कोणा न येववे वानरापासीं । मज बांधोनि नेतां पुच्छीं । धाकें धांवण्यासी कोणी न ये ॥ ४ ॥

इंद्रजिताचें बिळांत अंतर्धान–ऐसा धाक घेवोनि पोटीं । रणीं वानरा देवोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठीं । पुच्छासाठीं धाकोनी ॥ ५ ॥ पळतां न पळवे पुढें । पडिलें पुच्छाचें बिरडें । तेथिले विवरामाजी दडे । बहु माकडें गांजिलें ॥ ६ ॥ दुस्तर धाक घेवोनि मनीं । गुप्त विवर अशोकवनीं । इंद्रजित तेथें गेला पळोनी । अति दडोनी राहिला ॥ ७ ॥

पुच्छानें केलेला सैन्यसंहार व सर्वत्र हाहाःकार–लागों न ये पळल्यापाठीं । हे तंव स्वधर्मयुद्धगोष्टी । इंद्रजिता मारणें नाहीं पोटीं । यालागीं पाठीं न लागेचि ॥८॥ पुच्छ म्हणे गा कपिनाथा । कोंडोनि राखिलें सैन्या समस्ता । तू भागलासी इंद्रजित दमितां । मज युद्धार्था दे आज्ञा ॥ ९ ॥ हनुमान म्हणे तुझेनि बळें । म्यां महावीर मारिले खळ । आतां निर्दाळूं हें दळ । रणकल्लोळ विचारूनी ॥ ११० ॥ मी जातें तूं घालीं वैरण । ऐसें भरडूं राक्षससैन्य । डोळ जे उरती सघन[1] । रणकंदन करूं यांसी ॥ ११ ॥ करावया सैन्यसंहार । कपि पुच्छासीं करोनि विचार । मग दिधला भुभुःकार । राक्षसभार खवळला ॥ १२ ॥

+अश्वैरश्वान्गजैर्नागान्योधैर्योधान्रथै रथान् ।
लाङ्गूलेनाहनत्काश्चिद्रवाजिखरोष्ट्रकान् ॥ ३ ॥

येतां देखोनि हनुमंत । राक्षसवीर समस्त । होवोनियां एकभूत । शस्त्रें वर्षत समकाळ ॥ १३ ॥ बाणीं खिळिलें पृथ्वीसी । शस्त्रें न समाती आकाशीं । शस्त्रीं बुजिलें हनुमंतासी । वीरीं राक्षसीं गर्जोनी

१ नांव. २ बाधण्यासाठीं. ३ चवाठ्यामध्यें. ४ हुऱ्यो, फजिती.

१ मोठमोठे.

+ अ. ४६।३७.

॥१४॥ हनुमान युद्धीं निगरघट[1]। राक्षस हाणिती भट सुभट। हाणितां शस्त्रें होती पीठ। अहा कटकट[2] राक्षसां ॥ १५ ॥ हनुमंत निधडा वीर। साहोनि त्याचा शस्त्रसंभार। करावया सर्व संहार। रणीं वानर खवळला ॥ १६ ॥ अश्वीं अश्वातें मारित। गजीं गजां संहारित। रथीं रथांतें उपटित। वारुनि मत्त* सारथींसी ॥१७॥ पायींचा पायीं रगडित। वीरें वीर पैं झोडित। ध्वज शस्त्रें छत्रें मोडित। रणीं पाडित† महामारें ॥ १८ ॥ हनुमान युद्ध करी भिन्न। पुच्छें करी भिन्न कंदन। तेंही ऐका सावधान। रणमर्दन पुच्छाचें ॥ १९ ॥ शायशीं प्रयुतें मत्त हस्ती। पुच्छें उपटोनि‡ मारुती। हस्तींच्या पिष्ट केल्या अस्थी। रणसमाप्ती गजदळा ॥ १२० ॥ विदारितां कुंभस्थळा। विखरा[3] होय गजमुक्ताफळां। त्याचि रणरंगीं रंगमाळा। अति सोहळा युद्धाचा ॥२१॥ पुच्छ रिघोनि सैन्यातळीं। महावीरां बांधोनि मोळी। उपडी§ त्यांसी भूतळीं। करी रांगोळी तळिल्याची[4] ॥ २२ ॥ अश्वतर[5] खर[6] उष्ट्र[7]। पुच्छीं बांधोनि अपार। तळीं उभे अश्वसंभार। घायीं चकचूर करी त्यांचा ॥ २३ ॥ कपिपुच्छाचा महामार। रणीं उठिला हाहाकार। येरीकडे हनुमान वीर। करी रणमार तो ऐका ॥२४॥

+तलेनाभ्यवधीत्काश्चित्पद्भ्यां काश्चित्परंतप।
मुष्टिभ्यामवधीत्कांश्चिन्नखैः कांश्चिद्व्यदारयत् ॥ ४ ॥
प्रममाथोरसा कांश्चिदूरुभ्यामितरान्कपिः।
केचित्तस्यैव नादेन तत्रैव पतिता भुवि ॥ ५ ॥

१ घटावलेला. २ हायहाय. ३ पसारा. ४ खालीं पडलेल्याची. ५ खेचरें. ६ गाढव. ७ उंट.

* क्ष—मित. † ब—पडित. ‡ ड—गुडोनि. § ड—उपटिता, क्ष—उत्पाटिता.

\+ अ. ४५।१२,१३,१५.

विनेदुर्विस्वरान्नादान्निपेतुर्भुवि वाजिनः।
भग्ननीडध्वजच्छत्रो भुवि कीर्णोऽभवद्रथः ॥ ६ ॥
स कपिर्नाशयामास राक्षसान्बलदर्पितान् ॥ ७ ॥

रागें हाणितां थापडीं। वीर मारीत लक्षकोडी। कोटयनुकोटी पायीं रगडी। मुष्टिपडिपाडीं असंख्य ॥ २५ ॥ बहुत चिरकाळी नखाग्रीं। एकें मारिलीं जानुचक्रीं। जानुत्रा[1]* अपाना बहुतां मारी। अर्धचंद्रीं[2] पैं एकें ॥ २६ ॥ आंवळोनि उरावरी। वीर मारीत शतसहस्रीं। तडवे हाणोनि उपराउपरी। लक्षांतरीं मारित ॥ २७ ॥ देता भुभुःकार प्रबळ। रणीं उठिला हलकल्लोळ। भेणेंकरोनि मूत्रमळ। प्राण तत्काळ सांडिला ॥ २८ ॥ हनुमंताचे गिरागजरें। आक्रंदोनि वाजिकुंजरें। रणीं निमालीं अपारें। लक्षांतरें वीरश्रेणी ॥ २९ ॥ भोंवता पुच्छाचा आवर्त[3]। मध्यें मारितो हनुमंत। जाला सैन्याचा अंत। आला प्राणांत राक्षसां ॥ १३० ॥ पुच्छें पुरविलीसे पाठी। होवों नेदी कुटुंबभेटी। लंका पाहूं नेदी दृष्टी। जीवासाठीं राक्षसां ॥३१॥ रणीं महामारी हनुमंत। पुच्छ पळों नेदी नगरांत। जो तो लपे प्रेताआंत। मिथ्या मूर्च्छित वीरश्रेणी ॥ ३२ ॥ एक घायें घाबरलीं वेडीं। एक नागवीं उघडीं। एक पडिलीं उपडीं। मेलीं मढीं होवोनि ठेलीं ॥३३॥ झाडिला इंद्रजिताचा पाडाव[4]। केला सैन्याचा नितोडा[5]। रामनामें हनुमान गाढा। केला झगडा निजनेटें ॥ ३४ ॥ युद्ध झालें अति कर्कशीं। रणीं निर्दळिलें समस्तांसी। हाव[6] न बाणे हनुमतासीं। राक्षसासी मारित ॥३५॥ रथ भंगिले कोटयनुकोटी। मारिल्या अश्वगजांच्या थाटी। छत्रें भंगिलीं तीं सृष्टीं। ध्वजा कोटी विखरल्या ॥३६॥ अशुद्ध वाहत गडगडाटीं। तेचि रणनदी गाढी

१ गुडघे. २ गचांडीनें. ३ वेढा. ४ गर्व. ५ नाश ६ वीरश्री.

* ब—जान्वापाना; ड,क्ष—जानापानें.

जालिया प्रेतांच्या दरडी। गजकरवडी महाग्राह ॥ ३७ ॥ तीर वाहती सपिच्छीं। तेचि मासे रणनदीसीं। वोडणें वाहती कासवें जैसीं। सर्प सपुच्छी रणभाले ॥ ३८ ॥ मेद मांस अति दुर्गम। तेचि दोहीं तीरींचा कर्दम। विक्राळ शिसाळें विक्रम। सुसरी परम दोहीं भागीं ॥ ३९ ॥ मोक्ष-सुखाची सुरवाडी[१]। रणनदी वाहे पूराडीं[२]। सर्वस्वत्यागें जो घाली उडी। त्याचिये जोडी तो जोडे ॥ १४० ॥ ध्वजेंसीं वाहे रहंवरू[३]। तेंचि शिडेंसहित तारूं। येथें तारक श्रीरामचंद्रू। परपारू पाववी ॥ ४१ ॥

भूतादि शाखिणी डाखिनी देवतांस आनंद-उद्दो म्हणोनि भद्रकाळी। घेवोनि आली भूतावळी। खाती मांसाच्या वडवाळी[४]। रुधिरांजुळी प्राशिती ॥ ४२ ॥ यक्षिणी† बहुकाळाच्या वृत्ती। लाखोली काळिजें घेवोनि हातीं। शंखिणी डाकिनी वानें देती। मग भक्षिती स्वानंदें ॥ ४३ ॥ आनंदें नाचे क्षेत्रपाळ। शिरें चौंडकें‡ वाहे वेताळ। भूतें मिळोनियां सकळ। रणगोंधळ नाचती ॥ ४४ ॥ बहुतां दिवसांचें धरणें। दिधलें हनुमंतें पारणें। अवघे घालिती लोटांगणें। विजयी होणें रणरंगीं ॥ ४५ ॥ पीक पिकलें रणचत्वरी[५]¶। राक्षस-दांतांच्या राशी थोरी। भूतें मोविती[६] कुडवेंकरी*। कौलकरी[७] हनुमंत ॥ ४६ ॥ देव ब्राह्मण भैरवासी। बलुतें[८] देती वेताळासी। खळेंदान तें भूतासी। महाकाळीसी राजभाग ॥ ४७ ॥ खळमातेरें मारकोसी। मेसको तिचे घरची दासी। वेसी पेंढी ते सटवाईसी। पाळभारियासीं काळिका ॥ ४८ ॥

१ सुखानें. २ प्रवाहानें. ३ रथ ४ ग्रास. ५ रणांगणात. ६ मोजतात. ७ कौल देणारा. ८ देणगी.

† क्ष–येचि क्षणीं. ‡ ड–शिरें चहूंकडे वाहि. ¶ डक्ष–नागरी. * क्ष–कडोकरी.

अग्रिम[१]† पिकाची व्युत्पत्ती। विभागिली स्वयें मारुती। पश्चिम धान्याची महाख्याती। श्रीरघुपति विभागील ॥ ४९ ॥

तें वर्णन ऐकून कपि सैन्यांत हर्ष–कुडवें दांत मेविजेती‡। ऐसी हनुमंतें केली ख्याती। हर्षानंदें कपि गर्जती। स्वयें उपरमती आल्हादें ॥ १५० ॥ आमुचा हनुमान आतुर्बळी। रणीं राक्षसां केली रांगोळी। वानरीं पिटोनियां टाळी। सुखसमेळीं नाचती ॥ ५१ ॥ सुग्रीव राजा तये वेळीं। आणोनियां द्रव्यांजुळी। हनुमंतावरी ओंवाळी। हृदयकमळीं आलिंगी ॥ ५२ ॥ तूं विसांवा कपि-कुळासी। सुखी केलें श्रीरामासी। वांचविलें वानरांसी। यश आम्हांसी तुझेनि ॥ ५३ ॥ स्फुरण आलें अंगदासी। खांदीं घेवोनि हनुमतासी। हरिखें नाचता चौपासीं। कळिकाळासी विटावी§ ॥५४॥ धरिल्या हनुमंताचे चरण। कळिकाळ बापुडें तें कोण। करोनि हनुमंताचें स्मरण। मरणा मारीन मी आतां ॥ ५५ ॥

श्रीरामास आनंद व विस्मय; मारुतीला आलिंगन—

हनुमंताचें अगाध चरित्र। ऐकोनिया ब्रह्मलिखित। श्रीराम होवोनि विस्मित। आलिंगीत हनुमंता ॥५६॥ परमामृतें अभिषिंचन। नेत्रद्वारा रघुनंदन। हनुमंतासी करी आपण। स्वर्गीं सुरगण विस्मित ॥ ५७ ॥ कृपा करील रघुनंदन। हनुमंताचें भाग्य गहन। स्वमुखें वानी त्रिनयन। भेरी निशाण लावोनी ॥ ५८ ॥ आलिंगिता हनुमंता। राम विसरे श्रीरामता। कपि विसरे वानरता। एकात्मता आल्हाद ॥ ५९ ॥ सांडोनियां मीतूंपण। देवां भक्तां आलिंगन। खुंटला बोल तुटलें मौन। सुखसंपन्न श्रीरामें ॥ १६० ॥ निबिड आणि नित्य निघोट[२]। सुख कोंदलें घनदाट। नाहीं आदि

१ पहिल्या पिकाची. २ दृढ.

† क्ष–अग्रय;ब–अगप. ‡ ड–मोजवीती. § विटायेवे.

मध्य शेवट । न चले वाट वेदवादा ॥ ६१ ॥ जेथें मौनावल्या श्रुती । तेथें पावला मारुती । सार्थक हनुमंताची भक्ती । पावन कीर्ति तिहीं लोकीं ॥ ६२ ॥ स्वयें सुखावे रघुनंदन । ऐसें हनुमंताचें भजन । पायां लागे ब्रह्मज्ञान । एका जनार्दना उपदेश ॥ ६३ ॥ नित्य श्रीरामस्मरण । नित्य श्रीरामनामभजन । एका जनार्दना शरण । ब्रह्मज्ञान हरिभजनीं ॥ १६४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितइंद्रजित-अपमानहनुमंतपराक्रमवर्णनं नाम एकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ओंव्या ॥ ॥ १६४ ॥ श्लोक ॥ ॥ ७ ॥ एवं ॥ १७१ ॥

## अध्याय ३२ वा

लक्ष्मण पुढील वर्णन वाचतो—श्रीहनूमते नमः ॥ श्रीराम होवोनि सावचित । लक्ष्मणासी स्वयें सांगत । पुढारां वाचीं ब्रह्मलिखित । अनुचरित[१] कपीचें ॥ १ ॥ राक्षसदांताचिया रासी । पाडोनि केलिया रणभूमीसीं । पुढें काय केलें लंकेसीं । तें मजपासीं परिसवीं[२] ॥ २ ॥ ऐकोनि श्रीरामाची गोष्टी । सुग्रीवासी आल्हाद पोटीं । हर्षल्या वानरांच्या कोटी । कथाकसवटी ऐकावया ॥ ३ ॥ वानरांच्या निजकोडी । सभा बैसली परवडी । हनुमंताची प्रतापप्रौढी । अति आवडीं ऐकावया ॥ ४ ॥ हनुमंताची प्रतापकीर्ती । वाचितां लक्ष्मणा परम प्रीती । अनुलक्षोनि श्रीराममूर्ती । पत्र प्रयुक्ती वाचित ॥ ५ ॥

इंद्रजिताचा पाडाव केल्यावर पुच्छ आवरून हनुमान बसला—झाडोनि इंद्रजिताचा पाडाडा[३]*। करोनि सैन्याचा नितोडा[४] । काढोनि कपिपुच्छाचा वेढा । हनुमान गाढा बैसला ॥६॥ पुढती करावया रण । कोण कोण धाडी रावण । त्यांचें करावया निर्दळण सावधान बैसला ॥ ७ ॥

उर्वरित सैन्य रावणाकडे सर्व वृत्तान्त सांगतात—गेला देखोनि हनुमंत । मीस[१] करून वीर समस्त । आंगिक घायाळ कुंथत । नगराआंत निघाले ॥ ८ ॥ वीरीं घेतलें घायवारें[१] । रावणाचे सभे-माझारें । म्हणती पळा रे पळा रे । रणीं वानरें मारिजेल ॥ ९ ॥ रावण बापुडें तें किती । युद्धीं नाटोपे मारुती । सेनानी[२] सैन्य नेलें भस्मांतीं । करील शांति लंकेची ॥ १० ॥ समस्त सैन्या केली बोहरी[३] । बोंब सुटली घरोघरीं । कळकळती नगर-नारी । लंकापुरी आकांत ॥ ११ ॥ समरीं† रावणाची थोरी । चोरोनियां परनारी । केली राक्षसांची बोहरी । महामारी वानरें ॥१२॥ रणीं‡ रावण मरता । लंकालोक स्वस्थ होता । करविलें इंद्रजिताच्या घाता । रणीं हनुमता खवळोनी॥१३॥ करितां अखयाचा कैवार । रणीं मारविला ज्येष्ठ कुमर । बोंब करितां निशाचर[४] । दशवक्त्र हड-बडिला ॥ १४ ॥

इंद्रजिताचाहि ठाव नसल्यानें त्याजविषयीं कुशंका—इंद्रजित मेला किंवा जीत[५] । कोणी न सांगती मात । तेणें गजबजिला लंकानाथ । केला रणघात वानरें ॥ १५ ॥ इंद्रजित मारिला रणीं । तरीच मारिल्या वीरश्रेणी । तो जरी असता सावधानी । कपि कैसेनि मारिता ॥ १६ ॥ शोधूं जावें जरी रणासीं । राक्षस भिती कपिपुच्छासी । भूतीं भक्षिलें प्रेतांसी । तेथें कायसी ओळखी ॥ १७ ॥

रावणाचा शोक व ब्रह्मदेवास पाचारण—रणीं निमाला ज्येष्ठ सुत । रावण मुखीं धूळ घालित । दाही

१ वर्तन. २ ऐकीव. ३ गर्व ४ नाश.

* क्ष—पादोडा, ड—पवाडा.

१ शस्त्रप्रहाराचें भय. २ सेनापती. ३ नाश. ४ राक्षस. ५ जीवत.

† क्ष—निशंक. ‡ ड—जळो, क्ष—सिमुरी. § ड— +जरी

मुखीं शंख करीत । आक्रंदत अति दुःखें ।। १८ ।। दुःखें गडबडा लोळे । केश सुटले मोकळे । अश्रु स्रवती विंशती[1] डोळे । पिटी कपाळें अति दुःखें ।। १९ ।। इंद्रजिताचा केला घात । रणीं नाटोपे हनुमंत । वानरीं न चले पुरुषार्थ । लंकानाथ अति दुःखी ।। २० ।। ब्रह्मयाने सांगितलें मजपासीं । गळां बांधोनि वानरासी । इंद्रजित आणील तुजपासीं । असत्य त्यासी केंवी आलें ।।२१।। पाचारोनि चतुराननं । त्यासी पुसे दशानन । इंद्रजित आणील कपि बांधोन । तें तूं वचन करीं सत्य ।। २२ ।।

व त्याचें वचन सत्य करण्याचा आग्रह; ब्रह्मदेवाचें उत्तर–आम्ही तव तुझी संतती । तुझेनि वरदें दादुगे क्षितीं[2] । मज भेटवीं पुत्रसंतती चरण तदर्थीं[3] वंदिले ।। २३ ।। इंद्रजिताच्या निजवृत्तांता । तुझेनि नाणवे गा दूता । करितो कपि राक्षसघाता । त्यासी सर्वथा न वंचवे ।। २४ ।। मीच जावोनि अशोकवना । इंद्रजिताची विवंचना[4] समूळ जाणोनियां मना । मग दशानना सांगेन ।। २५ ।। इंद्रजित मेला किंवा जित । ग्लानीं¶ पुसे लंकानाथ । वानरें गांजिला अत्यद्‌भुत । आहे तो गुप्त म्हणे ब्रह्मा ।। २६ ।।

ब्रह्मदेव मारुतीला भेटून ब्रह्मपाशीं बांधून घेण्याचें मागतो–ऐसें सांगोनि लंकापती । वना आला प्रजापती । ब्रह्मा देखोनि मारुतीं । घातलें क्षितीं लोटांगण ।। २७ ।। कपि पुसे ब्रह्मयाप्रती । ऐसी आवडी आहे चित्तीं तुकोनि रावणाची शक्ती । करावी ख्याती लंकेसीं ।। २८ ।। ब्रह्मा स्वयें सांगे आपण । श्रीरामु मारील रावण । इंद्रजितासी मारील लक्ष्मण । येरांचें कंदन तूं करीं ।। २९ ।। ब्रह्मा सांगे हनुमंतासी । इंद्रजित तुझेनि भयेंसीं । लपालासे विवरप्रदेशीं । मी त्यापासीं जातसें ।। ३० ।।

१ वीस. २ पृथ्वीवर. ३ त्यासाठीं. ४ शोध.

¶क्ष–म्लानमुखें, बक–ग्लानी, ड–ग्लानिय.

राक्षसाच्या हातून केव्हांहि बांधून घेणार नाहीं असें मारुतीचें स्पष्ट उत्तर–इंद्रजिताचे करसंपुटीं । ब्रह्मपाश मानोनि[†] कंठीं[‡] । यावें रावणाचे भेटी । लंकात्रिकूटीं कंदनार्थ ।। ३१ ।। कपि म्हणे इंद्रजिताचे हातें । सर्वथा न मानीं पाशबंधातें । ब्रह्मदेवा तुझेनि हातें । ब्रह्मबंधातें मानीन ।। ३२ ।।

इंद्रजिताला स्वतः व रावणाविषयीं चिंता–ब्रह्मा म्हणे ऐसेंचि घडे । माझेनि हातें बांडेंकोडें हनुमंत पाशबंधनीं पडे । रावणापुढें न्यावया ।। ३३ ।। रणीं वानरा देखोनि पाठी । पळतां¶ विवरा संकटीं । इंद्रजितासी चिंता मोठी । लागली पोटीं धुकधुक ।। ३४ ।। रणीं गांजिलें माकडें । काय मुख दावूं रावणापुढें । इंद्रजित खळखळां रडे । अति सांकडें[1] ओढवलें[2] ।। ३५ ।। रणीं मज येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । वांचल्याचें फळ कोण । काळें वदन तिहीं लोकीं ।।३६।। इंद्रजित नांवाची हे ख्याती । तिहीं लोकीं माझी कीर्ती । कीर्ति तेचि झाली अपकीर्ती । रणीं मारुति नाटोपे ।। ३७ ।। कपि केवळ पालेखाइर । आम्ही निधडे महावीर । रणीं न जिंकवे वानर लज्जा थोर मज माझी ।। ३८ ।।

ब्रह्मदेवाचें स्मरण व आगमन–काळें वदन लज्जावृत्तीं* । मरण न ये मज वरदोक्ती । इंद्रजित पडतां चिंतावर्ती । तंव ब्रह्मोक्ती आठवली ।।३९।। गळां बांधोनि मारुती । इंद्रजित आणील लंकेप्रती । स्वमुखें बोलिला प्रजापती । तो मज [3]प्रत्यय§ आवा कीं ।। ४० ।। पाचारावया चतुरानन[4] । रणीं तुरेचि सेवकजन । माझा वांचलासे प्राण । विवरीं दडोन राहिलों ।। ४१ ।। धाडावया नाहीं सेवकजन । बाहेर निघतां आपण । रोकडें कपिपुच्छें मरण । करी रुदन इंद्रजित ।। ४२ ।।

१ संकट. २ आलें. ३ अनुभव. ४ ब्रह्मदेव.

†ड–बांधोनि. ‡ क्ष–कटि. ¶लपता. * ब–वर्ती. § ब–मती.

इंद्रजित-ब्रह्मदेव संवाद—माझे पित्याच्या पित्याचा पिता। कैसेनि भेटेल विधाता[१]। ऐसी इंद्रजित करी चिंता। तंव आला अवचितां परमेष्ठी[१] ॥४३॥ डोळां देखताच परमेष्ठी। इंद्रजित धीर धरी पोटीं। समूळ सांगे युद्धगोष्ठी। केलें कष्टी वानरें ॥४४॥

+ततः पैतामहं वीरः पार्थं शस्त्रविदां वरः।
संदधे स* महातेजास्तं हरिप्रवरं प्रति ॥ १ ॥
अवध्योऽयमिति ज्ञात्वा तमस्त्रेणास्त्रतत्त्ववित्।
अवध्य सर्वभूताना तदस्त्र न बबध§ तम् ॥२॥

रणीं गांजिलों मारुती। तो बांधवे+ माझे हातीं। ऐसी स्वामीची पूर्वोक्ती। कृपामूर्ति सत्य कीजे ॥ ४५ ॥ असत्य नव्हे ब्रह्मवचन। नारदें सांगितलें आपण। कपीसी ब्रह्मपाशबंधन। कृपा करोन मज द्यावें ॥ ४६ ॥

इंद्रजितानें टाकलेला पाश मारुती झुगारतो—मज दिधल्या पाशबंधन। तेव्हां रणरंगीं गर्जोन। ब्रह्म-पाशीं कपि बांधोन। मग श्लाघेन वाढिवा[२] ॥४७॥ विरिंचि देतां पाशबंधन। इंद्रजित मोकली कपि लक्षोन। वानरासी ब्रह्मपाशबंधन। सर्वथा जाण बांधीना ॥ ४८ ॥× हनुमंतासि निंबलोण। करूनि गेले पाशबंधन। करीं गर्जोनि बंधन। पाशबंधन बाधिना ॥ ४९ ॥

इंद्रजिताचा खेद व ब्रह्मदेवावर दोषारोप—हरिवरदान हरवरदान। बांधूं न शके ब्रह्मबंधन। पाश गेले पैं तुटोन। निर्बंधन मारुति॥५०॥ ब्रह्मपाशाचिया¶ अनुवृत्तीं[३]। रणीं खवळला मारुती। मरण मज असेल पुढती। इंद्रजिताचे चित्तीं चळकांप ॥५१॥

+अहो महत्कर्म कृत निरर्थकं न राक्षसैर्मन्त्रगतिर्विमृष्टा।
पुनश्च नास्त्रे विहतेऽस्त्रमन्यत्प्रवर्तते संशयिताः स्म सर्वे ॥ ३ ॥
अत्र तद्विदश्च दृष्ट्वा सजगई पितामहम्।
अथागतस्ततो ब्रह्मा मारुतात्मजमब्रवीत् ॥ ४ ॥

इंद्रजितें ब्रह्मपाश घालितां। ते न लगती हनुमंता। माझा रणधर्म गेला वृथा। जघन्यता[१] मज आली ॥५२॥ माझी अस्त्रशक्ती शस्त्रशक्ती। ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती। अवघी वृथा केली मारुतीं। राक्षसपंक्ती केंवी चाले ॥ ५३ ॥ ब्रह्मपाश वृथा जाय। आणीक अस्त्रें करिती काय। वानरीं न चालती उपाय। आला अपाय[२] राक्षसां ॥ ५४ ॥ ब्रह्मयानें दिधली खोटी शक्ती। यालागीं न धरवे मारुती। इंद्रजित कोपला ब्रह्मयाप्रती। तुझी दुष्ट-मति आम्हांवरी ॥ ५५ ॥

ब्रह्मदेवाचा इंद्रजितावर दोषारोप—रावणें विभागिलें वेदांसी। त्याचा राग तुझे मानसीं। निर्दाळावया राक्षसांसी। बुद्धि सांगसी हनुमंता ॥ ५६ ॥ तूं आमुची मूळमूर्ती[३]। आम्ही तुझी ब्रह्मसंतती। आम्हांसी देवोनि खोटी शक्ती। कपिहातीं मार-विसी ॥ ५७ ॥ ब्रह्मा म्हणे तूं [४]विकल्पमूर्ती। ब्रह्मद्वेषी ब्रह्मघाती। तुझीं† नासले ब्रह्मशक्ती। कैंवी मारुति बांधवे ॥ ५८ ॥ ब्रह्मानुवादाचें उत्तर। गळां बांधोनि वानर। इंद्रजित आणील महावीर तें साचार करीं वाक्य ॥ ५९ ॥

स्वतः जाऊन मारुतीस विनवून पाशबद्ध करितो—ब्रह्मा म्हणे इंद्रजिताप्रती। माझे पाश दे मज हातीं। गळां बांधोन देईन मारुती। लंकेप्रती न्यावया ॥ ६० ॥ इंद्रजित म्हणे ब्रह्मयासी। म्यां मोकलिलें ब्रह्मपाशासी। हनुमंतें बांधोनि राखिलें पुच्छीं।

---

१ ब्रह्मदेव. २ पराक्रमानें. ३ योगानें.

* ब–स. §ब–न च बंधनम्। +ड–न. ×डपाठ. ¶ब–ब्रह्मपाशाची अनुवर्ती.

+ अ. ४८।३७,३८.

१ नीचपणा. २ नाश. ३ मूळपुरुष. ४ संशयखोर.

† ब–तुम्हां. + ४८।५१.

म्यां तुम्हांसी काय द्यावें ॥ ६१ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें वचन । ब्रह्मा जाला हास्यवदन । कपीस ब्रह्मपाशबंधन । केलें निदान तें ऐका ॥ ६२ ॥

नानृतं मद्वचः कार्यं गृह्यणास्त्रं हि वानर ।
एवमुक्तस्तथा चोक्त्वा बद्ध कपिवरात्मज. ॥ ५ ॥
अभिवाद्य विचेष्टः सन्पपात धरणीतले ॥ ६ ॥

ब्रह्मा सांगे गा हनुमंता । तुज न लागे पाशबंधता । माझ्या सत्यवचनार्था[1] । ब्रह्मपाशता मानावी ॥ ६३ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । तुझेनि बोलें देईन प्राण । पाशबंधन तें किती ॥ ६४ ॥

तें पाहून राक्षसांना आनंद व मारुतीवर सर्वांचे आघात—ऐसें बोलोनि हनुमंत । पाशबंधनीं पडे मूर्च्छागत । धरणीवरी निश्चेष्टित । धुकधुकीत भयभीत ॥ ६५ ॥ ब्रह्मपाशीं हनुमंत । पडिला देखोनि निचेष्टित । परी तो बंधमोक्षातीत[2] । नित्य निर्मुक्त श्रीरामें ॥६६॥ जैंवी रवि थिल्लरांत[3] । मूर्ख मानिती थिल्लरस्थ । तैंवी कपि ब्रह्मपाशांत । बांधिला हनुमंत राक्षसीं ॥ ६७ ॥ हनुमान बांधिला ब्रह्मपाशांत । विजयी वीर इंद्रजित । निशाणें[4] वाहाटिलीं[5] लंकेआंत । लंकानाथ आल्हादे ॥६८॥ ब्रह्मयानें बांधिला हनुमंत । परी ब्रह्मबंधासी अतीत । देखोनि धाके इंद्रजित । करील अनर्थ लंकेसी ॥ ६९ ॥

+अथ त राक्षसो दृष्ट्वा निर्विचेष्टमरिंदमम् ।
बबंध रज्जुपाशैश्च द्रुमचीरैश्च मारुतिम् ॥ ७ ॥
कृष्यमाणश्च रक्षोभिस्तैः स्वबंधे प्रतिष्ठितः ।
हन्यमानस्तथा क्रूरैः राक्षसैः काष्ठमुष्टिभिः ॥ ८ ॥

[6]क्षितितळीं निचेष्टित । पडिला देखोनि हनुमंत । राक्षस धांवोनि समस्त । त्यासीं बांधीत वेलवाखीं[1] ॥ ७० ॥ एक बांधिती चऱ्हाटें । साली बांधिती वृक्षफाटे । देखोनि हांसिजे मर्कटें । बंधन खोटें मजलागीं ॥ ७१ ॥ जो न बांधवे ब्रह्मपाशीं । तो कैंवी बांधवे चऱ्हाटेंसी । बंधनमिसें जातो लंकेसी । रावणासी गांजावया ॥७२॥ आम्हांसी गांजिले अशोकवनीं । रावणा गांजील लंकाभुवनीं । परम चिंता इंद्रजिताचे मनीं । अपेश जनीं मज आलें ॥ ७३ ॥ इंद्रजितें हनुमंत । बांधोनि आणिला लंकेआंत । हे अवधीच मिथ्या मात । जातो अनर्थ करावया ॥ ७४ ॥ जें ब्रह्मयानें सांगितलें कानीं । तेंचि हनुमंतें धरोनि मनीं । प्रवेशला लंकाभुवनीं । इंद्रजित मनीं भयभीत ॥ ७५ ॥ वानर पालेखाइर । त्याचा इंद्रजितासी धाक थोर । आम्ही निधडे निशाचर । क्षणें कपींद्र मारूं[¶] या ॥ ७६ ॥

हनुमंताचे पुढील कार्याविषयीं विचार—म्हणोनि बांधिती रज्जुबंधनी । एक बांधिती वाख वळोनी । एक बांधिती मुंजी[†] चिरोनी । कपि बांधोनि आणिती ॥७७॥ पूर्वपश्चिमउत्तरेसीं । एक ओढिती दक्षिणेसीं । हनुमाना[‡] करिती कासाविसी । कपि मानसीं हासत ॥ ७८ ॥ राक्षसें केवळ वेडीं । व्यर्थ करिती ओढाओढी । लंका करीन कडाफोडी । पाडीन दरडी दुर्गाच्या ॥ ७९ ॥ मज नेलिया दुर्गाआंत । महावीरां करीन घात । मुख्य गांजीन लंकानाथ । दहनार्थ लंकेसीं ॥ ८० ॥

रावणासमोर नेल्यावर त्याचा क्रोध—कपि बांधिला महाबळी । म्हणोनि राक्षसीं पिटिली टाळी । गुढी आणिली रायाजवळी । सभामंडळीं लंकेच्या ॥८१॥ वज्रदेही हनुमंत । बुकी हाणी तो पडे मूर्च्छित ।

---

१ माझें वचन सत्य व्हावें म्हणून. २ बंधन व मुक्तता यापासून वेगळा. ३ डबक्यांत. ४ रणवाद्यें. ५ वाजविलीं. ६ पृथ्वीवर.

+ अ. ४८।४६, ५२, ५३

१ वेलींनीं व वाकाच्या दोऱ्यांनीं.

¶क्ष—मारोनी. †ड—मुंज. ‡ड—एक ओढिती मध्यासी.

मुसळघायें उखळे हात। वीर मूर्च्छित कपिघातें ॥ ८२ ॥ इंद्रजितासीं समवेत। हनुमान नेतां लंकेआंत। ब्रह्मा स्वमुखें मंत्र जपत। विपरीतार्थे तो ऐका ॥ ८३ ॥ गृह्य वै प्रतिष्ठा हें सूक्त। ब्रह्मा स्वमुखें गडगर्जत। रामराज्य लंकेआंत। हनुमंत-प्रवेशें ॥८४॥ रावणें देखोनि वानरा। दांत खाय करकरां। जिवें मारिलें अखयाकुमरा। यासी करा तिळखंडी† ॥ ८५ ॥ सकळ सैन्य समसगट। शस्त्रें हाणिती कडकडाट। लागतां शस्त्रें होती पीठ। हृदयस्फोट राक्षसा ॥ ८६ ॥

त्यानें केलेला खड्गप्रहार निष्फळ—एकाचे वखळले हात। वीरीं विचकिले पैं दांत। घायां दाटले समस्त। पडिले मूर्च्छित एकेक ॥ ८७ ॥ हनुमान रामनाम जपत। ससैन्य शस्त्रें हताहत। तें देखोनि लंकानाथ। कोपें कृतांत पैं जाहला ॥८८॥ रावणें खड्गा घातला हात। बळें हाणितां हनुमंत। झणाणिला लंकानाथ। शस्त्रें हात लचकला ॥ ८९ ॥

त्यामुळें मारुती त्याची निर्भर्त्सना करितो—घावो हाणितां प्रचंड। दणाणिलें त्याचें ब्रह्मांड। सरलें रावणाचें बळबंड। खालतें तोंड तेणें केलें ॥ ९० ॥ घावो न मानीच हनुमंत। रावण चिंताग्रस्त। हनुमान गदगदां हांसत। व्यर्थ पुरुषार्थ रावणा ॥ ९१ ॥ राक्षसघायांचा[1] समेळ[1]। ढेंकणाऐसी त्याची बुळबुळ। तुझा घावो अति निर्बळ। जैसी पेळ कापसाची ॥ ९२ ॥ सावध केलें लंकानाथा। तुझा मज थोर भ्रम होता। घावो हाणोनि आतां। केला वृथा पुरुषार्थ ॥ ९३ ॥ तुझ्या घायाच्या समेळीं। माझी न तुटे रोमावळी। श्रीरामासीं रणकल्लोळीं। घेसी फळी कैसेनि ॥९४॥ स्वयंवरीं वाहता हरकोदंड[2]। तेव्हां झालें काळें तोंड। तें श्रीरामें केलें दुखंड[3]। युद्ध प्रचंड कैंची त्यासी ॥ ९५ ॥ तुझें शुभ चिन्ह कळलें आतां। स्वयें जालासी भीक मागता। भिकेमाजीही कपटता। श्रीरामकांता चोरिली ॥९६॥ गृहस्थाची जे पत्नी। ती भिक्षुकाची निजजननी। तूं तंव केवळ मातृगमनी। सीतावरणीं उद्यत ॥ ९७ ॥ भिक्षा दे वो म्हणसी माते। शेखीं अभिलाषिसी सीते। महापापी तूं सर्वार्थे। संनिपातें घेतलासी ॥ ९८ ॥

रावणाची चिंता—बाप होणाराची थोरी। राजत्व सांडोनियां दूरी। झोळी घेवोनियां करीं। स्वयें भिकारी जालासी ॥ ९९॥ स्वयें होताचि भिकारी। राजत्वपदवी पळे दूरी। जळो तें वेदभाष्य तुझी थोरी। परनारी चोरिसी ॥ १०० ॥ अवध्यता वानरासी। मारितां न मारवे आम्हांसी। विलोकोनि बोलतां सभेसी। रावणासी अति चिंता ॥ १ ॥ येथें आणितां हनुमंत। आम्हांसी न जोडे पुरुषार्थ। हनुमान माझा करील घात। चळीं कांपत रावण ॥ २ ॥ रावणाचें सिंहासन। तयासमान पुच्छासन। हनुमान बैसला सावधान। दशानन लक्षोनी ॥ ३ ॥ दशमुखेंसीं संमुख। वानर बैसला निःशंक। रावणा लागली धुकधुक। अधोमुख स्वयें जाला ॥ ४ ॥

त्यामुळें त्याच्यापुढे मारुतीच्या चेष्टा व त्याची अवहेलना—इंद्रजितें हनुमंत। धरोनि आणिला लंकेआंत। सत्य जाला ब्रह्मवाक्यार्थ। मज† अपघात ओढवला[1] ॥ ५ ॥ रावणाचे चित्तीं चिंता ऐसी। कळों सरली हनुमंतासी। वानरचेष्टा मांडिल्या त्यासीं। लंकेशासी गांजावया ॥ ६ ॥ रावणसंमुख हनुमंत। बैसोनियां वांकुल्या दावित। कांखा कुशी खाजवीत। पुच्छ लावीत नाकासीं ॥ ७ ॥ पुच्छ लावितांचि नाकीं। केश भरले नासिकीं। रावण

१ राक्षसांचा सारखा मार. २ शिवधनुष्य. ३ दोन तुकडे.

† ब+रे तिलप्राय

१ येऊन ठेपला.

† ड–तुज.

शिंकेवरी शिंकी । दशमुखीं ओकित ॥ ८ ॥ दाढीं नाकीं शिंके थडथडां । होत शेंबुडाचा सडा । सिंहासनीं रोकडा । वानरें गाढा गांजिला ॥ ९ ॥ पुढें शिंकेचे पडतां नेट । बृहती वाजे परपराट§ । वानरचेष्टा अति वरिष्ठ । दशकंठ गांजिला ॥१०॥

रावण त्यास त्याची माहिती विचारितो–राजसन्मान राजाभिमान । वानरें उडविला संपूर्ण । सिंहासनीं दशानन । लज्जायमान बैसला ॥ ११ ॥ वानर न गणी राक्षसांसी । दृष्टी नाणी प्रधानासी । रावणें जाणोनि मानसीं । स्वमुखें कपीसी पूसत ॥ १२ ॥

रे रे वानर को भवानह्मरे त्वत्सूनुर्हताहवे
दूतोहं खरखंडनस्य जगतां कोदंडदीक्षागुरो' ।
मद्दोर्दंडकटोरपाटनपटुः को वा त्रिकूटाचले
को मेरौ क च रावणोद्य गणना कोटिस्तु कीटायते ॥९॥

मारुतीचें उत्तर–रावण हेळसोनि बोले उत्तर । अरे तूं कोण कोणाचें वानर । तैसाचि हेळसोनि बोले कपींद्र । ऐकें साचार रावणा ॥ १३ ॥ एकें म्हणतांचि अरे । सवेंचि दुसरा म्हणे कां रे । तैसेंचि मांडिलें वानरें । निशाचरें हेळसोनी[1] ॥१४॥ मारिले वनकर किंकर । जंबुमाळी प्रधानकुमर । पंच सेनानी मारिले शूर । तो मी वानर हनुमंत ॥ १५ ॥ करोनि वृक्षांचा उपाडा । झाडिला इंद्रजिताचा पादाढा । अखया कुमर मारिला गाढा । तो मी निधडा हनुमंत ॥ १६ ॥ कोणाचा म्हणसी कैंचा कोण । येथें यावया काय कारण । पुशिल्या प्रश्नांचें प्रतिवचन[2] । सावधान अवधारीं ॥ १७ ॥ सुबाहु ताटकानिर्दळण । त्रिशिरा मारिला खर दूषण । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ १८ ॥ कोदंडधारिदीक्षागुरू[1] । सूर्यवंशी श्रीरामचंद्र । त्याचा दूत मी वानरू । तुझा संहारू करूं आलों ॥ १९ ॥ राक्षसराजा मी रावण । तुज वधावया कैंची आंगवण । तरी माझें बळ असाधारण । नाहीं प्रमाण मारावया ॥१२०॥ लागतां बाहूची चपेट । मेरुमांदार होती पीठ । तेथें रावण दशमुख कीट । लंकात्रिकूट तें किती ॥२१॥ रावणाऐसे दशकंठी । रणीं मर्दीन कोटयनुकोटी । तो मी लंकेची त्रिकूटी । वामभुष्टीं मर्दीन ॥२२॥ म्हणसी तुजसवें वानर । असती पाठीराखे अपार । मी एकांगवीर[2] । पुरे दशशिर दंडावया ॥ २३ ॥

एकोहं पवनात्मजो दशमुखस्त्वं चापि कोटीश्वर-
स्त्वां जित्वा समरे प्रभु. प्रणयवान्सीतां च नेतु क्षमः।
किं तस्याघटितं बल बलवता रामेण सुश्रीमता
हत्वा दक्षिणपाणिना वसुमतीं त्वां हनुमुक्त वचः॥१०

मी तंव एकला एक वानर । [3]श्रीरामकटकींचें किंकर । तुझे कोटि कोटि झुंझार । मजसमोर करीं उभे ॥ २४ ॥ मशकें कोटी कोटी झुंझार । मज मारितां दशशिर । कोण राखेल निशाचर । सुरासुर पाहूं पां ॥ २५ ॥ सदाशिव तुज रक्षिता । तुवां चोरिली श्रीरामकांता । शिव पेटला तुझ्या घाता । चोरी करितां कोण राखे ॥ २६ ॥ ब्रह्मा तुज नित्य साहाकारी । त्याचे वंशीं तूं दुराचारी । चोरीमारी आणि परद्वारी । ब्रह्मा तुजवरी क्षोभला ॥ २७ ॥ ब्रह्मा शिव आणि शक्र । तुज क्षोभले सुर समग्र । मज मारितां दशशिर । कोण समोर राहील ॥२८॥ मुख्य त्वां चोरिली सीता सती । जटायु मारिला विश्वासघातीं । पतिव्रतेसी मागतां रती । प्रजापति क्षोभला ॥ २९ ॥ मज मारितां दशवक्त्र । कुमर प्रधान सैन्य समग्र । रणीं मर्दोनि निशाचर । सीता सुंदर मग नेईन ॥ ३० ॥

१ तिरस्कार–धिक्कार करून. २ उत्तर.

§ ढ–टरटुराट.

१ धनुर्धरांस धनुर्विद्येचा उपदेश करणारा. २ पुष्कळ शूरांशीं एकटा लढणारा. ३ रामाच्या सैन्यांतील.

त्यामुळें इंद्रजितास कंप—ऐकोनि हनुमंताची मात । इंद्रजित चळीं कांपत । धाके बिभीषणासी सांगत । आला अपघात रावणा ॥ ३१ ॥ हनुमंताचा रणावर्त । भोगोनि इंद्रजित असे भीत । न साहवे पुच्छाचा घात । लंकानाथ कैंवी वांचे ॥ ३२ ॥ लंके आणोनि हनुमंत । कांहीं नव्हेचि पुरुषार्थ । आजि निमाला लंकानाथ । आला अंत राक्षसां ॥ ३३ ॥

त्याला व बिभीषणाला रावणाविषयीं चिंता—इंद्रजित बिभीषण सचिंत । कैसेनि वांचेल लंकानाथ । तंव बोलिला हनुमंत । अति पुरुषार्थ रामाचा ॥ ३४ ॥ रणीं मारीन रावण । करोनि सीतासोडवण । सीता घेवोनि जातां जाण । आडवा कोण येऊं शके ॥ ३५ ॥ इतुकें करितां न लगे क्षण । परी श्रीरामें वाहिली आण[1] । स्वहस्तें मारीन रावण । मिथ्या कोण करूं शके ॥ ३६ ॥ मारोनियां दशशिरा । स्वस्थ[2] करावी वसुंधरा[3] । सुखी करावें चराचरा । श्रीरामचंद्रा निजनेम ॥ ३७ ॥ सोडावी देवांची बांधवडी[4] । तोडावी नवग्रहांची बेडी । उभारावी रामराज्याची गुढी । हे मर्यादा गाढी श्रीरामीं ॥ ३८ ॥

रावणाच्या शिरांवर मारुतीचा नखाग्रांनीं आघात—वानरें करोनि उड्डाण । जीवें मारावा दशानन । श्रीरामप्रतिज्ञापाळण । कपि रावण न मारीच ॥ ३९ ॥ रावणाचीं दाही शिरें । हनुमंत खुडिता नखाग्रें । मर्यादा[5] केली श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें राखिला ॥ १४० ॥ श्रीराममर्यादेचें उत्तर । सर्वथा नुल्लंघीच वानर । यालागीं तो दशशिर । जीवें कपींद्र न मारीच ॥ ४१ ॥ जीवें न मारीच वानर । मरणापरीस हें दुर्धर । निर्भर्त्सिला दशशिर । तेंही सादर अवधारा ॥ १४२ ॥

१ शपथ. २ सुखसंपन्न. ३ पृथ्वी. ४ बंदिवास. ५ अटक.

धिक्ते रावण पौरुष तव कुल धिग्धिग् यशस्तेजसी
धिक् खड्गासुरदर्पनोदनकर धिग्धिग् वृथा जीवनम् ।
यस्माद्राघवबाणभीतमनसा सीता परोक्षे हृता
तद्वैरादहमागतोऽस्मि हनुमान्बद्धो वधार्थे तव ॥ ११ ॥

त्याचा मारुती धिक्कार करितो—जळो ते रावणा तुझी थोरी । जळो तो राजा होय भिकारी । जळो तें कर्म करणें चोरी । परनारी पतिव्रता ॥ ४३ ॥ जळो तें तुझें रावणा कुळ । जळो तें रावणा तुझें शीळ । जळो तें तुझें रावणा बळ । पापी केवळ परद्वारी ॥ ४४ ॥ धिग्धिग् रावणा तुझा पुरुषार्थ । धिग्धिग् रावणा तुझा कर्तव्यार्थ । धिग्धिग् रावणा तुझें व्रत । स्वार्थ परमार्थ नाशिला ॥ ४५ ॥ धिग्धिग् रावणा तुझी राक्षसजाती । धिग्धिग् रावणा तुझी ख्याती । धिग्धिग् रावणा तुझी कीर्ती । जाली अपकीर्ति तिहीं लोकीं ॥ ४६ ॥ धिग्धिग् रावणा तुझें जन्म । धिग्धिग् रावणा तुझें कर्म । धिग्धिग् रावणा तुझा धर्म । निंद्य परम तिहीं लोकीं ॥ ४७ ॥ धिग्धिग् रावणा तुझी श्रीमंती । धिग्धिग् रावणा तुझी शक्ती । धिग्धिग् तो खड्ग[1] तुझे हातीं । लोम[2] मारुतीचें न तुटेचि ॥ ४८ ॥ धिग्धिग् जीवित्व तुझें क्षितीं । धिग्धिग् रावणा तुझी शौर्यशक्ती । परोक्ष[3] चोरिली सीता सती । बाणभयें भीसी श्रीरामा ॥ ४९ ॥ चोरिली माझ्या स्वामीची नारी । त्या तुझी म्यां धरिली चोरी । चोर तो† तंव प्रत्यक्ष वैरी । सहपरिवारी मारीन ॥ १५० ॥ देखतां सैन्य भट सुभट । तुझे मर्दीन वीसही होंट । तुझे छेदावया दशकंठ । आलों मी ‡वाट[4] रामाचा ॥ ५१ ॥ ऐसें बोलतां महाबळी । पिंजारिल्या रोमावळी । लांगूल[5] आहाटिलें भूतळीं । वाढलें निराळीं कपिपुच्छ ॥ ५२ ॥ सवेंचि आठवलें हनुमंता । श्रीराम वधील

१ तलवार. २ लव, केंस. ३ पाठीमागें. ४ वीर ५ शेंपूट.

† तू. ‡ ड—भाट, ब—बाटा.

लंकानाथा। व्यर्थ कां मी क्षोभूं आतां। केलें शांत निजकोपा ॥ ५३ ॥ एका जनार्दना शरण। केलें लंकेशगर्वहरण। जाळील लंकाभुवन। रणकंदन अवधारा ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमद्रावणगर्वहरणं नाम ब्रह्मलिखिते द्वात्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३२ ॥ ओंव्या ॥ ॥ १५४ ॥ श्लोक ॥ ११ ॥ एवं ॥ १६५ ॥

---

## अध्याय ३३ वा

मारुती रावणासमोर पुच्छासन मांडून बसतो, त्यामुळें रावण भयभीत होतो—श्रीसीतारामाभ्यां नमः॥ रावणसिंहासनासमान। घालोनियां पुच्छासन। हनुमान बैसला सावधान। दशानन लक्षोनी ॥ १ ॥ जैसा सिंहापुढें गजाचा दर्प। कीं गरुडापुढें कांपती सर्प। तैसा देखोनि कपिप्रताप। महाकंप रावणा ॥ २ ॥

बिभीषण व इंद्रजित रावणास सूचना करितात—जंव रावण देखे भयभीत। तंव बिभीषण इंद्रजितसंयुक्त। लंकेशासी बुद्धि सांगत। कीं अवध्य हनुमंत सर्वथा ॥ ३ ॥ मारूं जातां हनुमंतासी। तेणें गांजिलें महावीरासी। पुच्छें निर्दळिलें सैन्यासी। तो कपि कोणासी नाटोपे ॥ ४ ॥ तरी बुझवावया[1] हनुमंता। श्रीरामा अर्पावी सीता। आणि शरण रिघालिया रघुनाथा। आम्हां समस्तां कल्याण ॥ ५ ॥ जें श्रीरामाचें एक वानर। केवळ तेंही पालेखाईर। तें नाटोपे आम्हां अति दुर्धर। मग आल्या रघुवीर कोणा साहे ॥ ६ ॥

तें ऐकून रावणास चिंता, परंतु त्याची सूचना अमान्य—ऐसें ऐकोनि बिभीषणउत्तरा। आणि देखोनि इंद्रजितासी रणभेदरा[2]। परम चिंता दशशिरा। देखोनि वानरा चळकांप ॥ ७ ॥ तरी इंद्रजिताची बुद्धि भिन्न। आणि बिभीषण म्हणे रिघावें शरण। तरी म्यां काय करावें आपण। ऐसें रावण विचारी ॥ ८ ॥

म्हणून कपटानें घात करण्याची योजना—तरी एकल्या वानराभेण[1]। रिघावें श्रीरामासी शरण। तरी मज आलें उणेपण। करोनि छळण कपि मारूं ॥ ९ ॥ जैसा जटायु नाटोपतां जाण। मग म्यां मारिला करोनि छळण। तैसेंचि यासी घालोनि आण[2]। पुसोनि मरण कपि मारूं ॥ १० ॥ जरी श्रीरामभक्त सत्यवादी। असत्य न बोलती त्रिशुद्धी[3]। तरी याचे मरणा हेचि बुद्धी। छळणानुवादीं मारावा ॥ ११ ॥

मारुतीची स्तुती करून रामाची शपथ घालून त्याचें मरण विचारितो—ऐसी विचारोनि युक्ती। मग दाही मुखीं लंकापती। स्तवूं आदरिला मारुती। मरणयुक्ती पुसावया ॥ १२ ॥ तरी ऐकें कपींद्रा सावधान। तुज घालितों श्रीरामाची आण। कीं तुज कैसेनि ये मरण। हें सत्य वचन मज सांगें ॥ १३ ॥

आपण अमर असल्याचें मारुती सांगतो—ऐकोनि श्रीरामाची आण। हनुमान घाली लोटांगण। मज सर्वथा नाहीं मरण। हें सत्यवचन लंकेशा ॥ १४ ॥ ऐसें परिसतां कपिवचन। गदगदां हांसे दशानन। जे जन्माआधीं गर्भीं मरण। अमरपण तुज कैचें ॥ १५ ॥

रावणाचा अविश्वास—मग रावण वदे हनुमंता। मिथ्या वदों नको श्रीरामभक्ता। आणि तूं कां वदसी मिथ्या वार्ता। निजवृत्तांता मज सांगें ॥ १६ ॥ जैसें जटायूस पुसोनि मरण। त्यासि मारिलें करोनि छळण। तैसेंचि मजही करिसी जाण। तेणें भयें वदें मिथ्या ॥ १७ ॥ तरी मरणभय जयाचे चित्तीं। मग त्यासी कैंची श्रीरामभक्ती। देहलोभ्या श्रीरामप्राप्ती। कदा कल्पांतीं असेना ॥ १८ ॥

मारुतीचें प्रत्युत्तर व रावणाची निंदा—ऐसें परोपरी प्रबळ ज्ञान। योग्यता बोले दशानन। तरी

---

१ समजूत घालण्यासाठीं. २ लढाईचें भय.

१ वानराच्या भीतीनें. २ शपथ. ३ खरोखर.

परदाराचोरी[1] आपण। हे जाणतेपणा कोण रावणा ॥ १९ ॥ तरी मरणभयें कासाविसी। आणि सीता चोरोनि स्वयें पळसी। तो तूं आम्हां शिकविसी। मरणभयासी कां भीत ॥ २० ॥ वर्मी खोंचला लंकानाथ। मग त्यासी सांगे हनुमंत। ऐक माझा मरणार्थ। तुज यथार्थ[2] सांगेन ॥ २१ ॥

पुच्छाचें दहन झाल्यास कपीमरणच असें सांगतो—मी असत्य वदलों नाहीं तुजसीं। जें मरण नाहीं माझे देहासीं। तरी मरण आहे पुच्छासी। तें मारिसी तैं मी मरें ॥ २२ ॥ कपिपुच्छासी केलिया दहन[3]। अवश्य हनुमंतासी मरण। इंद्रजित सत्य मानी आपण। आणि सैन्य ‡प्रधान सत्य मानिती ॥ २३ ॥ श्रीरामआणेनें भयभीत। सत्य वदला मरणार्थ। पुच्छदाहें मरेल हनुमंत। ऐसें लंकानाथ सत्य मानी ॥ २४ ॥

तें कसें करावें असें रावण विचारितो. वस्त्रें गुंडाळून तेलतूप शिंपणें हा मार्ग सांगतो—मग स्वयें पुसे दशानन। तरी कोणे युक्ती पुच्छदहन। जें जाळावया लंकाभुवन। करावया छळण कपि सांगे ॥ २५ ॥ वस्त्रें तेलतुपीं भिजवोन। पुच्छ गुंडाळावें संपूर्ण। मग जाळावें अग्नि लावोन। तेणें मरण वानरासी ॥ २६ ॥ मरणवर्म[4] आलें हाता। तेणें अति उल्हास लंकानाथा। मग होय दूतांसी सांगता। वेष्टनार्था कपिपुच्छा ॥ २७ ॥

वस्त्राकरितां सर्व नागरिकांना नग्न केलें—पुच्छ गुंडाळितां तांतडी[5]। तंव सरलीं जुनीं पानीं लुगडीं। मग गुंडिती नवीं घोंगडीं। धुवट¶ घडी उकलोनी ॥ २८ ॥ मग दिंडें आणिलीं उदंडें[6]। परी तें कपिपुच्छ न गुंडे। तेणें चाटे[7] भाटे फोडिती धोंडे। करिती तोंडें महाशब्द ॥ २९ ॥ शेले खासी वेजवटे*। काळीं वेरीं समसगटें। सखरें निखरें धुवटें। परी पुच्छ न वेष्टे कपीचें ॥ ३० ॥ राजगृहींचीं वस्त्रें। आणि नगरींचीं वस्त्रमात्रें। सभा नागविली समग्र। परी पुच्छ चतकोर गुंडेना ॥ ३१ ॥ पोताचीं वस्त्रें घेती काढकाढूं। आणि पडदे† गुंडिती फाडफाडूं। कां दुसे गुंडिती उघडउघडूं। द्वद्वीं माकडूं पेटला ॥ ३२ ॥ कोणाचा मेहुणा कोणाचा पाहुणा। जांवई आणिला दिवाळसणा। त्यांचेहि करितां वस्त्राहरणा। शंखस्फुरणा ते करिती ॥ ३३ ॥ जे जे देखती वस्त्रयुक्त। त्यांतें दूत नागवित। नगरी भोंवे पुच्छावर्त। कळकळत नरनारी ॥ ३४ ॥ पुरुष नागवले हळहळित। मग कां तृणें‡ लिंग झाकित। मागेंपुढें देवोनि हात। स्त्रिया पळत अति नग्न ॥ ३५ ॥ मग राणिवसाचीं[1] लुगडीं। करोनि आणिती उघडीं। लंका नागविली रोकडी। कडोविकडी कपिपुच्छें ॥ ३६ ॥ नगर नागविलें हळहळित। आणि सभा नागविली समस्त। नग्न स्त्रिया राणिवसात। पुरविला अंत कपिपुच्छें ॥ ३७ ॥

राणीवसांतही आक्रमण, तरी पुच्छ मोकळेच—दुर्ग सांठवण[2] निवडी। तेलतुपांचीं टांकीं गाढीं। कपिपुच्छें केलीं कोरडीं। घोंगडीं पांगडीं भिजवोनि ॥ ३८ ॥ घृत स्नेह[3] नाहीं नगराआंत। वाती लाविल्या समस्त। गडद§ पडलें लंकेआंत। लंकानाथ धुकधुकी ॥ ३९ ॥ नगरीं तेलतुपाचा धडा[4]। आणि भोंवता वस्त्रांचा हरडा। तरी पुच्छ न गुंडे पुढां। लाविलें वेडा ३ वानरें ॥ ४० ॥ सभा नागविली वीरानुवीरीं¶। वस्त्रमात्र न मिळे नगरीं।

१ परस्त्रीचा अपहार. २ खराखरा. ३ जाळणें. ४ मरणाची खूण. ५ घाईनें. ६ पुष्कळ. ७ कापडवाले.

† इक्ष—शान. ‡ इक्ष— + सेनानी. ¶ धोवट घड्या.

१ अंतःपुरांतील. २ किल्ल्यातला साठा. ३ तेल. ४ तोटा.

* क्ष—बोझीवटे. † क्ष—पदरे. ‡ इक्ष—काळे तृणें. § क्ष—गडें. ३ इक्ष—वेटा. ¶ क्ष—वीरो.

नागव्या† हल्हाळित नरनारी । कपिपुच्छ तरी न गुंडे ॥ ४१ ॥ पुच्छ गुंडावयाची व्युत्पत्ती‡ । ज्याचें नगर त्याचे हातीं । स्वयें नागवी मारुती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ४२ ॥ वानर§ महा जगजेठी । लंका नागविली पुच्छासाठीं । शिणतां राक्षसांच्या कोटी । पुच्छ शेवटीं न गुंडे ॥ ४३ ॥ पुच्छ गुंडितां पैं कैवाडें । अग्र अधिकाधिक वाढे । ऐसी ख्याती लाविली माकडें । मरण रोकडें राक्षसां ॥ ४४ ॥ नाहीं झगडा ना भांडण । करितां कपिपुच्छासीं वेष्टण । तृणप्राय केला रावण । ऐसी गाढी आंगवण हनुमंता ॥ ४५ ॥ पुच्छ वेष्टिलें समग्र । अल्प उरलें दिसे अग्र[१] । ऐसें ऐकोनि दशशिर । पीतांबर म्हणे गुंडाळा ॥ ४६ ॥ इंद्रजित प्रधानसमवेत । रावण संतोषचित्त । पुच्छदाहें मरे हनुमंत । पुच्छ समस्त वेष्टावें ॥ ४७ ॥ मग पीतांबरें श्वेतांबरें । आणि पट्टकुळें[२] मनोहरें । गुंडिताती क्षौमांबरें[३] । पुच्छ न भरे कपीचें ॥४८॥ तंव इंद्रजित अतिशयें धाकत । जरी वांचला हनुमंत । तरीं समस्तां करील घात । पुच्छदहनार्थें मारावा ॥ ४९ ॥ रावण धाके मानसीं । जें पुच्छ न गुंडे पैं आम्हांसी । तरी कैंवी मारवेल हनुमंतासी । म्हणोनि चकसाचुकसी स्फुंदत ॥५०॥

सीतेचें वस्त्र आणण्याचा विचार चालताच पुच्छ गुंडाळलें गेलें—तंव बोलिला विद्युन्माळी[४] । जरी वानर आकळेना महाबळी । तरी उघडी करावी जनकबाळी । मग पुच्छ तत्काळीं आकळेल ॥५१॥ ऐसें ऐकतां हनुमंतें । मग सांवरिलें निजपुच्छातें । तंव दूत सांगती रावणातें । जें आम्हीं पुच्छातें आकळिलें ॥ ५२ ॥ आम्ही सेवक आतुर्बळीं[५] ।

१ टोंक. २ रेशमी महावस्त्रें. ३ रेशमी वस्त्रें. ४ या नावाचा राक्षस. ५ महाबळवान्.

† ब—नागवी, क्ष—लंगोटी लाविली घरोंघरीं. ‡ क्ष—ख्याति. § वानरवीर.

पुच्छ आकळिलें समूळीं । म्हणोनि पिटिली सर्वीं टाळी । केला समूळीं* गडगर्जे ॥ ५३ ॥

पुच्छ पेटविण्याकरितां लोहाराच्या भात्याची योजना—तंव रावण सांगे अति क्रोधार्थें । अग्नि लावा रे पुच्छातें । मग आणोनि लोहकारातें । लाविले भाते अग्नीसीं ॥ ५४ ॥ लंकानाथ सुखसमेळीं । पुच्छा करावया होळी । हनुमंत मारावा महाबळी । अग्नीजवळी स्वयें आला ॥ ५५ ॥ तंव अग्नीच्या पोटाआंत । कीं अपमानावा लंकानाथ । तंव तेंचि करूं पाहे हनुमंत । तो गुह्यार्थ अवधारा ॥ ५६ ॥ तयाकाळीं हनुमंतें । विनविलेसे पितयातें । जे वायु सखा अग्नीतें । तरी ज्वाळा तेथें होवों नेदीं ॥५७॥ ज्वाळा होवों नेदी येथें । ऐसें नमोनियां वायूतें । अपमानावया रावणातें । कपि पुच्छार्थें खवळला ॥५८॥ भाते फुंकितां चौपासीं । परी अग्नि स्पर्शेना पुच्छासी । राक्षस होती कासाविसी । परी अग्नि तयासी लागेना ॥ ५९ ॥

अचेतन भात्यानीं सचेतन पुच्छ कसें पेटणार—मग रावण पुसे हनुमंतासी । अग्नि कां न लागे पुच्छासी । हनुमान म्हणे रावणासी । तूं आहेसी अति मूर्खी ॥ ६० ॥ †सदसद्विवेकज्ञान । ज्यासी नाहीं तो अति अज्ञान । तूं तंव ज्ञानगर्वी पाषाण । जे धर्मलक्षण लक्षेना ॥ ६१ ॥ भाते फुंकितां अचेतन । कैंवी ज्वाळा होती सचेतन । तरी तें तुज नाहीं ज्ञान । अति अज्ञान लंकेशा ॥ ६२ ॥ तें तंव वचन मानलें लंकेशासी । मग पाचारोनि निजवीरांसी । फुंकूं लाविलें पुच्छासीं । साक्षेपेंसी[१] सांगोनी ॥ ६३ ॥ राक्षस फुंकितां चौपासीं । तंव पुच्छें दडपिलें अग्नीसी । घोर धाणी उठे घशासीं । तेणें कासाविसी राक्षसें ॥ ६४ ॥ घोर धाणी अति प्रबळ । डोळां आंसुवें मुखीं लाळ । आणि ऊर्ध्वश्वासें

१ गोठ्या यत्नानें.

* डक्ष—सकळी. † क्ष—हूड. ‡ डक्ष—सतासत.

खोकती सकळ । हलकल्लोळ मांडिला ॥ ६५ ॥ ऐसा द्वंद्वा पेटला हनुमंत । सभा जाहली धूम्राकुळित[1] । वानरें मांडिला हा अनर्थ । लंकानाथ गजबजिला ॥ ६६ ॥

तरीही पेट न घेतल्यावर हनुमताच्या सूचनेप्रमाणें रावण स्वत: फुकर घालू लागला—मग पुसे हनुमंता । पुच्छ कां न जळे फुंकितां । हनुमान म्हणे लंकानाथा । ऐक आतां सांगेन ॥ ६७ ॥ पोफळ नेदितां यजमानासी* । होम न करवे तयासी । तरी न फुंकितां रावणासीं । अग्नि पुच्छासी स्पर्शेना ॥६८॥ जेंवी गृहस्थें न करितां ब्रह्मार्पण । द्विज न घेती आपोशन । तेंवी न फुंकिता रावण । हुताशन[2] प्रज्वळेना ॥ ६९ ॥ एक मुखें किती फुंकिती । दहा मुखें तुज आहेती । तुवां फुंकिलिया लंकापती । पुच्छप्रदीप्ती[3] हुताशना ॥ ७० ॥ मग करोनि शुद्धाचमन । आणि प्रथम देवोनि घृतावदान । मग फुंकावया हुताशन । दशानन बैसला ॥ ७१ ॥ हनुमंताची विवेकयुक्ती । सत्य मानलें लंकापती† । पुच्छासी फुंकावया प्रदीप्ती । केली आइती[4] ते ऐका ॥ ७२ ॥ रावणाचे पोटीं कपट । कपि मारावया समसगट । येणें आवेशें दशकंठ । हव्यवाट[2] फुंकित ॥ ७३ ॥ जें रावणाचे निजचित्तीं । ‡माझेनि मुखें पुच्छप्रदीप्ती । §शांत[5] जालिया मारुती । जगीं कीर्ति वाढेल ॥ ७४ ॥ तंव हनुमान म्हणे पित्या पवनासी । अग्नि फुंकितां रावणासीं । अति अपमान द्यावा त्यासी । मुख कोणासी न दावी ॥ ७५ ॥

तेव्हां एकदम भडका होऊन दाहीं शिराच्या दाढीमिशा दग्ध—तंव अति आवेशें दशानन । आक्रोशें फुंकी हुताशन । तंव भडका एकसरें होऊन । केलें दहन खांडमिशां ॥ ७६ ॥ होतां खांडमिशादहन । मुखीं पोळला दशानन । शंख करी शुद्ध त्राहाटोन । काळें वदन लंकेशा ॥ ७७ ॥

रावणानें वर तोंड केल्यावर पुच्छही वर झालें—तंव रावण तोंड परतें करी । तंव हनुमान पुच्छ वरतें धरी । पहिला अपमान राजशिरीं । केली बोहरी खांडमिशां ॥ ७८ ॥

हा वृत्तांत ऐकून राम, लक्ष्मण, सुग्रीवादि सर्वांस परम हास्य आलें, व वानरसमूहात हनुमताचा जयजयकार—अभिनव कपीची ख्याती । ऐकोनि हांसे श्रीरघुपती । आणि सुग्रीवासारखे जुत्पती[1] । स्वयें हांसती स्वानंदें ॥ ७९ ॥ वाचितां पत्र लक्ष्मण । तोही जाला हास्यवदन । हनुमंताचें अति विंदान । काळें वदन लंकेशा ॥ ८० ॥ आमुचा हनुमान आतुर्बळी । जे धुरेच्या मुखा केली होळी । म्हणोनि वानरीं पिटिली टाळी । सुखसमेळीं गर्जत ॥ ८१ ॥ विजयी हनुमंत महावीर । हरिखें नाचती वानर । अवघे करिती जयजयकार । श्रीरामचंद्र स्मरोनी ॥ ८२ ॥ मग अंगदें उठोनि जाण । भेरी त्राहाटिल्या[2] निशाण । तंव सुमनें[3] वर्षती सुरगण । तेणें सुखसंपन्न श्रीराम ॥ ८३ ॥ ऐकतां सेवकाची ख्याती । स्वयें सुखावे रघुपती । धन्य धन्य तो मारुती । जे पावन कीर्ति तिहीं लोकीं ॥ ८४ ॥

मारुतीचें रामचरणीं वदन व श्रीरामस्तवन—मग सौमित्रा श्रीराम सांगत । पुढें वाचीं ब्रह्मलिखित । पुच्छदहनें हनुमंत । पुढें पुरुषार्थ काय केला ॥ ८५ ॥ वंदोनि श्रीरामाचे चरण । पत्र वाची लक्ष्मण । आवडीं परिसत रघुनंदन । तें सावधान अवधारा ॥८६॥ श्रीरामातें अनुलक्षोनी[4] । हनुमान

---

१ धुरानें व्याकुळ. २ अग्नि. ३ शेंपूट जाळणें. ४ तयारी. ५ मेलेला.

* क्ष—यजमान पुरोहितासी. † क्ष—लंकेशासी. ‡ क्ष— + म्हणे. § क्ष—साग जाळिलिया.

१ मल्लवीर. २ वाजविल्या. ३ फुलें. ४ पाहून.

उभा कर जोडूनी । आपुल्या स्तुती ऐकोनी। ¶ना[1] श्लाघे[1] ना अभिमान ॥८७॥ मी पालेखाइरें वानर। माझी कीर्ति करिता श्रीरामचंद्र। रणीं रामनाम महशूर। अति* दुर्धर †रामनाम ॥८८॥ श्रीराम हाताचा हात। श्रीराम शस्त्राचें सामर्थ्य। राम करिता राक्षसघात। रणकंदनार्थ श्रीराम ॥ ८९ ॥ श्रीराम प्राणाचाही प्राण। श्रीराम बाणाचाही बाण। श्रीराम माझी आंगवण। ‡श्रीरामीं समर्पण पैं माझें ॥ ९० ॥ ऐसे ऐकतां हनुमंताचे बोल। श्रीरामा येती सुखाचे डोल। जे भक्तिभावार्थाची ओल। अति सखोल श्रीरामीं ॥९१॥

पुढें वृत्तांत वाचून पुच्छानें केलेलें कदन–पुढें ब्रह्मयाचें ब्रह्मलिखित। हरिखें सौमित्र वाचित। अपमानिला लंकानाथ। सभेआंत सलज्ज ॥९२॥ प्रथमप्रारंभीं पुच्छकंदनें§। दाढया मिशा जाळिल्या दहन[2]। सिंहासनीं काळें वदन। लज्जायमान रावण ॥ ९३ ॥ कीर्ति जाली अपकीर्ती। थोर चिंताऽ रावणचित्तीं। पुढें काय करील मारुती। पुच्छदहनार्थी कळेना ॥ ९४ ॥ छळों जाता वानरासी। छळण न चले रामभक्तासी। छळणें जाळिलें माझ्या मुखांसी खांडमिशांसी पुच्छदाहो ॥ ९५ ॥

ते सप्तपाश तोडून मारुती मोकळा होतो–वानर उद्धत्तां रामनामेंसीं। छेदिलें दुर्धर सप्तपाशांसी। तेथें द्रुमपाश रज्जुपाशासी[3]। यमपाशासी कोण पाड ॥९६॥ काळपाश कर्मपाश। धर्मपाश ब्रह्मपाश। मायापाश मोहपाश। जन्मपाश सातवा ॥ ९७ ॥ काळपाश तो आयुष्यघात। कर्मपाश तो नैश्वर्यवंत+। धर्मपाश तो आश्रमगत। वेदविहितार्थ ब्रह्मपाश ॥ ९८ ॥ देहममता मोहपाश। मुख्य माया तो आशापाश। कनककांता हा* जन्मपाश। ऐसे सप्त पाशांहीं जीव बद्ध ॥ ९९ ॥ सप्त पाशांची निवृत्ती। रामनामें करी मारुती। तेथें वैरांची न चले युक्ती। शास्त्रव्युत्पत्ती शीणतां† ॥ १०० ॥ श्रीरामाचें जें नाम। तेंचि केवळ परब्रह्म। नामें निर्दळी कर्माकर्म। धर्माधर्मच्छेदक ॥ १ ॥ अबद्ध पढतां पैं वेद। अनिवार बाधिती निषेध। आणि नाम स्मरतांचि अबद्ध। होती सुबद्ध‡ श्रवणार्थी ॥ २ ॥ अबद्ध मंत्राच्या प्रयुक्ती। जापक[1] चळले नेणों किती। आणि अबद्ध नांवाच्या आवर्ती। जड मूढ तरती असंख्य ॥ ३ ॥ करितां क्रियाकर्मव्युत्पत्ती। जरी विधिविधानें व्यंग होती। व्यंग कर्में नव्हे उद्धारगती। आणि हरिनामोक्ती अच्युत[2] ॥ ४ ॥

नाममहिमा, रामरक्षेचा प्रभाव–नामासीं नाहीं कर्मबंधन। नामासीं नाहीं विधिविधान। आसनीं भोजनीं शयनीं जाण। नाम पावन हरीचें ॥ ५ ॥ स्वप्नीं स्मरतां रामनाम। तिन्ही अवस्था करी भस्म। ऐसें दादुगें[3] हरीचें नाम। नाम परब्रह्म प्रत्यक्ष ॥ ६ ॥ स्वप्नींचिया स्वप्नस्थिती। कौशिका[4] रामरक्षेची प्राप्ती। जे कां दादुगी त्रिजगतीं। उद्धरणार्थी जयाचे§ ॥ ७ ॥ तरी रामरक्षा ज्याचे हातीं। कळिकाळ त्यासी कांपती। यमधर्म पायां लागती। तीर्थें मागती चरणतीर्थ ॥ ८ ॥ असो रामरक्षाव्युत्पत्ती। दोनचि अक्षरें रामनामोक्ती। चहूं मुक्तींची फिटे भ्रांती। ब्रह्मप्राप्ती ठसावे ॥९॥ श्रीरामस्मरणाचेनि योगें। ब्रह्मस्थिति घर रिघे। कळिकाळासी करी उभें। ऐसें नाम दादुगें श्रीहरीचें ॥ ११० ॥ ऐसी रामनामाची स्थिती। पूर्ण बाणली

१ बढाई केली नाहीं. २ अग्नीनें. ३ दोऱ्यांचे पधास.

¶ ढक्ष–नाहीं श्लाघ्यता अभिमान। निराभिमान मारुती ॥ ८७ ॥ * ड–रण. † ड–हरि. ‡ ढक्ष–माझें मीपण श्रीराम ॥ ९ ॥ § क्ष–दहन. ऽ ढक्ष–लज्जा. + क–अनीश्वर.

१ जप करणारे. २ शाश्वत. ३ दाडगें. ४ बुधकौशिक ऋषीला.

* हे. † + ही. ‡ ढक्ष–निर्द्वंद्व. § जगाचे.

हनुमंतीं। तेणें त्याची पावन कीर्ती। त्रिजगतीं निजविजयी ॥ ११ ॥ ऐसी हनुमंताची स्थिती। ब्रह्मयानें लिहिली ब्रह्मलिखितीं। पुढें कपिपुच्छ-प्रदीप्ती। केली ख्याती ते ऐका ॥ १२ ॥

मारुती मेल्याचें सोंग करितो–पुच्छीं धडाडी हुताशू[1]। हनुमंतासी अति आवेशू। जैसा खेवा[2] आलिया अमृतांशू[3]। ऐसा उल्लासू वानरीं ॥१३॥ रामनामाहीपरतें। नाहीं साधन सरतें[4]। अग्नि बाधूं न शके मातें। कृपा रघुनाथें मज केली ॥ १४ ॥ श्रीरामनामें हनुमंत। सप्तपाशबद्ध निर्मुक्त। परी तोही पुच्छें तळमळित। राक्षसां अंत करावया ॥ १५ ॥ नेत्रीं लाविली अर्धचंद्री। आणि खरसी[5] आणिली मुखाभीतरीं। पुच्छ पसरोनि धरणीवरी। मरणानुकारी[6] कपि पडे ॥ १६ ॥

राक्षसांस हर्ष–मग राक्षस येवोनि समस्त। जंव हालवोनि पहात। तंव कपि हालवीना पाय हात। वानरें दांत विचकिले ॥ १७ ॥ एक उलथें पालथें करिती। एक उफराटें धरिती। तंव ते पुच्छाग्नीनें पोळती। मग पळती माघारे ॥ १८ ॥ एक ढुंगीं घालती काठ्या। एक हाणिती फडफडाटा। ऐसा वानर मीसगाढा[7]†। दांत दाढा हालवीना ॥१९॥ ऐसें मीस करोनि अति निगुतीं। हालों नेदी पातया पातीं। म्हणती निमाला मारुती। करोनि ख्याती रणमार ॥ १२० ॥ वानरवीर जगजेठी। मारिल्या राक्षसांच्या कोटी। इंद्रजित रावण धाके पोटीं। अवघ्यां पोटीं अति धाक ॥ २१ ॥ जरी हा मरण न मागता। तरी करितां अवघ्यांच्या घाता। परी तीक्ष्ण बुद्धि लंकानाथा। छळणें हनुमंता मारिलें ॥ २२ ॥ वानर सत्यवादी पूर्ण। पाळोनि श्रीरामाची आण। सांगोनियां निजमरण। आपणा आपण मारविलें ॥ २३ ॥

वैद्याचें मत–जंव वैद्य पाहती विचक्षण। म्हणती कपीचे हृदयीं आहे प्राण। परी तो अतिशयेंसीं क्षीण। क्षणार्धें पूर्ण निमेल ॥ २४ ॥

मारुती मेल्याच्या वार्तेनें तेथें मचड गर्दी–हनुमान निमाला ऐकोनी। घाव[1] घातला निशाणीं[1]। इंद्रजित हरिखला मनीं। वांटी शेरणी[2] लंकेसीं ॥ २५ ॥ रावणें मारिला मारुती। लंकालोक पाहूं येती। राक्षसवीरांचिया पंक्ती। अमित क्षितीं दाटलिया ॥ २६ ॥

असें पाहून जळत्या पुच्छानें त्याजवर एकदम आक्रमण–मिळाली राक्षसांची मांदी। मीस घेतलें निजबुद्धी। अवघ्यां वधावया त्रिशुद्धी। पेटला द्वंद्वीं तो ऐका ॥ २७ ॥ दाटल्या देखोनि राक्षसहारी। जळत पुच्छा घाली त्यांवरी। तंव ते पोळती उरीं शिरीं। ऐसी आपांपरी[3] राक्षसां ॥ २८ ॥

पुच्छानें सर्वांचा मार्ग बंद केल्यानें सर्वत्र त्रेधा–पळों जातां बाहेरी। तंव जळत पुच्छ लाविलें द्वारीं। अवघियां केली कोंडमारी। ऐसा निशाचरीं आकांत ॥ २९ ॥ जनांच्या वस्त्रां लाविली आगी। तेणें जळती सर्वांगीं। पुच्छ घाली एकाएकाचे ढुंगीं। नेसण्या आगी लाविली ॥ १३० ॥ आगी लागल्या धोत्रांसी। द्विज पोळले लिंगप्रदेशीं। नागवे नाचती रावणापासीं। दाविती त्यासी लिंगव्यथा ॥ ३१ ॥

मारुती राजद्वारीं जातो–हनुमान निघाला राजद्वारीं। निशाणें त्राहाटिल्या भेरी। जळो ते रावणा तुझी थोरी। जोहारवोहारी[4] त्यां केली ॥ ३२ ॥ लंका नागविली वस्त्रासाठीं। तेलातुपा पाडिली तुटी। दिवा लावणें खुंटली गोष्टी। शेवटीं जीवा साटी[5] कपिपुच्छ ॥ ३३ ॥ आधींच वानर सबळ।

१ अग्नि. २ आलिंगनाला. ३ चंद्र. ४ श्रेष्ठ. ५ फेस. ६ मरणोन्मुख होऊन. ७ ढोंग करण्यात कुशल.

† मीस करु गाढा.

१ रणभेरी वाद्यें वाजविण्यात आलीं. २ खिरापत. ३ दुर्दशा. ४ आगीनें राखरांगोळी. ५ भय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............... दि: ...................
क्रमांक ..................... नों दि: ..२.११.......



आणि पुच्छ पेटविलें प्रबळ। आतां लंका जाळील तत्काळ। आणि मारील राक्षसां ॥ ३४ ॥ रावणा तुझे पोटीं कपट। त्या कपटें केलें तव्पट। पुच्छें पेटला मर्कट। करील सपाट सर्वांचें ॥ ३५ ॥

रावणानें विचारल्यावरून हा सर्व पुच्छाचा भाबरेपणा आहे असें मारुती त्यास सांगतो—रावण म्हणे रे हनुमंता। लंका जाळिसी कवण्या अर्था। सावध ऐकें लंकानाथा। तुज तत्वतां[१] सांगेन ॥ ३६ ॥ पुच्छासी मरण आलें निश्चित। तें मरणभयें झाडा देत। भयें लोकांमाजी लपत। तरी त्यासी मी येथ काय कीजे ॥ ३७ ॥ एकाचे चरण धरित। आणि एकाचे पोटीं गवसत। एकाचे पालवीं[२] झोंबत। जे मरणभयार्थं चुकवावया ॥ ३८ ॥ एकासीं होत शरणागत। एकाचे गळीं पडत। जे विनवूनी लंकानाथ। मरणोन्मुक्त करा म्हणे ॥ ३९ ॥ रावणा मीही करितों विनंती। जे जाजावोनि[३] दहनार्थीं। पुच्छ येतें काकुळती। तरी मरणोन्मुक्ती करीं त्यासी ॥ १४० ॥ ऊरीं शिरीं स्वयें जाळित। त्या नांव म्हणिजे शरणागत। पुच्छें मांडिला भरणावर्त। मरणोन्मुक्त करा म्हणे ॥ ४१ ॥ करावया राक्षसांचा घात। द्वंद्वा पेटला हनुमंत। देखोनि पुच्छदहनावर्त। लंकानाथ चळीं कांपे ॥ ४२ ॥

सर्व लक्ष नतर राजमंदिराकडे वळलें—रावण कपिभयें कांपत। आणि निःशंक बैसला हनुमंत। पुच्छें मांडिला आकांत। दहनावर्तें[४] राक्षसां ॥ ४३ ॥ दशमुखेसीं संमुख। हनुमान बैसला निःशंक। पुच्छें सेना आणि सैनिक। एकैक पोळविले ॥ ४४ ॥ राक्षससैन्यामाझारीं। बोंब सुटली एकसरीं। अग्नि पोळतां ऊरीं शिरीं। पुच्छ महामारीं पेटलें ॥ ४५ ॥ पुच्छ तंव तें अग्निकल्लोळ। लंका वेढिली सकळ। राक्षसें करिती तळमळ। न चले बळ कपिपुच्छीं ॥ ४६ ॥ तंव हनुमान विचारी मानसीं। अग्नि लागला माझे कांसेसीं। तरी परम तृप्ती द्यावी यासी। ऐसें अति उल्लासे वानर ॥ ४७ ॥ विचारितां मूळ अनुवादु। वेदानुवादें सखे बंधु। दोहींचा पिता वायु प्रसिद्धु। परम सुहृदु आत्मत्वें ॥ ४८ ॥ अग्नि वायूचा ज्येष्ठ सुत। आणि कनिष्ठ भेटला हनुमंत। मग सुतें आलिंगिला सुत। तेणें उल्लासत स्वयें वायु ॥ ४९ ॥ ज्येष्ठ बंधु अति वरिष्ठ। भोजनीं लंकाभुवनताट। राजमंदिरीं परवडी[१] श्रेष्ठ। भक्ष चोखट तें ऐका ॥ १५० ॥

घरोघरीं पुच्छप्रवेश व दाह—रावणाचा छत्रदाहो[२]। प्रथम प्राणाहुति पहा हो। माडया गोपुरें[३] गृहसमुदावो। निजनिर्वाहो भोजनीं ॥ ५१ ॥ चंदनमंदिरें तेंचि ओदन[४]। गृहसामग्री तेंचि वरान्न[५]। पताका कथिका[६] ते पूर्ण। आणि घृत जाण मणिमाळा ॥ ५२ ॥ नानापरींचें वृक्षदहन। त्या शाका[७] स्वादिष्ट संपूर्ण। गुप्तधन तें वरी लवण। [८]दधिओदन तृणघरें ॥ ५३ ॥ जालिया तृणघरांचें दहन। मग सर्वेचि उत्तरापोशन[९]। ऐसें ज्येष्ठबंधूसी भोजन। लंकाभुवन अर्पित ॥ ५४ ॥ हनुमान बैसला पूर्वद्वारीं। आणि पुच्छ प्रेरिलें असे नगरीं। अग्नि लावितां घरोघरीं। नरनारी आकांत ॥ ५५ ॥ नवल लाघवी वानर। पुच्छ करोनिया चौफेर। सबाह्य आकळिलें नगर। निशाचरें तळमळिती ॥ ५६ ॥ निर्गम न पुरे नगरीं। जळत पुच्छ नगरद्वारीं। तळमळिती नरनारी। आपापरी राक्षसां ॥ ५७ ॥

नरनारी व नागरिकांची दैन्यावस्था—नेसण्या आगी लावी आधी। नरनारी धांवती नागव्या बिदीं।

---

१ तायलेंकरून. २ पदराला. ३ कटाक्षून. ४ जाळण्याचा सपाटा.

१ प्रकार. २ छत्र जाळणें. ३ मनोरे. ४ भात. ५ वरण. ६ कढी. ७ भाज्या. ८ दहीभात. ९ भोजनांतीचें आपोशन.

हळहळित राक्षसमांदी। सांदोसांदी कळकळिती ॥ ५८ ॥ लेंकीस माय म्हणे तूं का बुची। तंव ते सांगे माझी पोळिली खोची[१]। तव जांवई आला नागवाची। तो देखे सासूची नम्रता ॥ ५९ ॥ मग म्हणे आजि सफळ नयन। जें देखिलें स्त्रियेचें जन्मस्थान। तंव लाजे सासू झांकी नयन। अवघे नम्र हळहळित ॥ १६० ॥ एक पोळती स्तनांतरीं[२] एक पोळती योनिद्वारीं। एक पोळती उरीं शिरीं। गुदद्वारीं पैं एक ॥६१॥ ऐसा राक्षसांसी आकांत। नगरीभोंवता पुच्छावर्त। काळें तोंड लंकानाथ। जें नगरदाहार्थ तेणें केला ॥ ६२ ॥

पुच्छानें सर्व वाटा अडविल्यामुळें जनतेचा कोंडमारा–पुच्छाग्नीनें मारुत्री वानर। तंव तेणें अग्नि केला तीव्र। लंका जाळिली समग्र। निशाचरदेहदाहो ॥ ६३ ॥ निघाल्या नगराबाहेरी। येता जनांचिया हारी। तंव जळत पुच्छ चौफेरीं। लंकापुरी कवळोनी ॥ ६४ ॥ जे जे द्वारीं रिघों जात। तंव पुच्छ धगधगीत तेथ। निर्गम[३] न पुरे अति आकांत। जन भ्रमत अति भ्रांती ॥ ६५ ॥ आगी लावोनि प्रबळ बळी। पाडिले हुडे दुर्गांच्या पौळी। अगड[४] बुजिल्या पैं तळीं। माडिली होळी दुर्गांची ॥ ६६ ॥ हुडे खचती दडदडां। तंव नळीं होत राक्षसां रगडा। सैन्य मारोनि बुजी अगडा। पुढें झगडा जिंतावया ॥ ६७ ॥ पाडोनि दुर्गांच्या पौळी। खंदक बुजिला समूळीं। श्रीराम यावया सवदळीं[५]। वाट मोकळी कपि करी ॥६८॥ लंकानगरींचीं दुर्घटें। जाळिल्या अर्गळा[६] कपाटें। मोकळे सातही दारवंटे। ख्याती मर्कटें लाविली ॥ ६९ ॥

नगराभोंवतीं सुरक्षास्थानें असलेले सर्व भस्मसात्–लंकानगरीसभोंवतें। गडपाळ सैन्य जागृत होतें। तीं तीं स्थळें बळें समस्तें। हटें कपिनाथें जाळिलीं ॥ १७० ॥ दुर्गाभोंवती चौफेरें। भरलीं होतीं अग्नियंत्रें[१]। अग्नि लावितां वानरें। तीं एकसरें सूटती ॥ ७१ ॥ एक वेळ समकाळ सुटले यत्रांचे यंत्रगोळ। नगरीं उठिला हलकल्लोळ। वीर प्रबळ निमाले ॥ ७२ ॥ हनुमान अग्नि वायु तिन्ही। लंका जाळितां तिघी जणीं। तापें तापलीसे धरणी[२]। तेणें सर्पफणा पोळती ॥ ७३ ॥ सर्प पोळोनि फणोफणी। बुडी देती [३]आवरणजीवनीं। तंव शेष पोळेना सहस्रफणी। जे शेषशयनी¶ श्रीराम ॥ ७४ ॥ जेंवी प्रळयकाळींचा अग्नी। राहे सत्यलोका जाळूनी। तैसा लंकादाहें दहनवन्ही। ठेले धांवोनी निराळीं[४] ॥७५॥ लंका जाळितां मारुती। तापें तापली त्रिजगती। लंकाजय अति आवर्ती। जाली शांती राक्षसां ॥ ७६ ॥

रावणाच्या निवासस्थानावर–तंव रावणाच्या राणिवसांत[५]। अग्नि लावी स्वयें हनुमंत। मग रावण बैसला जेथ। आलें तेथ कपिपुच्छ ॥ ७७ ॥ रावणा मांडिला अति आकांत। तेणें राक्षस धाकती समस्त। इंद्रजित झाला शोकाकुळित। लंकानाथ कैंवी वांचे ॥ ७८ ॥ युद्ध करितां मारुती। आम्हुचिया खुंटल्या सर्व शक्ती। मरण आलें लंकापती। कैशा रीतीं वांचेल ॥ ७९ ॥ रावण काढा रे बाहेरी। नातरी पडेल पुच्छजोहरीं। मग दुर्ग पाडोनि निशाचरीं। कष्टांतरी मार्ग केला ॥ १८० ॥ नवल कपिपुच्छाची थोरी। जळत पुच्छ टाकिलें द्वारीं। तेणें निर्गम न पुरे बाहेरी। मग हाहाकारीं गर्जती ॥ ८१ ॥ मग ते काळीं निशाचर। निवडोनियां निधडे वीर। रागें लोटले कपीवर। शस्त्रास्त्रीं सन्नद्ध ॥ ८२ ॥

१ गुह्येंद्रिय. २ हृदयीं. ३ बाहेर पडणें. ४ लवणामधून गेलेल्या वाटा. ५ ससैन्य. ६. अडसर.

१ तोफा. २ पृथ्वी. ३ आवरणोदकामध्यें. ४ आकाशात. ५ जनानखान्यात.

¶व–श्रीरामशयन शेषाचें.

योडणखांडें शूळ त्रिशूळ। परशु पट्टिश गदा मुद्गळ। बाणीं कोंदले नभभूतळ। ऐसा रणकल्लोळ वीरांचा ॥ ८३ ॥ रावणाचे दृष्टीपुढां। होतो निर्वाणीचा झगडा। तंव हनुमान होवोनि गाढा। रणीं वेगाढा ऊठिला ॥ ८४ ॥

मारुतीवर सर्व योद्ध्यांचा मार, परंतु सर्व व्यर्थ— कपीनें बहुतां लाविली ख्याती। तरी आज याची करूं शांती। गर्जोनियां रणविख्याती। शस्त्रसपातीं मारणें ॥ ८५ ॥ कपीस मारावया रोकडे। कवची[1] खड्गी[2] वीर गाढे। सरकोनि थरकोनि चहूंकडे। घाय देव्हडे हाणिती ॥ ८६ ॥ एक कपिपुच्छें आकात। लघुलाघवें चुकवित। संमुख वंचोनि आघात। रणकंदनार्थ मांडिला ॥ ८७ ॥ मग हनुमान विचारी पोटांत। वीर खवळले अत्यद्भुत। यांचा तरी पाहूं पुरुषार्थ। अंगीं घात साहोनि ॥ ८८ ॥ यांच्या शस्त्रांच्या समेळीं। माझी न तुटे रोमावळी। शस्त्रें हाणिता महाबळी। घायातळीं राहिला ॥ ८९ ॥ हनुमान आला घायातळीं। मग वीरीं दिधली आरोळी। म्हणती अवघे बळी रे बळी। जे कपि भूतळीं पाडिला ॥ १९० ॥ संमुख हाणिती तोमर। तंव एक मागोनि हाणिती वज्र। एके वेळे नाना शस्त्र। अति दुर्धर हाणिती ॥ ९१ ॥ वीर वर्षती शरजाळीं। तंव हनुमान पडला घायातळीं। मारुति मारिला आतुर्बळी। पिटिली टाळी सकळिकीं ॥ ९२ ॥ राहिलें उड्डाण किराण। निःशेष याचा गेला प्राण। आमची गाढी आंगवण। भेरी निशाणें त्राहाटिलीं ॥९३॥ वानरें थोर केली ख्याती। परी आम्ही वीर भद्रजाती। जे रणा आणिला मारुती। अति व्युत्पत्ती रणमारें ॥ ९४ ॥ ऐसें अति वाढिवा[3] गर्जती वीर। आणि हरिखें वांटिती साखर। आतां विझवा रे लंकापुर। रणीं वानर पाडिला ॥ ९५ ॥ आतां रण शोधा रे सत्वर। जे कोणी ¶घायीं निमाला कपींद्र। तंव तेथें करोनि भुभुःकार। वेगीं वानर उसळला ॥ ९६ ॥ ऐकतां कपीचें गर्जन। धाकिन्नला दशानन। राक्षसांचे पळाले प्राण। जें अचुक मरण ओढवलें ॥ ९७ ॥ लंका पडिली दहनावर्ती। पळावया वाट नाहीं रिती। आणि पुढें खवळला मारुती। तेणें मरणप्राप्ती राक्षसां ॥ ९८ ॥ तंव सभामंडपींचा थोर। स्तंभ उपटोनि अष्टधार। आणिक कवळोनि निशाचर। घायें चकचूर करीतसे ॥ ९९ ॥ पुच्छें कवळोनि निशाचर सगट। अवघे करोनि एकवट। मग खांब हाणोनि उद्भट। केलें पीठ अवघ्यांचें ॥२००॥ हात पाय ना मनगट। नाडया अस्थि शिर कंठ। आणि पोटापाठीचें करोनि पीठ। केली एकवट अवघ्यांची ॥ १ ॥ ऊर्ध्वगती अधोगती। पुढती नव्हे मरणप्राप्ती। ऐसे राक्षसां मारोनि मारुती। गुणातीतीं[1] ते नेले ॥ २ ॥ इंद्रियें अवघी त्रिगुणवृत्ती। इंद्रियें देवता नानारूप ज्योती। जिवें मारोनियां मारुती। गुणातीतीं ते नेले ॥ ३ ॥ श्रीरामभक्ताचे निजहस्तीं। जे जे निमती[2] मारकयुक्ती। ते ते पावती गुणातीतीं। भक्ताची ख्याती पैं ऐसी ॥ ४ ॥ हरिभक्ताचे दृष्टीपुढें। मरे त्याचें भाग्य गाढें। जिणोनि त्रिगुणांचें सांकडें। पावती रोकडें परब्रह्म ॥ ५ ॥

याप्रमाणें मारुतीचा पराक्रम झाला—असो ऐसें रणव्युत्पत्ती। सैन्य मारिलें मारुती। तंव संमुख जाला लंकापती। मरणावृत्तीं धाकत ॥ ६ ॥ रावण धाकत निजचित्तें। जें सैन्य मारिलें हनुमंतें। आतां आल्या मजभोंवतें। कोण कपीतें निवारी ॥७॥

---

१ कवचे घातलेले. २ हातात तरवार घेतलेले. ३ प्रौढीनें.

१ सत्व रज तम ह्या तीन गुणांपलीकडे. २ मृत्यु पावतात.

¶नकड—घाईं.

अखयाकुमार केला पुरा। इंद्रजितासीं रणभेदरा[1]। आणि रणीं मारिलें निशाचरां। कोण वानरा निवारी ।। ८ ।। रावणा तुझे दाही माथे। कपि म्हणे म्यां तोडावे हातें। परी मज वारिलें श्रीरघुनाथें। जें तुज निजहस्तें मारावें ।। ९ ।। श्रीरामाची मर्यादारेखा। कपीस नुल्लंघवे देखा। तेणें वांचविलें दशमुखा। मरणोन्मुखा[2] चुकवोनी ।।२१०।। ऐसा गांजोनि दशानन। आणि जाळोनि लंकाभुवन। मग कपि परतला आपण। श्रीरामचरण वंदावया ।।११।। सीतेसी घालोनि लोटांगण। आणि तिसी होवोनि अनन्यशरण। कपि परतला आपण। श्रीरामचरण वंदावया ।।१२।। मस्तकमणि घेवोनि खूण। आणि खूण पुसोनि मुखवचनें। कपि परतला आपण। श्रीरामचरण वंदावया ।।१३।। मुखीं श्रीरामनामावृत्ती[3]। आणि हृदयीं श्रीरामाची मूर्ती। देह विकला श्रीरामकीर्ती। अनन्यभक्तीं हनुमंतें ।। १४ ।। श्रीराम देखे सत्सर्वार्थीं। श्रीराम देखे सर्वां भूतीं। देह विकला श्रीरामकार्यार्थीं। अनन्यभक्तीं हनुमंतें ।। १५ ।। †श्रीराम देखे गतीची गती। श्रीराम देखे नयनस्वार्थीं। श्रीराम देखे सर्वांभूतीं। भक्त परमार्थी हनुमंत ।। १६ ।। श्रीरामरूप इंद्रियस्थिती। श्रीरामरूप नानावृत्ती। श्रीरामरूप स्वप्नसुषुप्ती। भक्त परमार्थी हनुमंत ।। १७ ।। एका जनार्दना शरण। जालें ब्रह्मलिखित संपूर्ण। पुढारें श्रीरामागमन। सेतुबंधन अवधारा ।। २१८ ।। स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितहनुमत्प्रतापकथनं नाम त्रयस्त्रिंशत्तमोऽध्यायः ।। ३३ ।। ओंव्या ।।२१८।।

---

१ लढाईचा धाक. २ प्राप्तमरण अशा तुला. ३ रामनामाचा जप.

† ड—श्रीरामु देखे वाच्यवचनार्थीं.

## अध्याय ३४ वा

हनुमताच्या लंकेतील विक्रमाचें संक्षिप्त सिंहावलोकन—

श्रीसीतारामाभ्यां नमः ।। ब्रह्मा म्हणे ब्रह्मलिखितीं। कपीची लिहिली अल्पकीर्ती। त्याहून अगाध हनुमंताची ख्याती। कीर्ति किती लिहावी ।। १ ।। श्रीरामा तुझें हें वानर। लंके आलें पालेखाइर। त्याची कीर्ती अति दुर्धर। मज साचार लिहवेना ।। २ ।। अठरा लक्ष दीपिका पूर्ण। कपीनें पुच्छें विझवोन। रावणसभा करोनि नग्न। दशानन गांजिला ।।३।। रिघोन रावण शयनस्थाना। परिसोनि मंदोदरीचे स्वप्ना। सीताशुद्धि आणी मना। अशोकवना कपि आला ।। ४ ।। देवोनिया श्रीराममुद्रा। सुखी करोनि सीता सुंदरा। गांजावया राक्षसेंद्रा। केला तरुवरां नवभंग ।। ५ ।। मारिलें वनकरां किंकरां। पंच सेनानी प्रधानपुत्रां। जंबुमाळी करोनि पुरा। निशाचरां निर्दळिलें ।। ६ ।। मुख्य मारावया धुरा। प्रथम वोहणी अखया कुमरा। इंद्रजितासी लावोनि भेदरा[1]। अदट[2] वीरां मारिलें ।।७।। राक्षससैन्याचिया श्रेणी। अर्बुदांत[3] पाडिल्या रणीं। रुधिरप्रवाहो धरणी। भूतां पारणी मेदमांसें ।। ८ ।। रणनदीरुधिरस्नान[4]। मेदमांसें आतृप्ति[5] भोजन। भूतें प्रेतें पिशाचगण। रणनर्तन ते करिती ।। ९ ।। दशमुखाची दाढी जाळिली। लंकापुराची करोनि होळी। हनुमान आला तुजजवळी। आतुर्बळी महावीर ।। १० ।। ब्रह्मा म्हणे माझे युक्तीं। धरवली ते लिहिली कीर्ती। मजही न कळे कपीची ख्याती। मी लिखितीं केवीं लिहूं ।। ११ ।। जैसा अवतार श्रीरामचंद्र। तैसाच हनुमंत साचार। वीर धीर महाशूर। गुणगंभीर गांभीर्यें ।। १२ ।। श्रीराम देव हनुमंत भक्त। दोहींच्या स्वरूपाचा इत्यर्थ। करूं नेणती श्रुतिशास्त्र। इत्थंभूत केवीं मी

---

१ धाक. २ बलाढ्य. ३ दशकोट्यवधि. ४ रक्ताची आंघोळ. ५ तृप्तता होईपर्यंत.

जाणें ॥ १३ ॥ श्रीराम जीव हनुमान प्राण। श्रीराम शिव हनुमान ज्ञान । श्रीराम ब्रह्म हनुमान पूर्ण । दोघे परिपूर्ण परब्रह्म ॥ १४ ॥

ब्रह्मलिखिताचे श्रवणानें श्रीरामचंद्रास आनंद व मारुतीस आलिंगन–ब्रह्मयानें लिहिलें ब्रह्मलिखितीं । ऐकोनि हनुमंताची ख्याती । संतोषोनि रघुपती । अति प्रीतीं आलिंगी ॥१५॥ हृदया हृदय लागतां देख। दोन्ही हृदयीं श्रीराम एक। एक तोचि पैं अनेक । अनेकीं एक श्रीराम ॥ १६ ॥ हनुमान अवघाचि रामाआंत । हनुमान सबाह्य श्रीरघुनाथ। लवण[1] समुद्रीं एक होत । तैसा हनुमंत श्रीरामीं ॥ १७ ॥ देवाभक्ताची जाली भेटी। निर्विकल्पें पडली मिठी । परमानंदें कोंदली सृष्टी । आनंदकोटी सुग्रीवा ॥ १८ ॥ विजयी आमुचा हनुमान वीर। वानर करिती भुभुःकार। अवघीं केला जयजयकार। श्रीरामचंद्र स्मरोनी ॥ १९ ॥ अगाध हनुमंताची ख्याती । ऐकोनियां श्रीरघुपती । स्वमुखें आदरिली स्तुती । अति प्रीती हनुमंता ॥ २० ॥ वानितां हनुमंताची कीर्ती । करितां हनुमंताची स्तुती । धणी[2] न पुरे श्रीरघुपती । तेचि श्लोकार्थी अनुवादों ॥ २१ ॥

+श्रुत्वा हनूमतः कीर्तिं यथावदभिभाषिताम् ।
रामः प्रीतिसमायुक्तं वाक्यमुत्तरमब्रवीत् ॥ १ ॥
नूनं हनूमतः कृत्यं सुमहद् भुवि दुष्करम् ।
मनसापि यदन्येन न शक्यं धरणीतले ॥ २ ॥
नहि तं प्रति पश्यामि यस्तरेत महार्णवम् ।
अन्यत्र गरुडाद्वायोरन्यत्र च हनूमतः ॥ ३ ॥
देवदानवयक्षाणां गन्धर्वोरगरक्षसाम् ।
अप्रवेश्या पुरी लंका रावणेनाभिपालिता ॥ ४ ॥
गुप्ता दुर्गगिरेर्मूर्ध्नि वीरेणैकेन धर्षिता ॥ ५ ॥

श्रीरामांनीं केलेली हनुमंताची स्तुती–उल्लंघोनि अपांपती[3] । लंके जावोनियां मारुती । अतर्क्य श्रुतिशास्त्रप्रयुक्ती । ते ते ख्याती येणें केली ॥२२॥ एकें उड्डाणें समुद्रलंघन । करी ऐसा आहे कोण । गरुड वायु कीं वायुनंदन । अन्यत्रा गमन न करवे ॥२३॥ गरुडागमन पक्षगतीं । वायूसीं सर्वत्र गमनशक्ती । एकें उड्डाणें हा मारुती । समुद्रीं ख्याती करोनि गेला ॥ २४ ॥ सुरसा सिंहिका मैनाकगिरी । कपीचा मार्ग रोधिला सागरीं । एका सोडी एका मारी । एकाचा गर्व हरी स्पर्शमात्रें ॥२५॥ अगाध उड्डाणाची थोरी । लंका सांडोनि माघारी । जावोनि पडलंकेभीतरीं । कौंचा सहपरिवारीं वधियेली ॥ २६ ॥ लंकादुर्ग सागरोदरीं । रावण रक्षी सहपरिवारीं । अति दुर्गम गिरिशिखरीं । दुर्धर थोरी गर्वाची ॥ २७ ॥ जया दुर्गाची निरवडी[†] । देव बंदीं तेहतीस कोडी । नवग्रहांचे पायीं बेडी । येरां बापुडियां कोण पुसे ॥ २८ ॥ देव दैत्य गुह्यक दानव । यक्ष रक्ष सिद्ध गंधर्व ॥ पन्नग ऋषीश्वर मानव । कांपती सर्व लंकेशा ॥ २९ ॥ ऐसिया दुर्धर लंकेप्रती । नाहीं साह्य ना सांगाती[1] । एकला रिघोनियां मारुती । [2]अभिनव ख्याती येणें केली ॥ ३० ॥ इंद्रजितें दांतीं धरिलें तृण । ऐसें दुर्धर केलें रण । रावणाचें मुख जाळोन । केलें दहन लंकेचें ॥ ३१ ॥ सीतेची सावकाश घेवोन भेटी । तिच्या पुसोनि गुह्य गोष्टी । मणि घेवोनि जगजेठी । उठाउठीं येथें आला ॥ ३२ ॥

+न चात्मा लघुतां नीतः सुग्रीवश्चापि तोषितः ।
अहं च रघुवंशश्च लक्ष्मणश्च महाबलः ॥ ६ ॥
वैदेह्या दर्शनेनाद्य धर्मतः परिरक्षिताः ॥ ७ ॥

रणकंदन सीताशुद्धयर्थ । सुखी सुग्रीव कपिनाथ । ऐकोनि सीतानिजगुह्यार्थ । श्रीरघुनाथ सुखी जाला ॥ ३३ ॥ ऐकोनि सीताअनुतापवचनें । लक्ष्मण सुखावे जीवें प्राणें । वानरां होतसे सुखपारणें ।

१ मीठ. २ तृप्ती. ३ समुद्र.

+ युद्ध कांड १।१-४.

१ कौशल्य. २ सोबती. ३ विलक्षण.

† ब–निरवडी, क्ष–निवडी. + यु.कां. १।१०-११

कपीचें बोलणें ऐकोनी ॥ ३४ ॥ लघुत्व न येतां वानरजाती । कपीनें केली रणख्याती । तेणें सुग्रीव वानरपती । सुखसंवित्ती[१] पावला ॥ ३५ ॥ करोनि राक्षसकंदनार्थ[२] । कपीनें आणिला सीताशुद्धयर्थ । आम्हां अवघियां पुरुषार्थ । संरक्षित हनुमंत ॥३६॥

हनुमताचें रामनामस्तवन–श्रीरामें करितां स्तुती । हनुमान अति विनतवृत्ती । लोटांगणें घालोनि क्षितीं । स्वयें रघुपतीतें विनवी ॥ ३७ ॥ श्रीरामा तुझी नामशक्ती । तेणें म्यां केली लंकेची ख्याती । त्या मज रंकाची स्तुती । कैंवी रघुपति तूं करिसी ॥ ३८ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषोनि श्रीरघुनंदन । पुढतीं पुसतसे आपण । दुर्गलक्षण लंकेचें ॥ ३९ ॥

+पुनरेवाथ पप्रच्छ राघवः पवनात्मजम् ।
कति दुर्गाणि दुर्गाया लंकायास्तद्ब्रवीष्व मे ॥८॥
बलस्य परिमाणं च द्वारदुर्गक्रियामपि ।
गुप्तिकर्म च लंकायां रक्षसां सदनानि च ॥ ९ ॥
यच्च यावच्च यादृक्च लंकायामभिदृष्टवान् ।
तथा तत्सर्वमाचक्ष्व सर्वथा कुशलो ह्यसि ॥ १० ॥
स पृष्टो राजपुत्रेण रामेणाक्लिष्टकर्मणा ।
आचचक्षे हनुमता यथा दृष्टार्थमर्थवत्* ॥ ११ ॥
परां समृद्धिं लंकायाः सागरस्य च भीमताम् ।
विभागं च बलौघस्य निर्देशं वाहनस्य च ॥ १२ ॥

श्रीरामचंद्रास लंकादुर्गाविषयीं माहिती–लंकादुर्ग हें कैसें काये । कोणाची †कैसी आहे । दुर्गाचें बळ दळसमुदाय । साभिप्राय मज सांगें ॥ ४० ॥ दुर्गद्वारीं क्रियास्थिती । दुर्गाचीं यंत्रें गुप्तगती । द्वाररक्षण सैन्यसंपत्ती । रिघूं ‡निघूं युक्ती मज सांगें ॥ ४१॥ दुर्ग शोधिलें तुवा समुळीं । घेतली लंकेची [३]घरधांडोळी । किती सैन्य रावणाजवळी । आतुर्बळी वीर किती ॥ ४२ ॥ आम्हांसीं मांडिलिया रण । संमुख येती कोण कोण । तूं तंव तेथींचा रणप्रवीण । रणलक्षण मज सांगें ॥ ४३ ॥ श्रीराम राजपुत्रऽ सज्ञान । हनुमंत अनुलक्षोन । पुसिला लंकादुर्गप्रश्न । तेंवी आपण कपि सांगे ॥ ४४ ॥ लंका दुर्गीं† समुद्र आगड[१] । तेणेंकरितां अति अवघड । न कळे सुरासुरांची घडमोड । परम गूढ समुद्रीं ॥ ४५ ॥ मत्त गजांचिया हारी । मद स्रवती लंकानगरीं । मदगंध न माये अंबरीं । मत्त भ्रमरीं झंकार ॥ ४६ ॥ अश्वरथांचिया थाटी । पदरज न माये ऽंबुटीं[२] । सैन्य असंख्य कोट्यनुकोटी । वीर जगजेठी राक्षस ॥ ४७ ॥ लंकादुर्ग अतिशय दुर्धर । खंदकी जळ अपरंपार । माजी मीन नक्र मगर । जळीं जळचरें असंख्य ॥ ४८ ॥ उभवोनि यंत्रावरी यंत्र । परसैन्याचे देखोनि भार । दुरोनि करिती चकचूर । यंत्रभार§ महागोळा ॥ ४९ ॥ नानानिगिया* अति मर्दनी । ज्या शतघ्नी[३] सहस्रघ्नी । दुर्ग चौफेर चहूं कोनीं । यंत्रश्रेणी मारका ॥ ५० ॥ चोरद्वारांची व्युत्पत्ती । इंद्रजित कपटी गुप्तगती । घाला घालोनि रातोरातीं । धुरा[४] मारिती अस्त्रबंधें ॥ ५१ ॥ दुर्गीं शतानुशत द्वारवंटे । मुख्य वागणें चहूं‡ वाटे । आगळा¶ सांखळा घडघडाटें । दृढ कपाटें लोहबंधें ॥५२॥ श्रीरामासीं करावया युद्ध । रावणासी अति आल्हाद । सैन्य सन्नद्ध बद्ध । द्वंद्वयुद्ध धुरेसीं ॥ ५३ ॥

+शैलाग्रे रचिता दिव्या सा पूर्देवपुरोपमा ।
वाजिवारणसंपन्ना लंका परमदुर्जया ॥ १३ ॥

१ सुखानुभव. २ राक्षसास मारण्याचें कार्य. ३ घरांची झडती.

* ब–वित्. † क्ष– + कैंची कैसी. ‡ क्ष–रिघोनि.
+ यु. कां. ३।२,५,८,९.

१ खंदक. २ आकाशात. ३ तोफा. ४ प्रमुख प्रमुख वीर.

ऽ क्ष–प्रश्नसन्मान. † ब–दुर्ग. § ब–मार.
* क्ष–नवनाग अरिमर्दनी; ढ–नाना वाणिभ्या अतिमर्दुनी.
‡ क्ष–च्यार. ¶–गैमा, क्ष–अर्गळा श्रृंखळा.
+ २४,२५,२६,२८.

अयुत रक्षसामत्र पूर्वद्वार समाश्रितम् ।
शूलहस्ता दुराधर्षाः सर्वे खड्गाग्रयोधिनः ॥१४
अर्बुद रक्षसां तत्र पश्चिमद्वारसंस्थितम् ।
नियुत रक्षसामत्र दक्षिण द्वारमास्थितम् ॥१५॥
शतशोऽथ सहस्राणि मध्यम गुल्ममास्थिताः ।
उत्तर द्वारमास्थाय रावण. पर्युपासते ॥ १६ ॥

लंकेची निर्मिती व रक्षणव्यवस्था—*समुद्रमध्य-गिरीचे माथां । वसावया लंकानाथा । लंका करवी विधाता । दुर्गकर्ता विश्वकर्मा ॥ ५४॥ विश्वकर्मा[1]† निजव्युत्पत्ती । लंका निर्मी दुर्गम गती । ते लंकेची दुर्गम ख्याती । म्यां तुजप्रती सांगितली ॥ ५५ ॥ चहूं द्वारीं संरक्षण । भट सुभट वीर दारुण । रावणें ठेविले आपण । रक्षोगण ते ऐका ॥५६॥ पूर्वद्वारीं दहा सहस्र । निधडे निःशंक निशाचर । शूळहस्ती खड्गधर । अति दुर्धर ते द्वारीं ॥५७॥ पश्चिमद्वारीं महाशूर । अर्बुदात महावीर‡ । शस्त्रास्त्रीं प्रवीण निशाचर । ते द्वारीं द्वार रक्षिती ॥५८॥ लक्षानुलक्ष निधडे वीर । रथ गज वाजी महाशूर । ते रक्षिती दक्षिणद्वार । अहोरात्र गर्जोनी ॥ ५९ ॥ उत्तर-द्वाराचा पैं धाक । स्वयें वाहे दशमुख । येणें द्वारें रघुकुळटिळक । आवश्यक येईल ॥ ६० ॥ शतानु-शतें शतानुसहस्री । गुल्मागुल्मीं द्वारोद्वारीं । स्वयें रावण सहपरिवारीं । उत्तरद्वारीं सरक्षी ॥ ६१ ॥ लंकासमुद्राचे बेटीं । वसताहे गिरि त्रिकूटीं । भोंवतीं राक्षसांची घरटी । पारखें[2] दृष्टी कैंची देखे ॥६२॥ लंकादुर्ग अति गूढ[3] । ऐकता वाटे अवघड । तोही केला म्यां निवाड[4] । कडेफोड दुर्गाची ॥ ६३ ॥

+ते मया संक्रमा भग्नाः परिखाश्चापि पूरिताः ।
दग्धा च नगरी लंका साट्टप्राकारतोरणा ॥१७॥
स्थिता पारे समुद्रस्य दूरपारस्य† राघव ।
नौपथश्चापि नास्त्यत्र निरुद्देशश्च सर्वतः ॥१८॥
येन केन तु मार्गेण तराम वरुणालयम् ।
हतेति नगरी लंका वानरैरुपधार्यताम् ॥ १९ ॥

मारुतीच्या दहनामुळें दुर्ग घेणें सुकर झालें—लंका दुर्ग श्रीरघुपती । म्यां पाहिलें जाण निश्चितीं । म्हणसी चोरोनि रातीं चितीं । वीरां रणख्याती लावोनी ॥ ६४ ॥ रावणें पुच्छा लावितां आगी । लंका जाळितां वभयभागीं । वीर मारिले ते प्रसंगीं । रणरंगीं भिडोनी ॥ ६५ ॥ उपऱ्या धवलारें गोपुरें । सप्तखणी दामोदरें । लंका जाळिली घरोनघरें । राजमंदिरें मुख्यत्वें ॥ ६६ ॥ आगळा साखळा दुर्गांचे ओटे । लोहनिबद्धें[1] कपाटें । जाळिले दुर्गांचे दारवंटे । श्रीराममर्कटें हनुम्यानें ॥ ६७ ॥ मत्स्यमगरकुळीं[2] । खंदक भरले होते जळीं । ते म्यां बुजिले समूळीं । दुर्गांच्या पौळी पाडोनी ॥६८॥ दुर्ग जाळितां नानापरी । मुख्य दुर्गवस्तीचा जो गिरी । तो म्यां जाळिला पुच्छेंकरीं । करोनि महामारी राक्षसां ॥ ६९ ॥ रावण करोनियां दीन । म्यां जाळिलें लंकाभुवन । राखिलें बिभीषणाचें सदन । तो भक्त पूर्ण परमार्थी ॥ ७० ॥ जो जो श्रीरामाचा भक्त । तो तो आमचा परम आप्त । रावणाच्या राण्या समस्त । त्याच्या घरांत वांच-विल्या ॥ ७१ ॥ श्रीराम रिघावया समदळीं । सदुर्ग लंका केली होळी । समुद्र तरलिया गोळांगूळीं[3] । लंका तत्काळीं घेतील ॥ ७२ ॥

+दृढा पारे समुद्रस्य दूरपारस्य राघव ।
नौपथश्चापि नास्त्यत्र निरुद्देशश्च सर्वतः ॥२०॥
श्रीरामोक्ति.—तपसा सेतुबंधेन सागरोच्छोषणेन वा ।
सर्वथा हि समर्थोऽहं सागरस्य विलंघने ॥२१

१ देवांचा कारागीर. २ परकी. ३ गुप्त. ४ निर्णय.

* क्ष—समुद्रमध्यें. † ब—कर्मे. ‡ क्ष—निशाचर.
+ २९,३३,२१.

१ लोखंडानें खिळलेलीं. २ मासे, सुसरी यांच्या समुदायांनीं. ३ वानरांनीं.

† ड—दूरे. + ३।२१,२२.

समुद्रापलीकडे जाण्याच्या योजना—समुद्रपारीं निश्चितीं। लंकादुर्गीं रावणा वस्ती। नावांची तेथें न चले गती। मत्स्य गिळिती महामीन॥ ७३॥ मत्स्य मीन आणि मगर। नावा गिळिती महानक्र। समुद्र अतिशयेंसीं दुर्धर। कैंवी परपार पावाल॥ ७४॥ समुद्र तरावया आतां। उपाव चिंतावा सर्वथा। दुस्तर सांगतां हनुमंता। आलें रघुनाथा स्फुरण॥ ७५॥ सोडोनियां अग्निबाण। करीन समुद्राचें शोषण। जळजंतूंचे जातील प्राण। तरी मी आन न करीन॥ ७६॥ तीव्र तप सत्वनिष्ठ। समुद्रीं करोनि पायवाट। वानरवीर सुखें संतुष्ट। परतट पावती॥ ७७॥ समुद्रलंघन तें किती। त्यास कां वेंचूं तपःसंपत्ती। सेतु बांधोनि सिंधूप्रती। नेईन जुत्पत्ती[१] परतटा॥ ७८॥

विजयादशमीच्या मुहूर्तावर मध्यान्हीं प्रयाण करण्याचा सुग्रीवास आदेश—सुग्रीवास पाचारोन। गर्जोनि सांगे श्रीराम पूर्ण। आजचि करावें प्रयाण। रणीं रावण मारावया॥ ७९॥

+अस्मिन्मुहूर्ते सुग्रीव प्रयाणमभिरोचय।
युक्तो मुहूर्तो विजये प्राप्तो मध्यं दिवाकरः॥२२
उत्तराफाल्गुनी ह्यद्य श्वस्तु हस्तेन योक्ष्यते।
अभिप्रयाम सुग्रीव सर्वानीकसमावृताः॥ २३॥
निमित्तानि च पश्यामि यानि प्रादुर्भवन्ति वै।
निहत्य रावणं सीतामाहरिष्ये न संशयः॥२४॥

विजयादशमी सुमुहूर्ती। जयो पावला रघुचक्रवर्ती। प्रपितामह तो आम्हांप्रती। त्याची ख्याती तूं ऐकें॥ ८०॥ शमीतळीं प्रथमवस्ती। धनेश्वर[२] तेचि रातीं। अपार वर्षला संपत्ती। त्रिखुरलें[३†] क्षितीं बहुधन॥ ८१॥ तैंपासोनि अद्यापि जाण। आणावया बहुसाल धन। विजयादशमीस सीमोल्लंघन। शमीपूजन जन करिती॥ ८२॥ पूर्वजांचे सुमुहूर्त। आजि मज जाले प्राप्त। लंकेसी जावया त्वरित। सेना समस्त सिद्ध करीं॥ ८३॥ रणीं दंडावया लंकापती। शुभ लोचन माझे स्फुरती। आलिंगावया सीता सती। बाहु स्फुरती स्वानंदें॥ ८४॥ मध्यान्हीं येताचि आदित्य[१]। रणविजयी अभिजित। प्रयाण करावें निश्चित। ऐसें रघुनाथ बोलिला॥ ८५॥

सुग्रीव अंगदादींना आनंद व प्रयाणाकरितां सैन्यरचना—ऐकोनि श्रीरामाचें वचन। सुग्रीवा आलें अति स्फुरण। भेरी त्राहाटिल्या निशाण। लंकाप्रयाण गडगर्जे॥ ८६॥ अंगद हर्षला तत्काळीं। वानरसेनेंत पिटिली टाळी। रावण मारोनि महाबळी। जनकबाळी आणावया॥ ८७॥ सुग्रीवराजाज्ञेची नीति। वानराची निघती स्थिती। ज्यासी जैसी नेमिली गती। तिहीं त्या रीतीं चालावें॥ ८८॥

+अग्रे यातु बलस्यास्य नीलो मार्गं प्रवीक्षितुम्।
वृतः शतसहस्रेण वानराणां तरस्विनाम्॥२५॥
फलमूलवता नील शीतकाननवारिणा।
पथा मधुमता चाशु सेनां सेनापते नय॥२६॥
सागरौघनिभं भीमं वानराणां महद्बलम्।
कपिसिंहाः प्रकर्षन्तु शतशोथ सहस्रशः॥ २७॥
गजश्च गिरिसंकाशो गवयश्च महाबलः।
गवाक्षश्चाग्रतो यातु गवां दृप्त इवर्षभः॥ २८॥
यातु वानरवाहिन्या वानरः प्लवतां पतिः।
पालयन्दक्षिणं पार्श्वमृषभो वानरर्षभः॥ २९॥
मत्तहस्तीव दुर्धर्षस्तरस्वी गंधमादनः।
यातु वानरवाहिन्याः सव्यपार्श्वमधिष्ठितुम्॥ ३०॥

वानरसेना आज्ञावर्ती। नीळ महावीर सेनापती। तेणें चालावें ऐसिया रीतीं। मार्गगती शोधोनि॥ ८९॥ धाडोनि तरस्वी[२] तराळ[३]। फळ मूळ जळ स्थळ। सेना चालवावी सुखसमेळ। यावें

१ मोठे वीर, मल्ल. २ कुबेर. ३ पसरलें.

+ ४।३,६,७. † क्ष—विस्तरलें.

१ सूर्य. २ जलद चालणारे. ३ गावचा वहीतेदार महार. + ४।१०,११,१५,१८.

तत्काळ पाहोनी ॥ ९० ॥ जिकडे नाहीं फळ मूळ जळ । तिकडे चालवितां दळ । वानर कष्टतील सकळ । सेना विकळ होवों नेदीं ॥९१॥ यालागीं शोधोनि मार्गस्थिती । वानरां पदोपदीं विश्रांती । सेना चालवावी ऐसिया रीतीं । सेनापती सज्ञानें ॥ ९२ ॥ ऐकोनि श्रीरामाचा वचनार्थ । वानर हर्षले समस्त । बाप कृपाळु श्रीरघुनाथ । आम्ही सनाथ श्रीरामें ॥ ९३ ॥ जरी आम्ही वानरें उद्धत । तरी म्हणती रामदूत । हरिखें रामनामें गर्जत । आम्ही सनाथ श्रीरामें ॥९४॥ मार्गगतीचें लक्षण । श्रीराम वदला आपण । नीळें वाळोनि लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ९५ ॥ नीळासवें निज-परिवार । शतसहस्र वानरवीर । अवघ्यांपुढें चाले भार । जयजयकार करोनी ॥ ९६ ॥ गज गवाक्ष शरभ वीर । नीळामागें सहपरिवार । चालिला तिघांचा संभार । जयजयकार करोनी ॥ ९७ ॥ गाईमागें जैसे गोन्हे । नीळामागें तेणें प्रकारें । वानर चालिले निजभारें । जयजयकारें गर्जतो ॥ ९८ ॥ ऋषभ वीर वानरयोधी । तेणें चालावें दक्षिणभागीं । गंधहस्ती गंधमादन दोघीं । वामभागीं चालावें ॥ ९९ ॥ कोट्यनुकोटी वानर-भार । युवराज राजकुमर । अंगदें घेवोनि सहपरिवार । केला नमस्कार श्रीरामा ॥ १०० ॥ निशाणें त्राहाटिल्या भेरी । तडक फुटला एकसरीं । काहाळा चिनकाहाळा थोरी । रणमोहरी गर्जती ॥ १ ॥ जाला तुरांचा गजर । सुग्रीवराजा सह-परिवार । वानरीं केला जयजयकार । संख्यासंभार अवधारा ॥ २ ॥

+शतैः शतसहस्रैश्च कोटिभिश्चायुतैरपि ।
अर्बुदैरर्बुदशतैर्मध्यो परिवृतस्तदा ॥ ३१ ॥

शतानुशत श्यामसुख वानर । गोळांगूळें शत-सहस्र । कोट्यनुकोटी केवळ शुभ्र । असंख्य वानर हेमवर्णी ॥ ३ ॥ एक ते डाळिंबीकुसुमाकार । शेंदुर वर्णी वीर अपार । सुनीळ निळे वानरभार । अंजनाकार असंख्य ॥ ४ ॥ एक [1]बालार्कसम तांबडे । एक ते चंद्रबिंबसम चोखडे[2] । इंद्रचापा-समान वेगाढे । एक रोकडे स्फटिकाचे ॥ ५ ॥ कोट्यनुकोटी अयुतें प्रयुतें । अर्बुदें अर्बुदांतशतानु-शतें । वानरवीर असंख्यात । हरि[3] गर्जत राम-नामें ॥ ६ ॥ ऐसे वानरराजभार । शशांकच्छत्र युग्मचामर । सुग्रीव निघाला राज्यधर । जाला गजर वाद्यांचा ॥ ७ ॥ वृक्ष फळित पुष्पित । किंशुकफुलें झेलित । टकेपताका त्या सैन्यांत । वीर गर्जत रामनामें ॥ ८ ॥ वानरवीरां अत्यंत हरिख । मारोनियां दशमुख । सीता आणावी आवश्यक । देती हाक श्रीरामें ॥ ९ ॥ एक राम-नामें उपरमत । एक ते आनंदें नाचत । वानर-सैन्य उल्हासत । अभिषेकार्थ रामसीता ॥ ११० ॥ श्रीरामांकित आम्ही जुत्पती । रावण बापुडें तें किती । आणोनिया सीता सती । श्रीरघुपती अभिषेकूं ॥ ११ ॥ ऐसा देखोनि सुग्रीवभार । संतोषला श्रीरामचंद्र । निघावया अति सत्वर । केलें विचित्र तें ऐका ॥ १२ ॥

+अधिरुह्य हनूमन्तमिंद्रो गजमिवा प्रभुः ।
अंगदं च समारुह्य लक्ष्मणस्त्वंतकोपमः ॥३२॥
सार्वभौमेन भूतेशो द्रविणाधिपतिर्यथा ।
जाम्बवांश्च सुषेणश्च वेगदर्शी च वानरः ॥ ३३ ॥
ऋक्षराजो महाबाहुः कुक्षिं रक्षतु ते त्रय. ।
जगाम रामो धर्मात्मा ससैन्यो दक्षिणा दिशम् ॥३४॥
मध्ये तु राजा सुग्रीवो रामो लक्ष्मण एव च ।
बलिभिर्हरिभिर्भीमैर्वृतः शत्रुनिबर्हणः ॥ ३५ ॥

हनुमंतावर श्रीरामचंद्र व अंगदावर सौमित्र आरूढ होऊन प्रयाण--इंद्र चढे ऐरावता । तैसा श्रीराम चढे

+ ४।३९

१ उदयकाळाच्या सूर्याप्रमाणें तांबडे. २ स्वच्छ, चांगले. ३ वानर.

+ ४।१९-२१,२४,३२. [?]म–मेघ. [?]ज–+जव.

हनुमंता । अंगद अति उल्लासता । होय उचलिता सौमित्रा ॥ १३ ॥ जैसा भूतारूढ भूतनाथ । तैसा अंगदीं [१]ऊर्मिळाकांत । देखोनि उल्लासे श्रीरघुनाथ । अति उल्लासित सुग्रीव ॥ १४ ॥

दक्षिण दिशेकडे गमन—श्रीरामलक्ष्मण वीर वरिष्ठ । सुग्रीवराजा त्यांनिकट । दक्षिणपंथें घडघडाट । वीर उद्भट चालिले ॥ १५ ॥ सुषेण आणि जांबुवंत । जांबुवंताचा ज्येष्ठ भ्रात । जो कां ऋक्षराज विख्यात । नामसंकेत धूम्राक्ष ॥ १६ ॥ सुषेण वीर जगजेठी । जांबुवंत वीर निकटीं । श्रीराम लक्षोनियां दृष्टी । सुखसंतुष्टी चालिले ॥ १७ ॥ श्रीरामाचे पाठीं जाण । जांबुवंत आणि सुषेण । हेही चालती सावधान । यांसी हें स्थान नेमस्त ॥ १८ ॥ वानरवीर श्रेष्ठ श्रेष्ठ । त्यांसी वांटोनी देती वाट । ऐका सांगेन तें स्पष्ट । वीर वरिष्ठ मार्गभागीं ॥ १९ ॥

+हरिः शतबली भीमः कोटिभिर्दशभिर्वृत. ।
दक्षिणं पार्श्वमासाद्य ररक्ष हरिवाहिनीम् ॥ ३६ ॥
शतकोटिपरीवारः केशरी गवयो गजः ।
रभश्चातिबलः पार्श्वे सैन्यमध्यमपालयत् ॥ ३७ ॥
दधिमुखः प्रजघश्च जंघश्च सरभः कपिः ।
सर्वे पार्श्वेभिधावंतो रक्षणार्थे नृपाज्ञया ॥ ३८ ॥
उल्कामुखः प्रभावश्च इंद्रजानुस्तथा कपिः ।
सर्वतस्ते ययुर्वीराश्चारयतः प्लवगमान् ॥ ३९ ॥

शतबळी नामें कपीश्वर । सेना दशकोटी परिवार । श्रीरामाचा दक्षिणपार । राखे वानर उल्लासें ॥ १२० ॥ केशरी हनुमंताचा पिता सावत्र । अंजनीचा पूर्व भ्रतार । सेना शतकोटिसंभार । वीर वानर आतुर्बळी ॥ २१ ॥ त्याहीसवें वीर प्रबळ । गज गवाक्ष वीर अतिबळ । गवय वानर अति विकाळ । सकळ दळ संरक्षी ॥ २२ ॥ उल्कामुखनामें महावीर । प्रभवनामा अति दुर्धर । इंद्रजानु त्याहुनि थोर । आला सत्वर रामकाजा ॥ २३ ॥ दधिमुख प्रजंघ जंघ । शरभ क्षुरभ कपी अनेग । श्रीरामाचें सैन्य सांग । अष्टदिग्भाग रक्षिती ॥ २४ ॥ रामाज्ञा दुर्धर गाढी । नेमिल्या मार्गांच्या परवडी[१] । चालती वानरांच्या कोडी । समुद्रथडी लक्षोनी ॥ २५ ॥

+आप्लवंतः प्लवंतश्च नदंतश्च प्लवगमाः ।
क्ष्वेडतो विद्रुतश्च जग्मुस्ते दक्षिणां दिशम् ॥४०॥
पुरस्तात्पनसो वीरो नलः कुमुद एव च ।
पथान शोधयतश्च वानरैर्बहुभिर्वृताः ॥ ४१ ॥
केचित्किलकिला चक्रुर्वानरा वनगोचराः ।
प्रास्फोटयश्च पुच्छानि सन्निजघ्नुः पदान्यपि ॥४२॥

मार्ग शोधण्यास व करण्यास पुढें सैनिक पाठविले—समस्तही सीताप्राप्त्यर्थ । वानरां उल्लास अत्यद्भुत । येरयेरांपुढें उडत । उपरमत उल्लासें ॥२६॥ येरयेरांवरी चढती । येरयेरांवरी वहती । येरयेरांतें पाडिती । आसुडती[२] येरयेरां ॥ २७॥ येरयेरां तिरस्कारिती । येरयेरां निखंदिती[३] । येरयेरां कुस्ती घेती । नोकोचिती[४] येरयेरां ॥ २८ ॥ येरयेरां दाविती वांकुली । येरयेरां करिती गुदगुली । रामनामें गर्जती महाबळी । गगनीं आरोळी न समाये ॥ २९ ॥ वाकुल्या दाविती सुग्रीवाकडे । पिलंगती [५]वाढेंकोडें । अवघे नाचती रामापुढें । मातलीं माकडें रामनामें ॥ १३० ॥ [६]सैरां जाता वानरपंक्ती । निशाचरां शिंतरती[७] । मार्ग शोधावयाचे अर्थीं । पुढें जुत्पती पाठविले ॥ ३१ ॥ राक्षस मारोनि उद्भट । पुढील शोधावया वाट । नळ वीर अति उद्भट । वीरवरिष्ठ पैं पनस[८] ॥३२॥ राक्षसांची गती अगती । पनस जाणे अतर्क्यवृत्ती । कुमुद वीर महामती ।

१ ऊर्मिळापति ( लक्ष्मण ). + ,, ३३,३४,३७

१ निरनिराळे भाग. २ ओढतात. ३ हांकून लावतात. ४ चुकवितात. ५ मोठ्या हर्षानें. ६ स्वेच्छेनें. ७ फसविती. ८ या नावाचा वानर. + ,, २७,३१,६६.

राक्षसजातिघातक ॥ ३३ ॥ मार्ग शोधावया जाण। स्वयें श्रीरामें आपण। तिघे धाडिले वीर दारुण। वानरसैन्यसमवेत ॥ ३४ ॥ वानरसेना-समुद्रजळा। नीळ सेनानी तोचि वेळा। आंवरोनि सकळ दळा। [1]वीरागळा§ प्रतापी ॥३५॥ नीळाची निग्रहआज्ञावृत्ती। ऋक्ष वानर आणि जुत्पती। कोणी उल्लंघूं न शकती। प्रतापमूर्ति सेनानी ॥३६॥

+समावृत्य महीं कृत्स्नां जगाम महती चमूः।
ऋक्षवानरशार्दूलैर्नखदंष्ट्रायुधैरपि ॥ ४३ ॥
कराग्रैश्चरणाग्रैश्च वानरैरुद्धतं रजः।
भीममन्तर्दधे लोकं निवार्य सवितुः प्रभाम् ॥४४॥
सपर्वतवनाकाशां दक्षिणां हरिवाहिनी।
छादयंती ययौ भीमा द्यामिवाम्बुदसंततिः ॥ ४५ ॥
उत्तरंत्याश्च सेनायाः सततं बहुयोजनम्।
एव ते हरिशार्दूला गच्छंतो बलदर्पिताः ॥ ४६ ॥

मध्यें न थांबता नीट जाण्याचा आदेश—नेमूनि बोलिला श्रीरघुपती। मध्यें न करोनि वस्ती। आजिचे आजि लंकेप्रती। शीघ्रगतीं स्वयें जाणें ॥ ३७ ॥ ऐकोनि श्रीरामउत्तर। पृथ्वी कवळोनि समग्र। चालिले वानरांचे भार। हातेरें नखदंष्ट्रा ॥ ३८ ॥ श्रीरामनामाचा गुणगुणाचार। चालिले रीस अपार। नामें गर्जती वानर। असंख्य भार चालिले ॥ ३९ ॥ नदनदिया देशोदेशीं। गिरि-कंदरीं विवरासीं। वानर आले रामकाजासीं। मही चौपासीं कवळोनी ॥ १४० ॥ चारी बोटें ठिती क्षिती[2]। नाहीं उरली वानरांहातीं। सोडवावया सीता सती। शीघ्रगती चालिले ॥ ४१ ॥ वानर वीर चालतां धरणी। रजकण कोंदले गगनीं। सूर्य लोपला मध्यान्हीं। काळाच्या मनीं चळकांप ॥ ४२ ॥ सूर्य लोपतां माध्यान्हीं। गाई परतल्या गोठणीं। पक्षी कळकळती गगनीं। देव विमानीं कांपती ॥ ४३ ॥ वानरवीर अहोरात्रीं। वाटे न घेवोनि विश्रांती। सोडवावया सीता सती। शीघ्रगती निघाले ॥ ४४ ॥ श्रीरामकार्याचें निज-सुख। वानरां नाठवे तहानभूक। निद्रा विसरोनि निःशेष। दक्षिणामुख चालिले ॥ ४५ ॥

+ते सह्यं समतिक्रम्य मलयं च महागिरिम्।
वनानि चाप्यतिक्रम्य नदीश्च विमलोदकाः ॥४७॥
आसेदुरानुपूर्व्येण समुद्रं भीमनिःस्वनम्।
सा महार्णवमासाद्य तस्थौ वानरवाहिनी ॥४८॥

विंध्याद्री, मध्याद्री व विविध वनें उल्लंघून समुद्र-तीरीं आगमन—उल्लंघोनि विंध्याद्री। उल्लंघोनि मल-याद्री। नाना वनें वानरीं। क्षणामाझारीं लंघिलीं ॥४६॥ नदी नद थोरथोर। क्षणें उतरोनि वानर। तंव पुढें देखिला सागर। गर्जत घोर गडगर्जें ॥४७॥ ऐकोनि समुद्राचा गजर। श्रीरामनामें घेती वानर। अवघीं केला भुभुःकार। नादें अंबर कोंदलें ॥४८॥ नामें कोंदलें अंबर। नामें कोंदला सागर। नामें कोंदलें चराचर। नामें वानर गर्जती ॥४९॥ गिळोनि समुद्राचा ध्वनी। नाम कोंदलें जीवनीं[1]। नामें कोंदली अवनी। नाम त्रिभुवनीं कोंदलें ॥ १५० ॥

रामसेना व समुद्र यांची तुलना—पुढें जलाब्धि महासागर। पाठीसीं वानरसेनासमुद्र। मध्यें शोभे श्रीरामचंद्र। मर्यादामेरू धैर्याचा ॥ ५१ ॥ गंगा-यमुनासंगमांत। शोभे प्रयागवट मध्यस्थ। तेंवी सैन्यजलसिंधूआंत। शोभे रघुनाथ प्रतापें ॥५२॥ पावोनियां समुद्रतीर। कटक उतरलें समग्र। उल्लंघावया सागर। वानरवीर उल्लासी ॥ ५३ ॥ समुद्रीं महामीन चवकत[2]। तैसेचि वानर तळपत। समुद्रीं मत्स्य उल्लाळे[3] देत। कपि उपरमत आकाशीं ॥ ५४ ॥ अतिशयें निबरा[4] पाठीं। कमठ[5] देखो-निया दृष्टीं। शिळा बांधोनियां पाठीं। वानरकोटी

१ वीररूपी अडसर, २ जमीन.

§ बकदक्ष—वीर मर्गळा. + ,, ५७-६१

१ उदकामध्यें. २ शोभतात. ३ उसळ्या.
४ टणक, कठिण. ५ कासव. + ,, ९६-११०

नाचती ॥ ५५ ॥ तीक्ष्णदंत देखोनि मगर । दांत विचकोनि वानर । स्वयें धांवती त्यासमोर । कपिपुच्छाग्र तोचि फडा ॥५६॥ समुद्रीं मत्स्यांची चळवळ । तैसी वानरां कळवळ । आणावया जनकबाळ[1]। उतावीळ अवघेही ॥ ५७ ॥ समुद्रीं येती दुर्धर लाटा । तैसा वानरीं प्रताप लाठा । वेगीं जावोनि परतटा । दशकंठा मारावया ॥ ५८ ॥ जेंवी रेखा नुलंघवे सागरा । तेंवी श्रीरामआज्ञा वानरां । अवघे आले समुद्रतीरा । लंकापुरा जावया ॥५९॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । श्रीरामा भेटेल बिभीषण । सेतुबंधन अवधारा ॥ १६० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसमुद्रतीरागमनं नाम चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३४ ॥ ओंव्या ॥ १६० ॥ श्लोक ॥ ४८ ॥ एवं ॥ २०८ ॥

॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

## अध्याय ३५ वा

श्रीरामचंद्र व वानरसैन्य समुद्रतीरावर आलें— श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ श्रीराम जगदानंदकंद । श्रीराम सच्चिदानंद । श्रीरघुपति नित्यशुद्ध । नाहीं भवबंध स्मरणें तुझ्या ॥ १ ॥ वानरसेनासंभार[2] । पावोनियां समुद्रतीर । कटक[3] उतरलें समग्र । श्रीरामचंद्रासमवेत ॥ २ ॥

राजमाता कैकसीची चिंता—येरीकडे लंकेआंत । नगर जाळोनि गेला हनुमंत । तेणें कैकसीस आकांत । राक्षसां अंत दृढ आला ॥ ३ ॥

ततः परमदुःखार्ता जननी रक्षसां पतेः ।
सुत वदती वृत्तांतमित्युवाच बिभीषणम् ॥ १ ॥
इष्टान्दारान्मृगयता प्रेषितो हनुमानिह ।
रामेण विनयज्ञेन न तदिष्ट बिभीषण ॥ २ ॥
तदिदं गर्हितं कर्म कृतं भ्रात्रा तवानघ ।
न प्रीणयति मां भुक्तमपथ्यमिव भोजनम् ॥ ३ ॥

कैकसी रावणाची जननी । लंकागडदाहो[1] देखोनी । परम दुःखित होय मनीं । स्रवती नयनीं अश्रुधारा ॥ ४ ॥

बिभीषणाकडे जाऊन रावणाचीं अपकृत्यें व त्याचे परिणाम सांगते—येवोनियां बिभीषणापासीं । निजदुःख सांगे त्यासी । मरण आलें रावणासी । राक्षसांसी कुळक्षयो ॥ ५ ॥ यासीं मूळ तुझा ज्येष्ठ बंधू । चोरोनि आणिली श्रीरामवधू । श्रीराम रावणा करील वधू । सकुळ छेदू राक्षसां ॥ ६ ॥ सीता श्रीरामप्रियकर । शुद्धी घाडिला वानर । तेणें जाळोनियां नगर । निशाचर निर्दळिले ॥ ७ ॥ इंद्रजित आम्हांमाजी उद्भट[2]। कपिनें त्याचें काढिलें[3] चारट[3] । रणीं खवळोनियां मर्कट । दशकंठ गांजिला ॥ ८ ॥ सविष उत्तम पक्वान्न । सेविल्या अवश्य आणी मरण । तैसें सीताभिलाषण । कुळनिर्दळण राक्षसां ॥ ९ ॥ संताना होय निःसंतान । ऐसें अलोट आलें विघ्न । बिभीषणासी आलिंगून । करी रुदन कैकसी ॥ १० ॥ ऐकें श्रीरामाची गोष्टी । जो जो वीर पडला दृष्टी । तो तो निर्दळी शरवृष्टीं । वीर जगजेठी श्रीराम ॥ ११ ॥ ताटका मारिली उठाउठीं । सुबाहु मारिला यज्ञवाटीं । विराध मारिला रणदिग्पटीं । पडिल्या दृष्टी न सोडी ॥ १२ ॥ श्रीराम पदाति[4] एकला जाण । मारिला त्रिशिरा खरदूषण । चौदा सहस्र रक्षोगण[5] । रणकंदन केलें रामें ॥ १३ ॥ कबंध निर्दळिला बळी । आणी निर्दळिला वाळी । सुग्रीव मिनला त्याजवळी । वानरदळासमवेत ॥१४॥ त्यामाजील हनुमंत एक । लंका जाळोनि निःशंक । गांजोनियां दशमुख । लाविला धाक राक्षसां ॥ १५ ॥ येथें आलिया

१ सीता. २ वानरसेनेचा समुदाय. ३ सैन्य.

१ लंकादुर्गाचें दहन. २ बलाढ्य. ३ खोडकी जिरविली. ४ पायांनीं चालणारा. ५ राक्षससमूह.

रघुनाथ। कोण साहेल शरसंपात। होय राक्षसांसी कुळघात। लंकानाथ अविवेकी ॥ १६ ॥

बिभीषणास रावणास उपदेश करण्यास पाठविते– अति गर्वी दशानन। माझी नायके शिकवण। तुझें मानितो वचन। हित संपूर्ण उपदेशीं ॥ १७ ॥ श्रीरामा अर्पोनि सीता। सख्य करावें श्रीरघुनाथा। तेणें कल्याण लंकानाथा। आणि समस्तां राक्षसां ॥१८॥ ऐसी देतां शिकवण। रावण करील अपमान। तोही साहोनि आपण। हित संपूर्ण उपदेशीं ॥ १९ ॥ बिभीषणा तुज परम शांती। सर्वथा क्रोध न ये चित्तीं। करोनि अपमाननिवृत्ती[१]। लंकापती उपदेशीं ॥ २० ॥ ऐसें बोलोनियां वचन। उकसाबुकसीं करी रुदन। माझें वांचवीं संतान। अनन्यशरण आलागीं ॥ २१ ॥

बिभीषणाची तयारी व रावणानें घात केल्यास रामाकडे जाण्याचा बेत–ऐकोनि मातेचें वचन। बिभीषणें वाहिले प्राण। प्राणांत साहोनि अपमान। हित सांगेन लंकेशा ॥ २२ ॥ रावणा हित शिकवितां। सीतासन्निपात लंकानाथा। करूं धांवेल माझे घाता। शरण रघुनाथा मी होईन ॥ २३ ॥

मातेची संमती व वंशरक्षणाबद्दल आशीर्वाद–तूं श्रीरामा निघालिया शरण। तुझेनि माझा कुसवा[२] धन्य। तुझेनि रावणा कृतकल्याण। वंशवर्धन तुझेनि ॥ २४ ॥

कुलं पवित्रं जननी कृतार्था
वसुंधरा पुण्यवती च तेन।
अपारसंवित्सुखसागरेऽस्मिन्
लीनं परब्रह्मणि यस्य चेतः ॥ ४ ॥
तथैव मुक्तश्चरणौ निपीड्य तौ
शुभौ जनन्या विषयेष्वलोलुपः।
कृताभ्यनुज्ञः स यथा कृतांजलि-
र्जगाम रक्षोधिपदर्शनोत्सुकः ॥ ५ ॥

१ अपमानाचा त्याग करून ( अपमान मनात न आणून ). २ कुस.

श्रीरामासी निघाल्या शरण। त्याचेनि कुळ पवित्र पूर्ण। त्याचेनि धरा सुखसंपन्न। तीर्थे पावन त्याचेनि ॥ २५ ॥ शरण रिघल्या श्रीरघुनाथा। कृतार्थ होय त्याची माता। त्याचेनि पूर्वजां होय सुखरूपता। उद्धरी समस्तां समागमें ॥ २६ ॥ त्याचेनि सुखरूप संसार। त्याचेनि सुखी सुरवर। त्याचेनि सुखी चराचर। जे श्रीरामचंद्र सेविती ॥ २७ ॥ श्रीरामासी रिघाल्या शरण। स्वप्नप्राय जन्ममरण। कळिकाळ घाली लोटांगण। श्रीरामचरण सेवित्या ॥ २८ ॥ श्रीराम रावणाचा वैरी। कैकसी त्याचा द्वेष न करी। ऐकोनि मातृवचन थोरी। आल्हाद भारी बिभीषणा ॥ २९ ॥

मातांज्ञेप्रमाणें बिभीषण रावणाकडे जातो–निर्मत्सर मातृवचन। तेणें बिभीषणा हरिख[१] पूर्ण। मस्तकीं वंदोनि तिचे चरण। लोटांगण घातलें ॥ ३० ॥ मातृवचन महाबळी। वोडवोनि[२] कृतांजुळी। हरिखें निघाला रावणाजवळी। जनकबाळी सोडवावया ॥ ३१ ॥ जाता देखोनि बिभीषण। माता करी लिंबलोण। तुझी कीर्ति होईल पावन। सुखसंपन्न तूं होसी ॥ ३२ ॥ माताआशीर्वचनगोष्टी। तेणें बांधिली शकुनगांठी। मग निघाला उठाउठीं। ज्यावया भेटी लंकेशा ॥ ३३ ॥

सभेत रावण त्याचें स्वागत करून अर्धासनीं बसवितो– इंद्रजित अतिकाय पुत्र दोन्ही। सभा शोभत प्रधानीं। रावण बैसला सिंहासनीं। येतां देखोनि बिभीषण ॥ ३४ ॥ उठिले समस्तही राजकुमर। उठिले प्रधान चतुर। बिभीषण होवोनि एकाग्र। केला नमस्कार रावणा ॥ ३५ ॥ रावणें देवोनि सन्मान। अति प्रीतीं बिभीषण। देवोनियां हेमासन। आपणासमान बैसविला ॥ ३६ ॥

बिभीषणाचें रावणाशीं भाषण, लंकेची स्थिति–रावणा सांगे बिभीषण। समस्त मिळाले प्रधान। राक्षसां आलें दुर्धर विघ्न। केलें कंदन हनुमंतें ॥ ३७ ॥

१ आनंद. २ पुढें करून.

+प्रसाद्य भ्रातरं ज्येष्ठं सान्त्वेनोपस्थितक्रमः ।
देशकालार्थसंवादी दृष्टाचारपरावरः† ॥ ६ ॥
यदाप्रभृति वैदेही संप्राप्तेह परंतप ।
तदाप्रभृति दृश्यते निमित्तान्यशुभानि वै ॥ ७ ॥
अग्नीध्रेष्वग्निशालासु तथा ब्रह्मस्थलीषु च ।
सरीसृपा विसर्पंति हव्येषु च पिपीलिकाः ॥८॥

ब्रह्मयाच्या ब्रह्मासनीं । दंश मशक वृश्चिकश्रेणी[1]। समस्त व्याकुळ लंकाभुवनीं । स्वस्थ कोणी असेना ॥ ३८ ॥ हनुमंतें ख्याती केली भारी । हाहाभूत लंकानगरी । सर्व उठिले अग्निहोत्री । हविर्द्रव्यामाझारीं पिपीलिका[2] ॥ ३९ ॥ जाणोनि भविष्याची गती । हित सांगे रावणाप्रती । जैंहूनी आणिली सीता सती । विघ्नांची ख्याती तैंहूनी ॥ ४० ॥ मी कनिष्ठ तूं तंव ज्येष्ठ । बुद्धि सांगों नये स्पष्ट । विघ्न आलें अति अनिष्ट । विचार श्रेष्ठ विचारीं ॥ ४१ ॥ एकलें श्रीरामाचें वानर । मारिले असंख्य निशाचर । विध्वंसिलें लंकापुर । तुम्ही समग्र असतांही ॥ ४२ ॥ तुमचे माथां देवोनि पावो । मारिला अखया महाबाहो । इंद्रजिताच्या जीवा संदेहो । केला दाहो लंकेचा ॥४३॥ तुम्ही असतां समग्र । कोणा न धरवेचि वानर । कैसेनि जिंकवेल श्रीरामचंद्र । पुढें विचार तो कैसा ॥ ४४ ॥ वैर करितां श्रीरघुपती । राक्षसकुळा आली शांती । उपावो सांगेन तदर्थीं[3] । स्वार्थपरमार्थीं उपयोगी ॥ ४५ ॥

§तदेव प्रस्तुते कार्ये प्रायश्चित्तमिदं क्षमम् ।
रोचये वीर वैदेही राघवाय प्रदीयताम् ॥ ९ ॥
प्रायेण चास्य मन्त्रस्य निवृत्तास्तव मंत्रिणः ।
अवश्यं तु मया वाच्यं दृष्टं वा यदि वा श्रुतम् ॥१०॥
सम्प्रधार्य यथान्यायं तद्भवान्कर्तुमर्हसि ॥ ११ ॥

१ विंचवाचे समुदाय. २ मुंग्या. ३ त्यासंबधीं.

† पराक्रम : इति रामायणे ।

+अ. १०।१३,१४,१६. § २२,२४,२६.

सीता चोरून आणल्याची लंकेवर प्रतिक्रिया व पुढील कार्याविषयीं सूचना–तुवां चोरोनि आणिली सीता । तया अपराधा प्रायश्चित्ता । मी सांगेन लंकानाथा । तें तुवां तत्वतां करावें ॥ ४६ ॥ येणें तुज भुक्तिमुक्ती[1] । येणें तुज यश कीर्ती । येणें तुझिया कुळा विश्रांती । जाण निश्चितीं लंकानाथा ॥ ४७ ॥ सकळ पापांचें प्रायश्चित्त । नाम स्मरावें रघुनाथ । तो तुवां सेविल्या सीताकांत । सुखस्वार्थ पावसी ॥ ४८ ॥ आंगीं आदळल्याही विघ्न । उपाय न सांगती प्रधान । विचारीं प्रवेशेना त्यांचें मन । धरोन मौन राहिले ॥ ४९ ॥ देखोनि कपीचा युद्धप्रभाव । पळाली त्यांच्या बळाची हांव । निमाला वाटिवेचा[2] गर्व । परम संदेह प्रधानां ॥ ५० ॥ श्रुत[3] दृष्ट अनुमानचिन्ह । तुज म्यां सांगीतलें येवोन । न सांगतां न राहवे जाण । सखेपण आम्हां तुम्हां ॥५१॥ यावरी पुढील कार्यार्थ । रावें पाहोनि हिताहित । दृढ करावा इत्यर्थ । स्वार्थ परमार्थ जेणें साधे ॥ ५२ ॥

रावणाचा प्रधानावर कोप. प्रधानाचीं भाषणें–ऐकोनि बिभीषणाचें वचन । संतोषला दशानन । प्रधानावरी कोपायमान । अति उद्विग्न स्वयें जाला ॥ ५३ ॥

+लंकायां तु कृतं कर्म दृष्ट्वा घोरं भयावहम् ।
राक्षसेंद्रो हनुमता श्लाघनीयं सुदुष्करम् ॥ १२ ॥
अमात्यानब्रवीत्सर्वान्राक्षसान्राक्षसाधिपः ।
सलज्जो रक्तनयनः कोपात्किंचिदवाङ्मुखः ॥१३॥
दृष्टा तेन च वैदेही प्रविश्यांत पुरं मम ।
तेन वानरमात्रेण प्राकृतेन कुबुद्धिना ॥ १४ ॥

कंदन करोनि राक्षसांतें । लंका विध्वंसिली हनुमंतें । तें देखोनि लंकानाथें । हनुमंतातें मानवला ॥ ५४ ॥ एकला एक वानर । रणरंगीं वीर धीर ।

१ सुखोपभोग व मोक्ष. २ पराक्रमाचा. ३ ऐकलेलें. + ६।१, २.

स्वामिकाजीं महाशूर । दाटुगा[1] वीर मारुति ॥५५॥ प्रधान सेनानी[2] रक्षोगण[3] । त्यांवरी रावण कोपायमान । आरक्त करोनियां नयन । कठिण वचन बोलत ॥ ५६ ॥ कळिकाळा माझी दुर्धर नगरी । ते शोधोनियां लंकापुरी । सीताशुद्धि घेवोनि खरी । करोनि बोहरी[4] कपि गेला ॥ ५७ ॥ अखयादि सेना सैन्यगण । तुम्हांदेखतां केलें कंदन । जळो तुमचें काळें वदन । वाटीववल्गना[5] वृथा जल्प ॥ ५८ ॥ जळो तुमची वाटीवथोरी । जावोनि करा आडविहिरी । नातरी पोटीं घाला सुरी । वानरें नगरी नागविली ॥ ५९ ॥ एकलें एक वानर । तुम्हां न राहवे त्यासमोर । पुढें आलिया श्रीरामचंद्र । युद्धीं समग्र पळाल ॥ ६० ॥

+इत्युक्ता राक्षसेंद्रेण राक्षसास्ते महाबलाः ।
ऊचुः प्राञ्जलयः सर्वे रावणं राक्षसाधिपम् ॥ १५ ॥

कोपला देखोनि रावण । अवघेही प्रधानगण । बोलों लागले आंगवण । सोळा जण साटोपें ॥६१॥ सप्तघ्न आणि यज्ञगोपास्य । यज्ञकेतु आणि दुर्धर्ष । रश्मिकेतु आणि प्रघस । विरूपाक्ष महाबाहु ॥६२॥ वज्रदंष्ट्र आणि धूम्राक्ष । वज्रनाभि आणि विद्युन्मुख । विद्युजिव्ह आणि त्रिशिख । मेघवर्ण महामारी ॥ ६३ ॥ कुंभ निकुंभ दोहींच्या बळा । नाहीं करावया कांटाळा[6] । ऐसे प्रधान सोळा । उठिला पाळा[7] सन्नद्ध ॥ ६४ ॥ रथ वाजि पदाति कुंजर । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध[8] वीर । येवोनि रावणासमोर । स्वबडिवार बोलती ॥ ६५ ॥

+तेऽब्रुवन्रावणं सर्वे प्रदीप्ता इव तेजसा ।
वयं रामं हनिष्यामः सुग्रीवं सहलक्ष्मणम् ॥ १६ ॥
कृपणं च हनूमन्तं लङ्का येन प्रधर्षिता ।
तान्गृहीतायुधान्सर्वान्वारयित्वा बिभीषणः ॥ १७ ॥
अब्रवीत्प्राञ्जलिर्वाक्यं पुनः प्रत्युपवेश्य तान् ॥१८॥

राम व वानरसेनेचा निःपात करण्याची प्रतिज्ञा—
जैशा पतंगाच्या हारी । उडी घालिती वणव्यावरी । तेंवी राक्षस शस्त्रास्त्रीं । श्रीरामावरी निघाले ॥६६॥ रावणा ऐकें सावधान न लागतांचि अर्धक्षण । आम्ही मारूं रघुनंदन । सुग्रीवलक्ष्मणसमवेत ॥ ६७ ॥ आणि जुत्पती थोर थोर । अंगदादि* वानर वीर । रणीं मारोनि समग्र । धरणीं रुधिरप्रवाह ॥ ६८ ॥ जेणें येवोनि लंकेआंत । केला पुरदाहो राक्षसां अंत† । तो मारूं आम्ही हनुमंत । निमेषार्धांत[1] उपडोनी ॥ ६९ ॥ पुढें भरला आहे उदधी[2] । नसतां तरणोपायविधी । अवघे धांवत दुर्बुद्धी । मरणोन्मादीं उन्मत्त ॥ ७० ॥ यापरी ते वीर समस्त । युद्धा धांवती मरणोन्मत्त । त्यांसी बिभीषण निवारित । युक्तायुक्तविचारें ॥ ७१ ॥

तें ऐकून बिभीषणाचा संताप व त्यांची निर्भर्त्सना—
बिभीषण म्हणे तुम्ही वीर । युद्धीं कुशळ अति दुर्धर । न करितां बळाबळविचार । युद्धा समग्र कैंवी जातां ॥ ७२ ॥ श्रीरामाचें एक वानर । मारले कुमर निशाचर । जेव्हां जाळिलें लंकापुर । तेव्हां त्यासमोर कां न व्हां ॥ ७३ ॥ आला देखोनि हनुमंत । तुम्ही रांड महाभिणी ऐसे लपत‡ । आतां मिरवितां महापुरुषार्थ । लंकानाथप्रलोभा ॥ ७४ ॥ अशोकवनीं होतां रण । तुम्ही पळालां अवघे जण । अखया धाडितांचि जाण । घेतला प्राण हनुमंतें ॥७५॥ अखयाचिये कैवारा । धाडितां न देखतां निशाचरा । मग धाडिलें ज्येष्ठ कुमरा । महावीरा इंद्रजिता ॥ ७६ ॥ विश्वासतां तुमच्या बळा । अखया कुमर जीवें गेला । इंद्रजित रणीं गांजिला । लंकेचा केला पुरदाहो ॥७७॥ धिग्धिग् तुमचा पुरुषार्थ । धिग्धिग् तुमचें जीवित्व । वृथा

१ दाडगा. २ सेनापति. ३ राक्षससमुदाय. ४ नाश. ५ शौर्याची बडबड. ६ तुलना. ७ समुदाय ८ तयार.
+ ७।१. + १।५, ६, ७.

१ क्षणात. २ समुद्र.

* डक्ष—रीस आणि. † ड—घात; क्ष—निःपात.
‡ बक—पठत.

चाळवा लंकानाथ । रावण निश्चित महाभोळा ॥ ७८ ॥ रावण भोळें बापुडें । तुम्हासी विश्वासलें वेडें । तुमच्या पोटीं आहे कुडें[1] । हे धडफुडें[2] लक्षेना ॥ ७९ ॥

बिभीषणाच्या दोषाविष्करानें प्रधान लज्जायमान– ऐकोनि बिभीषणाचें वचन । समस्त जाले लज्जायमान । तंव उठिले पंचप्रधान । आपुली आंगवण वानित ॥ ८० ॥ प्रहस्त महोदर पार्श्वद देख । यज्ञहनु आणि दुर्मुख । या पांचांचे पंच श्लोक । अलोलिक[3]§ आंगवण ॥ ८१ ॥ रावणाचिये निजदळीं । प्रहस्त वीर महाबळी । तो आपली प्रतापनव्हाळी[4] । रावणाजवळी सांगत ॥ ८२ ॥

प्रधानाची आत्मप्रौढी. प्रहस्ताची आढ्यता–युद्धामाजी ज्याचे हात । [5]अरिनिर्दळणीं अति समर्थ । यालागीं नांवें प्रहस्त । अति आप्त लंकेशा ॥८३॥

सुव्यक्तं तृषिता भूमिः शोणितं पातुमिच्छति ।
हतानां संयुगेऽस्माभिर्वानराणां महेश्वर ॥ १९ ॥
लक्ष्मणः सह रामेण युद्धेषु शयनं गतः ।
गदाखड्गैश्च पाशैश्च राक्षसैर्बाहुशालिभिः ॥ २० ॥
रणे तालवनाकारं भवत्यद्भुतदर्शनम् ॥ २१ ॥

खड्ग चाप शूळ फरश । गदापाणी[6] वीर राक्षस । मारावया वानरांस । आम्ही बहुत रणयोद्धे ॥८४॥ बहुतकाळाची तृषित भूमी । वानररुधिरें तृप्त करूं आम्ही । रणीं मारूं वानरस्वामी । विजयो आम्ही पावोनी ॥८५॥ लक्ष्मणासहित रामस्वामी । ठायीं पाडोनि रणभूमीं । आम्हांसी विचारिता संग्रामीं । पराक्रमी कोण आहे ॥ ८६ ॥ रामलक्ष्मणां करोनि घात । सुग्रीव अंगदा करोनि अंत । वानर मारीन मी समस्त । तरी प्रहस्त वीर तुझा ॥ ८७ ॥ ताळफळें गळती वनीं । तैशा पाडीन वानरश्रेणी । रामलक्ष्मणां पाडोनि रणीं । अर्धक्षणीं येईन ॥ ८८ ॥

महोदराची गर्जना–ऐसें बोलतां प्रहस्त । महोदर उठिला गर्जत । नरवानरां करीन घात । निजपुरुषार्थप्रतापें ॥ ८९ ॥

इदं मतिमतां मध्ये मतियुक्तो महोदरः ।
उवाच वाक्यं राजेंद्र विशिष्टं विस्मयावहम् ॥२२
ममापि वचनं राजन्वृत्तान्तं श्रोतुमर्हसि ।
राघवं च रणे राजन्हनिष्यामि सलक्ष्मणम् ॥२३॥
निकृत्तानां रणे तावद्वानराणां महेश्वर ।
पिबंति रुधिरं सर्वे राक्षसास्तृषिता इव ॥२४॥

बळवंत बुद्धिवंत । रावणाचा परम आप्त । महोदर निजपुरुषार्थ । असे सांगत साटोपें[1] ॥ ९० ॥ जयाचें कां उदर । दुष्ट दुराशा† दुर्भर । यालागीं नाम महोदर । जेवीं विखार[2] महा उरग[3] ॥ ९१॥ ऐक राया सावधान । मी शस्त्रास्त्रीं प्रवीण जाण । रणीं पाडीन रामलक्ष्मण । विगतप्राण[4] रणरंगीं ॥ ९२ ॥ अंगद सुग्रीव जांबवंत । या जुत्पतींचा करीन घात । वानरसेना समस्त । क्षितीं विख्यात पाडीन ॥ ९३ ॥ वानरांचें पैं रुधिर । तृषार्त प्राशिती निशाचर । ऐसें बोलोनि महोदर । उठे सत्वर युद्धार्थीं ॥ ९४ ॥

महापार्श्वाची आत्मश्लाघोक्ती–महोदर निघतांचि देख । महापार्श्वें दिधली हाक । माझा पुरुषार्थ अलोलिक । स्वयें दशमुखा अवधारीं ॥ ९५ ॥ सकळ पार्षदमुख्यता यासी । म्हणोनि महापार्श्व म्हणती त्यासी । रावणा एकांतवासीं । विचारासीं अति आप्त ॥ ९६ ॥

बृहस्पतिसमो बुद्ध्या समरे च दुरासदः ।
महापार्श्वो रणापेक्षी वचनायोपचक्रमे ॥ २५ ॥

१ कपट. २ खरें. ३ विलक्षण. ४ शौर्याची नवलाई. ५ शत्रुपराभवाचे कामीं. ६ हातात गदा घेतलेले.

§ ड–अलोकिक.

१ मोठ्या आवेशानें. २ मोठ्या विषाचा. ३ सर्प. ४ मेलेले.

† क्ष–दुराशा.

मच्छस्त्रपातात्प्रायेण हनिष्ये रामलक्ष्मणम् ।
राक्षसैर्निहता सेना वानराणां विभागशः ॥२६॥
दृश्यंतु ते मृगेंद्रेण सहताः कलभा इव ।
बाहुभिः पीडिताः संतु गैरिकाणामिवाकराः॥२७॥
अस्माकमपि हस्ताना वागुरा इव बंधनम् ।
स्रवंतु रुधिराण्यगाद्वानराणा क्षतक्षतात् ॥२८॥

तो महापार्श्व आपण। संमुख लक्षोनि रावण। बोले आपुली आंगवण[1]। युद्ध दारुण संग्रामीं ॥ ९७ ॥ बृहस्पतिसमान बुद्धी। दारुण निर्वाणयुद्धीं। वीर धीर त्रिशुद्धी। दुष्टबुद्धी महापार्श्व ॥ ९८ ॥ माझ्या प्रथम शस्त्रघायीं। श्रीरामलक्ष्मणां पाडीन ठायीं। सुग्रीवादि वानर पाहीं। बहुत घायीं लोळवीन ॥ ९९ ॥ माझे¶ बाहु तेचि वागुरा[2]। तेंचि दृढबंधन वानरां। बळें रगडितां कपींद्रां। रुधिरधारा सूटती ॥ १०० ॥ जैसा महामेरु पर्वत। वर्षाकाळीं* असे द्रवत। तैसें वानरांचें रक्त। प्रवाहत देखाल ॥ १ ॥ जैसा पंचाननाच्या[3] चपेटा। लागतां† पडती गजघटा। तैंवी वानरें घायवटा। पडले स्पष्ट देखाल ॥ २ ॥ माझिया शस्त्रघातेंकरीं। वानर पडिले पृथ्वीवरी। राक्षस‡ रुधिरें स्नानेंकरीं। मांसआहारीं अति तृप्त ॥ ३ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण। सुग्रीव आणि वानरगण। म्यां मारिले गा संपूर्ण। ऐसें तूं जाण लंकेशा ॥ ४ ॥ निकटवर्ती[5] मी असतां। रावणा तुज कायसी चिंता। सुखें भोगावी हो सीता। विमानस्था महावनीं ॥ ५ ॥

दुर्मुखाची उक्ती—ऐसें बोलतांचि देख। तंव रागें उठिला दुर्मुख। हनुम्यानें गांजिला दशमुख। तें महादु:ख साहवेना ॥ ६ ॥

१ शौर्य, पराक्रम. २ पाश, जाळें. ३ सिंहाच्या. ४ हत्तींचे समुदाय. ५ जवळ असणारा.

¶ ड—आमच्या बाहू त्याच्या वागुरा. *ड—गैरिकधातुसम; क्ष—गैरधातुस. † ड—रक्षणीं पाडिती. ‡ क्ष—+ शत्रु.

अब्रवीच्च सुसक्रुद्धो दुर्मुखो नाम राक्षसः ।
इदं न क्षमणीय हि सर्वेषां नः प्रधर्षणम् ॥ २९ ॥
अयं परिभवो भूय पुरस्यात-पुरस्य च ।
श्रीमतो राक्षसेंद्रस्य वानरेंद्रप्रधर्षणम् ॥ ३० ॥
अस्मिन्मुहूर्ते गत्वैव निर्वर्तिष्यामि वानरान् ।
प्रविष्टान्सागर घोरमबरं वा रसातलम् ॥ ३१ ॥
अद्य रामं ससुग्रीव परिघेन सलक्ष्मणम् ।
आगमिष्यामि हत्वैको विक्षोभ्य हरिवाहिनीम् ॥३२॥

तो हनुमंत अति दुर्धर। मारीन तरी मी दुर्मुख वीर। गर्जोनि बोले निशाचर। संप्रधार[1] बळाचा ॥ ७ ॥ वानराची चपळवृत्ती। मज येतांचि पळे मारुती। तरी मी त्याची करीन शांती। ऐकें निश्चितीं निर्धार ॥ ८ ॥ अतळ वितळ सुतळ। भेणें लंघिती सप्त पाताळ। तेथेंही धरीन गोळांगुळ[2]। तो मी तत्काळ मारीन ॥ ९ ॥ मजभेणें पळतां सागरीं। उडी घालोनि पुच्छीं धरीं। मग काढीन बाहेरी। भूमीवरी आपटीन ॥ ११० ॥ आधीं मारीन हनुमंत। मग मारीन श्रीरघुनाथ। लक्ष्मणाचा करीन घात। करीन अंत सुग्रीवा ॥ ११ ॥ वानरांची मांदी[3] आली। ते रगडीन घायातळीं। एकला एक आतुर्बळी। तुजजवळी येईन ॥ १२ ॥ दुजयाचा पाहे सांगात। जळो त्याचा पुरुषार्थ। रामलक्ष्मणवानरांत। रणकंदनार्थ माझेनि ॥ १३ ॥

वज्रहनाची गर्जना—दुर्मुखबडीवार[4] ऐकोन। रागें उठिला वज्रहन। संमुख करोनि दशानन। स्वयें गर्जोन बोलत ॥ १४ ॥

ततो वज्रहनुर्नाम राक्षसः पर्वतोपमः ।
क्रुद्धः परिलिहन्सृक्का जिव्हया वाक्यमब्रवीत् ॥३३॥
एकोऽहं भक्षयिष्यामि सर्वेथा हरिवाहिनीम् ।
सर्वे भवतस्तिष्ठतु महाराजेन संगताः ॥ ३४ ॥

१ निश्चय. २ वानर. ३ समुदाय. ४ दुर्मुखाचा प्रताप.

अहं रामं हनिष्यामि सुग्रीव सह लक्ष्मणम्।
अंगद सहनूमत सर्वांश्चैवात्र वानरान्।। ३५ ।।
मोदिता राक्षसा: सर्वे प्रियाभि: सह सगता:।।३६।।

पदाति रथ वाजी[1] कुंजर[2]। सुखें राहोत निशाचर। संहारावया नर वानर। माझें चक्र उदंड[3] ।। १५ ।। प्रहस्त महोदर हरिखें। महापार्श्वादि दुर्मुखें। रावणापासीं राहावें सुखें। वानरकटकें मी जाणें ।। १६ ।। न लगे शस्त्रास्त्रभरण। आम्हांसी न लगे रणांगण। नरवानरांसी मरण। माझेनि जाण जिव्हाग्रें ।।१७।। लक्ष्मणासीं समवेत। प्रथम गिळीन मी रघुनाथ। अंगद सुग्रीव जांबवंत। हनुमंत महावीर ।। १८ ।। नळ नीळ तरस तरळ। सुषेण मैंदादि सकळ। माझेनि दर्शनें वानरदळ। प्रळयकाळ पावेल ।। १९ ।। पर्वताकृति निशाचर। जिव्हेनें चाटितसें वक्त्र। दांत खातसे करकर। नरवानर भक्षावया ।।१२०।। जिव्हा काळी सकंटक। दशन[4] विक्राळ विटंक[5]। येवोनि रावणासंमुख। देवोनि हाक गर्जत ।।२१।। जा रे सांगा लंकानाथा। म्यां मारिलें श्रीरघुनाथा। वधिलें वानरां समस्तां। सुखें तुवां सीता भोगावी ।। २२ ।। आजिपासोनि लंकापुरा। भय नाहीं निशाचरां। स्वभोगीं भोगाव्या निजदारा। सुमनसेजेसीं संयुक्त ।। २३ ।। ऐसे राक्षस बहुवस। मिळोनि अति कर्कश। बोलाचें मिरविताति यश। आलें अपेश चुकेना ।। २४ ।।

त्याच्या दर्पोक्ती ऐकून बिभीषणाचें उत्तर–देखोनि राक्षसांची उद्धतोक्ती। बिभीषण तो महामती। तेणें निवारिलें पुढती। युक्तायुक्तिविभागें ।। २५ ।।

धर्मे चार्थे च कुशलो वीर्येण च समन्वित:।
अब्रवीन्मधुर वाक्यमिद भूयो बिभीषण: ।। ३७ ।।

हात जोडोनि समस्तांप्रती। मृदु मधुर मंजुळवृत्तीं। बिभीषण बोले पुढती। स्वधर्मनीती धर्मार्थ ।। २६ ।। तुम्ही प्रधान बुद्धिवंत। धर्माधर्मविचार येथ। रामरावणांचा वैरार्थ। अधर्म येथ मुख्यत्वें ।। २७ ।। श्रीरामाची दारा[1] हरण। किमर्थ करी पैं रावण। हेंचि वैराचें कारण। प्राणहरण परदारा ।। २८ ।। सीता परम सती सृष्टीं। तिचिया अभिलाषदृष्टीं। रावणाची बुद्धि खोटी। महापापी सृष्टीं हा एक ।। २९ ।।

योग्य उपाय न सागण्याबद्दल त्यास दोष–त्यांसीं न सांगतां बुद्धी। तुम्ही साह्य होतां युद्धीं। यालागीं तुम्ही मंदबुद्धी। महामूढधी प्रधान हो ।। १३० ।। विष खातियाचे पंगतीं। जो बैसे तो मरणार्थी। धरितां पाप्याची संगती। अधोगती पाताळ ।।३१।। विचारोनि बळाबळ। मग करावें युद्ध प्रबळ। तदर्थीं तुम्ही अवघे मूर्ख सकळ। अवघे निर्बळ युद्धार्थीं ।। ३२ ।। सुबुद्धि सांगतां वाटे दु:ख। साच बोलतां वाटे विख। आदिकरोनियां दशमुख। तुम्ही अवघे मूर्ख अविवेकी ।। ३३ ।। त्या अविवेकाचें लक्षण। तुम्हांस सांगेन संपूर्ण। पाहोनि पराची आंगवण[2]। फावल्या आपण युद्ध कीजे ।। ३४ ।। रावण बापुडें भोळें येथ। प्रधान मिथ्यावादी समस्त। जैसे झकवा[3] तैसे झकत। हिताहित जाणेना ।।३५।। कुष्ठियासी कुष्ठ सांगतां। कोप येतसे तत्वतां। कां रांडवेसी रांड म्हणतां। अति क्षोभता संतापे ।। ३६ ।। तेंवी मज सत्य बोलतां। कोप येतसे तत्वता। तरी रावणाच्या हितार्था। यथार्थता बोलेन ।। ३७ ।।

प्रहस्ताचा अधिक्षेप–प्रहस्त म्हणवितो बळी। पुत्र निमाला जंबुमाळी। हनुमान मारीच ते काळीं। रणकल्लोळीं झपटोनी ।। ३८ ।। पुत्रशोकें दु:खाभिभूत। रावणापासीं आला रडत। श्रीरामसौमित्र हनुमंत। मारीन म्हणत तें मिथ्या ।।३९।। मिथ्या

१ घोडे. २ हत्ती. ३ भयकर. ४ दात. ५ घनदाट.

१ स्त्री. २ सामर्थ्य. ३ फसवाल.

† + तो.

त्याचें बळबंड । बोल बोलतो वितंड । प्रहस्ताचें काळें तोंड । परम लंड प्रधान ॥ १४० ॥

तसेंच महोदराची निर्भर्त्सना–मिथ्यावादी[1]महोदर । जें मारिला अखया कुमर । तेव्हां होवोनि कपीसमोर । रणीं वानर न मारीच ॥ ४१ ॥ अखया मारिला देखोन । महोदर पलायमान । आतां मिरवितो आंगवण । रामलक्ष्मण मारावया ॥४२॥ सूर्य जिणावयासाठीं[2] । खद्योत[3] निजतेजें हुटहुटी । तैसी महोदराची चावटी । मिथ्या गोष्टी महामूर्ख ॥ ४३ ॥ इंद्रजित गांजिला सुबद्ध । तेव्हां धांवोनि महापार्षद । हनुमंतासीं न करी युद्ध । पळाला प्रसिद्ध पडलंके ॥४४॥ तो हा मिरवितो आंगवण । मी मारीन रामलक्ष्मण । अंगद सुग्रीव वानरगण । हे चाळवण[4] लंकेशा ॥ ४५ ॥

महापार्श्व, दुर्मुख व वज्रहनु यांचीही तशीच संभावना– यापरी महापार्श्व । वृथा जल्पतां मिथ्यावाद । प्रधानांमाजी महामंद । अति निंद्य नपुंसक ॥४६॥ दुर्मुखाचें काळें मुख । जेव्हां गांजिला दशमुख । तेव्हां वानरासंमुख । युद्धोन्मुख न मारीच ॥४७॥ आतां बोलत बळवाळी[5] । जेणें केली लंकाहोळी । तो मी मारीन जळीं स्थळीं । सप्तपाताळीं शोधोनी ॥ ४८ ॥ लंका जाळिली तुम्हां देखतां । तेव्हां न माराचि हनुमंता । आतां मारीन म्हणतां । लाज सर्वथा असेना ॥ ४९ ॥ असत्यवादी सदा देख । यालागीं नांव दुर्मुख । त्याचें बोलणें एक एक । अवघें लटिक लंकेशा ॥ १५० ॥ वज्रहनु बोलतो बोली । रामलक्ष्मणवानरांसी गिळीं । हनुम्यानें करितां लंकाहोळी । तेव्हां तत्काळीं गिळीचना ॥ ५१ ॥ कपीनें करितां लंकाहोळी । वज्रहनूची बैसे दांतखिळी । धाकें लपाला अर्धजळीं । रायाजवळी तें नव्हता ॥ ५२ ॥

यापरी प्रधानाचे मिथ्या जल्पवाद ऐकू नये व सीता परत करावी–ऐसी प्रधानांची वार्ता । समूळ मिथ्या लंकानाथा । श्रीरामासी अर्पावी सीता । कुळ सर्वथा वांचवीं ॥ ५३ ॥

प्रधान लज्जायमान–ऐकोनि बिभीषणवचन । प्रधान सेनानी रावण । अवघे जाले लज्जायमान । अधोवदन राहिले ॥५४॥ अपमानितां सर्वांसी । देखोनि क्षोभ[1] इंद्रजितासी । तोही आपण अति आवेशीं । बिभीषणासी बोलत ॥ ५५ ॥ पुढील प्रसंगीं अनुवाद । संवादामाजी विवाद । दोघां बंधूंसीं विरोध । परम क्रोध खवळेल ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामासी अनन्य शरण । स्वयें होईल बिभीषण । तेंचि निरूपण अवधारा ॥ १५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणेन रावणप्रधाननिर्भर्त्सनं नाम पंचत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३५ ॥ ओंव्या ॥ ॥ १५७ ॥ श्लोक ॥ ३७ ॥ एवं ॥ १९४ ॥

---

## अध्याय ३६ वा

बिभीषणाचे भाषणांत हनुमत्पराक्रमाचे वर्णनानें सर्व सभा लज्जायमान–श्रीरामचंद्राय नमः ॥ कपिपुरुषार्थ अति प्रचंड । राक्षसांचें बळबंड । प्रताप ऐकतां काळें तोंड । लज्जा वितंड लंकेशा ॥१॥ हनुमंताचें अति प्रबळ । बिभीषणें वानिलें बळ । तेणें राक्षसें सकळ । तळमळ पैं करिती ॥ २ ॥ राक्षस सेनानी प्रधान । अवघे जाले हीन दीन । सभा समस्त लज्जायमान । म्लानवदन दशमुख ॥ ३ ॥ हें देखोनि इंद्रजित । कोपें जालासे कृतांत । बिभीषणासी बोलत । निजपुरुषार्थ वर्णोनी ॥ ४ ॥

+बृहस्पतेस्तुल्यमतेर्वचस्तत्
निशम्य यत्नेन बिभीषणस्य ।
इद बभाषे वचन महामना-
स्तत्रेंद्रजिन्नैर्ऋतराजपुत्रः ॥ १ ॥

---

१ खोटें बोलणारा. २ जिंकण्यासाठीं. ३ काजवा. ४ मोह पाडणें. ५ पुरुषार्थाची फुशारकी.

१ क्रोध. + सु. का. १५।१ २,४,५, ७.

इदं हि ते तातकनिष्ठ वाक्य-
मनर्थकं वै बहुभीतवच्च ।
अस्मिन्कुले योपि भवेन्न जातः
सोपीदृशं नैव वदेन्न कुर्यात् ॥ २ ॥
किं नाम तौ पार्थिवराजपुत्रा-
वस्माकमेकेन निशाचरेण ।
सुप्राकृतेनापि निहन्तुमेतौ
शक्यौ कुतो भीष्यसे स्म भीरो ॥ ३ ॥
त्रिलोकराजः स तु देवराजः
शक्रो मया भूमितले निविष्टः ।
भयार्दिताश्चापि दिशः प्रपन्नाः
सर्वे ततो देवगणाः समग्राः ॥ ४ ॥
सोहं सुराणामपि दर्पहंता
दैत्योत्तमानामपि शोकहर्ता ।
कथं नरेंद्रात्मजयोर्न शक्तो
मनुष्ययोः प्राकृतयोः सुवीर्यः ॥ ५ ॥

इंद्रजिताचा क्रोध, आत्मपराक्रम, प्रौढी व बिभीषणाची निंदा - इंद्रजित बोले कोपायमान । काकाजी तूं तंव धर्मसंपन्न । [1]बुद्धियुक्तिप्रज्ञापन्न । कनिष्ठ वचन कां वदसी ॥५॥ निंदोनि सेनानी रक्षोगण । निर्भर्त्सोनियां प्रधान । रामलक्ष्मणांची आंगवण । परम दारुण वानिसी ॥ ६ ॥ उद्देशून एक एक । तुवां निंदिलें आमुचें कटक । श्रीरामाची आगळिक*। आत्यंतिक† वानिसी ॥ ७ ॥ तूं तंव प्रबुद्ध प्रज्ञाप्राज्ञ ।[2] युवराजाचें महिमान । रायाचें खोंचलें अंतःकरण । ऐसें कठिण कां वदसी ॥ ८ ॥ पाठी थापटिल्या येडका । अधिक हाणी चारी थडका । तैसें सेनानी सैनिका । सन्मान देखा तुवां द्यावा ॥ ९ ॥ सन्मान देतां निजसैन्यासी । अति उल्हास संग्रामासीं । शेखीं त्यांतें निर्भर्त्सिसी । श्रीरामासी वानोनी ॥ १० ॥ राजा‡ तुझा ज्येष्ठ बंधु । तूं अति कनिष्ठ वदसी वादु । तेणें युवराजसंबंधु । अति विरुद्ध वाढला ॥ ११ ॥ जैसा पिता तैसा तुलता । यौवराज्य असे तुझे माथां । ज्येष्ठा निंदोनि लंकानाथा । श्रीरघुनाथा वानिसी ॥१२॥ आमुचा एकैक रक्षोगण । करील दोघांचें भक्षण । त्यासी काइसें रणांगण । रामलक्ष्मण ते किती ॥ १३ ॥ बापुडे रामलक्ष्मण । आमुचे दृष्टीस ते तृण । परीस माझी आंगवण । चरणां शरण नृप येती ॥ १४ ॥ वलयांकित[1] राजे किती । यज्ञ भोगिता अमरपती । तो म्यां आणिलासे क्षिती । लंकेश्वरी कामारा[2] ॥ १५ ॥ आंसडोनियां ऐरावती । आरडत पाडिलासे क्षितीं[3] । दांत उपडोनि घेतला हातीं । त्रिजगती चळीं कांपे ॥ १६ ॥ माझी ऐकतांचि हाक । सुरगण एकाएक । अवघे पळती अधोमुख[4] । जैंवी कां रंक अति दीन ॥ १७ ॥ इंद्रासहित अमरकोडी[5] । ते म्यां घातले बांधवडीं[6] । तेथें काइसी रामाची प्रौढी । साह्य माकडीं वानिसी ॥ १८ ॥ अंगद सुग्रीव हनुमंत । नळ नीळ जांबुवंत । राक्षसां भक्ष्य हे समस्त । दांता दांत न लागतां ॥ १९ ॥ मनुष्य आमचे आहारीं । वानरें तंव कोशिंबिरी । त्यांसी कायसी झुंजारी । क्षणामाझारी मारीन ॥ २० ॥ रणीं भिडोनि साटोपता । करीन श्रीरामाच्या घाता । रावणें सांडोनि सकळ चिंता । सुखें सीता भोगावी ॥ २१ ॥ राम आणि लक्ष्मण । रणीं पाडीन विंधोनि बाण । निर्दळीन वानरगण । आंगवण पाहें माझी ॥ २२ ॥

---

१ बुद्धि, युक्ति आणि ज्ञान यांनीं युक्त. २ प्रौढबुद्धीचा पंडित.

* क्ष–आंगवन. † परम दारुण.

१ समुद्रवलयांकित पृथ्वीचे, अर्थात् सार्वभौम. २ दास असा. ३ पृथ्वीवर. ४ खालीं तोंड घालून. ५ देवांच्या कोटी. ६ बंदींत.

‡ इक्ष–तू रायाचा कनिष्ठ बंधु.

बिभीषणाचा कोप व इंद्रजितास उत्तर—निंदोनियां श्रीरघुनंदन। ऐकतां इंद्रजिताचें वचन। बिभीषण कोपायमान। काय आपण बोलत ॥ २३ ॥

+अथेंद्रकल्पस्य महारथस्य
महौजसस्तद्वचनं निशम्य।
ततो बभाषे वचनं महार्थं
विभीषणो धर्मभृतां वरिष्ठः ॥ ६ ॥
न तात मन्त्रे तव निश्चयोऽस्ति
बालस्त्वमद्याप्यविपक्वबुद्धिः।
तस्मात्त्वयाप्यात्मविनाशनाय
वचोऽर्थहीनं बहु विप्रलब्धम् ॥ ७ ॥
पुत्रप्रवादेन तु रावणस्य
त्वमिंद्रजिन्मित्रमुखोऽसि शत्रुः।
यस्येदृशं राघवतो विनाशं
निशम्य मोहादनुमन्यसे त्वम् ॥ ८ ॥
त्वमेव वध्यश्च सुदुर्मतिश्च
स चापि वध्यो य इहानयत्त्वाम्।
बालं दृढं साहसिकं च योऽद्य
प्रावेशयन्मन्त्रकृतां समीपम् ॥ ९ ॥

ऐक इंद्रजिता साचार। तूं तंव अपक्व बालत्व अहंकार। माध्याचा वाळला नाहीं जार। स्वहित-विचार तुज नाहीं ॥ २४ ॥ अवधारीं विचारें विचारकोटी। विवेक धरोनियां पोटीं। समूळ ऐकें माझी गोष्टी। स्वहितदृष्टी तुज नाहीं ॥२५॥ स्वहितदृष्टी तुज नाहीं। जें बोलसी तें मिथ्या पाहीं। त्याही बोलाची नवलाई। मूळान्वयीं अव-धारीं ॥ २६ ॥

श्रीराम पराक्रम-वर्णन—म्हणसी आमचा एक रक्षोगण। भक्षील रामलक्ष्मण। ऐकोनि श्रीराम-आंगवण। मिथ्या भाषण कां वदसी ॥ २७ ॥ बाळपणीं विंधोनि बाण। ताटकेचा घेतला प्राण। सुबाहु मारिला करितां रण। सैन्यगणसमवेत ॥ २८ ॥ बाणपिसारें सुटला वारा। तेणें मारीच उडविला अंबरा। श्रीराम अंतक[1] निशाचरां। तूं निदसुरा उन्मादें ॥ २९ ॥ स्वयंवरीं वाहतां कोदंड। रावणाचें जालें काळें तोंड। तें श्रीरामें केलें दुखंड। बळें प्रचंड श्रीराम ॥ ३० ॥ येचि सीतेचे अभिलाखा। विराध मारिलासे देखा। तेचि गति दशमुखा। तुम्हां मूर्खांचेनि बोलें ॥ ३१ ॥ शूर्पणखेनें करितां छळणा। स्वयें मुकली नाककानां। गाऱ्हाणें देतसे खरदूषणां। तेही जाणा मारिले ॥ ३२ ॥ त्रिशिरा आणि खरदूषण। चौदा सहस्र रक्षोगण। रामें मारिले करोनि रण। दुर्धर बाण वर्षोनी ॥ ३३ ॥ नाहीं सैन्य रथ-संपत्ती। एकला श्रीराम पदाती[2]। त्याची ऐसी ऐकोनि ख्याती। तूं कां दुर्मति वदलासी ॥ ३४ ॥ नकट्या शूर्पणखेच्या बोलीं। रावणें पापबुद्धि केली। सीता चोरितां भीक लागली। तैसी आली अव-दसा ॥ ३५ ॥ चोरावया परनारी। राजा आणि होय भिकारी। जळो ते [3]वाटिवेचि थोरी। निर्लज्ज भारी तूं एक ॥ ३६ ॥ दुजी वाटीव लंकानाथा। मरण देवोनि मारीचमाथां। छळोनि सुमित्रेच्या सुता। चोरोनि सीता पळाला ॥३७॥ लक्ष्मणाची मर्यादारेखा। नुलंघवेचि दशमुखा। मिथ्या बोलां बळआवांका[4]। काळमुखा पुरुषार्थ ॥ ३८ ॥ जटा-यूसीं करितां रण। रावणें दांतीं धरिलें तृण। त्यासी मारिलें करोनि छळण। पापी पूर्ण तुम्ही एक ॥ ३९ ॥ चोरी मारी पापी [5]परद्वारी। इतुकें रावणाचे शिरीं। तेथें तुझें ज्येष्ठत्व* भारी। बाजीगिरी[6] जैसी[†] विद्या ॥४०॥ म्हणसी जिंतिला ऐरावती। आणि जिंतिला अमरपती। सुरवरांसी लाविली ख्याती। श्रीरामाप्रती तें न[‡] चाले ॥४१॥

+ अ. १९, ८-११.

१ काळ. २ पादचारी. ३ पराक्रमाची. ४ आपल्या बळाची वाखाणणी ५ परस्त्रीची इच्छा करणारा. ६ गारुडी विद्या.

* श्रेष्ठत्व. † क्ष—जेविसी. ‡ इ—विशादी. ‡ ड—मशकें.

वरुणशक्रब्रह्मादि ईश । हे श्रीरामाचे अंशानुअंश । हें तूं नेणसी बाळभाष्य । जगीं जगदीश श्रीराम ॥ ४२ ॥ म्हणसी दमिला ऐरावती । चरणीं शिळा उद्धरती । श्रीरामाची परम शक्ती । बाळमती[१] तूं नेणसी ॥ ४३ ॥

व पापकर्मास पाठिंबा केल्याबद्दल त्यास दोष—बोलसी स्वयें निजपुरुषार्था । मी मारीन श्रीरघुनाथा । रावणें सुखें भोगावी सीता । परदारता तूं महापापी ॥ ४४ ॥ रायासी सांगतां पापबुद्धी । तो वधावा सभेमधीं । राजपुत्र तूं दुर्बुद्धी । महामूढधी कुळघाती ॥ ४५ ॥ तूं एक मारिल्या जाण । सकळ कुळासी कल्याण । हे बुद्धि नायकतां रावण । कुळनिर्दळण पावेल ॥ ४६ ॥

इंद्रजिताचे वल्गनेचा आविष्कार—इंद्रजित बोलतो निजबळ । तें तें मिथ्या पैं समूळ । सभा सर्वज्ञ ऐका सकळ । रायें प्रांजळ परिसावें ॥ ४७ ॥ प्रलोभावया[२] लंकानाथा । मारीन म्हणसी तूं रघुनाथा । हनुमंतेंसीं युद्ध करितां । तुझे पुरुषार्था देखिलें ॥ ४८ ॥ हनुमंतासीं रणीं भिडतां । शस्त्रें अस्त्रें गेलीं वृथा । कपिपुच्छ वाजतां माथा । धीर सर्वथा न धरवे ॥ ४९ ॥ दुर्धर शस्त्रांचे संपात । वानरें झेलोनि समस्त । तुझ्या सैन्या केला घात । रणीं हुंबत§ पाडिलें ॥ ५० ॥

हनुमतापुढें इंद्रजिताची असहायता—सांगावया लंकेआंत । कोणीहि नुरेचि जीवंत । कपीनें अवघियांचा केला घात । तुजदेखत इंद्रजिता ॥ ५१ ॥ त्यांची करावया सोडवण । तुझी न चलेचि आंगवण । कपीनें गांजिलें संपूर्ण । घायें प्राण जावों पाहे ॥ ५२ ॥ लघुलाघवी हनुमंत । मारिला सारथी भंगिला रथ । रणीं इंद्रजित केला विरथ । छत्रपात कपिपुच्छें ॥ ५३ ॥ मल्लविद्येची कुसरी । चपेट हाणितां वरी शिरीं । अशुद्ध वमितां जालासी चांचरी[१] । पळावया दुरी ठाव नाहीं ॥ ५४ ॥ तुझ्या युद्धाची गति ऐसी । फावल्या मारावया शत्रूसी । नातरी पळावें मेघापासीं । कपिपुच्छासीं तें न चले ॥ ५५ ॥ पडिलें पुच्छाचें विरडें । सरों नये मागेंपुढें । इंद्रजित खळखळां रडे । वानरें गाढें गांजिलें ॥ ५६ ॥ रडत पडत [२]अशुद्ध वमित । कपिपुच्छाभेणें धांवत । पळोनि गेलासी विवरांत । मुख्य पुरुषार्थ हा तुझा ॥ ५७ ॥ रायासंमुख निजनिर्धारीं । म्हणसी एकला मी श्रीराम मारीं । मिथ्या जल्पसी सभेमाझारीं । निर्लज्ज भारी तूं एक ॥ ५८ ॥ वानरा रणीं देवोनि पाठी । पळालासी वठावठीं । ऐसी तुझी वाटीव मोठी । समूळ खोटी बुद्धि तुझी ॥ ५९ ॥

त्याच्या मिथ्या प्रौढीचे परिणाम—तुझी ऐकतांचि बुद्धी । रावण मरेल आधीं । मरेल राक्षसांची मांदी[३] । कुळ त्रिशुद्धीं[४] बुडेल ॥ ६० ॥ रायासंमुख आपण । सभेसीं वदे मिथ्या वचन । त्याचें काळें करोनि वदन । जिव्हा कर्ण छेदावे ॥ ६१ ॥ राजनीति ऐसी येथ । कुळघातकी मारावा सुत[५] । जेणें आणिला सभेआंत । तोही निश्चित मारावा ॥ ६२ ॥ जेणें प्रवेशिला द्वारीं । तोही मारावा निर्धारीं । कायसी इंद्रजिताची थोरी । निशाचरीं कुळपाश[६] ॥ ६३ ॥ रावणाचा ज्येष्ठ सुत । यालागीं राखिला म्यां हात । तुझा अवश्य करावा घात । कुळक्षयार्थ चुकवावया ॥ ६४ ॥

बिभीषणाच्या भाषणानें सर्व सभा स्तब्ध—ऐकोनि बिभीषणाची मात । प्रधानसैनिकवीरांआंत । वाढला क्रोधाचा [७]आवर्त । जाला कृतांत लंकेश ॥ ६५ ॥

संक्रुद्धास्ते यतस्तत्र बहवः प्रियवादिनः ।
मुह्यमानाश्चोपहासं ते चक्रुः सहरावणाः ॥१०॥

१ पोरकट बुद्धीनें. २ संतोषविण्याकरितां.

§ ड—बहुत.

१ घाबरा, व्याकुळ. २ रक्त. ३ समुदाय. ४ खरोखर. ५ मुलगा. ६ कुळास बट्टा लावणारा. ७ भोंवरा.

रोषाच्चान्ये प्रजहृशुर्भृशमन्येतिनिःश्वसन् ।
समीक्ष्यान्योन्यमाजल्पन्वभक्षुर्दशनानपि ॥११॥
तस्मिंस्तथोक्ते वचने महापार्श्वः प्रतापवान् ॥१२॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । प्रधान झाले कोपायमान । सेनानी वटारिले नयन । खाती दशन[1] सेनाधर ॥ ६६ ॥ एक अधरोष्ठ चावती । एक करकरां दांत खाती । एक ते हात कुस्करिती । एक वळिती वज्रमुष्टि ॥ ६७ ॥ बिभीषणाचे उत्तरीं । एक निश्चित धुधुःकारी । एक हांसती क्रोधाकारीं । क्षोभोनि सारे डुलत ॥ ६८ ॥ एक परस्परें बोलत । बिभीषण जाला उन्मत्त । इंद्रजितातें मारीन म्हणत । संमुख वदत लंकेशा ॥ ६९ ॥ चोरी मारी पापी परद्वारी । ऐसें बिभीषणाचे उत्तरीं । रावण खोंचला जिव्हारीं[2] । क्रोधें करी तळमळ ॥ ७० ॥ सन्मुख न राहवे वानरीं । पळोनि गेलासि तूं विवरीं । इंद्रजित लाजिला ये उत्तरीं । मौन धरोनि राहिला ॥ ७१ ॥ बिभीषणासीं संमुख । बोलों न शकेचि दशमुख । मग इतर कोण बोले रंक । टकमक अवघ्यांसी ॥७२॥ एक बोलती सर्वज्ञ । बिभीषणाचें धर्मवचन । न मानितांचि दशानन । कुळनिर्दळण सपुत्र ॥ ७३ ॥

तें पाहून महापार्श्वाची दर्पोक्ति–सभा देखोनि तटस्थ । महापार्श्व उठिला गर्जत । बिभीषण जालासे उन्मत्त । राजा राजसुत निंदिला ॥७४॥ संमुख निंदिला राजा रावण । वानितो श्रीरामाचे गुण । याची येथें भीड कोण । अवघे जण काय पाहती ॥ ७५ ॥ युवराज प्रतापसिंधु । रावणाचा कनिष्ठ बंधु । येणें सांडिला सुहृदसंबंधु । याचा वधु करावा ॥ ७६ ॥ मारा न म्हणेचि लंकानाथ । तरी आम्ही करूं याचा घात । गलका उठिला सभेआंत । अति उन्मत्त हा जाला ॥ ७७ ॥

१ दात. २ मर्मस्थानीं.

बिभीषण शांतपणें स्वस्थ व महापार्श्वाची उपेक्षा–बिभीषणाची शांति भारी । क्रोध न येचि तिळभरी । मारावा म्हणतां निशाचरीं । भय भीतरीं बाधेना ॥ ७८ ॥ जैसा सागर अगाध । तैसा बिभीषणाचा बोध । निंदोनि बोलिला महापार्श्वंद । स्वयें विषाद न मानीच ॥ ७९ ॥ जेंवी सिंहापासीं घुंगुरडें । तेंवी महापार्श्व बिभीषणापुढें । विरुद्ध बोलतां कैवाडें[1] । कोपा न चढे बिभीषण ॥ ८० ॥ महापार्श्वेंसीं बिभीषण । स्वमुखें न बोलेचि आपण । तृणप्राय उपेक्षून । धरिलें मौन निजशांती ॥८१॥

बिभीषणाच्या अनुचराचें भाषण–बिभीषणाचा अनुचर[2] । परम आप्त प्रधान हेर । महापार्श्वेंसीं उत्तर । गिरा गंभीर बोलिला ॥ ८२ ॥ बंधुबंधुचिया निजहिता । राजा युवराज बोलतां । तूं कां मधें कुंथसी वृथा । महामूर्खता तव आंगीं ॥८३॥

राजपुरुषाचे संभाषणांत अनुचराची लुडबुड कशाला ?–दोनी धुरा अति आप्तता । स्वहिताचा विचार न करितां । मध्यें बोलों नये सर्वथा । बोले तो तत्वतां महामूर्ख ॥ ८४ ॥ जैसा राजा रावण । तैसाच युवराज बिभीषण । त्यांसी बोलतां कठिण । तुझा प्राण वांचेना ॥ ८५ ॥

न ते महापार्श्व जिजीविषास्ति
त्वं रावणस्य प्रियकुक्षिकामम् ।
विभीषणं वाक्परुषं ब्रवीषि
†राजस्तवार्थं तरसा निहंसि ॥ १३ ॥
अयं सुनीतेः कुरुते सुवाक्य
व्यर्थं कथ निंदसि मूढबुद्धे ।
प्रकोपितेनापि कृते सुमंत्रे
त्वया महापार्श्वेन न कुत्सनीयाः ॥ १४ ॥

रावणाच्या कनिष्ठ बंधूसीं । संवाद करितां धुरेसीं । तूं कां वृथा निंदा करिसी । निजप्राणासी मुकावया ॥ ८६ ॥

१ कैवार घेऊन. २ सेवक.

† श.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ग्रंथालय

राजनीति अशी आहे–ऐसी आहे राजनीती। दोनी धुरा संवाद करिती। त्यांमाजी मध्यें निंदा करिती। त्यांतें मारिती नृपनाथ ॥ ८७ ॥ राजा युवराज निजहितीं। वाद करित राजनीतीं। येरयेरांतें[1] निखंदिती[2]। तेथें तूं किती रे मशका ॥ ८८ ॥ बंधुवंधूंच्या हितानुवादीं। युक्ति निग्रह[3] येती क्रोधीं। तेथें महापार्श्वा तूं दुर्बुद्धी। निंदानुवादीं जल्पसी ॥ ८९ ॥ आला देखोनि हनुमंत। राया देखतां तुम्ही पळत। आतां वाटिवे गर्जत। अति समर्थ निर्लज्जत्वें ॥ ९० ॥ तुम्ही राक्षसें रणीं दीन। नपुंसकाहूनि हीन। वाटिवे †चाळवा[4] दशानन। अति बोलोन§ पुरुषार्थ ॥ ९१ ॥ श्रीरामाचें एक वानर। मारिला अखया सैन्य समग्र। दमिला इंद्रजित ज्येष्ठ कुमर। लंकापुर जाळोनी ॥ ९२ ॥ वानर वनचर पालेखाइर। त्यापुढें पळाले समग्र। येथें आलिया श्रीरामचंद्र। दुर्धर शर कोण साहे ॥ ९३ ॥ सुटल्या श्रीरामाचा बाण। राक्षसकुळासी निर्दळण। तदर्थीं[5] हितवादी बिभीषण। तें रावण नायके ॥ ९४ ॥ सीता अर्पोनि श्रीरघुपती। स्वस्थ राहावें समस्तीं। ऐसी बिभीषणाची युक्ती। तूं कां कुत्सितोक्तीं निंदिसी ॥ ९५ ॥

महापार्श्व लज्जायमान–ऐकोनि हेराचें वचन। महापार्श्व लज्जायमान। खालतीं घालोनिया मान। दीनवदन राहिला ॥ ९६ ॥

ततः सदातिगंभीरः सत्यवादी जितेंद्रियः।
अब्रवीद्रावणं धीमान्पुनरेव बिभीषणः ॥ १५ ॥
यावद्धि केशग्रहणात्सुहृद्भिः
समेत्य सर्वैः परिपूर्णकामैः।
निगृह्य राजन्परिरक्षितव्यो
भूतैर्यथा भीमबलैर्गृहीतः ॥ १६ ॥

१ परस्परांना. २ धिक्कारतात. ३ मनाचें आकलन. ४ आशेस लावता. ५ त्याकरितां.

† इक्ष–वाटिवा चालिया. § इक्ष–बग्गोळी.

परस्ववीर्यं स्वबलं च बुद्ध्वा
स्थानं क्षयं चैव तथैव वृद्धिम्।
तथा स्वपक्षेप्यनुमृश्य बुद्ध्या
वदेत्क्षमं स्वामिहितं स मंत्री ॥ १७ ॥

बिभीषणाचें पुनर्भाषण व भावी दुष्परिणामाचें आविष्करण–सत्त्ववंत धैर्यवंत। वीर्य माधुर्य बुद्धिवंत। ऐसा बिभीषण क्षमायुक्त। रावणहितार्थ बुद्धि सांगे ॥ ९७ ॥ बुद्धि सांगतां पुढतपुढती। न माने रावणाचे चित्तीं। तरी सांगे पुनरावृत्ती। सीता रघुपती अर्पावया ॥ ९८ ॥ प्रहस्त महापार्श्व महोदर। इंद्रजित मुख्य कुमर। शुकसारणादि थोर थोर। ऐका समग्र बुद्धि माझी ॥ ९९ ॥ करोनि रावणा केशाकर्षण। सुबुद्धि सांगेन आपण। सीता करावी रामार्पण। कुळनिर्दळण चुकवावया। ॥ १०० ॥ भूत लागलें हो ज्यासी। मंत्रवादी आहटी धरोनि केशीं। तेंवी सुबुद्धि सांगें रावणासी। सीता श्रीरामापासीं अर्पावया ॥ १ ॥ सीतासन्निपात रावणासी। तेणें कुळक्षयो राक्षसांसी। यालागीं धरोनियां केशीं। सुबुद्धि त्यासी शिकवीन ॥ २ ॥ याचि नावें परम आप्त। याचि नावें सुहृद समस्त। अपायीं[1] पडतां लंकानाथ। त्यासी निश्चित वांचवावें ॥ ३ ॥ कुटुंब निजवोनि गृहाप्रती। जो गृहा दाहा[2] करी प्राप्ती[?]। त्यासी सज्ञान निवारिती। तैसी गती रावणा ॥ ४ ॥ करितां श्रीरामासीं वैर। समस्त मरती निशाचर। सपुत्र मरेल दशशिर। प्रतिज्ञोत्तर हें माझें ॥ ५ ॥ श्रीरामाचें एक वानर। त्यापुढें पळालेति समग्र। सुटल्या श्रीरामाचा शर। कोण दुर्धर साहेल ॥ ६ ॥

तीक्ष्णा न यावन्नवकंकपत्राः
सुदुर्धरा रावण विप्रमुक्ताः।
भित्त्वा शरीरं प्रविशंति बाणाः
प्रहस्त तेनेह विकत्थसे त्वम् ॥ १८ ॥

१ संकटात. २ जाळील.

न रावणो नापि महोदरोऽय
न कुम्भकर्णोऽपि न चातिकाय: ।
न चेंद्रजिद्दाशरथिं प्रसोढु
शक्तोस्ति तं शक्रसमप्रभावम् ॥ १९ ॥

तेलसाहाणे खरसाहाणे फुडा । लावी श्रीरामाचा बाण कुऱ्हाडा । [1]कंकणाचा झडाडा । कोण त्यापुढां साहों शके ॥ ७ ॥ सुटला श्रीरामाचा बाण । धाकें मरेल रावण । अतिकाय इंद्रजित कुंभकर्ण । सेनानी प्रधान निमतील[2] ॥ ८ ॥ प्रहस्त महोदर सोडिती प्राण । धाकें मरेल शुकसारण । सैन्य मरेल संपूर्ण । श्रीरामबाण येतांचि ॥ ९ ॥ दुर्धर श्रीरामाचे बाण । समुद्र शोषोनिया पूर्ण । लंका निर्दळिती रावण । सत्य वचन हें माझें ॥ ११० ॥ इंद्रादिकांचिया कोडी । न साहे श्रीरामबाणवोढी । धाकेंच पडती मुरकुंडी । राक्षसें बापुडीं तीं किती ॥ ११ ॥ यालागीं गा लंकानाथा । शीघ्र श्रीरामीं अर्पीं सीता । तुझे चरणीं ठेवितों माथा । विकल्प आतां धरूं नको ॥ १२ ॥ जरी विकल्प धरिसी चित्ता । तरी न जिंकवे श्रीरघुनाथा । श्रीरामाची प्रतापकथा । ऐक आतां सांगेन ॥ १३ ॥

देवातको वापि नरातको वा
तथातिकायोऽतिरथो महात्मा ।
अकंपनश्चापि समानसार
स्थातु न शक्ता युधि राघवस्य ॥ २० ॥
अय च राजा व्यसनाभिभूतो
मित्रैरमित्रप्रतिमैर्भवद्भिः ।
अन्वास्यते राक्षसनाशनार्थे
तीक्ष्णः प्रकृत्या ह्यसमीक्ष्यकारी ॥ २१ ॥

वेगें आलिया रघुनाथ । तुज साहावया नाहीं पुरुषार्थ । गर्वें प्राण वेंचिसी व्यर्थ । सत्य वचनार्थ हा माझा ॥ १४ ॥ निवारे श्रीरामबाणजाळ । तैसें तुज नाहीं शस्त्रबळ । करितां श्रीरामासीं सळ[1] । रणीं विकळ पडशील ॥ १५ ॥ रणीं जिंकावया रघुनाथा । तुझ्या आंगीं नाहीं सबळता । पडलासी धनुष्य वाहतां । सभेदेखतां स्वयंवरीं ॥ १६ ॥ तुजदेखतां पुरदहनीं । हनुमंताते देखोनी । पळती प्रधान वीरश्रेणी[2] । केंवी राम रणीं जिंकवेल ॥ १७ ॥ तुझें करोनि काळें तोंड । रामें धनुष्य केलें दुखंड । वृथा वाहसी बळबंड । तूं तंव लंड निर्लज्ज ॥ १८ ॥ श्रीराम पाहावया संमुख दृष्टी । धैर्य नाहीं तुझे पोटीं । श्रीरामा लावोनि मृगापाठीं । सीता गोरटी चोरिली ॥ १९ ॥ न्हावया श्रीरामासंमुख । तुझें न सरेचि[3] काळें मुख । वृथा बोलसी दशमुख । लाज निःशेख तुज नाहीं ॥ १२० ॥ हरावया सीता सुंदरी । सामर्थ्य नाहीं तुझे शरीरीं । मग तूं जालासी भिकारी । तरी गुंफेमाझारी रिघवेना ॥ २१ ॥ लक्ष्मणाची मर्यादारेखा । तुज नुलंघवे दशमुखा । रणीं पहावया रघुकुळटिळका । व्यर्थ आवांका[4] जल्पसी ॥ २२ ॥ तुझ्या आंगीं नाहीं बळ । म्हणसी युद्ध करील दळ । तें तंव पुरदाहें केवळ । केलें विकळ हनुमंतें ॥ २३ ॥ इंद्रजिताचें बळ अद्भुत । कपीनें केलें हताहत । येथें आलिया श्रीरघुनाथ । कोणा सामर्थ्य साहावयासी ॥ २४ ॥ या लागीं गा लंकानाथा । तुज सर्वथा न जिरे सीता । शरण रिघावें श्रीरघुनाथा । जनकदुहिता अर्पावी ॥ २५ ॥

पुढील कार्याची सूचना—श्रीरामा अर्पिलिया सीता । सकळ कल्याण समस्ता । हे सुबुद्धि ऐकें लंकानाथा । कुळाभिघाता चुकवावया ॥ २६ ॥ नानापरींच्या विवेकयुक्ती । म्यां सांगितल्या हितोक्ती । नाइकतां लंकापती । रणाभिवर्तीं मराल ॥ २७ ॥ श्रीराम अवतारावतारी । पूर्ण ब्रह्म चराचरीं । त्याची

---

१ बाणाचा. २ मरण पावतील.

१ छळ, कपट. २ वीरसमुदाय. ३ सरसावणार नाहीं. ४ पराक्रम.

कांता सीता सुंदरी । तुज तिळभरी जिरेना ॥ २८ ॥ म्हणसी श्रीराम बापुडें । तरी कां लपसी मागिलीकडे । चोरी करोनि पळसी पुढें । कर्म कुडें[1] लंकेशा ॥ २९ ॥ मारिले त्रिशरा खर दूषण । श्रीरामासीं करावया रण । संमुख न वचे तुझें सैन्य । आंगीं आंगवण असेना ॥१३०॥ श्रीराम शक्त अथवा अशक्त । तुझा करूं शके घात । सीता अर्पोनि निश्चित । श्रीरघुनाथ सुखी करी ॥ ३१ ॥ हे माझी बुद्धि नाइकतां । वैर केलिया श्रीरघुनाथा । तो तुझ्या करील घाता । सैन्यसमवेता सपुत्रा ॥ ३२ ॥ साह्य झालियाही कळिकाळ । अनिवार श्रीरामबाणजाळ । काळा गांजोनि तत्काळ । तुझें कंठनाळ छेदील ॥ ३३ ॥ माझा नाइकतां वचनार्थ । पाडोनि कळिकाळाचे दांत । श्रीराम तुझा करील घात । जाण निश्चित लंकेशा ॥३४॥ साह्य केलिया ब्रह्मशक[2] । निवारेना श्रीरामशर । शिव रामाचा किंकर । त्यासमोर तो नये ॥ ३५ ॥ श्रीराम शिवाची ध्येयमूर्ती । त्याची चोरली सीता सती । तेणें क्षोभला उमापती[3] । वाचती गति नाहीं ॥ ३६ ॥ चोरी मारी आणि परद्वारी । कपटवेषी संन्यासधारी । ब्रह्मा क्षोभला तुजवरी । वांचती परी तुज नाहीं ॥ ३७ ॥ राजा आणि अधर्मशीळ । त्यासी निर्दाळी कळिकाळ । काळें ग्रासिलें तुझें बळ । रणीं तत्काळ निमसील ॥ ३८ ॥ शक्तींमाजी आदिशक्ती । तुवां चोरिली सीता सती । क्षोभल्या शस्त्रदेवता समस्ती । तुझ्या घातीं उद्यत ॥ ३९ ॥ विचारितां विवेकविधी । तुज क्षयो आला त्रिशुद्धी[4] । माझी नाइकतां बुद्धी । रणाभिमर्दीं[5] निमसील[6] ॥ १४० ॥ रावणा ऐकें स्वहितवचन । श्रीरामासी रिघोन शरण । सीता अर्पिल्या आपण । सकळ कल्याण पावसी ॥४१॥

१ खोटें. २ ब्रह्मदेव, इंद्र वगैरे. ३ शंकर. ४ खरोखर. ५ युद्धाच्या माऱ्यांत. ६ मरशील.

श्रीरामासीं रिघाल्या शरण । तुज बाधेना जन्म-मरण । बाधूं न शके द्वंद्वभान[1] । कृतकल्याण पावसी ॥ ४२ ॥ गर्व न करीं लंकानाथा । श्रीराम-चरणीं ठेवोनि माथा । सद्भावें अर्पिलिया सीता । स्वार्थां परमार्थां पावसी ॥ ४३ ॥

तें ऐकून रावणाला क्रोध व बिभिषणावर अधिक्षेप—

ऐकोनि बिभीषणाचें वचन । क्रोधें संतप्त रावण । त्याचे क्रोधाचें दारुणपण । श्लोकलक्षण अवधारा ॥ ४४ ॥

> बिभीषणवचः श्रुत्वा बलवान्राक्षसेश्वरः ।
> अभवत्क्रोधसंरब्धः संध्यारक्त इवांशुमान् ॥२२॥
> अब्रवीद्रावणः क्रोधाद्बिभीषणमिदं वचः ।
> रावणाय त्वया भ्रात्रे धृता चानर्थबुद्धिता ॥२३॥

ऐकोनि[1] बिभीषणाचें वचन । रावण जाला क्रोधसंपन्न । आरक्त वटारिले नयन । जैसें जास्वंद नव फुललें ॥ ४५ ॥ क्रोधें म्हणे रे बिभीषणा । नष्टा चांडाळा दुर्जना । मज हीनत्व स्थापोनि जाणा । रघुनंदना वानिसी ॥ ४६ ॥ सपुत्र प्रधान अवघे जणीं । आम्हांसी म्हणसी मराल रणीं । रामा स्थापिसी विजयस्थानीं । धन्य वाणी हे तुझी ॥ ४७ ॥ राम मनुष्य बापुडें । तें काय वानिसी मजपुढें । एके घायीं चूर करीन हाडें । रडत त्याकडे तूं जाय ॥४८॥ जेवी मार्जार बोका पाहें । आपलीं पिलीं आपण खाये । तैसाचि तूं राक्षसा-न्वयें । कुलक्षया एक हेतु ॥ ४९ ॥ आम्हांसि भेडसाविसी[2] कैवाडें[3] । म्हणसी तुम्हांसि मारितील माकडें । हीन दीन तूं बापुडें । श्रीरामाकडे सुखें जायें ॥ १५० ॥ ऐक माझें सत्य भाषण । आजिच निमाला बिभीषण । घटस्फोट सांडा त्यालागन । कुळदूषण कुळपाश[4] ॥ ५१ ॥

१ द्वैतबुद्धि. २ भिववितोस. ३ पक्षपातें, कैवारानें. ४ कुळास कलंक लाविणारा.

1 ब—परेषां गुणसत्कार मम चानर्थभूहिता ॥२३॥

बिभीषणाचें उत्तर–ऐकोनि रावणाचें वचन। बिभीषण हास्यवदन। मुख्य धुरेंसींच मूर्खपण। तेथें शिकवण चालेना ॥ ५२ ॥

इह ते संति विगुणाः सहाया गुणवर्जिताः।
एवं कृत्वा किमप्येतद्वर्तते मन्त्रसञ्ज्ञितम् ॥ २४ ॥
न युक्तं कैतवं कर्तुं हिताहितप्रतिपादितम्।
त्यक्त्वा कामपरं मंत्रमर्थधर्मविवर्जितम् ॥ २५ ॥
राममेव गमिष्यामि धर्मार्थं परम नृप।
तव कोपादहं मुक्त्वा कृत्स्नं साभिजनं धनम् ॥२६॥
धर्महेतोर्गमिष्यामि राममेव शुभव्रतम् ॥ २७ ॥

कनकबीज[१] खाय आवेशें। तो बडबडी व्याघ्र ससे मासे। रावणा तुज जालें तैसें। सीताभिलाषें संनिपात ॥ ५३ ॥ रावणा सीतासंनिपात। प्रधान गर्वें मदोन्मत्त। विचार विवेक स्वहितार्थ। कोणें येथ मानावें ॥ ५४ ॥ कपट काम कामासक्ती। परदारा अधर्मरती। रावणा तुज मरणप्राप्ती। ससैन्यसंपत्ती सपुत्र ॥ ५५ ॥ करितां दुर्गाअभिलाषण। शुंभ निशुंभ निमाले ससैन्य। चंडमुंड रक्तबीज जाण। घेतला प्राण जगदंबें† ॥ ५६ ॥ तैसी श्रीरामाची सीता सती। अभिलाषितां लंकापती। व्यर्थ मरसी मरणावर्ती। सपुत्रसंपत्ती ससैन्य ॥ ५७ ॥ विष भक्षी त्याचे पंगतीं। जो बैसे त्या मरणप्राप्ती। त्यागोनि जाय तो सुमती। हे परम युक्ती लंकेशा ॥ ५८ ॥ शरण रिघोनि श्रीरघुपती। प्रेमें अर्पिल्या सीता सती। अर्थ स्वार्थ परमार्थप्राप्ती। हे परम युक्ती ऐकें पां ॥५९॥

ज्या अर्थी माझें सांगणें तुला पटत नाहीं तेव्हां मी रामाकडे जातों–माझी नायकतां युक्ती। तुज जिरेना सीता सती। गर्वें मरसी लंकापती। प्रतिज्ञा निश्चितीं हे माझी ॥ १६० ॥ तुम्हीं सांडिलें मी मेलों म्हणोन। आतां सुहृदत्वें उरलें कोण। खुंटली स्वहिताची शिकवण। श्रीरामा शरण मी जातों ॥ ६१ ॥ श्रीरामा गेलिया शरण। मी पावेन कृतकल्याण। तुम्हांसी अवश्य आलें मरण। श्रीरामबाणप्रतापें ॥६२॥ शरण गेलिया श्रीरघुपती। चारी मुक्ती दासी होती। आनंदें ओसंडेल[२] त्रिजगती। एवढी प्राप्ती श्रीरामें ॥ ६३ ॥ श्रीराम मारील एकी एक। क्रिया कर्ता नुरेल देख। मीच देईन तिलोदक। आवश्यक तुम्हांसी ॥ ६४ ॥ ऐकोनि बिभीषणाची गोष्टी। रावणा राग न माय पोटीं। खड्ग वसवोनि[२]‡ मुष्टीं। दांत होटी चाविले ॥ ६५ ॥

‡एतच्छ्रुत्वा तु संरब्धो रावणः क्रोधमूर्च्छितः।
नेत्रे प्रकुपिताताम्रेपि भूयस्ताम्रत्वमागते ॥ २८ ॥
घोरं ननाद वै शब्दं कल्पान्त इव तोयदः।
आसनात्तूर्णमुत्पत्य पादेनाभिजघान तम् ॥ २९ ॥
रावणः क्रोधसंवेगादासनस्थो बिभीषणः।
अभवत्पतितो भूमौ मूर्च्छापन्नो महाबलः ॥ ३० ॥
वज्रपातहतः श्रीमान्विशीर्ण इव पर्वतः।
प्रहस्तो वारयामास कुपितं राक्षसेश्वरम् ॥ ३१ ॥
शनैर्विचारयामास कोशस्थमकरोदसिम् ॥ ३२ ॥

हे ऐकून रावणाचा संताप व क्रोधाविष्कार–ऐकोनि बिभीषणाची मात। हृदयीं पोळला लंकानाथ। रागें तयाकडे पाहत। जेंवी कां कृतांत काळाग्नि ॥ ६६ ॥ स्वभावें आरक्त नयन। त्यावरी होतां क्रोधसंपन्न। झाले [३]लाखरंगासमान। विंशति नयन वटारिले ॥ ६७ ॥

खड्ग घेऊन बिभीषणावर वार करणार तों त्याचा हात लचकला व रावण खालीं पडला–नयन आरक्त

---

१ धोतऱ्याचें बी.

† दक्ष–जगदंबेनें.

१ भरेल. २ घेऊन. ३ लाखेसारखे तांबडे लाल.

† क्ष–आवळोनि. ‡ कोपेन समृश तस्य लाक्षारंगसमप्रभा। उत्पपात स निस्त्रिंशो वेगाच्च भृकुटीमुखः ॥ २३ ॥ एक विद्युद्गतः क्रुद्धः सवर्त इव तोयदः।

कल्लोळ । धाकें कांपती लोक सकळ । क्रोधें नेत्रीं निघती ज्वाळ । जाली खळबळ सभेसीं ॥ ६८ ॥ बिभीषणावरी घालावया उडी । कोशाबाहेरी[1] खड्ग काढी । विजूतेजसम[2] परवडी । पडली झांपडी सभेसी ॥ ६९ ॥ प्रळयमेघ गर्जे कडाडीं । तेंवी रावण रागें गडाडी । घावो हाणावया निर्वडी । शस्त्र झाडी साटोपें ॥ १७० ॥ ऐकतां रावणाची हाक । धाकें कांपती सकळ लोक । बिभीषण चित्तीं निःशंक । न मानी धाक रामनामें ॥ ७१ ॥ माझा स्वामी श्रीशंकर । त्यासी म्हणसी रामकिंकर । तरी छेदीन तुझें वक्त्र । शस्त्र सत्वर उचलिलें ॥ ७२ ॥ उडोनिया आकाशाआंत । घावो हाणितां लंकानाथ । रावणाचा लचकला हात । श्रीराम रक्षित निजभक्ता ॥ ७३ ॥ चमत्कारें सुटली मुष्टी । शस्त्र गळोनि पडलें भूपृष्ठीं । रावणें धाक घेतला पोटीं । गोष्टी उफराटी येथें झाली ॥ ७४ ॥ रावण चांचरे घावो हाणितां । पडला सिंहासनाखालता । राजपुरुषार्थ करोनि वृथा । रामरक्षिता भक्तासी ॥ ७५ ॥

बिभीषणावर लत्ताप्रहार—पुढती रावणें खड्ग घेतां । प्रहस्तें धांवोनि धरिलें हाता । कोप न सांवरे लंकानाथा । हाणिल्या लाथा बिभीषणा ॥ ७६ ॥ रावणें हाणितांचि लाथा । बिभीषणें चरण वंदिले माथा । शरण जावया श्रीरघुनाथा । सुमुहूर्तता[3] हे माझी[3] ॥ ७७ ॥ कोपा चढला लंकानाथ । त्यासी प्रहस्तें करोनि शांत । खड्ग घालोन दळाआंत[4] । बैसविला स्वस्थ सिंहासनीं ॥ ७८ ॥

बिभीषणाला मूर्च्छा. त्याची शांती व रामाकडे *गमन*—रावणाची लागली लात । जेंवी पर्वतीं वज्रपात । बिभीषण पडतांचि मूर्च्छित । द्वंद्वनिर्मुक्त[5] श्रीरामनामें ॥ ७९ ॥ अगाध बिभीषणाची शांती । अणुमात्र क्रोध न ये चित्तीं । कांहीं न बोलेचि दुरुक्ती । स्वस्थ चित्तीं बैसला ॥ १८० ॥ सुबुद्धि सांगावी सुहृदता । ते गोष्टी खुंटली आतां । स्वस्थ असावें लंकानाथा । शरण रघुनाथा मी जातों ॥ ८१ ॥ स्वयें हाणोनियां लात । मज तुष्टला लंकानाथ । स्वामी भेटेल श्रीरघुनाथ । हें भाग्य प्राप्त तुझेनि ॥ ८२ ॥ एका जनार्दना शरण । राम आश्वासील बिभीषण । तें अति गोड निरूपण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १८३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणापमानो नाम षट्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥३६॥ ॥ ओंव्या ॥ १८३ ॥ श्लोक ॥ ३२ ॥ एवं ॥२१५॥

१ म्यानाबाहेर. २ विजेच्या प्रभेप्रमाणें ३ मला उत्तम मुहूर्त सांपडला. ४ म्यानांत. ५ सुखदु:खाहून निराळा.

---

## अध्याय ३७ वा

नंतर कांहीं न बोलतां शांतपणें बिभीषण प्रधानांसह परतला—श्रीजानकीनाथाय नमः ॥ बिभीषणासी अपमान । जालिया नव्हे क्रोधायमान । स्वयें श्रीराम स्मरोन । सावधान बैसला ॥१॥ कांहीं न बोलोनि उपपत्ती[1]। विचारोनि विवेक युक्ती । शरण जावें श्रीरघुपती । निश्चयो चित्तीं दृढ केला ॥२॥

अभिवद्य ततो भूमौ रावणं क्रोधमूर्च्छितम् ।
चतुर्भिः सचिवैः सार्धं निश्चकाम बिभीषण ॥१॥
स शांतकोप संपूर्ण मोहात्त्यक्तमिव श्रिया ।
रावणं मधुरं वाक्यं बभाषे च बिभीषणः ॥ २ ॥
सौहृदात्तु मया राजन्वाक्यमुक्तं दशानन ।
न प्रियत्वाद्गुणांस्तस्य राघवस्य ब्रवीमि ते ॥ ३ ॥
हितार्थं धर्म्यमेवैतन्मया वाक्यमुदाहृतम् ।
मंत्र ज्ञात्वा मया प्रोक्तं वाक्यं राक्षससंसदि ॥ ४ ॥

त्याचे विचार—चौघे घेवोनि प्रधान । स्वयें निघाला बिभीषण । रावणासी मधुर वचन । काय आपण बोलत ॥ ३ ॥ आम्ही तुम्ही सखे बंधु ।

१ उद्देश.

अणुमात्र नाहीं विरोधु । सांगता तुजला हितानुवादु[1] । वृथा क्रोधु तुवां केला ॥ ४ ॥ निंदोनियां लंकानाथा । श्रीरामा वाणिले स्वपक्षार्था । तरी मी जाईन अधःपाता । जाण तत्वतां लंकेशा ॥ ५ ॥ हनुमंतापुढें तुझें दळ । तुजदेखता पळालें सकळ । तेंचि म्यां करोनि विकळ । तुज प्राजळ सांगितलें ॥ ६ ॥ तेणें राग प्रधानचित्ता । तेणें राग सैन्या समस्ता । तूंही कोपलासी लंकानाथा । निजस्वार्था नेणोनि ॥ ७ ॥ चोरी मारी आणि परद्वारी । हा धर्म तुझे घरीं । अनुताप रिघावया तुजमाझारीं । निजगजरीं बोलिलों ॥८॥ राक्षसांची सभा खोटी। म्या सांगितली स्वहितगोष्टी । तेच करोनि उफराटी । धरिला पोटीं महाक्रोध ॥ ९ ॥ जेंवी ज्वरिताचें मुख । दुग्धा मानी कडु विख । तैसें रावणा जालें देख । भानिसी असुख स्वहिताचें ॥ १० ॥

क्रोधाचा प्रभाव व त्याचे दुष्परिणाम—अति कोपें लंकानाथा । तुवां मजला हाणितल्या लाथा । तरी काय जिंकिलें रघुनाथा । किंवा स्वस्थता तुज जाली ॥ ११ ॥ कोप जगामाजी अपकारी । त्याची वस्ती तुजमाझारी । तेणें विवेकाची केली बोहरी । स्वहित दुरी दुराविलें ॥ १२ ॥

अपकारी भवेत्कोप. कोपे कोपः कथ न ते ।
धर्मार्थकाममोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि† ॥ ५ ॥

भलताही क्रोधानुकारी । कोपे अल्प अन्यायमात्रीं । कोप परम अपकारी । कोणी त्यावरी कोपेना ॥ १३ ॥ उन्मत्त गज जिवें मारी । त्यासी सिंह पाडी [2]धरेवरी । परी कोपावरी कोप करी । ऐसा संसारी वीर नाहीं ॥ १४ ॥ क्रोध एकला एक । चहूं पुरुषार्थी घातक । ऐक त्याचाही विवेक । दुष्ट परिपाक[3] क्रोधाचा ॥ १५ ॥ क्रोध येतांच मानसीं । स्वधर्मकर्मा क्रोध त्रासी । क्रोध अर्थ स्वार्थ विध्वंसी । मोक्ष क्रोधापासीं कदा न घडे ॥ १६ ॥ क्रोध आलिया एकांतीं । स्त्रीपुरुषां कलहउत्पत्ती । धकाबुकीमध्यें रात्रीं । कामविघाती समूळ क्रोध ॥ १७ ॥ क्रोध आलिया धर्मसंधीं । मुख्य ब्राह्मणातें स्वयें निंदी । परापवादाच्या[1] अनुवादीं । क्रोधें धर्मसिद्धी कदा न घडे ॥ १८ ॥ क्रोध धर्मातें उच्छेदी[2] । क्रोध कर्मातें निंदी । क्रोध पापी हा दुर्बुद्धी । निंदानुवादीं जल्पोनी ॥ १९ ॥ क्रोध पित्यातें निर्भर्त्सी । क्रोध मातेतें म्हणे दासी । क्रोध स्वधर्मातें नासी । क्रोधापासीं अधर्म ॥२०॥ बंधु बंधु अति आप्त । अर्थस्वार्थे क्रोधाभिभूत[3] । स्वबंधूसी हाणवी लाथ । अति अनर्थ तो क्रोध ॥ २१ ॥ उत्तम अर्थाचिये प्राप्ती । क्रोध मुख्य विश्वासघाती । अर्थापासीं क्रोध अनर्थी । जाण निश्चितीं लंकेशा ॥२२॥ अंधारी जरी सूर्य बुडे । तरी क्रोधापासीं मोक्ष जोडे । काम क्रोध लोभ जैं झडे । तैंच आतुडे[4] निजमोक्ष ॥ २३ ॥ धर्म अर्थ काम मोक्षता । चहूं [5]पुरुषार्थां क्रोध नागविता । तो तुजमाजि वसे लंकानाथा । जेणें मज लाथा हाणविल्या ॥ २४ ॥

बिभीषणाची रावणास शेवटची उक्ती—मज हाणितलिया लाथा । पावलासि कोणा निजस्वार्था । किंवा पावलासि परमार्था । जासी अधःपाता श्रीरामद्रोहें ॥ २५ ॥ परम कृपा रघुनाथा । तुवां हाणितल्या लाथा । अल्पही क्रोध नये चित्ता । निजशांतता श्रीरामें ॥ २६ ॥ तुवां हाणितांचि लाथा । पावली परम वैराग्यता । सांडोनि स्वराज्यसुहृदता । शरण रघुनाथा मी जालों ॥ २७ ॥ सापत्नभावें घरवा हाणिल्या लाथा । तेणें नो

---

१ हिताच्या गोष्टी. २ पृथ्वीवर. ३ परिणाम.

† पथिनाम्.

१ लोकांना दोष लावण्याच्या. २ नाश करतो. ३ क्रोधायमान. ४ मिळतो, प्राप्त होतो. ५ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांना.

पावला परम स्वार्था। तैशाच तुझ्या रावणा लाथा। श्रीरघुनाथप्राप्तिकर ॥२८॥ श्रीराम कृपालु दयाळ। श्रीराम भक्तवत्सळ। तूं तें नेणसीच बरळ। क्रोधें विव्हळ केलासी ॥२९॥ गर्व सांडोनि लंकानाथा। श्रीरामा अर्पिलिया सीता। तूं पावशील गा निज-स्वार्था। येऱ्हवीं वृथा मरशील ॥ ३० ॥ सुटल्या श्रीरामाचे बाण। तुज येथें राखेल कोण। पळालेति हनुम्याभेण। कैंची आंगवण राक्षसां॥ ३१ ॥

त्याचा रावणावर परिणाम—ऐसें बोलोनि बिभीषण। वचनीं खोंचिला रावण। क्रोधें अंतरला बंधु पूर्ण। कंपायमान स्वयें जाला ॥ ३२ ॥ माझी अपक्व बुद्धि पूर्ण। लाथा हाणितांचि जाण। सखा अंतरला बिभीषण। गेला शरण श्रीरामा ॥ ३३ ॥

मातेला वंदन करून रामाकडे जाण्याचा विचार—आठवलें बिभीषणाच्या चित्ता। आधीं अभिवंदोनि[1] माता। तीस सांगोनि निजवृत्तांता। शरण रघुनाथा जाईन ॥ ३४ ॥

स मातरं पुनर्दृष्ट्वा तस्यै सर्वं निवेद्य च।
जगामाकाशमार्गेण यत्र रामो महाबलः ॥ ६ ॥
उत्पपात गदापाणिश्चतुर्भिः सचिवैः सह।
अब्रवीच्च तदा वाक्यं जातक्रोधो बिभीषणः ॥ ७ ॥
अंतरिक्षगतः श्रीमान्भ्रातरं धनदानुजः।
स त्वं भ्रातासि मे राजन्ब्रूहि मा यद्यदिच्छसि ॥८॥

कुळक्षयो देखोनि जाणा। सुबुद्धि †सांगावया रावणा। मातेनें धाडिलें बिभीषणा। हितोपसंज्ञा सांगावया ॥ ३५ ॥ रावणासी हित सांगतां। कोप आला लंकानाथा। बिभीषणा हाणितल्या लाथा। ऐकोनि माता अति दुःखी ॥ ३६ ॥ बिभीषणा भाग्यवंता। तूं पावलासि या रघुनाथा। [2]कंदन आलें लंकानाथा। कुळा समस्ता समवेत ॥ ३७ ॥

मातेची प्रतिक्रिया व त्याला आशीर्वाद—माता तुष्टली बिभीषणासीं। तुझेनि धन्य माझी कुशी। श्रीरामीं तू विनटलासी। सकळ कुळासी तूं भूषण ॥ ३८ ॥ तुझेनि सकळ कुळ पुनीत[1]। तुझेनि वंश हा सनाथ। तुझेनि मी नित्य मुक्त। श्रीरघुनाथ निजसेवा ॥ ३९ ॥

बिभीषणाचें प्रयाण—ऐकोनि मातेचें वचन। बिभीषण घाली लोटांगण। पुढती वंदोनि तिचे चरण। निघाला शरण श्रीरामा ॥ ४० ॥ बिभीषण चढोनि आकाशीं। निराळीं[2] राहोनि सावकासीं। पुढती बोले रावणासी। सत्य तूं होसी सखा माझा ॥ ४१ ॥

लाथा मारून श्रीरामाकडे पाठविल्याबद्दल आकाशांतून बिभीषण रावणाचे धन्यवाद मानितो—मोहममतेचें सखेपण। हीन दीन अति गौण। कोपामाजी कृपालु पूर्ण। सखा रावण सत्यत्वें ॥ ४२ ॥ हाणोनियां निजलाथा। शरण धाडिलें रघुनाथा। ऐसा सखा तुजपरता। नाहीं तत्वतां तिहीं लोकीं ॥ ४३ ॥ जन्ममरणांचिया कोडी। लाथा हाणोनि तोडिली बेडी। रावणकोपकृपापरवडी। जोडिला जोडी श्रीराम ॥ ४४ ॥

तें ऐकून रावणाचा अनुताप—ऐसी रावणाची स्तुती। बिभीषण वदे निजशांती। तें ऐकोनि लंकापती। आश्चर्यें चित्तीं चमकला ॥ ४५ ॥ जाला अनुतापी[3] रावण। माझी अपक्व बुद्धि पूर्ण। सखा अंतरला बिभीषण। गेला शरण रघुनाथा ॥ ४६ ॥

सैन्य व सर्व लोकाकडून बिभीषणाची प्रशंसा—सैन्य सेनानी प्रधान। अवघे वानिती बिभीषण। अणुमात्र कोप न येच जाण। व्यर्थ रावण क्षोभला ॥ ४७ ॥ धन्य बिभीषणाची शांती। धन्य

१ नमस्कार करून. २ नाश.

† पाठ—शिकवावया.

१ पवित्र, पुण्यवान्. २ अंतराळीं, आकाशात. ३ पश्चात्तापयुक्त.

बिभीषणाची कीर्ती। धन्य बिभीषणाची स्थिती। शरण रघुपती तो गेला ॥ ४८ ॥ राक्षसांच्या घातका युक्ती। हा सांगेल श्रीरामाप्रती। आली राक्षसां समाप्ती[१]। केला समस्तीं निश्चयो ॥ ४९ ॥

बिभीषणाची रावणास शेवटची विनती—बिभीषण म्हणे रावणासी। जे जे इच्छा तुझे मानसीं। ते ते सांग मजपासीं। सिद्धी सर्वांशीं श्रीराम ॥ ५० ॥ कृपेनें हाणोनियां लाथा। शरण धाडिलें श्रीरघुनाथा। ऐक माझी प्रत्युपकारिता। तुज मी आतां सांगेन ॥ ५१ ॥ सावध ऐकें दशशिरा। मी अंतकाळींचा सोयरा। तुवां द्वेषितां श्रीरामचंद्रा। नरकद्वारा जावों नेदीं ॥ ५२ ॥ अंतीं होय परम मुक्ती। ऐसी श्रीरामनामकीर्ती। केलीया श्रीरामाची भक्ती। उद्धारगती वशस्था ॥ ५३ ॥ ऐसें बोलोनि बिभीषण। करोनि रावणासी नमन। घेवोनियां चौघे प्रधान। निघाला शरण श्रीरामा ॥ ५४ ॥

चारी प्रधानासह बिभीषण रामाकडे जातो—जैसे चारी पुरुषार्थ। जीवास करिती नित्य मुक्त। तैसे चारी प्रधान तेथ। साह्य सतत बिभीषणा ॥५५॥ नातरी[२] चारी वेद। उपनिषदीं करिती बोध। जीवासी पावे परमानंद। तैसे प्रबुद्ध प्रधान ॥५६॥ हो कां जैशा चारी मुक्ती। जीवासी देती ब्रह्मप्राप्ती। तैसे प्रधान परमार्थी। नित्यानुवर्ती[३] बिभीषणा ॥ ५७ ॥ नातरी जैशा वाचा चारी। नित्यानित्यविवेककरी। जीवासी नेती साक्षात्कारीं। तैसे चारी प्रधान ॥५८॥ऐसे घेवोनि चारी प्रधान। मेरुमांदारांसमान। येतां देखोनि बिभीषण। वानरगण खवळले ॥ ५९ ॥

+तं मेरुशिखराकारं ज्वलतमिव पावकम्।
गगनस्थं महीस्थास्ते ददृशुर्वानरर्षभाः ॥ ९ ॥
एष सर्वायुधोपेतैश्चतुर्भिः सह राक्षसैः।
राक्षसोभ्येति पश्यध्वमस्मान्हतुं न संशय. ॥१०॥

त्यास पाहून वानर सैन्यात गडबड—बिभीषण राक्षसेश्वर। गगनीं मेरुशिखराकार। त्यातें भूमिस्थ वानर। देखोनि सत्वर ऊठिले ॥ ६० ॥ बिभीषण शांत दांत[१]। विवेकवैराग्यें विरक्त। श्रीरामदर्शनीं अनुरक्त[२]। तेणें आरक्त[३] तो भासे ॥६१॥ रजतमधूम्र जाय निघोनी। लखलखित भासे चैतन्याग्नी। तैसा तेजस्वी बिभीषण गगनीं। वानरगणीं देखिला ॥ ६२ ॥ पुढील वीर धीर विराजमान। मागील ते चारी प्रधान। आमचें करावया हनन। आले धांवोनि सायुध ॥ ६३ ॥ वोडण खांड गदापाणी। धनुष्यबाण पाठीस तूणी[४]। आम्हांसी मारावयालागोनी। आले धांवोनि राक्षस ॥ ६४ ॥ आमचा करावया घात। पांच जण आले नेमस्त। पांचही निर्दळिलिया येथ। रामकार्यार्थ साधेल ॥ ६५ ॥ जो यांचा करील घात। तोच पुरुषार्थी समर्थ। तोच श्रीरामाचा परम आप्त। युद्धकंदनार्थ मग कैंचा ॥ ६६ ॥ पुढिल्या पांचांची मोहर[५]। मारोनि केलिया चकचूर। मग मेल्या न येती निशाचर। वानरीं विचार दृढ केला ॥ ६७ ॥ देखोनि राक्षसांची जाती। वेगें उठिले जुत्पती। शाळ ताळ शिळा हातीं। हाणावया पर्वतीं पेटले ॥ ६८ ॥ मिळोनियां वानरवीर। अवघीं केला भुभु:कार। तेणें खळबळिला सेनासागर। नादें अंबर कोंदलें ॥ ६९ ॥ पाडीं पाडीं म्हणतां जाण। एकापुढें एक उड्डाण। करीत आले वानरगण। तेणें बिभीषण दचकला ॥ ७० ॥ शरण जातां श्रीरघुपती। मध्येंच वानर मज मारिती। तेव्हां हे गति ना ते गती। आली ब्रह्मगति मुख्यत्वें ॥ ७१ ॥ मुख्य विरोधाचा संबंधु। मी रावणाचा कनिष्ठ बंधु। वानरीं माझा करितां

१ अंतकाळ. २ किंवा. ३ नित्य अनुकूल असणारे. + सु. का. १७।२, ७

१ इंद्रियनिग्रही. २ प्रीतियुक्त. ३ लाल, तेजस्वी. ४ भाता. ५ मार्ग.

वधु । रामें विमर्दु[1] चुकवावा ॥ ७२ ॥ करिता श्रीरामनामस्मरण । दीनाचें चुके जन्ममरण । मी तंव श्रीरामीं अनन्य शरण । वानरविघ्न कां आलें ॥ ७३ ॥ येथें भेटतां कीं हनुमंत । तो तंव माझा परम आप्त । मज भेटविता श्रीरघुनाथ । कपिकंदनार्थ चुकवोनी ॥ ७४ ॥ आतां असोत बहुत युक्ती । लोटांगण वानरांप्रती । मी अनन्य शरण रघुपती । तुम्ही कां युद्धार्थीं धांवतां ॥७५॥ ऐसें बोलोनियां देख । बिभीषणें दिधली हाक । तोचि बिभीषणाचा श्लोक । अर्थविशेषें अवधारा ॥ ७६ ॥

+उवाच स महाप्राज्ञः स्वरेण महता महान् ।
सुग्रीव वानरान्प्रेक्ष्य खस्थ एव बिभीषणः ॥ ११ ॥
भो भो शाखामृगा, सर्वे वचनं मे निबोधत ।
रामायाख्यातुमिच्छामि कोसलेंद्राय धीमते ॥१२॥
रावणस्यानुजो भ्राता बिभीषण इति श्रुतः ।
चतुर्भिः सचिवैः सार्धं शरणार्थी न संशयः ॥१३॥
प्राप्तोऽहं राघवं द्रष्टुमिति मां वेत्थ वानराः ॥१४॥

तें पाहून अंतराळांतूनच बिभीषणाचें भाषण व सुग्रीवास विनति—देखोनि वानरांचा तवक[2] । गगनींहूनि बिभीषण देख । दीर्घ देतांचि पैं हाक । कपिकटक वचकलें[3] ॥ ७७ ॥ काय गर्जतो निशाचर । ऐकों ठेले वानरवीर । म्हणे मी शरणागत साचार । श्रीरामचंद्राचे चरणीं ॥ ७८ ॥ तो म्हणे सुग्रीवा कपिपती । वानरस्वामित्व तुझे हातीं । शरणागतासी मारूं येती । यांतें निश्चितीं निवारीं ॥७९॥ रावणाचा अनुज[4] बंधु । बिभीषणनामें मी प्रसिद्धु । म्हणोनि माझा कराल वधु । मी तंव शुद्ध शरणार्थी ॥ ८० ॥ येथें असता हनुमंत । तो सांगता माझा वृत्तांत । मज भेटविता श्रीरघुनाथ । शरणागत म्हणोनि ॥ ८१ ॥ श्रीरामाचें सत्य व्रत । मारूं नये शरणागत । कपि मज मारावया उदित[1] । ते तूं समस्त निवारीं ॥ ८२ ॥ सुग्रीवा तुझे चरणीं माथा । वृत्तांत सांगें श्रीरघुनाथा । रावणाचा कनिष्ठ भ्राता । शरण तत्वतां आला असे ॥ ८३ ॥ चौघे प्रधानांसमवेत । बिभीषण शरणागत । ऐसेंनि सांगेल रघुनाथ । तोचि कार्यार्थ करावा । ८४ ॥ कौसल्येचा निजसुत । कौसलेंद्र श्रीरघुनाथ । त्याचा अनन्य शरणागत । बिभीषण नाम पैं माझें ॥ ८५ ॥ बिभीषण अनन्य शरणागत । सुग्रीवा मानली हे मात । तोचि श्रीरामासी वृत्तांत । वानरनाथ स्वयें सांगे ॥८६॥

+एतत्तु वचनं श्रुत्वा सुग्रीवो वानरेश्वरः ।
लक्ष्मणस्याग्रजं राममिदं वचनमब्रवीत् ॥ १५ ॥
रावणस्यानुजो बंधुर्बिभीषण इति श्रुतः ।
चतुर्भिः सचिवैः सार्धं शरणार्थमिहागतः ॥ १६ ॥

सुग्रीवाचें रामास निवेदन—ऐकोनि बिभीषणाचें वचन । सुग्रीव येवोनि आपण । रामलक्ष्मणां करोनि नमन । सांगे आगमन बिभीषणाचें ॥८७॥ श्रीरामासी अर्पावी सीता । हें हित सांगतां लंकानाथा । तयासी हाणोनि लाथा । अनाथता दवडिला ॥ ८८ ॥ नगरीं धेंडे पिटोनि पूर्ण । नगरत्यागें बिभीषण । दवडितां बोलला रावण । जाय तूं शरण श्रीरामा ॥ ८९ ॥ श्रीराम जालिया पक्षपाती । कैसा येईल लंकेप्रती । कैंवीं राक्षसां करील ख्याती । तेही प्रतीति[2] अवधारा ॥ ९० ॥ जो बिभीषण सद्भावतां । शरण आला† श्रीरघुनाथा । काय करावें त्यासी आतां । सांग समर्था श्रीरामा ॥९१॥ घेवोनियां चौघे प्रधान । बिभीषण अनन्य शरण । काया वाचा उदित मन । तुझे श्रीचरण देखोनि ॥ ९२ ॥

१ मरण. २ आवेश. ३ चपापलें. ४ धाकटा.
+ १७

१ तयार. २ अनुभव.

†क्ष—आला असे. + अ. १७।१८, २६

प्रातं विभीषण श्रुत्वा रामः सुग्रीवमब्रवीत् ।
स्मरन्निव स्पृशन्हस्त सहजामित्रतापनः ॥ १७ ॥
हरिश्रेष्ठ महाबाहो वचन श्रूयता मम ।
हनुमत्प्रमुखान्सर्वान्सचिवांश्च समाहूय ॥ १८ ॥
तै. समुच्यैव कर्तव्य करिष्यामि परीक्षणम् ।
इति श्रुत्वा राघवस्य वचन हरियूथपाः ॥ १९ ॥
बभूवुर्वानराः सर्वे प्रहृष्टा. साधुवादिनः ॥ २० ॥

तें ऐकून रामास आनद–बिभीषण आला भेटी । तेणें श्रीरामास आनंदकोटी । हरिखें सुग्रीवाची पाठ थापटी । आल्हाद पोटीं प्रेमाचा ॥ ९३ ॥ बिभीषणाचें मनोगत । अनन्य भावें शरणागत । जाणे अंतर्यामीं श्रीरघुनाथ । हृदयस्थ निवासी ॥ ९४ ॥ बिभीषण शरणागत परम । स्वयें जाणे आत्माराम । सुग्रीवाप्रती राजधर्म । अनुक्रमें[१] अनुवादे ॥ ९५ ॥

सर्व वानरप्रमुखानें मत राम विचारितात–हनुमंतादि मुख्य प्रधान । [२]पाचारिले वानरगण । बिभीषण येतो शरण । त्याचें लक्षण लक्षावया ॥ ९६ ॥ बिभीषणाचें मनोगत । सत्य किंवा असत्य । निर्धारावया इत्थंभूत । कपी समस्त पाचारिले ॥ ९७ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । उल्लासले[३] वानरगण । बिभीषणाचें लक्षण । अनुवादन ते करिती ॥ ९८ ॥

सर्वांचें मत कीं त्यास मारावें–मुख्य सुग्रीवसंवादु । हा रावणाचा बंधु । अवश्य याचा करावा वधु । म्हणे कुमुदु‡ मारावा ॥ ९९ ॥ नळ नीळ सांगती गोष्टी । तेचि तरळ[४] तरळाचे पोटीं । रावणानुज हा तंव कपटी । उठाउठीं मारावा ॥ १०० ॥ गज गवय सांगती जाण । शत्रुबंधु हा कपटी शरण । यासीं न करावें आपण । यावा दवडोन लंकेसी ॥ १ ॥ कपटी रावणाचा बंधु । हा मारावा म्हणे मैंदु । तैसाचि अनुवादे[१] द्विविदु । करावा वधु पैं याचा ॥ २ ॥ सुषेण पनस दधिमुख । तिघे होवोनि एकमुख । यासी राखितां परम दुःख । अवश्यमेव मारावा ॥ ३ ॥

जांबुवंताचें मत कीं त्याची अंतर्बाह्य स्थिति पाहून काय तें करावें–मग बोलिला जांबुवंत । बिभीषणा पाचारा येथ । त्याचें लक्षिता चेष्टित[२] । मनोगत कळेल ॥ ४ ॥ स्थिति गति गमनागमन । नेत्र वक्त्र[३] संभाषण । येणें पराचें[४] लक्षण । विचक्षण लक्षिती ॥ ५ ॥

शरणागताला मरण देऊ नये असें अंगदाचें मत–अंगद बोले अति कौतुक । एकला एक बिभीषण रंक । त्यासाठीं हरलें कटक । कपि नेटक निजयुद्धें ॥ ६ ॥ धन्य धन्य या वानरां । शरण आलिया निशाचरा । जो तो म्हणे मारा मारा । हा काय खरा पुरुषार्थ ॥ ७ ॥

हनुमंताला लंकेची सर्व माहिती तेव्हां त्यास विचारितां–नेणोनि श्रीरामाची स्थिति । वृथा वानरें जल्पती । पैल बैसलासे मारुती । त्याची युक्ती अवधारा ॥ ८ ॥ सकळ लंकेचें शोधन । हनुमंतें केलें आपण । साधु कीं दुर्जन बिभीषण । त्याचें लक्षण तो जाणे ॥ ९ ॥ हनुमंतासी अविदित[५] । नाहीं उरला लंकेचा अर्थ । तो सांगेल इत्थंभूत । तें समस्त आयका ॥ ११० ॥ श्रीराम म्हणे गा हनुमंता । बिभीषणा शरणागता । काय करावें त्या आतां । तें तत्वतां मज सांगें ॥ ११ ॥ ऐकोनि स्वामीचें वचन । हनुमान घाली लोटांगण । वंदोनि श्रीरामाचे चरण । युक्त वचन अनुवादे ॥ १२ ॥

अथ संस्कारसंपन्नो हनुमान्बुद्धिसत्तमः ।
उवाच मधुरं श्लक्ष्णमर्थवच्च ततो वचः ॥ २१ ॥

---

१ क्रमानें. २ बोलाविले. ३ आनद पावले. ४ संशय, भीति.

‡ ड–मुकुदु, क्ष–कमुदु.

१ बोलला. २ वर्तन. ३ तोंड. ४ दुसऱ्याचें, शत्रूच. ५ माहित नाही असा.

न भवत्तमतिश्रेष्ठं समर्थं वदतां वरम्
अतिशाययितुं शक्तो बृहस्पतिरपि ब्रुवन् ॥ २२ ॥
चारप्रणिहितं युक्तं यदुक्तं सचिवैस्तव ।
अर्थस्यासम्भवात्तत्र कारणं नोपपद्यते ॥ २३ ॥
अदेशकाले सम्प्राप्ते इत्ययं यद्विभीषणः ।
विवक्षा तत्र मेऽस्तीयं तां निबोध यथामति ॥ २४ ॥

तो विभीषणाच्यासबंधीं पूर्ण निर्वाळा देतो—
हनुमंत सर्वांगें सज्ञान । सर्वेंद्रियीं पक्व विज्ञान । जें बोले तें युक्त वचन । श्रीरघुनंदनसुखकारी ॥ १३ ॥ हनुमान श्रीरामाचें लळिवाड[1] । त्याचा बोल अमृतापरीस गोड । पुरतें वेदशास्त्राचें कोड[2] । श्रवणीं चाड श्रीरामा ॥ १४ ॥ हनुमान बोलतां आपण । टवकारले वानरगण । पाहत ठेले त्याचें वदन । अवघे जण टकमकां ॥ १५ ॥ बृहस्पति करितां निरूपण । अति एकाग्र अमरगण[3] । तैसें ऐकती हनुमंताचें वचन । अवघे जण टकमकां ॥ १६ ॥ हनुमद्वाक्याची घडमोडी । वानरां टकटक लक्ष कोटी । वचनीं सत्यत्वाची प्रौढी । तेणें अति गोडी श्रीरामा ॥ १७ ॥ खिरी तुपावरी साखर । तैसें वचन अति मधुर । सत्यवादी[4] रामानुचर । श्रीरामचंद्रसुखकारी ॥ १८ ॥ सावधान ऐकें श्रीरघुनाथा । नेणोनि विभीषणा हृदयस्था । कपि प्रधान बोलती वृथा । अनुमानता[5] मिथ्यात्व ॥ १९ ॥ न कळोनि विभीषणाचा बोधु । शरण रिघोनि शत्रुबंधु । म्हणती आमचा करील वधु । वानरानुवादु अति मिथ्या ॥ १०० ॥

विभीषणाचें चारित्र्य, पावित्र्य इ०—लंका शोधितां त्रिकूटीं । म्यां देखिलें आपुले दृष्टीं । विभीषण हा नव्हे कपटी । सत्य गोष्टी हे माझी ॥ २१ ॥ विभीषण नव्हे हा शठ । विभीषण नव्हे हा नष्ट । विभीषण नव्हे कपट । वाक्य निर्दुष्ट हें माझें ॥ २२ ॥ लंका शोधितां समस्त । राक्षसांचें हृद्गत । जाणोनि वदे हनुमंत । अति समर्थ सत्यत्वें ॥ २३ ॥ श्रीरामसेवातपोबळें । सर्वां हृदयीं हनुमान खेळे । तेणें सत्यासत्य आकळे । बोले प्रांजळें सत्य मधुर ॥ २४ ॥ कपी प्रधान जे बोलती । कपटी विभीषणाची स्थिती । त्यांची मिथ्या हे वदंती[1] । शुद्धभावार्थी विभीषण ॥ २५ ॥ विभीषणाची धर्मस्थिती । विभीषणाची अगाध कीर्ती । विभीषणाची भगवद्भक्ती । शुद्ध भावार्थी विभीषण ॥ २६ ॥ विभीषणीं नाहीं अकर्म । विभीषणा नाहीं विकर्म[2] । विभीषणीं नाहीं अधर्म । सत्यत्व वचन हें माझें ॥ २७ ॥ विभीषणीं नित्य निवृत्ती । विभीषण धर्ममूर्ती । विभीषणीं नित्य शांती । शुद्ध भावार्थी विभीषण ॥ २८ ॥ सांडोनि यौवराज्य संपूर्ण । त्यजोनियां बंधु रावण । युद्धसमयीं आला शरण । त्यासी आपण नये मारूं ॥ २९ ॥ पहिलेंची श्रीरामीं प्रेमता । त्यावरी रावणें हाणिल्या लाता । शरण आला श्रीरघुनाथा । भावार्थता स्वानंदें ॥ १३० ॥ भावार्थी अथवा कपटी पूर्ण । जो कां म्हणे मी आलों शरण । त्यासी मारितां आपण । लागेल दूषण सूर्यवंशा ॥ ३१ ॥ शिबी हरिश्चंद्र रुक्मांगद । वंशींचे क्षोभती धर्मविद । शरणागताचा पैं वध । अति विरुद्ध तिहीं लोकीं ॥ ३२ ॥

त्यापासून तोटा कांहींही न होता लाभच होईल—
स्वर्गीं क्षोभेल दशरथ । अधर्मी जाला श्रीरघुनाथ । मारूं नये शरणागत । हा निश्चितार्थ श्रीरामा ॥ ३३ ॥ एकला एक विभीषण । त्याचें आम्हांसी भय कोण । वधावा म्हणती वानरगण । त्यांची आंगवण अति तुच्छ ॥ ३४ ॥ तुटोन पडतां गगन । गजवजीना रघुनंदन । तेथें बापुडें विभीषण । त्याचें भय कोण आम्हांसी ॥ ३५ ॥ ऐसें बोलतां

१ आवडता. २ इच्छा, आवड. ३ देवसमुदाय. ४ खरें बोलणारा. ५ कल्पनेनें

१ बोलणें. २ कुकर्म

मारुती। संतोषला श्रीरघुपती। सर्वेच कपि बोले पुढती। ते उपपत्ती अवधारा ॥ ३६ ॥ बिभीषणाचिये संगती। राक्षसांच्या दुर्गम गती। वश्य होतील श्रीरघुपती। विजयप्राप्ति बिभीषणें ॥३७॥ आभिचारिक[1] [2]विघ्नानुवर्ती† । स्वयें रामा वश्य होती। बिभीषणाचे संगतीं। विजयप्राप्ती श्रीरामा ॥ ३८ ॥ रात्रीं अपरात्रीं निकटवर्ती[3]। घाला घालोनियां मारिती। तेथें हे बिभीषणसंगती। विजयप्राप्ती श्रीरामा ॥ ३९ ॥ अलक्ष्य अगम्य अतर्क्य गती पृथ्वी कोरोनि धूर[4] चोरिती। तेथें ही बिभीषणसंगती। विजयप्राप्ती श्रीरामा ॥१४०॥ संकट विकट[5] अति दुर्घट। जेथें रिघतां परम कष्ट। बिभीषणासंगतीं होती सपाट। विजयपट श्रीरामा ॥ ४१ ॥ बिभीषणाची शुद्ध मती बिभीषण केवळ परमार्थी। विकल्प न धरावा चित्तीं। शुद्ध शरणार्थी बिभीषण ॥ ४२ ॥ लंका शोधितां संकटीं। म्यां देखिलें आपुले दृष्टीं। त्रिसत्य सत्य माझी गोष्टी। नव्हे कपटी बिभीषण ॥४३॥ वाहतों श्रीरामा तुझी आण। भावें शिवतों तुझे चरण। कपटी नव्हे हा बिभीषण। सत्य भाषण हें माझें ॥ ४४ ॥

रामाच्या मनोगताप्रमाणेच हनुमंताचें मत पडलें—ऐकतां हनुमंताची गोष्टी। श्रीरामासी आनंद पोटीं। हरिखें खेंवा[6] पडली मिठी। आल्हाद सृष्टीं न समाये ॥ ४५ ॥ जैसें श्रीरामाचें मनोगत। तैसेंचि बोलिला हनुमंत। तेणें उल्लासे श्रीरघुनाथ। असे गर्जत स्वानंदें ॥ ४६ ॥ भज मारावया जाण। कपटी रावण आलिया शरण। त्यासी माझें अभयदान। मग बिभीषण कैंवी त्याज्य ॥ ४७ ॥

१ जारणमारणादि करणारे. २ विघ्नें उत्पन्न करणारे. ३ जवळ असणारे. ४ मुख्य योद्धा. ५ मोठें. ६ आलिंगनाला.

† भक्त—वृत्ती.

रामाचा आनंद व बिभीषणाचें स्वागत व लंकाराज्यदान—बिभीषण माझा आत्मा जाण। बिभीषण माझा जीवप्राण। माझेनि चिरंजीवी बिभीषण। जन्ममरण त्या नाहीं ॥ ४८ ॥ बिभीषणा शरणागता। वेगीं पाचारीं पैं आता। लंका दिधली तत्त्वतां। निजराज्यतासंकल्पें ॥ ४९ ॥ जा रे म्यां मारिला रावण। लंकेसीं स्थापिला बिभीषण। शरणागतीं प्रेम पूर्ण। आपणा आपण विसरला ॥ १५० ॥ ऐसिया श्रीरामउत्तरीं। हनुमान लोळे पायांवरी। जें म्या नेमिलें जिव्हारीं[1]। तेंचि निर्धारीं[2] श्रीरामवाणीं ॥ ५१ ॥ भेटावया निजभक्ता। बाहु थरकती श्रीरघुनाथा। वेगीं बोलावीं गा हनुमंता। शरणागता बिभीषणा ॥ ५२ ॥ ऐकोनि बिभीषणाचें महिमान। सुग्रीवें खालती घातली मान। वानर जाले लज्जायमान। श्रीरघुनंदन उल्लासे ॥ ५३ ॥ बिभीषणाचें भाग्य पूर्ण। श्रीराम तुष्टला संपूर्ण। एका जनार्दना शरण। भेटीचें लक्षण अवधारा ॥ ५४ ॥ कैसी दोघांची दृष्टादृष्टी। कैसी दोघांची होईल भेटी। कैसे दोघे करितील गोष्टी। ते कथा कसवटी अनुपम्य ॥ ५५ ॥ देवाभक्तांचें दर्शन। ते कथा तंव अति पावन। एका जनार्दना शरण। रामायण अति रम्य ॥ १५६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणागमनं नाम सप्तत्रिंशत्तमोऽध्यायः ॥३७॥ ओंव्या ॥ १५६ ॥ श्लोक ॥ २४ ॥ एवं ॥१८०॥

## अध्याय ३८ वा

मारुतीचे वचनानें रामचंद्रास संतोष—श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ बिभीषणाचा वृत्तांत। समूळ सांगे हनुमंत। तेणें तुष्टला श्रीरघुनाथ। उल्लासत स्वानंदें ॥१ ॥

१ मनांत, अंतःकरणात. २ निश्चयपूर्वक.

रामस्तेषां वचः श्रुत्वा शरणागतवत्सलः ।
पूरयन्निव घोषेण श्लक्ष्ण वचनमब्रवीत् ॥ १ ॥
एवं ब्रुवति सुग्रीवे तस्मिन्हरिगणेश्वरे ।
उवाच राघवः श्रीमान्धर्मार्थसहित वचः ॥२॥
सुदुष्टो वाप्यदुष्टो वा किमेष रजनीचरः ।
सूक्ष्ममप्यहित कर्तुं मम शक्तः कथचन ॥ ३ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषला रघुनंदन । सुग्रीवादि वानरगण । त्यांप्रति आपण धर्म सांगे ॥ २ ॥ सद्भावेंसीं संपूर्ण । अथवा कपटें आलिया शरण । त्यासी नाहीं सर्वथा मरण । सत्य भाषण हें माझें ॥ ३ ॥

शरणागताला केव्हाहि अभयच. रावण आला तरी तेंच–माझा करावया घात । शरण आलिया लंकानाथ । त्यासीही माझा अभयहस्त । जाणा निश्चित कपि सर्व ॥ ४ ॥ शरणगतापासाव मरण । आम्हांसी सर्वथा नाहीं जाण । हेंही माझें सत्य भाषण । वानरगण तुम्ही जाणा ॥ ५ ॥ शरणागतासीं क्रोधानळीं[1]।जो कोणी उचलील[2] आंगोळी[2]। त्याची करीन मी होळी । शरजाळीं वर्षोनी ॥ ६ ॥ जो कोणी माझा शरणागत । त्यासी जेणें लाविला हात । त्याचा मी करीन घात । निश्चितार्थ हा माझा ॥ ७ ॥ श्रीराम कृपेचा कल्लोळ । श्रीराम शरणागतवत्सल । श्रीराम तो दीनदयाळ । प्रेमप्रांजळ श्रीराम ॥ ८ ॥ श्रीराम स्वानंदें गर्जत । बिभीषण जो शरणागत । त्यासी माझा अभयहस्त । आणा त्वरित भेटीसीं ॥ ९ ॥

आनयध्व हरिश्रेष्ठास्तमाश्वास्य ददाम्यहम् ।
बिभीषणो वा सुग्रीव यदि वा रावणोऽभयम् ॥ ४ ॥
राघवेणाभये दत्ते सनतो रावणानुजः ।
खात्पपातावनिं हृष्टः सर्वैरनुचरैः सह ॥ ५ ॥
स तु रामस्य धर्मात्मा निपपात बिभीषणः ।
पादयोर्निपपाताथ चतुर्भिः सह राक्षसैः ॥ ६ ॥

ऐसें बोलतां रघुनाथ । सुग्रीवासहित हनुमंत । उडाले पैं आकाशांत । जुत्पतियुक्त[1] स्वानंदें ॥१०॥ देखोनियां [1]वानरजात । पुढती बोले रघुनाथ । शरण आलिया लंकानाथ । अभयहस्त त्या माझा ॥ ११ ॥ शरण आलिया सर्वथा । बिभीषणाहून अधिकता । सुखी करीन लंकानाथा । जाण तत्वतां वानरेशा ॥ १२ ॥ रावण अथवा बिभीषण । दुष्ट नष्ट हो दुर्जन । मज आलिया शरण । अभयदान त्या माझें ॥ १३ ॥ जो भीतसे शरणागता । मरणभय ज्याचे चित्ता । जय न पावे तो सर्वथा । जाण तत्वता कपिराजा ॥ १४ ॥ ज्याचे पोटीं सभयता । कैसें निर्भय शरणागता । तैसें नाहीं श्रीरघुनाथा । निःशंकता निर्भय ॥ १५ ॥

बिभीषणाला आणवून त्यास अभय व त्याचें स्वागत–ऐकोनि श्रीरामाचें वचन । अवघे विस्मित वानरगण । गाढी[3] श्रीरामाची आंगवण । निधडा पूर्ण निःशंक ॥ १६ ॥ श्रीरामचित्तीं नाहीं चिंता । मरणभय नाहीं रघुनाथा । हाचि शरण्य[4] शरणागता । ऐसें समस्ता मानलें ॥ १७ ॥ ऐसा श्रीराम समर्थ । अवघे अति प्रीती बोलत । जेथें बिभीषण शरणागत । तेथें समस्त पातले ॥१८॥ देखतांचि बिभीषण । सुग्रीवें दिधलें आलिंगन । बिभीषण भाग्याचा संपूर्ण । वानरगण वानिती ॥ १९ ॥ नळनीळादि समस्त । अंगद आणि जांबवंत । अवघे आलिंगन देत । भाग्यवंत बिभीषण ॥२०॥ देखताचि हनुमंता । उल्लास बिभीषणाच्या चित्ता । त्याच्या चरणीं ठेवोनि माथा । सप्रेमता सद्गदित ॥ २१ ॥ माता पिता बंधुभगिनी । तूंचि सखा मजलागूनि । तुजवांचोनि त्रिभुवनीं । आन कोणी असेना ॥२२॥ रावणाची संपूर्ण कथा । सांगितली

१ क्रोधाग्नीनें, अत्यत संताप पावून. २ हात उतारील.

१ मुख्य वानरासह. २ वानरसमुदाय. ३ मोठी. ४ शरणागताचें रक्षण करण्याविषयीं समर्थ.

त्या हनुमंता । स्वराज्य सुहृद[1] त्यजोनि माता । शरण रघुनाथा मी आलों ॥२३॥ ऐसें सांगतांचि गोष्टी । हरिखें[2] बाष्प दाटे कंठीं । सुखस्वानंदें जडोनि मिठी । पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ २४ ॥ त्यासी मूर्च्छित पडतां । उल्लास हनुमंताचे चित्ता । उचलोनियां स्वानंदता । उल्लासता आलिंगी । ॥२५॥ अंगा अंगस्पर्शन । हनुमंतासीं आलिंगन । तेणें पावला समाधान । सुखसंपन्न बिभीषण ॥२६॥ कृपेनें बोले हनुमंत । बिभीषणा तूं भाग्यवंत । तुज तुष्टला श्रीरघुनाथ । कृपावंत कृपाळु ॥ २७ ॥

चार अनुयायासह बिभीषणाची शरणागति—श्रीरामें बोलाविलें भेटी । वेगें चाल उठाउठीं[3] । म्हणोनि धरिला बाहुवटीं[4] । वानरां पोटीं आल्हाद ॥ २८ ॥

पादयोः स तु रामस्य निपपात बिभीषणः ।
राक्षसः शरणान्वेषी चतुर्भिः सचिवैः सह ॥ ७ ॥
तं तु रामः समुत्थाप्य परिष्वज्य बिभीषणम् ।
उवाच मधुरं वाक्यं सखा मम भवानिति ॥ ८ ॥
अब्रवीच्च तदा रामं प्रतिवाक्यं बिभीषण ।
अनुजो रावणस्याहं तेन चास्म्यवमानितः ॥ ९ ॥
परित्यक्ता मया लंका मित्राणि च धनानि च ।
भवतं सर्वभूताना शरण्यं शरणं गतः ॥ १० ॥
राक्षसाना वधे साह्यं लंकायाश्चैव धर्षणे
करिष्यामि यथा प्राण प्रवेक्ष्यामि च वाहिनीम् ॥११

भेटवावया श्रीरघुपती । बिभीषणासी धरोनि हातीं । वेगें उठिला मारुती । वानरपंक्तीसमवेत ॥ २९ ॥ श्रीरामनामाचा गजर । करित चालिले वानर । नामें उचंबळिला सागर । नामें अंबर[5] दुमदुमलें ॥ ३० ॥ भेटावया शरणागता । बाहु स्फुरती श्रीरघुनाथा । आलिंगावया अति शीघ्रतां । श्रीरामचित्ता आल्हाद ॥ ३१ ॥ शुभ चिन्हें होळे लवती । हरिखें अष्टांगें थरकती । शरणागता श्रीरामप्राप्ती । आल्हाद चित्तीं भेटीचा ॥ ३२ ॥ अवलोकावया शरणागता । नेत्रपल्लव न हालतां । येणें उल्लासें श्रीरघुनाथा । उत्कंठता भेटावया ॥ ३३ ॥ येरीकडे[1] हनुमंत । धरोनि बिभीषणाचा हात । सुग्रीवादि कपि समस्त । आले गर्जत हरि-नामें ॥ ३४ ॥ देखतां श्रीरामदर्शन । बिभीषण घाली लोटांगण । मस्तकीं धरितां त्याचे चरण । आपणा आपण विसरला ॥ ३५ ॥ विसरला यौवराज्य संपत्ती । विसरला स्त्रीपुत्रसंतती । विसरला राक्षसजाती । श्रीराममूर्ती देखता ॥३६॥ विसरला जीवित्व जीव । विसरला देह अहंभाव । विसरला शिवत्व शिव । श्रीराघव देखतां ॥ ३७ ॥

साधकाच्या ब्रह्मार्पणासारखीच हीही शरणागति—राम देखतांचि दृष्टीं । विसरला द्वंद्व दुःख[2] त्रिपुटी[3] । विसरला स्वदेहेंसीं सृष्टी । आनंदकोटी श्रीरामा ॥ ३८ ॥ ऐसियापरी बिभीषण । श्रीरामासीं अनन्य शरण । स्वयें घालितां लोटांगण । समाधान पावला ॥ ३९ ॥ मन बुद्धि चित्त अभिमान । साधु राखे सावधान । तैसेचि चौघेही प्रधान । आणिले शरण श्रीरामा ॥ ४० ॥ धर्मार्थ काम मोक्ष पूर्ण । साधक करी ब्रह्मार्पण । तैसे चवघेही प्रधान । आणिले शरण श्रीरामा ॥ ४१ ॥ [4]साधनचतुष्टय-संपत्ती । साधून ब्रह्मार्पण करिती । तैशाच सजीव चारी मुक्ती । केले शरणार्थी श्रीरामा ॥ ४२ ॥ ऐसियापरी बिभीषण । अनन्यभावें लोटांगण । श्रीरामें उचलोनि आपण । आलिंगन दिधलें ॥४३॥ लवणजळा होय भेटी । तैसी दोघां पडली मिठी । विराले येरयेरांचे पोटीं । आनंद सृष्टीं न समाये ॥ ४४ ॥ दोनी दीप मेळविल्या ज्योती । दोनी

१ आप्तेष्टमंडळी. २ आनंदानें. ३ सत्वर. ४ मिठी मारून. ५ आकाश.

१ दुसरीकडे. २ सुखदुःखव्यथा. ३ ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान. ४ नित्यानित्यवस्तुविवेक, वैराग्य, शमादिषट्क (शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधानसंपत्ति ) आणि मुमुक्षुत्व.

मिळोनि एक होती। तैसें आलिंगितां रघुपती। अद्वैतस्थिति बिभीषणा ॥ ४५ ॥ जेंवी अलंकारें आपण। सुवर्णा दिधलें आलिंगन। ऐसिया स्थितीं रघुनंदन। भेटला आपण बिभीषणा ॥ ४६ ॥ ऐसें देवोनि आलिंगन। श्रीराम बोलिला गर्जोन। सखा माझा तूं पूर्ण। जीव प्राण तूं माझा ॥ ४७ ॥ जेंवी जळीं मिळाली साखर। स्वयें विरोनि होय नीर[१]। साखरें उदक केलें मधुर। तेंवी श्रीरामचंद्रबिभीषण ॥ ४८ ॥ श्रीरामाचें पूर्णपण। भक्तीं विवलें संपूर्ण। भक्तिभावाचें गोडपण। बिंबलें पूर्ण श्रीरामीं ॥४९॥ ऐसियापरी दोघे जण। पूर्ण पावोनि समाधान। हरिखेजोनि बिभीषण। काय आपण बोलत ॥५०॥

बिभीषणाचें आश्वासन—राक्षस मारावयाची निजख्याती। मुख्य मुख्य धुरा रणीं पडती। तैसी सांगेन मी युक्ती। रणसमाप्ती राक्षसां ॥ ५१ ॥ दुर्गीं रिघावया झडझडां। युक्ति जाणें मी गाढा। परी ते न चले वानरापुढां। उडोनि कडा चढतील ॥ ५२ ॥ सवेग करोनि उड्डाण। दुर्गीं रिघतील वानरगण तेथें माझी युक्ति कोण। मूर्खपण पैं माझें ॥ ५३ ॥ सुटल्या श्रीरामाचे बाण। समेरुसिंधूंसीं मरे रावण। तेथें माझी युक्ति कोण। मूर्ख पूर्ण मी एक ॥ ५४ ॥ ऐसें बिभीषणें सांगतां। कृपा उपजली रघुनाथा। अभयहस्त ठेवोनि माथां। होय बोलता तें ऐका ॥ ५५ ॥

इति ब्रुवाणं तं रामः परिष्वज्य विभीषणम्।
उवाच लक्ष्मणं वीरं समुद्राज्जलमानय ॥ १२ ॥
तेन चेमं महाप्राज्ञमभिषिंच विभीषणम्।
राजानं रक्षसां क्षिप्रं प्रसन्ने मयि लक्ष्मण ॥ १३ ॥

ऐसें बोलतां बिभीषण। संतोषला श्रीरघुनंदन। पुढती दिधलें आलिंगन। तुष्टमान[२] स्वयें जाला ॥ ५६ ॥ बिभीषणासी लंकापती। अभिषेकावया श्रीरघुपती। सिंधुजळ सिंचनार्थी। लक्ष्मणाप्रती स्वयें सांगे ॥ ५७ ॥

त्याला लंकेचें राज्यपद दिलें, व त्याचा राज्याभिषेक—तीर्थोदक प्रयागोदक। चतु समुद्रींचें उदक। वानरीं आणिलें आवश्यक। श्रीरघुकुळटिळकनिजाज्ञा ॥ ५८ ॥ व्याघ्रचर्म पैं सनख। सप्तमृत्तिका कुशोदक। औदुंबरी पीठ अति सुटंक[१]। लंकाभिषेक बिभीषणा ॥ ५९ ॥ घडासहित सोनकेळीं। घडीं घडघडित¶ नारळी। वानर हाणिती सुखसमेळीं। पुष्पें फळीं अभिषेका ॥ ६० ॥ दशाननासी न वधितां। बिभीषणासी अभिषेकितां। अवघे वानर म्हणती मिथ्या। युक्ति रघुनाथा आठवली ॥६१॥

श्रीरामाच्या आज्ञेनें हनुमतानें निर्मिलेली मतिलंका—श्रीराम म्हणे हनुमंता। लंका देखिली तुवा तत्वतां। समुद्रतीरीं करीं आतां। यथार्थता मज दावीं ॥ ६२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन। हनुमान घाली लोटांगण। समुद्रतीरीं आपण। करी निर्माण लंकेचें ॥ ६३ ॥ भोंवता समुद्रपरिघ देखा। सव्य[२] तिकुवळा मागें पडलंका। मध्यें निर्माण केली लंका। ध्वजपताका शोभती ॥ ६४ ॥ गडप्रवेश अति अवघड। चोरद्वारें मारे गूढ। विकट यंत्रें मारक दृढ। भरले अगड[३] बहुजळें ॥ ६५ ॥ *महाद्वारासंमुख। गुप्तत्वें मारक घातकीं†। हुडे अग्नियंत्रांचे भडक। पारिखें[४] कटक[४] मारावया ॥६६॥ उलटीं लोट‡ अतर्क्य घात। पारखे वीर ठायीं पडत। ऐसा मार दुर्गाआंत। दावी हनुमंत गडभागें ॥ ६७ ॥ फांजी[५] पौळी निघोट कडे। दुर्धर मार दोहींकडे। टळों नये मागेंपुढें। दावी निवाडें हनुमंत ॥ ६८ ॥ रचिली लंकेची आकृती। तीपुढें तुच्छ अमरावती।

---

१ पाणी. २ संतुष्ट.

१ सुचिन्हित. २ डाव्या बाजूला. ३ खंदक. ४ शत्रूचें सैन्य. ५ तट.
¶ भक—पाडित. * + पैं. † क्ष—मारक हुडे. ‡ ध—उलाट.

राजमंदिरें शोभती । टके झळकती पताका ॥६९॥ माडियां§ गोपुरें सातखणी । उपऱ्यांउपरी नवखणी । घरोघरीं पैं दुखणीं । लंकाभुवनीं अपार* ॥ ७० ॥ राणिवसा[1] शोभायमान । त्याहीमाजी अशोकवन । तेथें सीतेसी निर्बंधन । संरक्षण राक्षसी ॥ ७१ ॥ एकवस्त्रें अति दीन । मळीन केश कंपायमान । ऐसिये सीतेतें देखोन । रघुनंदन मूर्च्छित ॥ ७२ ॥ बिभीषण चवके चित्तें । उपडोनियां हनुमंतें । तेचि लंका आणिली एथें । अति विस्मयें विस्मित ॥ ७३ ॥ लंका देखतांचि पुढें । तवकें[2] उडाली माकडें । दुर्धर दुर्गांचे पैं हुडे[3]† । उड्डाण पडे माघारें ॥ ७४ ॥ अवघे करा आगवण । शोधोनि काढा रे रावण । ऐसे मुलले वानरगण । केलें विंदाण हनुमंतें ॥ ७५ ॥ सावध पाहे रघुनंदन । तंव वाळूचें केलें लंकाभुवन । हनुमंतें शोभायमान । समसमान लंकेसीं ॥ ७६ ॥ ऐसे स्वयें दुर्ग देखोन । विस्मयो पावला लक्ष्मण । अंगद सुग्रीव आपण । विस्मयापन्न होऊन ठेले ॥ ७७ ॥ देखोनि हनुमंताची लंका । टक पडिलें ब्रह्मादिकां । ब्रह्मांड करितां ब्रह्मा देखा । पाहे टकमका विस्मित ॥ ७८ ॥ हनुमंताचें मिथ्या रचना‡ । ब्रह्मादिका दिसे प्रमाण । ऐसें देखोनि विंदाण । सुखसंपन्न श्रीराम ॥ ७९ ॥ यापरी लंका देखोनि दृष्टीं । उल्हास श्रीरामाचे पोटीं । हनुमंताची पाठी थापटी । हरिख सृष्टीं न समाये ॥ ८० ॥

रावणवधापावेतों प्रतिकृति. लंका बिभीषणाजवळ गहाण—श्रीराम बोलिला आपण । मारोनि रावण कुंभकर्ण । मुख्य लंका देईन दान । सत्य जाण बिभीषणा ॥ ८१ ॥ मुख्य लंका देईन जंव दान । तंव हे हनुमत्कृत लंका जाण । तुजपासीं म्यां दिधली गहाण । सोडवण रावणांतीं ॥ ८२ ॥ बहुत दिन न ठेवीं गहाण । आम्हां तुम्हां वाइणी[1] हेचि जाण । निर्दळोनियां रावण । सोडवण पैं इची ॥ ८३ ॥ लंकेहूनिही देखा । कोटि गुणें या मोल अधिका । माझ्या हनुमंताची लंका । ते तुज देखतां डुलों नेदीं ॥ ८४ ॥ प्रीति प्रेम ज्ञान धन । तुज यथेच्छ देईन जाण । हनुमंतलंका सोडवीन । सत्य जाण बिभीषणा ॥८५॥ ऐकोनि श्रीरामाचें उत्तर । संतोषोनियां वानर । अवघे करिती जयजयकार । सुखनिर्भर सौमित्र ॥८६॥ हनुमंतलंका अद्यापवरी । आहे समुद्राचे तीरीं । काळ धाकें §जतन[2] करी । भय भारी हनुम्याचें ॥ ८७ ॥ राज्याभिषेकाची सामग्री । सिद्ध केली वानरीं । सौमित्रें घेवोनि करीं । अभिषेक करी बिभीषणा ॥ ८८ ॥

रामवाक्येन सौमित्रिरभिषिच्य बिभीषणम् ।
मध्ये वानरमुख्यानां राजानं रामशासनात् ॥ १४ ॥
तं प्रसादं तु रामस्य दृष्ट्वा सद्यः प्लवंगमाः ।
प्रचक्रिरे महानादान्साधुसाध्विति चाब्रुवन् ॥ १५ ॥

बिभीषणास राज्याभिषेक—श्रीरामाज्ञा लाहोन । बिभीषणा राज्याभिषिंचन । करिता झाला लक्ष्मण । वानरगणसमवेत ॥ ८९ ॥ [3]राज्यपटअभिषिंचन । अंगदासुग्रीवासमान । बिभीषणासी सिंहासन । रामवरदानप्रयोगें ॥ ९० ॥ बिभीषणासी लंकादान । श्रीरामें दिधलें संतोषोन । तें देखोनि वानरगण । आल्हादें पूर्ण हरिखले ॥ ९१ ॥ जयजयकाराचा गजर । करिते जाले वानरवीर । श्रीरामनामाचा उच्चार । तेणें अंबर गर्जलें ॥ ९२ ॥ श्रीराम निजभक्तकृपाळु । श्रीराम शरणागतवत्सळु । श्रीराम प्रेमळ प्रांजळु । दीनदयाळु श्रीराम ॥ ९३ ॥ साधु स्वामी श्रीरघुनाथ । साधु बिभीषण शरणागत । साधु साधु तो हनुमंत । स्वामिकार्यार्थसाधक

१ जनानखाना. २ त्वेषानें. ३ बुरूज.

§ क्ष—तजीवा. * ड—अपार, क्ष—अपारा.

† ड—सडे; क्ष—कडे. ‡ क्ष—वचन.

१ अट, ठराव. २ रक्षण. ३ राज्याभिषेक.

§ जर्जर न करी, क्ष—जोडोनियां करी.

॥ ९४ ॥ जैसा राजा श्रीरघुपती। तैसा सुग्रीव वानरपती। तैसाचि बिभीषण लंकापती। केला निश्चितीं श्रीरामें ॥ ९५ ॥ विकल्प[1] न धरोनि चित्तीं। शत्रुबंधु तो शरणार्थी। आपणासमान पदप्राप्ती। दिधली निश्चितीं श्रीरामें ॥ ९६ ॥ शरणागता संरक्षणें। शेखीं[2] आपणासमान करणें। हें कर्तव्य श्रीराम जाणे। अनन्याकारणें कृपालु ॥ ९७ ॥ न जिंकिता दशानन। बिभीषणासी लंकादान। श्रीरामकीर्ति अति पावन। दीनोद्धरण श्रीराम ॥ ९८ ॥ कीर्ति वानिजे सुरगणीं। कीर्ति वानिजे ऋषिजनीं। कीर्ति वानिजे वानरगणीं। कीर्ति पावन तिहीं लोकीं ॥ ९९ ॥ सख्या बंधु बिभीषण। कर्ता एक रघुनंदन। त्यासी जालिया अनन्य शरण। जन्ममरण त्या कैंचें ॥ १०० ॥ एका जनार्दना शरण। पुढें गोड अति निरूपण। सागरीं तरतील पाषाण। सेतुबंधन अवधारा ॥१॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणलंकाराज्याभिषेको नाम अष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३८ ॥ ओंव्या ॥ १०१ ॥ ॥ श्लोक ॥ १५ ॥ एवं ॥ ११६ ॥

---

## अध्याय ३९ वा

बिभीषणास लंकादान दिल्यावर सर्वत्र आनंदी आनंद—श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ †बिभीषणासी लंकादान। देवोनियां श्रीरघुनंदन। सभा बैसली सावधान। सुप्रसन्न स्वानंदें ॥ १ ॥ वानर करिती गदारोळ[3]*। बिभीषणासी सुखकल्लोळ। सुग्रीवा उल्लास प्रबळ। सकळ दळ देखोनि ॥ २ ॥ श्रीराम वानरांचे महाभार। करूं येती नमस्कार। श्रीरामनामाचा गजर। देती भुभुःकार आल्हादें ॥ ३ ॥

१ शंका. २ शेवटीं. ३ गलबला.

‡ ध्रइ—शत्रु. * ड—ळी, ध्र—ळा.

† क्षमध्ये—यावत् चन्द्रसूर्यस्य यावत् तिष्ठति मेदिनी। यावत् मत्कथा लोके तावद्राज्यं बिभीषण ॥

हनुमान व सुग्रीव समुद्र पार जाण्याचा विचार करितात—तेथें येवोनि हनुमंत। सुग्रीवासीं करी एकांत। सीता सोडवावयाचा मुख्यार्थ। लंकानाथ वधावया ॥ ४ ॥ समुद्राचिये तीरीं। बैसलथा वानरांच्या हारी। कैसेनि जाववेल पैलपारी। तें विचारीं कपिनाथा ॥ ५ ॥

अब्रवीत्त हनूमत स च राजा वनौकसाम्।
कथं सागरमक्षोभ्य तरेम वरुणालयम् ॥१॥

नद्या पर्जन्यें भरोनि येती। तेणें सिंधु प्रवाहे ना क्षितीं। उष्णकाळीं नद्या सुकती। तेणें [1]अपांपती आटेना ॥ ६ ॥ ऐसा नित्य पूर्णत्वें गंभीर। अगाध अक्षोभ्य सागर। आमची सेना तंव वनचर। कैंवी परपार पावती ॥ ७ ॥ समुद्रलंघना उपावो। आम्हांसी सर्वथा न दिसे पहाहो। तूं तंव वानराचा महाबाहो। काय उपावो करावा ॥ ८ ॥ बैसोनि वानरें समुद्रतटीं। करिती लांब लांब गोष्टी। ते तंव मिथ्या गा चावटी। जावया परतटीं शक्ति नाहीं ॥ ९ ॥

सुग्रीवाची चिंता—सुग्रीव म्हणे हनुमंता। काय बुद्धि करावी आतां। समुद्रलंघनीं तत्वतां। उपाव सर्वथा असेना ॥ १० ॥ कैसेनि वधावें लंकानाथा। कैसेनि आणावी ते सीता। सुखी न करवे रघुनाथा। ऐसी अवस्था दिसताहे। ॥ ११ ॥ तुज पुसतों अति आप्तता। समुद्रलंघनीं उपाव वृथा। कार्य न साधे श्रीरघुनाथा। काय म्यां आतां करावें ॥ १२ ॥ कार्य न साधे श्रीरघुनाथा। ऐसें उत्तर ऐकतां। स्फुरण आलें हनुमंता। साटोपता[2] उठिला ॥ १३ ॥

हनुमंताचें स्फुरण व बलाविष्कार—निर्दळावया लंकापती। प्रळयरुद्राची[3] आकृती[3]। वेगें वाढिन्नला मारुती। भेणें कांपती सुरवर ॥ १४ ॥ पिंजारिल्या

१ समुद्र. २ नेटानें. ३ प्रळयकाळींच्या रुद्राप्रमाणें, भयंकर.

रोमावळी। शेंडी थरथरीं समूळीं। पुच्छ वाढिनलें निराळीं[1]। [2]आतुर्बळी खवळला ॥ १५ ॥ तुम्ही अवघे वानरगण। करा माझें पुच्छग्रहण। श्रीराम-लक्ष्मणां खांदीं वाहून। जाईन घेऊन लंकेसीं ॥ १६ ॥ बिभीषण शरणागत। त्यासी धरोनि हृदयांत। एकेचि खेपे मैं समस्त। नेईन निश्चित लंकेसी ॥ १७ ॥ हनुमान आतुर्बळी उद्भट[3]। वटारिले नेत्रवाट। बाहु स्फुरती थरथराट। वळिला साट[4] पुच्छाचा ॥ १८ ॥ देखोनि हनुमंताची शक्ती। सुग्रीव दचकला चित्तीं। गजबजिले जुत्पती। शांत मारुति केंवी होय ॥ १९ ॥

त्यामुळें सर्वांची गजबज, श्रीरामचंद्राचें सांत्वन—

देखोनि हनुमंताचें त्राण। वेगीं उठला रघुनंदन। त्यास हृदयीं आलिंगून। मधुर वचन अनुवादे ॥ २० ॥ समुद्र बापुडें तें कोण। अग्निबाणें कोरडा करीन। पायीं नेईन वानरगण। लंकाकंदन करावया ॥ २१ ॥ कायसा रावणाचा पुरुषार्थ। अर्धक्षणें करीन घात। ऐसा शांतवोनि हनुमंत। स्वस्थ रघुनाथें बैसविला ॥ २२ ॥

बिभीषणाचें मार्गदर्शन कीं सागराला प्रार्थना—

ऐकोनि श्रीरामाचें वचन। सुखावला बिभीषण। सुगमोपायें समुद्रतरण। मूळ कारण सांगत ॥ २३ ॥

एवमुक्तस्तु श्रीरामं प्रत्युवाच बिभीषणः।
समुद्रं शरणं राजन्गतुमर्हति राघव ॥ २ ॥
खानितः सगरेणायमप्रमेयो महोदधिः।
कर्तुमर्हति रामस्य ज्ञातेः कार्यं महोदधि. ॥ ३ ॥
सागरश्च हि रामस्य श्रूयते प्रपितामहः।
समुद्रो ज्ञातिसाहाय्य करिष्यति न संशय. ॥ ४ ॥
एवं बिभीषणेनोक्तं राक्षसेन विपश्चिता।
प्रकृत्या धर्मशीलस्य राघवस्याप्यरोचत ॥ ५ ॥

श्रीरामवाक्य प्रतापपूर्ण। ऐकोनियां बिभीषण। स्वयें घालोनि लोटांगण। कर जोडूनि विनवित ॥ २४ ॥ सोडोनियां अग्निबाण। सिंधु शोषितां न लागे क्षण। परी तें नव्हे गा भूषण। अति दूषण सूर्यवंशा ॥ २५ ॥ सावधान परिसें श्रीरघुनाथा। सांगेन मी समूळ कथा। समुद्र पूर्वज तत्वता। ते मूळानुवार्ता अवधारीं ॥ २६ ॥ तुझे पूर्वज सगर जाण। त्यांचेनि सागर हा निर्माण। यालागीं सागर हें अभिधान। वेदपुराण अनुवादे ॥ २७ ॥ पूर्वी समुद्र कायें नव्हता। [1]आवरणोदकीं अति गुप्तता। सगरें खाणोनियां तत्वतां। प्रकटार्थां आणिला ॥ २८ ॥ सगरापासूनि सागरता। तो तुज पूर्वज तत्वतां। कैसेनि त्याच्या करावें घाता। निजवंशस्था समुद्रा ॥ २९ ॥ वेगळें करोनि दशरथा। सागर सातवा प्रपिता। ऐसी सूर्यवंशाची कथा। होय सांगता बिभीषण ॥ ३० ॥ समुद्र पूर्वज पूज्य जाण। त्यासी श्रीराम निघाल्या शरण। तो तुज भेटोनि आपण। [2]सागरोत्तरण सांगेल ॥ ३१ ॥ तुझा प्रताप श्रीरघुनाथा। समुद्र जाणतो तत्वतां। त्या तुज भेटीची परम आस्था। मज सर्वथा कळलीसे ॥ ३२ ॥ तूं तव प्रतापी रघुराज। सगरवंशीं वंशध्वज। समुद्र तुझा निजपूर्वज। करील काज वंशाचें ॥ ३३ ॥ निजपर्वज सिंधूसीं शरण। रिघतां तुज लाज कोण। सुखोपायें समुद्रतरण। स्वयें आपण सांगेल ॥ ३४ ॥ धर्मशीळ सज्ञानता। समूळ निजवंशाची कथा। बिभीषणें स्वयें सांगतां। श्रीरघुनाथा आल्हाद ॥ ३५ ॥

श्रीरामचंद्रास मान्य—बिभीषणाची जे गोष्टी। ते रुचली श्रीरामाचे पोटीं। लक्ष्मणसुग्रीवें लक्षोनि दृष्टी। तेंच जगजेठी अनुवादे ॥ ३६ ॥

बिभीषणस्य मंत्रोयं मम लक्ष्मण रोचते।
ब्रूहि तावन्च सुग्रीव तवापि यदि रोचते ॥ ६ ॥

---

१ आकाशांत. २ महाबलवान्. ३ अत्यंत. ४ आंकडा.

१ सर्व भूगोलास आच्छादून टाकणारे उदकांत. २ समुद्र ओलांडून जाण्याची युक्ती.

एवमुक्तौ तु रामेण तदा सुग्रीवलक्ष्मणौ ।
समुदाचारसयुक्तमिदं वचनमूचतुः ॥ ७ ॥
किमर्थं नौ नरव्याघ्र न रोचिष्यति राघव ।
बिभीषणोक्तं हृद्यं च युक्तं चैव विशेषतः ॥८॥

सागरासी रिघावें शरण । गोड बोलिला बिभीषण । सुग्रीव राजा सखा लक्ष्मण । तुम्हां हें वचन रुचे[ψ] की ॥ ३७ ॥ सुग्रीव आणि लक्ष्मण । वदती वंदोनि श्रीरामचरण । विभीषणवचन अति प्रमाण । तेंचि आपण करावें ॥ ३८ ॥ सत्यवादी बिभीषण । सिंधुपूर्वजासी रिगोनि शरण । अनायासें समुद्रतरण । तेंचि आपण करावें ॥ ३९ ॥

त्याप्रमाणें समुद्रपूजन व त्रिरात्र अनुष्ठान- ऐकोनि दोघांचें वचन । रिघावया समुद्रा शरण । श्रीराम करी समुद्रपूजन । सुमनचंदनकल्मूळें ॥ ४० ॥

सागरं द्रष्टुमिच्छामि रूपिणं सरितां पतिम् ।
कर्तुमर्हसि साहाय्यं भव त्वं शरणं मम ॥ ९ ॥
एवमुक्त्वा कुशास्तीर्णे रम्ये सागररोधसि ।
संविवेश तदा रामो वेद्यामिव हुताशनः ॥१०॥
तस्य रामस्य सुप्तस्य कुशास्तीर्णे महीतले ।
नियमादप्रमेयस्य निशास्तिस्रोऽतिजग्मतुः ॥११॥

रम्य समुद्राचे तटीं । पसरोनि कुशास्तरण[1] दाटी । दर्भशयनीं श्रीराम जगजेठी । घ्यावया भेटी सागराची ॥ ४१ ॥ तूं आमुचा पूर्वज । आम्ही तुझे वंशज । माझें सिद्धी पाववीं काज । शरण तुज अनन्यत्वें ॥ ४२ ॥ ऐसें बोलोनि रघुनंदन । दर्भासनीं करी शयन । जेंवी पुरिला हुताशन[2] । देदीप्यमान अग्निहोत्रीं ॥ ४३ ॥ यापरी श्रीरघुनाथ । साधावया निजकार्यार्थ । त्रिरात्र सिंधुशरणागत । दिसे निद्रिस्थ सावधत्वें ॥ ४४ ॥ जागृती स्वप्न सुषुप्ती । तुरीयातीत[3] श्रीराममूर्ती । तोही शरण सिंधू शरणार्थी । दिसे प्रतीति सुरनरां ॥ ४५ ॥ ऐसा प्रसुप्त श्रीरामचंद्र । देखोनि तळमळती वानर । केव्हां पावों समुद्रपार । दशशिरवधार्थ ॥ ४६ ॥

समुद्राच्या असहकारामुळें सर्वांस चिंता व हनुमताचा त्वेष–अनुलक्षोनि श्रीरघुनाथ । हनुमान निजगुह्य सांगत । निद्रा करितांचि येथ । व्यर्थ पुरुषार्थ दिसताहे ॥ ४७ ॥ स्वयें बोलती वानरगण । श्रीरामभातां दुर्धर बाण । तरी कां निघाला शरण । गाढेपण धरोनी ॥ ४८ ॥ हनुमान म्हणे मी निजसेवक । समुद्रतरणीं कायसी अटक । पुच्छाग्रीं समग्र कटक । एकीएक उतरीन ॥४९॥ अंतर्यामी श्रीरघुनाथ । जाणोनि हनुमंताचें हृद्गत । स्वयें उठिला सावचित्त । निजपुरुषार्थ दावावया ॥ ५० ॥

ततः क्रुद्धो महाबाहू रामो रक्तान्तलोचनः ।
समक्षं लक्ष्मणं वीरं सरोषो वाक्यमब्रवीत् ॥१२॥
चापमानय मे शीघ्रं शरांश्च विशिखोपमान् ।
अद्याक्षोभ्यमपि क्रुद्धः क्षोभयिष्यामि सागरम् ॥१३
न साम्ना शक्यते कीर्तिर्न साम्ना लभते यशः ।
न साम्ना वीर्यशौर्ये च न साम्ना विजयो भवेत् ॥१४
सपीड्य च धनुर्घोरं कम्पयित्वा शनैर्जगत् ।
ततो बाणधनुष्पाणिः क्रोधविस्फारितेक्षणः ॥ १५ ॥
मत्कार्मुकविनिर्मुक्तैः शरैः शुष्को महोदधिः ।
अद्यैनं संतरिष्यंति पद्भ्यां सर्वे प्लवंगमाः ॥१६॥

श्रीरामचंद्राचा क्रोध व धनुष्यबाण आणण्याचा आवेश–तीन दिवस लोटल्यापाठीं । स्वयें समुद्र न येचि भेटी । श्रीराम कोपला जगजेठी । रक्तांबरदृष्टी[1] कृतांत ॥ ५१ ॥ आमुचा पूर्वज हा पूर्ण । म्हणोनि सद्भावें रिघालों शरण । तंव याचें दुर्जनपण । न येचि आपण भेटीसी ॥ ५२ ॥

१ दर्भांचें शयन २ अग्नि. ३ नित्यानंदस्वरूपस्थितीहून पलीकडे.

१ रक्तवर्ण आकाशासारखे लाल नेत्र करून.

ψ ड–रुचे तक्चे.

1 ड–गोढपण.

याचा वाढवोनि सन्मान । करोनि अर्घ्यपाद्यादि पूजन । अनन्यभावें रिघतां शरण । न येचि आपण भेटीसी ॥ ५३ ॥

मार्दवाचा अनादर. राजांना मार्दव कामाचें नाहीं—याचे सर्वांगीं गर्व मोठा । अक्षोभ्यत्वें अगाध ताठा । यासीं मी लक्ष्मणा सुभटा । लावीन वाटा निधनाचे[1] ॥ ५४ ॥ शरण रिघाल्या पुरुषार्थी । कीर्ति ते होय अपकीर्ती । शरण रिघावें अशक्तीं । तें केलिया शक्तिलाभ कैंचा ॥ ५५ ॥ शरण रिघतांचि पाठीं । वाढीव होय उफराटी । तेथें कायसी यशाची गोष्टी । अपेश वाक्पुटीं जग वदे ॥५६॥ शरण रिघतांचि बळवंतीं । समूळ पळे यश कीर्ती । त्यासी कैंची विजयप्राप्ती । अवघे म्हणती अशक्त ॥५७॥ समुद्र स्वयें अभक्त आपण । यासी मी भक्त रिघालों शरण । तंव तेणें गर्व धरिला पूर्ण । केलें उपेक्षण पैं माझें ॥५८॥ मृदुपणें[2] नाहीं यश कीर्ती । मृदुपणें नाहीं लाभप्राप्ती । मृदुपणें नाहीं विजयवृत्ती । जाण निश्चितीं सौमित्रा ॥ ५९ ॥ मृदुत्वें संन्यासीं धरावी शांती । तेणें त्यासीं परमार्थप्राप्ती । मृदुत्व आम्हां रायांप्रती । जाण अपकीर्ती कारण ॥ १६० ॥ अदंड्यातें राजे दंडिती । अदम्यातें राजे दमिती । ते राजे जैं शांति धरिती । तेचि अपकीर्ति तयांसी ॥ ६१ ॥ समुद्राचा गर्व पूर्ण । तो नाशीन न लागतां क्षण । दे दे माझें धनुष्यबाण । अति दारुण सर्पप्राय ॥ ६२ ॥ सर्प लागल्या उतरे विख । त्याहूनि माझे बाण तीख । सुरां असुरां प्राणांतक । जीवातेंही देख जीव घेती ॥ ६३ ॥

श्रीरामाच्या कोपानें देवादिकांचा उद्वेग—ऐसें बोलोनि आपण । कोपें वाहिलें धनुष्यबाण । अग्निअस्त्र सज्जोनि आपण । वोढी काढोन चालिला ॥ ६४ ॥ क्षोभला श्रीराम देखोन । स्वर्गीं देव कंपायमान । तळमळिती मगर मीन । आलें निधन सिंधूसी ॥ ६५ ॥ समुद्र शोषितां राघव । पाताळीं कांपती दानव । दैत्य नाग मानव । धाकती सर्व श्रीरामा ॥ ६६ ॥ बाण पडतां समुद्रजळीं । सप्तपाताळां करील होळी । पाताळवासी कांपती चळीं । श्रीराम महाबळी क्षोभला ॥६७॥ धनुष्य चढवितां श्रीरामा । धाकें रविचंद्रा काळिमा । नक्षत्रें पडती व्योमा[1] । ऋषी स्वधर्मा विसरले ॥ ६८ ॥ शोषितां समुद्राचें पाणी । बाणाग्नि मिळोनि अर्णवाग्नी[2] । दोनी भस्म करिती अवनी[3] । ब्रह्मा मनीं साचित ॥ ६९ ॥ ब्रह्मा देखोनि साचित । ब्रह्मभुवनीं अति आकांत । सिंधुनिर्दळणीं श्रीरघुनाथ । करील अंत सृष्टीचा ॥ ७० ॥ ऐकें सौमित्रा साचार । शोषोनि समुद्राचें नीर[4] । पायीं उतरीन वानर । निशाचर वधार्थ ॥ ७१ ॥

श्रीरामचंद्राची रौद्रवृत्ती पाहून समुद्राचें स्त्रीपुत्रांसह आगमन—धनुष्य ओढितां सत्राण[5] । दोनी वटारिले नयन । श्रीराम दिसे काळासमान । वानरगण कांपती ॥ ७२ ॥ क्षोभला देखोनि श्रीरघुनाथ । स्त्रियांपुत्रांसमवेत । समुद्रासीं अति आकांत । आला प्राणांत श्रीरामें ॥ ७३ ॥ सुटल्या श्रीरामाचा बाण । त्यातें निवारूं शकेल कोण । त्यांसी न होतांचि शरण । आलें मरण निश्चित ॥७४॥ परम कृपाळु श्रीरघुनाथ† । स्त्रियांपुत्रांसमवेत । स्वयें होवोनि मूर्तिमंत । समुद्राआंत प्रकटला ॥ ७५ ॥

ततः समीपे रामस्य विधायोर्मीः सहस्रशः ।
स्वयं मध्यात्समुत्पत्य सागरः स च मूर्तिमान् ॥१७॥
स राममुपसंगम्य पूर्वमामंत्र्य वीर्यवान् ।
अब्रवीत्प्राजलिर्वाक्यं राघवं शरपाणिनम् ॥ १८ ॥

---

१ मरणाचे. २ नम्रपणें.

१ आकाशातून. २ समुद्रातील वडवानळाला. ३ पृथ्वी. ४ उदक. ५ नेटानें.

† क्ष—शरणागता न करीच घात । यालागीं स्त्रीपुत्रा समवेत । समुद्रात प्रगटला ॥ ७५ ॥

भो भो राम महाबाहो रघुवंशविवर्धन ।
शृणु मे वचनं सौम्य मा भूः क्रुद्धो रघूत्तम ॥१९॥

रामानिकट सागरीं । सहस्रोर्मि[1] महालहरी । सिंधु प्रकटला त्यांमाझारी । रूपधारी साकार ॥ ७६ ॥ द्वादशनामांकित टिळे । कंठीं यज्ञोपवीत रुळे । सपुत्रस्त्रिया कुटुंबमेळें । देखिलें त्या काळें श्रीरामें ॥ ७७ ॥ स्त्रियांपुत्रांसमवेत । समुद्र पायवाटे येत । तें देखोनि श्रीरघुनाथ । अति विस्मित स्वयें झाला ॥ ७८ ॥

मूळ ब्रह्मापासून उत्पत्ति त्यामुळें तो ब्राह्मण म्हणून त्यास श्रीरामानें नमन केलें-पूर्वी ब्रह्मयानें केला निर्माण । यालागीं सिंधु शुद्ध ब्राह्मण । सगरीं पुढें केलें खनन । सागर अभिधान[2] तेणें त्यासी ॥७९॥ ऐसा ब्राह्मण देखोनि तेथ । कृपाळु तो श्रीरघुनाथ । न करीच शरसंपात[3]। द्विजघात चुकवावया ॥८०॥ बाहेर आलिया ब्राह्मण । मग समुद्रीं सोडीन बाण । श्रीरामें विचारोनि जाण । वोढी काढोन राहिला ॥ ८१ ॥

सागराची विनती-मग ब्राह्मण उदकाआंतौता । शरण शरण म्हणे श्रीरघुनाथा । माझ्या करूं नको घाता । शरण तत्वतां मी आलों ॥ ८२ ॥ कोणें अपमानिलें द्विजवरा । धनवृत्ती कीं हरिली दारा[4] । तें सांगें गा मज रघुवीरा । तुझ्या कैवारा मी करीन ॥ ८३ ॥ आधीं साधीन द्विजकार्यार्था । मग सोडवील गा सीता । त्रिसत्य सत्य हें रघुनाथा । सांग मी आतां काय करूं ॥ ८४ ॥ मज श्रीरामा आलिया शरण । तुज कल्पांतीं नाहीं मरण । श्रीराम वंदुनी द्विजाचे चरण । पुसे आपण काय करूं ॥ ८५ ॥ द्विज म्हणे श्रीरघुनाथा । मी समुद्र शरण आलों आतां । सोडोनियां† शरसंपाता । माझ्या घाता कां करिसी‡ ॥ ८६ ॥

१ हजारों लाटा. २ नांव. ३ बाण सोडणें ४ स्त्री.

† क्ष—अमी शरसतापा. ‡ क्ष—करूं पाहासी.

रामाचें उत्तर-तूं माझा पूर्वज सनातन[1] । तुज देवोनि सन्मान । तीन दिवस निरंजन[2] । म्यां दर्भशयन सेविलें ॥ ८७ ॥ तुझे आंगीं गर्व पूर्ण । भेटी न देसीच जाणोन । आतां वांचवावया निजप्राण । आलों शरण म्हणतोसी ॥ ८८ ॥

न येण्याचें कारण-तुझेनि थोर अपकीर्ती । झाली सूर्यवंशा अपख्याती । तेणें क्षोभें गा रघुपती। भेटी निश्चितीं न घेंचि ॥ ८९ ॥ आतां धरिलिया आंगवण । तरी मी घेवों आलों दर्शन । तुज गुह्य सांगों आलों आपण । सावधान अवधारीं ॥९०॥ देखतां वानरांचिया कोटी । रत्नांजळी घेवोनि मुष्टी । अर्पोनि श्रीरामअगुष्ठीं । चरण ललाटीं वंदिले ॥ ९१ ॥ श्रीराम अवतार पूर्ण । मी जाणतों संपूर्ण । पुढती पुढती लोटांगण । पुढती चरण वंदिले ॥ ९२ ॥ श्रीरामा ऐकें सावधदृष्टीं । सांगणें आहे गुह्य गोष्टी । सूर्यवंशीं कीर्ति लाठी । ते उफराटी तुवां केली ॥ ९३ ॥

पूर्वजाच्या कीर्तीच्या विरुद्ध बनाव झाला-हरिश्चंद्राची कीर्ती । वाखाणिली त्रिजगतीं । शिवी मांस तुकोनि[3] कपोतीं । वैकुंठाप्रती पुरी नेली ॥ ९४ ॥ रुक्मांगद धर्मांगदेंसीं । व्रत पाळुनी एकादशी । नगरी नेली वैकुंठासी । जाले जगासी उपकारी ॥९५॥

सागराचा सूर्यवंशीं उत्पत्तीचा वृत्तान्त-माझी सूर्यवंशीं उत्पत्ती । जाली असे कैशा रीतीं । तेंही सांगेन श्रीरघुपती । सावधवृत्तीं अवधारीं ॥ ९६ ॥

सागरः सगरात्कीर्तिर्गंगा कीर्तिर्भगीरथात् ।
रामस्याभिनवा कीर्तिरेका भार्या न रक्षिता ॥२०॥

[4]सगरापासाव सागर । हा भागवतीं कथाविस्तार । कपिलमुनीश्वरचरित्र । अति विचित्र तिहीं लोकीं ॥ ९७ ॥ तया चरित्राचे पोटीं । कपिल लक्षूनि क्षोभक दृष्टीं । सगरवीर सहस्र साठी ।

१ पूर्वीपासूनचा. २ निर्दोष, शुद्ध. ३ तोलून. ४ सगरापासून.

वाग्वज्रदंष्ट्रीं[1] शापिले ॥ ९८ ॥ बळोन्मत्त साठी सहस्र। नाहीं भूतदया अणुमात्र। जळत असाल अहोरात्र[2]। हें वाग्वज्र सोडिलें ॥ ९९ ॥ वज्रघात एकाले मारी। वाग्वज्राची त्याहूनि थोरी। साठी सहस्रां कवळोनि वीरीं। आगी एकसरी लाविली ॥ १०० ॥ वज्रघात येतां दारुण। शूर छेदिती विंधोन बाण। वाग्वज्रासी निवारण। सर्वथा जाण असेना ॥ १ ॥ ढळवेना ब्रह्मशापाहातीं। मागें पुढें न चले गती। धडधडाटें पैं जळती। अहोराती महावीर ॥ २ ॥ जळत देखतां सगरांसी। कृपा उपजली मुनीश्वरांसी। प्रार्थोनिया कपिलासी। उश्शापासी मागितलें ॥ ३ ॥ भगापासूनि उत्पन्नभूत। वंशीं जन्मला भगीरथ। तो गंगा आणोनि एथ। सगर समस्त उद्धरील ॥ ४ ॥ तेचि वंशीं भगीरथ। गंगा आणोनि प्रयत्नयुक्त। पूर्वज तारिले गा समस्त। जग पुनीत तेणें केलें ॥ ५ ॥ ऐसी पूर्वजांची ख्याती। तेचि वंशीं तूं रघुपती। पुण्य पूज्यत्वें पवित्र कीर्ती। थोर अपकीर्ति तुज आली ॥ ६ ॥

दोघे बंधू असताना सीता जाणें, मला खेद आला— कळिकाळ घालोनि तोडरीं। दोघे बंधु धनुर्धारी। शेखीं बाईल नेली चोरीं। लोकांतरीं अपकीर्ति ॥ ७ ॥ पाठीची हरविली कांता। लाज लाविली वंशपुरुषार्थां। थोर अपकीर्ति तुझे माथां। श्रीरघुनाथा बैसली ॥ ८ ॥ श्रीराम सूर्यवंशस्थ। सीताविरहें रडत पडत। ऐसा ऐकोनि वृत्तांत। दुःखाभिभूत मी झालों ॥ ९ ॥ तुवां सेविल्या दर्भशयन। तेणें क्षोभें मी क्षोभायमान। तुझें न घेंचि दर्शन। सत्य जाण श्रीरामा ॥ ११० ॥

श्रीराम लज्जित होतात—शक्ति असोनि संपूर्ण। अशक्तसम आलासी शरण। येणेंही क्षोभें क्षोभायमान। तुझें दर्शन न घेंचि ॥ ११ ॥ सीता नेतां पैं रावण। तेथें न कराचि आंगवण। मज पूर्वजाचा घ्यावया प्राण। अग्निबाण सज्ज केला ॥ १२ ॥ ऐकोनि समुद्राचें वचन। श्रीराम झाला लज्जायमान। गळों पाहती धनुष्यबाण। स्वेद संपूर्ण चालिला ॥ १३ ॥

रावणानें सीता नेल्यावर रडतां व मी न आल्यानें धनुष्यावर बाण लावता—ऐसें देखोनि श्रीरघुनाथा। समुद्रें चरणीं ठेविला माथा। जें मी बोललों उद्धतता। क्षमा तत्वतां मज कीजे ॥ १४ ॥ अति आवेशें सज्जोनि चाप। मजवरी धरूं नको कोप। सिंधु तरणें हें तंव अल्प। कार्य स्वल्प श्रीरामा ॥ १५ ॥

सागराचा व दशरथाचा पूर्वसंबंध, सगरांना शाप, भगीरथानें केलेला उद्धार—मी तव वंशस्थ कैवारी। दशरथाचा कृतोपकारी। तीही कथा निजनिर्धारीं। अवधारीं गा श्रीरामा ॥ १६ ॥ तारकामययुद्धाआंत। मी आणि दशरथ। इंद्रासी साह्य गेलों तेथ। युद्धकंदनार्थ दृढ झाला ॥ १७ ॥ माझा दैत्यीं करितां घात। साह्य झाला दशरथ। दैत्य दमोनि समस्त। मज निर्मुक्त रायें केलें ॥ १८ ॥ कष्टी करोनि अरिमंडळ[1]। दैत्य निर्दाळिले सकळ। इंद्र सुखावोनि तत्काळ। प्रीतीं भूपाळ पूजिला ॥ १९ ॥ इंद्रें अत्यंत सुखावोनी। राया दिधला मुकुटमणी। आम्हां दोघांतें पूजोनी। अति सन्मानीं गौरविलें ॥ १२० ॥ तोचि मणी दशरथें। अति आवडीं दिधला सीतेतें। जे खूण आणिली हनुमंतें। शुद्धि निश्चितें मानावया ॥ २१ ॥ ऐसा मी दशरथाचा उपकारी। कांहीं नव्हेंचि प्रत्युपकारी। तुज मी होईन साहाकारी। सैन्य सागरीं उतरावया ॥ २२ ॥

अयं कपिर्नलो नाम तनुजो विश्वकर्मणः।
पित्रा दत्तवरः श्रीमान्युज्यते सेतुकर्मणि ॥ २१ ॥
तमहं धारयिष्यामि तवाप्यस्तु महान्सुहृत्।
माझा अनुचरिष्यंति मवहिष्यति मारुतः ॥ २२ ॥

---

१ वाणीरूपी वज्रमय दाढांनीं. २ रात्रंदिवस.

१ शत्रुसमूह.

सलिलं स्तंभयिष्यामि नलस्य वचनादहम् ।
एवमुक्तः समुद्रेण समुत्थाय नलस्तदा ॥ २३ ॥
अब्रवीद्वानरश्रेष्ठो वाक्य राममिदं शुभम् ।
अहं सेतुं करिष्यामि विस्तीर्णे वरुणालये ॥ २४ ॥
पितृसामर्थ्यमाश्रित्य सत्यमाह महोदधिः ॥ २५ ॥

सागर श्रीरामा सांगत । पैल तो विश्वकर्म्याचा सुत । नळ नामा कपि विख्यात । बांधील [1]सेत समुद्रीं ॥२३॥ त्यासी पित्याचें वरदान । सेतुकर्मीं हा विचक्षण । आज्ञा देवोनि आपण । सेतुबंधन करावें ॥ २४ ॥

समुद्र मार्गदर्शन करितो–तूं तव वंशस्थ रघुनाथा । मी कृतोपकारी दशरथा । ऐसियापरी परम सुहृदता। करीन साह्यता तें ऐकें ॥ २५ ॥ मीन[2] महाग्राह न येती तेथ । लहरी शांत करीन समस्त । कुवायु[3] वाजेना सेतुबंधांत ।ऐसा साह्यार्थ करीन रामा ॥२६॥

त्याप्रमाणें नळाची सेतुबंधनावर योजना; नळाचा आनद–लाहोनि[4] पित्याचें वरदान । नळ करील सेतुबंधन । आणिक आहे ऐक चिन्ह । सावधान अवधारीं ॥ २७ ॥ नळाअंगीं वानरधर्म । सागरीं सांडिले शाळिग्राम । कोपोनिश्चां ऋषिसत्तम । शाप परम दिधला ॥ २८ ॥ माझ्या तीरीं ऋषी बैसोन । करिती स्नानसंध्या अनुष्ठान । पुढें मांडोनि शाळिग्राम । ध्यानस्थ होवोनि बैसती ॥२९ तेथें नळ कपि येवोन । ऋषींचे शाळिग्राम करीं घेवोन । समुद्रामाजी दे टाकोन । ऋषि कोपोन शाप देती ॥१३०॥ तुझेनि हातें सागरीं शिळा । न बुडती कदा काळा । हाही सेतुबंधनीं नळा । असे आगळा[5] पुरुषार्थ ॥ ३१॥ ऐकोनि समुद्राचें वचन । नळें वंदोनि श्रीरामचरण । स्वयें बोलिला गर्जोन । सेतुबंधन करीन मी ॥ ३२॥ सिंधु बोलिला सत्य गोष्टी । सेतुबंधनाची हातवटी । आहे सामर्थ्य माझे पोटीं । उठाउठीं निर्मीन ॥ ३३ ॥ सिंधु अगाध अत्यंत थोर । सेतु बांधीन मी सत्वर । पर्वत आणावया वानर । स्वामीनें सत्वर धाडावे ॥ ३४ ॥

नलस्य वचनं श्रुत्वा रामः परमहर्षितः ।
समुद्रमभिसपूज्य वचनं चेदमब्रवीत् ॥२६॥

सेतु बांधीन अर्धक्षणें । ऐकोनि नळाचें बोलणें । श्रीराम संतोषला सहस्रगुणें । अति सन्मानें प्रीतीं पूजी ॥३५॥ सर्वेंचि सिंधूसी अनुवादन । वाक्पुष्पीं प्रीतिपूजन । मृदु मंजुळ मधुर वचन । श्रीरघुनंदन सांगत ॥ ३६ ॥

धनुष्यावरील बाणाचें मरुदेशावर विसर्जन–तुझ्या कोपाचिये कडाडीं । अग्निबाण लाविला कोदंडीं[1] । चाप ओढिलें परम प्रौढी । तो मी न काढीं माघारा ॥ ३७ ॥ सोडोनिया अग्निबाण । सांग कोणाचा घेऊं प्राण । माझा बाण अति निर्वाण । सत्य जाण समुद्रा ॥ ३८ ॥ समुद्र म्हणे पश्चिम तीरीं । मरु दैत्य दुराचारी । मज पीडितो नानापरी । तो संहारीं येणें बाणें ॥ ३९ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा सागरस्य महात्मनः ।
मुमोच तं शरं दीप्तं परं सागरशासनात् ॥२७॥
तेन तन्मरुकांतारं पृथिव्यां किल विश्रुतम् ।
निपातितः शरो यत्र वज्राशनिसमप्रभः ॥२८॥
ननाद च तदा तत्र वसुधा शल्यपीडिता ।
तस्माद्व्रणमुखात्तोयमुत्पपात रसातलात् ॥ २९ ॥
पशव्यश्चाल्परोगश्च बहुमूलफलोदकः ।
बहुक्षीरो बहुस्नेहः सुगंधिर्विविधौषधिः ॥३०॥

ऐकोनि समुद्राचें वचन । श्रीरामें सोडिला अग्निबाण । मरु मारिला न लागतां क्षण । झालें शोषण समुद्राचें ॥ १४० ॥

त्याचे परिणाम. धरेची दीन अवस्था–श्रीरामबाणाच्या कल्लोळीं[2] । उदक आटे समूळीं । [3]धरा

१ पूल. २ मासे. ३ प्रतिकूळ वारा. ४ पावोन. ५ मोठा.

१ धनुष्याला. २ झपाट्यानें. ३ पृथ्वी.

पोळोनि अग्निज्वाळीं । श्रीरामाजवळी आली शरण ॥ ४१ ॥ धरा देखोनियां दीन । वरद वदे श्रीरघुनंदन । केला [1]मरुदेश पावन । तेंहि चिन्ह अवधारा ॥ ४२ ॥

धरेचें सांत्वन व वरप्रदान—धरेसीं सुटलिया जळ । पृथ्वी पिकेल सर्व काळ । फळमूळांचा बहु सुकाळ । अति रसाळ सुस्वाद ॥ ४३ ॥ घरोघरीं मागतां नीर[2] । स्त्रिया संतोष अर्पिती क्षीर[3] । गाईसीं उदक पंचरात्रांतर । तरी अपार क्षीर देती ॥ ४४ ॥ पशूंसीं प्रत्यहीं नाहीं जीवन । पंच दिवसा उदकपान । तरी घृत [3]क्षीर परमान्न । नित्य भोजन घरोघरीं ॥ ४५ ॥ नानापरींच्या दिव्यौषधी । ज्यांच्या अंगीं सुगंध गंधी । श्रीरामाचे निजवरदीं । सुखानुवादी मरुदेशीं ॥४६॥ तिळाचे ठायीं स्नेह पूर्ण । ह्या अर्थाचें नवल कोण । अतिथीचें स्नेह पूर्ण । मरुदेशीं जाण घरोघरीं ॥४७॥ ज्यातें म्हणती मारवाड । तेथें जिवाचे पुरती कोड । श्रीरामवरदाचें कैवाड । सुखसुरवाड[4] मरुदेशीं ॥ ४८ ॥

समुद्राचें आश्चर्य —देखोनि श्रीरामाची ख्याती । समुद्र आश्चर्य मानी चित्तीं । हर्षें वंदोनि श्रीरघुपती । सप्रेम पुढतीं बोलत ॥ ४९ ॥ सोडोनियां निजशर । वधिला मरु दैत्य दुर्धर । पावन केलें मरुकांतार । श्रीरघुवीर कृपाळु ॥ १५० ॥ तुमिया प्रतापापुढें । समुद्र कायसें बापुडें । मज सुखी केलें रोकडें । फेडिलें सांकडें दुःखाचें ॥५१॥

रामः समुद्रं सपूज्य वचनं चेदमब्रवीत् ।
भवान्पितृसमो मह्यं पितुश्च दयितः सुहृत् ॥३१

स्वयें राम संतोषोनी । अति प्रीतीं समुद्रपूजनीं । आल्हादें बोले हर्षवदनीं । अति सन्मानीं संबोधी ॥५२॥

१ मारवाडदेश. २ पाणी. ३ दूध. ४ सुखाचा सुकाळ.



रामानें त्याचा केलेला सन्मान—जैसा पिता दशरथ । तैसा पूज्य पूर्वज तूं निश्चित । सेतुबंधाचा कार्यार्थ । सुगम समस्त तुवां केला ॥ ५३ ॥ तूं दशरथाचा आवडता । त्याहूनि मज पढियंता । तुझा उपकार मज तत्वतां । श्रीरघुनाथा थोर झाला ॥ ५४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । समुद्र घाली लोटांगण । वंदोनि श्रीरामाचे चरण । गेला आपण निजधामा ॥ ५५ ॥ एका जनार्दना शरण । श्रीराम प्रतापी संपूर्ण । समुद्रीं तरतील पाषाण । सेतुबंधन अवधारा ॥ १५६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसमुद्रशरणगमनं नाम एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ३९ ॥ ओंव्या ॥ ॥ १५६ ॥ श्लोक ॥ ३१ ॥ एवं ॥ १८७ ॥

## अध्याय ४० वा

समुद्र गेल्यावर सेतुबन्धाची तयारी; वानरांना आदेश—श्रीरामचंद्राय नमः ॥ नळहस्तें सेतुबंधन । समुद्रें श्रीरामासी सांगोन । वंदोनियां श्रीरामचरण । आज्ञा पुसोनि स्वयें गेला ॥ १ ॥ ऐकोनि समुद्राचें वचन । संतोषला श्रीरघुनंदन । नळासी संमुख आपण । प्रीतिवचन बोलत ॥ २ ॥

प्रीत्या परमया[¶] रामस्तं नलं प्रशशंस च ।
क्रियतां मम कार्यार्थः सखे सौम्य महामते ॥ १ ॥
समुद्रे बध्यतां सेतुः सह सर्वैः प्लवंगमैः ।
ततः सुग्रीवसचिवान्हनुमत्प्रमुखान्हरीन् ॥ २ ॥
तदा दाशरथी रामो हर्षयुक्तोऽब्रवीद्वचः ।
श्रुतं भवद्भिर्वचनं समुद्रस्य महात्मनः ॥ ३ ॥
अत्र यत्तविधातव्यं तत्सर्वं सविधीयताम् ॥ ४ ॥

प्रीतिप्रेमाचें वचन । नळासी बोले रघुनंदन । सखा माझा तूं जीवप्राण । सेतु निर्माण करीं आतां ॥ ३ ॥ समुद्रें सांगितलें आपण । तुझेनि हातें सेतुबंधन । घेवोनियां वानरगण । सेतु निर्माण

¶ ङ—च परया.

करीं आतां ॥ ४ ॥ स्वयेंचि श्रीरघुनाथ। स्वमुखें सुग्रीवासी सांगत। प्रधान [१]जुत्पती समस्त। मुख्य हनुमंत आदिकरोनी ॥ ५ ॥ नळहस्तें सेतुबंधन। समुद्रें सांगितलें आपण। राजा सुग्रीव ससैन्य। सेतुविधान करावें ॥ ६ ॥ सेतुबंधाची सामग्री। सवेग आणावी वानरीं। देवोनि नळाच्या करीं। सेतु सागरीं बांधावा ॥७॥ परम आल्हादें हर्षयुक्त। परमानंदें सांगे श्रीरघुनाथ। तेणें सुग्रीवा सुख अद्भुत। जुत्पतियुक्त उठियेला ॥ ८ ॥

रामस्य वचनं श्रुत्वा निर्दिष्टास्ते प्लवंगमाः।
अभिपेतुर्महारण्य हृष्टाः शतसहस्रशः ॥ ५ ॥
वचनात्तस्य सुग्रीवस्तमेवाभिप्रहर्षयन्।
स्वय च राजा सुग्रीवो नलो नीलश्च वानरः ॥ ६ ॥
गवो गवाक्षो गवयः शरभो गधमादनः।
युवराजोऽगदश्चैव तारश्चान्ये वनेचराः ॥ ७ ॥
अन्ये च वानरश्रेष्ठाः शतशोऽथ सहस्रश ।
आस्फोटयतः संहृष्टाश्चक्रुः किलकिलामपि ॥ ८ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन। सुखावले वानरगण। आणावया पर्वत पूर्ण। केलें उड्डाण शतसहस्रीं ॥९॥ वानर सेतुबंधनार्थ। जातां देखोनि समस्त। स्वयें सुग्रीव विचारित। विलंब येथें नये करूं ॥ १० ॥ विलंबें सेतु बांधितां। जरी कळेल लंकानाथा। तरी तो करील सेतुघाता। अतर्क्यता साटोपें[२] ॥ ११ ॥ तें खेचर[३] आम्ही भूचर। मध्यें भरलासे सागर। युद्धीं प्राप्त वानर। सेतु सत्वर बांधावा ॥ १२ ॥ ऐसें बोलोनियां जाण। सुग्रीव राजा अंगें आपण। उठिला बाहु आफळोन[४]। सेतुबंधनशीघ्रत्वा ॥ १३ ॥ अंगें न उठतां स्वयें धुरे[५]। सेवकासेवकीं वानर। सेतुबंधन नव्हे शीघ्र। उठिला सत्वर स्वयें राजा ॥ १४ ॥ धुरे-वांचोनि वृथा कर्षण। धुरेंवांचुनी वृथा रण। धुरेवांचुनि सेतुबंधन। अति शीघ्र जाण साधेना ॥ १५ ॥ हेंचि आवडे श्रीरघुनाथा। सेतु बांधोनि शीघ्रता। वधोनिया लंकानाथा। स्वानंदें सीता आणावी ॥ १६ ॥ ऐसी आवडी श्रीरामापोटीं। यालागीं स्वयें सुग्रीव उठी। सेतु बांधावया जगजेठी। वानरकोटींसमवेत ॥१७॥ सुग्रीव उठतांचि जाण। सवेग उठिले वानरगण। मुख्य मुख्य धुरा दारुण। ते कोण कोण अवधारा ॥ १८ ॥ नळ नीळ जांबवंत। गज गवय गवाक्षयुक्त। शरभ गंध-मादन समस्त। निघाले त्वरित सेतुबंधा ॥ १९ ॥ अंगद युवराजा आपण। अंगें उठताचि जाण। उठावले वानरगण। संख्या कोण करी तेथें ॥ २० ॥ तर तरळ मैंद द्विविद। कोटयनुकोटी अर्बुद[१] अर्बुद। वानर क्षेपावती निर्बुद। सेतुबंध बांधावया ॥ २१ ॥ नळ बैसला सेतुबंधासी। वृद्ध देखोनि जांबवंतासी। सुग्रीवें ठेविलें नळा-पासीं। समविषमासी सांगावया ॥ २२ ॥ सेतु-बंधासी सत्वर। असंख्य निघाले वानर। वानरीं व्यापिलें अंबर[२]। दिगंतर कोंदलें ॥ २३ ॥ बाहु आफळोनि वानर। करोनि श्रीरामनामगजर। सवेग निघाले सत्वर। करिती भुभु:कार नामाचा ॥ २४ ॥

किलकिला शब्दव्युत्पत्ति–किलकिलशब्द वानर-जाती। किलकिल म्हणिजे निर्धार स्थिती। श्रीरामनामें नित्य गर्जती। शब्दव्युत्पत्ति इत्यर्थ ॥ २५ ॥ यालागीं किलकिलशब्द। रामनामें अति शुद्ध। वानरां परम आल्हाद। सेतुबंध बांधावया ॥ २६ ॥

दशकोटिपरीमाणा वानराश्च ततोऽधिकाः।
पर्वतैस्तृणकाष्ठैश्च सागरं समपूरयन् ॥ ९ ॥

पर्वतादि पाण्यात बुडू लागले; नळाचा विषाद–पांच कोटीचिया हारीं[३]। दक्षिणबाहूसीं वानरीं।

---

१ वीर, मल्ल. २ यत्नानें. ३ आकाशांत संचार करणारे. ४ थोपटून. ५ मुख्य.

१ दशकोटी. २ आकाश. ३ रांगा.

पर्वत देती नळाच्या करीं। त्वरेंकरीं अति शीघ्र ॥ २७ ॥ वामबाहूच्या सेतुप्रकारीं। पांच कोटी वानरहारीं। पर्वत वृक्ष देती गजरीं। त्वरेंकरीं अति शीघ्र ॥ २८ ॥ नळें मांडिले शुद्ध शीळ। साठी जण अति कुशळ। नळाजवळी सर्व काळ। सामग्री प्रबळ देती ते ॥२९॥ नळाची परम ख्याती। सेतु बांधी दोहीं हातीं। तेथें जाली विपरीत गती। पर्वत बुडती समुद्रीं ॥३०॥ नळें लाविलिया हात। पर्वत स्वयें समुद्रीं बुडत। तोही राहिला तटस्थ। सेतुबंधनार्थ चालेना ॥ ३१ ॥ समुद्रें सांगितलें येथ। नळाचे हातें पर्वत तरत। शेवटीं[1] त्याचेचि हातें बुडत। दुःखाभिभूत सुग्रीव ॥ ३२ ॥ नळहस्तें पर्वत बुडत। [2]हिंवसला कपिनाथ। वृत्तांत श्रीरामासी सांगत। सेतुबंधनार्थ चालेना ॥ ३३ ॥ ऐकोनि वानरांची मात। हासिन्नला श्रीरघुनाथ। सेतुबंधनाचा गुह्यार्थ। सांगेल हनुमंत तें करा ॥ ३४ ॥

हनुमताचें निदान व त्याचा अनुभव—हनुमान सांगे नळवरदोक्ती। श्रीरामापुढें त्या न चालती। जेंवी खद्योत[3] हरपती। सूर्यदीप्तिप्रकाशें ॥ ३५ ॥ श्रीरामप्रतापापुढें। समुद्र कायसें बापुडें। नळ केवळ तें किडें। वरदोक्तिवेडें अभिमानग्रस्त ॥३६॥ माझेनि हातें तरती पाषाण। ऐसा नळासी वरदाभिमान। अभिमानें ते पर्वत निमग्न। सेतुबंधन चालेना ॥ ३७ ॥ अभिमान वसला ज्याचे माथां। ते तव बुडाले तत्वतां। युक्ति सांगेन मी आतां। सेतुबंधनार्थ अति शुद्ध ॥ ३८ ॥ पर्वत अथवा वृक्षपाषाण। ज्यासी लागे श्रीरामचरण। त्यासी समुद्रीं घडे तरण। सत्य जाण सुग्रीवा ॥ ३९ ॥ श्रीरामचरणींचे पर्वत। तेचि समुद्रीं तरत। तेचि सेतुसिद्ध्यर्थ। गुह्य हनुमंत बोलिला ॥ ४० ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। वानरां पावली जीवींची खूण। पुढती करावया सेतुबंधन। हनुम्याचे चरण वंदिले ॥ ४१ ॥ लागतांचि चरणकमळा। अहल्या उद्धरली दु:शीळा[1]। श्रीरामपदीं पर्वतशिळा। समुद्रजळा सुखें तरती ॥ ४२ ॥

ये मज्जंति निमज्जयंति च परान्ते प्रस्तरा दुस्तरे
वार्द्धौ वीर तरंति वानरभटाः संतारयंतेपि च।
नैते ग्रावगुणा न वारिधिगुणा नो वानराणा गुणाः
श्रीमद्दाशरथेः प्रतापमहिमा सोऽयं समुज्जृंभते ॥१०॥

श्रीरामचरणाचा महिमा—श्रीरामचरणाचें महिमान। अवघे ऐकोनि सावधान। उल्हासें सांगे वायुनंदन। प्रतापपूर्ण हरिचरणीं ॥ ४३ ॥ श्रीरामचरणींचे शिळापर्वत। समुद्रीं घालितां हनुमंत। त्यांतें वानरदळ बुडवित। तरी ते तरत न बुडोनी ॥४४॥ एकएका पर्वतावरी। बैसले वानर लक्षांतरीं। तरी न बुडती समुद्रीं। तारिती सागरीं वानरां ॥ ४५ ॥ स्वयें बुडोनि आणिकां बुडविती। ऐसी पाषाणांची जाती। तेही सागरीं तरती। आणि तारिती वानरां ॥ ४६ ॥ नव्हे पाषाणाचा गुण। नव्हे समुद्राचें लक्षण। नव्हे ऋषींचें वरदान। श्रीरामचरणप्रताप ॥ ४७ ॥ श्रीरामचरणींचे पर्वत। पुष्पप्राय उचलित। येर जडत्वें जे डोलत। ते बुडत सागरीं ॥ ४८ ॥ श्रीरामचरणाचें महिमान। सिद्धी पावे सेतुबंधन। स्वयें हनुमंत सांगतां जाण। पावली खूण वानरां ॥ ४९ ॥

हनुमताचें अभिनंदन—ऐकोनि हनुमंताचें वचन। सुग्रीवें दिधलें आलिंगन। अंगद घाली लोटांगण। वंदिले चरण वानरीं ॥ ५० ॥ हनुमंतें विघ्नाचें निर्विघ्न। हनुमंतें सेतुबंधन। हनुमंतें भवाब्धितरण। अवघे जण वानिती ॥ ५१ ॥ सुग्रीव बोले संतोषोन। अगाध श्रीराममहिमान। अति गुह्य गुप्त ज्ञान। जाणे संपूर्ण हनुमंत ॥ ५२ ॥ करोनि

१ शेवटीं. २ खिन्न झाला. ३ काजवे.

१ पापी.

हनुमंताची स्तुती । सेतु बांधावया पुढती । वानर चालिले शीघ्रगतीं । भुभु:कार करिती श्रीरामनामें ॥ ५३ ॥

सेतुबंधन चालू. सर्व भूतांना तो चमत्कार—सुग्रीव सांगे स्वयें गर्जोन । पूर्व पश्चिम दिशा दक्षिण । तेथील बुडती पाषाण । ते आपण नाणावे ॥५४॥ उत्तरेचे जे पर्वत । तेचि आणावे सेतुबंधनार्थ । ऐसा ऐकोनि इत्यर्थ । वानर समस्त चालिले ॥ ५५ ॥ उत्तरेचे जे पर्वत । वृक्ष पाषाण शिळा समस्त । श्रीरामपायीं अति पुनीत[1] । सेतुबंधातें शीघ्र आणा ॥ ५६ ॥ जैसे आकाशीं विखुरती[2] टोळ । तैसें चालिलें वानरदळ । सेतुबंधनार्थ सकळ । प्रतापी प्रबळ चालिले ॥ ५७ ॥ गगनीं नक्षत्रें पैं थोडीं । तैशा वानरांच्या कोडी । सेतुबंधनाची तांतडी । कपि कडाडीं चालिले ॥ ५८ ॥ सेतु बांधावया सत्वर । हावे[3] अहंपूर्व[4] अहंपूर्व । वानरीं घेवोनियां धांव । आणिती सर्व गिरिवर ॥ ५९ ॥

खर्जूरैरर्जुनैस्तालैस्तिलकैस्तिमिशैरपि ।
अन्यैश्च विविधैर्वृक्षैर्गिरीणां शिखरैरपि ॥ ११ ॥
सागरे चलिते सेतुं चक्रुः शतसहस्रशः ।
दशयोजनविस्तारमायतं शतयोजनम् ॥ १२ ॥
नलश्चक्रे महासेतुं मध्ये नदनदीपतेः ।
तत्र शाखामृगाः सर्वे पुष्पितान्विहगैर्युतान् ॥ १३ ॥
महावृक्षान्समुत्पाट्य चिक्षिपुर्लवणाम्भसि ॥ १४ ॥

वानर अति बळें समर्थ । समूळ उपडोनियां पर्वत । घेवोनि येती सेतुबंधार्थ । कैसे शोभत तें ऐका ॥ ६० ॥ पर्वतमाथां खर्जूरीवृक्ष । अर्जुनवृक्ष ते असंख्य । शाल ताल तमाल तिलक । घटकवृक्ष विस्तीर्ण ॥ ६१ ॥ आणिक पर्वत असंख्यात । आणिती शिखरांसमवेत । नाना जातींचे वृक्ष तेथ । फलपुष्पित आणिले ॥ ६२ ॥ माथां घेवोनि पर्वत । शतसहस्र असंख्यात । आणिती शिखरांसमवेत । गात नाचत स्वानंदें ॥ ६३ ॥ श्रीराम जय राम या गजरीं । आणिती पर्वतांच्या हारी । सर्वेचि घालिती सागरीं । आल्हाद भारी सेतुबंधा ॥ ६४ ॥ लांबी संख्या शतयोजन । रुंदी दशयोजन जाण । ऐसें सेतूचें निर्माण करी नंदन[1] विश्वकर्म्याचा ॥६५॥ पडती पर्वतांच्या कोडी दोरी धरोनि अति निवाडीं । नळ पर्वतें पर्वत जोडी । रितीं सवडी उरों नेदी ॥६६॥ पर्वत घ्यावया उठाउठीं । नळाजवळी दहा कोटी । वानर ठेविले जगजेठी । अधिक साठी अति कुशळ ॥ ६७ ॥

आप्लवंतः प्लवतश्च गर्जतश्च प्लवंगमाः ।
तमचिंत्यमसह्यं ते ह्यद्भुतं लोमहर्षणम् ॥ १५ ॥
ददृशुः सर्वभूतानि सागरे सेतुबंधनम् ।
कृतानि प्रथमेनाह्ना योजनानि चतुर्दश ॥ १६ ॥

पर्वतांच्या कोट्यनुकोटी । वानर आणिती जगजेठी । सर्वेचि धांवती उठाउठीं । गिरिकोटी आणावया ॥६८॥ पर्वत पडतां उपराउपरीं । गाहाळू न करावा सागरीं । नांवें लिहिती पर्वतावरी । कपि नखाग्रीं कोरोनी ॥६९॥ नवल वानरांची कथा । संख्या सांगावया रघुनाथा । नांवें लिहिती पर्वतमाथां । सेतुबंधार्थीं अभिनव ॥ ७० ॥ सेतुबंधन समुद्रजळीं । श्रीराम बांधी आतुर्बळी[2] । स्वर्गमृत्युसप्तपाताळीं । पिटिली टाळी अति गजरें ॥ ७१ ॥

बंधनक्रम पहिले दिवशीं चौदा योजनें—प्रथम दिवशीं समुद्रांतु । बुडाला पर्वतपर्वतु । तेणें खोळंबला सेतु । अल्प कार्यार्थु चालिला ॥ ७२ ॥

दुसरे दिवशीं सव्वीस—चवदा योजनें नेमस्तु । प्रथम दिवशीं बांधिला सेतु । सुग्रीव श्रीरामा सांगतू । हर्षयुक्त स्वानंदें ॥ ७३ ॥ अति सज्ञान

---

१ पवित्र. २ पसरतात. ३ मोठ्या हौसेनें. ४ मी पुढें, मी पुढें.

१ पुत्र ( नळ ). २ पराक्रमी.

हनुमंतु । तेणें चालतां केला सेतू । आमचा पाहें पां पुरुषार्थु । बांधूं सेतू अति शीघ्र ॥७४॥ आजि माझें कौतुक पाहें । सेतू बांधीन [1]लवलाहें । म्हणोनि आफळोनि[2] बाहे । उडाला स्वयें शीघ्रत्वें ॥ ७५ ॥

प्रियकामश्चा रामश्च सुग्रीव संप्रहर्षयन् ।
स्वय वानरराजानं पंचयोजनपर्वतम् ॥ १७ ॥
अर्धयोजनविस्तीर्ण विंध्यस्य शिखर महत् ।
सुषेणः पाणिना गृह्य पातयामास सागरे ॥१८॥
नीलेन मलयस्याग्र ...

पश्चिमाया तु सध्यायां तपःस्थानानि भेजिरे ।
कर्माणि कथयतस्ते स्वानि स्वानि प्लवंगमाः ॥२४॥
श्रीरामं कथयति स्म पश्य सेतु महोदधौ ॥२५॥

वानरें अति उल्हासीं । सेतुबंधन दुसरे दिवसीं । सव्वीस योजनें नेमेंसीं । श्रीरामापासीं सांगती ॥ ८२ ॥ तंव जाला अस्तमान । परतले ते वानरगण । रामापासीं येवोनि जाण । आंगवण[1] सांगती ॥ ८३ ॥

दोर्भ्यामुत्पाट्य तरसा क्षिप्त लवणसागरे ॥१९॥
शृंग सचदन गृह्य सर्वत' पुष्पित महत् ।
आरुह्याजह्नतु॰ श्रीमान्मैंदश्च द्विविदश्च ह ॥२०॥
गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः ।
पंचैते शिखरं गृह्य महेंद्रादागता द्रुतम् ॥२१॥
चिक्षिपुः सागरे सर्वे पर्वतान्पर्वतोपमे ॥ २२ ॥

श्रीरामासी सुखार्थ । पंचयोजन पर्वत । सुग्रीवें उपटोनि त्वरित । समुद्रांत [1]निक्षेपी ॥७६॥ अर्धयोजन महाथोर । विंध्याद्रीचें दीर्घ शिखर । सुषेणे उपटोनी थोर । समुद्रीं गिरिवर निक्षेपी ॥ ७७ ॥ नीळें मलयाद्रिशिखर । बळें उपटिलें महाथोर । त्यावरी वृक्ष शतसहस्र । टाकिले सत्वर सागरीं ॥७८॥ चंदनवृक्षेंसी गिरिवर । सुगंधपुष्प तरुवर । मैंद द्विविद दोघे वीर । समुद्रीं शीघ्र टाकिती ॥ ७९ ॥ गज गवाक्ष गवययुक्त । शरभ गंधमादन अद्‌भुत । पांच जण पांच पर्वत । समुद्रांत निक्षेपिती ॥ ८० ॥ आणीकही वानरवीर । पर्वत आणिती थोर थोर । सेतु बांधावया सत्वर । गिरि वानर वर्षती ॥ ८१ ॥

दिवसेन द्वितीयेन षड्‌विंशद्योजनानि तु ।
बद्ध' स वानरैस्तैस्तु समुद्रः सेतुकर्मणि ॥२३॥

... साटोपें बोलती वानर । आम्हीं आणिले पर्वत थोर । एक म्हणती थोर थोर । आम्हीं गिरिवर आणिले ॥८४॥ एक म्हणती न बोला वृथा । नामें लिहिलीं पर्वतमाथां । तें तें पाहोनि श्रीरघुनाथा । कपिपुरुषार्थी वानावें ॥ ८५ ॥ एक साटोपें सांगती गोष्टी । आणिल्या पर्वतांच्या कोटी । स्वामीनीं येवोनि उठाउठी । सेतु निजदृष्टीं पाहावा ॥ ८६ ॥ व्यर्थ कां बोला पुरुषार्थ । जाणतो सर्वज्ञ श्रीरघुनाथ । सुग्रीवें सांगोनि वृत्तांत । कपिवृत्त स्वयें परिसे ॥८७॥ सवेग आणितां पर्वत । वानर कष्टले समस्त । कोणासी जाणवेना तो अर्थ । निद्राभिभूत कपिकुळें ॥८८॥ कोणा नुघडवे दृष्टी । कायशा जागरणाच्या गोष्टी । वानर निजले कोट्यनुकोटी । शिळासपुटीं सुप्त[3] ॥ ८९ ॥ चाळीस योजनें संख्यागोष्टी । वानरीं बांधिला सेतु संकटीं । पुढें उरला योजनें साठी । सहसा कांठीं पावेना ॥ ९० ॥ श्रीरामाचें मनोगत । जाणोनियां हनुमंत । दडोनि राहिलासे तेथ । व्हावया प्रभात पहातसे ॥ ९१ ॥ कायसी सेतुबंधसांकडी । बांधीन न लागतां अर्ध घडी । परी सूर्योदयाचे सांकडी । देवोनि दडी राहिलासे ॥ ९२ ॥

तत पभातसमये कृत्वा पूर्वाण्हिकीं क्रियाम् ।
... सर्वतो दिशः ॥२६॥

[ इ–स्य. .स्य.

१ पराक्रम. २ आवेशानें. ३ निजलेले.

हनुमंत गत वीरा ददृशुः सेतुकर्मणि ।
सप्तयोजनविस्तीर्णान्पर्वतान्सप्त पाणिना ॥ २७ ॥
लवणाभसि चिक्षेप मध्ये कपिवृषस्तदा ।
गिरीणा क्षिप्यमाणानां सागरे सेतुकर्मणि ॥ २८ ॥
भुवि दिव्यंतरिक्षे च बभूव निनदो महान् ।
प्रक्षिप्यमाणै. शिखरैर्जलराशिः समुत्थित ॥ २९ ॥
आकाशाभिमुखो गत्वा विससर्प समततः ।
दिवसेन तृतीयेन पचाशद्योजनानि च ॥ ३० ॥
बद्धोतिकपिभि सर्वैः शेष तु दशयोजनम् ।
मुचतः पुष्पवर्षाणि सुराः संहृष्टमानसाः ॥ ३१ ॥
दिवि दुंदुभयो नेदुर्ननृतुश्चाप्सरोगणा· ॥ ३२ ॥

अरुणोदय होतां प्राप्त । सवेग उठोनि हनुमंत । पूर्वाण्हिक[१] क्रिया करोनि तेथ । सेतुबंधनार्थ उडाला ॥ ९३ ॥ न पुसतां श्रीरामासी । कळों न देतां वानरांसी । न पुसता सुग्रीवासी । अति वेगेंसीं उडाला ॥ ९४ ॥ पुढें गेला रे हनुमंत । ऐकोनि वानर समस्त । पूर्वाण्हिकें करोनि तेथ । शीघ्र धांवत दशदिशा ॥ ९५ ॥ महावीर हनुमंत । उपटोनि पर्वत समस्त । एकैक योजन संख्या सप्त । घेऊनि येत उल्लासें ॥९६॥ दोन पर्वत दोहीं हातीं । दोन दोहीं कांखेप्रती । एक मस्तकीं स्वामिकार्यार्थी । पुच्छावर्ती[२] पैं एक ॥९७॥ एक पर्वत हनुवटीतळीं । आकळोनि महाबळी । गात नाचत नाममेळीं । सेतुजवळी स्वयें आला ॥ ९८ ॥ घेवोनियां सप्त पर्वत । येतां देखोनि हनुमंत । श्रीराम जाला अति विस्मित । बळें अद्‌भुत मारुति ॥ ९९ ॥ प्रभातीं नळें आवेश धरोन । सेतु बांधिला एक योजन । सप्तपर्वतेंसीं संपूर्ण । आलें उड्डाण हनुमंताचें ॥१००॥

सात योजनांचे सात पर्वत हातपाय वगैरेवर येक येक आणून एकूणपन्नास योजनें एकट्यानें काम केलें; सर्वांना आश्चर्य—पर्वत टाकितां उद्भट[३] । ध्वनि उठला कडकडाट । सागर गर्जे घडघडाट । नादें वैकुंठ कोंदलें ॥ १ ॥ पर्वत सांडितां सागरीं । नादें कोंदला कैलासगिरी । ध्यान सांडोनि ते अवसरीं । पाहे बाहेरी नीळकंठ ॥२॥ समुद्रीं पाषाण तारित । देखोनि श्रीरामचंद्राचा सेत । हरिखें सदाशिव डुल्लत । श्रीरघुनाथ परब्रह्म ॥ ३ ॥ सप्त पर्वतीं समस्त । हनुमंतें सिद्धि नेला सेत । आला रावणासी अंत । शिव सांगत शिवेसी ॥ ४ ॥ पर्वत सांडितां सिंधूसीं । जळ उसळलें आकाशीं । भिजवोनियां ध्रुवमंडळासी । सत्यलोकासी आदळलें ॥ ५ ॥ बाप बळिया हनुमंत । स्वर्ग केला सचैल स्नात । देवां देतसे प्रायश्चित्त । आलें हास्य सुरवरा ॥६॥ रावणबंदीं देव निर्मुक्त । सोडविले पैं समस्त । अवश्य पाहिजे प्रायश्चित्त । सचैल स्नान हनुमंत करवी ॥ ७ ॥ घालितां सप्त पर्वत पूर्ण । एकुणपन्नास योजन । हनुमंतें केलें सेतुबंधन । विस्मित मनें विरिंचि[१] ॥ ८ ॥

राहिलेले दहा योजन बांधून सेतु संपविला—विस्मय करित सुरवर । विस्मय करिती ऋषीश्वर । विस्मय करिती नरवानर । श्रीराम सौमित्र विस्मित ॥ ९ ॥ आतुर्बळी हनुमंत । देवदुंदुभि स्वर्गीं गाजत । सुर सुमनें[२] वर्षत । नृत्यान्वित अप्सरा ॥११०॥ तंतीवीणास्वरयुक्त । स्वर्गांगना नृत्य करित । हर्षें वानर नाचत । सेतु समाप्त श्रीरामें ॥ ११ ॥ तृतीय दिवसाचा वृत्तांत । सुग्रीव श्रीरामा सांगत । तुझा निजभक्त हनुमंत । सेतु समाप्त त्याचेनि ॥ १२ ॥ आमचा वाढवावया सन्मान । राखिला दशयोजनें न्यून । एऱ्हवीं करिता संपूर्ण । अर्ध क्षण न लागतां ॥ १३ ॥ वानरीं आणोनियां पर्वत । दशयोजनें उर्वरित[३] । नळ स्वानंदें सेतु बांधित । हर्षयुक्त वानर ॥ १४ ॥

---

१ सकाळीं करण्याच्या. २ शेपटीच्या गुंडाळ्यांत. ३ मोठा.

१ महादेव. २ पुष्पें. ३ शिल्लक, बाकी उरलेला.

अन्ये च सूत्रं गृह्णन्ति दंडानन्ये धरंत्यपि ।
समश्च क्रियतां सर्वे नलमेवं प्रभाषिरे ॥ ३३ ॥
बद्धो बद्धो वदंति स्म सिद्धानामंबरे स्वना ।
वानराणां प्रहृष्टानां महानादो बभूव ह ॥ ३४ ॥
गिरिशृंगाणि चाप्यन्ये शिलाशैलान्यथापरे ।
अन्ये च वारयति स्म बहुना किं प्रयोजनम् ॥३५॥
दशयोजनविस्तारमायतं शतयोजनम् ।
नलश्चक्रे महासेतु मध्ये नदनदीपतेः ॥ ३६ ॥
मलयाद्रिसमारब्धो लंकामूले प्रतिष्ठित. ।
नलेन बद्धं ददृशु. सेतु मंदरसन्निभम् ॥ ३७ ॥

एकोणपन्नास योजनें सेतु । भरोनि गेला हनुमंतु । दश योजनें उर्वरीतु । नळ बांधितु पुढारां ॥ १५ ॥ तंव नळासी सांगिजे वानरीं । हनुम्यानें बांधिला जैशा परी । त्यासमान अवघा करीं । धरोनि दोरी कपि पाहती ॥ १६ ॥ हनुमंताचे क्रियेसम । तुझी क्रिया दिसे विषम । बरावर करीं समान सम । त्यासीं सम करविती ॥ १७ ॥ बांधिला बांधिला सेतु समग्र । सिंहानुवादें गर्जे अंबर । स्वर्गी गर्जती सुरवर । सेतु समग्र बांधिला ॥ १८ ॥ समुद्रीं सेतु अति दुर्धर । वानरीं बांधिला समग्र । स्वयें बोलती ऋषीश्वर । थोर थोर देव ऋषी ॥ १९ ॥ वानरवीर कोटचनुकोटी । पर्वत आणि उठाउठीं । त्यातें वारिती कपि जेठी । सेतु परतटीं पावला ॥ १२० ॥

त्यानिमित्त मेरी निनाद व निशाणें फडकाविलीं—
सेतु सिद्ध जाला संपूर्ण । कटकीं त्राहाटिलें निशाण । तें ऐकोनि वानरगण । टाकिती पाषाण पर्वत ॥२१॥ पर्वतपाषाणांच्या हारी । वानरीं टाकिल्या धरेवरी । सेतुबंधन यात्रेकरी । अद्यापवरी देखिजेती ॥ २२ ॥ रुंदी संख्या दशयोजन । लांबी समग्र शतयोजन । नळें केलें सेतुबंधन । श्रीरघुनंदनप्रतापें ॥ २३ ॥ सेतुबंधना मूळ मलयाद्री । तेथोनि लंकामूळवरी । नळें बांधिला बरव्यापरी । मंदरगिरिसमप्रभ ॥२४॥

सेतु पावला परतटीं । रामनामें वानरकोटी । गजगर्जोनि नाचती सृष्टीं । न समाती पोटीं नभाच्या ॥ २५ ॥ येरयेरांवरी किराण[१] । हर्षें नाचती वानरगण । श्रीरामापुढें येवोनि जाण । लोटांगण घालिती ॥ २६ ॥ येरयेरांतें[२] गुदगुली । येरयेरांतें वाकुली । श्रीराम आमची माउली । संतोषली सेतुबंधें ॥ २७ ॥ सेतु जाला समाप्त । वानरवीर हरिखें गर्जत । श्रीरामापासीं आले समस्त । हर्षोन्मत्त स्वानंदें ॥२८॥ समुद्रीं सेतुबंधनस्थिती । देखोनि सुरवर बोलती । श्रीरामाची अगाध कीर्ती । त्रिजगतीं विस्तारली ॥२९॥ सेतु पावतां समाप्ती । नळें येवोनि शीघ्रगती । नमस्कारिला श्रीरघुपती । श्रीरामें अति प्रीतीं आलिंगिला ॥ १३० ॥ आलिंगोनि सुखसमेळीं । पाठी थापटी वेळोवेळीं । तंव वानरीं पिटिली टाळी । दिधली आरोळी अंगदें ॥ ३१ ॥

अंगदाचा हर्ष व प्रतिज्ञा—सिद्धि पावलें सेतुबंधन । कायसें बापुडें रावण । इंद्रजित आणि कुंभकर्ण । निर्दळीन राक्षस राक्षसां ॥ ३२ ॥ नरांतक सुरांतक । अतिकायादि कुमर अनेक । रणीं मारीन एक एक । युद्धीं सन्मुख दशमुखा ॥३३॥ महोदर प्रहस्त जाण । महापार्श्व शुक सारण । रणीं देखतां दशानन[३] । करीन कंदन[४] प्रधानां ॥ ३४ ॥ निर्दाळोनि लंकानाथा । अर्धक्षणें श्रीरघुनाथा । तुझी आणीन मी सीता । उल्लासतां गर्जत ॥ ३५ ॥ मज म्हणों नको लेकरूं । मी तव वाळीचा कुमरु । करीन सीतेचा उद्धारु । दशकंधरू[३] वधोनि ॥३६॥ आडवा होता जंव सागर । तंव विराले[५]† होते वानरवीर । आतां घ्यावया लंकापुर । अति सत्वर उपरमती ॥३७॥ अवघे मिळोनि मर्कट । छेदावया

१ उड्डाण. २ एकमेकांना. ३ रावण. ४ नाश. ५ अडले

† ब—वेंगले; क्ष—विगळित.

दशकंठ। तुझीच पाहती वाट। भट वद्धट वानर ॥ ३८ ॥

सर्व वानरांचा आवेश–सेतु पावला लंकामूळीं। वानरीं पिटिली टाळी। नामें गर्जती आतुर्बळी[1]। सुखसमेळीं नाचती ॥ ३९ ॥ रामनामाचा गजर। वानरीं केला भुभुःकार। देवीं करोनि जयजयकार। सुमनसंभार[2] वर्षती ॥ १४० ॥ एका जनार्दना शरण। सिद्धि पावलें सेतुबंधन। पुढें गोड निरुपण। श्रीरामगमन लंकेसी ॥ ४१ ॥ नावदेचा[3] पडिपाड। जीं जों चाखिजे तों तों गोड। तैसें रामायणीं कथाकोड†। सुखसुरवाड स्वानंदें ॥१४२॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सेतुबंधनसमाप्तिर्नाम चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥४०॥ ॥ ओव्या ॥ १४२ ॥ श्लोक ॥ ३७ ॥ एवं॥१७९॥

## अध्याय ४१ वा

सेतुबंधन संपूर्ण झाल्यावर रामलक्ष्मणाला घेऊन लंकेच्या वाटेला लागतात--श्रीरघुपतये नमः ॥ नळें बांधिला सेतु समाप्त। यालागीं म्हणती नळसेत। परी तो श्रीरामपुरुषार्थ। जाला विख्यात तिहीं लोकीं ॥ १ ॥

बद्धं तु तं महासेतुं सुग्रीवो वाक्यमब्रवीत्।
कृतकृत्याः स्म राजेंद्र हता लंका न संशयः ॥ १ ॥
रावणश्च हतः शत्रुः समाप्तः सपरिच्छदः ॥ २ ॥

सेतु जालिया समाप्त। सुग्रीव संतोषें डुल्लत। वंदोनिया श्रीरघुनाथ। स्वयें बोलत स्वानंदें ॥ २ ॥ समुद्रीं लागली पायवाट। आमचे चुकले परम कष्ट। आतां लंका करीन सपाट। दशकंठ वधोनि ॥३॥ प्रधान सेनानी सपरिवार। राक्षसांचे भारसंभार। रणीं मारीन दुर्धर वीर। तरी किंकर[5] मी तुझा ॥ ४ ॥ सेतु होतांचि समाप्त। लंका जाली हताहत। रणीं निमेल लंकानाथ। संदेह येथ असेना ॥ ५ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन। सेतु देखोनि संपूर्ण। उल्लासला श्रीरघुनंदन। शीघ्र गमन करावया ॥ ६ ॥ सोडवावया सीता सती। सवेग जावें लंकेप्रती। लक्ष्मणा धरोनि हातीं। शीघ्रगतीं निघे राम ॥ ७ ॥

जांबुवंताची भीति व रामास विनंती–ते काळीं जांबवंत गर्जोन। हाक देवोन बोले वचन। पायीं चालता श्रीरघुनंदन। ‡आनेंआन हों पाहे ॥ ८ ॥ श्रीराम चरणीं शिळा तारी। दोघे जातां सेतु उद्धरी। आम्ही राहोनि ऐलतीरीं। किलकिल करीतचि पैं ॥ ९ ॥ लागतां श्रीरामाचे चरण। सेतु पावेल उद्धरण। दोघे जातील निघोन। आम्ही राहों ऐलीकडे ॥ १० ॥ एकला जावोनि रघुनाथ। सकळ साधील कार्यार्थ। आमचा नव्हे रणसाह्यार्थ। ऐसा अनर्थ होऊं पाहे ॥ ११ ॥ ऐकोनि जाबवंताची मात[1]। सकळां मानला सत्यार्थ। सुग्रीव निघाला धांवत। श्रीरघुनाथ थांबवावया ॥ १२ ॥ सुग्रीवें घालोनि लोटांगण। दृढ धरिले श्रीरामचरण। स्वयें बोलिला युक्तवचन। सावधान अवधारा ॥ १३ ॥ वानरें समस्त शरणागत। आम्हांसी सांडोनिया येथ। एकलें जाणें लंकेआंत। नव्हे उचित श्रीरामा ॥ १४ ॥ लागतां तुझे श्रीचरण। सेतु पावेल उद्धरण। आम्ही वानरें अडकोन। सर्वथा गमन न करवे ॥ १५ ॥ कष्टलों आणोनि पर्वत। हर्षें सेतु केला समाप्त। एकला जासी तूं रघुनाथ। धिक् जीवित्व पैं आम्हां ॥ १६ ॥ एकला साधिसीं कार्यार्थ। आम्हांसी मानलें निश्चित। तेव्हां आमचें व्यर्थ जीवित।

[1] पराक्रमी. [2] पुष्पवृष्टी. [3] साखरेचा. [4] प्रकार. [5] सेवक.

† क–कथाबोद्; ख–निवडु.

[1] गोष्ट.

‡ ख–अनो अन होवू पाहे; ड–अन्यो बन्य.

धिक् पुरुषार्थ वाटिवा ॥ १७ ॥ रावण मारोनि सगण[1]। सीता सोडवील रघुनंदन । तेव्हां आमुचें काळें वदन । धिक्करण कपिकुळा ॥ १८ ॥ सवें घेवोनि कपी समस्तां । लंकेसी जावें श्रीरघुनाथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । सप्रेमता सुग्रीवें ॥ १९ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन । श्रीराम जाला सुखसंपन्न । हनुमान येवोनि आपण । जाह्ला वहन श्रीरामा ॥ २० ॥

सुग्रीववचनं श्रुत्वा रामो दशरथात्मजः ।
अधिरुह्य हनूमतः पृष्ठे नीलस्य लक्ष्मणः ॥ ३ ॥
अग्रतः सर्वसैन्यस्य श्रीमान्रामः सलक्ष्मण ।
अनुजग्मुः प्लवतश्च गर्जतश्च प्लवगमाः ॥ ४ ॥
केचिज्जवेन धावंति सेतुना केचिदेव तु ।
केचिदाकाशमार्गेण सेतु नैव स्पृशंति च ॥ ५ ॥
अन्ये मध्ये च गच्छंति पार्श्वे चान्ये च वानराः ।
सलिले प्रपतत्यन्ये पथानं ये न लेभिरे ॥ ६ ॥

जेंवी अपत्याचें बालभाषण । पिता न करी उपेक्षण[2]। तेंवी सुग्रीवाचें वचन । श्रीरघुनंदन स्वयें मानी ॥ २१ ॥

ती मान्य करून मारुतीच्या पाठीवर रामचंद्र व नीळाच्या पाठीवर सौमित्र बसून सर्व सेना निघाली—ऐकोनि सुग्रीवाच्या वचनार्था । श्रीराम चढला स्कंधीं हनुमंता । सौमित्रासी उल्हासता । पृष्ठीं बैसविता नीळ जाला ॥ २२ ॥ सज्जन चढती गुणातीतीं । तैसा श्रीराम हनुमंतीं । अवघे जयजयकार करिती । सुरवर वर्षती सुमनांतें[3] ॥२३॥ जेंवी निजबोधाचे माथां । साधु चढे निरपेक्षता । तेंवी नीळपृष्ठीं तत्वतां । होय बैसता सौमित्र ॥ २४ ॥ श्रीरामनामाचा गजर । हर्षें करिती वानरवीर । आनंदें नाचती थोर थोर । देती भुभुःकार हरिनामें ॥ २५ ॥ एक गर्जती नर्दत । एक आल्हादें नाचत । लंकेसी निघाला श्रीरघुनाथ । उल्हासती वानर ॥ २६ ॥ कोटयनुकोटी पैं वानर । अर्बुदें[1] निर्बुदेंहूनि अपार । सेतूसी दाटला वानरभार । करिती गजर श्रीरामनामें ॥ २७ ॥ एक श्रीरामनामें नर्तती । एक श्रीरामनामें गर्जती । एक श्रीरामनामामृतें डुलती । हाका देती श्रीरामनामें ॥ २८ ॥ सुग्रीव बिभीषण दोहींकडे । श्रीरामापासीं निजनिवाडें । नळ नीळ अंगद अवघ्यांपुढें । पाठीसीं गाढे तरस तरळ ॥ २९ ॥ श्रीरामापासीं जांबवंत । [2]निकटवर्ती बुद्धिवंत । सुषेण वैद्यराज समर्थ । तो अति आप्त सुग्रीवा ॥ ३० ॥

वानराचा उल्हास व हर्षोदर्क—श्वेत पीत रक्त पुष्पित । वृक्ष उभविले सैन्याआंत । कर्दळीपत्रें¶ टके डोलत । तेणें सैन्य शोभत अति शोभा ॥ ३१ ॥ माड ताल झेलिती गंभीर । तेचि महाकेतु दुर्धर । नामें गर्जती वानर । गतिप्रकार तो ऐका ॥ ३२ ॥ एक समुद्रीं घालिती उडिया । एक आल्हादें देती बुडिया । एक धांवती थडोथडिया । उभवोनि गुढिया पुच्छांच्या ॥ ३३ ॥ एक ते श्रीरामा सांगती । जलतरणें दाविती गती । एक ते सेतुधारा चालती । एक नाचती जळस्थळीं ॥ ३४ ॥ नातळोनियां[3] सेतूसीं । एकांची गती आकाशीं । एक स्वयें श्रीरामापासीं । येणें प्रकारेंसीं चालती ॥ ३५ ॥ सेतूसीं दाटले जुत्पती । एकां न लभे मार्गप्राप्ती । एक खचोनि समुद्रीं पडती । सवेंचि घेती उड्डाण ॥ ३६ ॥ सेतूचिया कांठावरी । चालती वानरांच्या हारी । एक ते उडोनि अंबरीं । लंका परपारीं पावले ॥ ३७ ॥

तानि कोटिसहस्राणि वानराणा महौजसाम् ।
तीर्त्वा तत्र महासेतुं जग्मुः पार महोदधेः ॥ ७ ॥
वानराणा हि सा तीर्णा वाहिनी नलसेतुना ।
तीरे निवेशिता राज्ञा बहुमूलफलोदके ॥ ८ ॥

---

१ सहपरिवार. २ त्याग. ३ पुष्पें.

१ दशकोटी २ जवळ असणारा. ३ न स्पर्शता.

¶ क्ष—कर्दळी टकेपत्रे डोलत.

ततः पारे समुद्रस्य गदापाणिर्विभीषणः ।
परेषामभिघातार्थं चतुर्भिः सचिवैः सह ॥ ९ ॥
यूथपानां सहस्त्रौघैः प्रस्थितो लघुविक्रमः ॥ १० ॥

वानरवीर प्रतापवंत । कोटयनुकोटी अर्बुदांत । समुद्र उतरले समस्त । श्रीरघुनाथ अनुलक्षी ॥ ३८ ॥ शतयोजन सेतूप्रती । मध्यें न करितांचि वस्ती । मुहूर्ते आले लंकेप्रती । शीघ्रगती हनुमंतें ॥ ३९ ॥ पृष्ठीं वाहोनि रघुनंदन । हनुमंताचें शीघ्र गमन । तयासवें वानरगण । चालतेपण विसरले ॥ ४० ॥ श्रीराम लक्षोनियां दृष्टीं । चालतां वानरांच्या कोटी । श्रम पळाला उठाउठीं । आले परतटीं स्वानंदें ॥ ४१ ॥ श्रीरामासवें करितां गमन । श्रम निवाला संपूर्ण । विरोनि गेलें भागलेपण । आले कपिगण स्वानंदें ॥ ४२ ॥ श्रीरामासवें श्रम[१]-निवृत्ती । श्रीरामासवें सुगम गती । श्रीरामासवें परमपदप्राप्ती । आले जुत्पती स्वानंदें ॥ ४३ ॥ परतटा येतां वानरगण । पुढें देखिलें लंकाभुवन । रत्नकलशीं विराजमान । तेजें परिपूर्ण तेजस्वी ॥ ४४ ॥ अलकावती भोगावती । कायसी बापुडी अमरावती । कैलासासम दिसे दीप्ती[२] । तेजें झघडती दशदिशा ॥ ४५ ॥ ऐसी लंका देखोनि दृष्टीं वानरवीर जगजेठी । वडोनि रिघावया त्रिकूटीं । कोटयनुकोटी खवळले ॥ ४६ ॥

बिभीषण अनुयायासह पुढें निघतो—तें देखोनि

बिभीषण । निवारोनि वानरगण । अवघ्यांपुढें आपण । गदा घेवोन चालिला ॥ ४७ ॥ राक्षस कपटी गुप्तघाती । छळोनि वानरांतें मारिती । त्यांसी निर्दाळावया प्रयुक्ती । जाणे युक्तीं बिभीषण ॥ ४८ ॥ राक्षसगती निर्बंधन[३] । करूं जाणती अवघे प्रधान । सवें घेवोनि वानरगण । पुढें बिभीषण निघाला ॥ ४९ ॥ गदापाणि बिभीषण । त्यापुढें राक्षस तव तृण¶। सन्मुख यावा शक कोण । धाकेंच प्राण सांडिती ॥ ५० ॥

त्याच्या जिवाला धोका बसू नये म्हणून राम त्याला आपल्याजवळ ठेवतात—बिभीषणा† पुढें जातां । श्रीराम सांगे हनुमंता । त्यासी जावों नेदीं सर्वथा । ऐक तत्वतां विचार ॥ ५१ ॥ बिभीषण पुढें जात । छळोनि राक्षसीं केलिया घात । व्यर्थ जीवित्व पुरुपार्थ । याहूनि अनर्थ तूं ऐकें ॥ ५२ ॥ शरणागत मारिल्या जाण । आम्हींच स्वयें सोडूं प्राण । कोण करील सीतासोडवण । अति दारुण अनर्थ ॥ ५३ ॥ यालागीं साक्षेपेसीं[१] रघुपती । बिभीषणा धरोनि हातीं । बैसविला आपणाप्रती । कृपामूर्ति कृपाळुवें ॥ ५४ ॥

ससैन्य राम लंकेच्या दाराशीं आल्यावर आकाशातून त्याजवर पुष्पवृष्टी—राक्षसगतिनिर्बंधन । करूं धाडिले अवघे प्रधान । तेही अतिशयें सावधान । [२]विचक्षणें रणयोद्धे ॥ ५५ ॥ समुद्राचे परतीरीं । फळमूळजळसंभारीं । बैसल्या वानरांच्या हारी[३] । स्वानंदेंकरीं डुल्लती ॥ ५६ ॥

जयस्व शत्रु नरदेव मेदिनीं
ससागरा पालय शाश्वतीः समाः ।
इति स्म रामं नरदेवसत्कृतं
शुभैर्वचोभिर्विबुधा अपूजयन् ॥ ११ ॥
ततो महान्तः§ कृतसेतुमीश्वर
प्रतिरथरूपे विजयाभिनंदनः ।
पुनः समुद्रोभिजगाम राघवं
स दिव्यरूपाभरणो महाद्युतिः ॥ १२ ॥

श्रीराम समुद्रपरतटीं । सुग्रीवसैन्य वानरकोटी । बैसला देखोनि जगजेठी । केली पुष्पवृष्टी सुर-

१ श्रमनिरास. २ तेज. ३ निवारण.

१ अगत्यानें, प्रयत्नानें. २ शहाणे. ३ रांगा.

¶ ड— + ते. † क्ष— + रघुनाथ म्हणे (बिभीषण)
§ ड—महालंकृत.

सिद्धीं ॥ ५७ ॥ शत्रु जाणोनि समर्थ । पृथ्वी समुद्रमेखलान्वित । प्रतिपाळावया तूं समर्थ । सुर गर्जत स्वानंदें ॥ ५८ ॥ दश सहस्र वर्षांआंत । निष्कंटक[1] राज्य प्राप्त । देव करावया बंदिमुक्त । तुझा पुरुषार्थ श्रीरामा ॥ ५९ ॥ बंधमुक्तता सुरवरीं । आम्ही तुझे कृतोपकारी । स्मरोनि जन्मजन्मांतरीं । जयजयकारीं गर्जती ॥ ६० ॥

समुद्राचें सहकुटुंब आगमन–बांधिला देखोनि सेतुबंधु । ससैन्येंसीं राम उतरला सिंधु । उतरला वानराचा वृंदु[2] । ऐकोनि सिंधु अनुतापी ॥ ६१ ॥ पूर्वीं भेटलों श्रीरघुवीरासी । युक्ति सांगितली सेतुबंधासी । नाहीं पूजिलें श्रीरामासी । मूढता ऐसी पैं माझी ॥ ६२ ॥ मी ज्येष्ठ श्रीराम कनिष्ठ । ऐसें मानितों पापिष्ठ । तेणें अभिमानें मी दुष्ट । श्रीराम वरिष्ठ न पूजीं ॥ ६३ ॥ कनिष्ठ मानितां श्रीराममूर्ती । महापापी मी त्रिजगतीं । त्या मज पापियाची पापयुक्ती । सेतुसमाप्ति नव्हेचि ॥ ६४ ॥ सेतु नव्हे माझे पापोक्ती । वृथा गेली नळवरदोक्ती । श्रीरामपायीं पर्वत तरती । सेतुसामग्री¶ श्रीरामें ॥ ६५ ॥ समुद्रीं पर्वत तरती स्पष्ट । तो श्रीराम मी मानीं कनिष्ठ । मजहूनिपरता पापिष्ठ । अति दुष्ट आन नाहीं ॥ ६६ ॥ ऐशिया अनुतापवृत्तीं । पूजावया श्रीराममूर्ती । घेवोनियां अलंकारसंपत्ती । श्रद्धान्वित सिंधु आला ॥ ६७ ॥ विजयलाभाच्या अनुवृत्तीं । सेतु पावला समाप्ती । परतीरीं देखिला श्रीरघुपती । सुग्रीव कपिपतीसमवेत ॥ ६८ ॥ संमुख लंका देखोनि दृष्टीं । बैसल्या वानरांच्या कोटी । रावण मारावया उठाउठीं । उल्लास पोटीं वानरां ॥ ६९ ॥ ऐसा देखोनि रघुनंदन । समुद्र घाली लोटांगण । श्रीराम वंदी सिंधुचरण । ज्येष्ठ संपूर्ण तूं आम्हां ॥ ७० ॥ ज्येष्ठ कनिष्ठ हा अभिमान । तेणें मजमाजीं पाडलें ठाण[1] । श्रीरामाचें महिमान । ज्येष्ठाभिमानें कळों नेदी ॥ ७१ ॥ खांबीं उपजला सिंहवदन† । तो काय धाकुटा प्रल्हादाहून । तैंवी ‡ज्येष्ठ तूं रघुनंदन । धाकटेपण तुज नाहीं ॥ ७२ ॥ पायें तारिसी पाषाण । तो तू परमात्मा परिपूर्ण । तुज कैचें धाकुटेपण । ज्येष्ठज्येष्ठपण श्रीरामीं ॥ ७३ ॥ तुं परब्रह्म ब्रह्मस्थिती । तुं परमात्मा परंज्योती । तुं चिदात्मा[2] चिन्मूर्ती । सगुणानुवर्ती निर्गुणत्वें ॥ ७४ ॥ तुज देखतांहि सगुण । परी तुं सर्वांगें निर्गुण । हेंही§ जाण उणी खूण । श्रीराम पूर्ण परब्रह्म ॥ ७५ ॥

समागतौ लक्ष्मणवानराधिपौ
विभीषणश्चर्क्षपतिश्च जाम्बवान् ।
मुदा प्रतीता हरयो वरप्रदं
नेमुश्च रामं सगरस्य चात्मजम् ॥ १३ ॥
स दिव्यरूपाभरणो महाद्युति-
र्दृष्ट्वा तु रामं मुनिवेषधारिणम् ।
गिरा समाघ्राय जयाय युंक्ष्व
समीक्ष्यमाणोऽपससार सागरम् ॥ १४ ॥
न वत्स युद्धे मुनिवेष इष्यते
विभज्य कर्माणि चरन्ति पार्थिवाः ।
त्वं राम राजाभरणैरलंकृतो
जयाय गच्छेति चकार सत्वरः ॥ १५ ॥
तथेति चोक्त्वा वचनं महोदधे-
र्विसृज्य चीराणि जटा नियम्य च ।
शुभानि राजाभरणानि चादधे
समुद्रहस्तात्कवचायुधानि ॥ १६ ॥

युद्धाला मुनिवेषात न जातां क्षत्रियाप्रमाणें जावें– सिंधु उतरला श्रीरघुनाथ । समुद्र स्वयें* आला तेथ ।

१ शत्रुविरहित. २ समुदाय.

¶ समाप्ती.

१ नागवण. २ ज्ञानस्वरूप.

† ड–नी. ‡ क्ष–ज्येष्ठज्येष्ठ. § क्ष–हे मी जाणतों तुझी खुण; बक–हें मी जाणे उणेपण. * बक–रूपें.

त्या दोघांसी समस्त । स्वयें वंदित तें ऐका ॥७६॥ लक्ष्मण सुग्रीव जांबवंत । बिभीषणादि वानर समस्त । श्रीरामा आणि सिंधूसी वंदित । दोघे समर्थ अति श्रेष्ठ ॥ ७७ ॥ समुद्रें करोनि स्तवन । स्वयें घालोनि लोटांगण । श्रीराम वंदी सिंधुचरण । ज्येष्ठ संपूर्ण तूं आम्हां ॥ ७८ ॥ ज्येष्ठकनिष्ठपणाची कथा । मागें वदलों मी यथार्थता । कांहीं एक विनवितों श्रीरघुनाथा । कृपावंता अवधारीं ॥७९॥ मुनिवेषें श्रीरघुनाथा । युद्ध नये गा रणीं करितां । ऐक मुनिवेषाची कथा । तुज तत्वतां सांगेन ॥ ८० ॥

मुनिवेष केव्हां चालेल–मुनिवेष पाहिजे निवृत्ती[1]। मुनिवेष पाहिजे शांतीं । मुनिवेष पाहिजे परमार्थीं । युद्धकंदनार्थीं नये कामा ॥ ८१ ॥ मागील राजे नरवीर । युद्धार्थ करिती वीरशृंगार । युद्धीं आलिया मुनिवेषधर । वीर जुंझार न मानिती ॥ ८२ ॥ मुनिवेषाचें लक्षण । स्वभावें केलें निरूपण । मारिले त्रिशिरा खर दूषण । मुनिवेषपण असतांचि ॥८३॥ संन्यासी आणि झेंपदे[2] राऊत[3] । हा [4]आहणा होईल प्राप्त । मुनिवेषें युद्धकंदनार्थ । नव्हे शास्त्रार्थ श्रुतिमूळ ॥ ८४ ॥ निवडा वीर तूं समर्थ । कांहीं एक माझें मनोगत । श्रद्धें पूजावा श्रीरघुनाथ । अलंकारयुक्त उल्हासें ॥ ८५ ॥ सर्वालंकारभरणीं । उभा ठाकलिया रणांगणीं । आमच्या डोळ्यांची पुरेल धणी । म्हणोनि चरणीं लागला ॥ ८६ ॥ पुढती अलंकारयुक्त । कैं मी देखेन श्रीरघुनाथ । माझे पुरवावे मनोरथ । सिंधु विनवीत अति श्रद्धें ॥ ८७ ॥ सुग्रीवअंगदादि जुत्पती । सालंकृत श्रीरघुपती । पहावया उल्लास चित्तीं । आल्हादवृत्ती स्वानंदें ॥ ८८ ॥ श्रीराम बाणल्या रत्नाभरणें । फिटेल डोळ्यांचे पारणें । उठे वल्कलाचें धरणें । बोळवणें मुनिवेषा ॥८९॥ लेइल्या अलंकार विचित्र । सुखी होतील आमचे नेत्र । तुझे देखतांचि वक्त्र[1] । सुख चिन्मात्र कोंदाटे ॥ ९० ॥ श्रीराम देखिल्या कृपानिधी । मनाच्या सकळ आधिव्याधी । अहं-कोहंसोहंसिद्धी । याही उपाधी हरपती ॥ ९१ ॥ चित्त होय चैतन्य । बुद्धि होय समाधान । प्रपंच होय ब्रह्मार्पण । श्रीरामदर्शन अति श्रेष्ठ ॥ ९२ ॥

तें पाहून समुद्राला आनंद–सिंधु सुग्रीव आणि वानर । अवघे करोनि जयजयकार । भावें प्रार्थितां रामचंद्र । कृपें रघुवीर तुष्टला ॥ ९३ ॥

[illegible]

सिंधुसुग्रीवप्रार्थन । ऐकोनियां रघुनंदन । स्वयें जाला सुप्रसन्न । मुनिवेषपणत्यागार्थ ॥९४॥ फेडो-नियां वल्कलांबर । श्रीराम वेष्टी पीतांबर । जो कां अत्यंत मनोहर । स्वयें समुद्रें आणिला ॥ ९५ ॥ श्रीरामकासेसीं लागोन । वीज विसरली अस्तमान । तैसा पीतांबर जाण । दैदीप्यमान तेजस्वी ॥९६॥ स्वयें श्रीराम आपण । सुमनीं[2] जटा आच्छादोन । त्यावरी समुद्रें आपण । मुकुट संपूर्ण बाणला ॥९७॥ अनर्घ्यरत्नीं रत्नघन । मस्तकीं मुकुट दैदीप्यमान । तेणें शोभला श्रीरघुनंदन । जननयनसुखकारी ॥९८॥ निजतेजें घवघवोनी[3] । मुकुट माथां अनर्घ्यमणी । श्रीराम शिरोमणींचा शिरोमणी । तोही [4]आभरणीं शोभत ॥ ९९ ॥ कुंडलें शोभती मकराकार । हा लौकिक बाह्य विचार । तो मुख्य मूळीं निर्विकार । श्रवणें विकार निर्दाळी ॥१००॥ उभय बाहूबाहुवटें । वरी कंकणें उद्भटें । मुक्ताफळें श्रेष्ठश्रेष्ठें । शोभती मनगटें सुंदर ॥ १ ॥ मनगटें बाणलीं सुंदरें । कंठीं बाणली चौसरें । श्रीरामा आवडे एकसरें । गुह्य समुद्रें नेणिजे ॥ २ ॥ गुणातीत परिपाक । तेंचि श्रीरामा हृदयीं पदक । पाहतां जीवशिवां पडलें टक । अलौकिक निजसेवा ॥ ३ ॥ कटीं बाणली

१ मोक्षाचे कामीं. २ बलाढ्य. ३ स्वार. ४ म्हण.

१ तोंड. २ पुष्पांनीं. ३ शोभोन. ४ अलंकारांनीं.

कटिमेखळा । क्षुद्रघंटिकाज्वाळमाळा । कंठीं अनर्घ्य रत्नमाळा । मुक्ताफळांसमयोगें ॥ ४ ॥ वांकीआंदुवांचा मेळा । ज्यांचा धाक कळिकाळा । वैरी कांपती चळचळां । तो चरणकमळा तोडरू ॥५॥ श्रीरामाचा [1]मुखमृगांक । परिपूर्णत्वें निष्कळंक । त्याचे उपमे नये शशांक[2] । तो सकळंक क्षयरोगी ॥ ६ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । कांसे कसिला सोनसळा । घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ ७ ॥ टिळक रेखिला पिंवळा । आपाद कंठीं रत्नमाळा । घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ ८ ॥ कंठीं कौस्तुभ तेजाळा । कटिसूत्रीं किंकिणीजाळमाळा । ऐसा घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥९॥ मुक्तीचा दुकाळ मुक्ताफळां । ते पडली श्रीरामाच्या गळां । मुक्ती देवोनि मुक्ताफळां । घन सांवळा शोभत ॥११०॥ [3]अम्लान [4]नवपंकजांची माळा । श्रीरामा तुळसीमाळ गळां । तोडर गर्जे रामपदकमळा । घनसांवळा घवघवीत ॥११॥ हृदयीं पदक अति गंभीर। बाहीं बाहुवटें मनोहर । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ १२ ॥ चरणकमळीं संत भ्रमर । [5]वाकीअंदुवांचा गजर । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥१३॥ रूपरेखा अति लावण्य । ऐसा देखोनि रघुनंदन । ठाणमाण लावण्यघन । नाचती नयन सुखोर्मी ॥ १४ ॥ मांडोनि माहेश्वरी ठाण । करीं धरोनि धनुष्यबाण । ऐसा देखोनि रघुनंदन । नाचती नयन सुखोर्मी ॥१५॥ वीरकंकणीं झणत्कार । करमुद्रिका दशावतार। ऐसा देखोनि रामचंद्र। नाचती नेत्र सुखोर्मी ॥ १६ ॥ नेत्र निवाले निर्विकारें । बुद्धि दोंदली सन्मात्रें । हृदय आनंदलें समग्र । चिदचिन्मात्र श्रीराम ॥ १७ ॥ अहंकोहंसोहंपण । सांडोनि अभिमान आपण । वंदितां श्रीरामाचे चरण । स्वानंदें पूर्ण निवाले ॥१८॥ वीर शृंगार श्रीराममूर्ती । देखतांचि इंद्रियवृत्ती । परमानंदें नित्य तृप्ती। सरित्पति तटस्थ ॥ १९ ॥ टक पडिलें सुरनरां । टक पडले वानरा । टक पडिलें सुरनरां । श्रीरामचंद्रा देखोनी ॥ १२० ॥

व त्याने रामावरून रत्नें ओंवाळिलीं—वाहों विसरलें जीवन । जळों विसरला पवन । रवि विसरला दिनमान । श्रीरघुनंदन देखोनी ॥ २१ ॥

ते पाहून समुद्राला आनंद—देखतां श्रीरामाची मूर्ती । समुद्र सुखावला चित्तीं । सुग्रीव सुखावला कपिपती । सुखी जुत्पती वानर ॥२२॥ सुखावोनि वानर । अवघे करिती जयजयकार । देतां रामनामें भुभु:कार । नादें अंबर कोंदलें ॥ २३ ॥ समुद्रें श्रीराम धरोनि हातीं । नेला वरुणालयाप्रती । वरुणासी नमस्कारी रघुपती । वृद्ध मूर्ति देखोनी ॥२४ वरुण घाली लोटांगण । श्रीराम अवतारी ब्रह्म पूर्ण । शीघ्र करीं लंकागमन । विजयी पूर्ण तूं होसी॥२५॥ जैसा शृंगारिला श्रीरामचंद्र। तैसाचि सखा सौमित्र[1]। दोघे महावीर शूर । जेंवी रविचंद्र आकाशीं॥२६॥ समुद्रें आणोनियां जाण । रत्नावळी भरोनि पूर्ण । श्रीरामासी ओंवाळून । सांडिली आपण स्वानंदें ॥ २७ ॥ पृथ्वी येवोनि उठाउठीं । ओंवाळोनि धनकोटी । वांटूं जातां समुद्रतटीं । मागता दृष्टी दिसेना ॥ २८ ॥

तीं वानरांनीं उधळलीं तीं रावणाचे सभेंत पडलीं—श्रीरामाचिये संगतीं । लोलुपता[2] निमाली निश्चितीं । मागण्याची समूळ शांती । स्वानंदें तृप्ती सर्वांसी ॥२९॥ मागता न देखोनि दृष्टीं । वानरीं उडोनि उठाउठीं । रावणाचे सभानिकटीं । केली वृष्टी धनरत्नीं ॥१३०॥ कायसी[3] धनरत्नांची वृष्टी । पाहूं

---

१ मुखचंद्रमा. २ चंद्र. ३ न कोमेजणाऱ्या. ४ नवीन कमळांची. ५ वाजुबंद.

१ लक्ष्मण. २ लोभ. ३ कां ?, कशामुळे ?

घाडिल्या राक्षसकोटी । घेवोनि वानरसेनाकोटी । आला जगजेठी श्रीराम ॥ ३१ ॥

तेव्हां चौकशी करितां राम-सैन्य आल्याचें त्यास समजलें—आला ऐकोनि श्रीरामासी । दशानन चिंता मानसीं । पाहों धाडिलें प्रधानांसी । आणि लंकेसीं आकांत ॥ ३२ ॥ मागें पळावया नाहीं वाडी । पुढें आली वानरघाडी । रावणाची बुद्धि कुडी । बांदवडी स्त्रीपुत्रां ॥ ३३ ॥ एका जनार्दना शरण । हदादिलें[1] लंकाभुवन । श्रीराम येवोनि आपण । करील कंदन राक्षसां ॥ १३४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसैन्यसिंधुपरपारप्रवेशो नाम एकचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥४१॥ ओंव्या ॥ १३४ ॥ श्लोक ॥ १६ ॥ एवं १५० ॥

## अध्याय ४२ वा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

आला ऐकोनि रघुनंदन । भयें भयभीत दशानन । प्रधान सेना अति उद्विग्न । लंकाजन सकंपित ॥१॥ चाकाटला रावण । तंव भेरी लावोनि निशाण । स्वयें आला रघुनंदन । वानरसैन्यसंभारीं ॥ २ ॥

ततस्तु तूर्यघोषेण भेरीशब्देन नादिता ।
राघवस्यागमत्सेना नानाप्रहरणान्विता ॥ १ ॥
समागतां तु तां सेना दृष्ट्वा राजा दशाननः ।
मुहूर्तं ध्यानमास्थाय सचिवान्वाक्यमब्रवीत् ॥ २ ॥
वाक्यं वाक्यविदां श्रेष्ठाः शृणुध्वं मम राक्षसाः ।
न ज्ञात भवतामद्य लंका प्राप्तः स राघवः ॥३॥
सहितः सर्वसैन्येन वानराणां सलक्ष्मण. ।
निवारण नैव कृतं वानराणां रणाजिरे ॥ ४ ॥
गृहीत्वा वानरान्सर्वान्सेतुर्बद्धो महोदधौ ।
भवतो विषयासक्ता प्रसंगे शयनं गताः ॥५॥

लंकेंत सर्वत्र हलकल्लोळ व रावणावर सर्व दोष—शंख भेरी टाळ घोळ । काहळा वाजती चिनकाहळ । ढोल पटह मांदळ । ध्वनि आगळा बुरुंगें ॥ ३ ॥ घडैघडै विख्यात वाही । निशाणां लागली एक घाई । विराणीं[1] वाजती दोहीं बाहीं । गिडबिढ ठायीं गर्जती ॥ ४ ॥ ऐसा वाजत्रांचा गजर । घेवोनि कपिकुळसंभार । लंके आला रघुवीर । केला भुभुःकार वानरीं ॥५॥ देखोनि श्रीरामाचा यावा[2]। कल्पांत रावणाच्या जीवा । कायसा प्रधानाचा केवा[3] । दुःखकालोवा[4] राक्षसां ॥ ६ ॥ श्रीराम आला वानरभारीं । अति आकांत लंकापुरीं । शंख करिती घरोघरीं । नर नारी कळकळिती ॥ ७ ॥ वानरदळ देखोनि गाढें । एक चाले एकापुढें । एक एकामागें दडे । कोणीकडे दडावें ॥ ८ ॥ पळावया वाट नाहीं पुढें । वानरीं वळकाविले हुडे[5] । रावणाचें कर्म कुडें । मरण रोकडें सर्वांसी ॥ ९ ॥ रावणअपराधासाठीं । मरती राक्षसांच्या कोटी । घरोघरीं बोंब उठी । वानर दृष्टीं देखोनि ॥ १० ॥

रावणानें प्रधानांचा केलेला धिःकार व निर्भर्त्सना—पापबुद्धि लंकानाथा । चोरोनि श्रीरामाची कांता । करविलें लंकेच्या घाता । उपाव आतां चालेना ॥ ११ ॥ पूर्वीं सूचवी बिभीषण । सीता देवोनि रिघावें शरण । पापी नायके आपण । आलें मरण राक्षसां ॥ १२ ॥ आला देखोनि रघुनंदन । अति क्षोभला दशानन । पाचारोनियां प्रधान । बोले आपण तयांसी ॥१३॥ घेवोनियां वानरसैन्य । लंके आला रघुनंदन । तरी तुम्हांसी नाहीं ज्ञान । मदें मैथुनविषयांध ॥ १४ ॥ समुद्रीं तारोनि पाषाण । सेतु बांधिला संपूर्ण । तरी तुम्हास नाहीं ज्ञान । मदें मैथुनें विषयांध ॥ १५ ॥ श्रीराम येवोनि सह परिवारीं । वानर ठाकिले उरावरी । तुम्ही सुपुष्टीत स्त्रियाजानूंवरी । विषयसंचारीं विषयांध ॥ १६ ॥ सहलक्ष्मण वानरभारीं । श्रीराम आला लंकेवरी । तुम्ही विषयांध निदसुरी । आदळे वैरी तुम्ही नेणां ॥ १७ ॥ मद्यमैथुनीं तत्पर । नाहीं जवळी हेर

---

१ हदबदलें.

१ वाद्यविशेष. २ आगमन. ३ पाड, गणना. ४ दु:खाचा कढ. ५ बुरूज.

चार[1]। वैरियें घेतलें घर। तुम्ही पामर तें नेणां ॥ १८ ॥ पंचविषय पंचभूत। तुम्हांस लागलें निश्चित। लंके आला श्रीरघुनाथ। तुम्ही सभ्रांत नेणांचि ॥ १९ ॥ पूर्वील तुमचा बडिवार[2]। म्हणा बापुडे ते वानर। वनचर पालेखाइर। आम्हांसमोर कैंचीं येती ॥ २० ॥ तेचि वानर महावीर। सेतु बांधोनि समग्र। लंके आले अति दुर्धर। देती भुभुःकार श्रीरामनामें ॥ २१ ॥ काळकृतांत दशानन। त्यातें करोनि तृणासमान। सेतु बांधोनि वानरगण। युद्ध दारुण करूं आले ॥२२॥ उपेक्षोनि वीर समस्त। मजचि लक्षोनि निश्चित। वानर युद्धासी उद्यत। अति समर्थ रणयोद्धे ॥ २३ ॥ रोकडें मांडलें असे रण। तुम्ही करितां कपिहेळण[3]। अवश्य तुमचा घेतील प्राण। कपि विचक्षण रणयोद्धे ॥२४॥ तुमचिया असावधानता[4]। लंकें येणें श्रीरघुनाथा। वानरीं सेतुबंधनता। नेणों सर्वथा अति गर्वें ॥ २५ ॥

बध्यमानं तथा सेतुं वानरैश्च निशाचराः।
द्रष्टुं चारा न प्रहिता मन्त्रिपक्षो मदोद्धतः ॥ ६ ॥
हितं मन्त्रयते राज्ञः स मन्त्रीति निगद्यते।
मंत्रिभिः सह कार्यार्थः सिद्धिं गच्छत्यसंशयम् ॥७॥
एवं भवद्भिर्विश्रभाद्वंचितोऽहं निशाचराः।
अंको ममाय सुमहान्यदि कार्यं विनक्ष्यति ॥ ८ ॥

बिभिषणाच्या वाक्याची आठवण—वानरवीर स्वयें समस्त। कडकडाटें सेतु बांधित। तें तुम्ही नेणां गर्वोन्मत्त। मद्याभिभूत[5] स्त्रीकामी ॥ २६ ॥ मनोन्मत्त मदोन्मत्त। स्त्रीकामें कामोन्मत्त। गर्वोन्मत्त बळोन्मत्त। पंचोन्मत्त तुम्ही सर्व ॥ २७ ॥ पंचोन्मत्त उन्मत्त पूर्ण। चोर हेर[6] पाठविले कोण। माझ्या कार्याची आठवण। तुम्हांसी विस्मरण उन्मादें ॥ २८ ॥ सर्वदा रायाचें हित विचारी। यालागीं त्यासी म्हणिजे मंत्री। तें कार्य नाहीं तुम्हांमाझारी। विषयसंचारी विषयाचे ॥ २९ ॥ सकळ कार्य प्रधानांहातीं। ऐसी अनादि राजनीती। तुम्ही माझे विश्वासघाती। ठकिलें निश्चितीं निजस्वार्थी ॥ ३० ॥ तुम्हांस मज विश्वासता। तुम्ही पेटलेति माझ्या घाता। लंके आणिलें श्रीरघुनाथा। कुळक्षयार्थी समूळीं ॥ ३१ ॥ बिभीषण माझा धर्ममूर्ती। तो बोलिला सत्य युक्ती। प्रधान तुझे विश्वासघाती। हेही प्रतीति मज आली ॥ ३२ ॥

मेघनादाचें आश्वासन—उन्मादें मदोन्मत्त प्रधान। अविश्वासी यांचें वदन। ऐसें बोलिला बिभीषण। प्रत्यक्ष प्रमाण मज आलें ॥ ३३ ॥ माझा बिभीषण येथें असता। तो सेतुचि बांधों न देता। येवों न देता रघुनाथा। माझ्या निजहिता कृतोपकारी ॥ ३४ ॥ तुमच्या वचना विश्वासोन। सखा दवडिला बिभीषण। आंगीं आदळला[1] रघुनंदन। कपटी प्रधान मज माझे ॥ ३५ ॥

रावणेनैवमुक्तास्ते राक्षसा व्रीडिता भवन्।
व्रीडितानां ततस्तेषां मेघनादो ह्यभाषत ॥ ९ ॥
किमर्थं तप्यसे तात राघवो लक्ष्मणस्तथा।
किं करिष्यंति मनुजा वानरा वनचारिणः ॥ १० ॥
तौ वा मनुष्यमात्रौ† तु भ्रातरौ रामलक्ष्मणौ।
व्यतीते संभ्रमे राजन्नहं हन्मि प्लवगमान् ॥ ११ ॥

लंके आला रघुनंदन। सकोप रावणाचें वदन। ऐकोनि सेना प्रधान। लज्जायमान जाहले ॥३६॥ गजरें आला रघुनंदन। आंगीं आदळलें विघ्न। लज्जायुक्त प्रधान। कंपायमान भयभीत ॥ ३७ ॥ आला देखोनि रघुनाथ। रावण कोपें जाला कृतांत। प्रधानराक्षसेंसीं आकांत। प्राणावर्त सर्वांसी ॥ ३८॥ अधोवदनें अवघे स्तब्ध। कांहीं न बोलती शब्द। तया काळीं मेघनाद। करी अनुवाद जनकासी ॥३९॥ आला देखोनि श्रीरघुनाथा। तूं कां व्यर्थ भीसी ताता। कायसी रामलक्ष्मणांची कथा। कपि समस्त

---

१ जासूद. २ मोठेपणा. ३ वानराची निंदा. ४ गैरसावधपणानें. ५ दारू पिऊन गुंग झालेले. ६ दूत.

† य—मंत्रिण त.

---

१ येऊन ठेपला.

† ब—मात्र.

कोण गणी ॥ ४० ॥ इंद्र आणिला बांधोन । बंदीं घातले सुरगण । रामलक्ष्मण ते कोण । वानरगण कोण गणीं ॥ ४१ ॥ वानर स्वयें पालेखाइर । रामलक्ष्मण मनुष्यमात्र । ते तंव आमचा नित्य आहार । भय दुर्धर तुज कैंचें ॥ ४२ ॥ स्वामीनें राहावें सुखें स्वस्थ । तूंही जाणसी माझा पुरुषार्थ । जे जे आले आहेत तेथ । ते मी समस्त मारीन ॥४३॥ विकट बाण वीरश्रेणी[1] । रामलक्ष्मण पाडीन रणीं । अंगद सुग्रीव राजे दोनी । रणीं शोधोनी मारीन ॥४४॥ ज्याचे पवाडे[2] अद्भुत । कंदन केलें लंकेआंत । तो मी मारीन हनुमंत । जांबवंत दूसरा ॥ ४५ ॥ नळ नीळ गंधमादन । तरस तरळ पनस सुषेण । एकैक वानर ससैन्य । निर्दळीन बाणाग्रें ॥ ४६ ॥ माझ्या बाणाची झडाडी । रामलक्ष्मणां प्रेतपरवडी[3] । मारीन वानरांच्या कोडी । तीं बापुडीं मर्कटें ॥ ४७ ॥

मेघनादवचः श्रुत्वा प्रहस्तो वाक्यमब्रवीत् ।
मुद्गलायोधिनो ह्यग्रे कः स्थास्यति रणाजिरे ॥१२॥
मुशलं भ्रममाणं तु रावण स्वमवेक्ष्यथा ।
अहमेको वधिष्यामि तव शत्रुं दशानन ॥ १३ ॥
सुखी भव महाराज यथेष्टं कुरु चेष्टितम् ॥ १४ ॥

नतर प्रहस्ताचें भाषण—ऐकोनि इंद्रजिताचें वचन । प्रहस्त बोले अति गर्जोन । राया तुझें शत्रुदमन[4] । मी करीन एकला ॥ ४८ ॥ माझ्या मुसळघायापुढें । रामलक्ष्मण बापुडे । कायसे वानर बळियाडे । रणीं रोकडे मारीन ॥ ४९ ॥ मुसळ साधन चक्राकार । अष्टांगीं विषम मार । प्रहस्त दावी महावीर । दशशिर अनुलक्षी ॥५०॥ राया तुझा शत्रुसंभार । म्यां मारिला मानीं साचार । सेवोनि पद्मिनीकामसेजार । भोगीं विचित्र स्वयें भोग ॥ ५१ ॥

एवमुक्तः प्रहस्तेन धूम्राक्षो वाक्यमब्रवीत् ।
लंकामूले स्थिताः सुग्रीवमूला सर्वो निशाचराः ॥१५

गच्छामस्त्वरिताः सर्वे तत्र तद्वानरान्बहून् ।
सुखसुप्तान्हनिष्याम एतद्धि मम रोचते ॥ १६ ॥

तसेंच धूम्राक्षाचें भाषण—ऐकोनि प्रहस्तनव्हाळी । धूम्राक्ष गर्जोनि वचन बोली । वानरसेना लंकामूळीं । आतुर्बळी आदळलीं ॥ ५२॥ सन्नद्ध आम्ही अवघे जण । रात्रीं जावोनि आपण । निजले असतांचि जाण । वानरगण निर्दळूं ॥ ५३ ॥ सौमित्र आणि रघुपती । सुग्रीवअंगदादि जुत्पती । जावोनि मारू रातोरातीं । रणसमाप्ती शत्रूसी ॥ ५४ ॥ ऐसी करोनियां ख्याती । यश देऊं लंकापती । हेंचि आवडे माझे चित्तीं । वीराप्रती सांगत ॥ ५५ ॥ ऐसीं धूम्राक्षाचीं उत्तरें । निर्भर्त्सिलीं महोदरें श्रीरामें नित्य रक्षिलीं वानरें । सहपरिवारें सुग्रीवें ॥ ५६ ॥

महोदरोथ निर्भर्त्स्य धूम्राक्षं वाक्यमब्रवीत् ।
वानराणां बल वीरैः समतात्परिरक्षितम् ॥ १७ ॥
न तत्र गमनं शुक्तं पुरा बुद्धिर्विधीयताम् ॥ १८ ॥

महोदर त्याचा धिक्कार करितो—निजल्या वानरां करावा घात । हा कोण तुझा पुरुषार्थ । धूम्राक्षासी सभेआंत । निर्भर्त्सित महोदर ॥ ५७ ॥ श्रीराम नित्य सावधान । स्वयें रक्षी वानरगण । सुग्रीव राजा आपण । करी रक्षण अहोरात्र ॥ ५८ ॥ श्रीराम नित्य सावधान । छळितां मारीच पावला मरण । शूर्पणखा आपण । करितां छळण विटंबिली॥५९॥ तेथें वानरांच्या निजघातीं । तुम्हासी जातां रातोरातीं । श्रीरामबाणाच्या संपातीं । मराल निश्चितीं एकैक ॥ ६० ॥ श्रीराम नित्य देखणा जाण । परी त्याचिया भात्याचे बाण । आंधारी देखणे पूर्ण । घेती प्राण गिवसगिवसूं[1] ॥ ६१ ॥ देखोनि श्रीराम दर्भशिखा । पाठी लागोनी काका । हिंडवोनि तिहीं लोकां । शेखीं वामनेत्र देखा घेतला ॥ ६२ ॥ ऐसिया श्रीरामापुढें । घाला घालणें कैंवी घडे ।

१ शूराचा समुदाय. २ स्तुति, कीर्ति. ३ मरणप्राप्ति. ४ शत्रूचा प्रतिबंध.

१ शोधशोधून.

[बक– + चे.]

REFBK-0010564